# आर्यांच्या सणांचा
# प्राचीन व अर्वाचीन इतिहास.

लेखक

' ऋग्वेदी. '

प्रकाशक

**व्ही. प्रभा आणि कंपनी,**

लक्ष्मीबाग, भटवाडी, गिरगांव–मुंबई,

( पुस्तकाचें पुनर्मुद्रण, भाषांतर वगैरेसंबंधीं सर्व हक्क प्रकाशकांकडे आहेत. )

किंमत,

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press,
318A, Thakurdwar, Bombay.

# दुसरी आवृत्ति.

—:०:—

महाराष्ट्रांतील वाचकवृंदानें माझें पुस्तक १९१६ सालीं प्रसिद्ध झाल्यापासून अवघ्या एका वर्षांत ३००० प्रतींस आश्रय दिल्यामुळें गेल्या सहा वर्षांत या पुस्तकाबद्दल मागणी असतांहि ती पुरवितां आली नाहीं. येथील व्ही. प्रभा कंपनीनें सदरहु पुस्तक व ( गुजराथी खेरीज करून ) त्याचें इतर भाषेंत भाषांतर प्रसिद्ध करण्याचा हक्क मजकडून घेतला त्यामुळें ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. माझ्या धर्मशील देशबांधवांनीं आपल्या उदार आश्रयानें प्रकाशकांस अंगीकृत कार्यांत मदत करावी अशी विनंति आहे.

या पुस्तकावर जे अभिप्राय प्रसिद्ध झाले त्यांत केलेल्या सूचना लक्षांत घेऊन सांप्रतच्या आवृत्तींत बरीच सुधारणा केली आहे. नव्यानें उपलब्ध झालेली माहिती ग्रथित केल्यामुळें या पुस्तकाच्या पृष्ठसंख्येंत आणखी ४८ पृष्ठांची भर पडली. ही माहिती वाचकांस मनोरंजक व महत्वाची आहे असें दिसून येईल. या पुस्तकांत निराधार अशीं कोणतींही विधानें मीं केलेलीं नाहींत. ज्या पुस्तकांच्या आधारानें हीं विधानें केलीं त्यांचा नामनिर्देश करणें म्हणजे माझें पांडित्य प्रगट करण्यासारखें आहे असें वाटल्यावरून मीं त्याचा नामनिर्देश केला नाहीं.

माझी कृति माझ्या महाराष्ट्रीय बंधुभगिनींस प्रिय झाली. विद्वज्जनांनीं व वृत्तपत्रकारांनीं तिचा गौरव केला. गुर्जर वर्गाचें लक्ष या विषयाकडे जाऊन अहमदाबाद येथील गुजरात विद्यापीठाच्या पुरातत्व मंदिरानें या पुस्तकाचें गुजराथी भाषांतर प्रसिद्ध केलें. या गुणग्राहित्वाबद्दल मी सर्वांचा आभारी आहें.

सरस्वती बाग, आंधेरी,<br>
गुढीपाडवा शके १८४६.

'ऋग्वेदी.'

# प्रकाशकांचे दोन शब्द.

या पुस्तकाची पहिली ३००० प्रतींची आवृत्ति आर्यधर्म विचारक मंडळीनें ता. २२ एप्रिल १९१६ रोजीं छापून प्रसिद्ध केली. त्यांनीं वाचकवृंदास उद्देशून खालीं लिहिल्याप्रमाणें आपले विचार प्रगट केले होते:—

" रा. ' ऋग्वेदी ' यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेला हा **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** महाराष्ट्रभाषाभिज्ञ वाचकवर्गाचे स्वाधीन करण्यास आज आम्हांस आनंद वाटत आहे. रावबहादूर अण्णासाहेब महाजनी यांच्या अभिप्रायांतील शब्दांत सांगावयाचें म्हणजे " चैत्रापासून आरंभ करून दरमहिन्यांत कोणकोणते सण पाळण्यांत येतात, त्यांचा शास्त्रोक्त विधि, चालु रूढी, प्रांतपरत्वें विधिभेद, पूर्वेतिहास, चालु रूढींत कोणते फरक करणें इष्ट आहे, इत्यादि सूचना अशी या ग्रंथाची रचना आहे. पूर्वेतिहास मिळविण्याकरितां ग्रंथकारांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत. वेद, ब्राम्हणें, उपनिषदें, सूत्रें, काव्यें, पुराणें, मेगस्थनीस, ह्युएनत्स्यंग, यवनप्रवासी यांचे ग्रंथ, अलीकडील प्राचीन इतिहासाची माहिती–नाणीं, लेणीं, अवशेष, यांच्या सहाय्यानें झाली ती–यांचा आधार घेऊन वर्णन केलें आहे. " हें वर्णन किती सार्थ आहे यासंबंधानें या पुस्तकाच्या शेवटीं दिलेले विद्वज्जनांचे अभिप्राय व रा. रा. वासुदेवराव आपटे यांची विद्वत्ताप्रचुर सुंदर प्रस्तावना ह्यांवरून वाचकांची सहज खात्री होईल. ग्रंथकर्त्यांच्या परिश्रमाचें चीज करणें सर्वथैव महाराष्ट्राच्या हातीं आहे. आणि ज्या महाराष्ट्रास भूषणभूत असलेल्या ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, मुक्ताबाई, जनाबाई वगैरे महानुभावांच्या धार्मिक बुद्धीचा यशोदुंदुभि दिगंतरीं गाजत आहे त्याच महाराष्ट्राची सदैव जागृत असलेली धर्मबुद्धि या स्वधर्मविषयक पुस्तकाचा आनंदानें गौरव करील असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे."

प्रकाशकांनीं प्रदर्शित केलेली आशा फलद्रूप झाली व एका वर्षाच्या आंत सर्व प्रति संपल्यामुळें एक अत्यंत उपयुक्त पुस्तक मिळेनासें झालें. या प्रकारचें समाजांत चैतन्य उत्पन्न करणारें पुस्तक प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या संग्रहीं असणें आवश्यक आहे असें वाटल्यावरून तें पुनः छापून प्रसिद्ध करण्याचें किंचित्

जबाबदारीचें व खर्चाचें काम आम्ही पतकरलें असून आमच्या बंधुभगिनींच्या उदार आश्रयानें लवकरच आमचें ओझें हलकें होईल अशी आम्हास बळकट आशा आहे.

या पुस्तकाची प्रशंसा आम्ही करण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. याच्या शेवटीं छापलेले प्रशंसापर अभिप्राय वाचल्यावर प्रत्येकास हें पुस्तक आपल्याजवळ, इतकेंच नव्हे तर, प्रत्येकाजवळ असणें इष्ट आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. सर्व वाचक हस्तें परहस्तें मदत करून आम्हांस प्रोत्साहन देतील अशी आशा बाळगतों.

या पुस्तकाचें गुजराथीखेरीज करून इतर कोणत्याही भाषेंत भाषांतर प्रसिद्ध करण्याची इच्छा असणारांनीं आमच्याकडे पत्रद्वारें खुलासा करून घ्यावा. विशेषतः हिंदी व कानडी भाषेंत हें पुस्तक प्रसिद्ध होणें इष्ट आहे.

हल्लीं छपाईचा खर्च फार वाढला आहे तथापि या पुस्तकाची किंमत शक्य तितकी कमी ठेविली असून आमच्या महाराष्ट्रीय बांधवांनीं आह्मांस उदार आश्रय द्यावा अशी विनंति करतों.

लक्ष्मीबाग,<br>भटवाडी, मुंबई नं. ४. }

व्ही. प्रभा आणि कंपनी.

# प्रस्तावना.

—:०:—

जसे देवांचे अवतार कांहीं विशिष्ट महत्‌कार्यसिद्ध्यर्थ– जगांत दुष्टांचें दमन व शिष्टांचा प्रतिपाळ करण्यासाठीं–होतात, तसाच प्रकार कित्येक ग्रंथांसंबंधानेंही केव्हां केव्हां घडलेला दिसून येतो. ह्मणजे कांहीं विशेष ईश्वरी योजनेनें समाजांतलें एखादें व्यंग दूर करण्यासाठीं असे ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ति लेखकाचे ठायीं होत असते. तसा प्रकार माझे मित्र रा. 'ऋग्वेदी ' यांच्या आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहासासंबंधानें माझ्या अंतर्दृष्टीला दिसतो. मला अगदीं मनापासून वाटतें कीं, रा. ' ऋग्वेदी ' यांना हें पुस्तक लिहिण्याची जी बुद्धि झाली, ती अगदीं समयोचित स्फूर्तीनेंच झाली आहे; इतकेंच नाहीं, तर सध्यांच्या परिस्थितींत असें पुस्तक लिहिण्याचें काम दिनावधीवर टाकणें अक्षम्य झालें असतें. आज शाळांतून शिकणाऱ्या आमच्या मुलांमुलींची किंवा पोक्तपणानें समाजांत मिरविणारांची आम्ही काय स्थिति पाहतों ? मराठी सहावी इयत्ता शिकणाऱ्या एका मुलीला गुढीपाडवा कधीं येतो, असा प्रश्न मीं एकदां सहज केला असतां तिला तें चटकन् सांगतां येईना; व इंग्रजी पांचव्या इयत्तेंतल्या एका विद्यार्थ्याला दिवाळी अगोदर कीं दसरा अगोदर, ह्या प्रश्नानें दोनचार मिनिटें घोटाळ्यांत घातलें होतें ! ज्या व्यक्ति आज मुलगे किंवा मुली ह्मणविल्या जातात, त्याच दहा पांच वर्षांत समाजांत अग्रगण्य गणिल्या जावयाच्या आहेत. हल्लींचीं पोक्त वयाचीं माणसें अशाच रीतीनें वयानें व प्रतिष्ठेनें वाढलीं आहेत, व हाच क्रम पुढें चालविण्याची कांहीं तरी तजवीज हल्लींच्या शिक्षणपद्धतींत करून ठेवण्यांत आली आहे काय ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आमच्या देशांत पाश्चात्य शिक्षण सुरू झालें तो दिवस एका अर्थानें जसा मोठ्या भाग्याचा, तसाच दुसऱ्या एका दृष्टीनें अत्यंत दुर्भाग्याचा ह्मणण्याची पाळी आलेली पाहून मन दुःखानें उद्विग्न होतें. इंग्रजी शिक्षणानें आमच्या एका डोळ्याला सतेज केलें, आणि त्याला आपलें भविष्य दुरून पाहण्याचें सामर्थ्य दिलें; पण त्याबरोबर आमच्या गतकालीन इतिहासाकडे सप्रेम दृष्टीनें पाहणाऱ्या दुसऱ्या नेत्राची शक्ति मात्र अत्यंत निष्ठुरपणानें हरण केली ! त्यामुळें आमच्या समाजाच्या पूर्वपरंपरेविषयीं,

आमच्या चालीरीतींविषयीं व त्यांच्या प्राचीन उगमाविषयींचें अज्ञान सुशिक्षित समाजांत अप्रतिहत रीतीनें वावरूं लागलें आहे. अज्ञानसुद्धां पुरवतें, पण विपरीत ज्ञान त्याचे जागीं संचार करीत आहे ही त्याहूनही अधिक दुःखाची गोष्ट आहे. आमच्या पूर्वींच्या अस्सल आर्य चाली कोणत्या, त्या पडण्याचा हेतु काय होता, त्यांत मागाहून परकीय चालींची कशी भेसळ झाली व आज त्या मूळच्या चालीचें कसें विकृत स्वरूप दिसत आहे, वगैरे गोष्टींचा विचार करणारे सुद्धां थोडे, मग त्यांतल्या ग्राह्याग्राह्यांशाविषयींची चर्चा व व्यावहारिक अंगीकार करणारे फारच थोडे दिसले, आणि आपल्या चालीरीतींविषयीं अज्ञानानें निष्कारण तिरस्कार व परकीयांच्या चालींचें निष्कारण अनुकरण करण्याविषयींची अज्ञानमूलक प्रवृत्ति हीं दिसून आलीं तर त्यांत नवल काय ? पण कोणत्याही समाजांत अशी स्थिति दिसून येणें हें त्याच्या अधोगतीच्या अनेक लक्षणांपैकीं एक लक्षण आहे, अशी माझी पक्की समजूत आहे. समाजाची सुधारणा म्हणजे अगदीं कोऱ्या करकरीत पाटीवर अक्षरें काढणें नव्हे; किंवा बिनपायावरची इमारत नव्हे. अशी इमारत बांधतां येणेंच अगोदर शक्य नाहीं, मग तिच्या गगनचुंबी उच्चत्वाकडे पाहून मनांत समाधान मानण्याचें भाग्य प्राप्त होण्याची गोष्ट कशाला पाहिजे ? असें प. वा. न्यायमूर्ति रानड्यांसारख्याचें सुद्धां मत होतें; व तें सर्वथा सत्यमूलक आहे असें विचाराअंतीं प्रत्येकास कबूल करावें लागेल. असें जर आहे, व आमच्या सामाजिक सुधारणेची इमारत सशास्त्र व पद्धतशीर रीतीनें उठविण्याची जर आमची खरी खरी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे, तर आमच्या समाजाच्या पूर्वपरंपरेविषयींचे अज्ञानांत राहून कसें चालेल ? आमच्या समाजाच्या पूर्वेतिहासाविषयीं अज्ञानमूलक अभिमान जसा गर्ह्य आहे, तसा त्या इतिहासाविषयीं अज्ञानमूलक तिरस्कारही तितकाच गर्ह्य व हानिकारक नाहीं काय ? अशा विचाराचा प्रादुर्भाव मनांत होऊन त्या अज्ञानाच्या उच्छेदार्थ ' मूले कुठारः ' घालण्याची प्रेरणा होणें व त्या प्रेरणेचें फल प्रस्तुत पुस्तकाच्या रूपानें दृश्य होणें हें आमच्या उदयोन्मुखतेचें लक्षण आहे असें वाटून माझ्या मनाला जो संतोष वाटतो, व त्या संतोषाच्या भरांत मी प्रस्तुत पुस्तकाला **सामाजिक सुधारणाविचारांचें अवतारकृत्य** असें जें गौरवयुक्त अभिधान वर दिलें, त्यांत मित्रप्रेमामुळें जरी थोडी बहुत अतिशयोक्ति झाली असली, तरी सत्याचा भाग बराच आहे असें विचारी वाचकांस दिसून येईल, अशी मला उमेद आहे.

या पुस्तकांत आर्यांच्या बाराही महिन्यांतल्या ठळक ठळक सणांविषयीं संपूर्ण विवेचन केलें आहे. कित्येक ठिकाणीं हें विवेचन वाजवीपेक्षांही जास्त पूर्णत्वानें झालें आहे असें कित्येकांस वाटेल. पण अतिविस्ताराचा आक्षेप प्रस्तुत पुस्तकावर करणारांनीं आमच्या लोकांतला बहुश्रुतपणाचा अभाव विशेषतः लक्षांत घ्यावा म्हणजे एवढा विस्तार करण्याचा ग्रंथकर्त्यांचा हेतु निरर्थक नाहीं असें त्यांना दिसून येईल. आमच्या लोकांच्या सामान्य ज्ञानाची मर्यादा अगदींच संकुचित असल्यामुळें व प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश विद्वानांपेक्षां सामान्य जनतेलाच विशेषतः व्हावा अशी लेखकाची इच्छा असल्यामुळें त्रोटक विवेचन करून गैरसमजुती वाढविण्यापेक्षां अतिविस्ताराचा दोष पत्करून विषयविवेचन सुगम करणेंच लेखकाला अधिक श्रेयस्कर वाटलें असावें, व यांत ते चुकले असले तर त्यांची चूक रास्त बाजूलाच झुकली आहे म्हणून मी तरी त्यांना दोष देण्यास बिलकुल तयार नाहीं.

या पुस्तकाचें नांव "**आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास**" असें देण्यांत ग्रंथकर्त्यानें इतिहासदृष्ट्या एक चूक केली आहे असा आक्षेप येण्याचा संभव आहे. ती चूक म्हणजे ही कीं या पुस्तकांत ज्यांचें विवेचन केलें आहे ते सगळेच सण खरोखर आर्यांचे आहेत, कीं त्यांत अनार्यांच्या उत्सवांची भेसळ झालेली आहे, याची विवेचक दृष्टीनें छाननी न करतां सर्वांना सरसकट आर्यांच्या सणांत सन्निविष्ट करण्यांत आलें आहे, असें कित्येकांस वाटेल. पण माझ्या मतें हा आक्षेप घेणें जितकें सोपें आहे, तितकेंच ते म्हणतात त्याप्रमाणें छाननी करण्याचें काम बिकट आहे. हल्लींच्या काळांत अस्सल आर्य रक्त कोणाच्या अंगांत किती प्रमाणानें आहे याबद्दलच जेथें विद्वानांत वाद आहे, तेथें निवळ आर्यांच्या चालीरीती किंवा सण कोणते होते, हें ठरविणें किती मुष्किलीचें आहे ? व स्वतःच आपण जर अस्सल आर्य नसलों तर अस्सल आर्यांच्या सणांशीं तरी आपणांस काय कर्तव्य आहे ? आपणांत जसें संमिश्रित रक्त आहे व तें आपणांस टाकतां येत नाहीं, तसे आपले सणही आर्य व अनार्य यांच्या मिश्रणानें गढूळ झालेले असले तरी आपणास ते आपले म्हणून टाकतां येत नाहींत; म्हणून या संमिश्रित सणांचें विवेचन आहे तसेंच केलें पाहिजे असा उत्तरपक्ष करतां येण्यासारखा आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, प्राचीन रोमन लोकांनीं निरनिराळ्या देशांतून वसाहती करतांना तेथील लोकांच्या देवतांना व सणांना आपल्या देवांच्या पंचायतनांत व पंचांगांत प्रविष्ट करून लोकसंग्र-

ह्याच्या तत्त्वास मान दिल्याबद्दल पाश्चात्य इतिहासकार रोमन लोकांच्या शहाणपणाबद्दल तारीफ करतात, तर तसाच प्रकार अनार्य जातींच्या संबंधांत आमच्या आर्यपूर्वजांनीं केल्याबद्दल त्यांच्या दूरदृष्टीचा गौरव करण्याचें सोडून त्यांच्या त्या धोरणाला अत्यंत विसदृश असें भिन्नत्वाचें धोरण आपण त्यांच्या वंशजांनीं तरी कां ठेवावें ?

प्रस्तुत पुस्तकाच्या विवेचनांत इतिहासकथन आणि युक्तिवाद अशीं दोन ठळक अंगें आहेत. पैकीं पहिल्या म्हणजे ऐतिहासिक माहितीचे संबंधांत येथें एवढें सांगणें अवश्य आहे कीं, ही माहिती मिळविण्याचे कामीं लेखकानें अत्यंत परिश्रम केले आहेत. एकाच सणाचीं निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळीं स्वरूपें कशीं झालेलीं दिसत आहेत व तीं तशीं कां झालीं वगैरे संबंधांत लेखकानें दिलेली माहिती मला तर कित्येक स्थळीं अगदीं नवीन आढळली व ज्ञानसंग्रहाचे दृष्टीनें पुस्तकाच्या वाचनानंतर आपणांस थोडासा तरी लाभ झाला असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. माझ्यासारखा अनुभव इतर वाचकांनाही थोड्या फार प्रमाणानें येईल व या पुस्तकानें लोकांच्या ज्ञानांत कांहीं तरी भर टाकली असें प्रत्येकास वाटेल, अशी माझी समजूत आहे. ग्रंथकर्त्यांनीं दिलेली सगळीच माहिती बिनचूक आहे किंवा त्यांनीं जागोजाग केलेलीं विधानें समर्थन करण्यासारखीं आहेत असें मी ह्मणत नाहीं. उदाहरणार्थ, पृष्ठ ६५ वर 'हिंदूंस मूर्तिपूजेचा ओनामा बुद्धाच्या अनुयायांनींच घालून दिला,' असें एक विधान आहे. अशा प्रकारचीं विधानें आधाराशिवाय मोघम रीतीनें करणें बरोबर नाहीं असें मला वाटतें. कित्येक ठिकाणीं विषयविवेचनास अवश्य नसतांही तीं करण्यांत आलीं आहेत. पण अशीं स्थळें फार थोडीं आहेत, आणि बहुधा अशा ज्या चुका झालेल्या आढळतात, त्या निर्हेतुक असल्यामुळें क्षम्य आहेत असें मला वाटतें. विषयप्रतिपादनाचें दुसरें अंग ह्मणजे प्रत्येक सण पाळण्याच्या प्रचलित पद्धतीसंबंधानें सुचविलेल्या सुधारणा किंवा जागोजागीं बोध घेण्यासारख्या सुचविलेल्या गोष्टी हें होय. माझ्या मतें हा भाग अत्यंत महत्त्वाचा व जरूरीचा आहे. आर्यांच्या सणांसंबंधानें ऐतिहासिक माहिती देणारीं एक दोन पुस्तकें यापूर्वी मराठींत झालेलीं आहेत; त्यांत व प्रस्तुत पुस्तकांत जें अंतर आहे तें येथेंच आहे. रा. 'ऋग्वेदी' यांच्या अंगच्या सारासारविचारशक्तीची व जुन्यांतला ग्राह्यांश घेऊन त्याच्या पायावर नव्या सुधारणेची इमारत उभारण्याच्या इच्छेची साक्ष पटविणारा व त्यांना कसोटीला लावणारा भाग ह्मणजे

हाच आहे. या भागाकडे समाजाचें—विशेषतः भगिनीवर्गाचें—जितकें लवकर व अधिक लक्ष जाईल, तितकें समाजसुधारणेचें पाऊल पुढें पडेल.

सारांश, ज्ञानसंग्रहाच्या व समाजाच्या प्रगतीच्या अशा दोन्ही दृष्टीनीं प्रस्तुत पुस्तकाची उपयुक्तता मोठी आहे व त्याचा जन्मही अत्यंत समयोचित झाला आहे असें मला वाटतें. हें माझें मत या प्रस्तावनेच्या द्वारें प्रांजलपणें सांगण्याची संधि मला दिल्याबद्दल व अशा उपयुक्त व परिश्रमपूर्वक लिहिलेल्या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचा मान दिल्याबद्दल रा. ' **ऋग्वेदी** ' यांचे आभार मानून सुज्ञ वाचकांच्या हातीं हें पुस्तक मी मोठ्या आनंदानें देतों.

आनंदमंदिर,
इंदूर, ता० २८।३।१६. } **वासुदेव गोविंद आपटे.**

---

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| विषयप्रवेश. ... ... | १ |
| **चैत्र महिना.** | १७ |
| १ संवत्सरप्रतिपदा. ... | २० |
| २ श्रीरामनवमी. ... | २८ |
| ३ दोलोत्सव. ... ... | ६३ |
| ४ गौरीउत्सव. ... ... | ७३ |
| ५ हनुमानजयंति. ... | ७४ |
| **वैशाख महिना.** | ८२ |
| ६ अक्षय्यतृतीया. ... | ८३ |
| ७ परशुरामजयंति. ... | ८७ |
| ८ नृसिंहजयंति.... ... | ९४ |
| **ज्येष्ठ महिना.** | |
| ९ गंगोत्सव ( दशहरा ). | १०७ |
| १० वटसावित्रि..... ... | १२३ |
| **आषाढ महिना.** | १३५ |
| ११ महाएकादशी... ... | १३६ |
| १२ चातुर्मास्य ... ... | १६६ |
| **श्रावण महिना.** | १७२ |
| १३ नागपंचमी. ... ... | १७३ |
| १४ मंगलागौरी. ... ... | १८३ |
| १५ श्रावणी. ... ... | १९० |
| १६ पोंवती पौर्णिमा. ... | २०३ |
| १७ नारळी पौर्णिमा. ... | २०६ |
| १८ श्रीकृष्णजन्माष्टमी. ... | २१९ |
| १९ पिठोरी अमावास्या. ... | २५० |
| २० पोळा ( वृषभोत्सव. ) | २५४ |
| **भाद्रपद महिना.** | २५६ |
| २१ हरितालिका. ... ... | २५७ |
| २२ गणेशचतुर्थी.... ... | २६१ |
| २३ ऋषिपंचमी. ... ... | २७२ |
| २४ ज्येष्ठागौरी. ... ... | २८० |
| २५ वामनद्वादशी. ... | २८२ |
| २६ अनंतचतुर्दशी. ... | २८६ |
| २७ महालय पक्ष.... ... | २९० |
| **आश्विन महिना.** | २९७ |
| २८ नवरात्रमहोत्सव. ... | २९८ |
| २९ विजयादशमी ( दसरा ) | ३१० |
| ३० दीपावली महोत्सव. ... | ३१९ |
| **कार्तिक महिना.** | ३२८ |
| ३१ बलिप्रतिपदा.... ... | ३२९ |
| ३२ यमद्वितीया ( भाऊबीज ) | ३३२ |
| ३३ तुलसीविवाह. ... | ३३६ |
| ३४ धात्रीपूजन. ... ... | ३३९ |
| ३५ वैकुंठचतुर्दशी ... | ३४० |
| ३६ त्रिपुरी पौर्णिमा. ... | ३४२ |
| **मार्गशीर्ष महिना.** | ३४४ |
| ३७ चंपाषष्ठी. ... ... | ३४५ |
| ३८ श्रीदत्तजयंति ... | ३४९ |
| **पौष महिना.** | ३५६ |
| ३९ मकरसंक्रमण. ... | ३५७ |
| **माघ महिना.** | ३६४ |
| ४० वसंतपंचमी.... ... | ३६५ |
| ४१ रथसप्तमी. ... ... | ३६७ |
| ४२ महाशिवरात्र. ... | ३७७ |
| **फाल्गुन महिना.** | ३९९ |
| ४३ फाल्गुनोत्सव व हाळी | ३९९ |
| शेवटची प्रार्थना. ... | ४११ |
| **प्रार्थनापर पद्यें.** | |
| १ प्रभातकालचें ईशस्मरण. | २७ |
| २ श्रीरामाची आरती. ... | ६२ |
| ३ मारुतीस्तवन. ... | ८१ |
| ४ श्रीविष्णूचा महिमा. ... | १६५ |
| ५ श्रीकृष्णाची आरती. ... | २४९ |
| ६ गणपतीची आरती. ... | २७१ |
| ७ दत्तगुरूची आरती. ... | ३५६ |



# विषयप्रवेश.

—:०:—

ॐ सह नाववतु ॥ सह नौ भुनक्तु ॥ सह वीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
ॐ शांतिः शांति शांतिः ॥

—कठोपनिषत् ॥

" आम्हीं उभयतांनीं एकत्र रहावें, एकत्र सेवन करावें, एकत्र सामर्थ्य संपादन करावें, आमचें अध्ययन आम्हांला तेजस्वी करणारें असावें, आमच्याकडून एकमेकांचा द्वेष न घडो."

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥

—मुण्डकोपनिषत् ।

हे देवहो, आमचे कान कल्याणप्रद गोष्टी श्रवण करोत. हे यजनीय देवहो, आमचे चक्षु कल्याणकारक गोष्टी पाहोत. स्थिर अशा अवयवांनीं व शरीरांनीं युक्त होत्सात्या आह्मांकडून तुमचें स्तवन होवो. देवांनीं दिलेलें जें आयुष्य असेल,:तें आम्हांस प्राप्त होवो.

## कालाचें अनाद्यनंतत्व.

काल हा अताद्यनंत आहे, हें जसें हिंदूंनीं जाणलें, तसें इतर कोणत्याही धर्मांतील लोकांनीं जाणलें नाहीं. ख्रिस्ती व महंमदी धर्मांनुसार पाहतां या जगाचा प्रारंभ होऊन सहा सात हजार वर्षेंच झालीं. कालाचें अनाद्यनंतत्व आर्यऋषींच्य

अंतःकरणांत भिनल्यामुळें आकाशांतील निरनिराळ्या खगोलांचें व इतरांचें कौतुक करण्यांत गुंतल्यावेळीं त्यांनीं सूर्य, चंद्र, नक्षत्रें, तारे, मेघ, ऋतु, मास, दिवस वगैरेंचीं जागोजागीं स्तोत्रें गाइलीं आहेत. तैत्तिरेय ब्राह्मणांत विश्वाच्या अनंतत्वाबद्दल पुढीलप्रमाणें उल्लेख सांपडतो.

लोकोसि स्वर्गोसि । अनंतोस्यपारोसि । अक्षितोस्यक्षय्योसि । म्हणजे तूं लोक आहेस; स्वर्ग आहेस, अनंत आहेस; अपार आहेस; अक्षित आहेस व अक्षय्य आहेस. अशा या अद्भुत व अवाढव्य विश्वांत आमचें वासस्थान जी पृथ्वी ती अगदींच लहान असल्याचे त्यांनीं उद्गार काढिले आहेत.

**य उद्‌चीन्द्र देवगोपाः सखायस्ते शिवतमा असाम ।**
**त्वां स्तोषाम त्वया सुवीरा द्राघीय आयुः प्रतरं दधानाः ॥**

ऋ० १-५३-११.

(अर्थ–खरोखर, हे इन्द्रा, पृथ्वी जर दसपट मोठी वाढेल आणि मनुष्याचें आयुष्य चिरकाल टिकणारें होईल, तरच हे उदार देवा, तुझें विख्यात सामर्थ्य, शक्ति आणि पराक्रम ह्या बाबतींत द्युलोकांत मावूं लागेल.) या सूक्तांत मनुष्य-प्राणी हा मर्त्य आहे, हें जसें दाखविलें आहे, तसेंच पृथ्वीहून द्युलोक किती तरी मोठा आहे असें ध्वनित केलें आहे. ज्या कालाच्या तडाख्यांत सर्व स्थिरचर पदार्थ सांपडले आहेत, त्याच्या अनाद्यनंतत्वाबद्दल पुढील विवेचनावरून कल्पना होण्याजोगी आहे. मृत्युलोकांतील मनुष्यप्राण्यांच्या कालगणनेप्रमाणें चार अब्ज बत्तीस हजार वर्षें संपतील, तेव्हां जगाचा कर्ता मानलेला जो ब्रह्मदेव त्याचा एक दिवस भरणार. अशा रीतीनें ब्रह्मदेवाचीं १०० वर्षें पुरीं होतील तेव्हां तो व त्याची सृष्टि नाशाप्रत जाईल. (अर्थात् कालाची सत्ता ब्रह्मदेवावरही चालते, मग बिचारा मनुष्य त्याच्या माऱ्यांतून कसा चुकेल ? तो मारा चुकवून अमर होण्याचा मार्ग शोधून काढण्यांत प्राचीन ऋषी गढून गेले, त्याचें कारण तरी हेंच कीं, या कालासही दाद देऊं नये असें त्यांस वाटलें.) जगाची उत्पत्ति होऊन सध्यां ब्रह्मदेवाचीं ५० वर्षें झालीं. यावरून किती वर्षांमागें हें जग उत्पन्न झालें, त्याची गणती करावी. ब्रह्मदेवाचा एक दिवस संपेपर्यंत १४ मन्वंतरें होतात. त्यांपैकीं स्वयंभु, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत व चाक्षुष हीं मन्वंतरें मागें पडून सध्यां वैवस्वत मन्वंतर चाललें आहे. यानंतर सावर्णि, दक्ष-सावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि आणि इंद्रसावर्णि हीं

सात मन्वंतरें यावयाचीं आहेत. प्रत्येक मनु ७१ महायुगें असावयाचा आणि एक महायुग ४३, २०,००० वर्षेंपर्यंत चालावयाचें. आतांपर्यंत २७ महायुगें झालीं आणि सध्यां २८ वें महायुग चाललें आहे. या २८ व्या महायुगांतील कृतयुग ( १७,२८,००० वर्षें ) त्रेतायुग ( १२,९६,००० वर्षें ), द्वापर युग ( ८,६४,००० वर्षें ), हीं तीन लहान युगें संपून चौथें कलियुग सध्या चाललें आहे. हें कलियुग ४,३२,००० वर्षेंपर्यंत चालू राहील. त्यांतून सध्यां ५०२२ वर्षें संपलीं. या सहस्रांनीं नव्हे लक्षांनीं मोजण्याच्या आंकड्यावरून जगाच्या अनाद्यनंतत्वाची साधारणपणें कल्पना होण्याजोगी आहे.

वेदकालीं ऋषिजनांनीं सूर्यचंद्रादिकांची प्रार्थना करून त्यांच्याप्रीत्यर्थ यज्ञयागादिक चालवीत असतां मास, ऋतु, नक्षत्र वगैरेसंबंधानें कांहीं सिद्धांत ठरविले. त्यांवरून आर्यावर्तांत

## ज्योतिषशास्त्राचा उदय

झाला. पृथ्वीस व सर्व भुवनांस सूर्य हा आधारभूत आहे असें ठरवून त्याची अनेक प्रकारें स्तुति केलेली आहे. वेदांत विष्णु हा शब्द सूर्यवाचक असून त्याच्यामुळें धनधान्य व सर्व प्राणिमात्र यांची उत्पत्ति झाली व पोषण होत असतें, असें दर्शविलें आहेः—

**सवितारं यजति यत्सवितारं यजति तस्मादुत्तरतः पश्चादयं भूयिष्ठं पवमानः पवते सवितृप्रसूतो ह्येष एतत्पवते ॥**

( ऐ. ब्रा. २-७ )

अर्थ—होता सवित्याचें यजन करितो म्हणून उत्तर पश्चिमेकडून फार वारा वाहतो. कारण तो सवित्यापासून उत्पन्न होऊन वाहतो.

यावरून स्पष्ट होतें कीं, उत्तर पश्चिमेकडून वारा वाहण्यास सूर्य कारणीभूत आहे हें देखील प्राचीनकाळीं जाणलें होतें. ऋग्वेदांत सूर्याला ‘ सप्त रश्मयः’ असें म्हटलें आहे. यावरून सूर्यकिरणें सात प्रकारचीं आहेत, असा जो बोध होतो, तो सूर्यकिरणांत सात रंग असल्याबद्दलच्या आधुनिक सिद्धांतास जुळतो असें म्हणतां येईल. सूर्याचा उदय व त्याचा अस्त यासंबंधानें विचार करून प्राचीन लोकांनीं जें मत नमूद केलें, तेंही फार महत्त्वाचें आहे. ऐत्तरेय ब्राह्मणांत ( १४–६ ) असें म्हटलें आहे कीं:—

**स वा एष न कदाचनास्तमेति नोदेति तं यदस्तमेतीति मन्यंतेन्ह एव तदंतमित्वाथात्मानं विपर्यस्यते रात्रीमेवावस्तात् कुरुतेहः परस्तादथ यदेनं प्रातरुदेतीति मन्यंते रात्रेरेव तदंतमित्वाथात्मानं विपर्यस्यतेऽहरेवावस्तात् कुरुते रात्रीं परस्तात् स वा एष न कदाचन निम्रोचति ॥**

अर्थ—( हा सूर्य कधींच अस्त पावत नाहीं किंवा उदय पावत नाहीं. अस्त म्हणजे सूर्य दिवसाच्या अंतास जाऊन स्वतःस उलट फिरवितो—एकीकडे रात्र व दुसरीकडे दिवस करतो. उदय याचा अर्थ असा कीं रात्रीचा तो अंत करून स्वतःस उलट फिरवितो. अलीकडे दिवस व पलीकडे रात्र करतो. वस्तुतः सूर्य कधींच अस्त पावत नाहीं. ) सूर्य व चंद्र यांच्यामुळें पृथ्वीवर प्रकाश व अंधकार यांचें नियमन होऊन शीतोष्णतेमुळें सृष्ट पदार्थांचें स्थित्यंतर होत असतें. वेदकालींच ज्योतिषशास्त्रज्ञांनीं कालमानाचें माप ठरवून वर्ष, ऋतु, मास, वार हे त्याचे मुख्य भाग पाडले. सूर्याभोंवतीं पृथ्वीची एक प्रदक्षिणा पूर्ण होण्यास जो काल लागतो, त्यास सौरवर्ष असें म्हणतात. ३६५ दिवस, ५ तास, ४८ मिनिटें, ४७॥ सेकंद इतका काल लोटल्यास एक वर्ष पूर्ण होतें. परंतु पृथ्वीभोंवतीं चंद्रही फिरत असून २९ दिवस, १२ तास, ४४ मिनिटें, २८ सेकंद इतक्या कालांत एक याप्रमाणें १२ प्रदक्षिणा संपल्या म्हणजे चांद्रवर्ष पूर्ण होतें. यास ३५४ दिवस, ८ तास, ४८ मिनिटें, ३३.५५ सेकंद इतका काल लागतो. अर्थात सौर वर्षाहून चांद्रवर्ष लहान आहे. अजमासें ३६० दिवसांत चांद्रवर्ष संपतें असें वेदकालीन आर्यांनीं जाणलें होतें, हें पुढील सूक्तावरून स्पष्ट होतें.

**द्वादशारं नहि तज्जराय वर्वर्ति चक्रं परि द्यामृतस्य ।**
**आ पुत्रा अग्ने मिथुनासो अत्र सप्त शतानि विंशतिश्च तस्थुः॥**

ऋ. १–१६४–११.

'सत्यभूत ( आदित्याचें ) १२ अरे असलेलें चक्र द्युलोकासभोंवतीं सदैव भ्रमण करीत असतें तरी तें नाश पावत नाहीं. हे अग्ने, या चक्रावर पुत्रांचीं ७२० जोडपीं बसलेलीं आहेत.' त्याच सूक्तांत पुढें असें म्हटलें आहे कीं, 'त्या चाकाला शंकूप्रमाणें ३६० चंचल अरे लगत लावलेले आहेत.' याचा अर्थ असा होतो कीं, संवत्सर हें चक्र असून त्यास १२ मास हे १२ अरे होत. ३६० अरे

हे ३६० दिवसांचे द्योतक असून दिवसरात्र अशीं जोडपीं मानल्यास ७२० दिनभाग होतात.

ज्योतिषशास्त्रांत विशेष प्रगति होत गेली, तसतसे सौर व चांद्र वर्षांचे दिवस नक्की ठरविण्यांत येऊन पांच सौरवर्षांचें एक लहान युग व पांच गुरुवर्षांचें ( किंवा बार्हस्पत्य वर्षांचें ) म्हणजे ६० संवत्सराचें एक युग अशी गणना होऊं लागली. पंचवार्षिक युगांचीं जीं वर्षें, त्यांचीं नांवें संवत्सर परिवत्सर, इदावत्सर, अनुवत्सर व इद्वत्सर अशीं होतीं. ६० सौरमास किंवा ६२ चांद्रमासांचें हें युग असून संवत्सरास ३५५, परिवत्सरास ३५४, इदावत्सरास ३८४, अनुवत्सरास ३५४, व इद्वत्सरास ३८३ याप्रमाणें दिवस मोजीत असत. यांच्याप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी यज्ञांत आहुती देण्यांत येत. सांप्रत या युगाचा प्रचार नाहीं. बृहस्पतीस सूर्याभोंवतीं फिरण्यास अजमासें १२ वर्षें इतका काल लागतो; अर्थात् बार्हस्पत्य किंवा गुरुवर्ष १२ वर्षांचें झालें. अशीं ५ गुरुवर्षें यांत ६० संवत्सरांचा समावेश होत असून प्रत्येकास नांव देण्यांत आलें आहे. प्रभवापासून क्षयापर्यंत ६० संवत्सरें आजमितीसही प्रचारांत आहेत.

सूर्यरश्मीच्या योगानें शीतोष्णतेचें मान नियमितपणें बदलत जाऊन पृथ्वीवरील स्थिरचर पदार्थांवर जो परिणाम होतो, त्याचेंही सूक्ष्म निरीक्षण करण्यांत येऊन हें स्थित्यंतर घडवून आणणाऱ्या कालावधीस ऋतु हें नांव देण्यांत आलें. अर्थात् सूर्य हाच

## ऋतु होण्याचें कारण

आहे हें प्राचीन आर्यवरांस ठाऊक होतें; ह्मणून त्यांनीं ह्मटलें आहे कीं,

**पूर्वामनु प्रदिशं पार्थिवानामृतून् प्रशासद्विदधावनुष्ठु ॥**

ऋ० १–९५—३.

‘ सूर्य ऋतूंचें नियमन करून पृथ्वीच्या पूर्वादि दिशा एकामागून एक निर्माण करतो. ’ प्रत्येक दोन महिन्यांचा एक ऋतु असें मानून तैत्तिरेय संहितेंत **वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत, शिशिर** हीं सहा ऋतूचीं नांवें दिलीं आहेत. क्वचित् ठिकाणीं हेमंत व शिशिर यांचें एकीकरण करून ५ ऋतु मानलेले दिसतात. या सहा ऋतूंपैकीं

**वसंतो ग्रीष्मो वर्षाः । ते देवा ऋतवः शरद्धेमंतः शिशिरस्ते पितरो + + + स यत्रोद्गावर्तते । देवेषु तर्हि भवति + + यत्र दक्षिणावर्तते पितृषु तर्हि भवति—** (शत–ब्राह्मण. २–१)

वसंतादि पहिले तीन ऋतु देवांचे असून शेवटचे तीन पितरांचे आहेत. या प्रकारची कल्पना समाजास अत्यंत मान्य झाली होती म्हणूनच महाभारतकालीं इच्छामरणी भीष्मपितामहानें पितरांच्या ऋतूंत प्राणत्याग करण्याचें बंद केलें. विषुवाचें ज्ञान प्राचीनकालीं चांगलें झालें होतें. तैत्तिरेय संहितेंत

**आदित्यः षण्मासो दक्षिणेनैति षडुत्तरेण ।**

असें म्हटलें आहे. या सर्व ऋतूंत **'तस्य ते वसंतः शिरः'** असें म्हणून वसंतास अग्रमान दिला हें योग्यच आहे. चंद्रकलेचें निरीक्षण करण्यांत येऊन नक्षत्रमार्गानें चंद्राची गति ऋग्वेदाच्या कालीं जाणली होती. (ऋ. मं. ८–३ व मं. १०–८५.) रामायण-महाभारतकालीं यासंबंधानें विशेष शोध करण्यांत आले व चंद्रमाच्या मार्गांतील २७ नक्षत्रांना नांवें देण्यांत आलीं. ज्योतिषाचा अभ्यास करणारा व तत्संबंधीं शोध करणारा एक निराळा वर्ग पुढें आला. त्यास नक्षत्रदर्श किंवा गणक हें नांव पडलें. ( शुक्लयजुर्वेद ३०–१०–२० ). यज्ञयागादिक करणें तीं अमुक नक्षत्रें उदयास आल्या वेळीं करावीं, असें ब्राह्मणकारांनीं ठरविलें. कृत्तिका, रोहिणी, मृगशीर्ष, फल्गुनी, हस्ता, चित्रा या नक्षत्रांचें दर्शन झाल्यावर कोणकोणते यज्ञ करावे हें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. ( २,१२ ). सूर्याचा प्रकाश ऋतुपरत्वें दिवसाच्या अधिकउण्या भागांत प्राप्त होत असतो, हें बारकाईनें ठरवून त्याला जुळता असा यज्ञविधि ऐत्तरेय ब्राह्मणांत सांगितला आहे. नक्षत्रांच्या मार्गानुरोधानें चंद्राची गति ठरविण्यापूर्वी वर्षाच्या

## बारा महिन्यांचीं प्राचीन नांवें

पुढीलप्रमाणें होतीं:— १ मधु, २ माधव, ३ शुक्र, ४ शुचि, ५ नभस्, ६ नभस्य, ७ इष, ८ ऊर्ज, ९ सहस्, १० सहस्य, ११ तपस् आणि १२ तपस्य. याशिवाय सौरमानाप्रमाणें चांद्रमासाच्या गणतीवरून जो एक मासाचा फेर पडत असे, त्यास योग्य कालीं अधिक मासांत गणून 'संसर्प' या नांवानें संबोधित असत. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांत ( सूक्त २५–८ ) असें म्हटलें आहे कीं,

**वेदमासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः वेदाः य उपजायते ॥**

अर्थ—( वरुण ) आपल्या आज्ञा सर्वांस मानावयास लावीत असून त्यास द्वादश मासांचें ज्ञान असतें. त्यापैकीं प्रत्येकांत लोकसंख्येची एकसारखी वृद्धि होत असते. शिवाय त्यास जोडूनच जो महिना कधीं कधीं येतो, त्याचीही

त्यास माहिती आहे. यावरून दिसून येईल कीं, अधिक मासाचें पूर्ण ज्ञान त्या काळीं होतें व सौरमास न गणतां चांद्रमासच गणीत असत.

## अधिकमास.

पृथ्वीभोंवतीं चंद्राची एक प्रदक्षिणा संपण्याला जो काल लागतो, त्याला चांद्रमास असें म्हणतात. याप्रमाणें त्याच्या बारा प्रदक्षिणा होण्यास अजमासें ३५४ दिवस लागतात. पृथ्वीची सूर्याभोंवतीं एक प्रदक्षिणा पूर्ण झाली म्हणजे १ वर्ष संपतें. त्यास ३६५ दिवस, ५ तास, ४८ मिनिटें, ४७॥ सेकंद इतका काल लागत असल्यामुळें सहजच दरसाल चांद्रमान व सौरमान वर्षांत अजमासें ११ दिवसांचें अंतर पडतें. हें अंतर वाढूं न देतां प्रत्येक तिसऱ्या वर्षी एक महिना वाढवून सौरमान वर्षाशीं चांद्रमान वर्षाचा मेळ घालून घेतला जातो. हा जो वाढविलेला महिना त्यालाच अधिकमास असें ह्मणतात. प्रत्येक महिन्यास सूर्य एका राशींतून दुसऱ्या राशींत गेल्याप्रमाणें वाटतो. या भासमान सूर्याच्या गतीस संक्रमण ह्मणतात. असे संक्रमण किंवा संक्रांती बारा आहेत. चैत्र महिन्यांत मेष, वैशाखांत वृषभ याप्रमाणें एका वर्षांत मीनपर्यंत १२ राशींचा सूर्य उपभोग घेतो. अर्थात् बारा सूर्यसंक्रांती होतात. ( मकरसंक्रमण हा सण पहा. ) परंतु चांद्रमासामुळें कधीं कधीं असें होतें कीं, एकाद्या महिन्यांत संक्रमणच घडत नाहीं; ह्मणजे दोन संक्रांतींच्यामध्यें दोन अमावास्या येतात. अशा महिन्यास अधिकमास मानतात. चैत्रापासून आश्विन महिन्यापर्यंत मात्र अधिकमास येतो. कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ य चार महिन्यांत कधींही अधिकमास नसतो. क्वचित् प्रसंगीं फाल्गुनांत अधिक मास असतो.

यावरून दिसून येईल कीं, ज्या महिन्यांत सूर्यसंक्रांत नाहीं तो अधिक मास आहे. कधीं कधीं एकाच चांद्रमासांत दोन सूर्यसंक्रांती होतात. त्याला क्षयमास असें म्हणतात. पूर्वीच्या अधिक मासापासून पुढचा अधिक मास होणें तो तिसाव्या महिन्यापासून आठ किंवा नऊ महिन्यांमध्यें कोणता तरी होतो. एकशें एकेचाळीस वर्षांनीं किंवा एकोणीस वर्षांनीं क्षयमास होतो; तो कार्तिक, मार्गशीर्ष, पौष या महिन्यांतून कोणता तरी होतो. ज्या वर्षी क्षयमास होतो, त्या वर्षी क्षयमासाच्या पूर्वी एक आणि क्षयमासानंतर एक असे दोन अधिक मास होतात. अधिक व क्षयमासाची योजना केवळ चांद्रमान

वर्ष सूर्यमान वर्षाशीं जुळविण्यासाठीं आहे हें जरी खरें, तथापि या महिन्यास मलमास किंवा अशुद्ध महिना असें शास्त्रकारांनीं ठरवून त्या महिन्यांत नित्य नैमित्तिक धर्मकृत्यांबाहेर लग्न, मुंजी वगैरे शुभ कृत्यें करूं नयेत असें ठरविलें आहे. अधिकमासमाहात्म्य व इतर ग्रंथ रचून या महिन्यांत अनेक व्रतें व दानें करण्याबद्दल शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. अधिकमासामुळें एक महिनाच वाढून दरसालचा खर्चही वाढतो, अशा समजुतीनें गरीब स्थितींतील लोक काळजींत असतात. दुष्काळांत तेरावा महिना ही म्हण प्रचारांत येण्याचें कारण तरी हेंच आहे कीं, एक महिन्याचा खर्च अधिक चालविण्याचा बोजा प्रापंचिकांवर अधिकमासामुळें पडतो, अशी चुकीची समजूत आहे. ज्या देशांतील हिंदु पूर्वजांनीं सूर्यचंद्रनक्षत्रादिकांचें सूक्ष्मरीत्या अवलोकन करून कालमानाचें माप योग्य प्रकारें ठरवून दिलें त्यांच्या वंशजांत अज्ञानाचा प्रादुर्भाव होऊन भलत्याच धर्मकल्पनांचा समाजावर पगडा बसावा, यापरतें शोचनीय काय आहे ?

वर सांगितलेलीं महिन्यांचीं नांवें कालेंकरून लुप्त होऊन नवीन नांवें प्रचारांत आलीं. हिंदुधर्मशास्त्रांतील बहुतेक धर्मकृत्यांचा संबंध तिथीशीं अर्थात् चांद्रमानाशीं आहे. संक्रांतीसंबंधी कृत्यें मात्र सौरमानाच्या मासांवर अवलंबून आहेत. बंगाल व मद्रास इलाख्यांतील तामीळ प्रदेश व मलबारप्रांत खेरीजकरून इतरत्र चांद्रमानाप्रमाणेंच वर्ष गणतात. महिन्याचा प्रारंभ मानण्याची पद्धतिही एकाच प्रकारची नाहीं. तथापि सामान्यत्वें प्रतिपदा ज्या दिवशीं सूर्योदयीं असेल त्या दिवशीं चांद्रमासाचा प्रारंभ होतो असें मानतात. सूर्य व चंद्र एका ठिकाणीं येतात तेव्हां अमावास्येचा अंत होऊन मास पूर्ण होतो. कांहीं ठिकाणीं चांद्रमास पौर्णिमांत व कांहीं ठिकाणीं अमावास्यांत किंवा अमांत आहेत. सूर्याभोंवतीं पृथ्वीची प्रदक्षिणा पूर्ण होण्यास जो काल लागतो त्याचा बारावा भाग तो सौरमास. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असते. तथापि सूर्यच प्रत्येक सौरमासीं स्थान बदलतो, असा भास होतो. हीं जीं बारा महिन्यांचीं बारा स्थानें त्यांस आकाशांतील नक्षत्रपुंजांच्या खुणांवरून नांवें देण्यांत आलीं आहेत; त्यांस राशी असें म्हणतात. मेष, वृषभ वगैरे बारा राशी आहेत. चंद्राच्या सांवत्सरिक गतींत जीं २७ नक्षत्रें ठरविण्यांत आलीं, त्यांपैकीं कांहीं नक्षत्रांचा उदय प्रत्येक मासाच्या पौर्णिमेस होत असतो. त्या नक्षत्रावरून चांद्रमासास नांव देण्यांत आलें. उदाहरणार्थ चित्रानक्षत्रयुक्त पौर्णिमा चैत्री या नांवानें ओळखली जाऊन, चैत्री ज्या महिन्यांत आहे तो चैत्र. अशा रीतीनें कृत्तिका, मृगशीर्ष, पुष्य, मघा, फल्गुनी, चित्रा,

विशाखा, ज्येष्ठा, अषाढा, श्रवण, भाद्रपदा आणि अश्विनी हीं नक्षत्रें अनुक्रमें कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद आणि आश्विन या महिन्यांच्या पौर्णिमेस असावयाचीं. परंतु सध्यां पौर्णिमेच्या मागेंपुढें त्यांचा उदय होत असल्याचें दिसून येतें. श्रावण शु. १५ स श्रवण नक्षत्र नसल्यामुळें कधीं कधीं श्रावणी ( उपाकर्म विधि) करण्याचें अन्य तिथीवर ढकलण्यांत येतें, हें आपण पहातों. संवत्सर, मास यांस नांवें देण्यांत आलीं. त्याच प्रमाणें महिन्याचे चार भाग पाडून एका भागांत

## सात दिवस किंवा सात वार

ठरविण्यांत आले. वारांचीं सात नांवें वेदांत कोठें नाहींत. वार यांच्या ऐवजीं वासर हा शब्द ऋग्वेदांत दोन ठिकाणीं आढळतो. अथर्व ज्योतिषांत

**आदित्यः सोमो भौमश्च तथा बुधबृहस्पती ।**
**भार्गवः शनैश्चरश्चैव एते सप्त दिनाधिपाः ॥**

असें ह्मटलें आहे. अर्थात् सध्यां जीं नांवें वारांस आहेत, तींच अथर्व ज्योतिषाच्या कालीं प्रचारांत होतीं हें उघड आहे. याज्ञवल्क्याच्या स्मृतींत

**सूर्यः सोमो महीपुत्रः सोमपुत्रो बृहस्पतिः ।**
**शुक्रः शनैश्चरो राहुः केतुश्चैते ग्रहाः स्मृताः ॥**

अशीं नवग्रहांचीं जीं नांवें दिलीं आहेत, त्यांतून पहिलीं सात वारांसंबंधीं आहेत, हें उघड दिसतें. यावरून याज्ञवल्क्य स्मृतीच्या कालीं रविवार वगैरे दिवसांचीं नांवें प्रचारांत असावीं. वारांची उत्पत्ति, निरनिराळ्या देशांतील वारपद्धतीचें साम्य वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन वारांचीं नांवें हिंदूंनीं परकीय नामपद्धतीस अनुसरून घेतलीं असें ज्योतिषशास्त्रविशारदांचें मत आहे.

सध्यां जी पंचांगाची पद्धति प्रचारांत आहे तिच्याबद्दल विचार करूं.

## पांच अंगें ज्याला आहेत तें पंचांग

होय. हीं पांच अंगें ह्मटलीं ह्मणजे तिथि, वार, नक्षत्र, योग आणि करण हीं होत. अमावास्येच्या दिवशीं सूर्य व चंद्र एके ठिकाणीं येतात. परंतु चंद्र प्रत्यहीं सूर्यापासून पौर्णिमेपर्यंत पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूस जातो; व पुनः सूर्याच्या बाजूस वळून अमावास्येस त्याच्या जवळच्या रेषेंत येतो. याप्रमाणें एका चांद्रमासांत त्याची ३६० अंश गति होते. या ३६० अंशाच्या ३० तिथि गणतात. ह्मणजे १ तिथीस चंद्र व सूर्य यांच्यांत १२ अंशांचें अंतर पडतें; किंवा असेंही

म्हणतां येईल कीं, चंद्रसूर्यांमध्यें १२–१२ अंशांचें अंतर पडण्यास जो काळ लागतो ती तिथि होय. ६३·९ ( अजमासें ६४ ) दिवसांत १ तिथीचा याप्रमाणें १२ चांद्रमासांत ५–६ तिथींचा लोप होतो. सूर्योदयीं जी तिथी असेल तीच गणतात. दोन दिवस सूर्योदयीं तिथी असल्यास तिथिवृद्धि व सूर्योदयीं एखादी तिथि नसल्यास तिथिक्षय असें म्हणतात. तिथीच्या अर्ध्यानें अंतर पडण्यास लागणारा काल ह्यालाच करण म्हणतात. सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदयापर्यंतचा काल त्याला वार म्हणतात. एकेक भाग ८०० कलांचा असे नक्षत्रमंडळाचे २७ भाग करून त्या प्रत्येक भागास आणि तो क्रमण्यास चंद्रास जो काळ लागतो, त्यास नक्षत्र म्हणतात. चंद्रसूर्यांच्या भोगांची बेरीज (योग) करून तिजवरून ८०० कला बेरीज होण्यास जो काळ लागतो त्यास योग म्हणतात. पंचांगांत योग या अंगाचा समावेश वराहमिहिरानंतर करण्याची पद्धती प्रचारांत आली, असें तज्ज्ञांचें मत आहे. ज्योतिषशास्त्राचा याप्रमाणें उत्तम प्रकारें अभ्यास चालवून तें उत्तम अवस्थेस आणून पोहोंचविण्याचें श्रेय आर्यभट्ट (जन्म शक ३९८ ), वराहमिहिर ( शक ४२७ ), ब्रह्मगुप्त ( शक ५२० ) वगैरे प्राचीन पंडितांस आहे. त्यांच्या मागून या देशांत बरेच ज्योतिषशास्त्रज्ञ होऊन गेले. त्या सर्वांनीं तत्कालिन साध्या उपकरणांच्या मदतीनें जे खगोलासंबंधानें शोध केले त्यांचा विचार केला असतां, या प्राचीन शोधकांच्या बुद्धिमत्तेबद्दल मोठें कौतुक वाटतें. जयपुर, मथुरा, काशी, उज्जनी, तक्षशीला वगैरे ठिकाणीं आकाशांतील ग्रहांचे व नक्षत्रांचे वेध घेण्याच्या ज्या प्राचीन कालीं वेधशाला होत्या, त्यांत अनेक विद्यादेवीचे भक्त मोठ्या प्रेमानें रात्रंदिवस वेध घेत बसलेले असत. अशा प्रकारचा शोध करण्यांत या प्राचीन आर्यज्योतिषांना द्रव्यरूपानें मोठा मोबदला मिळत असे असें नाहीं; परंतु त्यांत त्यांना आनंद वाटे. असे शोधक बुद्धीचे निस्पृह वीर या देशांत पुनः अवतीर्ण होतील, तेव्हांच आपला भाग्योदय होईल. ज्योतिषशास्त्रावर अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. एकंदर १८ सिद्धांत लिहिले गेले असें सांगतात. त्यांपैकीं पराशरतंत्र, गर्गसंहिता, ब्रह्मसिद्धांत, सूर्यसिद्धांत, वसिष्ठसिद्धांत, रोमकसिद्धांत, पुलिशसिद्धांत हे प्रसिद्ध आहेत. या शेवटच्या पांच सिद्धांतांवरून वराहमिहिरानें पंचसिद्धांतिका हा ज्योतिष ग्रंथ लिहिला आहे.

कालेंकरून खगोलशास्त्राचा अभ्यास मागें पडून फलज्योतिष पुढें आलें. सूर्य, चंद्र व त्यांच्याहून लक्षावधिपट मोठे असणारे आणि नक्षत्र या नांवानें

ओळखिले जाणारे सूर्य व आमच्यापासून लक्षावधि कोश लांबच्या पल्ल्यावर फिरत असणारे गुरु, शनि वगैरे ग्रह किंवा पृथ्वी यांची नजर आम्हां क्षुद्र मानवांवर असून ते आमच्या बऱ्यावाईटाचे कर्ते आहेत किंवा कसें, पूर्वकर्मानुसार यशापयशाची प्राप्ति होत असते, असें ठाम समजणाऱ्या आम्हीं हिंदूंनीं ज्योतिषावरून ठरणाऱ्या फलांचा विचार करण्यांत अर्थ आहे किंवा नाहीं, हे स्वतंत्र व वादग्रस्त प्रश्न आहेत. इतकी गोष्ट मात्र खरी आहे कीं, मनुष्यप्राणी आपल्या भविष्यत्कालीन सुखदुःखाचें ज्ञान मिळविण्यास सदा उत्सुक असतो. तेव्हां फलज्योतिषाचें महत्व कमीजास्त प्रमाणानें पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत आहे. या देशांत कदाचित् तें विशेष प्रमाणावर मानलें जात असेल इतकेंच. या देशांतील लोकांच्या वांट्यास अनेक प्रकारच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक क्रांत्या आल्यामुळें सहजींच त्यांची प्रवृत्ति दैवावर हवाला टाकण्याकडे होऊन फलज्योतिषाचें महत्व या देशांत वाढलें असावें. यासंबंधानेंही येथील लोकांनीं बरेच परिश्रम केले असून तत्संबंधी वाङ्मय अस्तित्वांत आलें. मुहूर्तमार्तंड, रत्नकोश, मुहूर्तचिंतामणि, मुहूर्तसिंधु, ज्योतिर्विदाभरण वगैरे किती तरी ग्रंथ आज उपलब्ध आहेत. प्रत्येक वर्षाच्या आरंभीं नभोमंडळत असणाऱ्या ग्रहांवरून

## संवत्सरफल

सांगण्याची जी पद्धति आहे, तिच्यासंबंधाचे कल्पलता, राजावलिजगन्मोहन, नरेंद्रवल्ली, समयसिद्धांजन वगैरे ग्रंथ आहेत. स्वरोदय व सारोद्धार हे एका प्राचीन जैन लेखकाचे शकुनासंबंधाचे ग्रंथ आहेत. मुहूर्त, शकुन, योग, पुण्यकाळ वगैरे पाहून कार्यास आरंभ करणारांस तुकारामबुवांनीं केलेला उपदेश लक्षांत ठेवण्याजोगा आहे. तुका म्हणतात

**विठ्ठलाचें नाम घ्यावें । पुढें पाऊल टाकावें ॥**
**अवघा मुहूर्त शकुन । हृदयीं विठ्ठलाचें ध्यान ॥**
**ऐसा पाहिजे हा योग । लाभा उणें काय मग ॥**
**तुका ह्मणे हरिच्या दासा । शुभ काळ सर्व दिशा ॥**

हाच खरा प्रगतीचा मार्ग आहे, हें कोण कबूल करणार नाहीं ?

वरील विवेचनावरून लक्षांत येईल कीं, कालाच्या गतीसंबंधानें वगैरे प्राचीन कालीं बरेच शोध करण्यांत आले. गुरुत्वाकर्षणासारख्या महत्वाच्या बाबीचाही विचार प्राचीन कालीं करण्यांत आला. ब्रह्मसिद्धांताचा लेखक ब्रह्मगुप्त यानें असें

म्हटलें आहे कीं, पदार्थांचें आकर्षण करणें हा पृथ्वीचा नैसर्गिक धर्म आहे. सृष्टिनियमानुसार सर्व पदार्थ पृथ्वीवर पडतात. भास्कराचार्यांनेंही यासंबंधानें असें म्हटलें आहे कीं

**आकृष्टिशक्तिश्च मही तया यत् खस्थं गुरु स्वाभिमुखं स्वशक्त्या आकृष्यते तत्पततीव भाति ॥**

गोलाध्याय–भुवनकोश ।

(अर्थ–पृथ्वीच्या अंगीं आकर्षणशक्ति आहे.ती आकाशांतील एखादा जड पदार्थ स्वशक्तीनें आपणांपाशीं ओढते, तो पडतो असें भासतें.) या गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार सर्व गोल सूर्याभोंवतीं फिरतात हा शोध मात्र आपल्या देशांत झाला नाहीं. याला कारण त्रासदायक राजकीय क्रांत्याच असाव्या. पृथ्वी निराधार आहे, ती गोल आहे, ग्रहणाचें खरें कारण पृथ्वीची किंवा चंद्राची छाया होय वगैरे अत्यंत महत्वाच्या गोष्टींचें ज्ञान कित्येक शतकांमागें आमच्या देशांतील शोधकांस झालें होतें. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां आधुनिक कालांत आमच्या हस्तें ज्योतिषशास्त्राची कांहींच सेवा झाली नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. असो. वर्ष, मास, वार यांच्या प्रमाणेंच

## काल किंवा शक

यांचें ज्ञान असणें इष्ट असल्यावरून तत्संबंधीं माहिती पुढें देत आहों. गत काल मोजण्यास जगाच्या आरंभाचें वर्ष घेणें शक्य नाहीं. या बाबीचा विचार केला असतां आपल्या देशांत 'राजा कालस्य कारणम्' या म्हणीची यथार्थता दिसते. महंमदी, ख्रिस्ती, पारशी, चिनी वगैरे लोकांनीं आपल्या धर्मप्रवर्तकांवरून काल मोजण्याचें आरंभिलें. आमच्या देशांतील विशेषतः 'शक' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या परकीयांच्या स्वाऱ्या हटविणाऱ्या कर्त्या पुरुषांवरून काल मोजण्याचा प्रघात पडला, अशी सामान्यतः समजूत आहे. पुढें पुढें तर 'शक' हाच शब्द 'काल' या अर्थी वापरण्यांत आला. सध्यां जे निरनिराळे काल किंवा शक चालू आहेत, त्यांत सप्तर्षिकाल, विक्रमकाल, शालिवाहनकाल, बंगाली सन, अमली सन, फसली सन, सूरसन, मगीसन, कोल्लम किंवा परशुरामकाल, नेवारकाल, लक्ष्मणसेनकाल, राजशक, विलायती सन आणि ख्रिस्तीसन हे मुख्य होत. त्यांतही विक्रमकाल, शालिवाहन काल व ख्रिस्तीसन हे या देशांत विशेष प्रमाणावर रूढ आहेत.

काश्मीर व आजूबाजूच्या प्रांतांत सप्तर्षिकाल गणण्याची रूढि प्रचारांत आहे. याला 'लौकिककाल' किंवा 'शास्त्रकाल' असेंही नांव आहे.

**सप्तर्षिकाल.** ध्रुवनक्षत्राभोंवतीं सप्तर्षि १०० वर्षांत एक नक्षत्र आक्रमण करितात. याप्रमाणें २७०० वर्षांत त्यांची एक प्रदक्षिणा पूर्ण होते, या समजुतीवर या कालाची गणना आहे. प्रत्येक १०० वर्षें पूर्ण झाल्यावर पुनः पहिलें वर्ष गणण्यांत येतें. पौर्णिमान्त चैत्र शु. १ दा हा सप्तर्षिकालाचा वर्षारंभ आहे.

बंगाल खेरीज करून सगळ्या उत्तर हिंदुस्थानांत विक्रमकाल किंवा विक्रमसंवत् चालू आहे. ख्रिस्तीशकाच्या ५६ वर्षांपूर्वी हा काल

**विक्रमकाल.** गणण्यास प्रारंभ झाला असें जरी मानतात तरी त्यानंतर ६०० वर्षेंपर्यंत या संवताचा उल्लेख जुन्या लेखांत सांपडत नाहीं. त्या सुमारास जो प्रसिद्ध विक्रमादित्य राजा उज्जयिनींत होऊन गेला त्याच्याच नांवावर हा शक चालू झाला. साधारणतः अशी समजूत आहे कीं, विक्रमादित्यानें परकीय लोकांची स्वारी परतविल्यामुळें हा काळ गणण्याची रूढी पडली. यास ऐतिहासिक आधार नाहीं. ख्रिस्तीशकापूर्वी ५६ वर्षें अस्तित्वांत असलेल्या या कालाचा विक्रमादित्याच्या नांवाशीं संबंध जोडण्यांत आला असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. गुप्तराजांच्या वेळचे लेख तपासून मि. फ्लीट यांनीं असें मत दिलें आहे कीं, मूलतः मालवकुलाच्या लोकांत हा संवत्काल रूढ होता. विक्रमादित्याच्या कारकीर्दींत मालव कुलाची उन्नति झाली, तेव्हां त्याच्या नांवानें हा जुना काळ चालू करण्यांत आला.

शालिवाहन नांवाच्या एका कुंभाराच्या पुत्रानें मृत्तिकेचें सैन्य तयार करून त्याच्यांत जीव भरला व त्याच्या मदतीनें शक लोकांचा

**शालिवाहन शक.** पाडाव केला. या विजयाप्रीत्यर्थ शालिवाहननृपशक चालू झाला, अशी सामान्यतः धर्मसमजूत आहे. हाच शक ज्योतिषग्रंथांत घेतला आहे. हा शक मलबार व तिनेवल्ली हे प्रांत खेरीज करून इतरत्र दक्षिण हिंदुस्थानांत रूढ आहे. ह्याचें वर्ष चांद्र व सौर आहे. हिंदुस्थानच्या उत्तरेकडील व पूर्वेकडील कित्येक प्रांतांत स्थानिक कालांबरोबर शककालही गगतात. नर्मदेच्या उत्तरभागीं याचे महिने पौर्णिमांत आहेत, आणि दक्षिणभागींअ मांत आहेत. याचा प्रारंभ ख्रिस्तीशकाच्या ७८ व्या वर्षी आहे,

ऐतिहासिक साधनांवरून असें सिद्ध होत आहे कीं, ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकांत शकराजा कनिष्क याच्या नांवानें हा शक सुरू करण्यांत आला. अर्थात् बौद्धधर्मीय राजाच्या नांवाचा हा काल आहे. या राजानें काश्मीर व पश्चिम हिंदुस्थान काबीज करून आपली सत्ता स्थापन केल्यावर हा शक प्रचारांत आला. तिबेट, ब्रह्मदेश, जावा, सिंहलद्वीप वगैरे ठिकाणीं हा शक चालू होता. त्या देशांतील प्राचीन लेखांत विक्रमादित्यशकाचा उल्लेख नाहीं. सुमारें ५००।६०० वर्षांनंतर शालिवाहन शक हिंदूंनीं चालू केला. परंतु बुद्धराजाचा शक असें न मानतां शकांचा पाडाव हिंदुराजानें केला, या समजुतीवरून त्यांनीं तो शक स्वीकारला. प्राचीन लेखांत याला 'शकनृपकाल, ' 'शकेंद्रकाल ' असें ह्मटलें आहे. या शकास 'शकनरपतेः अतिताब्द 'असें बंगाल्याकडील पंचांगांत ह्मणतात. यावरून देखील हा शकराजाचा काल आहे, असें इतिहाससंशोधकांचें ठाम मत झालें आहे.

कांहीं अर्वाचीन कालविवेचकांच्या मतें शालिवाहन शक हा शालिवाहन राजानें सुरू केलेला नाहीं. सुमारें दहाव्या शतकापूर्वींच्या लेखांत या शकाचा उल्लेख नाहीं. त्याला शालिवाहनशक असें न ह्मणतां ' शक नृपकाल 'वगैरे नांवें दिलीं आहेत. त्यानंतरच्या लेखांत मात्र या शकाचा उल्लेख आहे; आणि असेंही सिद्ध होतें कीं, शकनृपकाल हाच शालिवाहन शक या नांवानें संबोधिला गेला. कित्येक असें प्रतिपादन करितात कीं, शालिवाहन किंवा सातवाहन ही व्यक्ति नव्हती. हें आंध्रभृत्य घराण्याचें नांव आहे. कांहींचें असें मत आहे कीं, शालिवाहन नांवाची व्यक्ति होती. त्याच्यासंबंधानें आंध्रभृत्यांचा समकालीन जो गुणाढ्य कवि यानें स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या शालिवाहनानें आपल्या नांवें शक चालू केला किंवा नाहीं, या प्रश्नाचें मात्र अद्यापि स्पष्टपणें उत्तर मिळालेलें नाहीं.

**हिजरी सन.** हा मूळचा अरबस्थानांतील शक होय. मुसलमानी धर्माचा स्थापक महंमद पैगंबर हा धर्म सुधारण्यासंबधीं प्रयत्न करीत असतां त्याला आपल्या जीवरक्षणासाठीं मक्केहून मदिना येथें पळून जावें लागलें. तो काल हिजरी किंवा पलायनकाल या नांवानें प्रसिद्ध झाला. याचा प्रारंभ इ. स. ६२२ त जुलै महिन्यांत (शक ५४४ श्रावण शु. २ गुरुवार रात्रीं किंवा मुसलमानी शुक्रवारच्या रात्रीं) १५ व्या तारिखेस झाला. बारा चांद्रमास मिळून ३५४।३५५ दिवसांचें हिजरी वर्ष होतें. वाराचा आरंभ सूर्यास्तीं होतो. हा सन मुसलमानी अमदानींत हिंदुस्थानांत चालू झाला.

**बंगाली सन.** बंगाल्यांत बंगाली सन रूढ असून त्याचा आरंभ मेष संक्रांतीस (चैत्र–वैशाखांत ) होतो. मेष संक्रांतीला जो महिना सुरू होतो त्याला वैशाख म्हणतात. यालाच तामिळ प्रांतांत चैत्र म्हणतात. हा सन ख्रिस्तीशकानंतर ५९३ वर्षांनीं सुरू झाला.

**विलायती व अमली सन.** ओढिया प्रांताचा राजा इंद्रद्युम्न याच्या जन्मतिथीपासून म्हणजे भाद्रपद शु. १२ पासून अमली वर्ष सुरू होतें. वर्ष चांद्र व सौर आहे. विलायती सन बंगालच्या कांहीं भागांत मुख्यतः ओरिसा प्रांतांत चालतो. याचें वर्ष सौर व महिन्यांचीं नावें चांद्र आहेत. वर्षारंभ कन्या राशीच्या संक्रमणीं ( भाद्रपदांत ) होतो. हे दोन्ही सन ख्रिस्ती सनानंतर ५९२ वर्षांनीं सुरू झाले.

**फसली सन.** अकबरानें हा सन प्रचारांत आणला. अकबर इ. स. १५५६ सालीं राज्यावर बसला. त्या वेळेपासून हा सन अमलांत आला. पौर्णिमांतमानाच्या आश्विन कृष्ण १ स फसली वर्षाचा आरंभ होतो. ख्रिस्तीशक व फसली सन यांच्यांत ५९२।५९३ वर्षांचें अंतर आहे. बंगाल्यांतील फसली, विलायती आणि अमली या सनांचा अंक एकच असतो. हें वर्ष पिकाच्या हंगामाचें असतें.

**सूरसन किंवा शाहूर सन** हा सन ख्रिस्ती सनापेक्षां ५९९।६०० वर्षांनीं कमी आहे. याचा आरंभ सूर्य मृगनक्षत्रीं जातो तेव्हां होतो. वर्ष सौर आहे. महिने मोहरम वगैरे चांद्र आहेत. मराठ्यांचे कारकीर्दीत सूरसन फार प्रचारांत होता.

**मगीसन.** हा सन चितागांग प्रांतांत सुरू आहे. बंगाली सनाहून ४५ वर्षांनीं कमी असून इतर सर्व गोष्टींत दोन्ही एकच आहेत.

**कोल्लम किंवा परशुराम काल** हा काल केरल देशांत म्हणजे मलबारांत सुरू आहे. मंगळूरपासून कुमारी भूशिरापर्यंत आणि तिन्नवेली प्रांतांत कोल्लम काल गणतात. महिन्यांचीं नांवें मेष, वृषभ वगैरे राशींवरून पडलेलीं आहेत. उदाहरणार्थ कन्नी, चिंगम वगैरे नांवें कन्या, सिंह यांचे अपभ्रंश आहेत. मलबारच्या उत्तरभागांत कन्या राशींत सूर्य येतांच ( भाद्रपदांत ) वर्षारंभ होतो; व इतरत्र सिंह राशींत सूर्य येतांच ( श्रावणांत ) वर्ष सुरू होतें. १००० वर्षांनीं एक चक्र याप्रमाणें चौथें चक्र सध्या चालू आहे असें तेथील लोक समजतात. परंतु हजारावरच न थांबतां

हल्लीं त्याच्यावर कोल्लमवर्ष गेलें आहे. इसवी सनाहून ८२४।२५ वर्षांनीं हा काळ कमी आहे. केरळप्रदेश समुद्रापासून ज्या परशुरामानें मुक्त केला त्याच्या नांवानें हा शक चालू झाला असल्याची तेथील लोकांची समजूत आहे.

**राजशक.** हा शिवाजी महाराजांनीं ज्येष्ठ शु. १३ आनंद नाम संवत्सर शके १५९६ या वर्षीं सुरू केला. याचें वर्ष त्याच तिथीस बदलतें. सर्व गोष्टींनीं याची पद्धति दक्षिणेंतील चांद्रसौर अमान्त शक वर्षाप्रमाणें आहे. इसवी सनापेक्षां हा शक १६७३।७४ वर्षांनीं कमी आहे. सध्यां हा शक चालू नाहीं.

**खिस्ती.** इंग्रजी राजसत्ता या देशांत स्थापन झाल्यापासून हा सन या देशांत प्रचारांत आला. सुप्रसिद्ध धर्मसंस्थापक येशू खिस्त याचा हा जन्मकालचा शक आहे. या सनाचें वर्ष सौर आहे. प्रारंभ जानेवारी १ ल्या तारिखेस होत असतो. प्रत्येक महिन्याचे दिवस ठरविण्यांत आले असून प्रत्येक चार वर्षांनीं एक दिवस अधिक घेऊन सौर वर्षाशीं त्याचा मेळ मिळवून घेतला जातो. तथापि शंभर वर्षांनीं या गणनेप्रमाणें १ दिवसाचा फेर पडतो. त्यासाठीं प्रत्येक शंभराव्या वर्षीं फेब्रुआरी महिन्यास २८ दिवस गणतात. तिसऱ्या जॉर्जच्या कालीं ११ दिवस वर्षांतून एकदम कमी करून सौर मानाशीं वर्षे जुळवून घेण्यांत आलीं. याप्रमाणें निरनिराळे काल आहेत.

अशी ही कालासंबंधाची माहिती असून सणांचा इतिहास देण्यापूर्वीं ती देण्याचें कारण इतकेंच कीं, हिंदूंचे सर्व महत्वाचे सण नक्षत्र, मास, ऋतु वगैरेंवर अवलंबून आहेत. सध्यां यासंबंधाची माहिती कित्येक सुशिक्षित मानल्या जाणारांस नसते, यासाठीं सहजच त्यांच्या कुटुंबांतील मुलांमुलींस व स्त्रियांस हिंदूपद्धतीच्या मासांचें, तिथींचें व इतर गोष्टींचें ज्ञान नसतें. पुढें दिलेला निरनिराळ्या सणांचा इतिहास वाचण्यापूर्वीं वरील माहिती नीट लक्षांत घ्यावी अशी आग्रहाची विनंति आहे. हिंदूंचे जे निरनिराळे सण आहेत त्यांतील मुख्य सणांचें वर्गीकरण खालीं दिल्याप्रमाणें करितां येण्याजोगें आहे.

**ऋतूंवरून प्रचारांत आलेले सण**—संवत्सरप्रतिपदा, अक्षय्यतृतीया, चातुर्मास, श्रावणी, नारळीपौर्णिमा, विजयादशमी, दीपावली, धात्रीपूजन, मकरसंक्रांत, वसंतपंचमी, होळी व शिमगा.

**ऐतिहासिक सण**—श्रीरामनवमी, परशुरामजयंती, दशहरा, कृष्णजन्माष्टमी, वामनद्वादशी (?).

**शैव**—( धार्मिक ) त्रिपुरी पौर्णिमा, महाशिवरात्र.

**वैष्णव**—नृसिंहजयंती, महाएकादशी, अनंतचतुर्दशी, वैकुंठचतुर्दशी, दोलोत्सव.

**कौटुंबिक**—वटसावित्री, मंगलागौरी, पिठोरी अमावास्या, हरितालिका, ऋषिपंचमी.

**शाक्त**—गौर्‍युत्सव, ज्येष्ठागौरी, ललितापंचमी, सरस्वतीपूजन, देवी-नवरात्र, चंपाषष्ठी ( ? ).

**सौर**—रथसप्तमी.

**गाणपत्य**—गणेशचतुर्थी.

---

## चैत्र महिना.

चैत्र हा महिना इंग्रजी एप्रिल महिन्याच्या सुमारास येतो. हा महिना वसंतऋतूच्या प्रारंभीं गणला असल्यामुळें कित्येक उत्सव त्या ऋतूस योग्य होतील असेच रूढ झाले. चैत्र शु. १ दा हा वर्षारंभाचा दिवस मानण्यांत येऊन, त्या दिवशीं ध्वजारोपण, निंबपत्राचें भक्षण, संवत्सरफलाचें श्रवण वगैरे विधि उरकला जातो. चैत्र मास अधिक मास असल्यास नूतन वर्षाचा आरंभ अधिक मासींच होतो. चैत्र शु. १ देपासून ९ मीपर्यंत देवी नवरात्राचा उत्सव करावा. या देवी नवरात्राचा पारणादिक विशेष निर्णय शारद नवरात्राप्रमाणें समजावा असें धर्मसिंधूंत* सांगितलें आहे.

चैत्रापासून चार महिनेपर्यंत प्राणिमात्रास पाणपोईच्याद्वारें जलदान करावें. याला प्रपादान असें ह्मणतात. चार महिने पाणपोई घालण्यास ज्याला शक्ति नसेल त्यानें दररोज ब्राह्मणाच्या घरीं उदककुंभ द्यावा. चैत्र शु. प्रतिपदा ही

---

* धर्मसिंधु या ग्रंथावर आमच्यांतील वैदिक वर्गाची सारी भिस्त आहे. त्यांत अनेक धर्मकृत्यांचा ऊहापोह असून शुभाशुभ कृत्यांचा निर्णय सांगितला आहे. धर्मसिंधु हा ग्रंथ अगदींच अलीकडे ह्मणजे इ. स. १७९० सालीं ( शके १७१२ ) रत्नागिरी जिल्ह्यांत संगमेश्वर तालुक्यांत गोळवली नांवाच्या खेडयांत राहणारे काशिनाथ अनंतोपाध्याय यांनीं संस्कृत भाषेंत लिहिला.

मत्स्यजयंती आहे असें कित्येक मानतात. चैत्रांत दहीं, दूध, तूप आणि मध यांचा त्याग करून दंपत्यपूजनात्मक असें गौरीचें व्रत करावें. चैत्र शु. द्वितीयेच्या दिवशीं प्रदोषकालीं बालेंदूचें पूजन करून चंद्रव्रत करावें आणि याच दिवशीं दवण्यानें शिवगौरीची पूजा करावी. चैत्र शु. तृतीयेपासून एक महिनापर्यंत शिवगौरीचें आंदोलनव्रत करावें. याच दिवशीं रामचंद्राच्या दोलोत्सवाचा आरंभ करून तो एक महिना चालवावा. इतर देवतांचाही आंदोलनोत्सव करावा. चैत्र शु. तृतीयेच्या दिवशीं मत्स्यजयंती व ९ मीच्या दिवशीं श्रीरामजयंती याप्रमाणें जयंत्युत्सव करावे. आणि शु. ११ चे दिवशीं श्रीकृष्णाचा आंदोलनोत्सव करावा. आणि शु. १२ स मदनोत्सव करावा. त्रयोदशीस अनंतपूजनव्रत करावें व १४ स नृसिंहाचा दोलोत्सव करावा. चित्रा नक्षत्रानें युक्त अशा चैत्री पौर्णिमेस चित्रवस्त्रांचें दान करणें सौभाग्यदायक असून रवि, बृहस्पति व शनिवार यांहीं युक्त अशा चैत्री पौर्णिमेस श्राद्धादिक केल्यास अश्वमेधाचें पुण्य पदरीं पडतें असें धर्मसिंधूचें मत आहे. चैत्र शु. ११, पौर्णिमा किंवा मेषसंक्रांति यांतून कोणत्याही दिवशीं वैशाखस्नानास आरंभ करावा. उजाडतांच थंड पाण्यानें एक महिनापर्यंत स्नान केल्याच्या योगानें पुण्यप्राप्ति होते असें धर्मसिंधूचें मत असून कित्येक स्त्रिया ( विशेषतः विधवा ) वैशाखस्नानाचें पुण्य मिळविण्यास कसूर करीत नाहींत. याप्रमाणें चैत्र मासांतील धर्मकृत्यें आहेत. चैत्रमहिन्यांत खालीं लिहिलेलीं धर्मकृत्यें करावीं असें शास्त्रांत सांगितलें आहे:—

१ संवत्सरारंभ, २ देवीनवरात्रोत्सव, ३ रामजन्मोत्सव, ४ प्रपादान, ५ विद्याव्रत, ६ बालेंदुव्रत, ७ मत्स्यजयंती, ८ मदनोत्सव, ९ आंदोलनोत्सव, १० नागपूजा, ११ हयव्रत, १२ अनंगव्रत, १२ हनुमज्जयंती, १४ वैशाखस्नानारंभ, १५ मन्वादि, १६ कल्पादि.

---

## चैत्रांतील उत्सव.

चैत्र महिन्यांत जे उत्सव चालतात ते प्रांतपरत्वें भिन्न आहेत. चैत्र शु. १ स ध्वजारोपणादि उत्सव दक्षिणदेशीं विशेष दृष्टीस पडतो. चैत्र शु. ३ येस गौरीतृतीया असें म्हणतात. या दिवशीं गौरी आपल्या माहेरीं येते व एक महिना राहून वैशाख शु. ३ येस परत आपल्या ( पतीच्या ) घरीं जाते अशी समजूत

आहे. म्हणून गौरीच्या आगमनाच्या दिवशीं हळदकुंकवाचा समारंभ करण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. उत्तरदेशीं क्वचित् ठिकाणीं हा उत्सव पाळला जातो व बंगाल्यांत तर मुळींच पाळत नाहींत. गौरी तृतीया पाळणाऱ्या कुटुंबांत गौरीची स्थापना करून तिच्या पुढें चित्रें वगैरे ठेवतात. गौरीच्या दर्शनासाठीं सौभाग्यवती स्त्रिया व लहान मुली शेजारच्या घरीं जाऊन हळदकुंकुं व फुलें घेतात. रात्रौ गौरीसमोर गीत गाणें, फुगडी घालणें वगैरे मनोरंजक प्रकार होत असतात. हा उत्सव स्त्रियांचाच आहे असें म्हणतां येईल. मत्स्यजयंती विष्णूच्या देवालयांत पाळण्यांत येते. विष्णूनें मत्स्यावतार धारण करून प्रलयाच्या वेळीं मानव जातीच्या मूळ पुरुषांचें व स्त्रियांचें रक्षण केलें अशी कथा शतपथ ब्राह्मणांत आहे. पूर्वकालीं जलप्रलय होऊन मानवजातीचा अंत होण्याचा प्रसंग आला होता तेव्हां परमेश्वरानें नौकेच्या योगानें व इतर परीनें तिचें रक्षण केलें अशी कथा ख्रिस्ती, मुसलमानी व पारसिक धर्मग्रंथांत आहे. यावरून पूर्व कालीं जलप्रलय खरोखरच झाला असावा असें दिसतें. चैत्र शु. ५ ही श्रीपंचमी या नांवानें ओळखली जाते. या दिवशीं गौरीप्रीत्यर्थ सुवासिनींस भोजन वगैरे देण्याची चाल महाराष्ट्राच्या कांहीं भागांत आहे. चैत्र शु. ६ ही स्कंदषष्ठी व अशोक षष्ठी या नांवानें प्रसिद्ध असून उत्तर हिंदुस्थानांत स्त्रिया देवीप्रीत्यर्थ अशोक षष्ठीचें व्रत आचरीत असतात. शिव-पुत्र स्कंद याच्या प्रीत्यर्थ विशेष कांहीं उत्सव होत नाहीं. या तिथीस स्कंदषष्ठी हें नांव आहे इतकेंच. अशोक षष्ठी पाळणाऱ्या स्त्रिया अशोक पुष्पाच्या ६ फुलांच्या कळ्या पाण्यांत घालून तें पाणी पीत असतात. अशी एक कथा प्रचलित आहे कीं पूर्वकालीं एका ऋषीस त्याच्या घराच्या समोर एक मूल सांपडलें. या मुलीचें योग्य प्रकारें संगोपन करून योग्य कालीं तिला एका राजपुत्रास दिली. ती आपल्या पतीच्या घरीं जाण्यास निघाली तेव्हां त्या ऋषीनें तिला थोड्या अशोक वृक्षाच्या बिया दिल्या व मार्गक्रमण करतांना त्या बिया रस्त्यांत टाकण्यास तिला सांगितलें. या बिया उगवून रस्त्याच्या दोन्ही बाजूंस अशोक वृक्षांची रांग तयार होईल व तुला कांहीं संकट प्राप्त झालें असतां या झाडांजवळ येऊन मला हांक मार म्हणजे मी येईन व तुझ्या संकटाचें निवारण करीन असें त्या ऋषीनें मुलीस सांगितलें. कालेंकरून त्या राणीच्या कुटुंबावर अनर्थ कोसळला व एकाच वेळीं तिचे मुलगे व सुना मृत्युमुखीं पडल्या. तेव्हां त्या स्त्रीनें आपल्या पित्याप्रमाणें पालन केलेल्या ऋषीचा धांवा केला. त्यानें त्या अशोक वृक्षांमधून येऊन तिला

तीर्थ दिलें व तें मृतांवर शिंपडतांच तीं जीवंत झालीं. म्हणून त्या षष्ठीस अशोक षष्ठी म्हणतात. चैत्र शु. ८ मीस अवतारी परशुरामानें पापक्षालनार्थ ब्रह्मपुत्रा नदींत स्नान केलें अशी कथा आहे. डाक्याजवळ ब्रह्मपुत्रानदी सीतलाक्षा या नदीस मिळते. या तिथीस या नदींत स्नान केल्यानें पापक्षालन होतें अशी समजूत असल्यामुळें या दिवशीं उत्तर किनाऱ्यावर मोठी स्नानयात्रा भरते. चैत्र शु. ९ मीस रामनवमीचा उत्सव या देशांत सर्वत्र चालतो. या त्रयोदशीस मदन त्रयोदशी असें नांव असून उत्तर हिंदुस्थानांत या दिवशीं स्त्रिया रतिमदनाची पूजा करतात. गीत, वाद्य, नृत्य वगैरे मनोरंजक प्रकार दृष्टीस पडतो. चैत्र पौर्णिमेस हनुमज्जयंतीचा उत्सव सर्वत्र रामाच्या व मारुतीच्या देवालयांतून होत असतो. चैत्र कृ. १३ स शततारका नक्षत्रांत चंद्र आल्यावेळीं गंगास्नान करणें विशेष पुण्यकारक आहे असें मानिलें असून या दिवशीं गंगा व इतर पवित्र नद्यांच्या ठिकाणीं स्नानयात्रा भरते. या उत्सवास वारुणी असें नांव आहे. चैत्र महिन्यांत बंगाल्यांत प्रत्येक गुरुवारीं व महाराष्ट्रांत शुक्रवारीं स्त्रिया लक्ष्मीची पूजा करतात.

---

## संवत्सरप्रतिपदा.

**सर्वेऽत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥**

या जगांत सर्व लोकांस सौख्य प्राप्त होवो ! सर्व लोक आरोग्याचा उपभोग घेवोत ! सर्वांच्या दृष्टीला कल्याणप्रद प्रसंग पडोत ! कोणावरही दुःखाचे प्रसंग न येवोत !

प्रत्येक धर्मांतील लोक वर्षारंभाचा दिवस फार महत्वाचा आहे असें मानतात. मूलतः ज्योतिषशास्त्रावरून वर्षाचा प्रथमचा दिवस ठरलेला असतो; तथापि त्याला धार्मिक महत्त्व प्राप्त झालें आहे. हिंदुलोक हा दिवस पुण्यकाल आहे असें समजतात. सर्व हिंदुलोक चैत्रारंभ हाच वर्षारंभ असें मानीत नाहींत. कित्येक चंद्राच्या तर कित्येक सूर्याच्या गतीवरून वर्षारंभ ठरवितात. कांहीं जण चांद्रमास व सौरवर्ष पाळतात.* तामिळ प्रदेशांत सौरमान वर्ष चालू आहे. तेलगू

---

* यासंबंधाची सविस्तर माहिती या पुस्तकाच्या आरंभीं 'विषयप्रवेश' या सदराखालीं पहावी.

व कानडी प्रांतांतील लोक चांद्रमानाप्रमाणें महिना व सौरमानाप्रमाणें वर्ष पाळतात. मल्याळी लोक तामिळ लोकांप्रमाणेंच वर्ष गणतात. प्राचीन काळीं मकरसंक्रांत हाच वर्षारंभ होता असें सध्यां अवशिष्ट राहिलेल्या धर्मविधींवरून दिसतें. परंतु हा दिवस शिशिर ऋतूच्या प्रारंभींचा असल्याकारणानें वसंत काल हाच योग्य मानून त्या महिन्यावर वर्षारंभाचा दिवस ढकलला असावा. सुमारें ८०० वर्षांमागें काश्मीर प्रांतीं चैत्र हाच महिना प्रथममास मानीत असें आल्बेरूनीच्या लेखांवरून दिसतें. चैत्रशुद्ध १ हा दिवस तेथील लोक मोठ्या उत्साहानें पाळीत व हा परशत्रूस राजानें मागें हटविल्याचा दिवस आहे असें ते समजत. या सणास अगदुस (?) असें नांव असल्याचेंही आल्बेरूनीनें लिहिलें आहे. कानडी प्रांतांत वर्षारंभाच्या दिवसास 'इगादि' असें ह्मणतात. अगदुस, इगादि व युगादि ह्या शब्दांचा एकमेकांशीं कांहीं संबंध आहे किंवा कसें याचा इतिहाससंशोधकांनीं विचार करण्याजोगा आहे. श्रुति, स्मृति, पुराण, वेदांगें व ज्योतिष ग्रंथ आणि धर्मशास्त्र यांचा विचार केला असतां आणि वसंतऋतूचा प्रारंभही चैत्रांत होतो ही गोष्ट लक्षांत घेतली तर चैत्र हाच प्रथमचा महिना ठरतो. व चैत्र शु. प्रतिपदा हाच वर्षारंभाचा योग्य दिवस होय. गुप्तराजांची सत्ता एकाकाळीं उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र पसरली होती, तेव्हां चैत्रारंभीं वर्षारंभ होत असे, असें प्राचीन लेखांवरून दिसतें. चैत्राच्या खालोखाल ज्या महिन्यास अग्रमान मिळाला तो कार्तिकमास असून

## कार्तिक शु० १ स वर्षारंभ

मानण्याचा संप्रदाय उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं भागांत आहे. विशेषतः विक्रमसंवत् मानणारे कार्तिक शु. १ स वर्षारंभ मानतात. महाभारतांत मार्गशीर्ष हाच पहिला महिना असें सांगितलें आहे. मार्गशीर्ष महिन्याच्या शु. प्रतिपदेस मोठी दिवाळी मानण्याचा महाराष्ट्रांत प्रघात आहे. प्राचीन काळीं या दिवसाला वर्षारंभाचा दिवस मानण्याच्या पद्धतीवरून ही रूढि अविशिष्ट राहिली असावी. आल्बेरूनीच्या वेळेपर्यंतदेखील मार्गशीर्ष हा प्रथमचा मास असें समजत असत असें दिसतें. मृग नक्षत्रास अग्रहायणी असें नांव आहे. 'अग्र' म्हणजे टोंक व ' हायन ' म्हणजे वर्ष अर्थात् ज्या नक्षत्राच्या रात्रीच्या अग्रभागीं वर्ष आहे तें नक्षत्र अग्रहायणी ( किंवा मृगशीर्ष ) होय. पूर्व फल्गुनी ही संवत्सराची शेवटची रात्र व उत्तर फल्गुनी ही पहिली

रात्र आहे अशीं वाक्यें वेदांत सांपडतात. यावरून मृगशीर्ष नक्षत्रीं चंद्र असतांना दुसऱ्या दिवशीं वर्ष सुरू करण्याची पद्धति होती असें दिसतें. पंचविंशत् ब्राह्मणांत फाल्गुन महिन्यास 'मुखं वा एतत्संवत्सरस्य यत्फाल्गुनः' म्हणजे फाल्गुन हेंच संवत्सराचें मुख होय असें म्हटलें आहे. यावरून वर्षारंभ माघ व. १ किंवा फाल्गुन शु. १ हा असला पाहिजे. हल्लीं फाल्गुनाच्या किंचित् पुढें चैत्रारंभीं वर्षारंभ मानतात. याशिवाय इतर महिन्यांतही निरनिराळ्या प्रांतीं सौर मानाप्रमाणें सूर्याच्या राशीसंक्रमणारून वर्षारंभ मानतात. तथापि सर्वांत चैत्रास अधिक मान देण्यांत आला असून तोच प्रारंभींचा मास आहे असें सामान्यतः हिंदुसमाज मानीत असतो. प्रत्येक हिंदु म्हणविणारा कोणतेंही शुभाशुभ कृत्य करितेवेळीं

## संकल्पाचा उच्चार

करीत असतो. त्याचा अर्थ लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, आपण ब्रह्मांडांतील एक व्यक्ति या नात्यानें आपणाबद्दलचा विचारच तो करीत असून आपलें धार्मिक कृत्य करण्यास प्रवृत्त होत असतो. हल्लीं या संकल्पांत ऐहिक सुख प्राप्त होवो वगैरे अर्थांच्या शब्दांचा जो समावेश करण्यांत आला आहे तो मात्र अलीकडच्या वैदिक वर्गाच्या कल्पनांप्रमाणें आहे. जीं धार्मिक कृत्यें करण्यांत येतात त्यांची उभारणी धर्माच्या पायावर झाली असून धर्म म्हणजे देवत्वास किंवा ब्रह्मत्वास परत जाऊन मिळण्याचा एक मार्ग आहे असें हिंदु समजतात व सर्व कृत्यें त्या ब्रह्मास अर्पण करण्यांत येतात. धर्म म्हणजे एखाद्या व्यक्तीचा उपदेश नसून तो अनादि व शाश्वत आहे अशी प्रत्येक हिंदूची समजूत आहे. सत्य व निष्काम–कर्म हींच धर्माचीं मुख्य अंगें असल्याचें निरनिराळ्या प्रसंगीं विचारी आर्यांनीं सांगितलें असून तो शक्य तेवढा उज्ज्वल राखण्याचा प्रयत्न त्यांनीं स्वतःच केला असल्याचें दिसून येतें. सत्यापरता धर्म नाहीं–सत्यामुळेंच विश्व टिकलें आहे असे उद्गार त्यांनीं वेळोवेळां काढले आहेत. स्थिरचरकाष्ठपाषाणादि एकंदर दृश्य अदृश्य पदार्थांत परमेश्वराचा अंश आहे अशी ज्यांच्या मनाची पूर्णपणें भावनाच झाली आहे त्यांनीं प्रत्येक व्यवहारांत धर्मास अग्रस्थान दिलें यांत आश्चर्य नाहीं. प्राचीनकाळीं निरनिराळ्या स्वतंत्र विचाराच्या ऋषींनीं विचारपूर्वक धर्मास अग्रमान दिला. सर्वांनीं सत्याचा विजय झालेला पहावा म्हणून निरनिराळ्या अवतारांची योजना करण्यांत आली. धर्म या नांवाखालीं अनेक अनावश्यक कर्माचें अवडंबर

समाजाच्या माथीं मारून तो कर्तृत्वशून्य करून टाकण्यांत आला आहे असें सुशिक्षितांचें मत बनत चालल्यामुळें हिंदुधर्मास उतरती कळा लागून तो नामशेष होईल कीं काय अशी भीति कित्येक पुराणमतवादी लोक अंतःकरणपूर्वक प्रगट करतात. परंतु त्यांस इतकेंच सांगणें आहे कीं, वेद व उपनिषदें यांच्यावर अधिष्ठित असा हिंदुधर्म कदापि नामशेष होणार नाहीं. त्याचें स्वरूप मात्र विशेष उज्ज्वल होऊन तो सनातन, सार्वलौकिक व शाश्वत असा धर्म बनेल—तसा तो बनविण्यास सर्व मतांच्या लोकांनीं मात्र झटण्याची तयारी केली पाहिजे. आणि प्रत्येक सणाशीं धर्माची सांगड घालून त्याचें महत्त्व राखण्याचा जुन्या शास्त्रकारांनीं जो यत्न केला आहे त्याचें महत्त्व जाणण्यांतच आपलें खरें कल्याण आहे हें विसरतां नये.

कालाचे निरानिराळे भाग किंवा युगें यांचा विचार करतां, प्रत्येक युगांत विवक्षित कार्य करण्यासाठीं सत्पुरुष उत्पन्न झाल्याचें दिसून येतें. (यासंबंधाचें विवेचन नृसिंहजयंती, रामनवमी, महाएकादशी या सदराखालीं पहावें.) द्वापरयुगांत कृष्ण, युधिष्ठिर, भीष्म वगैरे सत्पुरुषांनीं अन्यायाचा दुष्परिणाम काय आहे हें दाखविलें. त्रेतायुगांत राम, वैदेही जनक वगैरे आर्यांनीं प्रपंचाचें रहस्य काय आहे, प्रपंचांत असून परमार्थ कसा साधावा, निष्काम कर्म व स्वार्थत्याग यांची मातबरी किती हें आपल्या उदाहरणांनीं सिद्ध केलें. कृतयुगांत अनेक ऋषींनीं मनुष्याचें ध्येय काय असावें याचा उलगडा केला. सनत्कुमार, नारद, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, विश्वामित्र, अजातशत्रु, अनसूया, गार्गीवाचक्नवी वगैरे विचारवंत ज्ञानी सत्पुरुषांनीं व आर्यमहिलांनीं हिंदुधर्मरूपी प्रासादाचे शिल्पकार बनून त्याला अत्यंत रमणीय स्वरूप प्राप्त करून दिलें. कलियुगांत बुद्ध, शंकराचार्य वगैरे महनीय विभूतींनीं प्रेम व विश्वबंधुत्वाची ध्वजा या प्रासादशिखरीं रोविली. अशा परमपूज्य आर्यांचे प्रयत्न कधींही निष्फळ होणार नाहींत. त्यांचा आशीर्वाद जसा हिंदुधर्मास आजवर अनेक संकटांतून सोडविण्यास समर्थ झाला तसाच तो पुढेंही या धर्मानुयायांचा पाठिराखा होऊन राहील.

## धार्मिक समजूत.

ज्या कारणांवरून चैत्र शु. प्रतिपदा हा संवत्सराचा आरंभींचा दिवस ठरला, तीं कारणें मागें दिलीं आहेत. परंतु यासंबंधाची धार्मिक समजूत कांहीं निराळीच आहे. श्रीरामचंद्र चवदा वर्षें वनवास करून सीतेसह आपल्या नगरींत परत

आला तो दिवस चैत्र शुक्ल प्रतिपदा होता, यासाठीं हा दिवस वर्षाचा पहिला दिवस मानला गेला. वसू नांवाचा राजा तपश्चर्या करून मनुजेंद्र झाला व त्याला स्वर्गांतील अमरेंद्रानें या दिवशीं वस्त्रालंकार वगैरे देऊन त्याचा गौरव केला. ब्रह्मदेवानें चैत्रशुक्ल प्रतिपदेस सृष्टि निर्माण केली, वगैरे कित्येक कारणांवरून हा दिवस संवत्सराचा प्रथमचा दिवस ठरला अशी धार्मिक समजूत आहे. तसेंच ६० बार्हस्पत्य संवत्सरांस जीं नांवें दिलीं आहेत तीं नारदऋषींच्या ६० पुत्रांचीं नांवें होत अशी एक पुराणांतरीं कथा सांपडते.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

वर्षारंभाचा दिवस प्राप्त होतांच सर्व कुटुंबवत्सल लोकांनीं आपल्या घरासमोर गुढी उभारावी. कलश व पताकायुक्त गुढी ही आनंदोत्सवाची दर्शक आहे. या गुढीची गंधपुष्पकुंकुमानें पूजा करावी, स्त्रीपुरुष व मुलांनीं उत्तम वस्त्रें परिधान करावीं, मंगलस्नानादि विधि आटोपल्यावर निंबभक्षण करावें, महान् महान् ऋषी निंबभक्षण करून कित्येक वर्षें सतेज रहात असत असें पुराणांत सांगितलें आहे; त्यामुळें निंबभक्षणविधीस शास्त्राचा पाठिंबा मिळाला. निंबाचे प्रफुल्ल अंकुर आणून मिऱ्यें, हिंग, लवण, जिरें व ओंवा यांसह भक्षण करावें. आरोग्य, बल, बुद्धि व तेज यांची वृद्धि करण्यास निंबभक्षण कारण होतें, असें आर्यवैद्यकाचें मत आहे. या दिवशीं सहकुटुंब सहपरिवार देवदर्शन घ्यावें. जोशांकडून पंचांग वाचवून तें श्रवण केल्यावर त्यांस शिधा द्यावा. पुढील सालाचें, जोशी भविष्य वर्तवीत असतात अशी भावना सामान्यतः जनांत आहे. यासाठीं पाऊस, धान्यसमृद्धि, आयव्यय वगैरे बाबींचा खल भाविक लोक करीत असतात. शास्त्रोक्त विधीबरहुकूम सर्वच लोक जरी चालत नाहींत तरी बहुजनसमाज चालत असतो. वर्षप्रतिपदेचा दिवस वर्षांतील साडेतीन मुहूर्तांतील एक असून त्या दिवशीं आरोग्यप्रतिपद्व्रत ( आरोग्यप्राप्तीसाठीं ), विद्याव्रत ( विद्येचा लाभ व्हावा एतदर्थ ) व तिलकव्रत ( ऐश्वर्यप्राप्तीस्तव ) करावें असें भविष्योत्तर व इतर पुराणांत सांगितलें आहे. तथापि या व्रतांचा हल्लीं प्रचार नाहीं. नवीन वर्षाची प्रतिपदा प्राप्त होतांच सर्व कुटुंबवत्सल लोक मंगल स्नानादिक आटोपल्यावर मिष्टान्नभोजन संपवून देवदर्शन घेत असतात; कांहीं ठिकाणीं त्या दिवशीं स्त्रियांस व मुलांस नवीन वस्त्रें देण्याची चाल आहे. पंचांगश्रवणानंतर निमंत्रित मंडळीस अत्तर, गुलाब, पानसुपारी देण्याचा प्रघात

आहे. कधीं सुखवस्तु लोकांच्या येथें गायनवादनांच्या योगानें हा दिवस मोठ्या आनंदांत घालविला जातो. आपल्या गरीब नातेवाईकांस भोजनास निमंत्रण करण्याची चाल बऱ्याच ठिकाणीं दृष्टीस पडते.

मलबारांत हा वर्षारंभाचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. संवत्सरप्रतिपदेच्या पूर्वदिवशीं घरांतील दागदागिने, हिरे, पाच वगैरे रत्नें, फळफळावळ व इतर अनेक शोभायमान जिन्नस देवघरांत व्यवस्थितपणें देव्हाऱ्यासमोर मांडतात. नंतर संवत्सरप्रतिपदेच्या दिवशीं उषःकालीं सुमारें प्रहर रात्र असतांना घरचा यजमान देवघरांत प्रवेश करून त्या वस्तूंस दीपारति दाखवितो. त्यानंतर त्याच्या कुटुंबांतील लहान मोठीं सर्व माणसें ( स्त्रिया व पुरुष ) एकामागून एक डोळे मिटून त्या खोलींत जातात व त्या वस्तूंच्या सन्निध पोहोंचतांच डोळे उघडून त्यांवर नजर घालतात. नंतर घरचा यजमान प्रत्येकास त्यांतून एखादा दागिना, फूल, फळ वगैरे देत असतो. त्या प्रांतांतील हिंदूलोक वर्षारंभाच्या दिवशीं सकाळीं उठतांच उत्तम व शुभ मानलेल्या पदार्थांवर आपली नजर पडावी याबद्दल खबरदारी घेतात. मल्याळ खेरीजकरून ही चाल इतर ठिकाणीं नाहीं. मकरसंक्रमणाच्या दिवशींही तेथील लोक मोठा उत्सव करतात. ( याचें वर्णन त्या सणासंबंधीं केलेल्या विवेचनांत दिलें आहे. )

## हेतु व बोध

कोणत्याही कारणानें वर्षारंभ चैत्र शु. १ देच्या दिवशीं ठरलेला असो, तो महत्त्वाचा आहे यांत संशय नाहीं. एकमेकांची प्रेमानें भेट घेऊन नवीन वर्ष सर्वांस सुखाचें जावें यासाठीं जगन्नियंत्याची प्रार्थना करावी व अनेक आधिव्याधींतून व संकटांतून आपलें गेल्या सालीं रक्षण केल्याबद्दल अंतःकरणपूर्वक त्याचे आभार मानावे. गेल्या सालीं आपण जीं कांहीं बरीं वाईट कृत्यें केलीं असतील त्यांचा आपल्या मनाशीं आढावा काढून नूतन सालीं आपलें वर्तन विशेष शुद्ध, सात्विक व प्रेमळ करण्याचा निश्चय करावा. प्रत्येक मनुष्य जें कांहीं बरें वाईट कर्म करतो त्याची रोजनिशी मरणोत्तर यमाजीभास्करापुढें वाचून दाखविण्यासाठीं चित्रगुप्त ठेवीत असतो, असें हिंदू समजतात. आपणच आपला चित्रगुप्त होऊन तीं कृत्यें टिपण्याची जर पद्धत ठेवूं तर आपला बराच फायदा होईल. तरुण जनांस प्रपंचांत अनेक कार्यें करावयाचीं असतात. योग्य वय प्राप्त होतांच समाजाचा एक घटकावयव या नात्यानें अंगावर

पडणारीं कामें नीट रीतीनें पार पाडण्याची पात्रता अंगीं येण्यास स्वतः चित्रगुप्त होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. साधारणपणें जगांतील बरें वाईट समजूं लागतांच लहानशी रोजनिशी आपल्या जिवाशीं बाळगून तींत आपण केलेल्या बऱ्या वाईट कामांची, अनुभवाची, विचारांची व आकांक्षांची प्रत्यहीं नोंद करण्याची संवय लावून घ्यावी. असें केल्यानें आपणावर स्वतःचीच देखरेख राहून योग्य प्रसंग येतांच आपल्या अंगीं महत्कार्य करण्याची पात्रता येईल. आपल्या अंतःकरणांत सत्कर्माबद्दल उमेद व दुष्कर्माबद्दल पश्चात्ताप व तिट्कारा उद्भवल्याशिवाय आपलें पाऊल कधींही पुढें पडणार नाहीं. आम्ही मनुष्य आहों, त्यांतूनही आर्य ऋषींनीं स्थापन केलेल्या सनातन हिंदुधर्माचे अनुयायी आहों त्या अर्थीं आपलें वर्तन मनुष्यपणास व आर्यत्वास साजेल असेंच असलें पाहिजे. प्रत्येक दिवशीं सूर्यास्त होतो, तसतसें आपलें आयुष्य क्षीण होत आहे हें ध्यानीं असावें. त्यासाठीं आपण क्षणभंगुर व नियमितपणें नाश पावणाऱ्या या आयुष्याचा दुरुपयोग न करतां त्याचा शक्य तेवढा उपयोग करण्यास शिकावें. नूतन वर्षाच्या उदयाबरोबर अंतःकरणांत नवीन आशांकुर उत्पन्न होऊन नवीन वर्ष आनंदांत जावो, अशी सदिच्छा उत्पन्न होत असते. आंग्लसत्ता स्थापन झाल्यापासून इंग्रजी शिक्षणाचा अंमल ज्यांच्यावर बसला आहे असे लोक जानेवारीच्या पहिल्या तारखेस वर्षारंभ मानून पत्रद्वारें ( New year's card ) आपल्या आप्तमित्रांच्या भेटी घेत असतात. या पद्धतीचें अनुकरण करून चैत्र शुद्ध १ स अशीं हिंदुपद्धतीचीं पत्रें पाठविण्याची रूढि पाडण्याचा कांहीं चित्रकारांचा यत्न साधत आहे. परंतु या औपचारिक सदिच्छादर्शक पत्रांपेक्षां प्रत्येक संवत्सरीं आपल्या अनाथ बांधवांस आपलें तनुमनधन शक्त्यनुसार अर्पण करण्याचा आपण निश्चय करूं तर विशेष चांगलें होईल. आयुष्याची दोरी केव्हां तुटेल हें सांगतां येत नाहीं म्हणून परमेश्वराचें बोलावणें येतांच हा मृत्युलोकांतील कारभार एकदम बंद करून शांत मनानें निजधामास जाण्याकरितां निघण्याची आपली तयारी असली पाहिजे. गेलेली संपत्ती उद्योगानें प्राप्त करून घेतां येईल; नष्ट झालेलें आरोग्यही पुनः औषधोपचारानें मिळवितां येईल; लुप्त झालेलें ज्ञान अभ्यासाच्या योगानें संपादितां येईल; परंतु व्यर्थ गेलेला काल गेला तो गेलाच. यासाठीं प्रत्येक निमिषाचा सदुपयोग करून प्रत्येक संवत्सराच्या आरंभींच्या दिवशीं स्वतःचें अभिनंदन करून घेण्याची प्रत्येकानें तयारी ठेविली पाहिजे. शेवटीं साधु तुकारामाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे,

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकळांच्या पाया माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन शुद्ध भावें ॥
तुका ह्मणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥

---

## प्रभातकालचें ईशस्मरण.

### भूप राग.

विश्वरंगणीं श्रेष्ठ असा नरजन्म मला लाभला ।
तुझ्या कृपेनें, आनंदघना आलों शरण तुला ॥ धृ० ॥
प्रभात झाला दिशा दीप्त बहु रविकिरणें दिसती ।
खगगण मोदें वृक्षस्कंधीं स्तोत्रें तव गाती ।
मंद पवन सुमगंधयुक्त हा देइ सौख्यशांति ।
अज्ञाननिशा लोपलि पसरे ज्ञानसूर्यकांति ॥ १ ॥
नरजन्मीं मत्करीं घडो दे प्रिय तुज तीं कार्यें ।
विद्या बुद्धी नीति विशारद म्यां व्हावें आर्यें ।
परोपकारीं आत्मोद्धारीं सतत काल जावा ।
आज्ञा होतां आनंदानें येइन तव गांवा ॥ २ ॥
तीर्थाटनजपतपसाधन जरि नच घडलें कांहीं ॥
शास्त्रपुराणें वेदांचेंही ज्ञान मुळीं नाहीं ॥
जगतामाजी अद्भुत शक्ति पाहुनि तव ठायीं ॥
प्रेम भक्ति जडली प्रभुराया तूंचि तात आई ॥ ३ ॥
मोह निरसला भंग पावले सर्व पाश आतां ।
नाहीं मजला तुझ्या प्रसादें तिळभरिही चिंता ।
मिळतां तुजसम दाता त्राता काय कमी ताता ।
उद्धरुनी मी जाइन तैसा उद्धारिन जनता ॥ ४ ॥
हेंचि मागणें कर जोडुनियां दावि मार्ग मजला ।
पार्थरथीं त्या कृष्णसारथी जेंवि समरिं झाला ॥
तैसा तूं हो नेता त्राता संकट-समयाला ।
तनु मन धन तुज अर्पण केलें पाव सख्या मजला ॥५॥

## श्रीरामनवमी.



गंगा व गंडकी या नद्यांच्यामध्यें जो प्रदेश आहे, त्यांत प्राचीन काळीं कोसल वंशाचे क्षत्रियलोक रहात असत. ते आपणास सूर्यवंशी ह्मणवीत. दशरथ हा या कोसल देशाचा राजा असतांना अयोध्या ही त्याची राजधानी होती. दशरथास कौसल्या, कैकयी व सुमित्रा अशा तीन पत्न्या होत्या. कैकयीच्या उदरीं भरत, सुमित्रेच्या उदरीं लक्ष्मण व शत्रुघ्न, ज्येष्ठ पत्नी कौसल्येच्या उदरीं रामचंद्र याप्रमाणें त्याला चार पुत्र झाले. हे चौघेही धनुर्विद्येंत निष्णात, स्वभावानें प्रेमळ, सत्यवचनी व निर्मल वर्तनाचे निघाल्या-मुळें त्यांची सर्वत्र वाहवा होऊं लागली. त्यांतही रामचंद्रानें आपल्या शीलाच्या योगानें सर्वांकडून धन्य धन्य असें ह्मणवून घेतलें. कालेंकरून त्याला विष्णूचा अवतार असें मानून त्याचा जन्मदिवस चैत्र शुक्ल ९ मी हा उत्सवदिनांत गणला गेला. श्रीरामाचें त्रोटक चरित्र पुढीलप्रमाणें आहे.

रामचंद्र व लक्ष्मण लहान असतांनाच त्यांना विश्वामित्र ऋषीनें आपल्या आश्रमांत यज्ञकार्यांत विघ्नें आणणाऱ्या राक्षसांचा नाश करण्यासाठीं अयोध्येहून आणिलें. विश्वामित्रानें त्यांना धनुर्विद्या शिकविली. त्या ऋषीच्या आश्रमापासून

जवळच गंडकीच्या पलीकडे जनक राजाचें राज्य होतें. त्याला विदेह देश असें म्हणत असत; व मिथिला ही त्या देशाची राजधानी होती. जनकाची कन्या सीता ही उपवर होतांच त्यानें स्वयंवर मांडिलें व देशोदेशींच्या राजांना निमंत्रण करून शिवधनुष्यभंग करण्याचा व त्यायोगें सीतेस वरण्याची योग्यता अंगीं असल्याचें सिद्ध करून दाखविण्याचा पण लाविला. अनेक राजांचा प्रयत्न व्यर्थ गेला; शेवटीं रामचंद्रानें तो पण जिंकतांच सीतेनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. दशरथ वगैरे मंडळी आल्यावर लग्नकार्य यथासांग होतांच रामचंद्राच्या इतर सावत्र बंधूंचींही तेथेंच लग्नकार्यें झालीं व ते सर्व नववधूंसह अयोध्येस आले.

दशरथाचा वृद्धापकाल समीप येतांच त्यानें ज्येष्ठ पुत्र रामचंद्रास युवराज करण्याचें योजिलें. परंतु त्याची तृतीय पत्नी कैकयी हिनें भरतास गादी देण्याबद्दल हट्ट धरिला. दशरथानें त्यापूर्वी एका प्रसंगीं तिची इच्छा पूर्ण करीन असें वचन दिलें होतें. या वचनाची आठवण देऊन तिनें आपला हेतु तडीस नेण्यास पतीस भाग पाडलें. पित्याचें वचन खरें करण्यासाठीं रामानें कैकयीच्या इच्छेप्रमाणें चवदा वर्षें वनवास स्वीकारला. सीतेनेंही पतीबरोबर अरण्यवास पत्करला व लक्ष्मण रामाबरोबर निघाला. याप्रमाणें राम, सीता व लक्ष्मण वनवासास गेल्यावर दुःखातिरेकानें दशरथ राजा लवकरच निवर्तला. भरत आजोळीं नंदिग्रामीं होता तेथून परत येतांच त्याच्या मातोश्रीनें रामास घालवून दिल्याची हकीकत त्याला समजली. स्वतः राज्यपदारूढ होण्यास तो कबूल होईना. पुढें रामाची त्यानें गांठ घेतली व चवदा वर्षें संपतांच पुनः राज्यांत येईन असें अभिवचन त्याजपासून घेऊन, तो त्याच्या पादुकांसह अयोध्येस आला. पादुका सिंहासनावर ठेऊन भरत कारभार पाहूं लागला.

वनवासी राम, सीता व लक्ष्मण यांसह प्रयागास (अलहाबाद) भारद्वाजाच्या आश्रमीं गेला. तेथें चित्रकूट पर्वतावर वाल्मीकीच्या आश्रमांत जाऊन राहिला. त्या ठिकाणीं भरताकडून त्याला पित्याच्या निधनाची वार्ता समजली. पित्यास दिलेलें वचन मोडतां येत नसल्यामुळें वनवासाची मुदत संपण्यापूर्वी परत येतां येत नाहीं असें त्यानें भरतास सांगितलें. चित्रकूटाहून ( बुंदेलखंडांतील एक टेंकडी ) गोदावरीच्या जवळपास असणाऱ्या दंडकारण्यांत राम फिरत असतां शूर्पणखा नांवाच्या राक्षस जातीच्या स्त्रीचें लक्ष्मणानें ( तिचें फाजील वर्तन पाहून ) नाक कापिलें. ही स्त्री लंकेचा राजा रावण याची बहीण होती. तिच्या

सल्ल्यानें त्यानें रामाची पत्नी सीता हिला हरण करण्याचें ठरविलें. राम आश्रमांत नसल्या वेळीं तिला तो घेऊन गेला. रामाला अत्यंत दुःख झालें व तो तिला शोधून काढण्याच्या प्रयत्नास लागला.

सीतेला रावणानें नेल्याचा सुगावा जटायूकडून लागतांच सुग्रीव नांवाच्या एका बलिष्ठ योद्धयास रामानें जवळ केलें. त्याचा बंधु वाली यानें उन्मत्त होऊन त्याचें राज्य जिंकिलें व त्याच्या बायकोसही आपल्या ताब्यांत घेतलें. रामानें वालीचा सूड उगवून राज्य व कांता परत मिळविण्याच्या कामीं सुग्रीवास मदत केली. वाली लढाईंत मारला गेला. सुग्रीवानें आपलें वानर नांवाचें सैन्य तयार केलें. व हनुमान, नल, नील, जांबुवंत यांस सीतेच्या शोधार्थ चोहोंकडे पाठविलें. सीतेला रावणानें लंकेस नेली असून ती अशोक वनांत आहे अशी बातमी हनुमानानें आणिली. पुढें आपल्या प्रचंड सैन्यासह सुग्रीवादिक रामाचे मित्र व राम लक्ष्मण लंकेस जाण्यास निघाले. लंका हें बेट असल्यामुळें तेथें जाण्याची अडचण आली. परंतु नलानें समुद्रावर पूल बांधून ती दूर करतांच ती मंडळी लंकेस गेली. तेथें रावणाशीं भयंकर युद्ध जुंपलें. रावणाचा बंधु बिभीषण रामाच्या पक्षास येऊन मिळाला. लंकेंत चाललेल्या घनघोर संग्रामांत रावण ठार झाला. कुंभकर्ण, इंद्रजित् वगैरे पराक्रमी वीरही निमाले.

त्यानंतर रामचंद्र सीतेसह स्वदेशीं परत आला. त्या वेळीं वनवासाची मुदत संपल्यामुळें भरताच्या विनंतीवरून व वसिष्ठाच्या आज्ञेप्रमाणें रामानें राज्यसूत्रें हातीं घेतलीं. सीता ही पर पुरुषाच्या अटकेंत होती इतक्यावरून तिच्या वर्तनाबद्दल प्रजेंतील एका इसमानें संशय घेतल्यामुळें तिला रामानें वनांत सोडिलें. त्या वेळीं ती गरोदर होती. वाल्मीकीच्या आश्रमांत ती प्रसूत होऊन तिला कुश आणि लव असे दोन पुत्र झाले. हे रामाप्रमाणेंच तेजःपुंज व पराक्रमी निघाले. रामानें अश्वमेध यज्ञ केला त्या वेळीं या मुलांनीं वाल्मिकीनें रचलेलें रामायण गायिलें. तें ऐकून रामास आनंद झाला व त्याला हे आपलेच मुलगे आहेत असें कळतांच त्यानें त्यांस पोटाशीं धरिलें व सीतेचा स्वीकार करण्याकरितां तिला आश्रमांतून बोलावून आणिलें. सीतेनें आपलें आचरण अत्यंत पवित्र आहे अशी सर्वांची खात्री पटविण्याकरितां पुढीलप्रमाणें शब्द उच्चारले:–"माझ्याकडून कायेनें, वाचेनें किंवा मनानें कोणतेंही वाईट कृत्य घडलें नसेल तर ही पृथ्वी मला पोटांत घेवो." असें ह्मणतांच पृथ्वी दुभंग झाली व सीता तींत गडप झाली.

रामाचें मन यामुळें अत्यंत अस्वस्थ झालें. एके दिवशीं एक योगी एकांतांत रामाजवळ बोलत असतां लक्ष्मणानें परवानगीवांचून दुर्वास ऋषीस आंत जाऊं दिल्यामुळें योगी तत्काळ तेथून चालता झाला. लक्ष्मणाच्या या कृत्याबद्दल रामास वाईट वाटलें. या अपराधाबद्दल लक्ष्मणानें अयोध्या सोडून जावें अशी सल्ला वसिष्ठानें देतांच तो निघून गेला व सरयू नदीच्या तीर्थांत त्यानें जलसमाधि घेतली. रामानें आपलें राज्य लव व कुश यांस वांटून दिलें. शत्रुघ्नानें आपल्या दोघां मुलांस राज्य देऊन तोही रामाबरोबर निघाला. सुग्रीवानें आपला पुतण्या अंगद यास किष्किंधेच्या गादीवर बसविलें. रामचंद्र, शत्रुघ्न, सुग्रीव व इतर कित्येकांनीं सरयू नदींत प्रवेश करून देहत्याग केला. याप्रमाणें रामचरित्र आहे.

## शास्त्रोक्त विधि व चालू रूढि.

चैत्र शु. ९ मीस माध्यान्हीं रामजन्मोत्सव करावा. त्या दिवशीं रामाच्या मूर्तीची पूजा करावी व उपोषण करावें. रात्रीची वेळ रामभजनांत घालवावी. दुसऱ्या दिवशीं मिष्टान्न भोजन करावें. होम, प्रतिमादान वगैरे विधि शास्त्रांत सांगितले आहेत, परंतु ते रूढ असल्याचें दिसत नाहीं. हा उत्सव रामाच्या व इतर विष्णूच्या देवालयांतून साजरा केला जातो. कित्येक लोक आपल्या घरीं देखील रामजन्मोत्सव करितात. बरेच लोक या दिवशीं उपोषण करतात. कित्येक रामजन्माचा उत्सव माध्यान्हीं पूर्ण होतांच मिष्टान्न भोजन करतात. राममंदिरांत प्रतिपदेपासून नवमीपर्यंत रामायणाचें वाचन, कीर्तन, भजन वगैरे चालतात. नवमीच्या दिवशीं पालखीची मिरवणूक निघत असते. अयोध्या, नाशीक, तिरुपति, रामेश्वर वगैरे ठिकाणीं हा उत्सव अत्यंत प्रेक्षणीय असा होत असल्यामुळें दूरदूरचे हजारों यात्रेकरू त्या ठिकाणीं जमतात.

## ऐतिहासिक माहिती.

पंजाबांत प्रथमतः वसाहत केलेल्या आर्यांचा वेलविस्तार वाढतांच सुदास नांवाच्या अनार्य ( दस्यू वंशाच्या ) पुढाऱ्याशीं युद्ध करण्यांत गुंतलेल्या भरताचे वंशज पूर्वेकडील भागांत वसाहत करूं लागले. त्यांनीं गंगा व यमुना या नद्यांच्यामधील प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला व सांप्रतच्या दिल्लीजवळ हस्तिनापूर हें राजधानीचें शहर वसविलें; आणि चोहोंकडे आपली सत्ता स्थापन केली. हे कुरुवंशाचे असल्यामुळें त्यांना कौरव असें नांव प्राप्त झालें. त्यांच्या प्रमाणें आर्यांची दुसरी एक लाट गंगा नदीच्या पलीकडे हिंदुस्थानच्या पूर्वभागा-

वर पसरली. त्यांनीं नवीन राज्यें स्थापन करून अयोध्या, काशी व बिहार यांच्या आसमंतात् वसाहती केल्या. या आर्यवसाहतवाल्यांत विदेही, कोसल व काशी असे तीन वंशाचे लोक होते. त्यांपैकीं अयोध्या ही कोसलांची, उत्तर बिहारांत मिथिला ही विदेही यांची राजधानी होती. विदेही वंशांत जनक हा राजा अत्यंत प्रसिद्ध होऊन गेला. कोसल कुलांत रामचंद्राची कीर्ति अजरामर झाली. रामाच्या कालीं कोसल व विदेही यांच्यांत विवाहसंबंध घडून आला. जनकाची कन्या सीता हीच रामायणांतील चरित्रनायिका आहे. रामायणकालीं आर्यांनीं जो प्रांत काबीज केला तो सुपीक असून स्वर्नदी या नांवानें प्रसिद्धीस आलेली गंगानदी या प्रांतांतून वहात असल्याकारणानें, तिच्या कांठीं अनेक तपोवनें उभारून विद्वान् ऋषि ब्रह्मज्ञानाचा विचार करण्यांत गर्क झालेले असत. या प्रदेशांतील लोकांची सांपत्तिक स्थिति उत्तम असून ते तेजःपुंज व बलवान् होते, असें रामायणावरून दिसतें. वाल्मीकीनें जेव्हां नारदास आपण कोणत्या वीरासंबंधानें काव्य लिहूं असा प्रश्न केला, तेव्हां त्यानें त्यास इक्ष्वाकुकुलांत अत्यंत श्रेष्ठ अशा रामाचें चरित्र लिहिण्यास सांगितलें; तेव्हां रामाच्या स्वरूपाचें जें वर्णन केलें आहे, त्यांत त्याचें शरीर पूर्णावस्थेस पोहोंचलेलें होतें असें दर्शविलें आहे. स्त्रियांचीही प्रकृति उत्तम प्रकारची होती. कैकयीनें पतीस युद्धाच्या वेळीं मदत केली. राक्षसनगरींत एकटी असतांना देखील सीता रावणाच्या दुष्टपणाच्या धमकावणीला घाबरली नाहीं, यावरून स्त्रियांच्या अंगीं धीरोदात्तता पूर्णपणें वसत होती व संकटास त्या जुमानीत नसत असें दिसतें. शारीरिक बलाच्या अभावीं साहसाचीं कामें घडणें शक्य नाहीं. राजकुलांतच शारीरिक संपत्ति दृग्गोचर होत असे असें नाहीं. जेव्हां रामचंद्र वनवासास निघाला, तेव्हां त्याच्या मागें चाललेला व त्याला नगराच्या सीमेपर्यंत पोहोंचविण्यास आलेला सुदृढ अशा लोकांचा समुदाय पाहून रामास आनंद झाला, असें वाल्मीकीनें लिहिलें आहे. तसेंच रामचंद्राच्या रथाला गाईच्या कळपांमुळें वारंवार अडथळा होऊं लागला असें जें वर्णन आहे, त्यावरून त्या कालीं दूधदुभतें विपुल देण्याइतक्या गाई नगरींत होत्या व गोधन व धान्यादि संपत्तीनें युक्त असे लोक सौख्यानें दिवस घालवीत असत, असें दिसतें.

## क्षत्रियांचा मुख्य धर्म

दुष्ट व घातकी शत्रूंचा नाश करणें हा असल्यामुळें, ते अगदीं लहान वयांतच वेदविद्येबरोबर समरविद्याही शिकत असत. नुसत्या शब्दध्वनीवर शर-

## श्रीराम धनुष्यभंग



लेत चढावत खैंचत गाढे । काहु न लखा देख सब ठाढे ॥
तेहि छन राम मध्य धनु तोरा । भरेउ भुवन धुनि घोर कठोरा ॥

पृष्ठ २९ पहा. ( श्री तुलसी रामायण )

Joshi Art P. Works, Bombay. 1.

दांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे. जेव्हां प्रवाहण जैवालीजवळ गौतममुनि आला, तेव्हां त्यास प्रवाहण म्हणाला—

**न प्राक् त्वत्तः पुरा विद्या ब्राह्मणान्गच्छति**
**तस्माद्‌ सर्वेषु लोकेषु क्षत्रस्यैव प्रशासनमभूत् ।**

'गौतमा, ब्रह्मविद्येचा संस्कार तुझ्यापूर्वी इतर ब्राह्मणांस झालेला नाहीं, अर्थात् ती त्यांना अवगत नाहीं. केवळ क्षत्रियांसच ती अवगत आहे; कारण ती त्यांच्यामुळेंच अस्तित्वांत आली.' अशा प्रकारचे उतारे किती तरी देतां येतील. यावरून स्पष्ट होतें कीं, क्षत्रिय हे ज्याप्रमाणें युद्धकलेंत निष्णात होते तसेच ब्रह्मविद्येंतही पारंगत असल्याकारणानें त्यांच्यामुळेंच हें ज्ञान वृद्धिंगत झालें. धर्म व त्यास आधारभूत असें ब्रह्मज्ञान सांगणारे, परमेश्वरशक्ति व स्वरूप यांची ओळख करून देणारे व त्याच्यासंबंधाचा विचार समाजांत रूढ करणारे क्षत्रिय होते व रामायणकालचा जनकराजा हा या बाबतींत त्या सर्वांचा मुकुटमणि होता हें निर्विवाद आहे. अवतारांची मीमांसा करितां परशुराम व वामन हे ब्राह्मणावतार मागें पडले व राम, कृष्ण हे क्षत्रिय अवतार पुढें आले, यांतील गोम तरी हीच आहे कीं, त्यांच्या हृदयांत खऱ्या ब्रह्मज्ञानाचा ठसा पूर्णपणें उमटला होता. योगवासिष्ठांतील रामाचे विचार व गीतेंतील कृष्णाचें तत्त्वज्ञानविषयक विवेचन यांवरून आमच्या विधानाची सत्यता दिसून येईल.

रामचंद्र हा पितृवचनपरिपालनासाठीं अरण्यांत जाण्यास मोठ्या आनंदानें तयार झाला. त्याच्या सावत्र आईनें जेव्हां युवराजराज्याभिषेकाच्या ऐन वेळीं रामास राज्य देऊं नये, इतकेंच नव्हे तर त्याला १४ वर्षें वनवासास पाठवावें असा हट्ट धरला, तेव्हां वृद्ध दशरथास अत्यंत दुःख झालें. परंतु पितृभक्त रामाच्या मनाला यत्किंचित्‌ही दुःखाचा स्पर्श झाला नाहीं. राम शांतपणें कैकयीस म्हणाला—'माते, केवळ विषयाचा लोभ धरून या जगांत मला रहाणें नको आहे. प्रत्यक्ष प्राणत्याग करावा लागला, तरी तो करून मी माझ्या पिताजींची इच्छा पूर्ण करीन.' इतक्या कोमल वयांत असे विचार ज्या राजपुत्राच्या मनांत आले, त्याचें मन किती उदात्त व सुसंस्कृत झालें होतें, याची कल्पना सहज होण्याजोगी आहे. राज्याभिषेकाच्या आनंदोत्सवप्रसंगीं उपस्थित झालेलें हें विघ्न पाहून लक्ष्मणास वाईट वाटलें व देशत्याग करण्याबद्दलची पित्याची आज्ञा मान्य न

करण्याबद्दल त्यानें रामास विनंति करतांच तो म्हणाला, 'लक्ष्मणा, माझे पिताजी केवळ सत्यस्वरूप आहेत, त्यांचा शब्द सत्य आहे, त्यांचीं कृत्येंही सत्यास धरून आहेत. परलोकाची त्यांना भीति वाटते. तरी ते त्यासंबंधानें निर्भय असोत. संपत्ति गेली म्हणून दुःखी होऊं नकोस. साम्राज्य व अरण्य हीं दोन्ही मला सारखींच आहेत. अरण्यांतही सुखानें राहूं.'

दशरथाच्या मृत्यूनंतर वृद्ध मंत्री जाबाली ऋषीनें रामास अयोध्येस येऊन राज्यसूत्र हातीं घेण्याबद्दल आग्रह केला. तेव्हां रामानें जें उत्तर दिलें त्यावरून त्याच्या अंतःकरणांत आपण पित्यास दिलेलें वचन पूर्ण करण्यासंबंधाची इच्छा किती जाज्वल्य होती हें दिसून येतें. जाबाली म्हणाला, 'रामा, बाप कोण आणि पुत्र कोण ? बापाची प्रतिज्ञा पुत्राला काय म्हणून लागू असावी ? पिता, पुत्र, भाऊबंद इत्यादि सर्व थोतांड आहे. जें आपणाप उपभोग घेण्यास मिळत आहे त्याचा स्वीकार करावा.' हें भाषण ऐकतांच क्रोधानें रामचंद्र म्हणाला— 'जाबाले ! सत्य हें मला सर्वांहून अधिक प्रिय आहे. राज्याची इमारतच सत्याच्या पायावर रचलेली आहे. सत्य सर्व धर्मांचें मूळ आहे. लोभ, क्रोध किंवा मोह यांस बळी पडून मी सत्य कधींही सोडणार नाहीं. सत्य व कर्तव्यकर्म यांस धरून वागणें, सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं दया दाखविणें, द्विज, देव व अतिथि यांची पूजा करणें हाच सन्मार्ग आहे, असे मुनिजन सांगत आले आहेत. त्याच मार्गानें आपण गेलें पाहिजे." दुसऱ्या एका प्रसंगीं त्यानें लक्ष्मणास सांगितलें, 'लक्ष्मणा, मी तुला खरोखर सांगतों कीं संपत्ति, सौख्य, राज्यपद यांचा स्वीकार मी तुझ्यासाठीं करीत आहें. आम्हां बंधूंत ऐक्य असावें व सर्वांचें कल्याण व्हावें म्हणून मी राज्यपदाचा अंगिकार करितों, हें तुला सत्यास स्मरून सांगतों. सर्व जगावर राज्य मिळविणें मला असाध्य नाहीं, परंतु अधर्मानें मला इंद्रपदाचीही प्राप्ति झालेली नको.' याप्रमाणें रामायणकालीं आबालवृद्धाची

## सामाजिक नीतिमत्ता

अत्यंत उच्च पायरीस पोहोंचण्याचें कारण काय असावें, याचा विचार करतां असें दिसतें कीं, समाजांत कालेंकरून ज्यांस अग्रस्थान प्राप्त झालें होतें, असे ब्राह्मण आपल्या आचरणानें अत्यंत शुद्ध व उदात्त असत. त्यांचा निस्पृहपणा श्रेष्ठ प्रकारचा असे. अध्ययन व अध्यापन किंवा स्वतः शिकणें व दुसऱ्यास शिकविणें हेंच मानवजन्मांतील मुख्य ध्येय असें समजून तें साध्य करण्यांत

ते सदा मग्न व तत्पर असत. संसारसुखांत डोलणाऱ्या व केवळ प्रापंचिक कार्यांत गुंतल्यामुळें मोह पडून स्वकर्तव्यापासून ढळणाऱ्या लोकांना पुनःपुनः सदाचरणाचा मार्ग दाखवून देण्यास ते कधींही चुकत नसत. त्यांच्या तेजापुढें राव व रंक सारखेच वांकत. असे हे ऋषिपदास पोहोंचलेले ब्राह्मण शहरवासियांच्या कामधंद्याच्या गडबडीमुळें आपल्या अध्ययनादिक नित्यनैमित्तिक कर्मांस त्रास होऊं नये म्हणून शहरापासून किंचित् लांब रहात. त्या कालच्या ब्राह्मणश्रेष्ठांचीं जीं अनेक नांवें अमर झालीं, त्यांत वसिष्ठ, विश्वामित्र, भारद्वाज, वाल्मीकि, ऋष्यश्रृंग, अत्रि वगैरे वैदिकांचीं चरित्रें रामायणांत आढळतात. वसिष्ठांचा आश्रम अयोध्यानगरीच्या बाहेर होता. वाल्मीकि तमसा व गंगा यांच्या संगमावर रहात. गौतम हे जनकराजाचे उपाध्याय असून मिथिलेजवळच्या एका आनंददायक काननांत रहात होते. विश्वामित्राचा आश्रम गंगेच्या पलीकडे असून तो सिद्धाश्रम या नांवानें प्रसिद्ध होता. भारद्वाज प्रयागास रहात होते. अत्री, सुचक्षु, अगस्त्य व इतर अनेक ऋषि दंडक नांवाच्या भयंकर अरण्यांत पर्णकुटिकेंत रहात. त्यांच्या हाताखालीं अनेक विद्यार्थी अध्ययनासाठीं राहून गुरूची सेवासुश्रूषा करण्यांत आनंद मानीत. अशा प्रकारच्या आल्हाद देणाऱ्या जागेंत अत्यंत उदात्त विचारांनीं प्रेरित झालेल्या गुरूच्या उपदेशामृताचा आस्वाद घेऊन पुष्ट झालेले ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य विद्यार्थी कालेंकरून समाजाचे नेते बनल्यावर त्यांच्या वर्तनाचा पगडा समाजावर बसे व त्यांच्याच सल्ल्यानें वागण्यास श्रीमंत व गरीब तयार असत. अशा सन्मार्गदर्शक समाजनायकांपैकीं जे कित्येक प्राचीन कालीं प्रसिद्धीस आले, त्यांतील श्रीराम व श्रीकृष्ण हे तर प्रत्यक्ष अवतार असें मानण्यांत आलें. निरिच्छपणें ब्रह्मकर्मे चालविणाऱ्या ब्राह्मणांचें रक्षण करणें, त्यांच्या लहानमोठ्या गरजा भागविणें व प्रसंगविशेषीं त्यांचा गौरव करणें, यांतच युद्धकुशल क्षत्रियराजे व धनधान्यादिकांची समृद्धि सेवन करणारे वैश्य यांना आनंद व अभिमान वाटे. म्हणूनच ते ऋषिजनांचा सेवा करण्यास एका पायावर तयार असत. विशेषतः

## रामायणकालीं ब्राह्मणांचें वर्चस्व

फार वाढलें होतें. राज्यवैभवसंपन्न असे क्षत्रिय देखील त्यांस मान देत. यामुळें सहजच सर्व प्रजाजनही त्यांस अत्यंत पूज्य मानीत असत. दशरथ व त्याचे सर्व पुत्र वसिष्ठाच्या अर्ध्यांवचनांत वागत. जनक हा त्या कालचा

अत्यंत विद्वान् क्षत्रिय राजा ब्रह्मविद्येंत ब्राह्मणांहूनही निष्णात होता. तथापि तो ब्राह्मणांस फार मान देत असे. परशुरामाशीं युद्ध करण्याचा जेव्हां रामावर प्रसंग आला, तेव्हां रामचंद्रानें त्याची केवळ ब्राम्हण म्हणून क्षमा मागितली. रामचंद्र वनवासास जाण्यासाठीं निघाला तेव्हां त्यानें व सीतेनें ब्राह्मणांस द्रव्य वांटून दिलें. त्या वेळीं राम म्हणाला–'लक्ष्मणा, ब्राह्मण हे अभ्यासांत मग्न असल्यानें आपल्या चरितार्थाची काळजी बाळगीत नाहींत. यासाठीं त्यांस दान देणें हें आपलें कर्तव्य आहे.' क्षत्रियबलापेक्षां ब्रह्मतेजोबल हेंच त्या काळीं श्रेष्ठ असें मानीत. म्हणूनच विश्वामित्रानें, असे उद्गार काढले—'धिग्बलम् क्षत्रियबलम्, ब्रम्हतेजोबलम् बलम्' म्हणजे क्षत्रियबल व्यर्थ आहे. ब्रह्मतेजोबल हेंच खरें बल होय. कुरुपांचालांचा **महाभारतांतील** इतिहास वाचला असतां क्षत्रियांचे धर्ममार्गदर्शक क्षत्रियच असत असें दिसतें. श्रीकृष्ण, भीष्म, धर्म वगैरे क्षत्रियांनींच धर्मतत्त्वाचें विवरण व धर्मोपदेश केल्याचें आढळतें. ब्रह्मतेजोबलापेक्षां क्षत्रियतेजोबल त्याकालीं अधिक मानीत, ह्मणून ब्राह्मणदेखील शस्त्र धारण करून युद्धांत सामील होत. सारांश रामायण व महाभारत यांच्या कालांतील सामाजिक स्थितींतील ठळक अंतर हेंच कीं, **रामायणकालीं ब्रह्मतेजोबलास व महाभारतकालीं क्षत्रियबलास विशेष मान देत.** दुर्योधन, कर्ण, भीम, अर्जुन, भीष्म यांसारखे योद्धे कुरुपांचाल युद्धाच्या वेळीं धैर्यशौर्यादि गुणांनीं मंडित असल्याचें जसें दिसून येतें, तसेंच त्यांतील भीष्म, कृष्णासारखे क्षत्रिय अध्यात्मविद्येंत निष्णात असल्याचें सिद्ध होतें. त्यांस स्वपक्ष व परपक्षाकडूनही योग्य मान मिळे. रामायणकालीं शौर्यापेक्षां सात्विक गुणांची विशेष महती वाढली. यासाठींच तत्कालीन समाजाचें चित्र रेखाटतांना वाल्मीकिनें सदाचार, सत्वस्थ वृत्ति, भूतदया वगैरे गुणांची महती गायिलेली असून रामायणांतील मुख्य पात्रें प्रेमळ, सद्वर्तनी व कोमल अंतःकरणाचीं असल्याचें सांगितलें आहे. श्रीरामाचा श्वशुर

## वैदेही जनक राजा

याची जागोजागीं स्तुति केलेली आढळते. जनकास राजर्षि म्हणत. बृहदारण्यकोपनिषदांत असें लिहिलें आहे कीं, जनकापाशीं ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्यासाठीं अनेक विद्वान् लोक येत. याज्ञवल्क्य ऋषीशीं होत असलेले वादविवाद लक्षांत घेतां, जनकराजा किती योग्यतेचा होता, हें समजून येतें. महाभारतांत

असें लिहिलें आहे कीं, जेव्हां व्यासाला आपला पुत्र शुक याची वेदांतासंबंधानें योग्य समजूत पाडतां येईना, तेव्हां त्यानें त्यास जनकापाशीं पाठवून दिलें. जनक हा विदेही वंशाचा होता. त्याचें वर्तन सर्वथैव निवृत्तिपर असल्यानें त्याला विदेही हें सार्थ नांव पडलें. जनकराजा असें म्हणे कीं, 'माझी संपत्ति अपरंपार आहे. कारण माझें असें कांहीं नाहीं. सर्व मिथिला नगरी जरी अग्निमुखीं पडली, तरी माझें असें कांहींच दग्ध होणार नाहीं.' एकदां ऋषिपदास पोहोंचलेल्या एका विदुषीनें जेव्हां जनकापुढें सन्यस्त वृत्तीची प्रशंसा करून राज्यसूत्रें चालविण्यांत खरें सौख्य नाहीं असें आपलें मत प्रदर्शित केलें, तेव्हां जनकानें दिलेलें उत्तर विचार करण्याजोगें आहे. तो म्हणाला 'राज्यकारभारांत जरी मी गुंतल्याप्रमाणें दिसतों, तरी कोणत्याही प्रकारच्या मोहापासून मी अलिप्त आहें. ज्ञानाच्या योगानें मुक्ति मिळवितां येते हें जर खरें आहे तर राजा किंवा संन्यासी या उभयतांनाही मुक्ति मिळविण्यास हरकत नाहीं.' एकदां एका ब्राह्मणानें जनकास 'तुमची सत्ता कोणत्या प्रदेशावर चालते ?' असा प्रश्न केला. तेव्हां जनक म्हणाला, "माझी सत्ता विस्तीर्ण प्रदेशावर चालते; परंतु सबंध पृथ्वीवर शोधलें असतांही माझें खरें राज्य मला सांपडेना. माझी मिथिला नगरी, माझें घरदार व मुलें या सर्वांवर माझी सत्ता आहे, वगैरे विचारांत कांहीं काल लोटल्यावर माझ्या विचारांचा फोलपणा मला दिसून आला; व शेवटीं समजून आलें कीं, माझें असें निराळें राज्य नाहीं किंवा ज्यावर पूर्ण सत्ता आहे असा निराळा पदार्थ नाहीं. सर्वच माझें आहे. एकंदर दृश्य पदार्थांस अंत हा आहेच. अशा क्षय पावणाऱ्या पदार्थांवर ममत्व बुद्धि अधिष्ठित करण्यापासून फायदा कोणता ? माझें मन व सर्व पदार्थ यांवर स्वामित्व मिळविल्यामुळें त्यांच्या स्वाधीन मी न होतां तेच माझ्या कह्यांत राहून देव, पितृ, अतिथि व भूतमात्र यांच्या प्रीत्यर्थ मी सर्व कर्में करीत असतों." अशा प्रकारच्या उदात्त विचारांनीं प्रेरित झालेला जनक, शीलासाठीं शेवटपर्यंत कष्ट सोसण्यास तयार झालेली त्याची कन्या वैदेही जानकी व सत्यनिष्ठ सदाचारसंपन्न श्रीराम यांची महति गावी तेवढी थोडीच आहे. स्वतःच्या अंगांतील विकारांस जिंकून त्यांनीं मनावर व इंद्रियांवर स्वामित्व मिळविलें होतें. तसेंच सत्कर्मांस विघ्नें आणणाऱ्या शत्रूंवरही त्यांनीं जय मिळविला होता. धर्म व नीति यांच्याच पथांत चालण्याचें ज्याप्रमाणें श्रीरामानें व्रत केलें, तसेंच व्रत त्याच्या प्रजेनेंही पाळिलें. त्या कालीं पितृभक्त व सत्यवचनी म्हणून ज्याप्रमाणें रामाची स्तुति होऊं लागली तशीच प्रजावत्सल राजा म्हणूनही त्याची ख्याति झाली.

# रामराज्य

हा शब्दच अत्युत्तम राज्यव्यवस्थेचा दर्शक होऊन बसला आहे. सौख्य व समृद्धि यांच्या योगानें प्रजाजन उल्हसित असत. वडीलजन, मातापितर, गुरु व इतर वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध लोकांबद्दल समाजांत पूज्य भाव असे. एक दुसऱ्याशीं प्रेमानें वागे. कवीच्या अलंकारिक भाषेंत सांगावयाचें म्हणजे त्या कालीं सृष्टिनियमानुसार अंगीं असणारे दुर्गुण देखील नाहींसे होऊन वाघ व गाई एकाच पात्रांत जलपान करीत. यथाकाल पर्जन्यवृष्टि व निरालस्यानें चालविलेले धनोत्पादक व्यवसाय यांच्यामुळें देशांत सुबत्ता नांदे व लोक सौख्याचा आस्वाद दीर्घ काल घेत. अपमृत्यु व अकालिक मरण यांच्या बाधेपासून लोक मुक्त असत. एकदां मात्र एका ब्राह्मणाचा पुत्र अकालीं मरण पावला, तेव्हां त्याबद्दल रामापाशीं कागाळी आली. रामानें लागलीच चौकशी करून त्या अनर्थाचें कारण शंबुक नांवाच्या शूद्राची तपश्चर्या आहे असें ठरविलें, व त्यास देहान्त प्रायश्चित्त दिलें. यावरून असें सिद्ध होतें कीं, धर्माचें नियमन राजाज्ञेनें होत असे. ब्राह्मणादि चातुर्वर्णांचीं धार्मिक कर्तव्यकर्में ठरून गेलीं होतीं व त्यांच्यापासून परावृत्त होऊन भलत्याच पथानें जाणारास शिक्षा ठरलेल्या असून, त्यांची अंमलबजावणी करणें हें राजाचें कर्तव्य होतें. राजाच्या वर्तनावर प्रजेचें वर्तन अवलंबून असतें, असें राम समजत असे; म्हणूनच त्यानें प्रजेस चांगला धडा घालून देण्यासाठीं अत्यंत कष्टप्रद असे प्रसंग स्वतःवर ओढवून घेतले; युवराजराज्याभिषेकाच्या प्रसंगीं सिंहासनाचा त्याग करून अरण्यवास पत्करला. रावणानें सीतेस हरण केल्यावर जिच्या प्राप्तीसाठीं त्यानें लंकेस जाण्याचें व भयंकर राक्षसांशीं वानरसैन्य घेऊन झुंजण्याचें धाडस केलें, त्याच सीतेचा प्रजेंतील एका क्षुद्र व्यक्तीचें समाधान करण्यासाठीं त्यानें एकदम त्याग केला. रामाचा वंश सीतेच्या उदरीं होता. अशा नाजुक स्थितींत सीतेचा त्याग करणें हें व्यावहारिकदृष्ट्या निष्ठुरपणाचें कृत्य खरें, तथापि ज्या नीतित्त्वाच्या अनुरोधानें जाण्याचें खडतर असिधारा व्रत रामानें पतकरिलें होतें त्या तत्त्वाचा विचार केला असतां त्याचें वर्तन योग्य होतें असेंच म्हणावें लागेल. सत्यानें व धर्मानें वागणें आणि प्रजेचें रक्षण व आराधन करणें, या नीतितत्त्वांस धरून राम सदोदित पाऊल टाकीत असे. रावण जेव्हां लढाईत ठार झाला तेव्हां राम म्हणाला "बिभीषणा, रणांत जय किंवा अपजय ठरलेलाच आहे, परंतु हा तुझा शूर भ्राता पराक्रम करून रणांत मेला

आहे, क्षत्रिय वीराला असेंच मरण योग्य आहे. अशा मरणाबद्दल शोक न करितां आनंद मानावा. तेव्हां शोक न करतां पुढच्या विधीच्या तजविजीस लाग. आमचें वैर याच्या मरणाबरोबर संपलें. जसा तुझा तो भाऊ आहे तसा माझाही आहे." यावरून रामाच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. सुवर्णमय लंका हस्तगत झाली, परंतु तिचा लोभ न धरितां ती एकदम बिभीषणाच्या हवालीं करणाऱ्या शूराची निर्लोभता अवर्णनीय आहे. शेवटीं ज्या लक्ष्मणास जिवापलीकडे तो जपत असे त्याला एकदम हद्दपार करून आपण यतीस दिलेलें वचन रामानें खरें केलें. या एकंदर कृत्यांचा शांतपणें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, रामाचें वर्तन ज्या उदात्त नीतितत्त्वांवर अवलंबून होतें त्या तत्त्वांस अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगींही त्यानें टाकून दिलें नाहीं. असो.

## रामायणकालीन स्त्रिया

कोणत्या प्रकारच्या होत्या यासंबंधाचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे सीता, मंदोदरी, तारा, कौसल्या व कैकयी यांचीं होत. रामायणांतील स्त्रिया स्थिरबुद्धीच्या, धर्मपरायण, कोमल अंतःकरणाच्या व सर्वांवर प्रेम करणाऱ्या अशाच आहेत. रामायणकालाच्या सुमारास रामराज्याच्या पश्चिमेस कौरवांची वसाहत होती त्यांच्या इतिहासांत स्त्रियांसंबंधानें पुढील मतें प्रदर्शित केलेलीं आढळतात. त्यांवरून तत्कालीन स्त्रीसमाजाची योग्यता समजून येणार आहे—

(१) पूज्या लालयितव्याश्च स्त्रियो नित्यं जनाधिप।
स्त्रियो यत्र च पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः॥ अनु० ४६ ५॥

(२) अपूजिताश्च यत्रैता सर्वास्तत्राफलाः क्रियाः।
तदा चैतत्कुलं नास्ति यदा शोचन्ति जामयः॥ अनु०४६-६॥

(३) अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः॥आदि०७४-४०॥

अर्थ—'(१) ज्या ठिकाणीं स्त्रियांस मान मिळतो तेथें देवता आनंद पावतात ह्मणून स्त्रियांचें लालनपालन करून त्यांचा मान राखावा. (२) ज्या ठिकाणीं स्त्रियांना मान मिळत नाहीं तेथें सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुळांत त्या दुःखीत असतात तें विनाश पावतें. (३) भार्या ही पतीची अर्धांगी आहे. ती त्याचा अत्यंत श्रेष्ठ मित्र आहे. ती धर्म, अर्थ, काम या तीन पुरुषार्थांचें मूळ असून भवसागरांतून तिच्यामुळें तरून जातां येतें–' भारत-

रामायणाचे अभिमानी आम्ही हिंदूंनीं या वरील वाक्यांतील सत्यत्व जाणून स्त्रियांची योग्यता वाढविण्याचा यत्न केला असता तर आमच्या समाजास सध्याप्रमाणें अवनति प्राप्त झाली नसती असें जे आमच्यांतील विद्वान् प्रतिपादन करीत असतात त्यांतील महत्त्व व खरेपणा वरील व्यासवचनांवरून दिसून येणार आहे. मातृपदाचें श्रेष्ठत्व अत्यंत उच्च प्रकारचें आहे असें प्राचीन आर्य मानीत. उदाहरणार्थ—

**(१) दशचैव पितॄन् माता सर्वां वा पृथिवीमपि ।**
**गौरवेणाभिभवति नास्ति मातृसमो गुरुः ॥** अनु. १०५--१५

**(२) नास्ति मातृसमा च्छाया नास्ति मातृसमा गतिः ।**
**नास्ति मातृसमं त्राणं नास्ति मातृसम प्रिया ॥** शांति.२६७-३१.

अर्थ--(१) 'एक माता दहा पित्यांपेक्षां किंबहुना पृथ्वीपेक्षांही योग्यतेनें जास्त आहे. मातेसारखा गुरु नाहीं. (२) मातेसारखी ( थंडावा देणारी ) छाया नाहीं, मातेसारखी गति नाहीं, मातेसारखी त्राण देणारी ( अंगांत सामर्थ्य उत्पन्न करून देणारी ) दुसरी कोणी नाहीं आणि मातेइतकी प्रिय वस्तूही दुसरी नाहीं.' प्रेम, आनंद, स्वार्थत्याग, सहिष्णुता, निरपेक्ष ममता यांचें निधान म्हणजे माता होय, आणि प्रत्येक कन्या ही भावी माता असल्याकारणानें तिला कालेंकरून प्राप्त होणारें श्रेष्ठपद ( मित्र, गुरु वगैरे ) भोगण्याची तिच्या अंगीं पात्रता आणून देण्याची जबाबदारी कुटुंबनायकांवर आहे हें कोण कबूल करणार नाहीं ? मनूनें स्त्रियांसंबंधानें अत्यंत अनुदार मत प्रदर्शित केलें, तथापि त्यांना पूज्य मानावें असें सांगितल्याशिवाय त्याच्यानें रहावेना. यासाठींच केवळ भारतांतील मतांप्रमाणें त्यानें आपलें मत स्मृतींत नमूद केलें. त्याचीं वाक्येंदेखील भारतांतील वाक्यांप्रमाणेंच आहेत. ( अध्याय ३–५५ ते ५७ पहा. ) एकंदरीनें पाहतां कुरुपांचाल व कोसलविदेही वंशाच्या आर्यांनीं गंगानदीच्या आसमंतात् वसाहत केली, त्या कालीं समाजांत स्त्रियांसंबंधानें आदरभाव वसत होता व स्त्रियाही पातिव्रत्य, वीरत्व, प्रेम, धर्मानुसार वर्तन वगैरेंच्या योगानें योग्यतेस पोहोंचलेल्या होत्या. जेव्हां रामचंद्रास महायुद्धांत विजयश्रीनें माळ घातली तेव्हां त्यानें सीतेस निरोप पाठविला कीं—'तुझ्यासारख्या धर्मपरायण स्त्रीच्या प्रभावानेंच मला या लढाईत मोठा जय मिळाला आहे.' स्त्रिया पतिसमागमांत राहून बिनतक्रार कष्टाचे दिवस क्रमण्यास सिद्ध असत, हें सीतादेवीच्या

वर्तनावरून दिसून येतें. राम वनवासास निघाला, तेव्हां सीतेनें ज्या शब्दांत रामास आपणास नेण्याबद्दल विनंति केली, त्यावरून

## पतिपत्नींतील प्रेम

किती उदात्त स्वरूपाचें होतें, हें समजून येणार आहे. सीता म्हणाली–' रामा, तुमच्या सहवासाच्या आनंदापुढें वनवासाचे कष्ट मला कांहींच वाटत नाहींत. ज्याच्या हातावर पाणी घालून पित्यानें आपली कन्या दिली ती त्याचीच झाली. अशी ही सर्वस्वी आपली झालेली पतिव्रता पत्नी आपल्याबरोबर न्यावी. अगदीं घोर वनांतसुद्धां हिरव्यागार तृणावर कुशांचें अंथरूण घालून मी निजेन. त्या वेळच्या सुखापेक्षां अधिक सुख तें कोणतें ? तुमचा सहवास म्हणजेच स्वर्ग व तुमचा वियोग म्हणजेच नरक होय.' वनवासांत सीतेमुळें रामाचे दिवस अत्यंत आनंदांत गेले. तिला रावणानें नेल्यावर त्याला अपरिमित दुःख झालें. पुढें तिला लंकेहून आणल्यानंतर जेव्हां तिचा त्याग केला, तेव्हां तिनें लक्ष्मणा-जवळ रामास जो निरोप पाठविला त्यावरून ती किती श्रेष्ठ पदास पोहोंचलेली स्त्री होती, हें दिसतें. ती म्हणाली–'लक्ष्मणा, जें माझ्या नशिबीं आलें आहे तें मी भोगण्यास तयार आहें. मला तूं राजाच्या आज्ञेप्रमाणें सोडून जा. तुझें कर्तव्य तूं कर. सर्व सासूबाईंना माझा नमस्कार सांग. आणि त्या परम धार्मिक रामाला माझा असा निरोप सांग कीं, महाराज, सर्वांसमक्ष दिव्य करून मी निष्पाप आहें हें सिद्ध केलें. माझी तुमच्या ठिकाणीं भक्ति किती आहे, हें तुम्ही पूर्ण जाणत आहां. असें असून लोकापवादास भिऊन माझा तुम्हीं त्याग केला, हें मला मान्य आहे. कारण स्त्रियांना पति हेंच दैवत, पति हाच त्यांचा बंधु, तोच त्यांचा गुरु. लोकोपवादामुळें सत्कीर्तीला कलंक लागूं नये, ही तुमची इच्छा तुम्हाला भूषण देणारी आहे. राजा या नात्यानें हा तुमचा परमधर्म आहे. आपल्या कीर्तीला कलंक न लागावा हें मलाही इष्ट आहे. यासाठीं माझा त्याग केल्याबद्दल मी आपणास दोष देत नाहीं. मला माझ्या देहाची मुळींच पर्वा नाहीं. आपला वंश माझ्या पोटांत आहे, तो बाहेर पडल्यावर जन्मोजन्मीं मला आपणच पति व्हावे परंतु या जन्माप्राणें मला आपला वियोग मात्र घडूं नये म्हणून मी उग्र तप करणार आहें; तरी पत्नी या नात्यानें आपण जरी माझ्यावर प्रेम न ठेविलें तरी राज्यांतील एक तपस्विनी म्हणून आपली माझ्यावर कृपादृष्टी असावी.' हे विचार विदेही जनकाच्या दुहितेला साजेसेच आहेत. रावणानें

सीतेचें मन वळविण्यासाठीं पहाऱ्यावर ज्या राक्षसिणी ठेविल्या होत्या, त्यांनीं तिला रावणास वश होण्याबद्दलचा आग्रह करतांच तिनें एकदां असें उत्तर दिलें, —'राम जरी राज्यहीन असला तरी तो माझा भर्ता आहे आणि मला गुरूप्रमाणें वंद्य आहे. सूर्याची पत्नी सुवर्चला, इंद्राची शची, वसिष्ठाची अरुंधती चंद्राची रोहिणी, अगस्तीची लोपमुद्रा, च्यवनाची सुकन्या, सत्यवानाची सावित्री, कपिलाची श्रीमती किंवा नैषधाची दमयंती, या जशा पतिव्रता पतिपरायण आहेत तशी मी पतिपरायण आहें.' या नामावलीस तारामती, तारा, द्रौपदी, मंदोदरी, कौसल्या, देवकी वगैरे कित्येक प्राचीन आर्य स्त्रियांचीं नांवें जोडतां येतील. त्या सर्वांत सीतेस अग्रमान दिल्यास वावगें होणार नाहीं. प्राचीन आर्य स्त्रिया सत्वस्थपणा, सहिष्णुता, प्रेम, सद्विचार वगैरे गुणांमुळें प्रसिद्धीस आल्या. त्यांचे गुणानुवाद तत्कालीन व नंतरच्या पुराणकारांनीं व इतर लेखकांनीं गाइले. त्यांचीं चरित्रें वाचणें, ऐकणें व गाणें हें पुण्याचें कृत्य आहे, अशी समाजाची समजूत झाली. याचा परिणाम असा झाला कीं, इतर ऐहिक प्रगतींत आमच्या स्त्रिया व त्यांच्या अज्ञानदशेमुळें एकंदर समाज जरी मागें पडला तरी वर निर्दिष्ट केलेल्या सद्गुणांचें ठाणें आमच्या देशांत कायमचें राहिलें, याबद्दल आह्मी या प्राचीन वंदनीय सत्पुरुषांचे व साध्वींचे गुणानुवाद गावे तितके थोडेच आहेत. त्यांचा जीवनक्रम आदर्शवत् मानला जातो, यांत आश्चर्य नाहीं. या प्राचीन सद्गुणशिरोमणींबद्दल प्रत्येक हिन्दु म्हणविणारास अभिमान वाटत असतो म्हणून त्यांच्यांतील गुणांचें अनुकरण करण्याकडे प्रवृत्ति होऊन सच्छीलता, सोशिकपणा, सत्याबद्दल आदर, भूतदया वगैरे गुण हिन्दूचीं लक्षणें होऊन बसले. मॅगेस्थनीस व इतर जे परकीय प्रवासी या देशांत मागें येऊन गेले त्या सर्वांनीं या गुणांबद्दल हिन्दूंची तारीफ केलेली आहे. सध्यां मात्र तीव्रपणें चाललेल्या जीवनार्थ झटापटीमुळें या गुणांचा कांहीं अंशानें लोप होत चालला आहे. तरी समाजाच्या खऱ्या व शाश्वत प्रगतीस अवश्य असलेल्या धैर्य, शौर्य, साहस वगैरे गुणांस सत्यनिष्ठा, सहनशीलता इत्यादि गुणांची जोड असणें सर्वथैव इष्ट आहे. यासाठीं रामसीतेच्या चरित्रासारखीं चरित्रें लोकांपुढें कायम ठेविलीं पाहिजेत. सीतेशिवाय इतर ज्या स्त्रिया रामायणांत आढळतात त्यांत वसिष्ठपत्नी अरुंधती हिला सर्व लोक बहुमान देत असत. मत्सर व स्वार्थ यांचा पगडा कैकयीवर बसेपर्यंत तिचें वर्तन वीरपत्नीस व गृहिणीस शोभण्यासारखेंच होतें. आर्यांहून कमी दर्जाच्या लोकांतील स्त्रियांच्या अंतःकरणांतही नीतितत्त्वें

चांगलीं भिनलीं होतीं. तत्त्वज्ञानासारखा गहन विषय समजण्याइतकी त्यांची पात्रता होती. तारा, मंदोदरी व कौसल्या यांचीं रामायणांतील चरित्रें वाचलीं असतां स्त्रियांची बुद्धिमत्ता तीव्रतर होती हें दिसून येणार आहे. रामायणकालीं समाजांतील चातुर्वर्णांचीं कर्तव्यकर्मे ठरून गेलीं होतीं व विचारांचा ओघ अत्यंत पवित्र होता, हें जरी खरें आहे, तथापि

## नूतन विचारांचा उदय

त्या कालीं झाला होता असें मानण्यास जागा आहे. क्षत्रिय विश्वामित्रानें वसिष्ठाची बरोबरी करून राजर्षीच्या पदापासून ब्रह्मर्षीच्या पदास चढण्याची जी खटपट केली, तिचें महत्त्व लक्षांत घेतां उच्च पायरीस जाण्याकडे खालच्या पायरीच्या लोकांची प्रवृत्ति दिसून येते. विश्वामित्रानें तपश्चर्या करून शेवटीं आपणास ब्राह्मण म्हणवून घेतलें. शंबूकाच्या उदाहरणावरून तरी हेंच दिसतें कीं शूद्रांस देखील उच्चतम अशा ब्राह्मणांच्या पायरीस जाऊन पोहोंचावें असें वाटूं लागलें होतें. तपाचें महत्त्व विशेष असल्यामुळें क्षत्रिय, शूद्र व राक्षस देखील तपोबलानें ब्राह्मणाची बरोबरी करण्याचा यत्न करीत; याचीं विश्वामित्र, शंबुक व रावण हीं उदाहरणें आहेत. दुसरें असें कीं, इहलोकींचा अनुभव विशेष मोलवान मानून पारलौकिक विचारांचें महत्त्व कमी मानणारे लोकही या कालीं होते. जाबाली तर ऋषि होता. त्यानें रामास केलेला उपदेश एकाद्या नास्तिकास शोभण्याजोगा आहे. जाबाली म्हणतो–"बाप कोण आणि पुत्र कोण ? हे सर्व संबंध तात्पुरते आहेत. बापाची प्रतिज्ञा पुत्राला काय म्हणून लागू असावी ? हीं श्राद्धादि कर्मे द्रव्यलुब्ध भिक्षुकांनीं पैशासाठीं लावून दिलीं आहेत. नाहीं तर बाप मरून तो पंचमहाभूतांत मिळून गेल्यावर त्याला पिंड कसे पोहोंचणार ? जे पिंड मृत्युलोकीं दिले असतां मेलेल्या बापास स्वर्गांत पोहोंचतात तेच येथल्या येथें बाप परगांवीं गेला असतां त्याला दिले तर कां पोहोंचत नाहींत ? सारांश पितापुत्र, भाऊबंद इत्यादि सर्व थोतांड आहे. जें आपल्या समोर आलेलें आहे आणि आपल्या उपभोगास मिळत आहे तें खुशाल घ्यावें. भरत तुला खुशीनें राज्य देत आहे तें बापाच्या वचनाची पर्वा न करितां तूं खुशाल घे." (अयोध्याकांड १०८–३.)

दुःखातिरेकानें व अनेक संकटांच्या दडपणाखालीं चेंगरून गेला असतां अत्यंत विचारी मनुष्य देखील पापपुण्यासंबंधाच्या कल्पना झुगारून देण्यास

कसा तयार होतो, याचें लक्ष्मण हें एक उदाहरण आहे. लक्ष्मण म्हणालाः—

**शुभे वर्त्मनि तिष्ठन्तं त्वामार्य विजितेंद्रियम् ।**
**अनर्थेभ्यो न शक्नोति त्रातुं धर्मो निरर्थकः ॥**
**भूतानां स्थावराणां च जंगमानां च दर्शनम् ।**
**यथास्ति न तथा धर्मस्तेन नास्तीति मे मतिः ॥**

युद्धकांड ८३, १४—१५.

" रामा, धर्म धर्म म्हणून तुम्ही त्याचें जिवापाड रक्षण करतां, परंतु तो धर्म मात्र तुमचें रक्षण करीत नाहीं. मला वाटतें, धर्म व अधर्म हे पदार्थच नाहींत. अधर्म खरोखरी असता तर रावण नरकास गेला असता आणि तुह्माला ही दुःखपरंपरा आली नसती. धर्मपरायण माणसेंच दुःख पावतात आणि अधर्मशील समृद्धि भोगतात. यासाठीं धर्माधर्म या गोष्टीच खोट्या आहेत. अथवा धर्म हा नपुंसक असून तो बळाचा आश्रय करून रहातो असें वाटतें. कारण बळानें व पराक्रमानें सर्व प्राप्त होतें; तर मग तुम्ही केवळ पराक्रमाचाच मार्ग कां स्वीकारीत नाहीं ? धर्माधर्म कशास पाहतां ? मला वाटतें अर्थ हेंच धर्माचें मूळ आहे. तुम्हीं राज्य टाकिलें तेव्हांच तुमचें हें मूळ नाहींसें झालें. अर्थ ज्या जवळ आहे तो बुद्धिवान्, तो पराक्रमी, तो सर्व कांहीं आहे. अर्थापासून हर्ष, काम, धर्म, शम, दम, सर्व साध्य आहेत. जेव्हां तुम्ही पित्याच्या आज्ञेनें हीं वल्कलें धारण केलीं तेव्हांच तुम्हीं तो अर्थ टाकिला; आणि यामुळेंच तुमची भार्या रावणानें नेली." संकटांमुळें चांगल्या मनुष्यांनाही पुण्य व पाप यासंबंधानें मोह पडे, हें यावरून दिसतें. परंतु राम मात्र यास अपवाद होता.

रामायणांत रामाचा व त्यानें केलेल्या पराक्रमाचा इतिहास लिहितेवेळीं कवि वाल्मीकीनें अनेक ठिकाणीं अतिशयोक्ति केलेली आहे. तसेंच वानर, राक्षस वगैरेंचें वर्णन वाचतां तें सत्यत्वास धरून नाहीं, असें ठरवून

## राम ही व्यक्ति काल्पनिक

असावी, असें कित्येक प्रतिपादन करतात. आर्यांनीं दक्षिणेकडे सिंहलद्वीपापर्यंत स्वारी करून आपली सत्ता दक्षिणहिंदुस्थानांत स्थापन केली, हें दाखविण्यासाठीं रामायण हें काल्पनिक काव्य रचलें गेलें, असा कित्येकांचा तर्क आहे. रामानें शिला होऊन पडलेल्या अहल्येचा पादस्पर्शानें उद्धार केला, याचा अर्थ ते असा लावतात कीं, प्रथमतः विंध्यपर्वताच्या आसमंतांतील प्रदेश ओसाड

होता. आर्यांचा प्रवेश त्या भागांत होतांच शेतकीचा व्यवसाय वाढला व केवळ दगडांनीं भरलेली जमीन सुधारलेल्या शेतकीपद्धतीमुळें भरपूर पीक देऊं लागली. कित्येक म्हणतात कीं, रामायणांतील मुख्य पात्रें हीं वेदांतील देवता होत. सीतेला वेदांत कृषिदेवता मानून तिची स्तुति केलेली आढळते. ( ऋक्. ४ सूक्त ५८. ) रामायणांत असें सांगितलें आहे कीं, जमीन नांगरतांना सीता सांपडली. यावरून वेदकालची सीता रामायणांत रामपत्नी असल्याचें दर्शविण्यांत आलें. त्याचप्रमाणें राम हा इंद्र, रावण हा वृत्रासुर, हनुमान हा मरुत् असून सीतेचें रावणानें हरण केलें, याचा अर्थ वृत्रासुरानें अवर्षण पाडून शेत पीक देईनासें केलें व इंद्रानें त्याला ठार करून पाण्याचा मार्ग खुला करून सर्वांस सुखी केलें असा आहे. अहल्येच्या उद्धारासंबंधानें कुमारिल भट्टानें जें विवेचन केलें आहे, त्यांत असें ह्मटलें आहे कीं, इंद्र म्हणजे सूर्य व अहल्या म्हणजे रात्र होय. तो रात्रीच्या जवळ जातांच त्याच्या सान्निध्यामुळें रात्र किंवा अहल्या नष्ट झाली. थिऑसॉफी धर्मपंथाच्या अनुयायांनीं रामायणास निराळाच अर्थ लाविला आहे. रामचंद्राबद्दल मनांत पूज्यभाव बाळगणारे जे वेदांती अगदीं अलीकडच्या कालांत होऊन गेले, त्यांनीं रामायणाचें अध्यात्मिकरीत्या विवेचन करण्याचें योजून राम, सीता वगैरे व्यक्तींस निरनिराळीं तत्वज्ञानदृष्ट्या नांवें दिलीं आहेत. जीवात्म्याचा दहा इंद्रियें जोडलेला विराट्देहरूपी रथ हाच दशरथ, जीवात्मा हा राम, सद्बुद्धि ही सीता, अविद्या ही कैकयी, वैराग्य हें वन, विवेक हा लक्ष्मण, पंचक्रोशी ही योगांतील ध्यानस्थिति, देहाभिमान हा रावण, सद्भाव हा बिभीषण, भावार्थ हा जटायु, भक्ति हे त्याचे पंख, योगशास्त्रोक्त मनश्चक्र अष्टदळ हीच लंका, अंजन हाच अंजनीपुत्र हनुमान, निष्काम हा सुग्रीव, सकाम हा वाली, कपि म्हणजे समाधि प्राप्त करून घेण्याचा मार्ग, वगैरे अर्थ लावून सबंध रामायणांतील कथेशीं अध्यात्माचा मेळ घातला आहे. अलीकडे कांहीं वर्षांमागें रामायण हें ईलियड नांवाच्या ग्रीसदेशांतील एका काव्यावरून रचलें गेलें असावें, असें मत युरोपस्थ एका पंडितानें पुढें आणिलें होतें. तें कै. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांनीं खोडून रामायण हें स्वतंत्र काव्य असल्याचें सिद्ध केलें. परंतु अशा रीतीनें वेदांती अर्थ लावल्यानें रामाचें अस्तित्वच नाकबूल केल्यासारखें होऊन अवतारांत गणलेला राम हा जन्मलाच नाहीं, असें म्हटल्याप्रमाणें होतें, हें धर्माभिमान्यांच्या लक्षांत येत नाहीं. संसारांत दिसणाऱ्या अनेक व्यक्तींत एकादा गुण ठळकपणें नजरेस येतो. तेवढ्यावरून

अध्यात्मिक अर्थ लावावयाचा तर प्रत्येक व्यक्तीस एकाद्या गुणाची मूर्ति असें म्हणतां येईल. अशा रीतीनें सामान्य जनसमूहास आकलन करण्यास जड होईल असा अर्थ रामायणास लावीत बसण्यापेक्षां श्रीराम व सीतादेवीचा उदात्त जीवन-क्रम लोकांपुढें मांडावा. तेणेंकरून त्यांच्या वर्तनांत हे गुण सहजच उतरतील, आणि आमचा समाज विशेष चांगला होईल असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या तत्त्वज्ञानांत विशेष गोम ही आहे कीं, त्याच्यामुळें आम्हांस शब्दावडंबराची संवय जडली. अशा प्रकारची स्थिति बदलण्यासाठीं वेळोवेळीं साधुसंतांनीं प्रयत्न करून खरा पथ्यकर असा धर्म सांगितला. रामायणांतील अतिशयोक्तीचा व काव्यालंकाराचा भाग वजा करून रामचरित्राचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं,

## राम हा ऐतिहासिक पुरुष

आहे. तो काल्पनिक नाहीं. कोसल व विदेही वंशाच्या लोकांनीं हिंदुस्थानच्या पूर्व बाजूस वसाहत केल्यानंतर इक्ष्वाकु कुलांतील दशरथाच्या कुटुंबांत सवतिमत्सरामुळें रामास वनवास घडला. त्या कालीं एकपत्नित्वाची चाल रूढ होती. क्वचित् एकापेक्षां अधिक बायका एकाच वेळीं करीत. दशरथाच्या अंतःपुरांत तीन मुख्य राण्यांशिवाय साडेतीनशें बायका होत्या. विशेषतः क्षत्रियांमध्यें मात्र अनेक स्त्रिया करीत. त्यांच्यांतही एकपत्नीव्रत विशेष महत्त्वाचें मानीत. रामचंद्रास एकच पत्नी असल्याबद्दल त्याची प्रशंसा केली आहे. अनेक पत्नीत्वामुळें कुटुंबांत कलह माजे; याचें उदाहरण रामाचा वनवास हें आहे. परंतु या वनवासाचा परिणाम मात्र असा झाला कीं, दक्षिण हिंदुस्थानांत आर्यांचा प्रवेश झाला. यमुनानदीच्या दक्षिण भागीं गोदावरी नदीपर्यंत त्या कालीं निर्जन व भयंकर अरण्य पसरलें होतें. तें दण्डकारण्य या नावानें प्रसिद्ध असे. या अरण्यांत वेदकालीन कित्येक ऋषींचे वंशज रहात त्यांचीं नांवें देखील पूर्वींच्या ऋषींसारखींच होतीं. त्यावरून असें दिसतें कीं, ऋग्वेदाचीं सूत्रें रचलेल्या ऋषींच्या वंशजांनीं मूल पुरुषाचीं नांवें उपनांवाप्रमाणें वापरण्याची चाल अमलांत आणली होती. असें नसेल तर वेदकालचे ऋषी रामायणकालीं म्हणजे सुमारें ३००० वर्षांनंतर असणें शक्य नाहीं. या ऋषींचे सुंदर आश्रम दंडकारण्यांत जागाजागीं पसरले होते. त्या वेळीं पौराणिककालीन देवतांची पूजा करण्याची चाल नव्हती. इंद्र, चंद्र, विष्णु, ब्रह्म, सूर्य, भग, कुबेर, वायु,

गायत्री वगैरे वेदांत वर्णिलेल्या देवतांचीं आयतनें किंवा मंदिरें आश्रमाजवळच बांधून त्यांप्रीत्यर्थ यज्ञ करण्यांत येत असत. गोदावरीच्या पलीकडे दक्षिण भागीं लंकेपर्यंत अनार्य लोक रहात.*

या अनार्यांचा राजा लंकेंत असे व त्याला रावण म्हणत. रावण हें त्याचें मुळचें नांव नसून बहुमानदर्शक सार्वभौम नृपती अशा अर्थाचें तें सूचक होतें. खरें नांव दशानन किंवा दशकंठ हें असावें. यावरूनच त्याचें वर्णन करितांना त्याला दहा तोंडें होतीं, वगैरे कथाभाग पुढें आला असावा. रावणाच्या सर्व मुलांस व आप्तेष्टांस एकच तोंड असल्याचें दिसून येतें. त्याचा बंधु बिभीषण हाही एकमुखीच होता. हे राक्षस रंगानें काळे, शरीरानें धिप्पाड व स्वभावानें स्वार्थी व तामसी वृत्तीचे होते. ते रुद्राचें पूजन करीत, व विष्णूचे द्वेष्टे होते. आर्यांच्या धर्माबद्दल व देवतांबद्दल त्यांना तिटकारा वाटत असून त्यांच्या यज्ञयागादिकांत विघ्नें आणण्यांत ते गुंतलेले असत. तसेंच ते नरमांसभक्षक व परदारापहार करणारे होते असेंही दिसतें. परदारापहार करण्याची त्यांच्यांत चाल होती म्हणूनच त्यांच्या विवाहपद्धतीला राक्षसविवाह हें नांव मनूनें दिलें असावें. अशा अनार्यांचा नाश करण्यास क्षत्रियवीर सदा तयार असत. ऋषींनींही त्यांचा समाचार घेतल्याचें दिसून येतें. अगस्त्य ऋषींनीं प्रथमतः राक्षसांस चांगला हात दाखविल्याबद्दल रामायणांत उल्लेख आहे. विश्वामित्रानें राम व लक्ष्मणास लहान असतांना आपल्या आश्रमीं नेऊन त्यांच्या हस्तें कित्येक राक्षसांचें निर्दाळण करविलें. रामचंद्र वनवासास गेल्यावर त्याच्या अलौकिक पराक्रमास कित्येक धाडसी नरमांसभक्षक बळी पडले. शेवटीं त्यांचा राजाधिराज रावण हा जेव्हां त्याच्या परिवारासह धारातीर्थी मरण पावला तेव्हां त्यांची दक्षिण देशांतील सत्ताच नाहींशी झाली. बिभीषण मांडलिक राजा झाल्यावर राहिलेल्या थोड्याबहुत राक्षसांवर सहजच रामाची सत्ता चालू झाली. यासाठीं त्यांना वैरभाव टाकून देऊन आर्यांच्या कह्यांत रहावें लागलें. रामानें जो मोठा अश्वमेध यज्ञ केला तो पहाण्यासाठीं आर्यांप्रमाणें अनार्यही आले होते. दक्षिणदेशांतील दुष्ट घातकी अनार्यांचा नाश करणें हें

* हल्लीं सिलोन म्हणतात तीच लंका आहे असें कित्येक समजतात. लंका हें बेट विंध्याद्रीच्या जवळच पश्चिम समुद्रांत होतें व सध्यां तें लुप्त झालें असें कांहींचें मत आहे. कित्येक मलया बेट हीच प्राचीन लंका असें प्रतिपादन करतात.

रामाचें महत्त्वाचें कृत्य असून त्याच्या अवताराचें मुख्य कार्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## राक्षसांची उत्पत्ति.

राक्षस हा शब्द पुराणांत वाचतांक्षणीं तो एक भयंकर मनुष्यदेहधारी परंतु विरूप व बलाढ्य प्राणी आहे अशी कल्पना येते. रामायणांत राक्षसांच्या उत्पत्ती-संबंधानें कथाभाग आहे त्यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं मूलतः राक्षस हेच लोक-रक्षक व पालक होते. याविषयींचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे.

प्रजापतिः पुरा सृष्ट्वा अपः सलिल संभवः
तासां गोपायने सत्त्वानसृजत् पद्मसंभवः ॥ ९ ॥
ते सत्त्वा सत्त्वकर्तारं विनीतवदुपास्थिताः ।
किं कुर्म इतिभाषन्तःक्षुत्पिपासा भयार्दिताः ॥ १० ॥
प्रजापतिस्तु तान्सर्वान् प्रत्याह प्रहसन्निव ।
आभाष्य वाचा यत्नेन रक्षध्यमिति मानवाः ॥ ११ ॥
रक्षाम इति तत्रान्यैर्यक्षाम इतिचापरैः ।
भुंक्षिता भुंक्षितैरुक्तस्ततस्तानाह भूतकृत् ॥ १२ ॥
रक्षाम इति यैरुक्तं राक्षसास्ते भवंतु वः ।
यक्षाम इति यैरुक्तं यक्षा एव भवंतु वः ॥ १३ ॥

वा. रामा. उ० ४

वेदकालीं ज्यांना असुर अशी संज्ञा देण्यांत आली त्यांनाच रामायणकालीं व नंतर राक्षस असें नांव देण्यांत आलें असावें. मूलतः राक्षस किंवा असुर हे एकाच प्रकारचे लोक व त्यांचीं कृत्यें देखील एकाच प्रकारचीं होतीं. रामायणांत राक्षसांच्या उत्पत्तीसंबधानें जें वर्णन दिलें आहे त्याचा आशय असा आहेः—

"प्राचीनकाळीं प्रजापतीनें प्रजा उत्पन्न केली तेव्हां प्रजाजनांनीं 'आम्हीं काय करावें' असा प्रश्न केला. प्रजापतीनें त्यांस 'रक्षण करा' असें सांगितलें. कित्येकांनीं 'रक्षामः' म्हणजे रक्षण करतों असें उत्तर दिलें आणि ज्या कित्येकांनीं 'यक्षामः' म्हटलें त्यांची गणना यक्षांत करण्यांत आली. 'रक्षामः' असें ज्यांनीं म्हटलें त्यांस राक्षस अशी संज्ञा प्रजापतीनें दिली."

यावरून दिसून येईल कीं जनतेचें रक्षण करण्याचें काम राक्षसांकडे असे व एकाच कुलांत राक्षस व यक्ष असत. रावणाचा बंधु कुबेर हा यक्ष होता. बिभी-

षणासही कोणी राक्षस म्हणत नसे. जुनी वर्णव्यवस्था लक्षांत घेतां राक्षसांकडे क्षत्रियांचीं कामें सोंपविण्यांत आलीं होतीं असें म्हणतां येईल. अमरकोशांत राक्षसांबद्दल 'पूर्वदेवाः' असा उल्लेख आढळतो.

राक्षसः कौणपः क्रव्यात्क्रव्यादोऽस्रप आशरः ॥ ५९ ॥
रात्रिंचरो रात्रिचरः कर्बुरो निकषात्मजः ।
यातुधानः पुण्यजनो नैर्ऋतो यातुरक्षसी ॥ ६० ॥

यावरून असें दिसतें कीं राक्षसांस पूर्वकालीं देव म्हणत. ते रात्रीच्या वेळीं पहारा करून प्रजाजनांचें रक्षण करीत. त्यांस 'पुण्यजन' अशीही संज्ञा देण्यांत आली आहे. तसेंच जगाचे कष्ट ते सहन करीत म्हणून त्यांस यातुधान असें म्हटलें आहे. त्याप्रमाणें श्रेष्ठ अशा राक्षसांस पूर्वदेव असें वर्णिलें असून मनुस्मृतींत ( ३।१९२ ) त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत तीं देखील त्यांच्या देवत्वाची साक्ष पटवितात.

अक्रोधनः शौचपराः सततं ब्रह्मचारिणः।
न्यस्तशस्त्रा महाभागाः पितरः पूर्वदेवताः ॥

क्रोध न करणारे, स्वच्छतेनें वागणारे, सतत ब्रह्मचर्य धारण करणारे, शस्त्रानें कधीं प्रतिकार न करणारे, महाभाग्यवान् रक्षक ( पितरः ) असे जे तेच ( राक्षस ) पूर्व देव होत. हेच राक्षस कालेंकरून नीतिभ्रष्ट झाले. लोकांचें रक्षण करण्याचें टाकून अनेक परीनें छळूं लागले म्हणून राक्षस हा शब्द नीच वृत्तीच्या कपटी, घातकी व दुर्व्यसनी लोकांचा द्योतक झाला. शेवटीं

## वानर हे कोण

हा प्रश्न राहिला. ज्यांस वानर हें नांव दिलें आहे ते खरोखरच माकड होते असें म्हणतां येत नाहीं. कारण ज्या माकडांच्या सेनेनें बलिष्ठ राक्षसांशीं तोंड दिलें ती सेना युद्धकुशल होती हें सिद्ध होतें. हनुमान, वाली, सुग्रीव, नल, अंगद यांनीं वेळोवेळीं प्रगट केलेले उदात्त विचार, त्यांचीं आचाट कृत्यें, त्यांचें सामोपचाराचें भाषण, व सुनीतीचें वर्तन यांचा विचार केला असतां वानर हे सात्विक वृत्तीचे व आर्यांप्रमाणें सत्पथगामी लोक होते असें: दिसतें. बहुधा हे हिंदुस्थानांतील मूळचे रहिवाशी असावे. त्यांच्या पोषाखाची तऱ्हा, मुखें रंगविण्याची रूढि, व्रात्य व हूड स्वभाव, वगैरे लक्षणांवरून त्यांस वानर हें

नांव दिलें असावें. ज्याप्रमाणें अमेरिकेंतील मूळचे रहिवाशी ( रेडइंडियन्स ) पशुपक्ष्यांप्रमाणें कवचें धारण करतात व निरनिराळ्या रंगांनीं आपले देह रंगवीत असतात त्याचप्रमाणें वानरांत वानर, आस्वल व पक्षी यांच्यासारखा पोषाख करण्याची चाल होती असें दिसतें. जटायू हा अशा मूळ रहिवाशांतला एक असून तो पक्ष्याप्रमाणें पिसें व पंख लावून घेत असे यामुळेंच त्याला पक्षी असें म्हटलें असावें. हनुमान हा अत्यंत शुद्ध भाषा बोलत असे. त्याचें भाषाज्ञान व शब्दांची व्याकरणानुसार योग्य योजना हीं पाहून श्रीराम थक्क झाला असें रामायणांत लिहिलें आहे. हनुमान व त्याचे ज्ञातिबंधु यांच्यांतील विशिष्ट गुण म्हटला म्हणजे ते राजनिष्ठ, स्वामिनिष्ठ, व धाडसी होते. अंगदानें प्रत्यक्ष रावणाच्या सभेंत जाऊन जी शिष्टाई केली तिचें महत्त्व लक्षांत घेतां त्यास माकड असें कोण म्हणेल ? भयंकर शत्रू जो रावण त्याच्या राजधानींत प्रवेश करून लंकानगरीस अग्निमुखीं घालणाऱ्या हनुमंतास मर्कट असें म्हणणें योग्य होणार नाहीं. लंकेचा वेढा यशस्वी करणारा सुग्रीव त्या कालचा मोठा धूर्त सेनानायक होता असेंच कबूल करावें लागणार. हे सर्व वानर नसून मनुष्यच होते असा पुरावा रामायणांत सांपडतो तो असाः—जेव्हां रामानें लंकेस वेढा दिला तेव्हां त्यानें सर्व वानरसेनेस आज्ञा दिली कीं त्यांनीं मनुष्यरूप धारण न करितां मर्कट रूपानें लढावें. राक्षसांप्रमाणें दगड व काठ्या घेऊन वानर युद्ध करीत. हे देवाचे अंश आहेत असें दाखविण्यासाठीं कालेंकरून त्यांच्यासंबंधानें अद्भुत गोष्टी वाल्मीकीनंतरच्या लेखकांनीं ग्रथित केल्या व ते सबंध पर्वत व मोठमोठे खडक उचलून नेत वगैरे लिहिण्यांत आलें. आर्यांचा व या काठ्या दगड घेऊन युद्ध करणाऱ्या लोकांचा संबंध रामाच्या दक्षिणेकडील स्वारीमुळें आला. त्यांच्या रानटीपणाच्या राहणीवरून त्यांना जें एकदां वानर असें मानलें तेंच कायम होऊन त्यांची वानरांत गणना होऊं लागली. सर्व अंग झांकतां येईल इतके मोठे कान असलेलीं मनुष्यें अस्तित्वांत आहेत अशी समजूत मॅगेस्थेनिसच्या कालीं होती. त्या पूर्वीं शेंकडों वर्षें हनुमंताच्या ज्ञातिबांधवांस माकडांत गणिलें यांत आश्चर्य कोणतें ? या लोकांस राक्षस वारंवार पीडा देत असत. यामुळें त्यांच्या अंतःकरणांत त्या दुष्ट नरभक्षकांबद्दल द्वेष वसत होता आणि रामासारखा पुढारी भेटतांच ते सर्व मोठ्या आनंदानें लंकेच्या मोहिमेवर निघाले असाच एकंदर इतिहासावरून निष्कर्ष निघतो.

## रामायणाचा काल.

राम केव्हां जन्मास आला, रामायण केव्हां लिहिलें गेलें वगैरे प्रश्न कित्येक वर्षे शोधकांपुढें आहेत. रामाचा जन्म त्रेतायुगांत झाला व राम होण्यापूर्वीच वाल्मीकीनें रामायण लिहून ठेविलें असें हिंदू समजतात. द्वापारयुगांत श्रीकृष्ण जन्मास आला अर्थात् रामायणानंतर महाभारत अस्तित्वांत आलें. राम हा ७ वा अवतार व कृष्ण त्याच्या नंतरचा असें समजण्यांत येतें. युगाच्या कल्पने-प्रमाणें राम होऊन हजारों वर्षे झालीं. युरोपस्थ व इतर पंडितांनीं रामायणांतील ज्योतिषसंबंधी उल्लेख वगैरे लक्षांत घेऊन तें कोणत्या कालीं रचलें गेलें हें ठर-विण्याचा यत्न केला आहे. वाल्मीकीनें रामायण लिहिल्यावर ख्रिस्तीशकापूर्वी ५०० वर्षे व पुढें ३००।४०० वर्षे निरनिराळ्या लेखकांनीं त्यांत भर घातली असें सिद्ध करण्यांत आलें आहे. रामायणाचीं ७ कांडें असून एकंदर २४००० बहुतेक अनुष्टुप छंदाचे श्लोक आहेत. शेवटचें ७ वें कांड उत्तर कांड या नांवानें प्रसिद्ध असून तें वाल्मीकीच्या लेखणींतून उतरलेलें नाहीं असें पंडि-तांचें मत आहे. कारण ६ व्या युद्धकांडाच्या शेवटीं या ग्रंथाची समाप्ति केल्याचें स्पष्ट होतें. रामायण हें महाभारतापूर्वीचें असून ख्रिस्ती शकाच्यापूर्वी १५०० वर्षांकडची सामाजिक स्थिति त्यांत लिहिली आहे असें कित्येक पाश्चात्य व पौरस्त्य पंडितांचें मत आहे. त्यानंतर २०० वर्षांनीं महाभारतांत वर्णिलेलें युद्ध झालें असेंही ते म्हणतात. कित्येकांच्या मतें महाभारतानंतरची सामाजिक स्थिति रामायणांत वर्णिली आहे. सतलज नदीपासून पूर्वेस यमुना व गंगा नदीच्या सुपीक दरींत दिल्ली ( हस्तिनापूर ) हें राजधानीचें शहर वसवून भरत ( कुरु ) वंशाच्या आर्यांनीं जी मोठी वसाहत केली व त्यांच्यांत जें पुढें युद्ध जुंपलें त्याचें वर्णन महाभारतांत असून त्यांत ख्रिस्तो शकापूर्वी १३०० वर्षां-पूर्वीची आर्य समाजाची माहिती सांपडते. त्यावेळीं त्यांच्यांतील धैर्यशौर्यादिक गुणांचा विकास विशेष प्रकारचा झाला होता हें त्या वेळच्या युद्धोत्साहावरून दिसतें. कालेंकरून समाजांत शांतता नांदूं लागल्यावर सहजच युद्धोत्साह कमी होऊन ज्या वेळीं समाज नैतिक आचरणाचें विशेष महत्त्व मानूं लागला त्या वेळीं रामायणांतील गोष्ट लिहिली गेली असावी. अर्थात् एकपत्नीत्व, बंधुप्रेम, सेव्य-सेवकभाव, पतिव्रताधर्म, सत्यवचन वगैरे नैतिक लक्षणांची योग्यता समाज मानूं लागला त्या वेळीं वाल्मीकीनें रामचरित्र लिहून ठेवून अमर अशी कीर्ति

मिळविली. भूगोलदृष्टया रामराज्याचा विस्तार व सामाजिक उत्क्रांतितत्त्वानुसार सामाजिक व नैतिक उन्नति यांचा विचार केला असतां रामायण महाभारता-नंतरचें असावें असें कित्येक प्रतिपादन करितात. तरी ख्रिस्तीशकापूर्वी १३००। १४०० वर्षांपलीकडची लोकस्थिति सामान्यतः समजण्यास रामायणापासून बरीच मदत होते याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. कालेंकरून

## राम हा सातवा अवतार

आहे असें मानण्यांत आलें. सद्धर्मानें वागणारांस दुष्टांकडून त्रास पोहोंचूं लागला म्हणजे तो कमी करण्यासाठीं परमेश्वर अवतार घेऊन अधार्मिकांचा संहार करतो अशी समजूत रामायण महाभारतकालीं होती असें दिसतें. कारण

**यदा धर्मो ग्लाति वंशे सुराणां तदा कृष्णो जायते मानुषेषु ॥**

असें अनुशासनपर्वांत ( १५९-१२ ) म्हटलें आहे. गीतेंत तर यासंबंधानें श्रीकृष्णानें स्पष्टपणें अर्जुनास सांगितलें कीं

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**

रामायणाच्या उत्तरकांडांत पुढील श्लोक आहे—

**नष्टधर्मव्यवस्थानां काले काले प्रजाकरः ।**
**उत्पद्यते दस्युवधे शरणागतवत्सलः ॥**

अर्थात् अवताराचें कार्य अधर्माचें उच्चाटन व सद्धर्मांची संस्थापना हें आहे, असें ज्याप्रमाणें पूर्वकालीं लोक मानीत असत तसेंच आजमितीसही समजतात. राम हा अवतार असल्याबद्दल रामायणांत उल्लेख आहे. अयोध्याकांडांत ( १-७. ) असें म्हटलें आहे कीं,

**स हि देवैरुदीर्णस्य रावणस्य वधार्थिभिः ।**
**अर्थितो मानुषे लोके जज्ञे विष्णुः सनातनः ॥**

( रावणाचा वध करण्यासाठीं हा विष्णु मनुष्यलोकांत अवतरला आहे. ) युद्धकांडांत ब्रह्मयानें रामाची पुढीलप्रमाणें स्तुति केलेली आहे-'रामा, तूं प्रत्यक्ष देव आहेस. चक्रधर नारायण आहेस, मागें होऊन गेलेल्या व पुढें होणाऱ्या तुझ्या शत्रूंचें निर्दाळण करणारा तूं वराह आहेस, अविनाशी ब्रह्म तूंच. सीता ही लक्ष्मी होय. " उत्तरकांडांत ब्रह्मदेवानें रामास शेवटीं म्हटलें आहे कीं, '

विष्णुज्योतींत मिळून जा. कारण सर्व विश्वाचें तूं निवासस्थान आहेस.' युद्धकांडांत मंदोदरीनें रावण मेल्यावर विलाप करितांना म्हटलें कीं 'महाराज, तुमच्यासमोर कृतांतसुद्धां उभा राहण्यास भीत असे; त्या तुम्हांला आज मनुष्याच्या हातून कसें मरण आलें ? मला वाटतें हा राम नव्हे. श्रीविष्णुच प्रत्यक्ष अवतार घेऊन आला आहे.' याप्रमाणें राम हा अवतार असल्याचें रामायणांत लिहिलें आहे. तरी कित्येकांच्या मतें यांतील बराच भाग प्रक्षिप्त आहे. महाभारताच्या शांतिपर्वांत पुढील श्लोक आहे—

**हंसः कूर्मश्च मत्स्यश्च प्रादुर्भावाद्द्विजोत्तम ॥**
**वराहो नारसिंहश्च वामनो राम एव च ॥**
**रामो दाशरथिश्चैव सात्वतः कल्किरेव च ॥**

या अवतारांत बुद्धाचें नांव नाहीं. आणि हल्लीं विष्णूचे जे दहा अवतार मानतात, त्यांत हंस हें नांव आढळत नाहीं. रामायणांत ( अयोध्याकांडांत १०९–३४ ) बुद्धास चोर व नास्तिक असें म्हटलें आहे.

**यथा हि चोरः स तथा हि बुद्धस्तथागतं नास्तिकमत्र विद्धि ॥**

परंतु हें वाक्य पुढें किंवा मागें संदर्भ नसतां आलें असून तें प्रक्षिप्त असावें असें शोधकांचें मत आहे. ख्रिस्तीशकाच्या पांचव्या शतकाच्या सुमारास वायुपुराण लिहिलें गेलें असें ठरविण्यांत आलें आहे. त्यांत राम हा विष्णूचा अवतार असल्याचें सांगितलें आहे. इतर पुराणांतही राम हा अवतार आहे असें म्हटलें असून त्याला देवाप्रमाणें पूज्य मानिलें आहे. ख्रिस्ती शकाच्या १०१४ सालीं अमितगति हा होऊन गेला. त्यानें रामाचें महत्त्व वर्णिलें असून तो सर्वज्ञ, सर्वव्यापी व विश्वपालक असल्याचें सांगितलें आहे. यावरून त्या कालीं रामाबद्दल समाजांत पूज्यत्वभाव वाढला होता असें दिसतें. कोशकर्ता अमरसिंह हा ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकांत होऊन गेला. त्यानें जीं देवतांचीं नांवें दिलीं आहेत त्यांत त्यानें रामाच्या नांवाचा समावेश केलेला नाहीं; परंतु त्याच कालाच्या सुमारास वराहमिहीर होऊन गेला. त्यानें कृष्ण, राम, सूर्य, यम वगैरे देवतांच्या मूर्ति कशा बनवाव्या हें सांगितलें आहे. यावरून असें दिसतें कीं राम हा अवतार असल्याचें मानीत होते; तथापि त्याची उपासना करण्याचा पंथ अस्तित्वांत आला नव्हता व त्याची पूजाअर्चा व भजनपूजन हल्लींप्रमाणें चालत नव्हतें. प्रत्येक द्विजाला शुभाशुभ कृत्याच्या आरंभीं व शेवटीं विष्णूच्या

२४ नामांचा उच्चार करावा लागतो. त्यांत वामन, नारसिंह व कृष्ण या अवतारांचीं नांवें आहेत. परंतु जें रामनाम अत्यंत पवित्र मानलें जातें त्याचा त्यांत समावेश केलेला नाहीं. यावरून देखील रामोपासनेचा संप्रदाय फार प्राचीन आहे असें म्हणावयास सबळ आधार नाहीं. ख्रिस्तीशकाच्या १३ व्या शतकांत रामोपासना चालू होती. मध्व ऊर्फ आनंदतीर्थ हे प्रेमळ रामोपासक होते. त्यांनीं दिग्विजयी रामाची मूर्ति बद्रिकाश्रमांतून आणिली आणि नरहरतीर्थ यांस १२६४ सालीं रामसीतेच्या मूर्ति आणण्यासाठीं जगन्नाथपुरीस पाठविलें. याच शतकांत हेमाद्रि यानें लिहिलेल्या व्रतखंड नामक पुस्तकांत रामजन्मोत्सव कसा करावा हें लिहिलें आहे. वृद्धहारिताच्या स्मृतींतही राम हा अवतार आहे असें सांगून त्याची पूजा करावी असें म्हटलें आहे. चौदाव्या शतकाच्या आरंभीं रामानुजाचा शिष्य रामानंद यानें रामोपासनेचा पंथ स्थापन केला. विष्णु व लक्ष्मी यांच्या ठिकाणीं राम व सीता मानून त्यांची पूजा करावी असें त्यानें सांगितलें. रामानंदाची शिष्यशाखा रामानंदी या नांवानें प्रसिद्ध असून ते तुलसीदासाच्या रामायणास वेदाइतका मान देतात. रामानंदाच्या १२ शिष्यांपैकीं प्रसिद्ध जो कबीर त्यानेंही रामभक्तीचा महिमा वाढविला. महाराष्ट्रांत १७ व्या शतकांत रामदासस्वामीमुळें रामोपासना करण्याची चाल पडली व जागोजागीं रामसीतेचीं व हनुमानाचीं देवालयें स्थापन झालीं. कालिदासाचा रघुवंश, भवभूतीचें महावीर चरित्र व उत्तररामचरित्र, एकनाथाचें भावार्थ रामायण, श्रीधराचा रामविजय, मोरोपंताचीं १०८ रामायणें, अध्यात्मरामायण, रामगीता या सर्व ग्रंथांमुळें रामाचें महत्त्व आबालवृद्धांस समजून त्याच्याबद्दल हिंदूसमाजाच्या अंतःकरणांत आदरभाव जागृत झाला. रामायणाचें रूपांतर हिंदुस्थानांतील अनेक भाषांतून झालें; इतकेंच नाहीं तर युरोपियन लोकांच्या निरनिराळया भाषांतही तें झालें आहे. वाल्मीकीनें रामाच्या पराक्रमाचें वर्णन करतांना राम हा सत्यवचनी, सदाचरणी व उत्तम क्षत्रिय होता इतकेंच दाखविलें असून त्याच्या शीलाबद्दल आदर व्यक्त केला आहे. दुःख, शोक, आनंद वगैरे विकारांस तो इतर मनुष्यांप्रमाणेंच आधीन होता, शत्रूच्या निर्दाळणासाठीं त्याला इतरांची मदत घ्यावी लागली, वगैरे कित्येक गोष्टींचा विचार केला असतां रामाच्या ठायीं देवत्वाची स्थापना करण्याचा वाल्मीकीचा तरी विचार होता असें दिसत नाहीं. राम आणि वानरें देखील देवावतार होतीं असें दर्शविणारे कांहीं श्लोक वाल्मीकीकृत रामायण म्हणून प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत सांपडतात. परंतु ज्या पद्धतीनें रामकथा

वाल्मीकीनें लिहिली आहे ती पद्धति पाहतां उपरिनिर्दिष्ट प्रकारचे श्लोक प्रक्षिप्त असावे असाच समज होतो. याचप्रमाणें कांचनमृगाची गोष्ट, दगडांचा सेतु वानरांनीं तयार केल्याची गोष्ट वगैरे अद्भुत रसात्मक गोष्टी देखील वाल्मीकीनंतर दुसऱ्या लेखकांनीं मूळ रामायणांत घुसडल्या असें म्हणण्यास आम्हांस तरी प्रत्यवाय दिसत नाहीं. असो. तुलसीदासानें राम हा विष्णूचा अवतार व प्रत्यक्ष विष्णुच असल्याचें सांगितलें. सध्यां रामनामाचा महिमा या देशांत फार आहे. लक्षावधि लोकांस 'रामनाम' हेंच मोक्षाचें साधन आहे असें अंतःकरणपूर्वक वाटतें. रामाचें चरित्र अत्यंत आदरानें वाचलें जातें. उत्तर हिंदुस्थानांत तर प्रत्येक साक्षर मनुष्य तुलसीदासाचे रामायणांतील दोहरे मोठ्या प्रेमानें गाऊन डुलत असतो. आणि तें वाचल्याशिवाय त्याचा एक दिवसही जात नाहीं. 'रामराम,' 'सीताराम' या शब्दांनीं लहान थोर एकमेकांस वंदन करतात. 'राम नाम सत्य है' हे शब्द मोठ्यानें म्हणत उत्तरेकडील लोक दहनभूमीकडे शव नेत असतात. रामाचीं कृत्यें रंगभूमीवर दाखविलीं जातात. जत्रेच्या वेळीं 'रामलीला' पाहण्यासाठीं हजारों लोक जमतात. उत्तरहिंदुस्थानांत आश्विन महिन्यांत 'रामलीला' जागोजागीं होत असते. त्यावेळीं "श्रीराजा रामचंद्रकी जय" या शब्दाचा घोष होत असतो. हें सर्व पाहिलें असतां हिंदूंच्या अंतःकरणांत रामाबद्दल किती प्रेम, किती पूज्यत्वभाव व अभिमान वसत आहे हें दिसतें. कृष्णाच्या देवालयांप्रमाणें रामाचीं जुनीं मंदिरें भव्य नाहींत. कृष्णाचीं वृंदावन व इतर ठिकाणचीं देवालयें भव्य, सुशोभित व पुष्कळ द्रव्य खर्च करून बांधलेलीं आहेत. परंतु रामाचें जन्मस्थान जें अयोध्या तेथील देवस्थान देखील इतकें उत्तम नाहीं. फक्त हनुमानगडीवरील देऊळ सुंदर आहे. तथापि हजारों भक्तांच्या अंतःकरणांत रामाचा निवास असून हृन्मंदिरांत त्याचें आवाहन मोठ्या प्रेमानें करणारे अनेक प्रापंचिक व पारमार्थिक लोक या आर्यभूवर पसरले आहेत.

## रामाचे लोकोत्तर चमत्कार

रामायणांत वर्णिले आहेत आणि त्यांवरून राम हा देवाचा अवतार असल्याचें सिद्ध होतें असें भाविक लोक समजतात. त्यानें अगदीं लहान वयांत शिवधनुष्याचा भंग केला; क्षत्रियांचा निःपात करण्याचें ज्यानें व्रत पत्करलें होतें त्या भार्गवरामाविरुद्ध हत्यार उचलण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यानें एक बाण सोडून तपश्चर्येच्या योगानें त्यानें मिळविलेल्या श्रेष्ठ लोकांचा नाश केला. भार्गवराम

निस्तेज होऊन त्याच्या अवताराची समाप्ति झाली. सुग्रीवानें रामाचा पराक्रम अजमावून पाहण्यासाठीं कित्येक अचाट कृत्यें करण्यास सांगितलें, तेव्हां त्यानें एका बाणाच्या योगानें विस्तीर्ण दाट अरण्याचा फडशा उडवून त्याची खात्री करून दिली. गौतमाच्या शापामुळें त्याची पत्नी अहल्या ही अरण्यांत शिला होऊन पडली होती. रामाचा पादस्पर्श होतांच ती जिवंत झाली. वर्णाश्रमधर्मा-बाहेर गेल्याबद्दल शंबुकाचा शिरच्छेद करून त्याला देहांत प्रायश्चित्त देतांच ब्राह्मणाचा मेलेला पुत्र जिवंत झाला. समुद्र आटविण्यासाठीं धनुष्यावर बाण चढवितांच रामाला समुद्रच शरण आला. त्याच्या प्रभावामुळें समुद्रावर पाषाण तरले. देवांसही अजिंक्य अशा रावणाचा व त्याच्या कुलाचा निःपात करून सर्व राक्षसांस रामानें पादाक्रांत केलें. याप्रमाणें किती तरी अलौकिक चमत्कार व पराक्रम रामानें केले. प्रत्येक अवताराच्यासंबंधानें अनेक अलौकिक गोष्टी सांगितलेल्या असतात. जगांत जे जे महापुरुष होऊन गेले मग ते कोणत्याही देशांत अवतीर्ण झालेले असोत, त्यांनीं चमत्कार करून दाखविल्याचें त्यांच्या चरित्रांत सांगितलें आहे. ख्रिस्त, महंमद, झोरोस्टर, बुद्ध, राम, कृष्ण या सर्वांबद्दल अशा गोष्टी लिहिलेल्या आढळतात; परंतु मनुष्यस्वभाव मात्र इतका विलक्षण आहे कीं प्रत्येक महापुरुषाचे अनुयायी दुसऱ्या महापुरुषांच्या अनुयायांस अशा चमत्कारांचा खरेपणा मानल्याबद्दल दोष देतात. परंतु आपण वंद्य मानलेल्या विभूतीसंबंधानें मात्र निःशंकपणें त्याच बाबतींत वाखाणणी करतात. ही स्थिति शोचनीय होय. मानवी स्वभावाच्या दौर्बल्याची ती एक खूण आहे. खरा विचार केला असतां हें सर्व विश्वच एक अद्भुत चमत्कार आहे. सूर्य, चंद्र, तारे, आकाश व त्यांत झळकणारीं नक्षत्रें, योग्यकालीं आम्हास दर्शन देणारे धूमकेतु, या भूगोलावर असणारे खनिज, उद्भिज व प्राणिकोटींतील सर्व पदार्थ हे सर्व चमत्कार असून ते ज्या परमवंद्य व अनाद्यनंत परमेश्वराच्या अचिंत्य लीलेमुळें अस्तित्वांत आले त्याच्या शक्तीची कल्पना करणेंही शक्य नाहीं, परंतु परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या या सर्व पदार्थमात्रांस नियमन असून त्यांना या सृष्टिनियमानुसार वर्तावें लागतें. त्यांची उत्पत्ति, स्थिति व लय हीं सर्व ईश्वरी कायद्याप्रमाणें चालतात. हे नियम अबाधित आहेत हें जरी खरें तरी परमेश्वर हा 'कर्तुं, अकर्तुं अन्यथा कर्तुं समर्थ' असल्याचें सर्व आस्तिक मानतात. या कल्पनेप्रमाणें सृष्टिनियमाच्या बाहेरही देवास जातां येतें असें सिद्ध झालें. जगांत जे विशाल बुद्धीचे, परोपकारी व पराक्रमी सत्पुरुष होऊन गेले त्यांस प्रेषित (म्हणजे परमे-

श्वरी प्रकाश अथवा ज्ञान लोकांत आणणारे ) किंवा अवतार असें त्यांच्या अनुयायांनीं मानल्यावर त्यांच्यांतही ईश्वराप्रमाणेंच 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' शक्ति आहे असें ठरवून त्यांच्या हस्तें कित्येक सृष्टिनियमांस विरोधी अशा चमत्कारिक व अलौकिक गोष्टी घडल्याचें भाविकांनीं सांगितलें आहे. त्यावर विश्वास ठेवणें न ठेवणें यावर अवताराचें महत्त्व अवलंबून नाहीं. एकादी व्यक्ति असे चमत्कार करण्यास समर्थ झाली इतक्यावरूनच ती आदर्शवत् होऊं शकत नाहीं. तसें असतें तर फोनोग्राफ, सिनेमा, बिनतारी विद्युत्संदेश, विद्युत् छायाचित्रें, एक्स रेज वगैरेंच्या योगानें जगास चकविणारेही अवतारमालिकेंत आले असते. अवतारांची खरी योग्यता त्यांच्या सत्कृत्यांवर अवलंबून आहे. याच दृष्टीनें आपण राम, कृष्ण, बुद्ध वगैरे महापुरुषांकडे पाहिलें पाहिजे. या महापुरुषांचा वर्तनक्रम व त्यांच्या हस्तें घडलेलीं सत्कृत्यें यांकडे पाहून ज्यांच्या अंतःकरणांत त्यांच्याबद्दल प्रेम व आदर उत्पन्न झाला त्यांनीं अशा विभूतींच्या चरित्रांत अनेक लोकोत्तर चमत्कारांचा समावेश केला. वाल्मीकीच्या रामायणावरून

## अलौकिक चमत्कारांचा उलगडा

होतो. असें सिद्ध करण्यांत आलें आहे कीं, यांसंबंधाच्या गोष्टी या महाकाव्यांत मागाहून अंतर्भूत केल्या गेल्या. अशा रीतीनें कितीतरी असंभवनीय भाग प्रत्यक्ष या काव्यांत व त्याच्यामागून अस्तित्वांत आलेल्या कित्येक रामासंबंधाच्या ग्रंथांत कवींनीं आपल्या कल्पनाचातुर्यानें उत्पन्न केला. तो लोकांनीं खरा मानून रामाच्याठायीं आपलें प्रेम व भक्ति अर्पण केली. उदाहरणार्थ— वाल्मीकीच्या रामायणांत कांचनमृगाची गोष्ट नाहीं. राम व लक्ष्मण शिकारीस गेले व जटायू सीतेच्या रक्षणार्थ पर्णकुटिकेंत होता ही संधि साधून रावण संन्याशाच्या वेषानें आला तेव्हां सीतेनें त्यास सांगितलें कीं,

> आगमिष्यति मे भर्ता वन्यमादाय पुष्कलम् ।
> रुरून् गोधान् वराहांश्च हत्वादायामिषं बहु ॥

'माझे पति लवकरच वन्य फळें, हरिण, साळू व वराह यांचें मांस घेऊन येतील. तोंपर्यंत कृपा करून थांबा.' कंचुकीसाठीं सुवर्णमृगाचें कातडें आणण्यासाठीं राम गेला व सीतेनें लक्ष्मणास दुरुत्तरें बोलून रामाच्या रक्षणार्थ दवडलें हें खरें असतें तर तिनें शांत मनानें रावणास अतिथिसत्कारपूर्वक वरीलप्रमाणें सांगितलें नसतें. शिवाय जटायूनें रामास असें सांगितलें कीं 'मी आपल्या इच्छेप्रमाणें येथें

सीतेचें रक्षण करतों तूं लक्ष्मणासह जा.' अर्थात् राम व लक्ष्मण हे उभयतां शिकारीस गेले होते; त्या वेळीं रावणानें सीतेचें हरण केलें असें वाल्मीकीनें लिहिलें आहे. अहल्येसंबंधानें वाल्मीकीनें असें लिहिलें आहे कीं, गौतमानें रागानें आपल्या पत्नीस शाप दिला तो असा—

वातभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ।
अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्वसिष्यसि

'वायूवर निर्वाह करून, निराहार, पश्चात्ताप करीत राखेंत पडून कोणाच्याही दृष्टीस न पडतां या आश्रमांत रहा.' पुढें राम व लक्ष्मण तेथें आले तेव्हां ती त्यांच्या समोर आली तेव्हां

राघवौ तु तदा तस्याः पादौ जग्राहतुर्मुदा

त्या बंधुद्वयांनीं आनंदानें तिच्या चरणावर मस्तक ठेविलें. पुढें अहल्येचा गौतमानें स्वीकार केला. अहल्या शिला होऊन अरण्यांत पडली होती, रामाचा पादस्पर्श होतांच ती उठली वगैरे भाग प्रक्षिप्त आहे असें वरील उताऱ्यांवरून दिसतें. लंकेस जाण्यासाठीं दगडांचा तरता सेतु बांधला असें रामायणांत लिहिलेलें नाहीं. माकडांनीं समुद्राचा भाग दगडांनीं भरून काढून रस्ता तयार केला असें आहे. असेच दुसरे कित्येक उतारे देतां येतील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हेंच कीं कालेंकरून जसजसा रामाबद्दल आदरभाव वाढत गेला, त्याप्रमाणें किती तरी असंभाव्य गोष्टी रामायणाची उजळणी करणारांनीं त्यांत घातल्या, इतकेंच नाहीं, मुख्य कथानकाशीं संबंध नसलेले त्या त्या कालच्या सामाजिक स्थितीवरून सुचलेले विचार त्यांनीं त्यांत ग्रथित केले. यामुळें बुद्धासंबंधी कांहीं गोष्टी व महाभारतांतील कांहीं प्रकरणें यांचाही या रामकाव्यांत समावेश झाला. हिंदूंचें दुर्दैव हें कीं मूळचें वाल्मीकी रामायण, ज्यांत रामाचा खरा इतिहास त्यानें नमूद केला होता, त्याचें विलक्षण रूपांतर करण्यांत आलें. असो. इतकी गोष्ट खरी आहे कीं, असे चमत्कार घडले असें अंतःकरणपूर्वक सांगणारे रामभक्त व त्यांवर विश्वास ठेवणारे रामोपासक यांची समजूत घालण्याचा यत्न करणें सत्याच्या दृष्टीनें इष्ट आहे असें प्रतिपादन करण्यापेक्षां अशा विभूतींच्या उदात्त जीवनक्रमाचें महत्त्व लक्षांत आणून त्यांनीं घालून दिलेला कित्ता गिरविणें हेंच विशेष श्रेयस्कर होईल. यासाठीं अशा विभूतींच्या चरित्रांत ग्रथित केलेल्या अद्भुत चमत्कारांचें सत्यत्व किंवा मिथ्यात्व प्रतिपादन करून बुद्धिभेद करण्यापेक्षां

## श्रीरामचरित्रापासून बोध

काय घ्यावा याचा विचार करूं. रामाचें चरित्र सात्विक, प्रेमळ व उदात्त आहे. आईबापांच्या ठिकाणीं अत्यंत भक्ति, पवित्र व उन्नत शील, श्रेष्ठ दर्जाचें बंधुप्रेम, सत्यवचन, सद्वर्तन यांच्यामुळें रामाची ख्याति झाली. त्याची सहधर्मचारिणी सीता ही देखील स्त्रीजातीची योग्यता दर्शविणारी साध्वी होती. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांच्या अंतःकरणांतील उज्ज्वल बंधुप्रेमास क्वचित् जोड मिळेल. हनुमंताची एकनिष्ठ सेवा बहुमोल असून स्वामिकार्यासाठीं स्वतःच्या सुखदुःखाची पर्वा त्यानें कां व कशी केली नाहीं हें ध्यानांत वागविण्याजोगें आहे. दशरथाचें पुत्रवात्सल्य, जनकाचा विदेहीपणा यांचीही योग्यता अनुपमेय आहे, उन्मत्तपणाचा परिणाम काय होतो हें रावणाचा अंतकाल लक्षांत आणल्यावर समजण्याजोगें आहे. उत्तम मार्गदर्शक लाभले असतां केवळ वानरांप्रमाणें बेजबाबदार रीतीनें रहाणारे लोक कसे कार्यकुशल होऊं शकतात हें सुग्रीव व त्याच्या वानरसेनेच्या अचाट कृत्यांकडे पाहिलें असतां दिसून येईल. एकंदरींत रामचरित्र अत्यंत प्रेमळ, उदात्त व बोधप्रद आहे. श्रीरामनवमी प्राप्त होतांच रामाच्या अंगीं असलेल्या सद्गुणांचा विकास आपल्या ठायीं करण्याचा निश्चय प्रत्येक हिंदु म्हणविणारानें करावा व तो नेटानें चालवावा म्हणजे रामनवमीव्रत सांग केल्याचें श्रेय पदरीं पडेल. रामाप्रमाणें सुशील, सदाचारी व सत्यवचनी होण्याची आवश्यकता भरपूर आहे हें प्रत्येक रामोपासकानें व रामासंबंधानें अभिमान व प्रेम बाळगणाऱ्या हिंदूनें लक्षांत वागविलें पाहिजे.

## श्रीरामाची आरती.

जयरामा श्रीरामा जय सीतारामा ।
सदया सुखदा विमला जय आत्मारामा ॥ ध्रु० ॥

पितरीं अखंड भक्ती बंधूंवरि प्रीती ।
धैर्य विलक्षण शौर्यहि आचरणीं नीती ।
सत्यप्रतिज्ञा अनुपम गुण हे जन गाती ।
अवतारीं गणुनी तव अजरामर कीर्ति ॥ १ ॥

अत्युन्नत शीलें त्वां भूषविलें आर्या ।
आदर्शापरि झाली तव सद्गुणि भार्या ॥
बहु तत्पर बलि हनुमान् जो स्वामीकार्या ।
अढळ सु-सेवा धर्मीं गाजविलें शौर्या ॥ २ ॥

तव गुणगानीं चिंतनिं साधूजन रमले ।
प्रापंचिक परमार्थीं रत तव पदिं झाले ।
नामोच्चारें तापत्रय विसरुनि गेले ।
नामाच्या नौकेनें दुस्तर भव तरले ॥ ३ ॥

शरणागत वत्सल तूं सुजनांचा वाली ।
भारतभूषण सीता बहु सद्गुणशाली ।
पदिं तुमच्या सद्भावें लोटांगण घाली ।
सेवक हा शिरिं घेई चरणांची धूली ॥ ४ ॥

## दोलोत्सव.

देवीपुराण व निर्णयामृत ग्रंथांत दोलोत्सवासंबंधाचें विवेचन असून चैत्र महिन्यांत शुक्ल ३ येपासून वैशाख शुक्ल ३ येपर्यंत गौरी, विष्णु इत्यादि देवांचें पूजन करावें, असें सांगितलें आहे. यास दोलोत्सव असें नांव देण्याचें कारण असें कीं या उत्सवाच्या वेळीं देवांच्या मूर्ति शृंगारून या डोल्हाऱ्यांत बसवून झोंके देतात. निरनिराळ्या देवतांच्या उत्सवाचे दिवस निरनिराळे ठरविले आहेत. तृतीयेपासून शु० १४ पर्यंत शिवपार्वतीचा उत्सव, १४ शीपासून नृसिंहाचा, वद्य ११ शीपासून विष्णुलक्ष्मीचा याप्रमाणें उत्सव करावा, असा विधि सांगितला असून छत्रचामरादिक राजोपचार देवास अर्पण करावे असेंही पुराणांत सांगितलें आहे. बंगाल्याकडे शिमग्याच्या उत्सवाच्या दिवसांत दोलोत्सव होत असतो. त्याचें विवेचन पुढें केलें आहे. ( होलिकामहोत्सव पहा. )

## शास्त्रोक्त विधि.

निरनिराळ्या देवतांस हिंदोळयावर बसवून त्यांची शोडषोपचारें पूजा करावी. रुप्याच्या सांखळ्या बांधलेल्या रत्नखचित सोन्याच्या पाळण्यांत विष्णु व लक्ष्मीच्या मूर्ति बसवून आंदोलन करावें. होम पेटवून त्यांत तुपाच्या १०८ आहुती द्याव्या. दाही दिशांस भाताचे बळी द्यावे. वाजतगाजत देवाच्या मूर्ति पाळण्यांत घालून गाणीं गावीं; याप्रमाणें एक महिना उत्सव करावा.

## चालू रूढि.

पूर्वीप्रमाणें हल्लीं घरोघर कोणी दोलोत्सव करीत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत याचा प्रचार नाहीं. सुमारें आठशें वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानांत हा उत्सव चालत होता असें आल्बेरूनीच्या लेखांवरून दिसतें. तेव्हां घरोघर दोलोत्सव होत असे. स्त्रिया व पुरुष मोठ्या आनंदानें चैत्राचे दिवस घालवीत असत. त्यावेळीं चैत्र शु. ११ शीस कृष्णाच्या देवालयांत मोठा उत्सव होत असे. याला हिंदोली चैत्र असें नांव होतें. सध्या मथुरा, वृंदावन, अयोध्या, काशी, द्वारका व डाकोरनाथ येथें सार्वजनिक देवालयांतून हा उत्सव मोठ्या थाटानें साजरा केला जातो. त्या वेळचा प्रेक्षणीय थाट पाहण्यासाठीं हजारों यात्रेकरू या क्षेत्रांत जमत असतात. विशेषतः कृष्णाच्या देवालयांत हा उत्सव प्रेक्षणीय होतो. सांप्रत जे अनेक उत्सव रूढ आहेत त्यांवरून

झाली हें ठरवितां येण्याजोगें आहे. परमेश्वरासंबंधाच्या उदात्त कल्पना नाहींशा होऊन तोदेखील आम्हा मनुष्यांप्रमाणेंच आहारनिद्रादिकांच्या योगानें संतुष्ट होणारा आहे अशी भावना ज्या कालीं उत्पन्न झाली, अर्थात् परमेश्वराच्या अगाधत्वाबद्दलचें ज्ञान आपल्या लोकांच्या ठायीं नष्ट झालें त्या कालीं दोलोत्सवासारखे उत्सव अस्तित्वांत आले. 'सहस्रशीर्ष सहस्रपाद' अर्थात् जगांतील यच्चयावत् प्राण्यांचीं शिरें व त्यांचे हजारों पाय परमेश्वराला आहेत अशी जी मूळची कल्पना ती जाऊन अवतारमाहात्म्यामुळें देवालाही आम्हां मनुष्यांप्रमाणेंच कान, डोळे, नाक असलेली एक व्यक्ति बनविण्यांत आली. अर्घ्य, पाद्य, स्नान, यज्ञोपवीत, नैवेद्य, तांबूल, छत्र, चामर, वाद्य, गीत, शयन वगैरे आम्हांप्रमाणेंच देवाला आवडतात असें कल्पून त्यांचें अर्पण हें भक्तीचें एक अंग आहे असें लोक मानूं लागले. तशांत देवालयांची जागोजागीं स्थापना झाल्यावर त्यांत जे देवाचे अर्चक होऊन राहिले त्यांनीं निरनिराळया उत्सवांची योजना केली. प्राचीन इतिहासावरून असें दिसतें कीं, वेदकालीं देवालयें किंवा देवाच्या मूर्ति नव्हत्या. ज्या पंचमहाभूतांची प्राचीन आर्य प्रार्थना करीत असत तीं देवतांच्या स्थानीं मानलेलीं महाभूतें देव्हाऱ्यांत किंवा देवालयांत मावण्याजोगीं नव्हतीं. प्रत्येक आर्यांचें घर हेंच देवालय व घरचा यजमान हाच उपाध्याय व अर्चक असे. देवपूजा, हव्यकव्य, होमहवन हीं सर्व घरच्या घरीं चालत. या सर्व धर्मकृत्यांत पुरुष व स्त्रिया श्रमविभागानें काम करीत. सोमवल्ली आणून कुटणें, रस काढणें वगैरे कामें स्त्रिया करीत व होम सिद्ध झाल्यावर हवि अर्पण करितांना पतीबरोबर बसून त्या यज्ञकार्य चालवीत. ऋग्वेदांत यासंबंधानें स्पष्ट उल्लेख सांपडतो तो असाः—

**वि त्वा ततस्रे मिथुना अवस्यवो व्रजस्य साता गव्यस्य निःसृजः सक्षन्त इन्द्र निःसृजः। यद्गव्यन्ता द्वा जना स्वऽर्यंता समूहसि आविष्करिक्रद्वृषणं सचाभुवं वज्रमिन्द्र सचाभुवम् ॥ ३ ॥**

( मं. १ सू. १३१ )

अर्थ—हे इंद्रा, तुझ्या प्रसादाची लालसा धरून यजमान व त्याची पत्नी अशीं अनेक जोडपीं गोधन प्राप्त होण्याकरितां तुला हवि अर्पण करतात व आहुति देऊन सर्व बाजूस सारून तुझें यजन तत्परतेनें करीत असतात. दिव्य प्रकाश आणि

स्वर्गसुख यांच्यासाठीं उत्सुक झालेल्या जोडप्यांना जेव्हां जेव्हां तूं स्वर्लोकीं नेतोस, तेव्हां तेव्हां, हे इंद्रा, तुझें अमोघ वज्र आमच्या सहज दृष्टीस पडतें. तें तुझा जीव कीं प्राण आहे. त्याचा तुझा कधींही वियोग घडत नाहीं." अशा प्रकारचे किती तरी उतारे देतां येतील.

यज्ञकार्य करणें म्हणजे स्वतंत्र अशी थाटाची व्यवस्था करावी लागे अशांतलाही प्रकार नाहीं. ज्या चुलीवर पाक सिद्ध करीत त्याच चुलींतील अग्नीस पाकाहुति दिल्या जात. ( सध्यां विशेष प्रसंगीं अशाच रीतीनें वैश्वदेव नांवाचा पाकयज्ञ करण्याची जी चाल आहे ती या जुन्या पद्धतीची अवशिष्ट रूढि होय.) बौद्ध धर्म हा नास्तिकवादी असल्यामुळें त्या धर्माशीं देवपूजा, मूर्तिपूजा किंवा देवालयें यांचा संबंध पोहोंचणें संभवनीय दिसत नाहीं. परंतु हिंदूंस मूर्तिपूजेचा ओनामा बुद्धाच्या अनुयायांनींच घालून दिला, यास प्राचीन इतिहास साक्ष देत आहे. खिस्ती शकाच्या सातव्या शतकांत हुएनत्संग हा प्रवासी या देशांत आला. बौद्ध धर्माच्या ऱ्हासासंबंधाचें जें त्यानें वर्णन दिलें आहे त्यावरून त्या कालीं बुद्धलोक मूर्तिपूजक बनले होते हें सिद्ध होतें. मूलतः भिक्षूंस रहाण्याकरितां व सभा भरवून धर्मविषयक चर्चा करण्यासाठीं भव्य लेणीं व सभामंदिरें बांधण्यांत आलीं होतीं. या मंदिरांत दहा हजारांपर्यंत भिक्षू रहात असत. अशीं मंदिरें सर्व देशभर पसरलीं होतीं. परंतु कालेंकरून त्यांत अजस्र बुद्धाच्या मूर्ति स्थापन करण्यांत आल्या. पालख्यांतून व रथांवरून बुद्धाच्या व इतर मूर्ती मोठ्या थाटामाटानें शहरांतून फिरविण्याची रूढि प्रचारांत आली. बुद्धाच्या धर्मोपदेशाबद्दल फारसा कोणी आदर दर्शवीत नव्हता. गौतम ज्या ठिकाणीं जन्मास आला तो कपिलवस्तु गांव, जेथें गौतम मरण पावला तें कुशिनगर तसेंच इतर कित्येक शहरें, जेथें बुद्धानें अमृततुल्य उपदेश केला होता, तीं सर्व नष्ट झालीं होतीं. त्यांच्याबद्दलचा आदर किंवा पूज्यत्वबुद्धि मनांत वागत असती तर बुद्धानुयायांनीं तीं शहरें क्षेत्रस्थानें मानिलीं असतीं. त्या कालीं ज्या ज्या ठिकाणीं बौद्धांचे संघाराम होते, त्या त्या ठिकाणीं हिंदूंचींही अनेक देवालयें स्थापन होऊन उत्सव चालू झाले होते. काशी हें प्रसिद्ध क्षेत्र असें मानण्यांत येत असून हजारों यात्रेकरू प्रत्यहीं शिवदर्शनासाठीं दूर दूरच्या प्रांतांतून येत असत. हुएनत्संगाच्या वेळीं काशी येथील देवालयांत सुमारें ७० हात उंचीची महेश्वराची मूर्ति होती असें त्याच्या लेखावरून दिसतें. इतर अनेक क्षेत्रें निर्माण होऊन त्या ठिकाणीं अनेक देवालयें निरनिराळ्या पौराणिक कालांतील देवांप्रीत्यर्थ

बांधण्यांत आलीं. कृष्णाचें माहात्म्य वाढतांच वृंदावन, मथुरा वगैरे ठिकाणीं कृष्णाचीं देवालयें स्थापन झालीं. पुढें देशभर विष्णूचे अवतार कृष्ण, राम वगैरे देवतांचीं मंदिरें उभारण्यांत येऊन कांहीं ठिकाणें क्षेत्रें बनलीं. शिव, गणपति, शक्ति यांच्या उपासकांनीं आपल्या देवतांस मंदिरांत बसवून त्यांच्या-प्रीत्यर्थ अनेक उत्सव चालू केले. अशा प्रकारें वेदकालानंतर बौद्धधर्माच्या वेळीं प्रथमतः मूर्तिपूजेचा प्रघात पडतां पडतां पुराणें रचलीं गेलीं. त्या कालांत, म्हणजे खिस्ती शकाच्या प्रारंभापासून सुमारें पांच सहाशें वर्षांच्या दरम्यान जिकडे तिकडे देवालयेंच देवालयें दृष्टीस पडूं लागलीं. प्रथमच जेव्हां बुद्धधर्माच्या उपासकांचें अनुकरण करून हिंदूंनीं देवालयें स्थापन केलीं तेव्हां त्यांनीं सहजच वेदप्रणित यज्ञयागादिकांचा त्याग केला व देवग्रहांतील विधि योग्य प्रकारें चालविण्यासाठीं भटजींची योजना केली. स्मृतिकार मनूस भटजींबद्दल आदर वाटत नव्हता असें दिसतें. ( मनुस्मृति अ० ३–१५२ पहा. ) भटजी हे हव्यकव्यादिकांत वर्ज्य आहेत अशा अर्थाच्या या वचनावरून इतकेंच दिसतें कीं ते धर्मविक्रय करणारे असें मानून त्यांची योग्यता मनूनें कमी मानिली असावी. सहाव्या शतकांत म्हणजे पुराणें अस्तित्वांत येऊं लागल्यावर

## देवांच्या मूर्ति

करण्याचा प्रघात पडला होता असें दिसतें. वराहमिहिरानें ( इ. स. ५०५–५८८ ) बृहत्संहितेंत राम, बली, विष्णु, बलदेव, भगवती, सांब, ब्रह्मा, इंद्र, शिव, पार्वती, सूर्य, लिंग, यम, कुबेर, वरुण, गणेश वगैरे देवतांच्या मूर्ति कशा असाव्या याचें विवेचन केलें आहे. तसेंच भागवत धर्माचे लोक विष्णूची, मग हे सूर्याची, भस्म धारण करणारे द्विज शिवाची, ब्राह्मण ब्रह्मयाची पूजा करितात असेंही त्यानें लिहिलें आहे. यावरून वराहमिहिराच्या कालीं वर निर्दिष्ट केलेल्या कित्येक देवतांची उपासना प्रचलित झाली होती हें सिद्ध होतें. त्या कालीं काशी, हरिद्वार, प्रयाग, मथुरा, वृंदावन वगैरे कित्येक ठिकाणांस क्षेत्र असें मानीत. या सर्व क्षेत्रांस लोकाश्रय व राजाश्रय भरपूर मिळल्यामुळें भव्य मंदिरें उठलीं. धनिक लोकांच्या औदार्यामुळें वर्षभर निरनिराळे उत्सव करण्याची सोय झाली. विशेष प्रसंगीं बरेचसे भाविक लोक तेथें जाऊन आपल्या उपास्य दैवताबद्दल प्रेम व्यक्त करूं लागले. सारांश बौद्धधर्मानें वेदप्रणित यज्ञयागादिकांचें महत्त्व कमी केलें; आणि पुराणकालींही त्यांचें पुनरुज्जीवन

झालें नाहीं. हिंदू लोक वेद हे ईश्वरप्रणित अतएव वंदनीय आहेत इतकेंच मानूं लागले. वैष्णव धर्मानें बौद्धधर्मीयांच्या अहिंसा तत्त्वाचा स्वीकार केला. जातिभेदाची महति कमी मानून समता व नीति यांच्या पायावर वैष्णव मताची उभारणी केली. त्यामुळें बुद्धाच्या पंथांत गेलेले लोक त्याचा त्याग करून पुनः हिंदुधर्मांत शिरले. वैष्णवमतप्रवर्तकांनीं नवविधा भक्तीचा महिमा वाढविला.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ॥
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

या प्रकारची नवविधा भक्ति सुसाध्य व श्रेष्ठ असल्याचें विष्णुभक्त सांगत आले व ह्या भक्तीचा संप्रदाय लोकांच्या विचारास पटला. घरोघर व देवालयांत आजमितीस दृष्टीस पडणारे अनेक उत्सव या नवविधा भक्तीच्या उपक्रमापासूनच उत्पन्न झाले. मूलतः विष्णूप्रीत्यर्थ प्रचारांत आलेल्या उत्सवांचें इतर देवतांच्या उपासकांनीं अनुकरण करून ते आपआपल्या कल्पनाचातुर्यानें अमलांत आणिले. दोलोत्सव हा मूळचा कृष्णाचा उत्सव असून इतर देव व देवी यांच्याप्रीत्यर्थ तो साजरा करावा असें त्यांच्या उपासकांनीं ठरविलें. असो.

## वेदकालचे वैदिक.

वैदिकांचा किंवा भटजींचा वर्ग कसा अस्तित्वांत आला हें या ठिकाणीं सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. वेदकालीं घरांतील यजमान हाच गृह्ययज्ञ करणारा भटजीही असे, हें जरी खरें आहे तरी कालेंकरून यज्ञयागादिकाचें काम चालविणारा एक निराळाच वर्ग उत्पन्न झाला. राजे लोक युद्धांत यश प्राप्त व्हावें ह्मणून किंवा यश संपादन केल्यावर मोठे यज्ञ करीत. ते चालविण्याचें काम त्या कार्यांत निष्णात अशा वैदिकांच्या हस्तें ते करवीत असत. त्याबद्दल त्यांना योग्य वेतन दिलें जात असे. यज्ञकार्य करणारे जे वैदिक असत, त्यांचे चार वर्ग होते. यज्ञसाहित्याची जुळवाजुळव करणारांस अध्वर्यु असें ह्मणत. ते जमीन मोजून वेदी बांधीत. यज्ञास लागणारीं पात्रें, लाकूड व पाणी पुरवीत. यज्ञाच्या वेळीं गीत गाण्याचें काम करणारांस उद्गाते असें ह्मणत. होते हे सूक्तें पाठ ह्मणत आणि यज्ञ चालतांना मुख्य याजकांचें काम ब्राह्मण करीत असत. यज्ञांतील कृत्यांचें ब्राह्मणंना पूर्ण ज्ञान असल्यामुळें अध्वर्यूंस, होत्यांस व उद्गात्यांस त्यांचीं त्यांचीं कामें ते नीट समजावून देत. होते सूक्त पाठ ह्मणण्याच्या कामांत

निष्णात असले म्हणजे पुरे होत असे; परंतु अध्वर्यु व उद्गाते हे विशेष पढिक लागत. ऋग्वेदावरून दिसतें कीं कांहीं वैदिकांचीं कुलें या यज्ञकार्याच्या कामीं प्रसिद्धीस आलेलीं होतीं. त्यांना विशेष मान देण्यांत येत असे. राजे लोक त्यांना धन, धान्य, गुरें व रथ देऊन त्यांची संभावना करीत.

## पुराणकालचे वैदिक.

महाभारताच्या कालींही ब्राह्मणाचें महत्व कमी न होतां वाढत गेलें. कालें-करून अवतारांत ज्याचा समावेश करण्यांत आला त्या श्रीकृष्णानें वर्णभेदाचें विवेचन करीत असतां गुणकर्मांवरून ब्राह्मणास श्रेष्ठ असें मानिलें. रामायणकालीं वैदिकांचें महत्व फार वाढलें. कारण प्रत्यक्ष श्रीराम ब्राम्हण वैदिकांचा पक्षपाती असून त्यांच्या अर्ध्या वचनांत वागत असे. बुद्धानें ब्राह्मणधर्मांतील यज्ञयागा-विरुद्ध आपलें धर्ममत प्रसिद्ध केलें हें जरी खरें आहे तथापि तो ब्राह्मणांस श्रमण व भिक्षूंप्रमाणेंच मान देत असे. अर्थात् त्यांचें महत्व समाजांत कायम राहिलें. पुढें बुद्धाच्या पश्चात् सुमारें एक हजार वर्षें पुराणोक्त हिंदुधर्म रूढ होईपर्यंत अशोक, शिलादित्य, कनिष्क व त्यांच्यासारखे उदार मतवादी असे जे कित्येक राजे झाले त्यांनीं ब्राह्मणांस योग्यतेप्रमाणें दानधर्म देऊन संतुष्ट केलें. बुद्ध-धर्माचा ऱ्हास होऊन पुराणांतील अवतारमहात्म्य लोकांच्या विचारास पटल्या-वर जेव्हां जागोजागीं देवालयें स्थापन झालीं तेव्हां त्यांची व्यवस्था पाहण्यास हा वैदिकांचा वर्ग उपयोगी पडल्यामुळें त्याचें महत्व वाढलें. वैदिकांनीं देखील आपल्या कल्पनाचातुर्यानें निरनिराळे उत्सव अमलांत आणिले. जात्याच उत्सव-प्रिय असलेले व बौद्धधर्म सोडून पुनः हिंदुधर्मांत आलेले हिंदू नव्या दमानें या उत्सवांत सामील होऊन ते चालविण्यास लागणारा द्रव्याश्रयही देऊं लागले. ब्राह्मणांस धन देणें किंवा धर्म व देवकार्याप्रीत्यर्थ मदत करणें म्हणजे पुण्य मिळ-विणें आहे अशी भावना समाजांत दृढ होत गेली. धर्मकृत्यें केल्याचा मोबदला म्हणजेच पुण्य आहे व पुण्य हेंच परलोकच्या यात्रेस लागणारें भांडवल असून उत्तम पुनर्जन्म लाभण्यास तें एक महत्वाचें साधन आहे अशी लोकांची समजूत होतांच अनेक व्रतवैकल्यें, दानधर्माचे नवस व उत्सव अमलांत आणण्याच्या कामीं भटजींचा पेशा पत्करलेल्या लोकांनीं प्रयत्न केला व तो त्यांस साधला.

## मूर्तिपूजेपासून फायदे.

वेदकालीं पृथ्वी, जल, तेज, वायु व आकाश यांची महति गाण्यांत लोक तल्लीन होत असत. त्यांच्या प्रीत्यर्थ करावयाचे यज्ञ सुमुहूर्तावर व्हावे

एतदर्थ त्यांना आकाशांतील नक्षत्र, सूर्य, चंद्र यांच्या गतीचें अवलोकन करून यज्ञाला योग्य काल ठरवावा लागला. यामुळें ज्योतिषशास्त्र जन्मास आलें. त्याचप्रमाणें यज्ञासाठीं वेदी तयार करण्यासंबंधानें वेदांत जो खुलासा होता त्यावरून रेखागणित ( ज्याला हल्लीं सिद्धांत असें आपण म्हणतों तें ) उत्पन्न झालें. छंदःशास्त्राचा उगम वेदांतील छंदोबद्ध सूक्तांवरून आहे. याप्रमाणें केवळ प्रार्थनापर जीं सूक्तें तीं जशीं उत्तम अशीं शास्त्रें ( ज्योतिष, गणित, छंदस् ) उत्पन्न करण्यास कारणीभूत झालीं, त्याचप्रमाणें मूर्तिपूजेच्या प्रघातामुळें समाजाची कांहीं बाबींत प्रगति झाली. शिल्पशास्त्र, गानकला, वाद्य, कवित्व, दगड व धातु यांच्या मूर्ति बनविण्याची कला वगैरेंची उत्पत्ति व वाढ मूर्तिपूजेमुळें झाली. भुवनेश्वर, केतेश्वर वगैरे देवस्थानांचें बांधकाम पाहून हल्लींच्या काळीं उत्तम शिल्पशास्त्रज्ञ देखील तोंडांत बोटें घालतात. सोमनाथपूर, बेल्लूर, कांची (कांजिवरम्), मदुरा, श्रीरंगम्, तंजावर, गिरनार, बुंदेलखंड, जगन्नाथपुरी वगैरे कित्येक ठिकाणीं जीं उत्तमोत्तम देवालयें दृष्टीस पडतात, तीं सर्व मूर्तिपूजकांच्या श्रद्धेमुळेंच उभारण्यांत आलीं. प्रत्येक अवताराची महति त्याच्या उपासक कवींनीं प्रेमळ शब्दांत गातांना त्यांत प्राचीन तत्त्वज्ञानाचा अनेक परीनें समावेश केल्यामुळें सामान्य जनांच्या विचारांस सात्विक वळण मिळालें. गायन व वादन यांचा संबंध धर्माशीं जोडल्यामुळें त्या दोन्ही कला उत्तम रीतीनें वृद्धिंगत झाल्या. कृष्णलीला व इतर देवांची महति ज्यांत वर्णिली आहे अशीं कर्णमधुर गीतें गातांना भाविक जनांच्या नेत्रांतून आजमितीसही आनंदाचे पूर येतात. क्षेत्रांच्या ठिकाणीं नदीकिनाऱ्यावर स्नानासाठीं व इतर धर्मकृत्यें करण्याकरितां बांधण्यांत आलेले घाट, क्षेत्रांतील मोठमोठे तलाव व त्यांचें आधुनिक शिल्पशास्त्रज्ञांना थक्क करून सोडणारें बांधकाम, यात्रेकरू व पांथस्थांसाठीं क्षेत्रांत व क्षेत्रांस जाण्याच्या रस्त्यांवर बांधण्यांत आलेल्या धर्मशाळा व सतत चालणारीं अन्नसत्रें या व इतर लोकोपयोगी सत्कृत्यांचा उगम पुराणोक्त हिंदुधर्म व त्यास चालन देणारे भटजी यांच्यापासून आहे, हें कबूल केलें पाहिजे. प्राचीनकाळीं गृह्य व पाकयज्ञ केल्यावर सत्पात्र ब्राह्मणास व इतर अनाथ बांधवांस अन्नदान व द्रव्यदान देण्याची चाल या देशांत होती. ती चाल रूपांतर पावून पौराणिक कालानंतर द्रव्याचा विनियोग वर सांगितलेल्या कार्याकडे होऊं लागला; व मूळची आर्यांच्या आंगची दानधर्म करण्याची बुद्धि बौद्ध धर्मामुळें विशेष बळावून नूतन धर्मविचारामुळें दृढ झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याशिवाय क्षेत्रांत जाऊन

देवदर्शन घेणें हें अत्यंत श्रेष्ठ कर्तव्य आहे, असें लोकांस वाटूं लागतांच ते लांबचा प्रवास करण्यास तयार झाले. हल्लींप्रमाणें त्या वेळीं रस्ते, आगगाड्या वगैरे प्रवासाच्या सोई नव्हत्या; तथापि दरसाल हजारों लोक यात्रेच्या निमित्तानें लांबचा प्रवास पायानें करीत असत. यावरून त्यांची श्रद्धा किती जाज्वल्य होती हें दिसतें. भाषाभेद, प्रवासाचे हाल, द्रव्याचा व्यय वगैरे गोष्टींची जशी त्यांनीं पर्वा धरली नाहीं, तशीच त्या काळीं सुरक्षितपणें प्रवास करतां येत नसतांही त्यांनीं धर्मश्रद्धेमुळें जिवाचीदेखील पर्वा धरली नाहीं. सारांश, लोकांत प्रवासाची आवड व त्यास लागणारें धाडस उत्पन्न करण्यास पुराणोक्त मूर्तिपूजा कारण झाली असें म्हणणें फारसें चुकीचें होणार नाहीं. वेद व उपनिषदें यांतील ब्रह्मज्ञान व निर्गुणोपासना सामान्य लोकांना अवगत होणें शक्य नव्हतें. तेव्हां मूर्तिपूजा प्रचारांत येतांच सगुणोपासना व भक्तिमार्ग यांची वाढ होत गेली व सामान्य बुद्धीच्या लोकांना ईश्वरसेवेचा सोपा मार्ग सांपडल्यामुळें त्याचा त्यांनीं आनंदानें अवलंब केला.

अखिल विश्वाला व्यापून असणाऱ्या परमात्म्यास मूर्तीच्या ठायीं मानून त्याची एकाद्या सामान्य धन्याप्रमाणें सेवा करणें ( आणि ती देखील आपला प्रापंचिक स्वार्थ साधण्यासाठीं करणें ) हें अनुचित आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें. मूर्तिपूजेचा पाडाव करण्याचा ज्या धर्मसंस्थापकांनीं आजवर प्रयत्न केला, त्यांची कीर्ति गाइली जाते हें जरी खरें आहे, तरी केवळ मूर्तीचे पूजक असे जे कित्येक लोक या सगुणोपासनेमुळेंच साधुपदास पोहोंचले, त्यांची योग्यता पहातां मूर्तिपूजेस तरी दोष कां द्यावा हें समजत नाहीं. विठोबा रखुमाईचे दास तुकाराम, श्रीकृष्णाचे भक्त चैतन्य, रामाचे भक्त रामदास किंवा कबीर, देवीचे भक्त रामकृष्ण परमहंस वगैरे कित्येकांची योग्यता केवळ निराकार देवाची पूजा करणारांपेक्षां किती तरी मोठी आहे. मूर्तिपूजेच्या योगानें त्यांची कोणत्याही प्रकारें अवनति न होतां उन्नतीच झाली हें त्यांच्या आनंददायक चरित्रावरून सिद्ध होतें. तसेंच देवालयें जागोजागीं स्थापन झाल्यानंतर लोकांस एकत्र जमविण्यास एक ठिकाण मिळाल्याप्रमाणें होऊन गांवच्या लोकांत परस्परप्रेम व सलोखा वाढला. हिंदुस्थानांत शहरापेक्षां लहान गांव किंवा खेडींच जास्त. प्रत्येक खेड्यांतील ग्रामदेवतेचें देवालय म्हणजे ग्रामचावडी आहे. त्या ठिकाणीं पूर्वी गांवांतील सर्व लोकांचे कज्जांचे निवाडे पंच करीत असत. खेड्यांतील मुलांस शिक्षण देणाऱ्या पंतोजीचें शालागृहही तेंच. राजकीय, समाजिक, सार्व-

जनिक व कौटुंबिक हिताच्या प्रश्नांचा विचार व खल करण्याची जागाही ग्रामदेवतेचें देवालय असे व सध्या अनेक ठिकाणीं ही स्थिति कायम आहे. अर्थात् देवतांच्या मूर्तींमुळें देवस्थानें उत्पन्न होऊन त्यांच्या पायीं जनतेचें हित बऱ्याच अंशानें मागें झालें व सध्याही होत आहे, असें ह्मणणें ऐतिहासिक दृष्टया चुकीचें होणार नाहीं. ज्या कारणावरून

## मूर्तिपूजेसंबंधानें आक्षेप

घेण्यांत येतात, त्यांपैकीं थोडीं कारणें पुढें देत आहों. मूर्तिपूजा प्रचारांत येतांच उपनिषदांतील उच्चतम कल्पना मागें पडल्या. ज्या ज्ञानामुळें आमच्या देशाच्या विचारशक्तीबद्दल जगांतील सर्व लोक आदर दाखवितात, तें ज्ञान कमी दर्जाचें मानण्यांत येऊन प्राचीन कालाप्रमाणें उत्तमोत्तम ग्रंथ तयार होण्याचें बंद पडलें. मनूच्या कालापर्यंत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य आपआपल्या घरीं परमेश्वराची प्रार्थना करीत असत. घरींच पाक सिद्ध झाल्यावर चुलींतील अग्नीस पाकाहुति अर्पण करीत. परंतु मूर्तिपूजा प्रचारांत येतांच घरांतील साधी उपासना जाऊन त्या जागीं देवालयांतील उत्सव रूढ झाले. या उत्सवांची व देवालयांतील देवतांची पूजा करण्याची व्यवस्था ज्या भटांकडे होती त्यांनीं अनेक प्रकारच्या व्रतवैकल्यरूपी शृंखला लोकांच्या पायांत अडकविल्या. भटजी दाखवितील तोच खरा धर्ममार्ग, असें झाल्यामुळें लोकांनीं त्यांच्या सल्लयानें अनेक धर्मकृत्यें करण्याचें अंधश्रद्धेनें पतकरिलें. त्यांनीं स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं पुराणांत कित्येक पापपुण्याच्या कल्पना अंतर्भूत करून पुरुष व स्त्रिया यांच्यासाठीं किती तरी व्रतें निर्माण केलीं. वैदिकांनीं प्राचीन तत्वज्ञानाचा अभ्यास सोडून दिला व ते पुराणांतील सर्वच गोष्टींबद्दल लोकांत आदर उत्पन्न करण्याच्या प्रयत्नास लागले. देवालयांत नृत्यगायन करणारा जो स्त्रीवर्ग तयार झाला, त्याच्या सहवासानें ते व कित्येक देवभक्त ह्मणविणारे नीतिभ्रष्ट होऊं लागले. देवास मुरळ्या वाहण्याची चाल हळू हळू प्रचारांत आल्यामुळें नैतिकदृष्ट्या बरीच हानि झाली. लोकांस दानधर्म करण्याची संवय लागतांच असंख्य आळशी लोक साधु या नांवाखालीं लोकांस नाडूं लागले. आज जवळ जवळ अर्ध कोटि लोक देवाच्या नांवावर व लोकांच्या अंधश्रद्धेच्या भरंवशावर देशभर हिंडत असतात. अन्नसत्रें व धर्मशाळा मूलतः ज्या पवित्र हेतूनें स्थापन करण्यांत आल्या, त्यांचा दुरुपयोग होऊं लागला. जातिभेद व धर्मपंथभेद यांचा परिणाम दिवसेंदिवस अनिष्ट होत जाऊन समाजाचीं शकलें झालीं.

यास कारण तरी हा पुराणकालानंतरचा वैदिक वर्गच आहे, असें कित्येकांचें मत आहे. मुसलमानांच्या स्वाऱ्या झाल्या वेळीं मूर्तिपूजा देशभर प्रस्थापित होऊन लोकांकडून मिळालेल्या उदार आश्रयामुळें देवस्थानें केवळ संपत्तीचीं कोशागारें बनलीं होतीं असें दिसतें. एका सोमनाथाच्या देवालयांतून मूर्तिभेदक महंमदानें नेलेल्या अपार संपत्तीवरून आमच्या विधानाची सत्यता दिसून येणार आहे. सोमनाथासमोर टांगलेल्या घंटेस २०० माणसांची सोन्याची सांखळी होती; दरवाजास सुवर्णाचा व जागोजाग रुप्याचा पत्रा ठोकला होता; नित्यशः गंगेच्या पाण्यानें लिंगास स्नान घालून काश्मीर देशाहून आणलेलीं सुंदर फुलें देवास वाहात. असें वैभव ज्या सोमनाथाचें होतें तें सोमनाथाचें लिंग महंमदानें फोडून टाकिलें. त्याची स्वारी हटविण्याची शक्ति देखील आमच्या लोकांच्या आंगीं त्या वेळीं राहिली नव्हती, हें यावरून जसें सिद्ध होतें तसेंच धनिक लोक देवालयांस सढळ हातानें द्रव्य देत असत, हें देखील स्पष्ट होतें. या देशांत मुसलमानांची सत्ता स्थापन झाल्यावर असंख्य देवस्थानांचा नाश करण्यांत आला; तथापि तीं राहिलीं. ब्रिटिश सत्ता स्थापन होतांच धर्माच्या बाबतींत लोकांस पूर्ण स्वातंत्र्य मिळालें; परंतु या स्वातंत्र्याचा त्यांनीं कसा दुरुपयोग केला, हें हल्लींची

## देवस्थानांची शोचनीय स्थिति

पाहिली असतां दिसून येणार आहे. ज्यांच्या मनावर पाश्चात्य संस्कृतीचा अंमल बसला आहे, त्यांचीं पुराणें, देवालयें व त्यांतील देव यांच्यावरची श्रद्धा दिवसें दिवस कमी होत चालली आहे. भटजींबद्दल आदर नसल्यामुळें व पूर्वीप्रमाणें त्यांस आश्रय न मिळाल्या कारणानें त्यांची स्थिति अत्यंत वाईट होत आहे. ही स्थिति कशी सुधारावी, हा प्रश्न समाजहितचिंतकांनीं हातीं घेऊन त्यासंबंधानें खल केला पाहिजे. वैदिक वर्ग सुशिक्षित होऊन, देवस्थानांस लाभणाऱ्या अपार संपत्तीचा विनियोग सत्कार्याकडे करण्याची रूढि प्रचारांत आल्यास देशाचें अनेक प्रकारानें कल्याण होण्याजोगें आहे. वरीलप्रमाणें मूर्तिपूजेसंबंधानें आक्षेप घेणारांनीं ज्या लोकांत धर्मानुशासनामुळें मूर्तिपूजा रूढ नाहीं त्यांच्यांतील आचारांचें सूक्ष्मरीत्या अवलोकन करावें म्हणजे त्यांची खात्री होईल कीं सर्व प्रकारच्या सामाजिक दोषांस केवळ मूर्तिपूजाच कारण होत नसून इतर अनेक कारणांमुळें समाज अवनतावस्थेस पोहोंचतो. मूर्तिनिषेधक लोकांची नीतिमत्ता पूर्णावस्थेस पोहोंचली आहे काय ? सदाचारी, विद्वान् व लोकहिततत्पर असा वैदिक वर्ग तयार होऊन लोकांस खरा धर्म समजावून देण्यास व त्यांच्याकरवीं चांगलीं कृत्यें करविण्यास पुढें येईल, तोच भाग्याचा दिवस होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. देव करो आणि असा दिवस लवकर उगवो.

# गौरीउत्सव.



ऋतुपरत्वें जे कांहीं उत्सव रूढ झाले, त्यांतील गौरिउत्सव हा एक आहे. चैत्र शु. ३ येपासून वैशाख शु. ३ येपर्यंत हा उत्सव चालू असतो. हे दिवस स्त्रियांस फार उल्हासाचे असतात. या दिवसांत हळदकुंकूं, ओटी भरणें वगैरे कामें चालतात. या उत्सवास शीतला गौरी असेंही नांव आहे. गौरीस शृंगारून सौभाग्यवती स्त्रिया तिची पूजा करीत असतात. जवळपास रहाणाऱ्या स्त्रियांस निमंत्रण करून त्यांस हळदकुंकूं देतात व वसंतऋतूंत होणाऱ्या अरण्यांतील फळांनीं ( चुरणें वगैरे ) व भिजविलेल्या हरभऱ्यांनीं सुवासिनींच्या ओट्या भरतात. रात्रौ गौरीसमोर फुगड्या, गीत वगैरेच्या योगानें स्त्रिया उल्हासानें हा उसत्व साजरा करितात. गौरीउत्सव सार्वत्रिक नाहीं. सुमारें ८०० वर्षांपूर्वी या महिन्यांत स्त्रिया ( चैत्र पौर्णिमेस ) वसंतोत्सव करीत, असें तत्कालीन लेखांवरून दिसतें; त्या दिवशीं स्त्रिया आपले दागिने अंगावर घालीत व पतींकरवीं त्यांना कांहीं तरी देणगी देण्यांत येत असे. चैत्र व. ६ स चैत्रषष्ठी असें म्हणत; व त्या दिवशीं भगवतीप्रीत्यर्थ मंगलस्नान करून दानधर्म दिला जात असे. समाप्तीच्या दिवशीं म्हणजे वैशाख शु. ३ येस स्त्रिया उपोषित राहून गौरीची पूजाअर्चा करीत. त्या सारा दिवस नाना प्रकारच्या करमणुकींत घालवीत असत. हा दिवस गौरी तृतीया या नांवानें प्रसिद्ध होता. दुसरा दिवस सणाप्रमाणें पाळीत. हल्लीं हा उत्सव उत्तर हिंदुस्थानांत विशेष दृष्टीस पडत नाहीं.

# हनुमानजयंति.




प्राचीनकाळीं दक्षिण हिंदुस्थानांत जे आसुरी वृत्तीचे लोक रहात त्यांचा राजा रावण व त्याचें राक्षसकुल यांचा नाश आर्यशिरोमणि श्रीरामचंद्रानें केला. या कार्यांत त्यास कायावाचामनेंकरून ज्या शूर पुरुषानें मदत केली, त्या हनुमानाचा जयंत्युत्सव प्रत्येक वर्षी चैत्र शुक्र पौर्णिमेस करण्यांत येतो. शंकराचें देवालय ज्याप्रमाणें नंदीशिवाय असूं शकत नाहीं त्याचप्रमाणें श्रीरामाच्या देवालयाची पूर्तता मारुतिरायाच्या सान्निध्याशिवाय होत नाहीं. हनुमानाचा जन्म वानर नांवाच्या रानटी लोकांच्या कुलांत झाला. हे वानरलोक आर्य नव्हते; तथापि त्यांच्यांत आर्यांप्रमाणेंच तपश्चर्या करण्याची चाल असून ते रुद्राचे भक्त होते, असें दिसतें. प्राचीन कालीं निषाध व इतर अरण्यांत वास करणारे लोक रुद्र देवतेची उपासना करीत असत ( महाशिवरात्र या सदराखालीं पहा ); आणि पुरुषांप्रमाणें स्त्रियाही मनकामनासिद्ध्यर्थ तपश्चर्या करीत. केसरी नांवाच्या वानराच्या अंजनी नांवाच्या पत्नीनें महादेवाची आराधना कित्येक संवत्सरें केल्यावर त्याच्या अनुग्रहानें तिला जो पुत्र झाला, तोच हनुमंत किंवा मारुती होय. शंकराच्या वरानें हा पुत्र परमप्रतापी, वज्रदेही व चिरंजीव असा झाला. मारुतीचा जन्म चैत्र पौर्णिमेस अरुणोदयसमयीं झाला. त्यानें जन्मतांच उड्डाण करून सूर्यमंडलास हात घातला असें लिहिलें आहे; त्यावरून असा तर्क करण्यांत येतो कीं, त्या दिवशीं ग्रस्तास्त चंद्रग्रहण असून नभोमंडळांत अंधःकार पसरला असावा. सूर्यग्रहण पौर्णिमेस असणें शक्य नाहीं. हनुमंत हा अत्यंत बलाढ्य, धाडसी,

धोरणी व सत्वशील असल्याचें रामायणांत वर्णिलें आहे. त्याच्या इतका स्वामिनिष्ठ व राजनिष्ठ पुरुष क्वचित् जन्मला असेल. कडकडीत ब्रह्मचर्याच्या योगानें तो वज्रदेही बनला होता, अशी त्याची ख्याति आहे. कालेंकरून हनुमंतास रुद्राचा अवतार असें मानण्यांत आलें. वायु किंवा मरुत् याचा पुत्र असें मानून त्याला मारुती असें नांव पडलें. क्रोधायमान झाला असतां रुद्राप्रमाणें हनुमंतही अजिंक्य व भयानक असून त्याच्या पराक्रमापुढें महान् वीराचें तेज फिकें पडे, असें रामायणांत वर्णिलें असल्यामुळें त्याला रुद्राचा अवतार असें कालेंकरून मानण्यांत आलें असावें. आजमितीस मारुतीची पूजा प्रचलित असून प्रत्येक चैत्र शु. १५ स त्याचा जयंत्युत्सव साजरा करण्यांत येतो.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

चैत्र पौर्णिमेच्या दिवशीं सूर्योदयापूर्वी उठून पुरुषांनीं देवालयांत अथवा घरींच मारुतीच्या मूर्तीची विधिपूर्वक पूजा करावी असें शास्त्रमत आहे. श्रीरामाच्या देवालयांत असणाऱ्या मारुतीच्या मूर्तीची या दिवशीं पूजा करण्यांत येते. तसेंच सर्व मारुतीच्या देवालयांतून जयंत्युत्सव साजरा केला जातो. मारुती हा ब्रह्मचारी असल्यामुळें स्त्रिया त्याची पूजा करीत नाहींत. मारुतीचीं देवालयें कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत पसरलेलीं आहेत. तीं शोभायमान अशीं बांधलेलीं क्वचित् दृष्टीस पडतात. दक्षिण हिंदुस्थानांत असें एकही खेडें नाहीं कीं जेथें मारुतीचें देवालय सांपडणार नाहीं. एकाच खेड्यांत कधीं कधीं अनेक मारुतीचीं लहान देवालयें दृष्टीस पडतात. अरण्यांत देखील एकादा धोंडा मारुतीप्रीत्यर्थ पूजलेला दृष्टीस पडतो. रुद्र किंवा शंकर याची सत्ता ज्याप्रमाणें भूतपिशाचादिकांवर चालते, तशीच मारुतीची चालते अशी सार्वत्रिक समजूत असल्यामुळें, त्यांची बाधा होऊं नये म्हणून मारुतीस नवस केले जातात. महाराष्ट्रांत रामदास स्वामीनें रामभक्तीचा महिमा वाढविल्यावर मारुतीची भक्ति वाढली व जागोजागीं मारुतीचीं देवालयें स्थापन झालीं. हें दैवत युद्धप्रिय मावळे लोकांस ( मराठ्यांस ) फार पूज्य वाटलें. शिवाजीमहाराजांनीं ज्या ज्या ठिकाणीं राज्याच्या बंदोबस्ताकरितां कोट, दुर्ग व गड बांधले, तेथें तेथें त्यांच्या महाद्वाराशीं बलभीम मारुती हातांत गदा देऊन उभा केलेला दृष्टीस पडतो. सदाविजयी, स्वामिसेवातत्पर, राजनिष्ठ व कर्तव्यनिष्ठ असा हा रामदूत लष्करी बाण्याच्या मराठे वीरांस फार वंद्य वाटला, यांत

आश्चर्य नाहीं. मारुतीप्रीत्यर्थ मुद्दाम बनविलेली मूर्ति स्थापन करण्यांत येते असेंही नाहीं. एकादा ओबडधोबड धोंडा ठेवून त्यावर शेंदूर व तेल ओतलें, कीं मारुती तयार झाला. त्याच्या दोन्ही बाजूस दोन दगड व त्यावर एक शिला ठेविली कीं मंदिर झालें. अशा प्रकारचीं देवालयें प्रत्येक खेड्याच्या सीमेवर असतात. ठाणें जिल्ह्यांत शाहापूर ( वाफे ) येथें मारुतीचें देवालय आहे तेथें महाशिवरात्री व होळी या सणांच्या दिवशीं मोठी जत्रा भरते. हिंदु तर मारुतीचे भक्त आहेतच, परंतु मुंबईसारख्या शहरीं इतर धर्मांचे लोक देखील ( पारसी वगैरे ) शनिवारीं मारुतीस शेंदूर व तेल अर्पण करितांना दृष्टीस पडतात. मल्ल लोकांची मारुतीच्या ठिकाणीं पूर्ण भक्ति असते. हनुमंत हा वानर जातीचा अतएव माकड होता, असें समजून माकडांसही पूज्य मानण्यांत येतें. क्षेत्रांच्या ठिकाणीं मंदिरांच्या सभोवतीं हजारों माणसाळलेलीं माकडें यात्रेकरूंकडून यथेच्छ पाहुणचार घेत असतात. त्यांस फळें खावयास देणें, हें पुण्याचें कृत्य असें गणलें जातें. घरांत माकड शिरलें असतां अशुभ मानून शांतिहोम करतात. अशुभ मानण्याचें कारण हेंच कीं, वानरांनीं सुवर्णमय अशी लंकानगरी उध्वस्त केली. माकडांचा उपद्रव फार झाला तरी त्यांच्यावर बंदुक झाडून किंवा इतर प्रकारें त्यांचा वध करण्यास कोणी हिंदू तयार नसतो. वानराचा वध करणें हें मोठें पातक आहे असें समजतात.

## वानर हे कोण

यासंबंधाचें विवेचन मागें ( श्रीरामनवमी या सदराखालीं ) केलें आहे. त्यावरून दिसून येईल कीं, रामाच्या कालीं ही एक रानटी जात होती. आर्यांचा प्रवेश दक्षिण देशांत होण्यापूर्वीं ते या देशांत होते. त्यांचें राज्य व्यवस्थित असून किष्किंधा नगरी ही वानरराज्याची राजधानी होती. या जातींत मुत्सद्दी, लढवय्ये, सेनानायक अशा श्रेष्ठ दर्जाचे पुरुष होऊन गेले. वानरसेनेच्या जोरावर रामानें गर्विष्ठ रावणाचा लंकेस जाऊन पराजय केला. मारुतीनें आपल्या अतुल पराक्रमानें जी कीर्ति मिळविली, तिजमुळें तो चिरंजीव झाला. मारुती हा कोणत्याही प्रसंगीं न डगमगणारा सेनानायक असून त्याचा शब्द सर्व सेना शिरसावंद्य मानीत असे. राक्षसनगरींत जाऊन हेराचें काम करण्यांत त्यानें धाडसाची परमावधि केली. रावणाच्या सामर्थ्याची अटकळ बांधून त्याला कसें जेरीस आणावें यासंबधानें त्यानें रामचंद्रास सल्ला दिली. रावण सदाचारणानें वागता तर त्याला

राज्यभ्रष्ट करण्याचें कारण नव्हतें व स्वतंत्रता व राज्योपभोग यांचा आस्वाद घेत तो दीर्घ काल राहिला असता, अशा आशयाचे उद्गार मारुतीनें एकदां काढिले. यावरून तो राजनीतिज्ञ होता असें दिसतें. हनुमंताच्या अतुल पराक्रमाविषयीं रामायणांत जीं वर्णनें सांपडतात, त्यांत अतिशयोक्ति असली तरी एकंदरींत मारुती हा त्या कालचा एक वीर पुरुष होता, हें स्पष्ट होतें. मारुतीची व इतर प्राण्यांची व झाडांची पूजा हिंदुलोक करितात, यावरून त्यांच्यांत खऱ्या धर्मज्ञानाचा अभाव आहे, असें

## अन्यधर्मीय लोक

प्रतिपादन करीत असतात. माकड, सर्प, बैल, गाय वगैरे पशूंची, पिंपळ, वड, तुळस वगैरे झाडांची पूजा करणारे हिंदु महामूर्ख होत असें मत जाहीररीत्या सांगणारे अनेक धर्मोपदेशक स्वजनांत व परकीयांत आहेत. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या प्राण्यांची व वनस्पतींची पूजा कोणत्या कारणामुळें प्रचारांत आली, याचा विचार ते करीत नाहींत. सर्व सृष्ट पदार्थांमध्यें ईश्वराचा अंश आहे व ईश्वराच्या ठिकाणीं असणारे सत्व, रज, तम हे गुण ज्या पदार्थांमध्यें आहेत, ते कमीअधिक प्रमाणानें पूज्य आहेत अशी भावना पुराणकालीं हिंदूंच्या अंतःकरणांत दृढ झाल्यामुळें वरील प्रकारचीं दैवतें अस्तित्वांत आलीं. या देशांत अवतारमाहात्म्यामुळें विभूतिपूजेचें महत्व फार वाढलें. ज्यांच्याठायीं सत्य, न्याय, प्रेम, कर्तव्यनिष्ठा वगैरे गुण प्राधान्येंकरून वास करितात, त्यांची जात, कुल किंवा धर्म यांचा भेदाभेद लक्षांत न घेतां त्यांस ईश्वराचा अवतार असें मानावें म्हणून ज्या लोकांचीं पुराणें व इतर धर्मग्रंथ सांगत आहेत, त्यांनीं मारुतीस विभूतीच्या ठायीं मानून त्याला देवालयांत बसविलें, यांत आश्चर्य नाहीं. मारुती हा वानर म्हणून त्याची पूजा करण्यांत येत नसून तो वानर होता तरी त्याच्यांत दिव्य शक्ति होती, म्हणून तो वंद्य आहे, या भावनेनें त्याची पूजा केली जाते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा प्राचीन वीराविषयींचा आदरभाव सदा जागृत रहावा या हेतूनें हनुमान् जयंत्युत्सव करण्याची चाल या देशांत पडली. हनुमंताच्या

## चरित्रावरून बोध

काय घ्यावा हें प्रत्येक हिंदुधर्माभिमान्यानें पाहिलें पाहिजे. राजनिष्ठा व स्वामिनिष्ठा यांचा मारुती हा केवळ अवतार आहे. तो मूर्तिमंत राजनिष्ठा व स्वामि-

निष्ठा यांचा पुतळाच होय. स्वार्थत्याग, अखंड प्रेम, अलोट धैर्य व सामर्थ्य यांचें ज्यांना महत्व वाटतें, त्यांनीं या वीर पुरुषाचें जीवनचरित्र सदोदित आपल्या नजरेसमोर ठेविलें पाहिजे. या सर्व सद्गुणांचा व सामर्थ्याचा उगम त्याच्या ब्रह्मचर्यापासून झाला असें प्राचीन ग्रंथ सांगत आहेत. ब्रह्मचर्याचें महत्त्व जाणून तें शेवटपर्यंत सांभाळण्याचा व त्यायोगें आपल्या अंगीं दिव्य सामर्थ्य उत्पन्न करण्याचा मारुतीनें शेवटपर्यंत प्रयत्न केला. शरीरसामर्थ्याचा ऱ्हास झाला म्हणजे मनुष्याच्या हातून कोणतेंही प्रापंचिक किंवा पारमार्थिक कृत्य नीटपणें तडीस जात नाहीं हा रोजचा अनुभव आहे. ब्रह्मचर्यानें शरीरसामर्थ्याची वृद्धि होते, असें प्राचीनकालीं हिंदुलोक समजत असत. यासाठीं पूर्वकालीन अनुशासन-कारांनीं असा नियम घालून दिला कीं, मनुष्यानें आपल्या आयुष्याचे तीन भाग ब्रह्मचर्यावस्थेंत काढावे व एक भाग तेवढा गृहस्थाश्रमांत संयमनपूर्वक विषयांचा उपभोग घेण्यांत खर्च करावा. आयुष्याचीं पहिलीं पंचवीस वर्षें ब्रह्मचर्यांत काढावीं. पुढें पंचवीस वर्षें प्रापंचिक या नात्यानें पत्नीच्या सहवासांत विषय-सेवन करून पुनः तेवढींच वर्षें वानप्रस्थ व संन्यास या अवस्थेंत घालवावीं. रामायण महाभारतकालीं या चार आश्रमांचा सर्वच अवलंब करीत, असें जरी म्हणतां येत नाहीं तरी बऱ्याच कालापर्यंत पुरुष कडकडीत ब्रह्मचर्य पाळीत असें दिसतें. उपनिषद्कालींही ब्रह्मचर्यासंबंधानें लोकांत अत्यंत आदरभाव वसत होता. ( यासंबंधाची विशेष माहिती ‘ श्रावणी ’ या सणाच्या विवेचनांत पहावी. ) यज्ञ, इष्टा ( पूजा ), सत्त्रायण ( मुनि व दीनदुबळ्यांस अन्न-दान ), मौन, अनाशकायन ( उपोषण ) व अरण्यायन ( अरण्यवास ) यांपेक्षां ब्रह्मचर्य हें श्रेष्ठ दर्जाचें आहे, असें छांदोग्यांत सांगितलें आहे. ( छां. उप. अ. ८–५ ) उपनिषद्कालानंतर बौद्धधर्माची स्थापना झाल्यावर धर्मोपदेश करीत फिरणाऱ्या भिक्षूंचा वर्ग बुद्धानुशासनाप्रमाणें तयार झाला. धर्मकार्यार्थ आजन्म अविवाहित राहणारे हजारों भिक्षु व भिक्षिणी त्या कालीं देशांत मठ बांधून जागो-जागीं राहिल्या होत्या. यांच्याकडून धर्मोपदेशाचें काम चाले.बौद्धधर्मीय रीतिभातींचें अनुकरण हिंदुधर्मीयांनीं अनेक परीनें केलें. यामुळेंच आजन्म अविवाहित राहून संन्यास धारण करण्याची रूढि पडली असावी. परंतु त्या कालचे सर्वसंगपरित्याग करून धर्मसंबंधी विचार करण्यांत आयुष्य घालविणारे संन्यासी फार योग्यतेचे व समाजास पूज्य असे असत. असेंही असण्याचा संभव आहे कीं, श्रीशंकरा-चार्यांनीं बौद्धधर्माचें खंडन करून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केल्यावर अनेक

बौद्धधर्मीय भिक्षु व प्रापंचिक लोक पुनः हिंदु बनले; तेव्हां सहजच हजारों भिक्षूंनीं वैदिक धर्मानुसार संन्यासग्रहण केलें असावें. त्यामुळेंच या देशांत संन्याशांचा पंथ व भरणा वाढतां आजमितीस त्यांची संख्या पन्नास लक्षांवर आली आहे. एखाद्या स्वच्छ पाण्याच्या तलावाला ज्याप्रमाणें शेवाळ नासून टाकतो, त्याप्रमाणें ह्या संन्याशांनीं धर्म, नीति व ज्ञान यांस बिघडवून टाकिलें आहे. त्यांच्यांत कमलपुष्पाप्रमाणें शोभा देणारे कांहीं संन्यासी सांपडतात ही मात्र त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. असो. एकंदरींत पहातां ज्या कारणांवरून ब्रह्मचर्य व संन्यास यांचें महत्व प्राचीन कालीं वाढलें, त्यांचा विचार करण्याचें हिंदुसमाजानें सोडून दिल्यामुळें त्यास उतरती कळा लागली यांत संशय नाहीं. शुक्राचार्य यांजपाशीं संजीवनी विद्या होती व तिच्या योगानें त्याचे शिष्य जे राक्षस ते देवांस चित करीत अशी पुराणांतील कथा आहे. ही संजीवनी विद्या म्हणजे शुक्र-रक्षण किंवा ब्रह्मचर्य पालन असें कां समजूं नये ? राक्षसांस पूर्व देव अशी संज्ञा असून ते ब्रह्मचारी असत असें मनूनें सांगितलें आहे. ब्रह्मचर्यामुळें सदा शक्तिमान् असलेल्या राक्षसांनीं देवांगनाबरोबर धुमाकुळ घालणाऱ्या देवांचा पाडाव केला तर त्यांत नवल तें काय ?

## ब्रह्मचर्याचें महत्व

दर्शविणारीं अनेक उदाहरणें पुराणांत व इतिहासांत सांपडतात. मेघनादाचा म्हणजे इंद्रजिताचा पराभव करण्यास जो वीर पुरुष पुढें आला त्यानें बारा वर्षें कायावाचामनेंकरून कडकडीत ब्रह्मचर्य पाळल्याचें रामायणांत सांगितलें असून हें शूरत्वाचें कृत्य करण्याचें सामर्थ्य लक्ष्मणाच्या अंगीं फक्त ब्रह्मचर्यामुळें आलें असें दर्शविलें आहे. भीष्मपितामह यानें ब्रह्मचर्याच्या जोरावर काळास जिंकलें व तो इच्छामरणी झाला. वनिताविलासांच्या तावडींत सांपडतांच मनुष्य निःसत्व बनतो याचें उदाहरण कुरुक्षेत्रीं पतन पावलेला अभिमन्यु आहे. ज्या ठिकाणीं हिंदूंच्या स्वातंत्र्याची प्रथमाहुति देण्यांत आली, त्या समरांगणीं जाण्यास जेव्हां पृथ्वीराज निघाला, तेव्हां त्याच्या कमरेचा शेला त्याच्या पत्नीनें आवळला अशी आख्यायिका आहे. अर्थात विषयवासना शौर्याचा नाश करिते याचें हें एक उदाहरण होय. जो विषयवासनांस जिंकून स्वजनोद्धारासाठीं खपतो, तोच खरा जन्मला. कालेंकरून तो मृत्युमुखीं पडल्यावर ‘ तो मेला ’ असें व्यवहाराच्या भाषेंत जरी आम्ही म्हणतों तरी तो कीर्तिरूपानें चिरंजीवच होऊं शकतो. यास हनुमंताचें चरित्र

साक्ष देत आहे. ब्रह्मचर्य व संन्यासवृत्ति यांचा सदुपयोग केला असतां, समाजाचें पाऊल योग्यमार्गात पडेल असें करण्यास, एखादी अल्पायुषी व्यक्ति देखील कशी समर्थ होते, हें सुप्रसिद्ध बुद्ध व शंकराचार्य यांच्या कर्तबगारीकडे पाहिल्यावर समजून येणार आहे. अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यांत बौद्धधर्मास पादाक्रांत करून अनेक विद्वत्ताप्रचुर ग्रंथ रचणारे श्रीशंकराचार्य खरोखरच धन्य होत. परंतु आजकाल हनुमज्जयंती साजरी करण्याला पुढें येणारे आम्ही स्वतःच्या कर्तव्यापासून च्युत झालों आहों. कांहीं कालपर्यंत तरी ब्रह्मचर्य पाळण्याचें एकीकडेच राहिलें. उलट बालविवाहादिक चालींच्या मगरमिठींत सांपडून समाजाची हानी होत चालली आहे, याबद्दल आम्हां हनुमंतभक्तांना कांहींच वाटत नाहीं. बालमाता, बालपिता, बालविधवा व बालविधुर, नेभळीं बालकें व निरुत्साही प्रजा यांची संख्या कमी होऊन देशांत शारीरिक, नैतिक व बौद्धिक तेजाचा प्रादुर्भाव व्हावा, सर्व समाज कर्तव्यनिष्ठ व सन्मार्गगामी बनावा, असें ज्यांस अंतःकरणपूर्वक वाटतें, त्यांनीं सदभिमानपूर्वक आपल्या बंधुभगिनी हनुमंताप्रमाणें परम प्रतापी, तेजःपुंज व कीर्तिरूपानें चिरंजीव होतील असें करण्याचा प्रयत्न चालविला पाहिजे. तरुण पिढीस कांहीं कालपर्यंत शुद्ध ब्रह्मचर्य पाळण्याचें महत्त्व समजावून देणारे गुरु ज्या दिवशीं पुढें येतील तेव्हांच आमचें पाऊल पुढें पडत जाईल. दरसाल प्राप्त होणाऱ्या या हनुमज्जयंतीमुळें व सर्वत्र दृष्टीस पडणाऱ्या मारुतीरायाच्या देवालयांमुळें आम्हांस कर्तव्यनिष्ठा व ब्रम्हचर्य यांबद्दलचें प्रेम उत्पन्न होईल, तर हा उत्सवदिन प्रचारांत आणणाऱ्या पूर्वजांनीं आमच्यावर उपकार केला असें आम्ही म्हणूं.

## मारुतीस्तवन.

### श्लोक.

स्वामीसेवक जन्मला न दुसरा निष्ठा जयाची अती ।
भीती, कष्ट न ज्यासि जिंकुं शकले तो वंदुं या मारुती ॥
मूर्तिमंत महीवरी अवतरे हा स्वामिनिष्ठा गमे ।
सेवाधर्म किती असे गहन हें दावी जनां विक्रमें ॥ १ ॥

लाभे जन्म तयासि मर्कटकुलीं, अज्ञानि लोकांसवें ।
झाला थोर, परी धरी रघुपदा तेणें डुले वैभवें ॥
विद्या, बुद्धि, सुनीति यांहिं नटला श्रीरामलाभामुळें ।
आत्मोद्धार असा करोनि चकवी शत्रूंसि तेजोबळें ॥ २ ॥

शक्ती, साहस, ब्रह्मचर्य, गुण जे वाखाणिती सज्जन ।
ते घेऊं गुण मारुतीपरि सदा होऊं जगीं पावन ॥
संपादोनि जसा गुणें हरिकृपा झाला चिरंजीव हा ।
तेवीं आपण जन्ममृत्यु चुकवूं ब्रह्मत्व सेवूं महा ॥ ३ ॥

वंदूं मारुति ब्रह्मचारि नमुं या श्रीरामभक्ता सदा ।
धीरोदात्त असें चरित्र पढतां जाईल ती आपदा ॥
चित्तीं ध्येय सदैव श्रेष्ठ असतां सत्कार्य हातीं घडे ।
साधूठायिं जडे सुभक्ति पदही सन्मार्गिं नेमें पडे ॥ ४ ॥

नीती, सद्गुण, भक्ति, विक्रम, दया यांहीं विभूषीत जो ।
रुद्राचा अवतार ज्यासि ह्मणती श्रीमारुती वंदुं तो ॥
दावोनी सुपथा मनीं उपजवो सत्प्रेम रामापदीं ।
धीराचा पुतळा प्रतापि हनुमान् स्थापूं तयातें हृदीं ॥ ५ ॥

# वैशाख महिना.

—————:०:—————

वैशाख हा महिना इंग्रजी मे महिन्याच्या सुमारास येतो. वसंतऋतूंत जरी याचा समावेश केला आहे, तथापि ग्रीष्मऋतूचा तीव्र उन्हाळा या महिन्यांत भासत असल्याकारणानें हिंदुधर्मशास्त्रकारांनीं जीं व्रतवैकल्यें या महिन्यांत करावीं असें सांगितलें आहे, तीं सर्व या महिन्यास योग्य अशींच योजिलीं आहेत. प्रातः-स्नान, धर्मकुंभाचें दान, गंधपुष्पमाला, पन्हीं, केळीं इत्यादिकांच्या योगानें वसंतपूजा, पाणपोईच्या द्वारें जलदान वगैरेंची योजना या उन्हाळ्याच्या दिवसांस साजेशीच आहे. या महिन्यांत पितृतर्पण, अश्वत्थप्रदक्षिणा, एकभुक्त, नक्त व अयाचित व्रतें यांचेंही महत्व फार वर्णिलें आहे. देवतांच्या मूर्ति पाण्यांत बुडवून ठेवाव्या, त्यांच्यावर उदकाची गळती बांधावी, पंखा, छत्री, उपानह, चंदन यांचें दान करावें, असेंही सांगितलें आहे. वसंतपूजेचे उत्सव अनेक देवालयांतून होतात; त्यांतही पुढील तीन उत्सवांस विशेष महत्व प्राप्त झालें आहे. हे तीन उत्सव म्हटले म्हणजे अक्षय्य तृतीया, परशुरामजयंति व नरसिंह-जयंति हे होत.

वैशाख शु॥ १ स बंगालांत वसू बारस नांवाचा सण पाळतात. पूर्वेकडील भागांत हाच सण ज्येष्ठ शु॥ २ येस साजरा केला जातो. या दिवशीं स्त्रिया, गायी व वासरें यांची पूजा करतात. आणि त्या दिवशीं दूध, दहीं ताक, तूप वगैरे गायी पासून प्राप्त होणाऱ्या पदार्थांस व गव्हांस शिवत देखील नाहींत. वैशाख शु॥ २ येस कृत किंवा सत्य युगाचा आरंभ होतो असें मानतात. हाच दिवस अक्षय्य तृतीया या नांवानें प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रांत हा त्रेतायुगाचा आरंभाचा दिवस असें मानतात. या दिवशीं परशुराम जयंति पाळण्यांत येते. वैशाख शु. ९ मीस बंगालांत सीता नवमी असें म्हणतात. या दिवशीं सीता भूमींत सांपडली होती म्हणून या दिवशीं भूमिदान करणें फार श्रेयस्कर मानलें जातें. सीता देवी ही या देशांत फार श्रेष्ठ मानिली जाते. परंतु हिच्या प्रीत्यर्थ बंगालच्या कांहीं भागाशिवाय इतर ठिकाणीं कोणताही दिवस पाळलेला दिसत नाहीं, हें आश्चर्य आहे. शु. १४ हा नृसिंह जयंतीचा दिवस आहे. पौर्णिमेस कूर्म जयंति होते. भागवतांत, विष्णूनें कूर्मावतार घेऊन पृथ्वी आपल्या पाठीवर घेतली व तिचें रक्षण केलें अशी कथा आहे. शतपथ ब्राह्मणांत, प्रजापतीनें कूर्माचें रूप धारण करून सर्व प्राणिमात्र उत्पन्न केले असें सांगितलें आहे. विष्णु देवांलयाच्या समोर कधीं कधीं दगडावर कूर्माचें चित्र खोदलेलें दृष्टीस पडतें. विष्णूच्या देवालयांत मात्र हा दिवस पाळला जातो.

———

## अक्षय्य तृतीया.

वैशाख शु॥ ३ येला अक्षय्यतृतीया असें नांव आहे. या दिवशीं जप, होम, पितृतर्पण, दान इत्यादिक जें कांहीं करावें तें सर्व अक्षय होतें. ही तृतीया रोहिणी नक्षत्रयुक्त बुधवारीं असल्यास महापुण्यकारक आहे असें मानलें जातें. अक्षय्य तृतीया हा दिवस कृतयुगाचा आरंभदिन आहे. वास्तविक पाहतां हा दिवस उत्सवांत गणतां येईल कीं काय, याबद्दल प्रश्न आहे. कारण फक्त स्त्रिया मात्र या दिवसाला महत्त्व देऊन या दिवशीं भटजीस उदककुंभ, पन्हें वगैरे दान देतात. पुरुषांनीं या दिवशीं युगादि श्राद्ध अपिंडक करावें. निदान मृत पितरांबद्दल तिलतर्पण तरी करावें असें शास्त्रांत सांगितलें आहे. शहरांत कामधंद्यांत चूर असलेले गृहस्थ हा विधि पाळीत असल्याचें दिसून येत नाहीं. परंतु महाराष्ट्र व इतर ठिकाणच्या धार्मिक घराण्यांत तिलतर्पण करण्याची चाल आहे. वर्षांतील साडेतीन सण मुख्य असून त्यांपैकीं अक्षय्य तृतीया हा अर्धा सण आहे असें शास्त्र सांगतें. बुधवारीं रोहिणी नक्षत्रांत चंद्र असल्या वेळीं ही तिथि असल्यास ती अत्यंत शुभ मानतात. या दिवशीं त्रेतायुगास प्रारंभ झाला असें महाराष्ट्रांत गणतात व उत्तर हिंदुस्थानांत हा दिवस सत्य युगाचा आरंभ दिन आहे असें समजतात. बंगाल ओडीसा प्रांतांत या वेळीं चंदन यात्रा भरते व ती तीन आठवडे चालू असते. चंदनाच्या तेलानें सुवासिक केलेले पंखे व फुलें ब्राम्हणांस दान देतात. पुरी येथें मदन मोहनाची मूर्ति रोज पालखींतून नरेंद्र तलावाकडे वाजत गाजत नेऊन नौकेंत बसवून तलावांत फिरवितात. चंदनाचें तेल चोळून तिला स्नान घालतात. चिपळूण येथें अक्षय्य तृतीयेस परशुरामाप्रीत्यर्थ मोठी जत्रा भरते. दक्षिण हिंदुस्थानापेक्षां उत्तर देशीं व बंगालाकडे हा सण फार आस्थेनें पाळला जातो.

## धार्मिक विधी.

हा सण विष्णूप्रीत्यर्थ आहे. पितृस्वरूपी जनार्दनास ब्राह्मणद्वारा उदककुंभदान द्यावें. वसंतमाधवाची पूजा करून वसंतदेवतेप्रीत्यर्थ तृषाशमनार्थ उदककुंभाचें दान द्यावें. गतभर्तृका स्त्रियांनीं नवीन मृत्तिकाघटांतून निर्मल व थंड पाणी व पन्हें ब्राह्मणांस अर्पण करावें. ही तिथि पूर्वाण्हव्यापिनी घ्यावी. दोनही दिवशीं पुर्वाण्हव्यापिनी असल्यास दुसरी घ्यावी. हा दिवस श्राद्धस्वरूप

असल्यामुळें जीवंत पितृकांचा, मुलांचा व सौभाग्यवती स्त्रियांचा या दानांशीं व श्राद्धाशीं संबंध नाहीं. पितरांप्रीत्यर्थ रात्रौ उपोषण करावें व शिवाची पूजा करावी.

## चालू रूढि.

हा दिवस इतर महत्वाच्या सणांप्रमाणें विशेष उत्सवानें कोणी पाळीत नाहीं. तरी अक्षय्यतृतीया ही तिथि इतर तृतीयांहून श्रेष्ठ मानतात. भाद्रपद शु० ३ स हरितालिका व्रत यापेक्षां विशेष प्रचारांत आहे. कांहीं जण अक्षय्य तृतीयेला आखाजी किंवा आखेती असें म्हणतात. या दिवसाच्या शुभमुहूर्तावर कोंकणांत शेतकरी लोक पेरणी करतात. चैत्र महिना हा वसंतकालाचा आरंभ असून चैत्र शु० ३ ये पासून अक्षय्य तृतीयेपर्यंत वसंतगौरीचा उत्सव सर्व देवींच्या देवालयांत चालत असतो. या उत्सवास चैत्रा गौरी व दोलोत्सव असें नांव आहे. या उत्सवांत वसंतकालास योग्य असेच नृत्यगायनादिक विधि व वसंतपूजा करण्यांत येत असून स्त्रीपुरुषांचा समुदाय देवालयांत एकत्र होत असतो. या उत्सवाची परिसमाप्ति अक्षय्य तृतीयेच्या दिवशीं होत असल्यामुळें माहेरीं आलेल्या गौरी त्या दिवशीं सासरीं जाण्यास निघणार आहेत असें मानून स्त्रिया हळदीकुंकवाचा समारंभ आपआपल्या परी सौभाग्यवती व कुमारिका मैत्रिणींच्या समागमांत मोठ्या आनंदानें साजरा करितात. श्रीकृष्णाच्या देवालयांत देखील वसंतोत्सव साजरा करण्यांत येत असून मथुरा, वृंदावन, अयोध्या, काशी, द्वारका, डाकोरनाथ वगैरे ठिकाणच्या देवालयांत तसेंच दक्षिण हिंदुस्थानांत अनेक देवींच्या देवालयांत वसंतोत्सव फार प्रेक्षणीय होतो.

## गुजराथेंत

अक्षय्यतृतीयेला आखातरी असें म्हणतात. श्रावण पौर्णिमेला समुद्र शांत होतो अशी ज्याप्रमाणें कोकणांत समजूत आहे त्याप्रमाणे या तिथीपासून समुद्र उचंबळतो अशी गुजराथेंतील लोकांची समजूत असून जलपर्यटण करणें धोक्याचें आहे असें ते मानतात. द्वितीयेच्या दिवशीं खेड्यापाड्यांतील लोक गांवाबाहेर धान्य, कापुस, साखर वगैरे जिनसांची मांडणी करून तेथेंच एक तांब्याचें नाणें ठेवतात. याला ' राजा ' असें म्हणतात. व जवळच ठेवण्यांत येणाऱ्या सुपारीला ' दिवाण ' अशी संज्ञा आहे. एकंदर रचना फार व्यवस्थेशीर करण्यांत येत असल्यामुळें या भागास अल्पकाल थोडेंसें शहराचें स्वरूप प्राप्त होतें. दुसऱ्या दिवशीं खेडवळ लोक आपल्या या नवीन शहराची

व्यवस्था कशी काय आहे हें पाहण्यास येतात व मुंग्यांनीं धान्यास वगैरे कमी अधिक मानानें त्रास दिला असेल त्यावर पुढील पिकांचें भविष्य वर्तविलें जातें. उदाहरणार्थ, एखाद्या धान्यास मुंग्या लागल्या किंवा तें वाहून नेलें असलें तर तें धान्य पुढील सालीं महाग होईल असें समजतात. सदरहु धान्याचें पीक चांगलें येणार नाहीं असेंही मानण्यांत येतें. पैसा किंवा सुपारी यांना मुंग्यांपासून त्रास झाला असल्यास राजा व प्रधान यांस त्रास पोहोंचेल असें मानतात. ज्या दिशेनें कापूस नेला असेल त्या दिशेकडील लोक कापसाची निगत विशेष करतील असें भविष्य वर्तविण्यांत येतें. गुजराथेपेक्षां मारवाडांत ही चाल विशेष आहे. अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं कुणबी वाणी वगैरे लोक उदकानें भरलेल्या घड्यावर खरबूज किंवा दुसरें एखादें फळ ठेवून तो घडा ब्राह्मणास दान देतात. श्राद्ध करण्याचा परिपाठ नाहीं. एकंदरींत पाहतां हा सण वर्षाकालाच्या आरंभींचा व नवीन पिकें कशीं येतील हें अजमावण्याचा आहे असें सामान्यतः तेथील लोक मानतात असें दिसतें.

## हेतु व बोध.

प्राचीन शास्त्रकारांनीं जे अनेक सण प्रचारांत आणिले ते सामाजिक असले तरी त्यांस धार्मिक स्वरूप प्राप्त झालें असल्यामुळें त्यांना विशेष कोणी मानीत नाहीं असें झालें आहे. सामाजिक प्रगतीच्या दृष्टीनें त्यांचें महत्व किती आहे, हें लोक समजून घेतील तर किती तरी हित होण्याजोगें आहे. हे सण प्रचारांत आले त्या वेळीं त्यांची तरफदारी करून ते लोकमान्य होतील असें करणाऱ्यांच्या अंतःकरणांतील हेतुच लोक विसरून गेले असून अल्पसा स्वार्थ साधतो इतक्याचसाठीं भटजींनीं त्यांचें अस्तित्व कायम राखण्याचा प्रयत्न केला नसता तर त्यांतील कित्येक नामशेषही झाले असते. हल्लींच्या कालीं अशा धर्मसंबंधीं कृत्यांची मातब्बरी लोकांस वाटत नसल्यामुळें त्यांस योग्य वळण देऊन, समाजाच्या प्रगतीस असे सण आवश्यक आहेत, हें जनतेस दाखवून न दिल्यास ते अल्पकालांत नामशेष झाल्याशिवाय रहाणार नाहींत. असो. प्राचीनकालीं ग्रीस, बेबिलोनिया, इंग्लंड वगैरे देशांत वसंतदेवीप्रीत्यर्थ उत्सव होत असत. हल्लीं ख्रिस्ती लोक ईस्टर नांवाचा सण या ऋतूंत जो मोठ्या उत्साहानें पाळतात, तो मूलतः वसंतोत्सव होता असें कित्येकांचें मत आहे. वसंतऋतु हा सर्व ऋतूंत अत्यंत आल्हाददायक असून त्या कालीं सर्व सृष्टींत नवीन तेज दृग्गोचर होतें

सृष्टिदेवतेस यौवनावस्था प्राप्त झाल्यामुळें तिच्या कविभक्तांस गीतें रचण्यास व गाण्यास स्फूर्ति येते. कौमार्यावस्थेंत माहेरीं असलेल्या वसंतगौरी यौवनावस्था प्राप्त होतांच अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर श्वशुरगृहीं जातात; असें म्हणण्याचा अर्थ तरी हाच आहे कीं या सुमारास सृष्टींतील झाडें वैवाहिक स्थितीचा उपभोग घेऊन फलद्रूप होतात. चैत्रारंभीं आम्रादिक वृक्षांना लुसलुशीत पालवी व सुंदर फुलें येऊं लागतात. वैशाख महिन्याच्या आरंभीं त्यांना फळें दृष्टीस पडतात व कित्येक पक्षी व फुलपांखरें त्यांच्यावर उपजीविका करून मोठ्या आनंदानें दिवस घालवितात. अर्थात् सृष्टिदेवतेस यौवन व मातृत्व प्राप्त होतें व श्वशुरगृहीं जाण्यास ती योग्य होते. यावरून दिसून येईल कीं, या सात्विक प्रणयोत्पादक व आनंददायक कालास देवतेच्या स्थानीं मानिलें आहे. स्त्रियांनीं या वेळीं हळदकुंकवाचा समारंभ करावा, सौभाग्यालंकारांनीं नटून त्यांनीं एकमेकांस सौभाग्यद्रव्यें प्रेमानें द्यावीं, दुर्दैवानें ज्या पतिसुखास अंतरल्या त्यांनीं तृषितांस पन्हें वगैरे देऊन संतुष्ट करण्यांत आनंद मानावा, असें प्राचीन आर्यांनीं ठरविलें. असे उत्सव म्हणजे सामाजिक दळणवळण व प्रेम वाढविण्याचे सोपे उपाय होत. गरीब श्रीमंतांच्या भेटी होऊन एकमेकांत सहानुभूति व प्रेम वाढण्यास हे हळदकुंकवासारखे समारंभ कारणीभूत होतात. शिवाय लहान वयाच्या मुलींस वयोवृद्ध व अनुभवी स्त्रियांकडून शिस्त शिकण्यास हे प्रसंग बऱ्याच अंशीं साधन होणार आहेत. म्हणून असे प्रसंग घडवून आणणें श्रेयस्कर आहे.

देवालयांतून व इतरत्र असे उत्सव साजरे केल्याच्या योगानें जातीजातींत प्रेमभाव जागृत होतो. या प्रसंगीं हजर राहण्याचा ब्राह्मणाप्रमाणें महारासही अधिकार असल्यामुळें देवालयांत व बाहेर आपआपल्या दर्जाप्रमाणें सर्व वर्णांचे लोक एकत्र झालेले पाहून चित्तास मोठा आनंद वाटतो. प्रत्येक खेड्यांत सध्यां प्रचलित असलेले सामाजिक नियम लक्षांत घेतां ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चांभार, महार वगैरे अत्यंत हीन मानलेल्या जाती या सर्वांस प्रत्येक धार्मिक, सामाजिक व राजकीय बाबींत ठरींव काम करावयाचें असतें. या दृष्टीनें पहातां जुन्या काळीं उत्पन्न झालेल्या कांहीं रूढींच्या मुळाशीं सामाजिक स्वास्थ्य राखण्याबद्दलची कळकळ दिसून येते. हल्लींच्या काळीं सुशिक्षित स्त्रियांनीं असे सण प्राप्त होतांच आपल्या जवळपास रहाणाऱ्या गरीब व अज्ञानी भगिनींस निमंत्रण करून त्यांच्याशीं सख्य वाढविल्यास व त्यांच्या गरजा काय आहेत हें समजून घेऊन त्या भागविण्याचा यथाशक्ति प्रयत्न केल्यास किती तरी चांगलें होणार आहे.

वैशाखाच्या आरंभीं उन्हाळ्याची तीव्रता भासूं लागतांच तृषितांस उदक देणें हें पुण्य कार्य आहे असें ठरवून उदककुंभ ( उदकुंभ ) देण्याच्या विधीचा शास्त्रकारांनीं धार्मिक कृत्यांत समावेश केला. अत्यंत प्राचीन कालीं देखील पाणपोईच्या द्वारें जागोजागीं जलपानाची सोय केलेली असे, हें हरिश्चंद्र राजाच्या कथेवरून दिसतें. तृषेनें व्याकुळ झाल्या वेळीं देखील आपल्या सत्त्वास हानी येईल या भीतीनें त्यानें पाणपोईचें पाणी पिण्याचें नाकारिलें, अशी गोष्ट आहे. ही पाण-पोई ठेवण्याची चाल हिंदुस्थानांत सर्वत्र आहे. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत रहदारीच्या रस्त्यावर या दिवशीं पांथस्थांना पिण्याकरितां पाणी दिलें जातें. उन्हाळा प्राप्त होतांच पिंपळाच्या पारावर एखाद्या गरीब ब्राह्मणास कांहीं वेतन देऊन बसवून ठेवण्यांत येतें. तो तृषितांस गूळपाणी देतो. यासंबंधाचा खर्च धनिक लोक करितात. गुरांना पाणी पिण्याची सोय अनेक ठिकाणीं केलेली असते. पांथस्थांची तृषा शांत करणें, तान्हेलेल्या मुक्या जनावरांस पाणी पाजणें, हीं कामें अगदीं गरीब स्थितींतल्या माणसांसदेखील सहज करतां येण्याजोगीं आहेत. मातापितरांनीं तर लहान मुलांमुलींस परोपकाराचा ओनामा घालून देण्यास अक्षय्यतृतीयेचा मुहूर्त उत्तम आहे.

---

# परशुरामजयंति.

अधर्मानें वागून लोकांस त्रास देणाऱ्या दुर्जनांचा संहार करण्यासाठीं व भयं-कर संकट प्राप्त झालें असतां त्यांतून साधुजनांची मुक्तता करण्याकरितां वेळो-वेळीं जे दिव्य पुरुष निर्माण झाले, त्यांची परमेश्वराच्या अवतारांत गणना करून त्यांच्या जन्मदिवसांचा उत्सव साजरा करण्याची चाल हिंदुधर्मशास्त्रकारांनीं पाडिली. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांनीं युक्त अशा परमेश्वरी शक्तीपैकीं विश्वाचें पालनपोषण करणाऱ्या सात्विक शक्तीची द्योतक अशी जी देवता श्री विष्णु तिचेच हे अवतार असल्याचें पुराणकारांनीं सांगितलें असून असे अव-तार आजपावेतों नऊ झाले. दहावा कलंकीचा अवतार अधर्माचें उच्चाटन करून धर्मसंस्थापना करण्यासाठीं पुढें येणार असून त्याच्यासंबंधानें प्राचीन धर्मग्रंथांत अनेक परीनें भविष्य वर्तविल्याचें दिसून येतें. या अवतारमालिकेंतला परशुराम हा सहावा वीर पुरुष आहे.

परशुरामाचा जन्म वैशाख शु. ३ येस पुनर्वसु नक्षत्रावर रात्रीच्या प्रथम प्रहरीं झाला. परशुरामाचें अवतारकार्य म्हटलें म्हणजे क्षत्रियकुलाचा नाश करणें हें होय. भागवतादि ग्रंथांवरून असें दिसतें कीं पुरुरव्याच्या वंशांत ऋचिक नामक ब्राह्मणाचा गाधि नांवाच्या क्षत्रियकन्येशीं विवाह झाला. तिच्या उदरीं जमदग्नि ऋषि जन्मास आला. हा महाब्रह्मज्ञानी होता; परंतु तो अत्यंत तापट स्वभावाचा होता. योग्यकालीं एका क्षत्रियकन्येशीं त्याचा विवाह होऊन त्याला सहा पुत्र झाले. त्यांपैकीं शेवटचा जो राम तोच पुढें परशुराम या नांवानें प्रसिद्धीस आला. यानें सर्व युद्धांत परशूचा उपयोग करून शत्रुसंहार केल्यामुळें दाशरथी रामाहून तो भिन्न आहे असें दाखविण्यासाठीं त्याला परशुराम हें नांव पडलें. प्राचीन काळीं निरनिराळ्या योद्धयांनीं भिन्न भिन्न शस्त्रास्त्रांचा उपयोग केल्याचें दिसतें. श्रीकृष्णाचें सुदर्शनचक्र, भीमाची गदा, बलरामाचा हल (नांगर), श्रीरामाचा चापबाण, अर्जुनाचें गांडीव धनुष्य, जमदग्निपुत्र रामाचा परशु हीं शस्त्रें प्रसिद्ध आहेत.

ज्या वेळीं परशुराम जन्मास आला, त्यावेळीं आर्यावर्तांत क्षत्रिय फार उन्मत्त झाले होते. क्षत्रिय व ब्राह्मण यांच्यांत जरी शरीरसंबंध होत असे, तथापि ब्राह्मणांस आपण ब्रह्मज्ञानवेत्ते म्हणून ज्याप्रमाणें मोठेपणा वाटत असे, तद्वत क्षत्रियांना आपण राजवंशी व अधिकारसंपन्न असल्याबद्दल गर्व होता. याचा परिणाम असा होई कीं उभय पक्षांत वारंवार भांडणें होत असत. सहस्रार्जुन कार्तवीर्य हा महिष्मती नगरीचा क्षत्रियराजा ब्राह्मणद्वेष्टा होता. ( महिष्मती हें सध्यांचें नर्मदा तीरावरील ओंकारेश्वर असल्याचें सांगतात. ) त्यांच्या उद्गारांवरून या उभय वर्णांत किती वैमनस्य होतें हें समजून येणार आहे. कार्तवीर्य म्हणत असे कीं—

ब्राह्मणाः संश्रिताः क्षत्रं न क्षत्र ब्रह्मणाश्रितम् ।
श्रिता ब्रह्मोपधा विप्रा खादन्ति क्षत्रियान् भुवि ॥
क्षत्रियेष्वाश्रितो धर्मः प्रजानां परिपालनम् ।
क्षत्राद्वृत्तिर्ब्राह्मणानां तैः कथं ब्राह्मणो वरः ॥

—१५३—१७।१८.

अर्थः—" ब्राह्मण क्षत्रियांचे आश्रित असून क्षत्रिय ब्राह्मणांवर अवलंबून नाहींत. क्षत्रियांवर ब्राह्मण चरतात. अर्थात् क्षत्रियच श्रेष्ठ होत. धर्माचें परिपालन व प्रजेचें रक्षण क्षत्रियांमुळेंच होतें. असें असतां ब्राह्मण श्रेष्ठ कसे होतील ?" अशा विचारांमुळें उन्मत्त झालेल्या सहस्रार्जुनानें ऋषिजनांस अनेक परीनें त्रास दिला. त्यानें एकदां जमदग्नीच्या आश्रमांत जाऊन त्याची कामधेनु हरण

केली. हें उन्मत्तपणाचें कृत्य परशुरामास सहन न होऊन त्यानें सहस्रार्जुनास व त्याच्या परिवारास ठार केलें आणि कामधेनु परत आणिली. हें वर्तमान ऐकून जमदग्नीस वाईट वाटलें. त्या ब्रह्मवेत्त्या ऋषिवर्यानें मुलास जवळ बोलावून म्हटलें, 'बाळा, तूं महान् पराक्रमी आहेस खरा; परंतु देवतांच्या ठिकाणीं असलेल्या राजाचा तूं वध केलास हें योग्य नव्हे. ( अभिषिक्त राजा प्रत्यक्ष विष्णु आहे, हा समज या देशांत फार प्राचीन काळापासून आहे. ) ब्राह्मणांची योग्यता त्यांच्या अंगांतील दया, क्षमा, सत्य, शांति वगैरे गुणांवर अवलंबून आहे. क्षमा हें ब्राह्मणाचें मुख्य भूषण होय. तुझ्याकडून राजवधाचें जें महत्पातक घडलें, त्याच्या क्षालनार्थ तूं तीर्थयात्रा करावी हें योग्य आहे." हा उपदेश शिरसावंद्य मानून परशुराम तीर्थयात्रेस गेला व तीर्थाटन संपवून एक वर्षानें स्वगृहीं आला. परशुराम पितृवचन परिपालन करणारा असल्यामुळें त्यानें पित्याच्या आज्ञेवरून आपली माता रेणुका हिचा शिरच्छेद केला. आपल्या पत्नीकडून पातिव्रत्यास कलंक लागण्याजोगें कृत्य घडलें, असें जमदग्नीस वाटतांच त्यानें परशुरामास तिचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. पुढें त्याच्या विनंतीवरून तिला जमदग्नीनें जिवंत केलें.

कांहीं कालानंतर सहस्रार्जुनाच्या मुलांनीं आपल्या पित्याचा वध केल्याबद्दल सूड उगविण्याच्या हेतूनें जमदग्नि ध्यानस्थ बसल्या वेळीं त्याचा त्यांनीं शिरच्छेद केला; तेव्हां रेणुकेनें एकवीस वेळां वक्षस्थळ बडवून आकांत केला. म्हणून तेवढ्याच वेळां क्षत्रियांचा संहार करून पृथ्वी निःक्षत्रिय करीन, अशी परशुरामानें शपथ वाहिली. त्यामुळें असंख्य क्षत्रिय त्याच्या परशूस बळी पडले. क्षत्रिय घाबरून गेले. पुढें रामचंद्रानें बालवयांत सीतेच्या स्वयंवरसमारंभाच्या वेळीं परशुरामाच्या शिवधनुष्याचा भंग केल्याचें वर्तमान समजतांच परशुराम क्रोधायमान होऊन त्याच्याशीं लढण्याकरितां आला; परंतु रामचंद्राकडून त्याचा पराभव होतांच आपल्या अवताराची पूर्तता झाली असें मानून तो महेंद्र पर्वतावर तपश्चर्येसाठीं निघून गेला.

## धार्मिक विधि व चालू रूढि.

राम व कृष्ण यांचे जन्मोत्सव ज्या प्रकारें करावे असें सांगितलें आहे, त्याचप्रमाणें परशुरामजयंतिही साजरी करावयाची असें धर्मशास्त्र आहे. रात्रीच्या प्रथम प्रहरीं व्यापिनी असेल ती तृतीया घ्यावी. या दिवशीं प्रदोषकाळीं परशुरामाची

पूजा करून अर्घ्य द्यावें. हा जयंत्युत्सव या देशांत मोठ्या प्रमाणावर साजरा केला जात नाहीं व परशुरामाचीं देवालयेंही विशेष आढळत नाहींत. अशी आख्यायिका आहे कीं परशुरामानें आपल्या बाणाच्या योगानें कोंकणपट्टींतील समुद्रास मागें हटवून तेथें जमीन तयार केली व ती जमीन ब्राह्मणांस दान दिली. या कोंकणपट्टीस परशुरामक्षेत्र असें म्हणतात. या क्षेत्रांत दुष्काळाची बाधा कधींही न व्हावी असा परशुरामानें आशीर्वाद दिला असल्याची सदरहू पट्टींतील लोकांची समजूत आहे. बरेच दाक्षिणात्य ब्राह्मण परशुरामाचे भक्त आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण येथें त्याचें देवालय असून, हा जयंत्युत्सव तेथें मोठ्या थाटानें साजरा करण्यांत येतो.

## परशुराम व दाशरथी राम

यांच्या काळची सामाजिक स्थिति लक्षांत घेतां असें दिसतें कीं, त्या कालीं ब्राह्मण, क्षत्रिय, वगैरे जातींची व्यवस्था हल्लींहून भिन्न होती. वेदकालीं आर्य व अनार्य हे भेद तेवढे अस्तित्वांत होते. जातिभेदासंबंधाचें विवेचन ऋग्वेदांतर्गत पुरुष सूक्तांत ( ऋग्वेद १० वें मंडळ ) आहे. याचा समावेश मागाहून करण्यांत आला, हें आधुनिक पंडितांचें मत जमेस धरलें तरी त्यावरून इतकेंच दिसून येतें कीं पुरुषाच्या मुखापासून झालेले ब्राह्मण, बाहूपासून झालेले क्षत्रिय, मांड्यांपासून उत्पन्न झालेले वैश्य व पावलांपासून जन्मलेले शूद्र हे सर्व एकाच परमेश्वराचे पुत्र असून त्यांची योग्यता भिन्न प्रकारची आहे व एकास दुसऱ्याशिवाय रहातां येणें शक्य नाहीं. रामायणांत ( अयोध्याकांड ) बहुतेक याचप्रमाणें चातुर्वर्णाची उत्पत्ति सांगितली आहे. भेद इतकाच कीं, क्षत्रिय हे वक्षःस्थलापासून उत्पन्न झाले असें सांगितलें आहे. 'भूर्भुवस्वः' या तीन शब्दांपासून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यांची उत्पत्ति झाली असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें असून, ज्याला आत्मप्रचीतीच्या योगानें 'अहं ब्रह्मास्मि' यांतील मर्म समजलें, तोच ब्राह्मण होय वगैरे मत प्रदर्शित केलें आहे. सामान्यतः ब्राह्मणांस सर्वांत श्रेष्ठ मानीत होते, एवढीच गोष्ट दिसून येते. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या घराण्यांत वेदकालापासून चुरस होती याचें द्योतक

## वसिष्ठ व विश्वामित्र

यांच्यांतील झगडा होय. हजारों वर्षेंपर्यंत या दोन वर्णांचे हे दोघे प्रतिनिधि प्रत्येक कार्यांत प्रतिस्पर्धी असल्याचें दर्शविलें असून त्यांनीं स्वतःची श्रेष्ठता प्रस्था-

पित करण्यासाठीं अनेक प्रयत्न केल्याचें दाखविलें आहे. हजारों वर्षेंपर्यंत एकच व्यक्ति जीवंत असणें संभवनीय नाहीं. त्या अर्थी त्याच उपनांवानें चालत असलेल्या घराण्यांतील कांहीं पुरुषांनीं हा कुलद्वेष दीर्घकालपर्यंत चालविला असें म्हणणें सयुक्तिक दिसतें. शेवटीं एका विश्वामित्रानें ब्रह्मर्षिपद प्राप्त करून घेऊन ब्राह्मण व क्षत्रिय हे समान योग्यतेचे आहेत, हें सिद्ध करून दाखविलें. प्राचीन लेखांत 'जाती' हा अर्वाचीन शब्द नसून 'वर्ण' हा शब्द योजलेला आहे. मूलतः आर्य व अनार्य यांच्यांत वर्णाचा भेद स्पष्टपणें दिसत होता. पुढें भारताच्या कालीं वर्णासंबंधानें भलतेंच मत पुढें आलें. शान्तिपर्वांत असें सांगितलें आहे कीं,

**ब्राह्मणानां सितो वर्णः क्षत्रियाणां तु लोहितः।**
**वैश्यानां पीतको वर्णः शूद्राणामसितस्तथा।**

ब्राह्मणांचा शुभ्र, क्षत्रियांचा लाल, वैश्यांचा पिंवळा व शूद्रांचा काळा वर्ण असतो. या वर्णदृष्टीनें पाहिल्यास आजची जातिव्यवस्था या कसास उतरणार नाहीं व ती मागेंही उतरली असेल असें दिसत नाहीं. अशा प्रकारें वर्णव्यवथे-बद्दल प्राचीन कालीं निरनिराळीं मतें प्रदर्शित करण्यांत आलीं; तरी ब्राह्मण व इतर वर्णांची योग्यता गुणांवरून ठरवावयाची, हें मत परशुरामाच्या कालापासून पांडव कौरवांच्या कालापर्यंत प्रचलित होतें, यांत संशय नाहीं. केवळ जन्मानें प्राप्त झालेला उच्चनीच भाव याचें महत्व न मानतां श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठपणा हा मनुष्याच्या शीलावर अवलंबून आहे, असें भारतांत अनेक ठिकाणीं प्रतिपा-दिलें आहे. उदाहरणार्थः—मोक्ष, धर्म, वनपर्व, शांतिपर्व, वगैरे प्रकरणांत यासंबं-धाचे उद्गार आहेत. 'ज्या मनुष्यांत सत्य, दान, क्षमा, शील, तपश्चर्या, दया हे गुण असतील तो ब्राह्मण होय. कुल, वेदाध्ययन किंवा विद्वत्ता यांनीं द्विजत्व प्राप्त होत नसून तें उत्तम आचारणानेंच प्राप्त होतें. हे वरील गुण जर शूद्रांत असतील तर तो ब्राह्मण समजावा व ब्राह्मण म्हणविणारांत ते नसतील तर तो ब्राह्मण नव्हे.' श्रीकृष्णानें तर गुणकर्माप्रमाणें चतुर्वर्णाची उत्पत्ति आहे असें गीतोपनिषदाच्याद्वारें सांगितलें. समाजांतील श्रेष्ठ जनांस या प्रकारचें मत ग्राह्य झालें होतें; म्हणूनच विश्वामित्रानें ब्रह्मर्षिपद मिळविण्याचा यत्न करून त्यांत यश मिळविलें. वसिष्ठाच्या शापामुळें चांडाळ बनलेल्या त्रिशंकूची व कल्मषपादाची बाजू उचलून धरून त्यांचा विश्वामित्रानें उद्धार केला. क्षत्रिय विश्वामित्रानें त्रिशं-कूचें पौरोहित्य पत्करून त्याचा यज्ञ चालविला, तेव्हां ब्राह्मणांनीं सहजच प्रश्न

केला कीं, अशा चाण्डाळाच्या क्षत्रिय उपाध्यायाकडून देव हविर्भाग ग्रहण करितील काय ? अशा प्रश्नाची पर्वा न करतां विश्वामित्रानें यज्ञकार्य नेटानें चालविलें. असो. या कालीं वर्णव्यवस्थेस हल्लींचें जातिव्यवस्थेचें खडतर स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. परंतु कालेंकरून निरनिराळ्या उद्योगधंद्यांमुळें व असे धंदे करणाऱ्या लोकांत झालेल्या रोटीबेटी व्यवहारांमुळें जे सामाजिक विभाग झाले, ते वज्रलेप होऊन भारतकालीं अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या होत्या. तथापि त्यांसंबंधानें हल्लींप्रमाणें कडक निर्बंध नसल्यामुळें त्याकालीं एक वर्ण दुसऱ्या वर्णाशीं रोटीबेटीव्यवहार करीत असे. कोणत्याही उच्च वर्णाच्या पुरुषाला आपणाहून कमी वर्णाच्या मुलीशीं लग्न करितां येत असे. परंतु उलट खालच्या वर्णाच्या पुरुषास आपणाहून वरच्या वर्णाच्या मुलीशीं शरीरसंबंध करतां येत नसे. शुक्राचार्यांची कन्या देवयानी हिनें ययातिराजास वरण्याचा निश्चय करून आपल्या पित्याची आज्ञा मागतांच त्यानें ब्राह्मणकन्येचा क्षत्रियाशीं विवाह होणें शक्य नाहीं, असें सांगितलें; तरी पण पुढें हा विवाह झालाच.

## वर्णभेदाचा लवचीकपणा

त्या कालीं किती होता, हें दाखविण्याजोगीं अनेक उदाहरणें देतां येतील. त्यांपैकीं कांहीं येथें देतों. विदर्भ देशाच्या राजाची मुलगी अगस्त्य ऋषीला दिली होती. लोमपाद राजाची कन्या शांता, ऋष्यशृंग ऋषीला दिली. त्याचप्रमाणें तृणबिंदूची कन्या गौ ही पुलस्त्यास, भगीरथाची मुलगी हंसी ही कौत्सऋषीस, शर्यतिराजाची मुलगी सुकन्या ही च्यवनऋषीस याप्रमाणें क्षत्रियांच्या कन्या ब्राम्हणांस देण्यांत आल्या व त्यांची संतति ब्राह्मणांत गणली गेली. ब्राम्हणही आपल्या मुली क्षत्रियांस देत असत. शुकाचार्यांची कन्या देवयानी हिचें ययातिराजानें, कृष्णद्वैपायन पुत्र शुकमुनीची कन्या कृत्वी हिचें अणुहराजानें पाणिग्रहण केलें. क्षत्रियांस तपश्चर्येच्या योगानें ब्राम्हणत्व संपादितां येत असे. पुरुकुलोत्पन्न प्रियमेध व गर्ग, दुष्यंतवंशीय शिनि, त्र्य्यरुणि हे सर्व तपेंकरून ब्राम्हण झाले. पुरुकुलोत्पन्न मुद्गल हा ब्रम्हर्षिपदास चढल्यावर त्याचे वंशज मौद्गल्यसंज्ञक ब्राम्हण झाले. तपश्चर्येवांचून केवळ ब्राम्हणांच्या अनुग्रहानेंदेखील जे क्षत्रिय ब्राम्हण झाले त्यांच्यांत गृत्समद यांचें उदाहरण फार महत्वाचें आहे. अनुशासनपर्वांत असें सांगितलें आहे कीं, वीतहव्य नांवाचा क्षत्रियराजा आपणास आपल्या शत्रूच्या हातून चुकवून घेण्यासाठीं भृगूच्या आश्रमांत दडून राहिला. पुढें त्याचा पाठलाग कर-

णाऱ्या शत्रूनें आश्रमांत येऊन 'येथें कोणी क्षत्रिय आहे काय ?' अशी पृच्छा करितांच भृगूनें सर्वच ब्राह्मण आहेत असें सांगितलें. हाच वीतहव्य राजा भृगु-वचनानें ब्राह्मणत्व पावला व गृत्समद झाला. ब्राह्मण व क्षत्रिय यांचीं सामाजिक कर्तव्यें बहुतेक ठरल्यासारखीं झालीं होतीं; तथापि ज्याप्रमाणें क्षत्रिय ब्राम्हणत्वा-साठीं धडपड करीत, त्याचप्रमाणें ब्राम्हणही क्षत्रियांप्रमाणें युद्धकलेंत पटुत्व संपादन करण्यास झटत. अगस्तिमुनि, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृपाचार्य हे सर्व ब्राम्हण असून धनुर्विद्येंत निष्णात होते. ब्राम्हण आपल्या तेजाच्या जोरावर क्षत्रियांस शाप देऊन जर्जर करीत, याचीं उदाहरणें पहावयाचीं असल्यास नहुश, वेन सहस्त्रार्जुन, कल्मषपाद व त्रिशंकु यांचा इतिहास पाहावा.

**न बलं क्षत्रियस्याहुर्ब्राह्मणा बलवत्तराः ।**
**ब्रह्मन्ब्रह्मबलं दिव्यं क्षात्राच्च बलवत्तरम्**

—बालकांड ५४-१४.

अर्थात् ब्राह्मणाच्या बलापुढें क्षत्रियांचें बल अगदींच फिकें पडतें, अशी त्या कालीं समजूत होती. ब्राह्मणांच्या नमस्कारामुळें सूर्य प्रकाशतो असें वनपर्वांत म्हटलें असून, ते क्रुद्ध झाले असतां सर्व जग भस्म करून टाकतील, असें अनुशासन-पर्वांत म्हटलें आहे; तथापि दुर्वासऋषि व अंबरीष राजा यांचें उदाहरण पाहतां अंबरीषाला शरण जाऊन दुर्वासास आपला पाठलाग करणारें सुदर्शनचक्र चुकवून घ्यावें लागलें. यावरून क्षत्रिय देखील आपल्या तेजानें ब्राह्मणास जेरीस आणीत, असें दिसतें. सारांश वसिष्ठमुनीचे वंशज सना-तनधर्मवादी पुराणपक्षाचे होते. त्यांच्यांत पराशर, कृष्णद्वैपायन, वैशंपायन, याज्ञवल्क्य, शुकमुनि, जैमिनी वगैरे जसे सुप्रसिद्ध ब्राह्मणधर्मांचे पुरस्कर्ते होऊन गेले, त्याचप्रमाणें विश्वामित्राच्या वंशजांचा संबंध परा-शर, भृगु, जमदग्नि यांच्याशीं घडून आल्यामुळें त्यांच्यांतही अनेक उदार-मतवादी ब्राह्मण निपजले. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां तत्कालिन समाजव्यवस्था किती लवचीक होती हें सिद्ध होतें. परशुरामाचा अवतार क्षत्रियांचा गर्व हरण करण्याकरितां झाला. परंतु त्याच्या हस्तें क्षत्रियकुलाचा निःपात झाला किंवा ब्राह्मणांचें वर्चस्व त्याच्या कृत्यामुळेंच प्रस्थापित झालें असें म्हणतां येत नाहीं. कारण परशुरामानंतर दाशरथीराम व त्याचा क्षत्रियवंश दीर्घ कालपर्यंत अस्तित्वांत होता. तसेच पांडवकौरव हे क्षत्रिय व त्यांचे वंशज यांनींही बऱ्याच कालपावेतों सत्ता गाजविली. पुढें क्षत्रियांचा वंश रजपूत लोकांच्या

द्वारें टिकला. तसेंच मराठे व दक्षिणहिंदुस्थानांतील वडियर हे सर्व क्षत्रिय होत. ब्राह्मणांचें वर्चस्व रामायणकालीं विशेष होतें व त्यानंतरही त्यांस अग्रमान मिळाला. परंतु यास परशुराम कारण नसून त्यांच्या अंगचे गुण व त्यांच्यांतील विद्या यांच्यामुळेंच ब्राह्मणांची योग्यता कायम टिकली.

परशुरामावताराच्या कार्याचा विचार केला तर इतकेंच दिसतें कीं, त्याच्या कालीं ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत झगडा चालला होता. उभय पक्षांना आपलीच योग्यता मोठी वाटे. त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार चालू असून वर्णव्यवस्था लवचीक होती. ब्राह्मण क्षत्रियत्व पत्करण्यास व क्षत्रिय ब्राह्मणत्व संपादन करण्यास झटत असत. परंतु हिंदुस्थानांत क्षात्रतेजापेक्षां सात्विक गुणांस विशेष मान असल्यामुळें ब्राह्मण परशुरामापेक्षां क्षत्रिय दाशरथी रामासच त्याच्या सौजन्यामुळें विशेष मान मिळाला. क्षत्रियांचा गर्व हरण करण्यासाठीं अवतरलेल्या ब्राह्मण परशुरामाचा प्रयत्न आणि ब्राह्मणांच्या ठायीं आपण ब्रह्मज्ञानवेत्ते असल्याबद्दलचा दुरभिमान कमी करण्याचा क्षत्रिय विश्वामित्राचा प्रयत्न हे देशहिताच्या दृष्टीनें सारखेच महत्वाचे आहेत. गुणकर्माप्रमाणें वर्णव्यवस्था असल्याचें श्रीकृष्णानें सांगितलें, यांतील रहस्य तरी हेंच आहे कीं, ब्राह्मण्य हा जन्मसिद्ध हक्क नसून प्रत्येक मनुष्य आपआपल्या कर्माप्रमाणें वरच्या किंवा खालच्या पायरीस जातो. अशाच अर्थानें पाहतां विश्वामित्र जसा ब्राह्मण झाला, तसा परशुराम क्षत्रिय बनला, असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं.

---

## नृसिंहजयंति.

अत्यंत प्राचीन कालीं स्वायंभुव मन्वंतरांत कश्यप नांवाचा एक ऋषि होऊन गेला. त्याला हिरण्याक्ष नांवाचा एक पुत्र होता. तो महाबलाढ्य असून त्यानें भूलोकास रसातळीं दडपून टाकिलें. अर्थात् आपल्या पराक्रमाच्या योगानें सर्व देश जिंकून, पादाक्रांत केलेल्या लोकांस तो डोकें वर काढूं देईना. तेव्हां वराहानें त्याचा नाश करून लोकांस दुःखमुक्त केलें. या वहारास विष्णूचा तिसरा अवतार असें मानिलें आहे. ( कांहीं ग्रंथांत वराह हा ब्रह्मयाचा अवतार असल्याचें लिहिलें आहे. ) या हिरण्याक्षाच्या वंशांत वैवस्वत मन्वंतरांत दुसरा एक कश्यपऋषि होऊन गेला. त्याला अनेक पुत्र झाले. यांपैकीं हिरण्यकश्यपु

( हिरण्यकशिपु ) हा एक असून त्यानें लोकांस दे माय धरणी ठाय करून सोडिलें. आपला प्रसिद्ध पूर्वज जो हिरण्याक्ष त्याचा नाश विष्णूनें केला, म्हणून त्याच्याशीं विरोध मांडून तो विष्णूच्या अनुयायांस अनेक परीनें त्रास देऊं लागला. हिरण्यकश्यपू हा हिरण्याक्षाचा बंधु होय, असें भागवतादि ग्रंथांत सांगितलें आहे; परंतु भारतांत त्यास ' एक एव दितेः पुत्रः ' असें म्हटलें आहे. यावरून त्याला दुसरा कोणी सहोदर नव्हता हें स्पष्ट होतें. हिरण्यकश्यपूनें आपली सत्ता जिकडे तिकडे स्थापन करून ऋषि, देव व राजे यांना जर्जर केलें. त्यांचे यज्ञयाग सिद्धीस जाईनात. हिरण्यकश्यपू हा विषयोपभोगांत गढून गेलेला असून आपण अजिंक्य व अमर व्हावें, या हेतूनें त्यानें स्वतःच्या देहरक्षणाचे अनेक उपाय योजिले. रात्रीं किंवा दिवसा मनुष्य किंवा हिंस्र पशु यांच्यापासून आपणास इजा पोहोंचूं नये म्हणून त्यानें चांगला बंदोबस्त केला. अशा प्रकारें आपणास कोणाकडून त्रास पोहोचणें शक्य नाहीं अशी त्याची खात्री होतांच, तो मन मानेल तसा क्रूरतेनें वागूं लागला. त्यामुळें सात्विक वृत्तीच्या लोकांस या दुष्टाच्या हातून आपली कशी सुटका करून घ्यावी हा मोठा विचार पडला. शेवटीं त्याचाच पुत्र त्याच्या नाशास कारण झाला. तो प्रकार असाः—हिरण्यकश्यपूस जंभासुराची कन्या कयाधु दिली होती. तिच्यापासून त्याला प्रन्हाद, अनुन्हाद, संन्हाद, न्हाद, शिबि आणि बाष्कल असे सहा पुत्र झाले. त्यांपैकीं प्रन्हादास आपल्या कुलबंधूंचा तामसी स्वभाव आवडत नसे. तो त्यांच्याशीं मिळूनमिसळून वागेना. आपले विषयलंपट असे नातेवाईक सर्वथैव चुकताहेत असें पाहून त्यांस शुद्धीवर आणण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. प्रन्हाद ज्या कुलांतला होता, त्या कुलास असुर कुल किंवा दैत्यकुल असें म्हणत व असुरांच्या प्रतिस्पर्ध्यांस सुर किंवा देव मानीत. असुर हे देहात्मवादी होते. सुर हे व्यापक परमात्मा जो विष्णु त्याची उपासना करीत. प्रन्हादास सुरांचा पक्ष हा सत्पक्ष आहे असें वाटतांच, त्यानें विष्णुभक्तीचा मार्ग स्वीकारला. आपला पुत्र आपल्या शत्रूच्या पक्षानें वागतो हें लक्ष्यांत येतांच हिरण्यकश्यपूनें आपल्या समजुतीप्रमाणें त्यास योग्य गुरूच्या हातांखालीं शिक्षणास ठेवून ताळ्यावर आणण्याचा यत्न चालविला. परंतु प्रन्हाद उलट गुरूसच उपदेश करूं लागला कीं—'गुरुमहाराज, मिथ्या अभिमानामुळें आम्ही असुर देहात्मवादी होऊन परमार्थास मुकलों आहों; मनुष्य अहंममतेनें बद्ध झाला कीं, त्याच्या अंगीं सत्य व असत्य, न्याय व अन्याय यांची निवड करण्याचें सामर्थ्य रहात नाहीं. जोंपर्यंत आपपरभाव कायम आहे, तोंपर्यंत परमार्थप्राप्ति होत नसते.

खऱ्या परमेश्वराविषयींचें ज्ञान संपादन करून त्याला जाणण्याची व त्याच्यांत लय पावण्याची आकांक्षा प्रत्येक व्यक्तीनें धरिली पाहिजे.'

गुरूचें व प्रऱ्हादाचें पटत नाहीं, हें हिरण्यकश्यपूस कळतांच त्यानें पुत्रास बोलावून आणिलें व गुरूच्या उपदेशाप्रमाणें वागण्याची सक्त आज्ञा केली; तेव्हां प्रऱ्हाद नम्रतापूर्वक म्हणाला-'बाबा, ज्या विद्येपासून शाश्वत सुख व शांति लाभत नाहीं ती विद्या काय कामाची ? परमेश्वरप्राप्ति हेंच विद्येचें अंतिम ध्येय होय. यासाठीं तें ध्येय साध्य करून घेण्याकरितां मी जो सुरांचा मार्ग स्वीकारला आहे, तो योग्य होय, असें मला वाटतें. विषयवासनांचा उच्छेद करून परब्रम्हाची प्राप्ति कोणत्या रीतीनें करून घ्यावी, हें शिकविणारे महानुभव साधुपुरुष हेच खरे गुरु होत. अशांचा लाभ झाला असतां नेत्रांवरील अज्ञानपटल दूर होऊन ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुगम होईल; अर्थात् या नश्वर देहाचें सार्थक करावयाचें असल्यास सुरसमागमांत राहून हा भवसागर तरून जाण्याचा यत्न केला पाहिजे.' अशा आशयाचे आपल्या मुलाचे विचार अहंकारानें धुंद झालेल्या हिरण्यकश्यपूस आवडले नाहींत, हें सांगणें नकोच. त्यानें आपल्या नोकरांस अशी आज्ञा केली कीं, प्रयत्न करून मुलगा ताळ्यावर नच आल्यास त्याला कडक शासन करावें. वीतभर पोटाची खळगी भरण्याच्या हेतूनें त्या उन्मत्त दैत्याधिपतीची सेवा पत्करलेल्या त्याच्या नीच भृत्यांनीं ( सेवकांनीं ) त्या बालसाधूस अनेक परीनें त्रास दिला; परंतु तो डगमगला नाहीं- त्यानें आपलें आचरण निर्मळ ठेवून सुरांचें दैवत जो विष्णु त्यास तनुमनधन अर्पण केलें. अशा रीतीनें प्रत्यक्ष आपला पुत्र शत्रूच्या पक्षास जाऊन मिळाला आहे, हें पाहातांच हिरण्यकश्यपू क्रोधायमान झाला व पुत्रप्रेम विसरून त्या ज्ञानी बालकास त्यानें देहांतप्रायश्चित देण्याचा विचार केला. हिरण्यकश्यपू म्हणाला-'प्रल्हादा, ज्या अर्थी तूं माझ्या इच्छेप्रमाणें वागत नाहींस, त्या अर्थी तूं जिवंत असणेंदेखील मला इष्ट नाहीं व म्हणूनच मी तुझा प्राण घेणार आहें; अशा प्रसंगीं तूं ज्या विष्णूच्या नांवानें रात्रंदिवस ओरडतोस, तो तुझा विष्णु तुला कसा वांचवितो तें पाहतों.' हे शब्द कानीं पडतांच प्रऱ्हादानें उत्तर दिलें, 'बाबा, तो माझा विष्णु माझा नेहमीं पाठीराखा आहे. तोच माझ्या देहाचा धनी असून त्याच्याशिवाय अन्य कोणासही माझा प्राण हिरावून घेतां येणार नाहीं. तो विष्णु स्थिरचर काष्ट, पाषाण या सर्वांत भरून उरला आहे. तो जसा माझ्यांत तसा तुमच्यांतही आहे. तोच माझें रक्षण करील. शौर्य, धैर्य व प्रेम यांहीं युक्त,

असलेल्या विष्णुमुळें आम्ही जगलों आहों. अशा या देवाधिदेवाशीं विरोध मांडण्यांत काय शहाणपणा आहे ? सर्वांठायीं समता व ममत्वभाव प्रस्थापित करून जे विष्णूच्या गुणचिंतनांत तल्लीन होतात, त्यांचा कैवारी तोच विष्णु होतो, यांत तिलमात्र संदेह नाहीं. अशा या विश्वंभराचा महिमा वर्णन करण्यास मी असमर्थ आहें.' मुलाचे हे उद्गार हिरण्यकश्यपूस अत्यंत कर्णकटु वाटले. तो एकदम ओरडून म्हणाला— 'तुझा विष्णु विश्वांत भरून उरला आहे असें तूं म्हणतोस, तर तो या समोरच्या खांबांत कां दिसत नाहीं ?' प्रल्हादानें शांतपणें परंतु ठांसून उत्तर दिलें, 'बाबा तो या खांबांत देखील आहे, ' असें म्हणतांच हिरण्यकश्यपूनें मोठ्या क्रोधावेशानें खांबावर लत्ताप्रहार केला. तेव्हां त्यांतून भयंकर गर्जना उत्पन्न झाली व सिंहाप्रमाणें उग्र व भयानक अशी एक व्यक्ति बाहेर निघाली. हाच नृसिंह होय. त्यानें एकदम त्या दुष्ट दैत्यावर झडप घातली व आपल्या मांडीवर त्याला आडवा घालून नखानें त्याचें पोट फाडिलें. हा दिवस वैशाख शुद्ध १४ होता.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

त्रयोदशीच्या दिवशीं एकभुक्त राहून चतुर्दशीच्या दिवशीं मध्यान्ह कालीं तीळ आणि आवळे वांटून अंगास लावून स्नान करावें. सायंकाळीं धान्याच्या राशीवर उदकयुक्त कलश ठेवून त्याजवरील पूर्णपात्रांत नृसिंहाच्या सुवर्णप्रतिमेची पूजा करावी. रात्रौ जागरण, हरिकीर्तन वगैरेच्या योगानें नृसिंहाची सेवा करून प्रातःकाळीं पुनः त्याची पूजा केल्यावर गोप्रदानासह प्रतिमा उपाध्याला द्यावी. आपल्या वंशांत होऊन गेलेल्या व पुढें होणाऱ्या वंशजांचा उद्धार करण्याबद्दल नृसिंहाची प्रार्थना करावी. नंतर ब्राह्मणासह तिथीच्या अंतीं पारणा करावी. तीन प्रहरांपेक्षां अधिक चतुर्दशी असल्यास पूर्वाह्णींच पारणा करावी. पौर्णिमेच्या दिवशीं शिजलेल्या अन्नासह उदककुंभदान करावें. सवत्स गाय, पादुका, उपानह, छत्री, पंखा, उदकुंभ, व शय्या इत्यादिकांचें दान पुण्यप्रद असल्याचें धर्मसिंधु सांगत आहे. नृसिंहजयंत्युत्सव घरोघर किंवा सर्वच विष्णुभक्तांच्या येथें साजरा केला जातो अशांतला प्रकार नाहीं. बंगाल व इतर उत्तरेकडील देशांत हा चालू नाहीं. विष्णूच्या कांहीं देवालयांतून हा उत्सवदिन साजरा केला जातो. हें दैवत रामाप्रमाणें लोकप्रिय नसण्याचें कारण हेंच आहे कीं, नृसिंह हा उग्र स्वरूपाचा

असून त्याची सेवा करण्यांत कांहीं प्रमाद घडल्यास त्या दैवताकडून त्रास पोहोंचतो अशी समजूत आहे. दक्षिण हिंदुस्थानांत वैष्णवमतप्रर्वतकांच्या दीक्षेमुळें जागोजागीं विष्णूचीं देवालयें स्थापन करण्यांत आलीं. त्यांतच कांहीं नृसिंहाचीं असून, तेथें हा जयंत्युत्सव मोठ्या थाटानें साजरा केला जातो. दीपोत्सव, पालखीची मिरवणूक वगैरे उत्सवाचे प्रकार त्या ठिकाणीं फार प्रेक्षणीय होतात. मद्रासइलाख्यांत घंटसाल हंपी येथें नृसिंहाचीं मोठीं देवस्थानें आहेत. सातारा जिल्ह्यांत धौम येथें नृसिंहाचें देवालय आहे तेथें या दिवशीं मोठी यात्रा भरते. तेथें बरेच यात्रेकरू एकादा नवस करण्यासाठीं किंवा पुरविण्याच्या निमित्तानें दरसाल जात असतात. कांहीं ब्राह्मण व ब्राह्मणेतर नृसिंहास कुलदैवत असें मानतात.

हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू यांच्यासंबंधाची माहिती देतांना प्राचीन ग्रंथकारांनीं असें दर्शविलें आहे कीं त्यांचा जन्म झाला त्या वेळीं पृथ्वीवर बरीच मोठी घडामोड चालली होती. पृथ्वी म्हणजे सध्यांच्या कल्पनेप्रमाणें प्रचंड भूगोल नव्हे. ज्या ठिकाणीं हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू आपल्या कुलांतील लोकांसह रहात होते, तोच प्रदेश त्या कालच्या कल्पनेप्रमाणें पृथ्वी होय. उत्तरध्रुवाकडील आपल्या वासस्थानाचा त्याग करून आर्यांच्या शाखा पश्चिमेकडे व दक्षिणेकडे गेल्या त्यांपैकीं एक कास्पियन समुद्राच्या दक्षिणबाजूस जेथें इराण, अफगाणिस्थान हे देश आहेत तेथें आली. त्यांच्यासंबधी माहिती दंतकथांच्या ( mythology ) रूपानें पुराणांत सांपडते. परंतु हजारों वर्षें या दंतकथांच्या भोंवतीं कविकल्पनेचीं व अतिशयोक्तीचीं आवरणें पडल्यामुळें खरा इतिहास लपून गेल्याप्रमाणें झालें आहे. सध्यां उपलब्ध असलेल्या सर्व जुन्या लेखांचें बारकाईनें परीक्षण केल्यास असें दिसतें कीं या दक्षिणेकडे आलेल्या आर्यांच्या शाखेंत दोन पक्ष होते. हे

## देव व दैत्य

या नांवानें पुराणांत व रामायण महाभारतांत प्रसिद्ध आहेत. यांच्यासंबंधाचा इतिहास असा आहे कीं, वैवस्वत मन्वंतरांतील ब्रह्मापुत्र मरीचिऋषि यास प्राचेतस दक्षानें आपल्या तेरा कन्या भार्यार्थ दिल्या. त्यांचीं नांवें अदिति, दिति, दनु, दनायु, सिंहिका वगैरे होतीं. या प्रत्येकीची संतति मातेच्या नांवावरून प्रसिद्धीस आली. उदाहरणार्थ अदितीचे पुत्र अदितेय किंवा आदित्य, दितीचे पुत्र

दैत्य, दनूचे पुत्र दानव वगैरे. कश्यपाच्या कुलांत हिरण्यकश्यपूचा पुत्र प्र्‍हाद हा महान् विष्णुभक्त व प्र्‍हादाचा पुत्र बळी हा उदारधी होऊन गेला. कश्यप स्वतः मंत्रद्रष्टा ऋषि होता. त्याचे अवत्सार आणि असित हे दोन पुत्र ऋषींत गणले जातात. अवत्सारास निध्रुव आणि रेभ असे दोन पुत्र असून असितास एकच शांडिल्य नांवाचा पुत्र होता. निध्रुवाच्या संततीस नैध्रुव, रेभाच्या संततीस रैभ्य आणि शांडिल्याच्या संततीस शांडिल्य अशीं नांवें पडलीं. नित्य ऋषि व देवल हे शांडिल्याचे प्रख्यात वंशज होत. तेही मंत्रद्रष्टे होते असें मत्स्यपुराणांत लिहिलें आहे. कश्यप हा मरीचि ऋषीचा पुत्र असल्यामुळें त्याला मारीच हें नांव प्राप्त झालें. कश्यपाची ख्याती प्राचीनकालीं फार असावी असें वाटतें व म्हणूनच त्याचें नांव नक्षत्रपुंजांतील एकास देण्यांत आलें आहे. ( मार्गशीर्ष महिन्यांत सूर्यामार्गें हें नक्षत्र असतें. ) वर सांगितल्याप्रमाणें कश्यपाच्या वंशांत जसे ऋषि जन्मास आले, तसेच दुष्ट व नीच मनोवृत्तीचे पुरुषही निर्माण झाले. विष्णु व इंद्र हे अदितीचे पुत्र होत, असें रामायण, महाभारत व पुराणें यांत सांगितलें आहे. ते व त्यांचे वंशज अदितेय या संज्ञेनें ओळखिले गेले. कालेंकरून त्यांस देव असें मानण्यांत आलें. इंद्र व विष्णु यांस व त्यांच्या वंशजांस 'अदितिनंदनाः' असें म्हटलें आहे. कश्यपाच्या इतर भार्यांच्या उदरीं अत्यंत दुष्ट मनोवृत्तीचे अनेक पुरुष जन्मास आले. त्यांपैकीं दितीचा पुत्र ( दैत्य ) हिरण्यकश्यपू, दनूचा पुत्र ( दानव ) केतु, दनायूचा पुत्र वृत्र, सिंहिकेचा पुत्र राहु हे विशेष प्रसिद्ध आहेत. कालेंकरून दैत्य व दानव हे शब्द समानार्थी योजण्यांत येऊं लागून ते नीचत्व व क्रौर्यदर्शक होऊन बसले. व त्याच अर्थी ते कित्येक जुन्या ग्रंथांत वापरले आहेत.

या दोन्ही संततींत दीर्घकालपर्यंत भांडणें चाललीं. देव व दैत्य यांचा स्वभाव एकमेकांच्या अगदीं उलट असल्यामुळें त्यांचें पटेना. दैत्य हे स्वभावानें तामसी, तापट, उन्मत्त व विषयलंपट होते. देह हाच आत्मा आहे असें ते मानीत. त्यांचे विचार व आचरण प्रवृत्तिपर असे. यज्ञयागांच्या विरुद्ध असल्यामुळें ते करणाऱ्या आपल्या भाऊबंदांस ( अदितेयांस ) दैत्य त्रास देत. उलटपक्षीं देव हे सात्विक, नम्र व संयमी होते. व्यापक परमात्मा जो विष्णु त्याची ते पूजा व आराधना करीत. विद्वान् व ज्ञाननिष्ठ गुरूपाशीं जाऊन ते अध्यात्मज्ञान मिळविण्याचा यत्न करीत. देव दैत्य या उभयतांनीं ब्रम्हज्ञान संपादन करण्याचा यत्न केला; परंतु तो देवांस साधला आणि दैत्यांनीं त्याचा भलताच

अर्थ घेऊन आपलें समाधान कसें करून घेतलें, याचें एक सुंदर रूपक उपनिषदांत सांपडतें. छांदोग्यांत असें सांगितलें आहे कीं, एकदां देवांपैकीं इंद्र व दानवांपैकीं विरोचन ( प्रऱ्हादाचा पुत्र ) हे हातांत समिधा घेऊन व एकमेकांशीं स्पर्धा करीत निघाले, ते प्रजापतीकडे आले व कांहीं काल ब्रह्मचर्यानें राहिल्यावर एके दिवशीं प्रजापतीसमोर जाऊन म्हणाले, "भगवन् ! पापरहित, जरारहित, मृत्युरहित, शोकरहित, क्षुधारहित, पिपासारहित, सत्यकाम, सत्यसंकल्प अशा आत्म्याचा शोध करावा, त्याचें ज्ञान करून घ्यावें, जो त्या आत्म्याचा शोध करून त्याला जाणतो, त्याला सर्व लोक प्राप्त होतात, त्याचे सर्व काम पूर्ण होतात असें आपलें वचन आहे, असें ज्ञाते सांगतात. त्या आत्म्याची इच्छा करीत आम्ही येथें आलों आहों.' तेव्हां प्रजापति म्हणाला, 'हा जो डोळ्याच्या ठिकाणीं पुरुष दिसतो तो आत्मा होय. तो मृत्युरहित व भयरहित आहे. तोच ब्रह्म होय.' इंद्र व विरोचन ह्मणाले, 'हे भगवन् ! उदकामध्यें जो दिसतो व जो आरशामध्यें दिसतो तो कोण ?' प्रजापति ह्मणाला, "तोच हा या सर्वांच्या मध्यें दिसतो. हाच आत्मा होय." तेव्हां ते शांतचित्त होत्साते तेथून निघून गेले. त्यांस जातांना पाहून प्रजापति ह्मणाला, 'आत्म्याची प्राप्ति व ज्ञान न होतां तुम्ही दोघे चाललां आहांत. देव अथवा दानव यांपैकीं जे एवढयाच ज्ञानानें युक्त होतील ते पराभव पावतील." विरोचन शांतहृदय होऊन आपल्या भाऊबंदांकडे गेला आणि त्यानें त्यांस असें ज्ञान सांगितलें कीं, 'या लोकीं आत्म्याची ह्मणजे स्वतःचीच पूजा करावी. स्वतःचीच पूजा व सेवा करणाराला इहलोक व परलोक असे दोन्ही प्राप्त होतात ' परंतु इंद्राचें समाधान न होतां तो पुनः प्रजापतीकडे आला व त्यानें ब्रह्मज्ञान संपादन करीपर्यंत प्रजापतीचा आश्रम सोडिला नाहीं. ( अध्याय ८ वा. खंड ७ ते १५ ).

देव हे यज्ञयागादिक करून सोमसुरेनें आपल्या इष्ट दैवतांस तृप्त करीत असत, व स्वतः तेही सुरापान करीत. वारुणि किंवा सुरा ही त्याज्य नाहीं असें त्यांचें मत होतें. परंतु दैत्य व दानव यांस यज्ञयागादिकांबद्दल तिटकारा असून ते सुरा ग्रहण करीत नसत. देवांनीं समुद्रमंथन करून अनेक रत्नें पैदा केलीं. अर्थात् या उभय पक्षाच्या लोकांनीं ज्ञानसमुद्राचें मंथन करून नानाप्रकारचे मौल्यवान् पदार्थ प्राप्त करून घेतले. त्यांपैकीं सुरा ही एक होती. देवांनीं तिचें सेवन केलें. दैत्यांनीं तिचा स्वीकार केला नाहीं. यावरून सुरा ग्रहण करणारे देव किंवा अदितीचे वंशज हे सुर या नांवानें प्रसिद्ध झाले. सुराग्रहण न केलेले

दैत्य हे असुर या नांवानें संबोधिले गेले. यासंबंधानें रामायणांत पुढील श्लोक आढळतो:—

**सुरा प्रतिग्रहाद्देवाः सुरा इत्यभिविश्रुतः**
**अप्रतिग्रहणात्तस्या दैतेयाश्चासुरास्तथा ।**

( ह्मणजे सुरेचा प्रतिग्रह केल्यामुळें देवांस सुर हें नांव पडलें; व प्रतिग्रह न केल्यावरून दैत्यांस असुर (Teatotaller ) हें नांव प्राप्त झालें. )

ऋग्वेदाचा अत्यंत प्राचीन असा जो भाग आहे त्यांत असुर हा शब्द देवार्थीं योजिला असून इंद्र, अग्नि, वरुण वगैरे देवतांस असुर असें ह्मटलें आहे. सुर व असुर हीं नांवें प्राप्त होण्याचें कारण सुरेचा प्रतिग्रह व अप्रतिग्रह हें होतें. तरी कालें करून अध्यात्म ज्ञानाच्या मार्गें लागलेल्या देवांनीं यज्ञयागादिकांप्रमाणें तिचाही त्याग केला. ते सुरेच्या ऐवजीं यज्ञांत मधाचा उपयोग करूं लागले, व असुरांनीं सुरापानाची संवय लावून घेतली.

## सुर व असुर

ऋग्वेदामध्यें प्रारंभीं असुर हा शब्द जीवन देणारा या अर्थीं वापरलेला आहे. असुरांचें गुणानुवर्णन पुढील ऋचांत सांपडतें.

१ गभीरवेपा असुरः सुनीथः । ऋ १।३५।७

२ हिरण्यहस्तो असुरः सुनीथः सुमृळीकः स्ववाँयात्वर्वाङ् ॥ ऋ १।३५।१०

३ बृहछ्रवा असुरो बर्हणा कृतः ॥ ऋ १।५४।३

४ त्वं विश्वेषां वरुणासि राजा ये च देवा असुर ये च मर्ताः । ऋ २।२७।१०

५ त्वमग्ने रुद्रो असुरो महो दिवः ॥ ऋ २।१।६

अर्थ—( १ ) उत्तम प्रेरक, उत्तम चालक असा हा असुर जीवनदाता आहे. ( २ ) सुवर्णाचीं भूषणें हातांत घालणारा, उत्तम नेता, उत्तम सुखदाता, आत्मिक बलानें युक्त असा हा असुर जवळ येवो. ( ३ ) कीर्तियुक्त असा हा जीवन दाता आहे. ( ४ ) हे असुर वरुणा, जे देव व जे मर्त्य आहेत त्या सर्वांचा तूं राजा आहेस. ( ५ ) हे अग्ने, तूं द्युलोकापेक्षां मोठा, भयंकर व असुर ( प्राण दाता ) आहेस.

याप्रमाणें देवाच्या ठायीं असुर होते. परंतु कालेंकरून जसा राक्षस या शब्दाचा अर्थ विपरीत झाला, त्याच प्रमाणें असुर याचाही उपयोग उलट अर्थी

होऊं लागला. असुराः सुराया अपानात् ॥ (अमर १।१२) सुरा पीत नव्हते म्हणून असुर असें त्यांस म्हणत. यांसही पूर्वदेव अशी संज्ञा असून त्यांचें गुणवर्णन उत्तम प्रकारें केलेलें आढळतें. असुर हा शब्द दैत्य या अर्थी वापरण्यांत आल्यापासून सुर म्हणजे देव असा अर्थ रूढ झाला. या सर्वांचा राजा इंद्र. इंद्रास 'सुराधिपः' असें म्हटलें आहे. इंद्र व विष्णु हे सुरांचे मूळ पुरुष असावेत. कालें-करून त्यांस देवतांप्रमाणें पूज्य मानण्याचा प्रघात पडून त्यांच्या पराक्रमाबद्दल अनेक अद्भुत गोष्टी त्यांच्यांत रूढ झाल्या. ( मूळ पुरुषास देवाच्या ठिकाणीं मानून, इतर देवतांप्रमाणें त्याची पूजाअर्चा करण्याची व त्याजपाशीं नवस कर-ण्याची चाल कित्येक आर्यांच्या वंशजांत आहे ). अदितिपुत्र इंद्रानें असुरांवर जय मिळविला, तेव्हां इंद्रपुरी किंवा अमरपुरी ही त्याची राजधानी झाली. कालें-करून इंद्र हें नांव सार्वभौमत्व दर्शविणारें झाल्यामुळें शेंकडों वर्षें निरनिराळ्या सुरा-धिपतींनीं इंद्र याच नांवानें सत्ता गाजविली असावी. इंद्र व विष्णु यांस देवतां-प्रमाणें मानूं लागल्यावर त्यांच्या पराक्रमाचें वर्णन करितांना त्यांच्या हातून अनेक पराक्रम घडल्याचें सांगण्यांत आलें. त्यांच्या स्तुतिपर गाइलेल्या शब्दांचा विचार केला असतां इंद्र व विष्णु हे मूलतः ऐतिहासिक पुरुष होते व त्यांच्या पराक्रमामुळें सत्पक्षाचे अभिमानी जे देव त्यांचें पाऊल या देशांत पडलें असें दिसतें.

## इंद्र व विष्णु

यांच्या कृत्यांचा विचार करतां मूलतः ते काल्पनिक नसून ऐतिहासिक पुरुष होते असें दिसतें. इंद्रास पूर्वदिशेचा अधिपति मानिलें आहे. याचें कारण हेंच कीं जेव्हां देव व दैत्य यांच्यांत भाऊबंदकी उत्पन्न झाली, तेव्हां त्यांना एकत्र नांदणें शक्य नव्हतें. म्हणून इंद्रानें पुढारी होऊन स्वपराक्रमानें त्यांच्यासाठीं नवीन सुपीक देश काबीज करून दिला. ते पूर्वेकडे वळले व पंजाबच्या समृद्धिपूर्ण प्रदेशांत त्यांनीं ठाणें दिलें. इंद्राच्या पुढारीपणामुळें सुरांनीं अनेक दऱ्याखोऱ्यां-तून रस्ता तयार केला म्हणून इंद्रास **गोत्रभिद्** हें नामाभिधान प्राप्त झालें. इंद्रानें अनेक शहरें हस्तगत केलीं म्हणून त्याला '**पुरंदर**' असेंही नांव देण्यांत आलें. इंद्राचीं हत्यारें वज्र ( गदा किंवा हातोडा ) व शक्ति ( बरची ) हीं होतीं. शिव हा त्रिशूल वापरीत असे. वरुणाचा पाश शत्रूचा गळा दाबून प्राण घेण्याच्या कामीं उपयोगांत आणीत. परंतु या सर्व हत्यारांचा उपयोग

शत्रूंशीं समोरासमोर लढण्याच्या कामीं होत असे. यांच्यापेक्षां शत्रूस लांबून ठार करण्याचें साधन म्हटलें म्हणजे धनुष्यबाण हें होय. याचा उपयोग प्रथमतः विष्णूनें केला. तेव्हां इंद्रापेक्षांही त्याची ख्याति विशेष झाली. विष्णूच्या नायकत्वाखालीं आर्यांनीं धनुष्यबाणाच्या मदतीनें आपल्या स्वाऱ्या पूर्वेकडील प्रदेशांत चालविल्या. अल्प श्रमानें व आपल्या बाणाचा नेम नीट धरण्याचें कौशल्य संपादून त्यांनीं थोड्याच वेळांत शत्रूचें निर्दालन करून गंगेच्या उगमापर्यंत देश काबीज केला; व म्हणूनच विष्णूच्या चरणापासून गंगेचा उगम झाला असें म्हणण्याचा प्रघात पूर्वकालीं पडला असावा. दशरथाचा पुत्र राम व देवकीपुत्र कृष्ण यांस कालेंकरून अवतार मानतां मानतां आजमितीस ज्याप्रमाणें त्यांस प्रत्यक्ष देव असें मानण्याचा प्रघात बहुजन-समाजांत पडला आहे, त्याचप्रमाणें अदितीचे पुत्र जे विष्णु व इंद्र यांस देवतांच्या ठिकाणीं मानून वेदकालीं त्यांस परमसमर्थ देव असें मानण्यांत आलें. ( विष्णु या दैवतासंबंधानें विस्तृत विवेचन महाएकादशी या सदराखालीं दिलें आहे. ) सारांश म्हणून इतकाच कीं देव व दैत्य हे ऐतिहासिक पुरुष असावेत. त्यांचे विचार भिन्न असल्यामुळें एकमेकांचें पटत नसे. असुरांचा नाश ज्या ज्या सुरांनीं केला त्यांस देवतांश मानण्यांत आलें. हिरण्यकश्यपूचा वध नृसिंहानें, बलीचा पराजय वामनरूपी विष्णूनें, नरकासुर, धेनुकासुर वगैरेंचा वध कृष्णानें, महिषासुराचा वध शिवपत्नी पार्वतीनें, भस्मासुराचा संहार स्त्रीवेषधारी विष्णूनें करून सुरांच्या पाठीमागचा त्रास कमी केला. म्हणजे वेदकालापासून महाभारत-कालापर्यंत सुर व असुर यांच्यांत वरचेवर झटापटी होत असें दिसतें. परंतु असुरांचा देशच सोडून सुरांनीं पूर्वेकडे मोर्चा फिरविल्यामुळें असुरांशीं दळणवळण कमी होत जाऊन एकमेकांचा विशेष संबंध येईनासा झाला. जे थोडेबहुत असुर कारणपरत्वें सुरांच्या मागून या देशांत आले, त्यांचा सुरांत मिलाफ होऊन गेला. येथें एक महत्वाची गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं,

## दैत्य हे नीच वृत्तीचे राक्षस नव्हत.

राक्षस नैर्ऋत्येकडे व यमुनानदीच्या दक्षिणेस लंकेपर्यंत रहात असत. ते नैर्ऋत्येकडे असत यावरून त्यांना नैऋताः असें म्हटलें आहे. अकाळविकाळ दाढा, भयंकर डोळे, प्रमाणशीर नसलेले अवयव राक्षसांस होते, असा लोकांचा समज आहे तो चुकीचा होय. ते आर्यांप्रमाणें मनुष्यदेहधारी होते. कधीं रंगानें काळे,

व शरीरानें मजबूत असून कालेंकरून नरमांसभक्षणाची क्रूर चाल त्यांच्यांत रूढ झाली असावी. आर्यांप्रमाणें त्यांच्यांत कित्येक रूपवान् असून प्रत्यक्ष रावण व त्याच्या नगरींतील कित्येक स्त्रीपुरुष सुंदर होते असें वर्णन रामायणांत आहे. रावणाचा बंधु कुंभकर्ण हा पर्वतप्राय शरीराचा राक्षस होता असें अर्वाचीन लेखकांनीं वर्णिलें आहे. त्याच्यासंबंधानें रामायणांत इतकेंच म्हटलें आहे कीं,

**यस्य प्रमाणाद्विपुलं प्रमाणं नेह विद्यते**

म्हणजे त्याच्यापेक्षां दुसरा कोणी मोठा किंवा उंच बांध्याचा नव्हता. दक्षिणेस यक्ष नांवांची दुसरी एक वसाहत होती. तेही राक्षसांचे भाऊबंध होत. कुबेर हा यक्ष होता. त्यानें रावणास लंका दिली वगैरे कथाभाग पुराणांत आहे. राक्षसांप्रमाणें यक्ष हे क्रूर नव्हते. कालेंकरून राक्षस व यक्ष यांच्यांत लढा पडून यक्षांस राक्षसांनीं आपल्या दक्षिणदेशांतून धुडकावून लाविलें असें दिसतें. दैत्य किंवा असुर हे नीचवृत्तीचे राक्षस नव्हत. ते हिंदुस्थानांत आलेल्या आर्यांचे भाऊबंद होत. धार्मिक व इतर बाबतींत त्यांच्यांत लढा पडून ते विभक्त झाले तरी त्यांच्यांत रामायण महाभारतकालापर्यंत बेटीव्यवहार चालू होता असें दिसतें. असुरांनींही कालेंकरून अध्यात्मज्ञान संपादन केलें असावें. केकय देशींचा राजा अश्वपति हा ब्रह्मज्ञानी होता असें उपनिषदांत सांगितलें आहे. हाच कैकयीचा पिता होय. तिच्या सौंदर्याला भुलून दशरथानें अश्वपतीस आसुरी विवाहपद्धतीप्रमाणें शुल्क किंवा वधूची किंमत देऊन तिची भार्यार्थ प्राप्ति करून घेतली. शुल्कादाखल दशरथानें कांहीं राज्य अश्वपतीस दिल्याचें रामायणांत सांगितलें आहे. कैकयाधिपतीस अश्वपति हें नांव पडण्याचें कारण हिंदुस्थानाबाहेरील त्याचा प्रदेश ( म्हणजे इराण हा ) घोड्यांबद्दल पूर्वकालापासून प्रसिद्ध आहे. युवराज राज्यभिषेकाच्या वेळीं कैकयीमुळें रामास वनवास घडला; तेव्हां भरत आजोळीं होता. तेथून त्यास बोलावून आणावें लागलें. हा प्रवास दूरचा असून तो ज्या मार्गानें आला असें वाल्मिकीनें लिहिलें आहे, त्यावरून पाहतां अफगाणिस्थानच्या पलीकडून तो आला असें दिसतें. शिवाय अश्वपतीनें आपल्या नातवास परत घरीं जातेवेळीं जे जिन्नस दिले त्यांवरून देखील तो हिंदुस्थानाबाहेरचा राजा होता हें सिद्ध होतें. रामायणांत असें सांगितलें आहे कीं, भरतास अश्वपतीनें लोकरीच्या उत्तमोत्तम शाली व घोंगड्या, हरिणाचीं कमावलेलीं कातडीं, अंत:पुरांतील सुंदर व मजबूत कुत्रे आणि शिकवून तयार केलेलीं मजबूत गाढवें दिलीं. ह्या सर्व वस्तु इराणांत उत्पन्न झालेल्या असाव्या. दुसरा आसुरी विवाह

माद्रीचा पंडूबरोबर झाला हा होय. त्या वेळीं मद्राधिपतीस भीष्मानें शुल्क दिलें. सुर व असुर यांच्यांत इतर कारणामुळेंही दळणवळण असे. असुर शिल्पकलेंत निष्णात होते असें दिसतें. मयासुरानें पांडवांच्या इंद्रप्रस्थ नगरींत अत्यंत शोभायमान व भव्य असें सभागृह बांधून दिलें असें महाभारत सांगत आहे. कांहीं वर्षांमागें पाटलीपुत्र ( पाटणा ) येथें प्राचीन वस्तुसंशोधनाचें काम चाललें, तेथें प्राचीनकालीं बांधण्यांत आलेले सभामंडप व राजगृहें जमिनींत सांपडलीं आहेत. त्यांचें काम पाहिलें म्हणजे भारतांतील वर्णन यथार्थ वाटतें व असुरी माया या नांवानें प्रसिद्ध असलेल्या कौशल्याचीं कामें आमच्या प्राचीन आर्यांच्या इराणांतील बंधूंच्या हातून झालीं होतीं, असें सिद्ध होत आहे. अशा प्रकारच्या शोधामुळें प्राचीन इतिहासावर बराच प्रकाश पडेल, यांत संदेह नाहीं. सुरांपासून विभक्त होऊन इराणांत कायमचें ठाणें देऊन राहिलेले

## इराणी हेच असुरांचे वंशज

होत असें म्हणावयास हरकत नाहीं. असुर ( अहुर ) हेच आपले पूर्वज असें इराणी मानतात, त्याचप्रमाणें अहुर हे देवदूत होत असें ते समजतात. परंतु देवांची गणना ते पिशाचांत करितात. देवांची देवता जो इंद्र त्याला पापिष्ट असें ते समजत असून ज्या त्वष्टयाचा सुर द्वेष करतात, त्यालाच ते पूज्य मानतात. सुरांप्रमाणें हेदेखील मित्राची ( सूर्याची ) पूजा करीत असत. ही मित्राची ( मिहिराची ) उपासना त्यांनीं पुराणकालीं या देशांत चालू केली असावी, असें कांहीं लेखांवरून दिसतें. ( यासंबंधाची माहिती रथसप्तमी या सदराखालीं पहावी. ) असुरांस सुरांचा देहदंडनाचा प्रकार आवडत नसे. यामुळें त्यांनीं उपोषणव्रतांस अजीबात फांटा दिला. सध्यां इराणी ( पारसी ) लोकांचे जे सण आहेत, त्यांचा उपोषणाशीं संबंध नाहीं. कालेंकरून परोपकार व शुचिर्भूतता यांचें महत्व निवेदन करून देहात्मवादी बनलेल्या आपल्या बांधवांस ताळयावर आणण्यासाठीं झोरोस्टर हा धर्मात्मा पुढें आला. हाच झोरोस्टर भविष्योत्तर पुराणांत–सांगितलेला शाकद्वीपांतील मिहिरगोत्री सुजिव्ह ब्राह्मणाचा नातु ( निक्षुभा नांवाच्या मुलीचा मुलगा ) जरशब्द किंवा जरशस्ट असावा.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, सुर, असुर, प्रल्हाद, विष्णु, इंद्र या सर्व काल्पनिक व्यक्ति नसून ऐतिहासिक आहेत. तसेंच विष्णूच्या ठिकाणीं मानलेला

नृसिंह हा देखील त्या कालचा हिरण्यकश्यपूचा वध करून असुरांचा पराजय करणारा सिंहासारखा बलवान् एक अदितेय असावा. या दृष्टीनें पाहतां नृसिंहजयंति हा ऐतिहासिक उत्सव आहे असें मानण्यास हरकत नाहीं. साधुवृत्तीच्या आर्यांनीं अत्यंत प्राचीनकालीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मिळविलेल्या यशाच्या स्मरणार्थ नृसिंहास अवतारांत गणून दरसाल त्याचा जयंत्युत्सव साजरा करण्याचा प्रघात पाडला असावा. परंतु सध्यां त्याचें ऐतिहासिकत्व अगदींच नष्ट होऊन तो केवळ धार्मिक सणांत गणला जात असल्यामुळें प्रारंभीं ( विषयप्रवेश या सदराखालीं ) आम्हीं त्याचा समावेश धार्मिक सणांतच केला आहे. धार्मिकदृष्ट्या विचार करतां देखील या सणावरून

## अत्यंत महत्वाचा बोध

घेतां येण्याजोगा आहे. नृसिंहवतार हा परमेश्वराचें सर्वसाक्षित्व सिद्ध करीत असून परमेश्वर स्थिर, चर, काष्ठ, पाषाणादिकांत भरून उरला आहे, याचें तो उदाहरण होय. घराचा जो मुख्य खांब त्याच्या खालीं विष्णूप्रीत्यर्थ वास्तु-देवतेची स्थापना करीत असतात. घराला आधारभूत खांब असून त्याच्यांत परमेश्वराचें अधिष्ठान आहे असें न मानणारांचें घर व प्रपंच हीं कशीं मोडकळीस येतात, याचें चित्र उन्मत्त हिरण्यकश्यपूच्या कथेवरून काढतां येईल. प्रवृत्तिपर विचाराचे जे लोक असतात, त्यांच्या हातून अनन्वित कृत्यें घडतात. त्यांना स्वतःच्या पराक्रमाविषयीं विशेष घमेंड असते. परंतु पापाचा घडा पूर्ण भरतांच त्यांचा नाश अकल्पित रीतीनें कसा होतो, हें नृसिंहावतार सिद्ध करीत आहे. आनुवंशिक संस्कारामुळें दुष्टांचीं मुलें दुष्ट निघावयाचीं हें जरी सकृद्दर्शनीं खरें दिसतें, तरी त्यांच्या पोटीं प्रल्हादासारखीं रत्नें जन्मास येऊन कुलाचा उद्धार करतात. ज्यांनीं मनोदेवतेस श्रेष्ठ मानून तिच्या आज्ञेप्रमाणें प्रापंचिक सुखदुःखाची पर्वा न धरितां सत्याचा मार्ग स्वीकारला, त्यांना अनेक कष्ट सोसावे लागले तरी निवृत्तिपर विचारांनीं आपल्या मनास दुःखाचा स्पर्श होऊं न देतां, त्यांनीं ईश्वराच्या ठायीं निष्ठा कायम केली. अशा अनेक लहान थोर साधूंचीं नांवें हिंदूंच्या धर्मविषयक वाङमयास भूषणावह होऊन राहिलीं आहेत. सत्य मार्ग श्रेष्ठ मानून पित्याची अवज्ञा करणारा प्रल्हाद, मातेची अवज्ञा करणारा भरत, बंधूचा पक्ष सोडणारा बिभीषण, गुरूशीं युद्ध करण्यास उद्युक्त झालेला भीष्म व प्रत्यक्ष मामाचा वध करणारा श्रीकृष्ण किंवा अगदीं आधुनिक कालांतील

उदाहरण द्यावयाचें म्हणजे, अत्यंत बलाढय राजसत्तेशीं असहकार करून ऐहिक सुखांची पर्वा न धरतां आनंदानें कारागृहवास पतकरणारे व **लोकमान्य** व **महात्मा** या थोर पदास चढलेले **टिळक** व **गांधी** या सर्वांस श्रेष्ठ असें मानण्यांत येतें, यांतील गोम तरी हीच आहे कीं, सत्यपरायणतेचा व आत्मप्रचीतीचा अनुपम गुण आर्यांत परंपरागत आहे. त्याच्या परिपालनासाठीं त्यांनीं कायिक व मानसिक त्रास सोसण्याची अनेकदां तयारी दाखविली आहे. प्रल्हाद हा या देशांत भक्तीचें बीं पेरणारा पहिला विष्णुभक्त असून तो कुलानें दैत्य होता, तरी सुरांसही वंद्य झाला. असो. आपण कितीही शक्तिमान् असलों तथापि सन्मार्गानें न जातां अनीतीनें वागून दीनदुबळ्यांस त्रास दिला असतां, सर्वसाक्षी असा परमेश्वर आपणांस दंडिल्याशिवाय रहाणार नाहीं, एवढें जरी आपण नृसिंहावताराच्या कथेवरून शिकलों तरी आपलें कल्याण होईल. परमेश्वर हाच आमच्या प्रपंचाचा खांब आहे. यासाठीं सर्व कृत्यें करीत असतां तो आमच्या सन्निध राहून आम्हांस सांभाळतो, किंवा शासन करितो, ही भावना मनांत दृढ होण्यास नृसिंहाची गोष्ट कारणीभूत होवो.

---

## गंगोत्सव किंवा दशहरा.

ज्येष्ठ शुक्ल प्रतिपदेपासून दशमीपर्यंत प्रसिद्ध तीर्थांच्या ठिकाणीं जो उत्सव होत असतो, तो गंगोत्सव या नांवानें प्रसिद्ध आहे. यास '**दशहरा**' असेंही म्हणतात. गंगानदीस सर्वांत श्रेष्ठ तीर्थ असें मानिलें आहे. गंगेचा प्रवाह या देशांत चालू होण्याचें कारण रामायणांतील गंगाख्यानांत दिलें आहे त्यावरून दिसतें कीं, इक्ष्वाकु कुलांतील सुप्रसिद्ध राजा भगीरथ यानें ही नदी या देशांत आणिली. या वंशांत सगर नांवाचा एक प्रख्यात राजा होता. त्यानें एकदां अश्वमेध यज्ञ करण्याचें योजून मेधार्थ योजलेला अश्व देशोदेशींच्या राजांकडून आपलें सार्वभौमत्व कबूल करविण्यासाठीं सेनेसह पाठवून दिला. तो परत आला नाहीं, हें पाहतांच त्याचे आठ सहस्र पुत्र अश्वशोधार्थ निघाले. तेही परत आले नाहींत. पुढें सगराचा नातु अंशुमान हा आपल्या चुलत्यांच्या शोधार्थ निघाला. पूर्वेस जातां जातां कपिलाच्या आश्रमाजवळ त्याला तो अश्व सांपडला. कपिलानें त्यास कळविलें कीं 'तुझे चुलते माझ्या रोषामुळें येथेंच भस्म होऊन

पडले आहेत. त्यांचा उद्धार होण्यास एकच मार्ग मोकळा आहे आणि तो हा कीं गंगेचा पवित्र ओघ त्यांच्या रक्षेवरून वाहून जाईल असें केलें पाहिजे.' अश्वासह परत आपल्या घरीं येऊन अश्वमेधज्ञाची पूर्तता केल्यावर तो आपल्या चुलत्यांच्या उद्धाराच्या कार्याला लागला. परंतु त्यास गंगेला प्रसन्न करून घेतां आलें नाहीं. अंशुमानाच्या मागून त्याचा पुत्र दिलीप व दिलीपामागून त्याचा पुत्र भगीरथ यांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले. शेवटीं भगीरथाच्या प्रयत्नांस यश आलें व गंगा नदी प्रसन्न झाली. असंख्य अडचणी, नाना प्रकारचीं विघ्नें व अपरिमित क्लेश यांच्या योगानें स्वकार्याचा त्याग करण्याचा प्रसंग अनेक वेळां भगीरथावर आला. तथापि त्यानें नेटानें यत्न चालविला व त्यांत त्याला यश आलें. यामुळें गंगेस भागीरथी हें नांव पडलें. 'भगीरथ प्रयत्न' हे शब्द 'परमावधीचा प्रयत्न' या अर्थी वापरले जातात. गंगेनें अवतीर्ण होण्यापूर्वी भगीरथास असा प्रश्न केला—'मी भूमीवर उतरलें, तर लोक पापक्षालन करून मला मलीन करतील, त्यास उपाय काय ?' भगीरथानें उत्तर दिलें—'तूं साधुसंतांच्या समागमामुळें निर्मल होशील.' याप्रमाणें सांगितल्यावर गंगा स्वर्गांतून विष्णूच्या चरणापासून निघाली, ती शंकराच्या मस्तकावरून खालीं पृथ्वीतलावर वहात वहात हरिद्वार, प्रयाग, वाराणशी वगैरे स्थानांवरून पूर्वसद्रास जाऊन मिळाली. सगरांच्या पुत्रांचा तिनें उद्धार केला. ज्या समुद्रासन्निध सगराचे पुत्र रक्षा होऊन पडले होते त्या समुद्रास सागर हें नांव प्राप्त झालें. ज्येष्ठ शु. १० मी भौमवारीं हस्त नक्षत्रावर भागीरथीनें भूलोकीं आगमन केलें. यावरून हा दिवस गंगोत्सवाचा ठरला. गंगास्नानाच्या योगानें दहा पातकांचें क्षालन होतें असें सांगितलें असल्यावरून गंगेस दशहरा असें म्हणतात. कठोर भाषण, असत्य भाषण, चहाडी, वृथा वल्गना, चौर्यकर्म, हिंसा, अनीतिकारक विषयोपभोग, परापहार, अनिष्टचिंतन व दुराग्रह यांची दहा पातकांत गणना केली आहे.

## शास्त्रोक्त विधि व चालू रूढि.

ज्येष्ठ शु. १ देपासून १० मीपर्यंत गंगेंत किंवा इतर नदींत स्नान करावें. गंगेची प्रतिमा देवीप्रमाणें तयार करून तिची पूजा करावी. त्याचप्रमाणें ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, सूर्य, हिमालय व भगीरथ यांचीही पूजा करून दहा शेर तीळ, दहा शेर यव आणि दहा गाई दहा ब्राह्मणांस द्याव्या. असें केल्यानें दशजन्मींचीं दहा पातकें नष्ट होतात, असें स्कंदपुराणांत लिहिलें आहे. नदींत राहणाऱ्या

मत्स्य, बेडूक, मगर व इतर जलचरांच्या व हंस, क्रौंचादिक पक्षांच्या प्रतिमा करून नदींत विसर्जन कराव्या. तसेंच तीळ, घृत व सक्तु यांहींयुक्त अर्घ्य नदीस अर्पण करावें. दहा ब्राह्मण सुवासिनींसह भोजन करावें. ही ज्येष्ठ शुद्ध १० मी ज्या दिवशीं बहूत योग असतील त्या दिवसाचीच घेतात. कारण त्यामुळें अधिक पुण्य लाभतें. या उत्सवासंबंधानें चालू रूढि पाहतां असें दिसतें कीं, कृष्णा, वेणी, गोदावरी, नर्मदा, गंगा इत्यादि प्रसिद्ध नद्यांच्या कांठीं असलेल्या गांवांत गंगोत्सव होत असतो. नाशिक, वांई, काशी, हरिद्वार, त्रिवेणीसंगम या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर हा उत्सव होतो. नदीप्रीत्यर्थ देवीच्या मूर्तीची स्थापना करून तिला त्या नदीचें नांव देण्यांत येतें. उदाहरणार्थ गोदाबाई, कृष्णाबाई वगैरे. गंगेस तर उत्तर हिंदुस्थानांत गंगाजी, गंगामाता याच नांवानें संबोधित असतात. गंगोत्सवाच्या दिवशीं दान, कथाकीर्तन, ब्राह्मणभोजन हीं होत असतात. हिंदुधर्मांत स्नानमाहात्म्य विशेष असून स्नानाच्या योगानें दहा फळें प्राप्त होऊन शिवाय पुण्यलाभाच्या योगानें उत्तम पुनर्जन्म लाभतो, असें शास्त्रांत सांगितलें आहे. यासाठीं विशेष प्रसंगीं या देशांत प्रसिद्ध तीर्थांच्या ठिकाणीं

## स्नानयात्रा

भरत असतात. मकरसंक्रांतीस अशी एक मोठी जत्रा हुगळी व गंगानदीच्या संगमाशीं भरते. या संगमास गंगासागर असें म्हणतात. हा स्नानाचा मेळा पाहिला म्हणजे हिंदूंच्या अंतःकरणांत तीर्थस्नानासंबंधानें पूज्यत्वभाव किती आहे हें दिसतें. बंगाल, ओरिसा, दक्षिण देश, नेपाळ, पंजाब, उत्तर हिंदुस्थान वगैरे भागांतून कमींत कमी एक लक्ष यात्रेकरू तेथें एकत्र होतात. त्या वेळीं आजूबाजूस रहाणारे लहानमोठे व्यापारी तेथें येत असतात. हा मेळा तीन दिवस चालतो. असंख्य यात्रेकरू त्या वेळीं फळें, रत्नें वगैरे नदीस अर्पण करतात. पोटीं अपत्य नसल्यास गंगेची प्रार्थना करून संतानप्राप्ति झाल्यावर प्रथमचें मूल गंगासागरास अर्पण करीन, असा नवस दंपत्य करीत व मूल झाल्यास तें गंगासागरास अर्पण करण्याची चाल पूर्वकालीं होती असें सांगतात. परंतु सध्यां असा प्रकार मुळींच दृष्टीस पडत नाहीं. स्नानयात्रेच्या वेळीं क्षौरविधि करून पितरांस पिंड देण्याचीही चाल आहे. गंगासागरावर कपिलाचें देवालय आहे. तेथील व्यवस्था कार्तिक मेळ्याच्या वेळीं वैष्णव महंताकडे व माघमेळ्याच्या वेळीं शैव महंताकडे असते. माघ मेळ्याचें उत्पन्न पांच रामानंदी मठांस मिळतें.

देवालयासमोर राम, हनुमान व कपिलाच्या सुमारें चार हात उंचीच्या मूर्ति आहेत. देवालयाच्या मागें सीताकुंड नांवाचा एक गोड पाण्याचा लहान तलाव आहे. त्यांत बारा महिने पाणी तुडुंब भरलेलें असतें; त्यांतील तीर्थ सर्व यात्रेकरू ग्रहण करतात. त्याबद्दल देवालयाच्या महंतास थोडीशी दक्षणा द्यावी लागते.

चैत्र व. १३ स ' वारुणि ' नांवाचा स्नानाचा उत्सव उत्तर देशांत चालतो. शतभिषा व शुभयुज् या नक्षत्रांचा योग या दिवशीं असल्यास या उत्सवाला महावारुणि असें म्हणतात. महावारुणीचा योग आल्या वेळीं गंगेंत स्नान केल्यास दश लक्ष सूर्यग्रहणांच्या वेळीं स्नान केल्याइतकें पुण्य पदरीं पडतें व महामहावारुणीच्या वेळीं गंगास्नान केल्यास तीस लक्ष पूर्वजांचा उद्धार होतो, अशी तेथील हिंदूंची भावना आहे. बंगाल व ओडिसा प्रांतांतील हजारों यात्रेकरू त्या वेळीं चिनसुरा येथून दोन कोस अंतरावर असणाऱ्या त्रिवेणी संगमावर स्नानासाठीं एकत्र होतात. या गांवांस 'छोटी प्रयाग' असें नांव पडलें आहे. दशहराच्या दिवसांतही तेथें मोठी स्नानयात्रा भरते. हस्तनक्षत्राचा योग असल्यास त्या वेळचा यात्रेकरूंचा भरणा विशेष असतो. भाविक लोक नदीच्या एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्यापर्यंत फुलांच्या माळा बांधून तीर्थाच्या ठायीं असलेली आपली भक्ति व्यक्त करितात.

ज्येष्ठ पौर्णिमेस ओडिसा प्रांतांतील पुरीक्षेत्रीं प्रचंड स्नानयात्रा भरते. त्याच वेळीं तेथें मोठा रथोत्सव होतो. हा रथोत्सव पाहण्यास दीड लक्षापर्यंत लोक दूरदूरच्या प्रांतांतून येतात. सर्व यात्रेकरूंच्या मुखांतून सद्भावपूर्वक निघालेल्या ' जय जय जगन्नाथ ' या ध्वनीनें आकाश दुमदुमून जातें. गीतेंत सांगितल्याप्रमाणें अत्यंत पवित्र अशा वर्तनाच्या ज्ञान्यापासून तों पतित मानलेल्या थेट चांडाळापर्यंत सर्व लोकांस या उत्सवाच्या वेळीं जगन्नाथाचें दर्शन घेण्यास धर्माची आडकाठी नसल्यामुळें जगन्नाथ ही देवता अत्यंत प्रिय झाली आहे. या वेळीं वैष्णव धर्माचें अत्यंत उज्ज्वल व उदार स्वरूप दृष्टीस पडतें. उत्सवास प्रारंभ होण्यापूर्वी जगन्नाथाच्या मूर्तीस सुगंधि तेलें लावून स्नान घालतात व उत्तम पोषाख करून रथावर बसवितात. या स्नानविधीवरूनच या जत्रेला स्नानयात्रा असें नांव पडलें आहे. या वेळीं जे हजारों यात्रेकरू येतात ते त्याच वेळीं गंगास्नान करीत असतात. हरिद्वार येथें कुंभमेळा ( माघांत ) भरतो.

बंगाल्यांत आषाढ व० ३० ला गोसहस्री नांवाची स्नानयात्रा भरते. त्या वेळीं गंगेंत स्नान केल्याच्या योगानें एक सहस्र गाई ब्राह्मणास दान दिल्याचें पुण्य मिळतें व त्या गाईच्या अंगावर जितके रोमांच आहेत, तितकीं वर्षें त्या पुण्याच्या योगानें स्वर्गांत रहाण्यास सांपडतें असें हिंदू समजतात.

सप्तर्षियोग, कपिलाषष्ठियोग, सिंहस्थपर्वणि वगैरे योग प्राप्त झाल्यावेळीं क्षेत्राच्या ठिकाणीं तीर्थांत स्नान करण्याच्या निमित्तानें हजारों यात्रेकरू दूर दूरच्या प्रदेशांतून येत असतात. सिंहराशींत गुरु असलेल्या मुदतींत गोदावरी नदींत, कन्याराशींत असतांना कृष्णानदींत, कुंभराशींत आल्यावेळीं गंगा व यमुना नदींत स्नान केल्यानें पुण्यप्राप्ति होते असें पुराणांत सांगितलें आहे. यासाठीं असा योग आल्यावेळीं त्या त्या नदींच्या किनाऱ्यावरील क्षेत्रांत यात्रेकरूंची गर्दी जमते. याशिवाय सूर्यचंद्राचा एकाच कालीं उदय, मकरराशींत सूर्य व श्रवण नक्षत्रीं चंद्र, पौष महिना व रविवार असा योग जुळून आल्यास अर्धोदय असें म्हणतात. या दिवशीं सर्व नद्या गंगेप्रमाणें पुनीत मानून त्यांच्यांत स्नान करणें अत्यंत श्रेयस्कर मानिलें आहे. २० पासून २५ वर्षांनीं असा योग येत असतो. याहीपेक्षां कपिलाषष्ठीयोग हा अत्यंत श्रेष्ठ मानतात. भाद्रपद महिन्याच्या व० ६ स मंगळवारीं रोहिणी नक्षत्रीं चंद्र व हस्तनक्षत्रीं सूर्य व व्यतिपात योग या गोष्टी जुळून आल्यास कपिलाषष्ठि योग म्हणतात. हा ६० वर्षांनीं एकदां येतो. नारदाचीं साठ मुलें म्हणजे संवत्सरें यांच्या प्रारंभींचा दिवस कपिलाषष्ठी आहे असें मानतात. ता० १२ अक्टोबर १९१२ रोजीं हा योग आला होता. या दिवशीं स्नानयात्रा सर्वत्र नद्या व समुद्र यांच्या किनाऱ्यावर असलेल्या क्षेत्रांत व गांवांत भरतात. 'गंगानदीस सुरसरिता' किंवा

## देवांची नदी


असें नांव आहे. तिच्या तीन शाखा कल्पून तिला ' त्रिपथगामिनी ' असें नांव प्राचीन आर्यांनीं दिलें आहे. तिची एक शाखा स्वर्गांत, दुसरी मृत्युलोकांत व तिसरी पाताळांत याप्रमाणें वहात आहेत अशी पूर्वकालापासून समजूत आहे. कालिदासानें तिच्यासंबंधानें ' त्रैस्रोतसम् वंदे' असें म्हटलें आहे. गंगेचें पाणी शुद्ध व रोगपरिहारक असल्याचें शास्त्रीय शोधांतीं ठरलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत गंगेला ' मा ' ( आई )असें म्हणतात. ' गंगाजीकी कसम् ' ही उत्तर

प्रांतस्थ आर्यांची शपथ वाहण्याची पद्धति आहे. हरिद्वार, प्रयाग व काशी या ठिकाणांस गंगेमुळेंच महत्व प्राप्त झालें. बद्रिनाथ, केदार व गंगोत्री येथपर्यंत प्रवासाचे हाल सोसून प्रत्यहीं जे असंख्य यात्रेकरू जातात, यांचा मुख्य उद्देश गंगेचें दर्शन घेणें हाच असतो. गंगेच्या कांठचा प्रदेश सुपीक व सुंदर आहे. बद्रिनाथ व लछमनझुला येथील गंगेचा कांठ, तिचा प्रवाह व आजूबाजूची नैसर्गिक रचना हीं पाहिलीं असतां ती जागा प्राचीन ब्रह्मवेत्त्या ऋषिजनांनीं व साधूंनीं पसंत करून त्या ठिकाणीं ज्ञानतप कां चालविलें, हें समजून येणार आहे. ती जागा इतकी प्रशांत व शुद्ध स्वरूपाची आहे कीं कितीही चिंताग्रस्त मनुष्य तेथें गेला असतां त्याचें चित्त प्रसन्न होऊन तो ईश्वरचिंतनांत मग्न होतो. गंगेची महति अनेक साधूंनीं गायिलेली आहे. कवींनीं तिच्यासंबंधाचीं प्रेमळ गीतें रचलेलीं आहेत. प्रसिद्ध श्रीशंकराचार्य म्हणतात, ' हे देवी, तुझ्या जलाचें पान करून सर्व विषयांपासून अलिप्त होत्साता म्यां भगवंताचें पूजन करावें हीच माझी इच्छा आहे. तूं तापत्रयाचें निवारण करणारी असून स्वर्गास जाण्यासाठीं शिडीप्रमाणें आहेस. ' वाल्मिकी कवीनें म्हटलें आहे-"माते, पुष्पमालेप्रमाणें पृथ्वीस शोभा देणाऱ्या व स्वर्गास जाण्याची वाट होऊन राहिलेल्या पर्वतकन्ये, तुला मी वंदन करतों. तुझ्यावरील तरंगांचें सौंदर्य अवलोकन करीत व तुझें जलपान करीत तुझ्या कांठीं मी वास करून रहावें. तुझें नामस्मरण करीत असतांनाच माझा देह पडो." कालिसादानें पुढील शब्दांनीं गंगेची स्तुति केली आहे. 'हे देवी, जे तुझ्या तीरावर राहतात, त्यांना गर्व नाहीं, ते ज्ञानी आहेत, मिताहारानें त्यांनीं आपले देह शुद्ध केले आहेत व सुंदर युवतींनीं गजबजलेल्या भव्य राजमंदिरांचा व राजोपभोगांचा त्याग करून ते आनंदांत आहेत.' या प्रकारचे विचार जागृत करणाऱ्या गंगेचें महत्व अद्यापि कमी झालेलें नाहीं यांत आश्चर्य कोणतें ? तीर्थ या नात्यानें

## वेदकालीं गंगेची ख्याति

नव्हती. तिचें अस्तित्व तत्कालिन आर्यांस माहीत होतें; तथापि एवढी गोष्ट खरी कीं, ऋषींनीं नद्यांची स्तुति अनेक परीनें केली आहे. नद्यांमुळें शेतकीला मदत होऊन संतान व सुख यांची अभिवृद्धि आर्यकुलांत झाली. यामुळें त्यांनीं नद्यांचे उपकार मानिले. प्राचीन काव्यांत नदीस सुंदर स्त्रीची उपमा दिलेली आहे. सरस्वती नदी तर प्रत्यक्ष देवताच असें मानीत. सर्व यज्ञयागादिक सरस्वतीच्या

## गंगावतरण.



शिरः शार्वं स्वर्गात्पशुपति शिरस्तः क्षितिधरं ।
महिध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम् ।
अथो गंगा सेयं पदमुपगता स्तोकमथवा
विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ।

(पृष्ठें १०८ व ३०८ पहा)

Joshi Art P. Works, Bombay. 1.

कांठीं होत असून पुराणकालीं तिला ब्रह्मयाची दुहिता व पत्नी बनविण्यांत आलें. ( यासंबंधाचें विवेचन ‘ दत्तजयंति ’ या सदराखालीं पहावें. ) ही सरस्वती नदी कालेंकरून गुप्त झाली. तथापि तिचा प्रवाह ज्या प्रदेशांतून वहात होता तो कुरुक्षेत्र व स्थानेश्वर यांच्या दरम्यानचा प्रदेश अद्यापि पवित्र मानण्यांत येतो. वेदकालीं नद्यांची योग्यता आर्यांस किती वाटत होती हें पुढील ऋग्वेदांतील ( मंडळ १, सू० २४ ) उताऱ्यावरून दिसून येईल.

**अप्सु मे सोमो अब्रवीदन्तर्विश्वानि भेषजा ।**
**अग्निं च विश्वशम्भुवमापश्च विश्वभेषजीः ॥ २० ॥**
**आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे३ मम ।**
**ज्योक् च सूर्यं दृशे ॥ २१ ॥**
**इदमापः प्र वहत यत्किं च दुरितं मयि ।**
**यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतम् ॥ २२ ॥**
**आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि ।**
**पयस्वानग्न आ गहि तं मा सं सृज वर्चसा ॥ २३ ॥**

अर्थ–मला सोमानें सांगितलें कीं जलांचे अंतरंगीं सर्व औषधी आहेत आणि अग्नि हा सर्वांचा कल्याणकर्ता आहे. उदक हें खरोखर सर्वरोगपरिहारक होय ॥ २० ॥ हे जलांनो, माझें शरीरस्वास्थ्य सदोदित रहावें व मला चिरकाल सूर्याचें दर्शन घेतां यावें ह्मणून मला उत्कृष्ट औषध द्या. ॥ २१ ॥ हे जलांनो जो कांहीं दुष्टपणा माझ्या अंगीं वास करीत असेल, कोणाशींही मीं जें शत्रुत्व आचरिलें असेल, जें मीं कोणाचें वाईट इच्छिलें असेल अथवा जें मीं असत्य वर्तन केलें असेल, तें तुम्ही सर्वथैव धुवून टाका ॥ २२ ॥ हे जलांनो, आज मी तुमच्या समीप आलों आहें व तुमच्या मधुर रसांशीं संयुक्त झालों आहें. हे जलनिवासी अग्निदेवा, येथें प्राप्त हो आणि मला तेजाची जोड करून दे ॥ २३ ॥ याप्रमाणें पापक्षालन करण्याबद्दल जलाची व नद्यांची प्रार्थना केलेली असून त्यांजपाशीं तेज, संतति व आयुष्य यांची याचना केलेलीहि आढळते. एके ठिकाणीं ( मंडळ २, सू. १६ ) सरस्वती नदीची प्रार्थना करितांना असे उद्गार काढले आहेत “ हे श्रेष्ठ माते, हे श्रेष्ठ नदी, हे श्रेष्ठ देवते, सरस्वती, आह्मी जवळ जवळ सांदींतच पडल्यासारखे झालों आहों; तर हे माते, आमची तूं प्रख्याति कर.”

## पुराणकालीं नद्यांची योग्यता

धार्मिकदृष्टया वाढत गेली. नद्यांत मुख्य देवतांचा अंश असल्याचें पुराणांतील एका कथेंत सांगितलें आहे. एकदां ब्रह्मदेवादीक सर्व देवतांनीं एका शुभ कार्यास आरंभ करतेवेळीं सावित्रीचा अपमान केला. त्यामुळें तिनें रागानें सर्व देवतांना तुह्मी नद्या व्हा असा शाप दिला. त्याप्रमाणें विष्णूची कृष्णानदि, महादेवाची महानदी व ब्रह्माची ब्रह्मपुत्रा बनली. इतर देवदेवता यांच्याही नद्या झाल्या. यावरून असें दिसतें कीं, पुराणकालीं सर्व नद्यांना पवित्र मानीत असत. त्यांना तीर्थ असें समजून त्यांच्यांत स्नान केल्यानें पापक्षालन होतें अशी हिंदूंची दृढ-भावना झाली होती. 'सागरे सर्व तीर्थानि' अर्थात् सर्व नद्या समुद्रास जाऊन मिळतात यासाठीं तो सर्व तीर्थांचा संचय अतएव परमपवित्र आहे असें हिंदू मानूं लागले. मूर्तिपूजेचें महत्त्व वाढत गेलें तेव्हां जागोजागीं देवालयें स्थापन झालीं. विशेषतः नदीकांठीं निसर्गतः सुंदर अशा स्थानीं भाविक लोकांनीं मोठमोठीं देवालयें बांधल्यावर उपाध्यांच्या योजकतेमुळें अनेक उत्सव जन्मास आले व तीं स्थानें क्षेत्रेंच बनलीं. काशीविश्वेश्वराचें दर्शन घेतल्यावर गंगाजलानें भरलेला लोटा घेऊन हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकाशीं असलेल्या रामेश्वरावर भक्तिपुरःसर ओतणें व तेथून सेतूजवळची वाळू आणून पुनः १५०० मैल दूर असलेल्या गंगेच्या पात्रांत टाकणें व तिचें तीर्थ घेतल्याबद्दल मोबदला देणें वगैरे प्रकार अद्यापि चालू आहेत. या प्रकारच्या यात्रेकरूंस मूर्ख म्हणून हंसण्या-पेक्षां ज्या भक्तीच्या जोरावर हें सर्व कार्य भाविक लोक अत्यानंदानें करतात, त्या भक्तीच्या मुळाशीं असलेल्या विश्वासाची व तो उत्पन्न करून देणाऱ्या पुराण-कारांची तारीफ करावी हें योग्य आहे. यात्रा व यात्रेकरू यांची हिंदुस्थानांत गर्दी आहे. यात्रा म्हणजेच तीर्थयात्रा असें मानलें जातें. गंगानदीचें दर्शन पुण्यकारक असून तिला संतुष्ट करण्यासाठीं साखरेचे गोण व अन्नाच्या थाली तिच्यांत ओतणें हें सत्कृत्य आहे असें समजण्यांत येत असल्यामुळें आजकाल कित्येक लक्ष्मीपुत्र अन्नशर्करादिक अर्पण करून गंगेच्या ठायीं आपलें प्रेम व्यक्त करितात. कित्येक गंगा, यमुना वगैरे नद्यांच्या अनेक प्रदक्षणा करण्याचा संकल्प करून सबंध आयुष्य पांयीं चालण्यांत घालवितात. यमुनेच्या प्रवाहाच्या जवळून केवळ संन्याशाप्रमाणें सर्व प्रकारच्या सुखोपभोगाचा त्याग करून केवळ पुण्य-प्राप्तीच्या हेतूनें रात्रंदिवस प्रवासाचे हाल सोसणाऱ्या या तीर्थभक्तांची श्रद्धा

तरी अत्यंत तारीफ करण्यालायक खरी. अवतार मानलेल्या रामचंद्रानें ज्या भागीरथीचें पावित्र्य व महत्व जाणलें, त्या नदीस आजमितीसही सर्व हिंदु ह्मणविणारे पूज्य मानून तिची भक्तिपूर्वक पूजा करीत असतात यांत आश्चर्य नाहीं. देहांतून प्राण जात असतां गंगोदकाचा थेंब तोंडांत टाकतां यावा म्हणून सर्व उच्च वर्गांतील हिंदु आपल्या घरीं गंगोदक आणून तें देव्हाऱ्यांत ठेवीत असतात. मृताच्या अस्थि गंगेंत टाकणें अत्यंत धार्मिक कृत्य मानलें जातें. 'मला गंगास्नान घडलें' हे शब्द उच्चारतांना भाविक हिंदूंस परमानंद होतो. गंगानदीच्या बरोबरीचें जरी इतर नद्यांस महत्व नाहीं, तरी त्या व त्यांच्या लहान मोठ्या शाखा पवित्र मानिल्या जातात. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व नद्या, अनेक तलाव, कित्येक स्वयंसिद्ध कुंडें व सरोवर आणि या देशाच्या दक्षिणभागीं, पूर्वेस व पश्चिमेस असणारा समुद्र या सर्वांची गणना तीर्थांमध्यें होत असून लक्षावधि लोक त्यांच्यांत स्नान करीत असतात. दरसाल लक्षावधि यात्रेकरू निरनिराळ्या प्रसंगीं काशी, प्रयाग, गंगोत्री वगैरे ठिकाणीं जाऊन गंगेचें दर्शन घेऊन येतात. तिच्या पात्रांत पितरांप्रीत्यर्थ पिंड अर्पण करून किंवा त्यांच्या अस्थि टाकून त्यांचा आपण उद्धार केल्याचें भाविक जन समजतात.

चालू कलियुगाच्या माथीं अनेक पापें लादण्यांत आलीं आहेत. त्यांच्या योगानें कलीचीं पांच हजार वर्षें संपतांच

## भागीरथीचा लोप

होईल असें सनत्कुमार संहितेंत सांगितलें असून कलियुगाच्या अंतीं ती जाईल असें विष्णुपुराणांत लिहिलें आहे. सरस्वतिनदी एका कालीं या देशांत वहात होती. तिचा जसा कालेंकरून लोप झाला तसाच गंगेचाही होईल असें भाकीत विष्णुपुराणकारांनीं केलें असल्यास न कळे. तसेंच कलियुगाचीं ५००० वर्षें होतांच ही नदी मृत्युलोक सोडून जाईल हें भविष्य खरें असतें, तर आज तिचा लोप व्हावयास पाहिजे होता; परंतु ती वहात आहे. सनत्कुमार संहितेंत असेंहि म्हटलें आहे कीं, २५०० वर्षांनंतर ग्रामदेवता नाहींशा होतील. प्राचीन इतिहास पाहतां या देवतांची उत्पत्तीच मुळीं अगदीं अलीकडची म्हणजे सुमारें हजार दीडहजार वर्षांपूर्वींची आहे. कलियुगाचा गतकाल लक्षांत घेतां या देवतांचा लोप होऊन आज अडीच हजार वर्षें व्हावयास पाहिजे होतीं. यावरून एकढेंच निष्पन्न होतें कीं, अशा वचनांवर भिस्त ठेवण्यांत विशेष अर्थ नाहीं. गंगानदीसंबंधाचा

उल्लेख अत्यंत प्राचीन जो ऋग्वेद त्यांत सांपडतो असें वर आलेंच आहे. एके ठिकाणीं अशी ऋचा आहे कीं,

**अधि बृबुः पणीनां वर्षिष्ठे मूर्धन्नस्थात् ।**
**उरुः कक्षो न गाङ्ग्यः ॥** ( मं. ६, सू० ४५-३१ )

(**अर्थ**—गंगेच्या तटाकावर मोठा विस्तीर्ण वृक्ष उगवावा त्याप्रमाणें पणीच्या कुलांत उच्च शिरोभागीं हा बृबु जाऊन बसला आहे. ) सध्यां गंगेची शाखा जी यमुना तिचा उल्लेख ( ५ व्या मंडळांत सू. ५-१७ ) वेदांत असून तिच्या कांठावरील गोधनाचा व घोड्यांच्या पथकांचा त्यांत नामनिर्देश केला आहे. यावरून सगर व भगीरथ हे जन्मास येण्यपूर्वीं बरींच वर्षें गंगानदी या देशांत होती हें सिद्ध होतें. असें असूनही तिला भगीरथानें या लोकीं आणिलें याचा अर्थ काय, हा प्रश्न सहज उद्भवतो. विचार केला असतां असें दिसतें कीं या कथाभागांत प्राचीन इक्ष्वाकुवंशाच्या साम्राज्याच्या विस्ताराचा इतिहास गोंविला गेला आहे. कपिल* गंगेच्या मुखाजवळ पोहोंचला होता, तेथपर्यंत सगराचे साठ सहस्र पुत्र अर्थात् पुत्रवत् पाळले जाणारे त्याचे प्रजाजन पूर्वेकडील प्रदेश काबीज करण्याच्या मोहिमेवर गेले. ते सर्व मृत्युमुखीं पडले. त्यांनीं हातीं घेत-लेलें महत्कार्य त्यांच्या पश्चात् तीन पिढया चालवून भगीरथानें आर्यांची विजय-पताका गंगासागरावर रोविली. सगराचें स्मरण रहावें म्हणून त्या समुद्रास सागर हें नांव दिलें, व ज्या भगीरथानें अनेक अडचणींतून पार पडून व संकटें सोसून गंगानदीच्या तीरावरील सर्व प्रदेश काबीज केला, त्यांतून वाहणाऱ्या नदीस भागीरथी हें नांव देण्यांत आलें. अर्थात् हा सर्व इतिहास आहे. त्याच्यावर दंत-कथा, अतिशयोक्ति वगैरेंचीं आवरणें पडल्यामुळें मूळ इतिहासाची ओळख पटे-नाशी झाली.

## आर्यांची मूळची वसाहत

पंजाबांत होती. परंतु त्यांच्यांत लोकसंख्येची वाढ होत गेली, तेव्हां

---

* हा बुद्धापूर्वीं सुमारें १००।१५० वर्षें होऊन गेलेला सांख्य सूत्रकार कपिल-मुनि नसावा. कारण हा भगीरथानंतर कित्येक शतकें होऊन गेल्यावर जन्मास आला. कपिलाच्या आज्ञेवरून कपिलवस्तु हें शहर इक्ष्वाकु वंशाच्या राजांनीं उभारिलें असें पालीभाषेंतील पालीदंतवंश यांत लिहिलें आहे. हा कोणता कपिल हें समजत नाहीं.

लहानशा क्षेत्रांत राहणें त्यांना अशक्य झालें. वेदकालीं कित्येक साहसी आर्य पंजाबचा त्याग करून गंगा व यमुना नदींच्या दोन्ही बाजूंस वसाहत करूं लागले होते. कालेंकरून त्यांच्यांत पांच कुलें झालीं. या कुलांनीं जे निरनिराळे पांच प्रदेश काबीज केले ते पंचक्षिति या नांवानें ओळखले जात. यांपैकीं कुरु हे एका कुलाचे होते. ऐतरेय ब्राह्मणावरून समजतें कीं, उत्तर कुरु व उत्तर मद्र हे हिमालयाच्या पलीकडे रहात. त्यांनींच पूर्वेकडे मोर्चा फिरविला व कालेंकरून हस्तिनापुरापर्यंत त्यांची सत्ता स्थापन झाली. त्याचप्रमाणें विदेही व इक्ष्वाकु वंशाची सत्ता अयोध्येकडील प्रदेशांत प्रस्थापित झाली. एकाच पिढींत हें कार्य पूर्ण झालें नाहीं. सगराच्या कारकीर्दींत ज्या महत्कार्यास प्रारंभ झाला, त्यास भगीरथाच्या प्रयत्नांमुळें मूर्तस्वरूप आलें व श्रीरामानें त्यास पूर्णावस्था प्राप्त करून दिली. धाडसी, उत्साही व शूर अशा सगरपुत्रांचें नांव इतिहासांत संस्मरणीय व चिरस्थायी झालें आहे. त्यांच्या ऋणांतून उतराई होण्याकरितां त्यांच्या वंशजांनीं केलेला प्रयत्न यशस्वी झाला म्हणूनच त्यांचा उद्धार होऊन ते स्वर्गास गेले असें प्राचीन लेखकांनीं म्हटलें आहे. या दृष्टीनें पाहतां गंगोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून ऐतिहासिक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें रूपकाच्या द्वारें इतिहास कथन करण्याची प्राचीन लेखकांची पद्धति असे; यास अनेक उदाहरणें देतां येतील. त्यांपैकीं एक दोन येथें देत आहों.

## इक्ष्वाकु व विदेही

वंशाच्या लोकांनीं पूर्वेकडे जी वसाहत केली त्यासंबंधानें शतपथ ब्राह्मणांत असें लिहिलें आहे कीं, "विदेघ माधवानें अग्निवैश्वानरास आपल्या मुखांतून नेलें. त्याचा पुरोहित गौतम राहुगण ऋषि हादेखील त्याच्या बरोबर होता. पुढें अग्नि एकदम बाहेर येऊन जमिनीवर पडला. माधवाच्यानें त्याला आवरून धरवेना. त्या वेळीं माधव सरस्वती नदीपाशीं होता. तेथून अग्नि पेटत पेटत पूर्वेकडे चालला. माधव व गौतमही त्याच्या मागून चालले. अग्नीनें वाटेवरील सर्व नद्या आटविल्या. उत्तरेकडून येणारी षड्निरा ( गंडकी ) मात्र अग्नीनें आटविली नाहीं. अग्नीनें तिच्यावर अनुग्रह न केल्यामुळें ब्राह्मणांनीं पूर्वकालीं ती ओलांडिली नव्हती. अग्नीनें ती जमीन चाखिली नव्हती, त्यामुळें ती अत्यंत दलदलीची व कृषीच्या कामास नालायक अशी होती; परंतु ब्राह्मणांनीं यज्ञ-

यागादिकांच्या योगानें ती जमीन अग्नीकडून चाखविल्यामुळें ती वसाहतीस योग्य झाली; विदेघ माधवानें अग्नीस प्रश्न केला ' मी कोठें राहूं ? ' अग्नीनें उत्तर दिलें 'या नदीच्या पूर्व बाजूस तूं रहा.' अद्यापि ही नदी कोसल व विदेह यांच्या प्रदेशाची सीमा आहे. हे माधवाचे वंशज होत. " यावरून सरस्वती नदीच्या पूर्वेस गंडकीपर्यंत आर्यांची वसाहत कशी होत गेली, हे आर्य स्थानान्तर करून नवीन प्रदेश काबीज करीत असतां आपल्या पुरोहितास व इष्ट देवतेस कसे बरोबर नेत, कृषिकार्यास योग्य व्हावी एतदर्थ जमीन कशी भाजून पेरीत वगैरे या शतपथांतील (सकृद्दर्शनीं विलक्षण वाटणाऱ्या) उताऱ्यावरून दिसून येणार आहे. दुसरें उदाहरण रामायणांतील अगस्ति मुनीचें होय. गंगेच्या दक्षिण कांठावर विश्वामित्राचा सिद्धाश्रम असून वामदेव ऋषिही त्याच ठिकाणीं होता. आग्नेय दिशेकडून आर्यांनीं ( ओडिसाप्रांतांतून ) दक्षिण हिंदुस्थानांत प्रथम प्रवेश केला; परंतु हा रस्ता फार लांबचा असल्यामुळें विंध्य पर्वत ओलांडून त्या प्रदेशांत जाणें आवश्यक होतें. हें कार्य अगस्तीनें केलें. विंध्यपर्वताच्या मधून त्यानें रस्ता काढिला व जनस्थानांत ( महाराष्ट्र ) परिवारासह वसाहत केली. त्यानें आर्यांशीं विरोध करणाऱ्या राक्षसांचा धनुष्यबाणानें फडशा उडविला. पुढें राम तेथें आला, तेव्हां हें शत्रुसंहाराचें काम त्याच्यावर सोंपवून त्यानें एक धनुष्य, एक तलवार व कांहीं बाण रामाला दिले, असें रामायणांत लिहिलें आहे. अगस्तीच्या पराक्रमामुळें त्याची ख्याति झाली व दक्षिणेकडील एका तेजःपुंज नक्षत्रास अगस्ती हें नांव त्याच्या स्मरणार्थ देण्यांत आलें. ( उत्तर ध्रुवाच्यावर चकाकणाऱ्या सात नक्षत्रांस वेदकालीन सुप्रसिद्ध ऋषींचीं नांवें देऊन त्यांची स्मृति आर्यांच्या अंतःकरणांत आचंद्रार्क राहील असें केलें आहे.)

**निगृह्य तरसा मृत्युं लोकानां हितकाम्यया ।**
**दक्षिणा दिक् कृता येन शरण्या पुण्यकर्मणा ।**

अर्थात् लोककल्याणाच्या हेतूनें अगस्तीनें दक्षिण दिशा हस्तगत करून घेतली असें वाल्मीकीनें म्हटलें आहे. यावरून दक्षिणेकडील आर्यवसाहतीच्या आरंभाचा इतिहास लक्षांत येईल; तरी कालेंकरून अगस्तीच्या अचाट पराक्रमाबद्दल भलत्याच कथा लोकांत रूढ झाल्या. विंध्यपर्वत इतका वाढला कीं सूर्यमंडळासही तो भेदून जाईल कीं काय अशी ऋषिजनांस भीति पडली व ते अगस्तीस शरण आले. तेव्हां त्यानें विंध्यपर्वतास आडवा पडण्याची आज्ञा केली व

त्या पर्वतानें त्या ऋषीच्या चरणावर मस्तक ठेविलें. अगस्ती दक्षिणेकडे चालून गेला व विंध्यपर्वतास अशी आज्ञा केली कीं, आपण परत येईपर्यंत तूं तसाच पडून रहा. ही आज्ञा शिरसावंद्य मानून तो पर्वत अझून अगस्तीची वाट पाहत आहे, अशी कथा सध्यां प्रचलित आहे. यावरून अगस्तीचा ऐतिहासिक पराक्रम भलत्याच रीतीनें कसा वर्णिला गेला हें दिसून येईल. रामायण, महाभारत व पुराणें यांत आर्यांच्या पराक्रमाचा इतिहास अशा रूपकांच्या भाषेंत वर्णिला गेला असून त्याचा अर्थ उमगत नसल्यामुळें आमची फार हानि होत आहे. त्या प्राचीन आर्यशिरोमणींच्या आह्मी वंशजांनीं सर्व पुराणांची छाननी करून त्यांतील इतिहास एकत्र करण्याची व्यवस्था केली पाहिजे. या देशांतील लोकांनीं मोठा द्रव्यनिधि जमवून या कार्यासाठीं कांहीं विद्वान् शोधकांची योजना केली पाहिजे. भारतेतिहाससंशोधक मंडळ, सनातन धर्ममंडळ व इतर धर्मविचारक संस्था यांनीं या कार्याकडे नजर पोहोंचवून अठरा पुराणें व अठरा उपपुराणें यांच्यांतील इतिहास शोधून काढिला पाहिजे. राष्ट्हिताच्या दृष्टीनें हें कार्य अत्यंत महत्वाचें आहे. यासंबंधाची जागृति लोकांत केल्यास सर्व श्रीमंत व गरीब लोक या प्राचीन इतिहाससंशोधनाच्या सत्कार्यास शक्त्यनुसार मदत दिल्यावांचून रहाणार नाहींत.

## गंगोत्सवावरून बोध

काय घ्यावा याचा विचार करितां असें दिसतें कीं, अनेक कारणांसाठीं हा उत्सव महत्वाचा आहे. ज्या भगीरथामुळें गंगेच्या कांठचा पूर्वेकडील सर्व प्रदेश आर्यांनीं हस्तगत केला, त्या वीराबद्दल प्रत्येक आर्य म्हणविणारास अभिमान वाटला पाहिजे. या दृष्टीनें गंगेचें दर्शन घेणें प्रत्येक आर्याचें पवित्र कर्तव्यकर्म होय. परंतु या विश्वप्रयत्न करणाऱ्या भगीरथाचे वंशज म्हणविणारे आम्ही आजकाल कोणत्या रीतीनें वागतों याचा विचार करूं. कार्य लहान असो किंवा मोठें असो त्यासंबंधानें प्रयत्न करून तें सिद्धीस नेण्याची महत्वाकांक्षा आपणांतून दिवसें-दिवस नष्ट होत जाऊन आपण निराशावादी व दैववादी झालों आहों. दैवीं असेल तेंच होईल, ब्रह्मदेवानें भाळीं लिहिलें असेल त्याचप्रमाणें यशापयशाची प्राप्ति होणार आहे, पूर्वकर्मानुसार आमचें नशीब नक्की झालें आहे वगैरे कल्पना दृढतर झाल्यामुळें आमच्यांतील कर्तृत्वशक्ति नाहींशी झाली आहे. ज्या कालीं हिंदूंच्या डोक्यांत या दैववादाचा भूतसंचार झाला, त्या कालीं त्यांच्या प्रगतीची वाढ खुंटली व ते मागें परतूं लागले असें म्हणतां येईल. 'षड्भिर्यत्नो मनुष्याणां

सप्तमम् दैवचिंतनम्' असें सांगणारे प्रयत्नवादी लोक प्रयत्नांतीं परमेश्वर देखील साध्य होतो असें सांगण्यास पुढें आले. परंतु त्यांच्या गोड अनुभवाचा व उपदेशाचा फायदा घेण्यास हिंदुसमाज तयार झाला नाहीं. आपलें उच्चतम ध्येय पुढें ठेवून आपलें कर्तव्यकर्म केल्याच्या योगानें नर हा नारायण होऊं शकतो असें कित्येक सत्पुरुषांच्या चरित्रावरून दिसून येतें. अवतारमहात्म्य तरी आम्हांला हेंच सांगतें कीं, मनुष्यास इतकेंच नव्हे तर मत्स्यकूर्मासारख्या क्षुद्र वाटणाऱ्या प्राण्याला, वराहासारख्या पशूसही देवतांच्या ठिकाणीं पोहोंचतां आलें, नव्हे–प्रत्यक्ष देव बनतां आलें. तर मग पशु, पक्षी व इतर सर्व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ असलेल्या मनुष्यास काय करतां येणार नाहीं? प्रापंचिक दगदगींमुळें कदाचित् तो गांजलेला असेल, अनेक प्रकारच्या दुर्बलतेमुळें तो पंगू बनला असेल तरी त्याला ध्येय म्हणून असलेंच पाहिजे. दिवसाचे चोवीसही तास प्रापंचिक विचारांत किंवा दगदगींत घालविणारा व आपल्या दौर्बल्याचा विचार करीत झिजत जाणारा मी आर्यांचा वंशज आहें असें म्हणण्यास योग्य नाहीं. अमुक ऋषीच्या कुलांतून आपण आलों, अमुक गोत्राचा मी आहें वगैरे वल्गना तरी करण्यांत काय अर्थ आहे? प्रत्येकानें आपल्या शक्त्यनुसार लहान मोठें ध्येय आपल्यासमोर ठेवून तें साध्य करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करावा, त्याच्यासाठीं खपावें व कीर्तिरूपें कसें उरावें हें समजून घेणें असेल तर भगीरथ प्रयत्नाची महती लक्षांत आणावी. गंगोत्सवासारख्या उत्सवावरून हा बोध आपले बंधु घेतील तर समाजाच्या स्त्रीपुरुषांच्या ठायीं असणारें दौर्बल्य नष्ट होऊन आमचा हिंदु समाज किती तरी अल्प कालांत उच्चतम पायरीस चढेल यांत संशय एाहीं.

दुसरी एक गोष्ट आपण लक्षांत घेण्याजोगी आहे ती ही कीं, आपण जन्मतः पुत्र या नात्यानें पितरांसंबंधानें कांहीं कर्तव्य करण्याच्या जबाबदाऱ्या आमच्या शिरावर घेत असतों. हिंदुसमाजाप्रमाणें पृथ्वीवरील इतर कोणताही समाज पुत्र हा पित्याच्या उद्धारासाठीं आहे असें मानीत नाहीं. सगराच्या कालानंतर किती तरी पिढया होऊन गेल्या, तेव्हां त्याच्या पुत्रांचा उद्धार झाला व तोही त्याच्या वंशांत उत्पन्न झाल्याची जबाबदारी जाणणाऱ्या त्याच्या वंशजांकडून होय. अर्थात् आपल्या कर्तव्याची व पितृऋणाची जाणीव व जबाबदारी त्या कालीं आमच्या पूर्वजांस होती. पित्यानें केलेलें ऋण फेडण्याचा प्रसंग आपणावर आला असतां, तें करण्यास उद्युक्त झालेला प्रत्यक्ष आपला पिता अनाचारी, कुमार्गी किंवा

बेजबाबदार होता असें धडधडीत न्यायासनासमोर सांगण्यास धजणारे कित्येक पुत्र आज आपण पहातों.मग पिढयान्पिढया पितृॠणाची जाणीव आपल्या अंतःकरणांत जागृत ठेवून त्यापासून मुक्त होण्यास यत्न करणारे आपणांस आढळत नाहींत, यांत आश्चर्य तरी कोणतें? यावरून आमच्या समाजाची शोचनीय स्थिति लक्षांत येण्याजोगी आहे. अशा स्थितींत सगराच्या वंशजांची आठवण करून देणारा गंगोत्सव समाजास योग्य शिस्त लावण्यास समर्थ आहे, असें ह्मणणें वावगें होणार नाहीं. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, धार्मिक दृष्टया पापपुण्याच्या भलत्याच कल्पनांच्या जाळ्यांत सांपडलेल्या लोकांस खऱ्या कर्तव्याची आठवण या उत्सवावरून होत नाहीं. यामुळें इष्ट हेतु साध्य न होतां शक्तीचा, पैशाचा व आयुष्याचा दुरुपयोग मात्र होत आहे.

गंगानदींत किंवा इतर नदीच्या पात्रांत बुडी मारल्यानें पापाचें परिमार्जन होतें ही भावना अनर्थमूलक आहे, असें ह्मटल्याबद्दल आह्मांला क्षमा करावी; परंतु या प्रकारच्या भावनेचा काय परिणाम झाला आहे, हें प्रत्येकानें पहावें. स्नानासारख्या कृत्रिम उपायांनीं कधींही पापाचें क्षालन होणें शक्य नाहीं. कडू भोपळा गंगेंत बुडवून आणिला तरी तो कडूच रहाणार. त्याचप्रमाणें ज्यांचें अंतःकरण कडू, ज्यांच्या देहांतील रुधिराभिसरणाबरोबर अन्याय व अनाचाराच्या कल्पना अभिसरण पावतात आणि ज्यांच्या हस्तें अनन्वित कृत्यें घडलीं आहेत, अशा मनुष्यांना एक वेळ नव्हे, शंभर वेळां जरी महातीर्थ मानलेल्या जलांत बुडवून वर काढिलें तरी ते जशाचे तसे पतितच राहणार. कोणत्या नदींत स्नान केल्यानें पापक्षालन होऊन आत्मा शुद्ध होतो हें भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें. श्रीकृष्ण म्हणतातः—

आत्मानदी संयम पुण्यतीर्था।
सत्योदका शीलतटा दयोर्मिः॥
तत्राभिषेकं कुरु पाण्डुपुत्र।
न वारिणा शुध्यति चान्तरात्मा॥

अर्थः—" आत्मा हीच नदी आणि मनःसंयमन हेंच पुण्य देणारें या नदीच्या पात्रांतील महातीर्थ आहे. या नदींत सत्योदक वाहतें. सच्छील हेच या नदीचे तट होत आणि तिच्या ठायीं उत्पन्न होणाऱ्या लाटा दयारूपी आहेत. हे पंडुपत्रा, अशा प्रकारच्या नदींत स्नान कर. केवळ पाण्याच्या योगानें अंतरात्मा शुद्ध होत नाहीं."

खरें आहे. आत्मज्ञान, मनःसंयमन, सत्याचरण, उच्चतर शील, आणि भूतदय यांच्या योगानें मनुष्य पवित्र होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. सर्व धर्मसंस्थापकांनीं व साधुसंतांनीं हाच उपदेश केलेला आढळतो. मनुष्यप्राणी जन्मतःच आपण पापी आहें असें समजतो. अशी त्याची समजूत होणें हें बरें किंवा वाईट आहे, हा स्वतंत्र व वादग्रस्त प्रश्न होय. ख्रिस्ताचा अवतार भक्तांचें पापक्षालन करण्यासाठीं भूतलावर प्राप्त झाला असून ईश्वराज्ञा मोडल्याबद्दल मूलपुरुष जो आदम त्याचीं मुलें ( सर्व मनुष्यप्राणी ) पापी होऊन जन्मास आलीं आहेत, असें ख्रिस्ती लोक समजतात. हिंदु तर 'पापोहम् पापकर्माहम् पापात्मा पापसंभवः' ( मी पापी, पापाचरणी, पापपूर्ण व पापामुळेंच जन्मास आलों ) असें समजतात. या कल्पनेपेक्षां 'मी पुण्याईमुळेंच मनुष्यजन्मास आलों व पुण्यसंचयाच्या योगानें जन्माचें सार्थक करीन' असें जर प्रत्येक म्हणता व मानता तर किती तरी बरें झालें असतें. ख्रिस्तानें ज्याप्रमाणें आपल्या अनुयायांस उपदेश करून एकमनानें व पूर्ण विश्वासानें आपणास येऊन मिळण्याचा उपदेश केला आहे, तसाच श्रीकृष्णानेंही परमधर्म कथन करितेवेळीं अर्जुनास सांगितलें:—

**सर्व धर्मान् परित्यज्य मामेकम् शरणं व्रज ।**
**अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥**

अनेक प्रकारच्या धर्मवेडाच्या कल्पना सोडून देऊन मला एकट्यालाच शरण ये म्हणजे मी तुला सर्व पापांतून मुक्त करीन; कष्टी होऊं नकोस. ' हा उपदेश कोणीकडे आणि गंगास्नानानें पाप नाहींसें होतें ही कल्पना कोणीकडे ? परमेश्वराच्या ठायीं पूर्ण विश्वास, सदोदित सद्वर्तनी असावें एतदर्थ अव्याहत प्रयत्न, बुद्धया किंवा न कळत आपल्या हातानें दुष्कृत्य घडल्यास त्याबद्दल अंतःकरणपूर्वक पश्चात्ताप, हे दोषविमुक्त होण्याचे खरे उपाय आहेत; आणि अशाच उपायांचा अवलंब पूर्वकालीन आर्य करीत असत असें दिसतें. ऋग्वेदांतील देवतांमध्यें वरुण हा सर्वांत नीतिमान् व सद्गुणी असून त्याच्या भक्तांनीं केलेल्या प्रार्थना कितीं कळकळीच्या आहेत, हें ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांवरून दिसून येईल ( मं. ५–६, मं १–२४, मं. ७–८६ व ८९.). याप्रमाणें पश्चात्तापपूर्ण अंतःकरणानें ईश्वरास शरण जावें हा खरा मार्ग टाकून भलत्याच रस्त्यानें आपण जाऊं लागल्यास त्यापासून फायदा न होतां अधिक खालावत मात्र जाणार याबद्दल शंका नाहीं. '**ॐ नमः शिवायै नारायण्यै दशहरायै गंगायै नमोनमः ।**' असा मंत्र पांच हजार वेळां जपल्यानें किंवा दशहराच्या दिवसांत नदींत स्नान केल्यानें

अंगावरील मळाप्रमाणें अंतःकरणांतील मळही धुऊन टाकतां आल्यास जगांतील सर्व लबाड व निंद्य वर्तनाच्या लोकांस परमेश्वरचरणांचा लाभ करून घेण्याचा हातखंडा उपाय लाभल्याप्रमाणें होऊन सर्वत्र अनर्थ माजून राहील. दुसरी जी एक अत्यंत महत्वाची गोष्ट तिचा आपण कधींही विचार करीत नसतों; ती ही कीं, प्रत्यक्ष भगीरथानें गंगेस सांगितलें कीं, साधूंचा समागम झाल्यामुळें तूं पुनः पुनीत होशील. यावरून सिद्ध होतें कीं, प्रत्यक्ष गंगेलाही पापापासून मुक्त करण्याची शक्ति साधुजनांत आहे; तर मग साधुसमागम हा गंगास्नानाहून अधिक श्रेष्ठ व अधिक फलप्रद होय, 'साधूंची संगति हाचि स्वर्गवास' असें तुकारामबुवांनीं सांगितल्याप्रमाणें साधुजनांचा समागम प्राप्त करून घ्यावा. ते खऱ्या कर्तव्याची ओळख करून दिल्यावर आम्हांकरवीं योग्य तींच कार्यें घडवून आणून आमची जीवनयात्रा सुखावह होईल असें करतील. अशा साधूंचा शोध करून त्यांनीं ज्या या कालरूपी वाळवंटावर आपलीं सत्कृत्यरूपी पावलें उमटवून सन्मार्गगामी लोकांसाठीं खुणा करून ठेविल्या आहेत, त्यांच्याच अनुरोधानें आपण गेल्यास गंगास्नानाचें महत्पुण्य पदरीं पडल्यावांचून रहाणार नाहीं. शेवटीं श्रीसाधु तुकारामाच्या अभंगवाणीनें सांगावयाचें म्हणजे—

**जाउनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळीलें वरी वरी ॥**
**अंतरींचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां केलें आपणया ॥**
**वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचीना ॥**
**तुका ह्मणे नाहीं शांति क्षमा दया । तों वरी कासया फुंदा तुह्मी ॥**

---

## वटसावित्री.

महाराष्ट्रांत दरसाल हिंदुस्त्रिया ज्येष्ठ पौर्णिमेस प्राचीन साध्वीशिरोमणी सावित्री हिच्या प्रीत्यर्थ जें व्रत करीत असतात, तें वटसावित्री या नांवानें प्रसिद्ध आहे. या व्रताच्या उत्पत्तीसंबंधाची कथा अशी आहे कीं, पूर्वकालीं मद्र देशांत अश्वपति नांवाचा एक क्षमाशील व सत्यप्रतिज्ञ राजा होऊन गेला. त्याला संतान नव्हतें, तेव्हां त्यानें सावित्रीचें ( सूर्याचें ) पुरश्चरण केलें. त्यायोगें त्याला जी कन्या झाली, ती सावित्री याच नांवानें संबोधिली गेली. ही मुलगी सुस्वरूप, निरोगी व बुद्धिमान् अशी निघाली. कालेंकरून ती उपवर होतांच तिच्याबद्दल कोणीही

मागणी करीत नाहीं असें पाहून, राजानें तिला स्वतःच पति निवडण्यास सांगून अनेक देश हिंडण्यासाठीं योग्य प्रकारें प्रयाणाची तयारी करून दिली. आपल्या पित्याच्या पदरीं असलेल्या वृद्ध मंत्र्यास बरोबर घेऊन पतिशोधार्थ ती अनेक देशांत गेली; परंतु तिच्या मनाजोगा तिला पति सांपडेना. शेवटीं शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन हा राज्यभ्रष्ट होऊन अरण्यांत रहात होता, तेथें ती पोहोंचली. द्युमत्सेनाच्या आश्रमांत त्याचा पुत्र सत्यवान हाही होता. त्याचें वर्तन शुद्ध, वाणी गोड, प्रकृति सुदृढ व स्वभाव अत्यंत प्रेमळ असल्याचें पाहतांच सावित्रीनें त्याला वरण्याचा निश्चय केला. त्याच्या गरिबीचें तिला कांहींच वाटलें नाहीं व अशा सद्गुणी वराच्या सहवासांत अरण्यवास देखील आनंददायक होईल असें त्या वैभवसंपन्न राजकन्येस वाटलें. स्वदेशीं परत आल्यावर तिनें आपल्या पित्यास आपण सत्यवानास मनानें वरलें असल्याचें सांगून यथासांग धर्मविधीनें विवाहकार्य उरकण्याबद्दल विनंति केली. अश्वपतीराजानेंही सावित्रीचें म्हणणें मान्य करून लग्नकार्याची तयारी चालविली; परंतु तेथें नारदाची मूर्ति प्रविष्ट झाली व सत्यवानास विवाहानंतर बिनचूक एक वर्षानें मृत्यु येणार असल्याचें त्यानें भविष्य वर्तविलें. अश्वपति बिचारा घाबरला. परंतु सावित्रीनें निश्चयपूर्वक सांगितलें कीं, ज्या सत्वशील सत्यवानास 'मी मनानें व वाचेनें वरिलें, तो अल्पायुषी असो किंवा दीर्घायुषी असो त्यालाच मी वरणार.' योग्य कालीं तिचा सत्यवानाशीं विवाह झाला व ती त्याजबरोबर आश्रमांत राहूं लागतांच राजवैभवाचे अलंकार तिनें टाकून दिले व आपल्या सासूप्रमाणें साधीं वस्त्रें परिधान केलीं. भिडस्त वर्तन, सात्विक वागणूक, व प्रेमळ स्वभाव यांच्यामुळें ती तिच्या सासूश्वशुर व पति यांस अत्यंत प्रिय झाली. हां हां म्हणतां नारदानें सांगितलेला तिच्या नवऱ्याच्या अपमृत्यूचा काळ जवळ आला. त्यानें वर्तविलेल्या भविष्यासंबंधानें ती रात्रंदिवस विचार करीतच होती. शेवटीं एक वर्ष संपण्यास अवघे चार दिवस राहिले; तेव्हां ती एकाग्रचित्तानें ईश्वरावर भार घालून त्याच्या चिंतनांत मग्न झाली. तिला अन्नोदकही रुचेना. चवथ्या म्हणजे शेवटच्या दिवशीं तर तिनें पतीच्या निकट सान्निध्यांत रहाण्याचा निश्चय करून ती त्याच्याबरोबर कंदमुळें आणण्यासाठीं अरण्यांत गेली. वन्यफळें वगैरे गोळा केल्यावर सत्यवान होमासाठीं कुऱ्हाडीनें लांकूड तोडूं लागला. कांहीं वेळानें त्याच्या मस्तकांत व हृदयांत वेदना उत्पन्न झाल्या व तो जमिनीवर धाडकन् पडला. सावित्रीनें त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें व अत्यंत चिंतायुक्त होत्साती

ती त्याला वारा घालीत सावध करण्याचे उपाय करूं लागली. सत्यवानाचे प्राण हरण करण्यासाठीं प्रत्यक्ष मृत्युदेव जो यम तो तेथें आला व त्यानें ते हरण केले. यम पाठ फिरवून आपल्या यमपुरीकडे जाऊं लागतांच सावित्रीही त्याच्या मागून चालली. यमानें तिला आपल्या मागें येण्याचें कारण विचारिलें. तिनें उत्तर दिलें कीं, जेथें पति तेथें मी या न्यायानें त्यांच्या मागेंच मी येणार आहें. पुढें यमाचें व तिचें बराच वेळ भाषण झालें. तिच्या सासुश्वशुरांचें नष्ट वैभव पुनः प्राप्त करून देण्याचें यमानें आश्वासन दिलें व तिच्या पित्यासही पुत्रप्राप्ति होवो असा वर दिला; तरी सावित्री कांहीं केल्या मागें फिरेना. शेवटीं आपण स्वतः पुत्रवती व्हावें, असा वर तिनें युक्तीनें यमापाशीं मागितला. सावित्रीच्या पतिप्रेमाची परमावधि पाहून चकित झालेल्या यमानें आपण काय म्हणतों, याचा विचार न करितां ‘ तथास्तु ’ असें म्हटलें. पुत्रप्राप्ति होणें वैधव्यदशेंत शक्य नाहीं, अर्थात् पतीस जीवदान देणें हा एकच मार्ग यमाजीपंतांस खुला राहिला आणि त्यानें सावित्रीच्या पतिभक्तीची तारीफ करून सत्यवानास जिवंत केलें. तिच्यामुळें उभय कुलांचें कल्याण होऊन आनंदी आनंद झाला. यावरून सावित्रीव्रत प्रचारांत आलें.

## शास्त्रोक्त विधि.

ज्येष्ठ शु. १३ शीपासून पौर्णिमेपर्यंत पति आयुष्मान् व्हावा एतदर्थ सावित्रीचें व्रत आचरावें. त्रिरात्र उपोषित राहतां येणें शक्य नसेल, तर त्रयोदशीस नक्त करून चतुर्दशीस अयाचित व पौर्णिमेस उपोषित रहावें. सावित्रीची सुवर्ण प्रतिमा करून किंवा वटवृक्षाखालीं सावित्री, सत्यवान व यम यांचीं चित्रें काढून त्यांची शोडषोपचारें पूजा करावी. सौभाग्यवतींनीं एकमेकांस वायन द्यावें. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं दंपतिभोजन घालून सायंकाळीं सावित्रीची कथा वाचावी किंवा पुरोहिताच्या मुखें श्रवण करावी. या व्रताबद्दल तीन दिवस पाळणें ते पौर्णिमेच्या निर्णयानुसार त्रयोदशीपासून घ्यावे. पौर्णिमा सूर्यास्तापूर्वी सहा घटिकांहून कमी असल्यास दुसऱ्या दिवशीं हें व्रत आचरावें.

## चालू रूढि.

या व्रताचा विशेष प्रचार असल्याचें दिसून येतें. या दिवशीं स्त्रिया उपोषित राहून वटवृक्षाची पूजा करीत असतात. ब्राह्मणेतर स्त्रियांनींही हें व्रत पाळण्यास अलीकडे प्रारंभ केला आहे. विशेषतः मुंबईसारख्या शहराच्या ठिकाणीं सांप-

त्तिक व इतर बाबीच्या सवलती सर्व वर्णांस बहुतेक सारख्या असतात. त्यामुळें वरच्या लोकांनीं आचरलेल्या कित्येक खर्चांच्या बाबी सामान्यतः विद्या किंवा ज्ञान यांत मागासलेल्या लोकांनीं केवळ अनुकरणाच्या लालसेनें आपल्या समाजांत रूढ करण्यास अलीकडे प्रारंभ केला आहे. बंगाल्यांत वटसावित्रीव्रत पाळण्याची तऱ्हा किंचित् भिन्न आहे. या दिवशीं स्त्रिया आपल्या पतीची पूजा करीत असतात. त्यांच्या अंगास सुगंधी तेलें लावतात व चंदनाची उटी काढतात. फुलांचा हार त्यांच्या गळ्यांत घालणें, हातांत पुष्पगुच्छ देणें वगैरे पूजनात्मक विधि उरकल्यावर नवीन वस्त्र पतिराजास अर्पण करण्यांत येतें. याशिवाय यमाची पूजा करून त्याला पुष्प, फळें व वटवृक्षाची लहान डहाळी त्या समर्पण करीत असतात. हें व्रत तेथें, 'सावित्रीव्रत' या नांवानें प्रसिद्ध आहे. दक्षिण हिंदुस्थानांत हें व्रत रूढ नाहीं. सावित्रीची गोष्ट हिंदुस्थानांतील सर्व वरच्या वर्णांतील हिंदुस्त्रियांस माहीत असून तिच्याबद्दल परमादर व्यक्त केला जातो.

सावित्रीव्रत हें कौटुंबिक उत्सवांतलें एक आहे. पतीच्या आयुष्याची दोरी अकालीं तुटूं नये म्हणून मृत्युदेवाची पूजा करणें, सावित्रीची कथा वाचणें किंवा श्रवण करणें, रंगभूमीवर सावित्री नाटकाचा प्रयोग पाहणें वगैरे प्रकारानें हा दिवस स्त्रियांकडून साजरा केला जातो. वडाच्या पानांचे द्रोण करून त्यांत ऋतु-परत्वें प्राप्त होणारीं फळें व सौभाग्यद्रव्यें घालून शेजारच्या सौभाग्यवती स्त्रियांस वायनें दिलीं जातात. भटजींची या दिवशीं कोण धांदल! विशेषतः शहरांत स्त्रिया आपल्या घरीं लहानशी वडाची डहाळी आणून पूजा करीत असतात. त्यामुळें पुरोहितास आपल्या निरनिराळ्या कुळांचीं कामें वेळेवर आटपून किंचित् द्रव्यप्राप्ति करून घेण्याची संधि साधण्यास बरेच श्रम करावे लागतात. खेड्यांतील सौभाग्यवती स्त्रिया एकाद्या वडाच्या झाडाखालीं एकत्र जमून तेथें पूजा करीत असतात. विधवा फक्त उपोषण मात्र करितात. सावित्रीच्या कथानकावरून एक महत्वाची गोष्ट समजून येणार आहे, ती ही कीं,

## प्राचीन काळीं विवाह

हल्लींप्रमाणें बालवयांत होत नसत. प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे असाही निर्बंध नसे. मुली अविवाहित रहात व त्यांस पित्रार्जित मालमत्तेंतून पुत्रांप्रमाणें कांहीं भाग मिळत असे. विवाहाचे निरनिराळे प्रकार त्या कालीं समाजांत रूढ होते. त्या सर्वांचें वर्गीकरण करून स्मृतिकारांनीं विवाहाचे मुख्य आठ प्रकार

ठरविले. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें होतीं—**१ ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गान्धर्व, ७ राक्षस** व **८ पैशाच** यांपैकीं पहिले चार प्रकार ब्राह्मणांत रूढ होते, तरी ब्राह्मविवाहपद्धति सर्वांत श्रेष्ठ मानीत.

**ब्राह्म** विवाहांत वराचें कुल, शील, विद्वत्ता, आचरण, आरोग्य वगैरे पाहून आपल्या कन्येस तो सर्वपरी योग्य पति आहे असें दिसून आल्यास, तिला सुमुहूर्तावर त्यास अर्पण करीत. **दैव**विवाहांत यज्ञाच्या वेळीं यजमान आपली कन्या पुरोहिताला देत असे. **आर्ष**विवाहांत वराजवळून दोन गाई घेऊन कन्या देत. हा एक प्रकारचा कन्याविक्रय असल्यामुळें या पद्धतीस ज्ञात्यांनीं दोष दिला आहे. **प्राजापत्य** विधींत वराकडून कांहीं एक न घेतां आपली कन्या योग्य वराला देत. **आसुर**विवाहांत मुलींच्या मातापितरांस शुल्क किंवा कन्येचें मोल द्यावें लागे. कैकयीचा दशरथाशीं व माद्रीचा पंडूशीं विवाह या पद्धतीनें झाला. **गान्धर्व**विवाहांत उपवर कन्या आपल्या वडील जनांस नकळत आपणास पसंत असेल त्या पुरुषास वरीत असे. शकुंतला व दुष्यंत यांचें लग्न गांधर्वपद्धतीनें झालें. **राक्षस**विवाहपद्धति फार भयंकर होती. मुलीचें हरण पराक्रमाच्या योगानें करीत. कन्येच्या बांधवांच्या इच्छेविरुद्ध तिला बलात्कारानें घेऊन जात. कृष्णानें रुक्मिणीचें अशाच रीतीनें हरण केलें. विचित्रवीर्यासाठीं भीष्मानें अंबिका व अंबालिका यांचें हरण राक्षसविवाहपद्धतीनेंच केलें. **पैशाच**विवाहांत कन्या निद्रित किंवा मूर्छित असतां तिला नेत.

क्षत्रियांत गान्धर्व व राक्षसविवाहपद्धति चालू होती. शिवाय ब्राह्मपद्धतीनेंही त्यांच्यांत लग्नविधि उरकीत. गान्धारी व धृतराष्ट्र यांचा विवाह ब्राह्मपद्धतीनें झाला. सावित्रीचा विवाह देखील अशाच रीतीनें उरकला गेला. त्या कालीं स्वयंवराची पद्धतिही रूढ होती. स्वयंवरसमारंभाच्या वेळीं कन्येच्या पित्यानें लावलेला पण जिंकणारास तिला अर्पण करीत. कन्या उपवर झाल्यावर तिला अनुरूप असा पति शोधून काढण्याचें काम मातापितरें करीत किंवा मुलीसच योग्य पति निवडण्यास सांगत. परंतु अशा रीतीनें मुलीनें निवडलेल्या पतीस वरण्यापूर्वी तिला आपल्या पित्याची संमति घ्यावी लागे. जेव्हां सावित्रीनें आपला पति निवडला व ती परत स्वगृहीं आली, तेव्हां पिता म्हणाला,

**प्रार्थितः पुरुषो यश्च स निवेद्यस्त्वया मम।**
**विमृश्याहं प्रदास्यामि वरय त्वं यथेप्सितम् ॥**

( वन. २९३-३३ ).

' ज्याला तूं पसंत केलें असशील तो कोण हें मला सांग. मी त्याच्याबद्दल विचार करून मग तुला त्याला देईन. ' प्राचीन कालीं मुलींस स्वपति ठरविण्याची मुभा असल्यामुळें कधीं कधीं तरुण मुलींची निवड चुके. ऋग्वेदाच्या १० व्या मंडळांत ( सूक्त २७ ऋ० १२ ) असें म्हटलें आहे कीं ' विवाहासाठीं मुलीचें मन वळविणाराच्या संपत्तीला भुलून कित्येक मुली कबूल होतात. परंतु जी मुलगी सुशील व सुस्वरूप असते, ती अनेकांतून आपणास जो प्रिय असेल त्यालाच वरते.' वर निश्चित झाल्यावर वर्णाश्रमधर्माप्रमाणें योग्य अशा विवाहपद्धतीनें कन्येला सालंकृत करून वराला देत. स्वयंवराची चाल व गांधर्व विवाहाची रूढि ऋग्वेदकालीं प्रचलित होती, हें पुढील उताऱ्यांवरून सिद्ध होतें.

**भद्रा वधूर्भवति यत्सुपेशाः स्वयं सा मित्र वनुते**
**जने चित् ॥ ऋग्वेद मं. १०. २७ । १२.**

अर्थ—जेव्हां वधु देखणी व अलंकारानें विभूषित असते तेव्हां ती लोकांतून आपला मित्र ( पति ) शोधून काढते.' ऐतरेय ब्राह्मणांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

**प्रजापतिर्वै सोमाय राज्ञे दुहितरं प्रायच्छंत्सूर्यां**
**सावित्रीम् । तस्यै सर्वे देवा वरा आगच्छस्तस्या**
**एतत्सहस्रं वहतुमन्वाकरोद् यदेतदाश्विनमित्या-**
**चक्षते । ऐ. ब्रा. ४ । ७.**

"प्रजापतीच्या मनांत आपली कन्या सूर्या–सावित्री ही सोमाला द्यावी असें आलें. सर्व देव तिच्या प्राप्तीसाठीं आले. लग्नाच्या वेळीं एक हजार आश्विन देण्याचें त्यानें ठरविलें." यावरून लग्नाच्या वेळीं वरास देणगी देत असत असेंही दिसतें. ही प्राचीन चाल हल्लीं हुंड्याच्या रूपानें प्रचारांत असून दिवसें दिवस ती त्रासदायक होत आहे याचा अनुभव प्रत्यहीं येतो. कन्येच्या पित्याच्या मर्जीवर देणगी अवलंबून नसून वराच्या किंवा तत्पक्षीयांच्या स्वार्थावर सर्व अवलंबून असतें. ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. वधू व वर संसाराची जबाबदारी शिरावर घेण्यास समर्थ असून विवाहाच्या वेळीं ज्या शपथा घेत, त्यांवरून पाहतां वधूवरें वयानें व बुद्धीनें प्रौढ असत हें सिद्ध होतें. ऋग्वेदांत (मं० १०--८५) विवाहासंबंधीं प्रार्थना असून त्या कालीं द्विज कोणत्या विधीनें लग्नकार्य उरकीत हें दिसून येतें. सध्यां वाद्यांच्या गजरांत उभय पक्षाकडील पुरोहित ह्या शपथा वधुवरांच्या वतीनें घेत

असतात. परंतु त्यांचा अर्थ मात्र पुरोहितास किंवा दुसऱ्या कोणाला समजत नसतो. ही स्थिति शोचनीय होय. नमुन्यासाठीं कांहीं ऋचांचा अर्थ खालीं देत आहों:—

२२. हे विश्वावसू, येथून ऊठ. आम्हीं नम्रपणें तुला प्रणाम करितों. पूर्ण वाढ झालेल्या या कन्येपाशीं जाऊन तिला पतीशीं संलग्न कर.

२३. उपवर कन्येच्या शोधार्थ ज्या मार्गानें आमचे मित्र जातात, तो मार्ग सुलभ व निष्कंटक होवो. देवहो, पति व पत्नी यांचें पूर्णैक्य होवो.

२४. कन्ये, तुला दैदीप्यमान् सूर्यानें ( कौमार्यावस्थेच्या ) पाशांनीं बद्ध केलें होतें. पाश आतां मोकळे करतों. तुला पतीच्या समागमांत ठेवीत असून जें गृह सत्य व सत्कृत्यें यांचें निवासस्थान आहे, अशा गृहीं तुला ठेवीत आहों.

२५. या पितृगृहांतून काढून पतीच्या गृहीं तुला उत्तम प्रकारें प्रस्थापित करितों. हे इंद्रा, ती भाग्यशाली व सुपुत्रांची माता होंवो.

२६.......तुझ्या पतीच्या गृहीं जा आणि तेथील गृहस्वामिनी हो. सर्वांची धनीण होऊन त्यांच्यावर तुझा शब्द चालव.

२७. तुला मुलें प्राप्त होवोत. तुला सौख्याचा लाभ घडो. तुझीं गृहकार्यें लक्षपूर्वक कर.......वृद्धापकालापर्यंत तूं या तुझ्या गृहीं अधिकार चालव.

४२. वधुवरांनो, तुम्ही येथें एकत्र रहा. कधींही एकमेकांस विसंबूं नका. अनेक प्रकारच्या सुग्रासाचें सेवन करा. स्वगृहीं वास करून पुत्रपौत्रांच्या सहवासांत सुखानें कालक्रमण करा.

४३ ( वधूवर म्हणतात ) प्रजापति आम्हांला मुलें देवो. वृद्धपकालापर्यंत आम्हां उभयतांना आर्यमन् एकत्र ठेवो. ( वधूस ) हे वधू, तुझ्या पतीच्या गृहीं सुलक्षणांनीं युक्त होत्साती प्रवेश कर. आमच्या दासदासींना व गुरांढोरांना चांगल्या रीतीनें वागव.

४४. तुझ्या नेत्रांत राग नसो. तुझ्या पतीच्या सुखासाठीं जपत जा. आमच्या गोधनाची जोपासना कर. तुझें चित्त उल्हासित असो आणि तुझें सौंदर्य उज्ज्वल असो. वीरपुत्रांची तूं माता हो आणि देवांची तूं भक्त हो. आमच्या दासदासींना व गुरांढोरांना चांगल्या प्रकारें वागव.

४५. हे इंद्र, ही स्त्री भाग्यशाली व सुपुत्रांची माता होईल असें कर. ती दशपुत्रा होवो. मग पतीसह या घरांत अकरा पुरुष होतील.

४६. ( वधूस ) तुझे श्वशुर व सासू यांच्यापाशीं तुझा शब्द चालो. दीर व नणंदा यांच्यावर तुझा अधिकार राज्ञीप्रमाणें चालो.

४७. ( वधूवर म्हणतात ) सर्व देव आमच्या हृदयांचें एकीकरण करोत. ( अर्थात् आम्ही सर्व कार्यांत एकदिलानें वागावें असें करोत. )

आजकाल आम्हां आर्य म्हणविणारांत जे

## बाहुला बाहुलीचे विवाह

बेजबाबदार रीतीनें उरकले जातात त्यांचा विचार केला असतां आम्ही आमच्या कर्तव्यकर्माबद्दल काळजी बाळगीत नाहीं व आमच्या पूर्वजांच्या आज्ञांचा भंग करीत आहों, असेंच म्हणावें लागतें. सासूश्वशुरांवर व घरांतील इतर माणसांवर अंमल चालविणें तर एकीकडेच राहिलें, उलट रूढीपरत्वें बालस्नुषेस मन मोकळें करून बोलण्यासवरण्याचीही मोकळीक नसल्यामुळें आमच्या कोमल दुहितांचे व भगिनींचे जे हाल होतात, त्याबद्दल सर्व देव एकत्र बसून आमच्या समाजावर शापांचा वर्षाव करीत असतील. आम्हां हिंदुस्थानांतील आर्यांचे लग्नविधि म्हटले म्हणजे केवळ विषयोपभोगाच्या लालसेनें एकत्र आलेल्या तरुण स्त्रीपुरुषांतील प्रेमसंबंध जुळविण्याचें साधन नव्हे. तो धार्मिक अतएव पवित्र संस्कार आहे. त्यांत दैविक तेज आहे. तो व्यक्तीव्यक्तींतील करार नव्हे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ साध्य करून घेण्याच्या सद्धेतूनें पंचमहाभूतें व समाज यांस साक्ष ठेवून एकमेकांशीं आणभाक केलेल्या दोघां जबाबदार व्यक्तींचा ( पुरुष व प्रकृति यांचा ) शुद्ध संकल्प दाखविणारा हा मंगलविधि सर्वपरी मंगलदायक होईल असें करण्याची जबाबदारी समाजाच्या नेत्यांवर आहे. आम्ही सध्यां जी सामाजिक अवनति भोगीत आहों ती विवाहासंबंधी ईश्वराच्या आज्ञा मोडल्याबद्दल शिक्षेदाखल आहे असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. आमच्या समाजाचें दिव्य नेत्रांनीं निरीक्षण करून

## श्री स्वामी रामतीर्थ

यानीं एकदां अधिकारयुक्त वाणीनें हिंदु देशास एका व्याख्यानांत असें बजावलें कीं, ‘जगांतील अत्यंत पवित्र संबंध म्हटला म्हणजे लग्नसंबंध होय. परंतु तो अपवित्रतेच्या योगानें आम्हीं कलुषित केल्यामुळें त्यापासून उत्पन्न झालेली सर्व प्रजा अवनत स्थितींत आहे. अत्यंत महत्वाची व पवित्र अशी ही संस्था अतिशय

निष्काळजीपणानें, अयोग्य रीतीनें व निर्लज्जपणानें वर्तविली जाते. पत्रिका पाहिल्या, मुहूर्त काढले, मंगलाष्टकें म्हटलीं, स्तोत्रें गाइलीं आणि अनेक धार्मिक संस्कार केले, तरी देखील हिंदुस्थानांतील लग्नें कुमुहूर्तावर, अमंगल व अपवित्र अशींच होतात. आपल्या अनुकूल स्थानबलाच्या जोरावर विवाहित होणारें कोमल, अपरिपक्व जोडपें पाहून आकाशांतील कोणतेही ग्रह आपल्या मंगल स्थानांत राहण्यास धजणार नाहींत. असा अमानुष प्रसंग पाहतांच ते ग्रह चळचळ कांपतात आणि स्वस्थानापासून च्युत होतात. आपल्या पायांवर उभे राहतां येत नाहीं अशा जोडप्याच्या भ्रष्ट लग्नाला धार्मिक स्वरूप देऊन तें पवित्र करण्याचें काम वैदिक मंत्र करीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर ते कायमचे फोल आणि कुचकामाचे होतात. देशांमध्यें अयोग्य, कर्तृत्वहीन, निरुपयोगी, परोपजीवी प्राणी उत्पन्न करण्यासाठीं निर्धनाचा विवाह लावणाऱ्या विधीच्या अधर्म्य दर्पापुढें कोणतीं सुमनें आपलें माधुर्य कायम ठेवूं शकतील ? '

दुराग्रहास वश न होतां समाजहिताच्या सिद्धीकरितां हा अनन्वित प्रकार एकदम बंद पाडला पाहिजे. दुराशेनें मुलांमुलींचा विक्रय करण्याचा आसुरी प्रकार बंद पाडून खरे सार्थ ब्राह्मविवाह सर्वत्र चालू होतील, असा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या नीतीसाठीं, हिंदुस्थानच्या नांवासाठीं, आपल्या स्वतःसाठीं आणि स्वतःच्या वंशजांसाठीं हे अंधपणाचे प्रकार बंद पाडले पाहिजेत. असें हें दरसाल येणारें सावित्रीचें व्रत आम्हांस सांगत नाहीं काय ? सावित्रीचें जें वर कथानक दिलें आहे त्यांत

## यमासंबंधाचा कथाभाग

असून त्याचा उलगडा करणें आवश्यक आहे. यम हा देहांतून प्राण हरण करणारा आहे अशी ज्याप्रमाणें हिंदूंची कल्पना आहे त्याप्रमाणें इतर धर्मीय लोकही मृत्यु घडवून आणणारा मृत्युदेव असून तो मनुष्यमात्राचें आयुष्य संपतांच त्याला इहलोकांतून घेऊन जातो असें समजतात. हल्लींच्या काळीं जन्ममृत्युसंबंधानें प्रयोग चालवून शास्त्रज्ञांनीं यमाजीभास्करास मृत्युलोकांतून हद्दपार केलें आहे. त्याचा ताबा आपल्या जीवितावर नसून मृत्यूचे प्रसंग जसे घडवून आणणें शक्य आहे तसेंच ते प्रयत्नानें घालविणेंही शक्य आहे असें ते सप्रमाण सिद्ध करतात. असें जर आहे तर यमानें आपल्या पाशांनीं सत्यवा- नास बद्ध केलें वगैरे गोष्टी कशा मान्य होणार ? तसेंच एक वर्षानंतर नेमक्या

वेळीं सत्यवानास मृत्यु प्राप्त होईल असें भविष्य करणें शक्य आहे कीं काय, हा देखील एक प्रश्न आहे. एखाद्याचा मरणकाल जर जन्मतः ईश्वराज्ञेनेंच ठरलेला आहे तर तो चुकेल कसा ? या प्रकारच्या प्रश्नांस समर्पक उत्तर देणें शक्य नाहीं. तेव्हां त्यांसंबंधानें भलतेसलते तर्क करण्यापेक्षां या कथेंत काय सार आहे, एवढेंच पाहणें विशेष योग्य होईल. हजारों वर्षें समाजांत दंतकथेच्या रूपानें रूढ झालेल्या गोष्टींत फेरबदल होत जाऊन ज्या कालीं त्या लिहिल्या गेल्या, तेव्हां त्यांत अलौकिक असा भाग गुंतविला गेला. त्यामुळें खऱ्याखोट्याची निवड करून व्यवहारिकदृष्टया या कथांचा अर्थ जुळविणें फार बिकट होतें. आमच्या मतें सावित्री व यम यांचें भाषण म्हणजे एक रूपक आहे. अशाच प्रकारचें दुसरें एक रूपक सांपडतें.

कठोपनिषदांत अशी कथा आहे कीं वाजश्रवस यानें नचिकेतस नामक आपल्या पुत्रास यमाकडे पाठविलें. यमाची भेट होईपर्यंत तीन दिवस तो यमद्वारीं तिष्ठत राहिला, याबद्दल यमास वाईट वाटून त्यानें त्यास तीन वर देण्याचें कबूल केलें. नचिकेतसानें पहिला वर मागितला तो असा–'हे मृत्यो, माझा पिता गौतम माझ्या संबंधानें शांत चित्त, प्रसन्नहृदयी व विगतक्रोध होवो.' यमानें 'तथास्तु' ह्मटल्यावर दुसरा वर त्यानें असा मागितला कीं 'स्वर्गप्राप्ति ज्या यजमानाला होते, तो अग्नीच्या द्वारें देवत्व पावतो. या अग्नीचें ज्ञान मला सांग' हें ज्ञान यमाकडून मिळविल्यावर तिसरा वर मागितला तो असा:—

**येयं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीति चैके**

'मनुष्य मरण पावला असतां आत्मा असतो असें कोणी म्हणतात आणि कित्येक म्हणतात कीं आत्माच नाहीं. यांतून खरें कोणतें ?' मृत्यूनें या प्रश्नास उत्तर देण्याची टाळाटाळ केली व विषयोपभोग हवे तेवढे माग, ते सर्व तुला देऊन संतुष्ट करीन असें तो म्हणाला; परंतु नचिकेतसानें यमास सांगितलें कीं धन, कनक, कांता वगैरे नश्वर विषय मला नकोत. यमानें नचिकेतसास अनेक परीनें संतुष्ट करण्याचें योजिलें, परंतु जेव्हां तें त्यास पटेना, तेव्हां त्यानें सांगितलें,

**तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणम् ।**
**अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ॥१२॥**
**एतच्छ्रुत्वा संपरिगृह्य मर्त्यः प्रवृह्य धर्म्यमणुमेतमाप्य ।**
**स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा विवृतं सद्म नचिकेतसं मन्ये ॥१३॥**

दिसण्यास कठिण, गहन, आच्छादलेला, बुद्धीच्या ( गुहा ) ठिकाणीं स्थित, अनेक संकटें सोसल्यावर प्राप्त होणारा, प्राचीन असा तो आत्मा, चित्ताचा आत्म्याच्या ठिकाणीं लय केल्यानें ज्ञात होतो. असें ज्ञान झाल्यावर बुद्धिमान् मनुष्य हर्ष व शोक या दोहोंचाही त्याग करतो ॥ १२ ॥ हें श्रवण करून, याचें योग्य मनन करून धर्मरूप अशा याचें पृथक्करण करून ( म्हणजे आत्मा हा शरीराहून भिन्न आहे हें समजून ) सूक्ष्मरूप आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावर मनुष्य आनंददायक अशा वस्तूची प्राप्ति झाल्यामुळें आनंद पावतो. करितां हे नचिकेतस, तुझ्याकरितां ब्रह्मज्ञानाचें द्वारच खुलें केलें आहे असें मला वाटतें."

यावरून तरुण पुरुषांस जसें ब्रह्मज्ञानप्राप्ति हेंच अंतिम ध्येय असें वाटत असे, तसेंच स्त्रियांस पति हेंच आद्य दैवत वाटून त्याच्या समागमांत आपलें आयुष्य जावें, एतदर्थ मृत्यूशीं भांडण्यासही त्या तयार असत असें दिसतें. नचिकेतसानें ब्रह्मज्ञान हें सर्व इहलोकींच्या सुखोपभोगाहून श्रेष्ठ मानिलें. सावित्रीनें पतिविरहित जीवन अयुक्त समजून आपल्या पतीचा बचाव करण्यासाठीं शिकस्तीचा प्रयत्न केला. स्वतःची जीवनयात्रादेखील संपविण्यास तयार होऊन ती मृत्यूच्या मागें चालली.

**अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथाऽरसं नित्यमगन्धवच्च यत् ।**
**अनाद्यनंतं महतः परं ध्रुवं निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते ॥१-१५॥**

शब्द, स्पर्श, रूप, क्षय, रस, गंध, आदि अंतरहित, नित्य, श्रेष्ठ आणि शाश्वत असें जें ब्रह्म तें जाणल्यानें मरणापासून सुटका होते असें प्रत्यक्ष यमानें नचिकेतसाला सांगितलें; अर्थात् यम हा केवळ प्राणहरण करणारा व पौराणिक कालीं पुराणकारांनीं वर्णिलेला भयानक काळपुरुष नव्हे, तर तो महाज्ञानी व मानवी कुटुंबाचें कल्याण योजणारा एक देव आहे असें उपनिषत्कार तरी मानीत असत असें सिद्ध होतें; म्हणूनच त्यानें सावित्रीला तिचा पति परत देऊन तिची इच्छा पूर्ण केली. ( यासंबंधीं माहिती भाऊबीज या सदरा खालीं पहावी. ) स्वयंवराची रूढि अमलांत येण्यापूर्वीं म्हणजे रामायण महाभारत कालापूर्वीं सावित्रीची कथा लोकांस माहीत असावी. जगांत मनुष्यप्राण्यांवर अकल्पित दुःखाचे प्रसंग येतात; परंतु ते प्राप्त झाले असतां संकटांशीं मात्र नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूशीं तोंड देण्यास आपली तयारी असली पाहिजे. हें दाखविण्यासाठीं महाभारतांत अश्वपतिराजा व त्याची कन्या सावित्री यांची

कथा धृतराष्ट्रास सांगितली आहे; पुरातनकालीं आर्य स्त्रिया ज्ञान व निष्ठा यांच्या जोरावर प्रत्यक्ष मृत्यूस-हार न जातां त्या स्वतःचें ध्येय संपादण्यांत किती दक्ष होत्या हें दिसतें. असो. हल्लींच्या कालीं या कथानकावरून

## बोध काय घेतां येईल

हें पाहूं. सध्यांच्या विचारयुगांतील सिद्धांतांस धरून आपण चाललों तर एवढी गोष्ट कबूल करण्यास हरकत नाहीं कीं, सावित्रीच्या कालीं मुलीस स्वतःसाठीं पति ठरविण्याची मोकळीक होती. लग्न होतांच सावित्री आपल्या माहेरच्या डामडौलाच्या चाली सर्व टाकून देऊन पतीबरोबर अरण्यांतील पर्णकुटिकेंत रहायाला तयार झाली. त्याप्रमाणें इतर स्त्रियांचीही तयारी असे. त्या प्रौढ वयाच्या असल्यामुळें विवाहाच्या वेळीं आपली प्रापंचिक जबाबदारी जाणत व पति म्हणजे आपलें सर्वस्व आहे असें मानून त्याच्याबरोबर सुखदुःखें भोगण्यास व त्याच्या प्रपंचाच्या कार्यांत मदत करण्यास तयार असत. स्नुषेसंबंधानें सासूश्वशुरांचें अप्रतिम प्रेम, तिच्यामुळें आपल्या कुलाची वृद्धि व उन्नति व्हावी ही सदिच्छा, त्याचप्रमाणें सासूश्वशुरांसही केवळ मातृपितृस्थानीं मानण्याची सुनांची तयारी, या सर्व गोष्टींचा विचार केला असतां प्राचीनकालीं आपला समाज बऱ्याच उन्नतावस्थेस पोहोंचला होता असें सिद्ध होतें. या सद्गुणांचा ऱ्हास झाल्यामुळें आम्हांस अवनति प्राप्त झाली आहे. त्यांची समाजांत वाढ करणें हाच खरा प्रगतीचा मार्ग आहे, असें जर आमच्या लोकांस समजूं लागेल तर किती तरी आपलें हित होऊन प्रत्येक घरांत सध्यां जो अविचाराचा दुष्परिणाम दृग्गोचर होत आहे तो नाहींसा होईल. सावित्रीच्या नांवानें वटवृक्षाची पूजा करण्यासाठीं ज्येष्ठ पौर्णिमेस एकत्र जमणाऱ्या स्त्रियांनीं पूजेसाठीं निघण्यापूर्वीं आपण गेल्या सालीं पतीच्या सुखासाठीं किती जपलों, त्यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांचा श्रमपरिहार करण्याकरितां किती खटपट केली, तसेंच कुटुंबांत दुखणें किंवा वाईट स्थिति प्राप्त झाल्यावेळीं पति व इतर वडील जनांस धीर देऊन त्यांची काळजी कमी करण्याचा कितपत प्रयत्न केला, याचा पूर्ण विचार करावा व यासंबंधांत आपलें वर्तन अनुदारपणाचें झालें असें वाटल्यास, पश्चात्तापपूर्वक साध्वी सावित्रीची क्षमा मागून नूतन सालीं सद्वर्तनी होण्याचा निश्चय करावा. सबंध वर्ष पतीशीं तुसडेपणानें वागून या दिवशीं मात्र पतीचें आयुरारोग्य वाढावें म्हणून वटवृक्षाखालीं बसून सावित्रीची पूजा करण्यांत अर्थ नाहीं. आचरण संकल्पानुरूप ठेवि-

ल्यानें व्रताची सांगता होते. गंध, पुष्प, फल वगैरे सर्व उपचार आहेत. त्यांच्या मागें लागून खरें कर्तव्य विसरण्यांत अर्थ नाहीं. तसेंच ज्या स्त्रिया आपलें प्रापंचिक कर्तव्य नीटपणें बजावीत नाहींत, त्या गृहिणीच्या पदास पात्र न होतां पतीच्या दुःखास मात्र कारणीभूत होतात, हें ध्यानीं असावें. पुरुषांनींही सत्यवानाच्या अंगचे सद्गुण व अश्वपतीचा प्रेमळपणा व इतर गुण आपल्या अंगीं उतरतील असें करण्याची खबरदारी घेऊन सदोदित आपलें घर आनंदानें परिपूर्ण राहील असें करावें. गरिबी किंवा श्रीमंती प्राप्त झाली तरी आपण मानवी कर्तव्यकर्म करण्यास सदा तत्पर राहून सन्मार्गगामी व्हावें व सर्वांस ममतेनें वागवावें, हें कुटुंबांतील वडील जनांचें कर्तव्यकर्म आहे. दुःखाचे प्रसंग प्राप्त होतांच नववधूचा किंवा नूतन जन्मलेल्या बालिकेचा पायगुण असें म्हणून वृथा कष्ट उपस्थित करून घेणें हें मूर्खपणाचें लक्षण होय. इतकें जर सावित्रीच्या कथानकावरून आपण शिकूं तर हा उत्सव समाजांत रूढ झाल्याचें सार्थक होईल.

---

## आषाढ महिना.

आषाढ हा महिना जून महिन्याच्या सुमारास येतो. या महिन्यांत कर्कसंक्रमण होत असून या संक्रमणापासून मकरसंक्रमणापर्यंत दक्षिणायन असतें. या संक्रांतीच्या दिवशीं दान, उपोषण वगैरे करावें. आषाढमासांत एक मासपर्यंत एकभुक्त व्रत करावें. तेणेंकरून धनधान्य व पुत्र यांची प्राप्ति होते. तसेंच उपानह, छत्री, लवण, आवळे यांचीं दानें करावीं. तेणेंकरून वामनाची ( विष्णु ) सेवा केल्याप्रमाणें होते. पुष्य नक्षत्रानें युक्त किंवा विहित अशा आषाढ शुक्ल द्वितियेच्या दिवशीं श्रीरामाचा रथोत्सव करावा. आषाढ शुक्लपक्षांतील दशमी व पौर्णिमा या मन्वादि आहेत. आषाढ शु. ११ स विष्णुशयनोत्सव करावा व चातुर्मास्याचा संकल्प या दिवशीं करून शैव, सौर ( सूर्योपासक ) व वैष्णव या सर्वांनीं चातुर्मास्यव्रत पाळावें. याशिवाय तप्तमुद्राधारण, कोकिलाव्रत, शाकाव्रत, शिवशयनोत्सव व व्यासपूजा हीं धर्मकृत्यें याच महिन्यांत आचरावीं.

आषाढ शु. २ येस जगन्नाथाची रथयात्रा निघते. कृष्ण व बलराम कंसास मारण्यासाठीं गोकुळाहून मथुरेस गेल्याबद्दलचा हा उत्सव असून त्यांची बहीण सुभद्रा

हिची मूर्ति देखील रथांत बसविलेली असते. हा रथ सुमारें दीड मैल ओढून नेतात व लक्षोगणति लोक मूर्तींच्या दर्शनासाठीं दूरदूरच्या ठिकाणाहून येतात. दहा दिवसांनंतर रथ पुनः परत आणतात. आषाढ शु. १० मीस पुनर्यात्रा किंवा उत्तर रथयात्रा असें नांव आहे. सर्व जगन्नाथाच्या देवालयांतून हा उत्सव होत असतो. कोंकणांत आषाढ शु. १३ स गुरांची पूजा केली जाते. या सणास बेंदूर असें म्हणतात. पौर्णिमा हा व्यासपूजेचा दिवस आहे. आषाढ व॥ ५ मीस बंगाल व उत्तर हिंदुस्थानांत नागदेवता मनसा हिची पूजा करतात. हिला मनसा पंचमी असें नांव आहे. आषाढ व॥ १० मीपासून १३ पर्यंत भूमाता विटाळशी असते असें मानून त्या मुदतींत जमीन नांगरणें, बीं पेरणें, प्रवास करणें वगैरे वर्ज्य आहे असें बंगालांत मानतात. या कालास अंबुवाची हें नांव आहे. चौथ्या दिवशीं दगडांस स्नान घालून फुलांच्या माळा वाहतात व भूमाता पुनीत झाली असें समजतात. पुढें लवकरच वर्षाकालास प्रारंभ होतो व ती गर्भवती होऊन धान्य देते असें समजण्यांत येतें. यावरून हा सण पावसाला प्रारंभ होण्याच्या पूर्वीचा आहे असें दिसतें. आषाढ अमावस्येस दीपपूजा करण्याची चाल आहे.

---

## महाएकादशी.

—:०:—

**देव ही पंढरी आत्मा पांडुरंग । करितसे संग अहर्निशीं ॥**
**मन पुंडलीक आवरूनी धरा । तेणें होय सोयरा आत्माराम ॥**
**चहूं या देहाची करूनियां वीट । विटेवरी नीट उभा असे ॥**
**तुका ह्मणे लक्ष लक्षूनी अंतरीं । तोचि वारकरी पंढरीचा ॥**

कृष्ण व शुक्ल पक्षांतील अकरावी तिथि एकादशी या नांवानें संबोधिली जात असून एकादशी नांवाच्या देवतेप्रीत्यर्थ या दिवशीं वैष्णव व शैव मतानुयायी लोक उपोषण करीत असतात. त्यांतून आषाढ शु. ११ स **महाएकादशी** असें म्हणत असून त्या दिवशीं विष्णु शयन करतो असें समजण्यांत येतें. यासाठीं या दिवसाला **शयनी एकादशी** असें म्हणतात. चातुर्मासाचा आरंभ याच दिवशीं होतो. विष्णु कार्तिक शु. ११ स जागा होतो, यासाठीं त्या दिवसास **बोधिनी एकादशी** असें नांव आहे. वेदांत श्रीविष्णूच्या प्रीत्यर्थ जीं स्तोत्रें आहेत त्यांत चार महिने विष्णुदेवता शयन करते असें वर्णन सांपडतें. यावरून पंडितांनीं असा

निष्कर्ष काढिला आहे कीं आठ महिने दिवस व चार महिने रात्र असा अनुभव ज्या वेळीं वेदकालीन ऋषींस येत होता त्या कालीं सूर्यप्रीत्यर्थ केलेलीं हीं स्तोत्रें असावीं. या प्राचीन ऋचांचा विचार बाजूस ठेवून रूढ पौराणिक कथा भागावरच आम्हीं या सणांचा विचार केला आहे. या एकादशीचें महात्म्य पुराणांत व महाभारतांत विशेष वर्णिलें आहे. प्राचीन कालीं पांडव, रुक्मांगद राजा, अंबरीष ऋषि वगैरे महनीय लोकांनीं एकादशी व्रत आचरल्याचें पुराणांत सांगितलें असून त्यांच्यावर आलेल्या भयंकर विघ्नांचा विष्णूनें परिहार केल्याच्या कथा भाविक लोक या दिवशीं मोठ्या प्रेमानें वाचतात. एकादशीच्या उत्पत्तीसंबंधाची गोष्ट अशी आहे कीं, पूर्वकालीं देव व दानव यांच्यांत विरोध चालत होता. तेव्हां कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य यानें शंकराकडून आपण अमर व्हावें असा वर मिळविला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तो ब्रह्मा, विष्णु, शिव वगैरे देवतांस अजिंक्य होऊन त्याच्या दराऱ्यास घाबरून त्यांना दडून बसण्याचा प्रसंग आला. सर्व देव त्रिकूट पर्वतावर धात्री झाडाच्या खालीं एका गुहेंत दडून बसले. सहजच त्यांना जेवणही न मिळतां उपोषण व पावसामुळें स्नान घडलें. इतक्यांत त्यांच्या एकवटलेल्या श्वासापासून एक शक्ति उत्पन्न झाली. देवांच्या विनंतीवरून तिनें त्या गुहेच्या द्वाराशीं टपत बसलेल्या मृदुमान्य दैत्याचा नाश केला. हीच देवी एकादशी होय. हिच्यांत सर्व देवांचें तेज एकवटलें होतें, यासाठीं एकादशीव्रत शिव व विष्णु या दोन्ही देवतांच्या उपासकांत रूढ झालें.

## शास्त्रोक्त विधि.

एकादशीच्या दिवशीं श्रीविष्णूची चतुर्भुज मूर्ति लक्ष्मीसह मंचकीं ठेवून तिची पूजा करावी. दशमीच्या दिवशीं एकभुक्त राहून एकादशीस उपोषण करावें. त्या दिवशीं रात्रौ जागरण करून हरिभजनांत काल घालवावा. द्वादशीचे दिवशीं पहांटेस पांच घटका दिवसास भोजन करावें. एकादशीच्या दिवशीं समुद्रस्नान करावें. विष्णूस तुलसीच्या माला वाहून आपण त्या कंठीं धारण कराव्या. दशमी, एकादशी व द्वादशी हे तिन्ही दिवस हरिचिंतनांत घालवून विषयोपभोगांचा त्याग करावा. आषाढी व कार्तिकी एकादशीच्या दिवशीं वैष्णवांनीं तप्तमुद्रा धारण*

---

* यासंबंधानें मतभेद असून तप्तमुद्राधारण धर्मविहित असल्याबद्दल जसें अनुकूल मत आहे, तसें कित्येक ग्रंथांत प्रतिकूल मत आहे.

कराव्या. आषाढ शु० १२ चे दिवशीं वामनाची पूजा करावी, तेणेंकरून नरमेध यज्ञाचें फल मिळतें.

## चालू रूढि.

सर्व एकादशीसंबंधानें स्मार्त व भागवत असे दोन संप्रदाय आहेत. हें व्रत स्मार्त व वैष्णव पाळतात. त्याचप्रमाणें सर्व वर्णांच्या लोकांस एकादशी व्रताबद्दल आदर वाटतो. विशेषतः खालच्या वर्णांतील लोकांत एकादशीच्या दिवशीं उपोषण करण्याचा परिपाठ विशेष आहे. कित्येक एकदांच जेवण करून हें व्रत आचरतात. देशपरत्वें या दिवशीं कित्येक पदार्थ वर्ज्य करण्याची चाल आहे. कित्येक ठिकाणीं गहूं तर कित्येक ठिकाणीं तांदूळ या दिवशीं ग्रहण करीत नाहींत. उपोषणाच्या दिवशीं रोजच्या डाळभाताऐवजीं अनेक मिष्ट पदार्थ व फळें सेवन करून उपोषित राहिल्याची समजूत करून घेणारांचा भरणा विशेष आहे. दशमीस किंवा द्वादशीस क्वचित् लोक एकभुक्त राहतात. विष्णूचीं प्रसिद्ध देवालयें ज्या ठिकाणीं आहेत, त्या गांवीं यात्रा भरत असल्यास बहुतेक लोक या दिवशीं उपोषण करून हरिभजनांत काल घालवीत असतात. सर्व विष्णूच्या लहान मोठ्या देवालयांत या दिवशीं उत्सव होत असतो. हिंदू लोक अनेक देवांचे पूजक आहेत अस जरी सकृद्दर्शनीं वाटतें, तरी हे सर्व देव त्रैमूर्तींतील विष्णु व शिव या दोन मुख्य दैवतांचीं रूपांतरें आहेत.

## एकादशीचें महत्व.

श्री विष्णूचे उत्सव निरनिराळ्या ठिकणीं भिन्न कालीं व भिन्न पद्धतीनें व कमीजास्त प्रमाणावर पाळले जातात तरी वर्षभर व्रतोपोषणांच्या योगानें या देवतेची भक्ति व सेवा करण्याचा प्रघात सर्वत्र चालू आहे. विष्णूचे जे दहा अवतार झाले त्यांपैकीं नृसिंह, वामन, राम व कृष्ण या अवतारांचें महत्व विशेष मानिलें जातें व त्यांतही राम व कृष्ण यांची उपासना सर्वत्र चालू आहे. कृष्णोपासनेचा प्रकार विशेष राजस व रामोपासनेचा विशेष सात्विक आहे हें या उपासनांतील अंतर होय. विष्णुभक्ति वर्षभर कशा प्रकारें चाललेली असते हें पुढील विवेचनावरून दिसून येणार आहे. प्रत्येक महिन्यांतील शुक्ल व कृष्ण पक्षांतील एकादशी विष्णूप्रीत्यर्थ पाळल्या जातात. महाभारतांत द्वादशीच्या दिवशीं

विष्णूप्रीत्यर्थ उपोषण करावें म्हणजे पुण्यप्राप्ति होते असें सांगितलें आहे. व विष्णुपुराणांत अष्टमी व एकादशी या तिथि श्रेष्ठ मानिल्या आहेत. परंतु आजकाल एकादशीस तेवढें विशेष महत्व देण्यांत येतें. स्मार्त सांप्रदायी द्वादशीयुक्त एकादशी पाळतात. वर्षांतील २४ एकादशीस निरनिराळीं नांवें असून प्रत्येकीचें महत्व भिन्न प्रकारानें वर्णिलें आहे. चैत्र शु. ॥ ११शीस कामदैकादशी असें म्हणतात. ही पाळल्यानें आपल्या कामना परिपूर्ण होतात असें सांगितलें असून नागराजानें ललित गंधर्वास उत्तम प्रकारें न गाइल्यामुळें रागानें पिशाच्च बनविलें व पुढें त्याची पत्नी ललिता हिनें एकादशी व्रत पाळून संपादन केलेल्या पुण्याच्या योगानें त्याची पिशाच्च योनीपासून मुक्तता झाली अशी कथा आहे. चैत्र व॥ ११ शी ही वरूथिन्येकादशी म्हणून ओळखली जाते. हिच्या योगानें पापक्षालन होतें व पुण्यसंचय वाढतो अशी कथा आहे. वैशाख शु. ११ शी ही मोहिन्येकादशी या नांवानें ओळखली जाते. धनपाल वैश्याचा मुलगा धृष्टबुद्धि यानें दुराचारी होऊन सर्व वित्ताचा नाश केला. त्याला त्याच्या बापानें घराबाहेर हांकून दिलें व राजानें स्वराज्यांतून हद्दपार केला. पुढें अरण्यांत एका ऋषीनें त्याला मोहिन्येकादशी व्रत पाळण्यास सांगून त्याला मोहापासून मुक्त केलें व पुनः त्याला सर्व संपत्ति लाभली. वैशाख व ॥ ११ स अपरैकादशी हें नांव आहे. स्नान व दानधर्म यांच्या योगानें प्राप्त होणारें पुण्य ही एकादशी पाळल्यानें प्राप्त होतें. ज्येष्ठ शु ॥ ११ स निर्जलैकादशी म्हणतात. पांडवांतील भीम हा उपोषण करण्यास कधीं तयार नसे. परंतु व्यासाच्या उपदेशानें त्यानें या दिवशीं पाणी देखील न पितां उपोषण केलें व त्या योगें प्राप्त झालेल्या पुण्यानें त्यानें कौरवांशीं झालेल्या युद्धांत यश मिळविलें अशी कथा आहे. ज्येष्ठ व॥ ११स योगिन्येकादशी म्हणतात. कुबेराच्या माळ्यानें आपल्या पत्नीवर अत्यंत प्रेमासक्त होऊन आपल्या धन्यास देवपूजेसाठीं वेळेवर फुलें आणून देण्याचें कर्तव्यकर्म न केल्यामुळें त्याला शाप दिला व तो कुष्ट रोगानें पीडित झाला. योगिन्येकादशी पाळल्यामुळें तो रोगमुक्त झाला. आषाढ शु ॥ ११स शयनी एकादशी म्हणतात. मांधात राजा राज्य करीत असतां तीन वर्षें अवर्षण पडून लोक दुष्काळानें पीडित झाले. तेव्हां ही एकादशी पाळल्यामुळें वृष्टि होऊन देश सुपीक झाला. या दिवशीं विष्णु महासागराच्या खालीं ( अस्तास ) जाऊन चार महिने विश्रांती घेतो म्हणून हिला शयनी एकादशी म्हणतात. वेदांत विष्णूस सूर्याच्या स्थानीं कल्पिलेला आहे. तेव्हां वर्षाचे आठ महिने दिवस व चार

महिने रात्र वेदकालीन लोक, ते ज्या प्रदेशांत रहात असत तेथें, अनुभवीत असत. त्या कालाची आठवण देणारी ही तिथि आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. वेदकालीं मूलतः आर्य लोकांची वस्ती उत्तर ध्रुवाकडे होती. तेथें कांहीं काल त्यांनीं वास केला तेव्हां सहा महिने दिवस व सहा महिने रात्र असे. पुढें ते स्थानांतर करीत दक्षिण प्रदेशीं उतरत गेले तसतसा दिवस व रात्र यांच्यांत फरक पडत जाऊन दहा महिने, नऊ महिने, किंवा आठ महिने दिवस व बाकीचे महिने रात्र अशी स्थिति झाली. ऋग्वेदाच्या १० व्या मंडळांत ( ७२-८-९ ) पुढील ऋचा आहे.

**अष्टौ पुत्रासो अदितेर्ये जातास्तन्वस्परि । देवाँ उपप्रैत्सप्तभिः परा मार्तण्डमास्यत् ॥ सप्तभिः पुत्रैरादितिरुपप्रैत्पूर्व्यं युगं । प्रजायै मृत्यवे त्वत्पुनर्मार्तांड माभरत् ॥**

अर्थ—अदितीच्या देहापासून आठ पुत्र झाले. तेच आदित्य ( सूर्य ) होत. तिनें सात पुत्रांस देवांपाशीं नेलें आणि मार्तंडास टाकून दिलें. हें पूर्व युगांत घडलें. तिनें मार्तंडास जन्म दिला व मृत्युमुखीं लोटला.

ऐतरेय ब्राह्मणांत ( अ. ४-१७ ) असें सांगितलें आहे कीं,

**गवामयनेन यंति । गावो वा आदित्या आदित्यानामेव तदयनेन यंति ॥**

म्हणजे गायी (किंवा सूर्य रश्मी) हेच आदित्य होत. आणि गाईचा संचार होण्यास लागणारा काल हाच प्रत्येक महिन्याच्या सूर्य देवतेचा अयन (संचार) काल आहे. यावरून दिसून येईल कीं आठ महिन्याचे आरंभींचे जे आठ आदित्य तेच अदितिपुत्र असून ८ वा हा मृत्युमुखीं पडे. अर्थात् अस्तास जाई. व पुढें चार महिने रात्र असे. वेदकालीन लोक प्रत्येक महिन्याच्या आरंभीं उदय होणारा सूर्य निराळा आहे असें मानीत व त्यांचीं नावेंही त्यांनीं निराळीं दिलेलीं आहेत. सूर्य पाण्याखालीं जाऊन चार महिने वृत्रासुराशीं म्हणजे अंधःकाराशीं भांडून विजयशाली होतो व पुन्हा वर येतो अशा अर्थाच्या अनेक ऋचा ऋग्वेदांत सांपडतात. यावरून विष्णु शयन करतो व चार महिन्यानंतर जागा होतो अशी जी कथा पुराणकारांनीं रचली तिच्या बुडाशीं ही वेदकालीन विष्णूची किंवा आदित्याची कथा असली पाहिजे. याप्रमाणें सतत आठ महिने आनंददायक सूर्यप्रकाशाचा उपभोग घेतल्यावर आषाढ शु० ११ स सूर्यास्त होण्याच्या दिवशीं सर्व लोक त्या

देवतेची आराधना करीत यांत नवल नाहीं. पुनः चार महिन्यांनंतर रविकिरणें दिसूं लागतांच त्यांच्या भक्तीला उमाळा येत असे हें देखील साहजिक आहे. म्हणून अत्यंत प्राचीन कालीं पवित्र मानलेले हे दिवस पुराणकारांनीं त्यांस धार्मिक स्वरूप देऊन समाजांत रूढ केले व त्यानीं पूर्वकालाशीं आमच्या धार्मिक आचरणाचा संबंध जोडून दिला हें योग्य झालें असें म्हटलें पाहिजे.

आषाढ व॥११ स कामिकैकादशी किंवा मनकामना पूर्ण करणारी एकादशी म्हणतात. श्रावण शु॥११ पुत्रदायी एकादशी या नांवानें ओळखली जाते. पूर्व कालीं महीजित राजानें ही एकादशी पाळल्यामुळें पुत्रप्राप्ति झाली. श्रावण व ॥ ११ स अजैकादशी म्हणतात. राजा हरिश्चन्द्रानें ही एकादशी पाळल्यामुळें त्यास पूर्ववैभव प्राप्त झालें. भाद्रपद शु ॥ ११ ही परिवर्तिन्येकादशी; ही विष्णूनें शयन करून दोन महिने झाल्याबद्दलची असून या दिवशीं ही देवता एका कुशीवरून दुसऱ्यावर वळते अशी कथा आहे. सूर्यास्ताच्या वेळीं विष्णुदेवालयांत विष्णु मूर्तीस एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर फिरविण्यांत येतें. भाद्रपद ११ स इंद्रसेन राजा व त्याच्या प्रजेनें उपोषण, रात्रौ जाग्रण वगैरे करून विष्णुदेवतेस प्रसन्न केलें व त्यायोगें इंद्रसेन राजाच्या मृत पित्यास स्वर्गप्राप्ति झाली म्हणून या ११ स इंद्रैकादशी असें म्हणतात. आश्विन शु ॥ ११ स ज्याला मृत्यु प्राप्त होतो तो ही एकादशी पाळणारा असल्यास त्याला यम राजाच्या पाशांची भीति नसून तो थेट स्वर्गास जातो. यावरून या तिथीला पाशांकुशैकादशी असें नांव आहे. आश्विन व॥ ११ स मुचकुंद राजानें आपली पत्नी चंद्रभागा हिच्या इच्छेनुसार उपोषण करून विष्णुसेवा केल्यामुळें त्याला स्वर्गप्राप्ति झाली. या तिथीस रमैकादशी असें नांव आहे. कार्तिक शु ॥ ११ स श्रीविष्णु जागा होतो म्हणून तिला प्रबोधिन्येकादशी असें म्हणतात. विष्णूच्या देवालयांत मूर्तीची मिरवणूक काढतात. वनभोजनसमारंभ द्वादशीपासून पौर्णिमेपर्यंत कोणत्याही दिवशीं करण्याचा संप्रदाय आहे. रानांत आवळीच्या झाडाखालीं देवाची पालखी ठेवून तेथेंच हा भोजनसमारंभ होतो. व हें जेवण फार पवित्र मानिलें असल्यामुळें गांवांतील लहान मोठे या भोजनसमारंभास हजर असतात. कार्तिक व ॥ ११ ही उत्पत्त्यैकादशी या नांवानें ओळखली जाते. मुरदैत्याचा नाश करण्यासाठीं विष्णूनें या दिवशीं एक स्त्री देवता स्वतःपासून उत्पन्न केली व सर्व भक्तांचें कल्याण करण्यासाठीं तिला एकादशी देवी असें नांव देऊन एकादशी पाळणाराचें हित करण्याची आज्ञा केली. मार्गशीर्ष शु ॥

११ ला मोक्षदायी एकादशी असें म्हणतात. वैखानस राजानें ही एकादशी पाळून पुण्य संपादन केलें व आपल्या पित्याचा नरकापासून उद्धार करून त्याला मोक्षप्राप्ति करून दिली. मार्गशीर्ष शु॥ ११ स लंपक नांवाच्या राजपुत्रास वनवासांत असतांना सहज उपवास घडला व त्यायोगें विष्णु प्रसन्न होऊन त्यास मुक्ति मिळाली. म्हणून हिला सफलैकादशी असें नांव आहे. पौष शु ॥ ११ स सुकेतु राजानें उपोषण केलें. त्या योगें त्याला पुत्रप्राप्ति झाली म्हणून हिला पुत्रदायी एकादशी असें म्हणतात. पौष्य कृ. ११ स यमानें तपश्चर्या करून तिलाची उत्पत्ति केली. यासाठीं या दिवशीं तीळ पाण्यांत घालून तिलोदकानें स्नान करावें. तीळ वाटून अंगास लावावे. तिलोदक प्यावें, ब्राह्मणांस तिलदान द्यावें. व देवास तीळ वहावे. याप्रमाणें सहा परीनें तिलांचा उपयोग या दिवशीं करावयाचा असल्यानें या तिथीला षट्‌तिलैकादशी हें नांव आहे. याच महिन्यांत संक्रांतीस तिलाचें महत्त्व फार सांगितलें आहे. माघ शु॥ ११ स जयैकादशी हें नांव आहे. इंद्राचा गंधर्व पुष्पवान हा आपल्या पत्नीच्या प्रेमोपभोगांत दंग होऊन इंद्राची सेवा करण्यांत कसूर करूं लागला तेव्हां इंद्रशापानें उभयतांना दैत्ययोनी प्राप्त झाली व मृत्युलोकीं तें दंपत्य भ्रमण करूं लागलें. पुढें या तिथीस त्यांना सहजरीत्या उपवास घडला. तेव्हां विष्णूच्या प्रसादानें त्यांस इंद्रलोक पुनः प्राप्त झाला. माघ व ॥ ११ स रामानें उपवास पाळल्यामुळें त्याला लंकेस जाण्यासाठीं सेतु बांधतां आला म्हणून हिला विजयैकादशी असें नांव आहे. फाल्गुन शु. ११ स चैत्ररथ राजानें आमलकी किंवा आवळीच्या झाडाखालीं श्रीपरशुरामाची पूजा केली व उपोषण केलें. यावरून या तिथीला आमलक्यैकादशी असें म्हणतात. फाल्गुन व॥ ११ ही पापमोचन्येकादशी या नांवानें ओळखली जाते. मंजुघोषा नांवाच्या एका सुंदर अप्सरेनें मेधावी ऋषीसमोर जाऊन आपल्या नृत्य गानाच्या योगानें त्याच्या तपश्चर्येंत व्यत्यय आणला, त्यासाठीं तिला ऋषीनें शाप दिला. या शापापासून मुक्त होण्यास मंजुघोषेला हें एकादशी व्रत करावें लागलें. याप्रमाणें या २४ एकादशी निरनिराळ्या कारणानें महत्वाच्या मानिल्या आहेत. स्त्रीपुरुषांनीं एकादशी व्रत पाळावें असें पुराणांत सांगितलें आहे. वैष्णव सांप्रदायी समाजांत हें व्रत फार रूढ आहे. याप्रमाणें वर्षांतील २४ ही एकादशी महत्त्वाच्या मानिल्या असून शयनी व प्रबोधिनी या दोन एकादशी त्यांतही विशेष महत्त्वाच्या गणिल्या आहेत.

## जगद्रक्षक श्रीविष्णु.

यासंबंधाची प्राचीन ग्रंथांवरून जी माहिती उपलब्ध आहे, ती पाहतां या दैवतास हिंदूंच्या अंतःकरणांत अग्रस्थान कां मिळालें हें समजून येणार आहे. वेदकालीं विष्णूसंबंधाचे विचार हल्लींहून निराळे होते, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल. वेदांत विष्णु हें नांव सूर्यास दिलें आहे. त्याला इंद्र, वरुण, सावित्री, अग्नि वगैरे देवतांपेक्षां पराक्रमाच्या दृष्टीनें कमी योग्यतेचा गणिला आहे. शतपथ ब्राह्मणांत इंद्रानें विष्णूचा शिरच्छेद केला असा उल्लेख आहे. तथापि सर्व जगाचें पालनपोषण ज्या प्रकाशमान देवतेमुळें होतें ती देवता विष्णु असून तिला सूर्याच्या ठिकाणीं मानिलें आहे. अनेक प्रकारें या सूर्यरूपी विष्णूची स्तुति केलेली आढळते. त्यांतून कांहीं उतारे येथें देत आहों.

"हा विश्वाधिपति, भक्तरक्षक, कृपाळू व उदार आहे; तरी त्यानें तीनच पावलांनीं भूलोकाचें आक्रमण केलें. व तेंही ( मनुष्यानें ) उन्नति आणि दीर्घायुष्य हीं दोन्ही साधावीं म्हणून केलें. या पराक्रमाचीच आम्ही विशेष वाखाणणी करितों. (ऋक्. मं. १-१५५) हा आकाशस्थ सर्वद्रष्टा विष्णु, त्याचीं दोनच पावलें पाहून मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो. त्याच्या तिसऱ्या पावलाकडे पाहण्याचीसुद्धां कोणाची प्राज्ञा नाहीं. सामर्थ्याची तरतरी किंवा पक्षाच्या भराऱ्या यांपैकीं कशाचीही तेथें मात्रा चालत नाहीं. चार प्रकारच्या नांवांनीं नव्वद विलक्षण स्थित्यंतरें तो एकाद्या वाटोळ्या चाकाप्रमाणें गरगर फिरवीत आहे. हा शरीरानें इतका अवाढव्य, परंतु भक्तीनें सहज मोजला जातो. तरुण परंतु बालरूप नव्हे, असा हा विष्णु हाक मारल्याबरोबर येऊन उभा राहतो."

वरील उताऱ्यांत जे विचार ग्रथित केले आहेत त्यांच्याच अनुरोधानें पुराणांत अनेक कथा रचल्या गेल्या ह्यांत संदेह नाहीं. विष्णूचीं तीन पावलें म्हणजे सूर्याचा उदय, मध्य व अस्त यांवरून वामनावताराची कथा अस्तित्वांत आली, असें कित्येक प्रतिपादन करितात. विष्णूचें तिसरें पाऊल जें कोणासही प्राप्त होत नाहीं त्या परम पदाची प्राप्ति हेंच आर्यांचें ध्येय होऊन बसलें आहे. वेदांत पुढीलप्रमाणें

## विष्णुलोकाचें वर्णन

सांपडतें. 'जेथें ईश्वराचे भक्तजन आनंदांत तल्लीन असतात, असा तो विष्णूचा प्रिय लोक मलाही प्राप्त होईल. अमृताचा अक्षय्य झरा त्या विष्णूच्या लोकीं

आहे. असा उत्तम लोक तुम्हांस प्राप्त व्हावा अशीच आमच्या अंतःकरणाची मनीषा आहे. अतिशय चपल आणि अनेक शृंगयुक्त अशा दिव्य धेनू तेथें असतात. पहा, हें त्या सर्वव्यापक वीराचें अत्यंत श्रेष्ठ असें स्थान वरून आपणावर भरपूर प्रकाश पाडीत आहे.' ( ऋग्वेद मं. १-सू. १५४-५।६ )

विष्णूचा प्रिय लोक हाच पुराणकालीं ' वैकुंठ ' या नांवानें संबोधिला गेला. वैकुंठींचा परमानंद अवर्णनीय असल्याचें साधुसंतांनीं जसें वर्णिलें तसेंच वेदकालिन ऋषींनीं म्हटलें. भक्तांसाठीं सूक्ष्माहून सूक्ष्म होणारा व उच्चनीचपणा न मानणारा श्रीविष्णु अत्यंत प्रिय दैवत झाला यांत आश्चर्य कोणतें? भागवत, विष्णुपुराण व इतर वैष्णव ग्रंथांत विष्णूची स्तुति ज्या शब्दांत केली आहे त्याच शब्दांत ती वेदकालींही करण्यांत आली हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

"तो पुराणपुरुष खरा परंतु नवीन म्हटला तरी नवीनही आहे. आणि सृष्टिनियामक व स्वयंभू आहे. म्हणून या विष्णूची जो भक्ति करितो, जो या परमश्रेष्ठ विष्णूच्या अवताराचें स्तवन करितो त्याचा दैवी ऐश्वर्याशीं योग खचित घडून येईल. हे स्तोत्र जनहो, सकल धर्मव्यवस्थेचें आदिकारण स्वभावतः हाच विष्णु होय. तेव्हां तुम्हीं आपल्या अल्प ज्ञानाप्रमाणें त्याच्या अवताराचें स्तवन करून त्याला आनंदानें परिपूर्ण करा. त्याची जीं जीं चरित्रें तुम्हांस माहित आहेत तीं तीं वर्णन करा. हे विष्णु, तुज परमश्रेष्ठाच्या कृपेचा अनुभव आम्ही घेतच आहों. ( ऋग्वेद मं. १-१५६ )"

वेदकालीं विष्णूबद्दल आर्यांच्या अंतःकरणांत अत्यंत आदरभाव वसत होता. स्थिरचर सृष्टीचें प्रेमानें पोषण करणारा एकच देव व तो श्रीविष्णु आहे ही भावना त्यांच्या मनांत दृढ झाली होती. या भावनेचा विकास होत जाऊन शेवटीं विष्णुभक्तीचें महात्म्य इतकें वाढलें कीं विष्णूपेक्षां श्रेष्ठ दैवत नाहीं असें लोक मानूं लागले.

**एकः समस्तं यदिहाऽस्ति किंचित् ।**
**तदच्युतो नाऽस्ति परम् ततोऽन्यत् ।**
**सोऽहं स च त्वं स च सर्वमेतत् ।**
**आत्मस्वरूपं त्यज भेदमोहम् ॥**

" जें सर्व कांहीं येथें आहे तें अच्युत ( विष्णु ) आहे. दुसरें कांहीं नाहीं. तो मी आहें. तो तूं आहेस. तो हें सर्व आहे. तो आत्मा आहे. भेदाभेदाचा मोह सोडून दे " अशा प्रकारचें समाजाचें मत बनत गेल्यामुळें विष्णूबद्दल प्रेम व भक्ति यांची वृद्धि होत गेली. विष्णूचीं तीन पदें म्हणजे सूर्याचा उदय, मध्य व अस्त असें जिज्ञासूंनीं ठरविलें. तरी ज्यांचे विचार धर्मपर होते त्यांनीं या पदांचा अर्थ निराळा मानून स्थूल, सूक्ष्म व कारण लोक असा केला. आणि वेदगायकांनीं परमम् पदम् व पुराणकारांनीं वैकुंठ असें ज्याला नांव दिलें त्याला निर्गुण ब्रह्मपद असें वेदांत्यांनीं मानिलें. पुराणांत व रामायण महाभारतांत विष्णु हा अधर्माचें उच्चाटण करण्यासाठीं पुनः पुनः मृत्युलोकीं अवतीर्ण होतो हा समज दृढ झाला. अशा

## विष्णूच्या अवतारांचें वर्णन

सर्व पुराणांत एकाच प्रकारचें सांपडतें असें नाहीं. वायुपुराणांत दोन ठिकाणीं अवतारांचें वर्णन आहे. पहिल्या वर्णनांतील बारा अवतार विष्णूचे नाहींत. दुसरे दहा अवतार विष्णूचे असून त्यांच्यांतील नऊ अवतारांचीं नांवें वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, दत्तात्रेय, वेदव्यास व कल्की अशीं दिलीं आहेत. दत्तात्रेयानें अलर्क व प्रल्हाद यांस आन्वीक्षिकी ( ध्यानयोग ) व यदु आणि हैहय यांस योग शिकविल्याचें सांगितलें आहे. हाच प्रल्हाद अत्यंत प्रेमळ विष्णुभक्त असून त्यानें आपला पिता जो हिरण्यकश्यपु याच्या इच्छेविरुद्ध विष्णुभक्तीचा पंथ वाढविला. कांहीं पुराणांत हंस, कूर्म, मत्स्य, हयग्रीव हे अवतार सांपडतात. सांख्यशास्त्राचा उत्पादक कपिल, आयौषधी विद्येचा उत्पादक धन्वंतरी, बद्रिकाश्रमांत तपश्चर्येच्या योगानें ब्रह्मत्वास पोहोंचलेले नर व नारायण, ज्याच्यावरून या भूगोलाला पृथ्वी हें नांव पडलें तो पृथुराजा या सर्वांस कमी जास्त प्रमाणानें विष्णूचे अवतार असें मानण्यांत आलें आहे. गीतेंत श्रीकृष्णानें उपदेशिलेल्या नियमानुसार या थोर विभूतींस अवतारांत गणलें, यांत संदेह नाहीं श्रीकृष्ण म्हणतात—

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥

भग. अ. १०-४१.

**अर्थ**—जी जी विभूति ऐश्वर्ययुक्त किंवा शोभायुक्त किंवा कांहीं तरी प्रभावानें युक्त असेल ती तो माझ्या तेजाच्या अंशापासून झालेली आहे.

या अर्थानें अनेक विभूति झाल्या तथापि त्यांपैकीं मत्स्य, कूर्म वगैरे दहा अवतार मात्र निश्चित व महत्वाचे मानण्यांत येत असून त्यांच्यापैकीं श्रीराम व श्रीकृष्ण हे तर सर्वमान्य झाले व त्यांची पूजा सर्व हिंदुलोक करीत असतात. दत्तात्रेय-भक्ति कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडते. महाराष्ट्रापुरतें पाहूं गेल्यास ती विशेष आहे. विष्णूचें स्वतंत्र देवालय कोठें नाहीं. त्याच्या अवतारांतून एकाद्या अवताराची विष्णूच्या ठिकाणीं स्थापना केलेली असते. नृसिंह, राम, कृष्ण, नारायण या अवतारांप्रीत्यर्थ जागोजागीं विष्णूचीं देवालयें स्थापन झालेलीं आहेत. वर सांगितलेल्या

## अवतारांचें रहस्य

उत्क्रांतितत्वास धरून आहे असें कित्येक म्हणतात. मत्स्य* हा हस्तपादरहित असा पहिला अवतार होय. दुसरा जो कूर्मावतार हा मत्स्याहून वरच्या प्राण्याची उत्क्रांतिनियमानुसार उत्पत्ति दर्शवीत आहे. वराहावतार हा त्याच्याही पुढची प्राणिकोटींतील पायरी जो चतुष्पाद पशु त्याचें उदाहरण होय. यानंतर नृसिंह हा नर व पशु यांचें एकीकरण असून पूर्णावस्थेस पोहोंचलेला मनुष्य जन्मास येण्यापूर्वीचा हा अवतार आहे. यानंतर याचकरूपानें अवतीर्ण झालेला ठेंगणा वामन हा अपूर्ण वाढ झालेल्या मानवी प्रकृतीचा द्योतक आहे. त्यानंतरचा परशुराम हा तामसी वृत्तीनें भरलेला व शक्तिमान् असा देहाची पूर्ण वाढ झालेला मनुष्य होय. यानंतरचा जो राम त्याच्यांत तामसी वृत्तीचा लोप होऊन सात्विक तेजाचा पगडा अंतःकरणावर बसल्याचें दाखविलें आहे. रामानंतर कृष्ण हा सत्व, रज, तम, राग, द्वेष यांची बाधा ज्याला नाहीं असा केवळ सत्याच्या जोरावर परंतु बुद्धीचा उपयोग करून निष्काम कर्म करणारा मुत्सद्दी होय. अर्थात् रामापेक्षांही वरच्या पायरीवरून जगांतील सुखदुःखांकडे पाहणारा हा जीवन्मुक्त आहे. स्वतः जीवन्मुक्त होण्यांत विशेष कांहीं नसून सत्कर्मांच्या योगानें संपूर्ण मानवसमाजास पूर्णावस्थेस पोहोंचविलें पाहिजे असें प्रतिपादन करणारा पूर्णप्रज्ञ बुद्ध त्यानंतर झाला. अर्थात् मत्स्यानंतर पायरीपायरीनें वराह व नृसिंह हे झाले. मूलतः पूर्ण वाढ न झालेला मनुष्य तोच वामन. त्यानंतर रागद्वेषानें भरलेला मनुष्य तो परशुराम. त्याहून सात्विक तो राम, रामाहून वरची

---

* महाप्रलयाच्या कथेशीं मत्स्यावताराचा संबंध असून असा प्रलय एका काळीं झाला असल्याचें ख्रिस्ती, महंमदी व इराणी धर्मही सांगतात. प्रलयासंबंधीं भिन्न-देशीय लोकांस कल्पना कशी आली याबद्दल अनेक तर्क करण्यांत आले आहेत.

सामाजिक प्रगति दर्शविणारा श्रीकृष्ण व सर्व जगाचा उद्धार करण्याची महत्वाकांक्षा बाळगणारा मनुष्य तो बुद्ध; अशी ही अवतारांची सांखळ आहे असें उत्क्रांतिवादी हिंदु ह्मणतात.

## विष्णुभक्तीचा संप्रदाय

एकाच प्रकारें चालत आला आहे असें म्हणतां येत नाहीं. महाभारतांत शांतिपर्वांत युधिष्ठिरानें भीष्म पितामह यांस शरपंजरीं असतां अनेक प्रश्न विचारले, त्यावेळीं 'सर्वांत श्रेष्ठ देव कोण?' या प्रश्नास भीष्मानें उत्तर दिलें कीं, 'विष्णु हेंच परमश्रेष्ठ दैवत असून त्याला आदि किंवा अंत नाहीं, तो विकाररहित आहे. ध्यान, चिंतन, सेवा यांच्या योगानें त्याला आळविलें असतां परम पदाची प्राप्ति होते. सृष्टि उत्पन्न करून तिचें पालनपोषण करणारा तोच श्रीसच्चिदानंद समर्थ होय.' याच पर्वांत नरनारायणाख्यान आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं, स्वायंभुव नारायणापासून नर, नारायण, हरि व कृष्ण या चार मूर्ति धर्माच्या पोटीं उत्पन्न झाल्या. यांपैकीं नर व नारायण या बंधुद्वयानें देहरूपी रथांत बसून उग्र तपश्चर्या केली. या ऋषींची ख्याति सर्वत्र पसरल्यामुळें अनेक जण त्यांच्या दर्शनास जात असत. एकदां नारदमुनि त्यांच्या भेटीस गेल्यावेळीं स्वायंभुव देवादिदेव नारायणाची (विष्णु) भेट आपणास कशी होईल, हें त्यांस विचारतांच त्यांनीं नारायणाचें निवासस्थान जें श्वेतद्वीप तेथें जाण्यास नारदास सांगितलें. त्याप्रमाणें नारद तेथें गेला व नारायणाच्या दर्शनाचा त्याला लाभ घडला. या देवतेचें हव्य कव्य व तपश्चर्या यांच्या योगानें दर्शन होत नाहीं असें या आख्यानांत सांगितलें असून एकदां एकत, द्वित व त्रित नांवाचे तीन ऋषि श्वेतद्वीपाहून परत आले व ज्याच्या अंतःकरणांत नारायणाविषयीं अनन्य भक्ति आहे त्यालाच नारायणाचे चरण दिसतात असें दर्शविलें आहे. नारायणानें नारद हा अधिकारी परमभक्त असल्याचें जाणून त्याला पंचरात्र सिद्धांत नांवाचा भक्तिमार्ग कथन केला. भगवान् नारायणानें सांगितलें कीं, "हिंसा करून यज्ञयागादिक करणारांना माझी प्राप्ति होत नाहीं. माझे चार व्यूह झाले. ते वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध किंवा परमात्मा, जीवात्मा, मन व अहंकार हे होत. वासुदेवाच्या ठायीं पूर्ण भक्ति ठेवावी. जो एकनिष्ठपणें वासुदेवाची पूजा करितो तो एकांतिन् भक्त सर्वांत श्रेष्ठ होय." पंचरात्र सिद्धांत हा सर्व वेदांचा निष्कर्ष आहे. चित्रशिखंडी या अभिधानानें

विख्यात असलेल्या सप्तर्षींनीं या उत्तम शास्त्राची रचना केली. हा प्रवृत्ति व निवृत्ति या दोन्ही मार्गांचा परिपोषक असून तो सिद्धांत नारदानें पृथ्वीवर प्रचलित केला असें शांतिपर्वांत सांगितलें आहे. पंचरात्र सिद्धांत हाच परमात्मप्राप्तीचा सोपा उपाय आहे त्याला

## वासुदेवधर्म

असें नांव देतां येईल. हा वासुदेवधर्म एका कालीं आमच्या देशांत चालू होता. ज्या वेळीं ब्रह्मा, विष्णु व शिव यांची पूजा रूढ झाली नव्हती त्यावेळीं वासुदेव हा परमपूज्य दैवत मानून त्याचीच भक्ति सर्व लोक करीत असत. महाभारतकालीं यज्ञयाग व हिंसा यांच्याबद्दल अनुकूल मत नव्हतें. अशा वेळीं भक्तिप्रधान एकेश्वरी वासुदेवधर्म वाढत गेला. पतंजली, पाणिनी वगैरे प्राचीन लेखकांच्या कालीं वासुदेव हा परम श्रेष्ठ दैवत असल्याचें लोक मानीत असत, हें त्यांच्या लेखांतील कांहीं वाक्यांवरून दिसतें. निवृत्ति व निष्काम भक्ति हीं वासुदेवधर्माचीं मुख्य अंगें होत. तरी प्रवृत्तिमार्गांत असून निवृत्तिपर वर्तन असणें हेंच योग्य असल्याचें त्यांत सांगितलें आहे. श्रीकृष्णानेंही गीतेंत वासुदेवभक्तिसंप्रदायाची महती वर्णिली आहे व सर्वप्रकारें वासुदेवास शरण जाऊन तनुमनधनेंकरून त्याचीच एकनिष्ठपणें सेवा करणारा एकांतिन भक्त श्रेष्ठ होय असें म्हटलें आहे.

**बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।**

**अर्थ**—'बहुत जन्मांच्या अंतीं वासुदेव हेंच सर्व आहे, अशा भावनेनें ज्ञानी मनुष्य मला भजतो. परंतु असा महात्मा दुर्लभ होय.' हाच वासुदेव भगवान् या नांवानें संबोधिला जात असून वासुदेवधर्माचे अनुयायी भागवत या नांवानें ओळखले जात असत. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा अत्यंत पवित्र मानला जाणारा तारक मंत्र भागवत संप्रदायी लोकांत आजही जपला जातो. विष्णूप्रीत्यर्थ वासुदेव शालिग्रामाची पूजा करण्याचा वैष्णवांत संप्रदाय आहे. वासुदेव हें पूज्य दैवत असल्यामुळेंच गृह्य विधींत त्याचा नामोच्चार करण्याचा प्रघात पडला व श्राद्धाची सांगता 'पितृस्वरूपी जनार्दनो वासुदेवः प्रीयताम् प्रीतो भवतु' या शब्दांनीं होऊं लागली हें उघड आहे. श्रीकृष्णानें गीतोपदेश केला त्यावेळीं वासुदेव, नारायण व विष्णु हे एकच आहेत अशी समजूत नव्हती असें दिसतें; कारण कृष्णानें अर्जुनास विश्वरूपदर्शन दिलें, त्या वेळीं 'आदित्यानामहम् विष्णुः'

म्हणजे आदित्यांपैकीं मी विष्णु* आहें असें सांगितलें. अर्थात् सूर्याच्या स्थानीं विष्णु देवतेची कल्पना त्या कालीं तरी प्रचलित होती.

कालेंकरून कृष्णाचें महत्व वाढतांच कृष्ण हाच भगवान्, तोच वासुदेव व तोच विष्णु असे मानण्यांत आलें. विष्णु सर्वांपूर्वी अंत्यास जाऊन पोहोंचला, यासाठीं तो श्रेष्ठ होय असें तैत्तिरीय आरण्यकांत म्हटलें आहे. शतपथ ब्राह्मणांतील वामनावताराच्या कथेवरून तो विश्वव्यापी असल्याचें सिद्ध होत आहे. कठोपनिषदांत आत्म्याचें मार्गक्रमण सांगितलें असून शेवटीं तो विष्णूच्या परम पदाला जाऊन पोहोंचतो असें सांगितलें आहे. मैत्री उपनिषदांत अन्नाला भगवद्विष्णु असें म्हटलें असून तेंच जगाचें पोषक द्रव्य असल्याबद्दल त्याची स्तुति केली आहे. याप्रमाणें विष्णूचें महत्व क्रमाक्रमानें वाढत गेलें. गृह्यसंस्कारांतदेखील विष्णूस महत्व प्राप्त होऊन आपस्तंभ, हिरण्याक्षिन् वगैरे सूत्रकारांनीं गृह्यविधींत त्याला अग्रमान दिला आहे. वधूवरांस उद्देशून सप्तपदीच्या विधींत ' विष्णु तुम्हांस मार्ग दाखवो आणि तुमच्या बरोबर असो ' असें म्हटलें आहे. यावरून विष्णूस किती पूज्य मानण्यांत आलें आहे हें दिसून येतें. महाभारतांत विष्णूची स्तुति अनेकपरीनें केली आहे.

**एको विष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः ॥**
**त्रींल्लोकान्व्याप्य भूतात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः ॥**

—अनु. १४९-१४०

**अहं नारायणो नाम प्रभवः शाश्वतोऽव्ययः ।**
**विधाता सर्वभूतानां संहर्ता च द्विजोत्तम ॥**

—वन० १८९-४.

अर्थात् विष्णु हा जगाची उत्पत्ति करणारा, रक्षण करणारा व संहार करणारा आहे. तो तिन्ही लोक व्यापून राहिलेला आहे. तो अविनाशी, अव्यय व प्राणिमात्राचा अन्तरात्मा आहे, असें शेंकडों वर्षांपासून आम्ही मानीत आलों आहों. वासुदेवधर्म हाच वैष्णवधर्म आणि यालाच

---

* वर्षाच्या बारा महिन्यांत बारा आदित्य किंवा सूर्य असल्याचें प्राचीन कालीं मानीत असत, व मधुमासाचा जो आदित्य तोच श्रेष्ठ समजून त्याला विष्णु असें म्हणत.

## भागवतधर्म

हें नांव असून त्याचा प्राचीन कालीं विजय झाला. या धर्माचें ऐतिहासिकदृष्ट्या प्राचीनत्व ठरविण्यास कांहीं आधार मिळतो. ख्रिस्ती शकापूर्वी दोनशेंपासून चारशें वर्षांतील लेख सांपडतात त्यांत भागवतधर्माचा उल्लेख आहे. तेवीसशें वर्षांपूर्वी चंद्रगुप्ताच्या पदरीं मेगेस्थनीस हा ग्रीसदेशीय गृहस्थ होता. त्यानें त्या कालीं वासुदेव कृष्णाची पूजा लोकांत रूढ असल्याचें सांगितलें आहे. ख्रिस्ती शकाच्या चवथ्या शतकांत गुप्त वंशाचे राजे राज्य करीत होते. त्यांच्या नाण्यावर 'परम भागवतः' अशीं अक्षरें आहेत. भागवतधर्माचें व्यापकत्व इतकें होतें कीं, ग्रीकांसारख्या परस्थांनींदेखील तो धर्म स्वीकारल्याबद्दल इतिहास साक्ष देत आहे. भागवतधर्मासारखा भक्तिप्राधान्य सार्वलौकिक किंवा विश्वधर्म परस्थांच्या विचारांस पटला यांत आश्चर्य नाहीं. ईश्वराच्या ठायीं निःसीम प्रेम, त्याचें नामसंकीर्तन, त्याच्या गुणाचें मनन, चिंतन व निदिध्यास आणि त्याची निष्काम सेवा यांसारखे सोपे व आनंददायक संसारतापत्रय विसरविणारे भक्तीचे प्रकार सर्वसंमत झाले, यांत आश्चर्य नाहीं. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणताही भेदभाव भागवतधर्माचा स्वीकार करण्याच्या आड येत नसून त्याचे प्रवर्तक जसे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे द्विज होऊन गेले त्याचप्रमाणें सामाजिक वर्णव्यवस्थेंत नीच मानलेले शूद्र, अतिशूद्र, महार, चांभार व म्लेंच्छही झाले. संतलीलामृतांत भागवतधर्माचा महिमा वर्णिला आहे, तो वाचला असतां मन आनंदित होतें. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध भागवत श्रीसंत तुकाराम यांच्या अभंगवाणीनें सांगावयाचें म्हणजे—

**उंच नीच कांहीं नेणें हा भगवंत । तिष्ठे भावभक्ति देखोनियां ।**
**दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्याघरीं रक्षी प्रल्हादासी ।**
**चर्म रंगूं लागे रोहिदासासंगें । कबीराचे मागीं वीणी शेले ।**
**सजन कसाया विकूं लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ।**
**नरहरि सोनारा घडूं फुंकूं लागे । चोखामेळयासंगें ढोरें ओढी ।**
**नामयाची जनीसवें वेंची शेणी । धर्माघरीं पाणी वाहे झाडी ।**
**नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानीयाची भिंत अंगें ओढी ।**
**अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे ।**
**गौळीयांचे घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला ।**
**यंकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी । अंबऋषिचे सोशी गर्भवास ।**

**मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥**
**घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥**
**पुंडलिकासाठीं अझूनि तिष्ठत । तुका ह्मणे मात धन्य त्यांची ॥**

असा हा भागवतधर्म विद्वान् अविद्वान्, श्रीमंत गरीब, उच्चनीच, प्रागतिक व पुराणमतवादी या सर्वांस मान्य झाल्यामुळें या देशांत त्याची पताका आजमितीसही फडकत आहे आणि ती दीर्घकालपर्यंत फडकत राहील यांत संशय नाहीं. सध्याच्या कालीं वैष्णव, शैव, सौर, गाणपत्य, समाजिस्ट, थिऑसॉफिस्ट हे व इतर अनेक धर्मपंथांचे अनुयायी म्हणविणारे कमी अधिक प्रमाणानें भागवतधर्मांचे अनुयायी आहेत असें म्हणतां येईल. पौराणिक कालीं या भागवतधर्मास

## वैष्णवधर्म

असें नांव पडलें. त्याचे प्रवर्तक अनेक झाले. त्यांनीं स्वतःच्या सद्वर्तनाच्या व भक्तीच्या जोरावर या धर्माचें महत्व वाढविलें. बौद्धधर्मांचे प्रतिस्पर्धि व वेदप्रणीत धर्माचें पुनरुज्जीवन करणारे सुप्रसिद्ध शंकराचार्य यांनीं भागवतधर्मीयांच्या पंचरात्र सिद्धांताचें खंडण आपल्या भाष्यांत केलें. (वेदान्तसूत्रभाष्य अध्याय २–२–४२–४५) त्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं, प्रत्येक मनुष्य परमेश्वराचा अंश असून ज्ञानाच्या योगानें त्याला ब्रह्मांत मिळून जातां येतें. जग मिथ्या असून जें आपण पाहतों तें सर्व ईश्वरी मायेमुळें आपणास सत्यस्वरूप दिसत नाहीं. नेत्रांवरील अज्ञानपटल दूर झाल्याशिवाय सत्याशीं आपली गांठ पडणार नाहीं. कर्मानें जीवाला बंध प्राप्त होतो; कर्मानें जीव बंधयुक्त होतो.

**ज्ञानादेव मोक्षः न तु कर्मसमुच्चयात् ।**

यासाठीं ज्ञान हेंच श्रेष्ठ मानावें असें आचार्यांनीं सांगितलें. भागवतधर्मांतील मुख्य मुद्दा—परमेश्वर व मनुष्य यांच्यांत सेव्यसेवक नातें असून जीव व शिव निराळे आहेत—त्यास शंकराचार्यांच्या प्रतिपादनामुळें धक्का बसला. तेव्हां भागवतधर्मांचे अनुयायी आचार्यांचें मत खोडून टाकण्यास पुढें आले. प्रथमतः विशिष्टाद्वैत मताचे संस्थापक रामानुजाचार्य यांनीं श्रुति, उपनिषत्, ब्रह्मसूत्रें व पुराणें यांच्या आधारें ब्रह्म हें निर्गुण नसून अनेक कल्याण गुणांनीं मंडित असल्याचें प्रतिपादन केलें. ज्ञान व कर्म यांचा समुच्चय मोक्षसाधनास आवश्यक आहे व ज्ञानापेक्षां भक्तीनेंच मोक्षप्राप्ति होते असें रामानुजांचें मत होतें.

त्यांच्या प्रतिपादनांत पुढील तीन मुद्यांचा विचार केला आहे:— १ विष्णु हाच परमात्मा आहे. २ जीवात्मा हा अणुपरिमाण असून परब्रह्ममूर्तीचा अंश आहे; व प्रत्येक जीवात्मा स्वतंत्र आहे. ३ इतर दृश्य पदार्थ तेवढे सर्व आत्मा नव्हत. आत्मा अमर असून अत्यंत सूक्ष्म आहे व त्याच्यांत वास करणारा ईश्वर हाच अंतस्थ आत्म्याचा शास्ता आहे. परंतु मनुष्याचा आत्मा व परमात्मा हे भिन्न होत. परमेश्वरप्राप्ति करून घेण्याचा मार्ग गीतेंत सांगितल्याप्रमाणें ज्ञानयुक्त भक्तिपूर्ण निष्काम कर्म होय. हेंच रामानुजांच्या प्रतिपादनांतील सार आहे. रामानुजीय संप्रदायाचे लोक दक्षिण हिंदुस्थानांतील तामिळ प्रांतांत आहेत. ह्या संप्रदायास श्रीसंप्रदाय असें म्हणतात. शेंकडा १५ लोक या संप्रदायाचे असून ७५ लोक शंकराचार्यांच्या मतानुरोधानें वागणारे व बाकीचे मध्व व वल्लभपंथीय असल्याचें खानेसुमारीवरून दिसतें. रामानुजांमागून

## मध्वाचार्य ऊर्फ आनंदतीर्थ

हे ख्रिस्ती शकाच्या १३ व्या शतकांत होऊन गेले. यांनीं द्वैतमताचें प्रतिपादन केलें. विष्णु हा एकच अनाद्यनंत परमात्मा असून मनुष्य व विष्णु यांच्यांत सेवक व धनी हें नातें आहे. ब्रह्मा व शिव यांचा इतर वस्तूंप्रमाणें योग्य कालीं नाश व्हावयाचा आहे. फक्त विष्णु तेवढा अविनाशी आहे. भक्तीनें विष्णूस आळवावा, त्याचीं आयुधें अंगावर धारण करावीं, नामसंकीर्तनाच्या योगानें विष्णूचे गुण आठवावे वगैरे भक्तीचे प्रकार त्यांनीं सांगितले. तप्तमुद्रा व गोपीचंदनाच्या मुद्रा यांचें धारण करण्याची रूढि त्यांच्या उपदेशामुळेंच वैष्णवांत रूढ झाली. दक्षिण हिंदुस्थान, मद्रास इलाख्याचा बराच मोठा भाग व मुंबई इलाख्याचा दक्षिणभाग यांत मध्वमत चालू आहे. यास माध्वसंप्रदाय म्हणतात. उत्तर देशांत निंबार्क यानें विष्णुभक्ति वाढविली. त्याचा संप्रदाय 'सनक संप्रदाय' या नांवानें प्रसिद्ध आहे. राधाकृष्णाची पूजा विष्णूच्याठायीं करण्याचा प्रघात निंबार्कामुळें पडला. बंगाल, मथुरा वगैरे भागांत सनकसांप्रदायी लोक आहेत. त्यांच्या मागून

## उदारमतवादी रामानंद

हा वैष्णवमतप्रवर्तक पुढें आला. त्यानें ख्रिस्ती शकाच्या १४ व्या शतकांत काशी, आग्रा वगैरे भागांत विष्णुभक्ति वाढविली. तो रामानुजाप्रमाणें विशिष्टाद्वैती होता परंतु कर्मठ नव्हता. तो वर्णभेदास मान देत नसे. विष्णु व लक्ष्मी यांच्या

प्रीत्यर्थ रामसीता यांची पूजा करावी असें त्यानें सांगितलें. रामानंदाच्या शिष्यशाखेंत बरीच मंडळी होती. त्यांपैकीं १३ शिष्य प्रसिद्धीस आले. त्यांत एक रजपूत, एक मुसलमान (कबीर), एक न्हावी, एक जाट व एक चांभार असे भिन्न जातीचे लोक होते. पद्मावती नांवाची एक स्त्री या शिष्यमंडळांत होती. रामानंदाचा शिष्य कबीर यानें रामभक्तीचा पंथ वाढविला. त्यानंतर प्रतिवाल्मीकि तुलसीदास यानें रामचरित्र लिहून उत्तर हिंदुस्थानांतील आबालवृद्धांस रामभक्तीस लाविलें. त्याच्यानंतर वल्लभाचार्यांनें लोकांस पुष्टिमार्ग नांवाचा संप्रदाय निवेदन केला. पुष्टिमार्गाचें खरें रहस्य जरी भक्तिमार्गांत आहे तरी त्या मार्गाचा संप्रदाय वाढविणारांकडून मूल आचार्यांच्या हेतूस विरोधात्मक असें वर्तन घडून त्यांनीं विषयोपभोगांचें महत्त्व वाढविलें. राधाकृष्णाची पूजा करावी व नवविधा भक्तीनें कृष्णाची आराधना करीत असतां विषयोपभोगांस कमी लेखूं नये असें त्या पंथाच्या उपदेशकांनीं सांगितल्यामुळें कालेंकरून विषयलोलुपता समाजांत वृद्धिंगत होऊन वल्लभीपंथ नीतिमार्गापासून ढळूं लागला. यासाठीं या पंथांत सुधारणा करून नैतिक आचरणाची अनुशासनपद्धति अमलांत आणण्यासाठीं गुजराथेंत स्वामिनारायण या साधूनें प्रयत्न केला व सुमारें अडीच लक्ष लोक या पंथास मिळाले. पंधराव्या शतकांत यानें कृष्णभक्ति अत्यंत शुद्ध स्वरूपांत वाढविली. लोकांस संकीर्तनाचें महत्त्व कथन केलें व स्वतःच्या प्रेमळ वर्तनानें अनेक लोकांस कृष्णभक्तीकडे ओढिलें. चैतन्य हा प्रत्यक्ष कृष्णाचा अवतार असें मानतात. चैतन्य सांप्रदायी लोक बंगाल्यांत पुष्कळ आहेत. ते ज्ञानापेक्षां भक्ति ही अधिक श्रेष्ठ मानतात. कृष्णनामाचा उच्चार करून अत्यंत भक्तीनें त्याला शरण जाण्याचा अधिकार सर्व वर्णांच्या लोकांस सारखा आहे, असें चैतन्यसांप्रदायी जनांचें मत आहे. चैतन्याचीं ' शिक्षाशतक ' नांवाचीं पदें प्रासादिक आहेत. रामानंद, कबीर, चैतन्य यांच्याशिवाय मिराबाई या उत्तर हिंदुस्थानांतील कवयित्री संतिणीनें कृष्णभक्ति वाढविली. हिनें रचलेलीं पदें हजारों भक्त आनंदानें गातात. राजपुतान्यांत दादु नांवाच्या पिंजारी जातीच्या एका साधूनें विष्णुभक्तीचा संप्रदाय वाढविला. याच्या अनुयायांस दादूपंथी असें म्हणतात. जुनागडचे नरसिंह मेथा, गुजराथेंतील जयदेव कवी, डाकोर येथील साधु बोडाणा व त्यांची पत्नी गंगा या व इतर कित्येक वैष्णवांनीं गुजराथेंत श्रीविष्णुभक्तीचा संप्रदाय वाढविला. वैष्णवाच्या अंगीं अत्यंत श्रेष्ठ असे जे गुण असावे असें धर्मग्रंथ सांगत आहेत ते

सर्व गुण ज्यांच्यांत कळसाला पोहोंचले आहेत असे अखिल जगतास वंद्य झालेले व भरतभूमीस भूषणीभूत होऊन राहिलेले महात्मा मोहनचंद करमचंद गांधी हे आपल्या सदाचरणाच्या योगानें लक्षावधि लोकांस सन्मार्गाकडे वळविण्यास समर्थ झाले आहेत. सामाजिक, औद्योगिक, बौद्धिक, आर्थिक व राजकीय प्रगतीचा पायाच मुळीं धर्म आहे असें सांगणारे हे विद्यमान सत्पुरुष महात्मा या पदास चढले यांत नवल नाहीं. ब्रजवासी सूरदास हा अकबराच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आला. हा आंधळा होता. त्याचीं पदें भक्तिरसपरिपूर्ण असून महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें तुकारामाचे अभंग अत्यंत प्रेमानें गातात, त्याचप्रमाणें सूरदासाचीं पदें उत्तर हिंदुस्थानांत हजारों लोक प्रत्यहीं गात असतात. त्याच्यामागून सुंदरदास हा मेवाड प्रांतीं विष्णुभक्तीच्या योगानें प्रसिद्धीस आला. दोआब ( संयुक्तप्रांत ) येथें अठराव्या शतकांत गिरधारी कविराय यानेंही वैष्णव भक्तीची वाढ करण्यास आपल्या प्रासादिक पदांच्या योगानें मदत केली. ज्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत अनेक साधुसंत जन्मून त्यांनीं वैष्णवमताचा प्रसार केला त्याचप्रमाणें

## महाराष्ट्रांत भागवतधर्माचा प्रसार

करणारे अनेक साधुसंत जन्मास आले. संस्कृत भाषेंत असणारें ज्ञानभांडार सामान्य जनांस अगम्य होऊं लागलें. ब्राह्मणेतरांस ब्रह्मज्ञानाचा अधिकार नाहीं असें ठरल्याप्रमाणें होऊन त्यांस व्रतोपोषणाचा एकच मार्ग खुला राहिला आणि कर्मावडंबराचें महत्त्व वाढून खरा सनातनधर्म नाहींसा होत चालला. अशा वेळीं सन्मार्गाचा बोध करणारे जे अनेक साधु जन्मास आले, त्यांनीं महाराष्ट्रावर केलेले उपकार अगणित आहेत. त्यांनीं संस्कृतांत असणारें ज्ञानभांडार खुलें करून तें प्राकृत जनांस यथेच्छ लुटण्याची सोय करून दिली. ईश्वर व मनुष्यप्राणी यांच्यांत सेव्य व सेवक हें नातें असून त्याला केवळ भक्तीनें आळवून आपलेंसें करून घेतलें पाहिजे, ईश्वरसेवा करण्याचा अधिकार स्त्रीपुरुषांस सारखा आहे. जातीचा उच्च नीच भेद ईश्वराच्या घरीं असणें संभवत नाहीं, असें संतांनीं प्रतिपादन केलें. त्यांचें आचरण पवित्र, वर्तन भाविक व प्रेमळ तसेंच अंतःकरण रागद्वेषापासून अलिप्त, परमशुद्ध व कोमल असल्यामुळें व त्यांनीं निवेदन केलेला ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुलभ व सुखकर असल्यामुळें त्यांच्या उपदेशाची छाप लोकांवर बसून त्यांनीं प्रस्थापन केलेला भागवतधर्म यशस्वी झाला यांत आश्चर्य कोणतें? या संतजनांच्या उपदेशामृताचा परिणाम उत्तम

झाला. महाराष्ट्रांत सुमारें पांचशें वर्षं ही जी भागवतधर्माची चळवळ चालली होती, तिचें यथार्थ वर्णन कै० न्या. माधवराव रानडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासांत पुढीलप्रमाणें केलें आहे. " या पांचशें वर्षांत सुमारें पन्नास साधुसंत या देशांत जन्मास आले. त्यांतील कांहींजण स्त्रिया, थोडें बहुत हिंदुत्व पत्करलेले मुसलमान, निम्मे ब्राह्मण व इतरांपैकीं सोनार, मराठे, कुणबी, शिंपी, माळी, कुंभार व महार होते. कांहीं वेश्या व बटिकी होत्या. या धर्मजागृतीचें विशेष महत्त्व हें कीं धर्माच्या उन्नत तत्त्वांचा पगडा एकाद्या विशिष्ट वर्गावर न बसतां समाजांतील सर्वच वर्गांच्या लोकांच्या अंतःकरणावर बसला होता. स्त्रिया व पुरुष, उच्च व नीच, सुशिक्षित व अशिक्षित हिंदु व मुसलमान हे सर्वच जण या धर्म-विचाराच्या छत्राखालीं आले. सार्वजनिक जागृति जेथें आहे, अशा ठिकाणीं खेरीज करून इतरत्र या प्रकारचा चमत्कारिक धार्मिक परिणाम जगाच्या पाठीवर कोणत्याही देशांत घडून आलेला इतिहासावरून दिसून येत नाहीं. पंजाबांत नानकानें हिंदु व मुसलमान यांच्यांत धार्मिक ऐक्य करण्याचा महत्प्रयत्न केला. पूर्वेस बंगाल्यांत चैतन्यानें लोकांस शक्ति व काली यांच्या उपासनेपासून परावृत्त करून भागवतधर्माकडे ओढण्याचा यत्न केला. रामनंद व कबीर, तुलसीदास व सूरदास, जयदेव व राईदास या-सर्वांनीं आपाआपल्या परीनें धर्मोन्नतीच्या कार्यास हातभार लाविला. याचा परिणाम इष्ट व टिकाऊ असाच झाला. परंतु महाराष्ट्रांतील संतांनीं त्यांच्याहीपेक्षां महत्त्वाची कामगिरी केली. चांगदेव व ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आणि जनी, आकाबाई आणि वेणुबाई, नामदेव आणि एकनाथ, रामदास आणि तुकाराम, शेक महंमद आणि शांति बहामनी, दामाजी आणि उद्धव, भानुदास आणि कूर्मदास, बोधले बुवा आणि संतोबा पवार, केशवस्वामी आणि जयरामस्वामी, नरसिंहस्वामी आणि रंगनाथस्वामी, चोखामेळा आणि दोघे कुंभार, नरहरिसोनार आणि सांवतामाळी, बहिरामभट आणि गणेशनाथ, जनार्दनपंत व मुधोपंत, हे व इतर कित्येक यांच्या चरित्रांवरून महाराष्ट्रांत ही धर्मजागृतीची चळवळ किती महत्त्वास चढली होती हें दिसून येणार आहे." या सर्वांत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, व

## श्रीसाधु तुकाराम

ह्यांनीं संकीर्तनाचें माहात्म्य फार वाढविलें. तुकारामास तर संतांचा मुकुटमणि

असें मानतात. भागवतधर्मीय संतांचें व त्यांच्या अनुयायांचें पंढरपूर हेंच भूमीवरील वैकुंठ, विठोबा हा वैकुंठाधिपति व आषाढी एकादशी हा महोत्सवाचा दिवस ठरून त्या दिवशींचा भागवतांचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा झाला. पंढरपूर व तेथील दैवत विठोबा यांसंबंधानें गुरुवर्य डॉ. भांडारकर यांनीं पुढील माहिती प्रसिद्ध केली आहे. विठोबा हा मूळचा विष्णु या संस्कृत शब्दापासून निघालेला प्राकृत शब्द आहे. विष्णु याचें कानडींत विठ्ठ हें रूप झालें. बा व ल हे कोमलतादर्शक प्रत्यय होत. विठूबा, विठ्ठल याचींच विठोबा, विठू, विठ्ठल हीं रूपांतरें होत. विठोबाचें देवालय केव्हां स्थापन करण्यांत आलें, हें समजण्यास साधन नाहीं. एका ताम्रपटावरून समजतें कीं देवगिरी येथील यादव वंशाचा कृष्ण राजा राज्य करीत असतां त्याचा सेनापति मल्लिसेट्टी यानें बेळगांव जिल्ह्यांत शके ११७१ (इ. स. १२४९ ) भीमरथी नदीच्या कांठीं असलेल्या पौंडरिक क्षेत्रांतील एक खेडें इनाम दिलें. हें खेडें विष्णु देवाच्या जवळच आहे, असाही ताम्रपटांत उल्लेख आहे. हेंच पौंडरिक क्षेत्र पंढरी किंवा पंढरपूर असावें. ताम्रपटांत ज्या विष्णुदेवतेचा उल्लेख आहे, तोच सध्यां प्रसिद्ध असलेला विठोबा असावा. दुसऱ्या एका शिलालेखावरून दिसतें कीं, शके ११९२ (इ. स. १२७० ) मध्यें केशवाचा पुत्र भानु यानें पांडुरंगपूर येथें यज्ञ केला. त्या वेळीं असंख्य लोकांना व विठ्ठल व इतर देवतांना अत्यंत आनंद झाला. यावरून पंढरपुराला पांडुरंगपूर असेंही नांव होतें असें दिसतें. हेमचंद्र याच्या मतें पंडरंग किंवा पंडुरंग हें रुद्राचें किंवा शिवाचें नांव आहे आणि पंडुरंग याच्यावरून त्या गांवास पांडुरंगपूर हें नांव पडलें असावें. अद्याप पंढरपूर येथें शिवाचें देवालय असून विठोबाची भेट घेण्यापूर्वीं त्याची भेट घेतात. परंतु सध्यां विठोबालाच पांडुरंग हें नांव पडलें आहे. मूलतः हें शिवाचें नांव होतें, परंतु विष्णूचें (विठ्ठलाचें ) महत्त्व वाढतांच तेंच नांव विठ्ठलास देण्यांत आलें असावें. मातापितरांच्या सेवेंत अत्यंत तत्पर अशा पुंडलिक नांवाच्या एका साधूनें आपण मातापितरांच्या सेवेंत असतां त्याच्या भेटीस आलेल्या श्रीकृष्णाचें स्वागत न करतां त्यास एक वीट देऊन आपलें सेवेचें काम संपेपर्यंत उभें रहाण्यास सांगितलें. विटेवर उभा राहिलेल्या श्रीकृष्णास (विठे उभा ह्मणून ) विठोबा असें नांव पडलें. रुक्मिणीही त्या ठिकाणीं येऊन उभी राहिली, अशी एक कथा आहे. या कथेचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला असतां असें दिसतें कीं महाराष्ट्रांत विष्णु ( कृष्ण ) व रुखमाई ( रुक्मिणी )यांच्या भक्तीचा मार्ग स्थापन करणारा साधु पुंडलिक होय. हा भागवतधर्माचा या भागांतला मूल

प्रवर्तक असून त्याच्यावरून पंढरपुरास पौंडरिक क्षेत्र हें नांव पडलें असावें. हें नांव ताम्रपटांत आहे. दुसरें असें कीं उत्तर देशांत कृष्णाची पूजा ( परवधू ) राधेसह करण्याचा निंबार्क, वल्लभ व चैतन्य यांनीं प्रघात पाडला. 'राधाकृष्णा' ची भक्ति तेथें वाढली. कृष्णाची धर्मपत्नी जी रुक्मिणी तीच रुकमाई किंवा रखमाबाई या नांवानें महाराष्ट्रांत प्रसिद्धीस आली. अर्थात् पंढरपूरचा विठु व रखमाई यांस कृष्ण व रुक्मिणी असें समजण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील धर्मग्रंथांत कृष्णाला राधावल्लभ असें म्हटलें नसून रुक्मिणीपती किंवा रुक्मिणी-वर असें ह्मटलें आहे. यावरून महाराष्ट्रांतील कृष्णभक्तीचा संप्रदाय विशेष शुद्ध स्वरूपाचा आहे, हें सिद्ध होतें. राधिका यावरून राही हा अपभ्रंश झाला असून राहीला विशेष कोण मानीत नाहीं. गोकुळांत कृष्णाचे खेळ (गोपाळकाला वगैरे) विठोबाच्या महोत्सवाच्या वेळीं करण्यांत येतात; परंतु मथुरा वृंदावनांतील उत्स-वाप्रमाणें हा काल्याचा उत्सव महत्त्वाचा नसतो. ज्याप्रमाणें रामानंदानें वैष्णव-मताचा किंवा भागवतधर्माचा प्रसार हीन मानलेल्या जातींत केला, त्याचप्रमाणें तुकाराम, नामदेव वगैरे चतुर्थ वर्णांतील साधूंमुळें हीन मानलेल्या लोकांच्या अंतः-करणावर या धर्माचा पगडा बसला . ज्ञानेश्वर महाराजांच्या कालापासून ह्मणजे इ०स० १२९० च्या पूर्वीपासून आषाढी एकादशीच्या दिवशीं पंढरपुरास श्री-विठोबा रखुमाईच्या दर्शनास जाण्याचा संप्रदाय अस्तित्वांत आला. हाच

## वारकरी संप्रदाय

या नांवानें महाराष्ट्रांत आज सुमारें ७०० वर्षें चालू आहे. दिंड्या (वीणा)-पताका घेऊन भक्तिरसानें ओतप्रोत भरलेल्या अंतःकरणानें देहभाव विसरून जाऊन थयथय नाचत जाणारे वैष्णववीर सर्वत्र व सर्व जातींत आहेत. अलीकडे सुमारें ८० वर्षांपूर्वीं हैबतराव यांनीं पंढरपुरास ज्ञानोबाची पालखी नेण्याचा प्रघात पाडला. हैबतराव ज्ञानेश्वर महाराजांचे परमभक्त होते. ते साताऱ्याजवळ आरफळ येथें रहात असत. विरक्त झाल्यावर ते आळंदीस येऊन राहिले व ज्ञानो-बांच्या पादुका पालखींत घालून पंढरपुरास मिरवीत नेण्याचा प्रघात त्यांच्यापा-सून प्रचारांत आला तो अद्यापि चालू आहे. सध्यां पंढरपुरास मुख्य आठ पालख्या दरसाल जातात. १ आळंदीहून श्रीज्ञानेश्वराची, २ देहूहून तुकाराबुवांची, ३ पैठणाहून एकनाथमहाराजांची, ४ त्र्यंबकहून निवृत्तिनाथांची, ५ एदलाबादहून मुक्ताबाईची, ६ मच्छेंद्रगडाहून मच्छेंद्रनाथाची, ७ सासवडाहून सोपानदेवाची,

व ८ आरणगांवाहून सांवतामाळ्याची. याप्रमाणें पालख्या निघून वाटेंत मुक्काम करीत करीत सुमारें पंधरा वीस दिवसांनीं दशमीच्या दिवशीं रात्रौ पंढरपुरास जाऊन पोहोंचतात. या पालख्यांचे निघण्याचे दिवस व मुक्काम ठरलेले आहेत. सर्व काम वारकरी पंथीयांकडून बिनचूक व व्यवस्थेशीर होत असतें. वाटेंत वारकरी लोक मिरवणुकींत येऊन दाखल होतात. आकाशांत भजनाचा एकच गजर दुमुदुमूं लागतो. याप्रमाणें वारकऱ्यांचा जमाव वाढतां वाढतां सुमारें दीडपासून दोन लाख यात्रा जमत असते. वारकरी लोकांस जवळपास असणाऱ्या गांवांतील लोक गाड्यांच्या गाड्या भरून भाकरी आणून देतात. याप्रमाणें यात्रेकरूंच्या भोजनाची सोय वाटेवरील गरीब व श्रीमंत गांवकरी लोकांकडून होते.आळंदीची पालखी ज्येष्ठ नवमीस निघून पुणें, सासवड, कापुरवळ, शिरवळ, लोणंद, तरटगांव, फलटण, बरड, नातेंपोतें, माळशिरस, वेळापूर, शेगांव, व वांकरी या मार्गानें पंढरपुरास जाते. इतर पालख्या या पालखीस वाटेंत गांठतात. पंढरपुरास यात्रेकरूंची गर्दी जमलेली असतेच. त्यांत वारकरी जाऊन मिळतांच प्रचंड भक्तसमुदायामुळें तें क्षेत्र फुलून जातें. विठ्ठलनामाचा गजर, टाळ, मृदंग यांचा नाद, पुंडलिकाच्या नामाचा जयघोष ,कीर्तन, भजन, पुराण, वगैरेमुळें पंढरपूर हें केवळ देवनगरी बनतें. भाविक लोक देहभान विसरून जातात. तुकारामाचे अभंग पावलोपावलीं श्रवणरंध्रीं पडून मनास शांतता प्राप्त होते. अत्यंत प्रवृत्तिपर मार्गाची कास धरून संसाराचें गाडें हाकीत असतां त्रस्त झालेल्या प्रापंचिकास भक्तिरसामृताचें औषध पाजून भवरोग बरा करण्यास समर्थ झालेले हे साधुसंत धन्य खरे. त्यांचे शब्द जोंपर्यंत हिंदु लोक शिरसावंद्य मानून सन्मार्गानें वागतील तोंपर्यंत भावी स्थितीसंबंधानें निराश होण्याचें कारण नाहीं. तुकारामबुवांनीं ह्मटल्याप्रमाणें या संतांचा अवतार नवीन धर्मस्थापनेसाठीं नव्हे, तर मृत धर्माचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं आहे. बुवा ह्मणतातः—

**अभंग**

आह्मी वैकुंठवासी । आलों याची कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साचा भावें वर्ताया ॥१॥

झाडूं संतांचे मारग । आड रानें भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ॥२॥

अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्द-ज्ञानें ।

**विषय लोभी मनें । साधनें बुडवीलीं ॥३॥**
**पिटूं भक्तीचा डांगोरा । कळीकाळासी दरारा ।**
**तुका ह्मणे करा । जयजयकार आनंदें ॥४॥**

तुकारामादिक संतांनीं निवेदन केलेल्या भागवतधर्मांत प्रेम, आनंद व ईश्वरी साक्षात्कार पूर्णपणें भरलेला आहे. ज्ञानमार्गाहून भक्तिमार्ग श्रेष्ठ असून त्याचाच अवलंब करणें हें इहपरलोकींच्या सुखास कारणीभूत होणार आहे, याची या संतजनांस पूर्ण खात्री होती, ह्मणूनच बुवांनीं या भागवतधर्मासंबंधानें पुढील निश्चयाचे व विश्वासपूर्ण उद्गार काढले आहेतः-

**घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडवीन ॥**
**ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥**
**तीर्थभ्रामकासी आणिन आळस । कडू स्वर्गवास करिन भोग ॥**
**सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥**
**भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्था । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥**
**धन्य ह्मणवीन इहलोकीं लोकां । भाग्य आह्मीं तुका देखियेला ॥**

यावरून आपण अंगीकारलेला भक्तिमार्ग ईश्वरप्राप्तीचा किती खात्रीलायक उपाय आहे असें संतजनांस वाटत होतें हें दिसतें. ब्रह्मज्ञान, तीर्थाटण, स्वर्गवास, भोग, तपश्चर्या, यज्ञ, दान या सर्वांपेक्षां भक्तिमार्ग श्रेष्ठ असें ते मानीत. खरें आहे.

## साधुसंतांचीं देवालयें.

या देशांत अनेक ठिकाणीं साधुसंतांचीं देवालयें आहेत. या साधुसंतांत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांत समावेश होतो. यावरून दिसून येईल कीं हिंदुधर्म जरी सकृद्दर्शनीं अत्यंत बंधनयुक्त आहे तरी तितकाच तो व्यापक असून त्याचे अनुयायी साधुत्वास, मग तें कोणत्याही जातीच्या स्त्रीपुरुषांत दिसून येवो, मान देतात व अशा व्यक्तींची गणना देवतांत घालून त्यांची पूजाअर्चा करण्यास तयार होतात. महाराष्ट्रांत जीं जुनीं स्थानें प्रसिद्ध आहेत त्यांची माहिती पुढें देत आहों. **आळंदी** (पुणें जिल्हा ) येथें मराठी कवी व संत ज्ञानेश्वर महाराज यांची समाधी व देवालय आहे. यांच्या हातांतील दंडकाष्ठाचा या ठिकाणीं मोठा वृक्ष झाला अशी आख्यायिका असून या झाडाला अजानवृक्ष असें नांव आहे. या जातीचें

झाड अन्य ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं असें म्हणतात. कार्तिक व ॥ ११ स येथें मोठी जत्रा भरते. शिवाय प्रत्येक महिन्याच्या व ॥ ११ स हजारों भाविक यात्रेकरू समाधीच्या दर्शनास जातात. ज्ञानेश्वर महाराजांचे बंधु निवृत्तिनाथ यांची समाधी त्र्यंबकेश्वरीं ( नाशीक ) आहे. तेथें पौष व ॥ ११ स मोठा उत्सव होतो, व मोठी यात्रा भरते. ज्ञानेश्वरांचीं इतर भावंडें सोपानदेव व मुक्ताबाई यांच्या पादुका या देवालयांत आहेत. **चाफळ** ( सातारा जिल्हा ) येथें श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचें व मारुतीचें देवालय आहे. येथें चैत्र शु ॥ ९ मीस मोठा उत्सव होतो. **सज्जनगड** ( सातारा ) येथेंही समर्थांचें देवालय असून माघ कृ. १ दे पासून १० मी पर्यंत या ठिकाणीं मोठा उत्सव होतो व जत्रा भरते. **देहू** (पुणें जिल्हा ) हें तुकाराम महाराजांचें जन्मस्थान आहे. येथील तुकोबाच्या देवालयांत फाल्गुन कृ ॥ २ ये पासून पंचमीपर्यंत मोठा उत्सव होतो, तो पाहण्यासाठीं हजारों भक्तांची यात्रा जमते. कोल्हापूर संस्थानांत **कोळें** येथें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्रसिद्धीस आलेल्या घाडगेबुवा नांवाच्या विठ्ठल-भक्ताच्या प्रीत्यर्थ एक विठ्ठल मंदिर बांधलें असून त्या ठिकाणीं माघ शु॥ ५ मीस जत्रा भरते. अहमदनगर जिल्ह्यांत **मडी** येथें शा रमजान महि सवार नांवाच्या मुसलमान साधूचें देवालय आहे. यास हिंदु लोक कान्होबा म्हणतात. वैशाख शु. १० मीस मोठा उत्सव होतो त्यावेळीं हिंदु व मुसलमान समाधिदर्शनासठीं एकत्र जमतात. **चिंचखेड** ( खानदेश ) येथें सत्राव्या शतकाच्या पूर्वार्धांत माहेजी नांवाची एक कुणबी जातीची स्त्री संतीण म्हणून प्रसिद्धीस आली. हिचें देवालय बांधिलें असून पौष पौर्णिमेस मोठा उत्सव होतो. ठाणें जिल्ह्यांत **मलंगगड** येथें एका खडकाळ डोंगरावर हाज़ी अबदुल रहिमान नांवाच्या मुसलमान साधूची समाधी आहे, तेथें माघ पौर्णिमेस उत्सव होतो. ठाणें जिल्ह्यांत **निर्मळ** येथें असलेली समाधी सुप्रसिद्ध शंकराचार्यांची आहे असें समजतात. येथें कार्तिक व॥ ११ पासून मार्गशीर्ष शु ३ ये पर्यंत मोठा उत्सव होत असतो. श्रीशंकराचार्यांचें देहावसान काश्मीर येथें झालें असें हल्लींच्या शोधकांनीं ठरविलें आहे. तेव्हां ही निर्मळ येथील समाधी त्यांच्या परंपरागत शिष्यशाखेंतील एखाद्या आचार्यांची असावी. साधु पुंडलीक व चोखामेळा ( महार ) यांचीं देवालयें पंढरपुरास आहेत. पुंडलिकाप्रीत्यर्थ मार्गशीर्ष शु १० मी पासून पौर्णिमेपर्यंत जत्रा भरते व उत्सव चालतो. कुलाबा जिल्ह्यांत **सांकशी** नांवाचा किल्ला आहे तेथें बद्रुद्दिन नांवाच्या मुसलमान साधूच्या नांवानें पौष पौर्णिमेपासून एक आठवडा जत्रा

भरते. या साधूनें मक्केहून आल्यानंतर (बाराव्या शतकांत ) आपल्या अनुयायांच्या मदतीनें हा किल्ला काबीज केला अशी दंतकथा आहे. **शिराळें** ( सातारा ) येथें पूर्व कालीं सव्वा तासपर्यंत शिराळशेट नांवाच्या साधुवृत्तीच्या धनिकास राज्यपद देण्यांत आलें. त्या मुदतींत त्यानें अनेक प्रकारचीं धर्मकृत्यें केलीं. या गोष्टीचें स्मरण कायम राहील अशा रितीनें त्याची प्रत्येक वर्षीं प्रतिमा करून मोठा उत्सव केला जातो. हा उत्सव श्रावण शु ॥ ५ मीस होतो. तळेगांव ढमढेरें ( पुणें ) येथें शिवाजी महाराजांच्या कालीं प्रसिद्धीस आलेल्या नाथ महाराजांची समाधी असून तेथें महाशिवरात्रीस मोठी जत्रा भरते. अगदीं अलीकडच्या ५० वर्षांत माणिकप्रभु (नगर), अक्कलकोट बुवा (अक्कलकोट, सोलापूर), सांई महाराज (शिरडी ), नारायण महाराज ( केडगांव ), देव मामलेदार ( नाशीक ), आरूढस्वामी ( हुबळी ) वगैरे साधु लोकादरास पांत्र झाले असून त्यांस दत्तावतार मानतात.

वरील विवेचनावरून विष्णुभक्तीचा संप्रदाय वेदकालापासून रूपांतर पावत आजमितीस कोणत्या थरास येऊन पोहोंचला आहे हें दिसून येईल. अद्यापि या संप्रदायाची वृद्धि करणारे साधुसंत निर्माण होत आहेत. सर्व जगावर सारखें प्रेमकरून, उत्पत्ति व पोषण यांस कारणीभूत होणारा श्रीविष्णु किंवा सूर्य याला कालेंकरून महत्व प्राप्त झालें. वासुदेव किंवा भागवतधर्म हाच वैष्णवधर्म या नांवानें प्रचारांत आला. तो सोपा, आनंददायक व कर्मावडंबरापासून मोकळा असल्याकारणानें सर्व वर्णांतील लोकांस स्वीकार करण्यास योग्य आहे असें दिसून येतांच बहुजनसमाजानें निरनिराळ्या पद्धतीनें त्याचा स्वीकार केला. पुराणें मूलतः शिवपर होतीं. विष्णूचें महत्व वाढतांच त्यांस वैष्णवी वळण मिळालें. भागवत व विष्णुपुराण यांच्या योगानें विष्णुभक्तीचें महत्व वाढलें. सर्वाभूतीं दया दाखविणें, त्यागबुद्धि जागृत ठेवून ईश्वरचरणीं काया, वाचा व मन हीं अनन्यभावानें अर्पण करणें, हेंच वैष्णवधर्माचें सार असून तें सार्वलौकिक धर्माचें लक्षण आहे, हें कोणीही कबूल करील. अवतारमहात्म्यामुळें सज्जनांची योग्यता वाढूं लागून अशा सत्पुरुषांच्या विद्यमानें लोककल्याण घडवून आणण्यास परमेश्वर सदा सिद्ध असतो, ही भावना हिंदूंच्या अंतःकरणांत दृढ झाली आहे. संकटांची परमावधि होतांच परमेश्वर मृत्युलोकीं अवतीर्ण होऊन तो त्यांचा परिहार करतो ही आशाजनक भावना हिंदूंच्या सर्व प्रापंचिक व्यवहारांस प्रामुख्यानें चालन देत असते. दुष्टांचा संहार करून निरपराधी जनांचें

संरक्षण करण्यासाठीं विष्णूनें अनेक पूर्ण व अंश अवतार घेतले आहेत असें हिंदुधर्म मानीत आहे. कोणत्याही काळीं कोणत्याही देशांत समाजहित साधण्यासाठीं जन्मास येणारा पुरुष किंवा स्त्री यांच्यांत ईश्वरी अंश असतो असें मनुष्यजाति मानीत आली आहे; व जोंपर्यंत मनुष्याच्या अंतःकरणांत साधुत्व व सच्छील यांच्याबद्दलचा आदर कायम राहील, तोंपर्यंत त्यांच्या रक्षणार्थ प्रयत्न करणारे सत्पुरुष देवाप्रमाणें वंद्यच राहतील. एकादशी देवीची कथा तरी हेंच सांगते. उन्मत्त दैत्याचा संहार करण्यासाठीं या देवतेनें जन्म घेतला असें पुराणांत लिहिलें आहे. परंतु सध्यांच्या चिकित्सक बुद्धीच्या लोकांचा अशा पौराणिक कथेवर विश्वास बसण्याचा संभव नाहीं. अर्थात् एकादशी देवीच्या अस्तित्वाबद्दल संशय आल्यावर तिच्यासंबंधानें आदर किंवा भक्ति तरी कशी राहील? महाभारताचा कांहीं भाग व पुराणें लिहिलीं गेलीं त्या वेळीं एकादशी संबंधानें तत्कालीन आर्यांच्या अंतःकरणांत अत्यंत पूज्यत्वभाव वसत असावा. त्या दिवसाला कालेंकरून वैष्णवव्रताचें धार्मिक स्वरूप प्राप्त झालें तरी मूलतः हा दिवस ऐतिहासिक महत्वाचा होता असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. नृसिंहावतारासंबंधानें केलेल्या विवेचनांत देव व दैत्य यांचा इतिहास दिला आहे. एकादशीची कथा देखील त्या

## इतिहासांतील एक अध्याय

होय. हिरण्यकश्यपूच्या पश्चात् देवांचा द्वेष करणारे अनेक दैत्य व दानव होते, त्यांपैकीं प्रल्हादाचा पुत्र बलि व पौत्र मृदुमान्य हे फार पराक्रमी असून त्यांच्यावर विष्णूनें जय मिळवून सुरांस त्यांच्या त्रासांतून मुक्त केलें. कुंभ हा प्रल्हादाचा पुत्र; त्याचा मुलगा मृदुमान्य हा एकादशीच्या दिवशीं ब्रह्मा, शिव, व विष्णु या तिघां सुराधिपतींच्या मसलतीनें ठार करण्यांत आलेला असुर होय. या तिघांच्या श्वासापासून एक शक्ति उत्पन्न झाली, असें पुराणकारांनीं अलंकारिक भाषेंत वर्णन केलें आहे. त्याचा सरळ अर्थ असा कीं, हा मृदुमान्य दैत्य आटोपेनासा झाला तेव्हां या सुरांच्या तिघां मुख्य नायकांस एकत्र जमून त्याचा नाश करावा लागला. कांहीं असुरांनीं या त्रिमूर्तीतील एकाद्यास प्रसन्न करून घेऊन त्यांच्यापासून वर मिळविला असल्याच्या अनेक कथा पुराणांत आढळतात. एका देवानें दिलेल्या वरामुळें उपस्थित झालेला त्रास चुकविण्यासाठीं दुसऱ्या देवांना कधींकधीं बरीच युक्तिप्रयुक्ति योजावी लागली आहे. यावरून असें दिसतें कीं हे दैत्य साम,

दाम, दंड, भेद वगैरे शत्रूंस जेरीस आणण्याचे उपाय योजून कधीं कधीं देवांच्या एखाद्या पुढाऱ्यास आपल्या पक्षास ओढून घेत व त्याजकडून आपणास त्रास पोंहोचूं नये अशी तजवीज करीत. दैत्य आपलेच भाऊबंद असल्यामुळें देव त्यांच्याबद्दल प्रेम व्यक्त करीत; परंतु याचा परिणाम वाईट झाल्याचें दिसतांच दुसरा कोणी पुढें येऊन आपल्या भोळया भावंडाच्या पायीं उत्पन्न झालेलें संकट निस्तरून टाकी. देवांचे पुढारी ब्रह्मा, विष्णु व शिव यांपैकीं तिसरा जो शिव हा भोळा असल्यामुळें त्याला वश करून घेणें फार सोपें काम असे. शिवानें अनेकदां दैत्यांस वर दिल्यामुळें ( अर्थात् त्यांच्यावर शस्त्र उचलणार नाहीं अशी शपथ वाहिल्यामुळें ) विष्णूस मध्यें पडून देवांवर आलेल्या संकटांचा परिहार करावा लागला. मृदुमान्यांच्या पराक्रमापुढें या तिघां देवांच्या नायकांस दडून बसण्याचा देखील प्रसंग आला. परंतु शेवटीं त्यांनीं जय मिळविल्यामुळें या विजयाप्रीत्यर्थ हा एकादशीचा दिवस अत्यंत महत्वाचा मानून तो पाळण्याची रूढि पडली. दिवसेंदिवस दैत्य व देव यांच्यासंबंधाचा खरा इतिहास लोकांच्या स्मरणांतून नष्ट होत गेला. त्यांच्याबद्दल ज्या दंतकथा अस्तित्वांत होत्या त्यांच्यावरून या इतिहासास पुराणकारांनीं धार्मिक वळण दिलें व आज एकादशी हा सर्वथैव धार्मिक सण होऊन बसला आहे. तरी नव्या दृष्टीनेंही

## एकादशीचें महत्व

विशेष आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या दिवशीं कोट्यवधि हिंदु प्रेमपुरःसर ईश्वरस्मरण करून या आर्यावर्ताच्या वातावरणांत एक दैविक तेज उत्पन्न करितात; त्या तेजापुढें आम्हीं नम्र व्हावयास नको काय ? प्राचीन देवदेवता व त्यांचे अनुयायी यांच्याबद्दल अभिमान उत्पन्न करण्यास कारणीभूत होणारा हा दिवस, साधुसंतांनीं या दिवसाबद्दल दाखविलेलें प्रेम, या दिवसाच्या सुमुहूर्तावर उभारलेली भागवतसंप्रदायाची विजयपताका, तिच्या आश्रयाखालीं ज्ञानयुक्त भक्तिप्रणीत निष्काम कर्म करण्यासंबंधानें साधुसंतांनीं दिलेलें अनुपम प्रोत्साहन यासंबंधानें विचार करून आम्ही हिंदू म्हणविणारांनीं हा दिवस पाळावयास नको काय ? हे एकादशीसारखे दिवस राष्ट्रीय महोत्सवाचे होत. अशा उत्सवांत सर्व वर्गांच्या व सर्व वर्णांच्या लोकांस समान धार्मिक वृत्तीमुळें, बंधुभावनेनें एकत्र जमतां येतें. या प्रसंगीं परस्परांतील मतभेद नाश पावतो. शिवरात्रीसारखा प्रसंग येतांच श्रीक्षेत्र काशी किंवा गोकर्णासारख्या सुप्रसिद्ध ठिकाणीं

राष्ट्रीय हेमंतोत्सव भरवावा. महाएकादशीच्या दिवशीं पंढरपूर क्षेत्रीं राष्ट्रीय ग्रीष्मोत्सव साजरा करावा. वर्षाऋतूंतील राष्ट्रीय संमेलन श्रीकृष्णाष्टमीच्या दिवशीं वृंदावन मथुरा येथें भरवावें. वसंतोत्सवाचा समारंभ अयोध्यानगरींत श्रीरामनवमीच्या दिवशीं आणि वार्षिक राष्ट्रीय महोत्सव नवरात्रांत वंगदेशीं कलकत्ता येथें भरवावा. सर्व वर्गांच्या व वर्णांच्या, सर्व मतांच्या आणि विचारांच्या लोकप्रतिनिधींनीं चालविलेले हे महोत्सवच आमच्यांत प्रेम, सद्भाव, धर्मनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा, वगैरे सद्गुण उत्पन्न करण्यास कारणीभूत होतील. असे प्रसंग प्राप्त होतांच राष्ट्रांतील सर्व जनांनीं, स्त्रियांनीं व पुरुषांनीं उत्साहपूर्वक आपआपल्या वांट्यास आलेलें कर्तव्यकर्म करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. या दिवशीं नगरकीर्तनें करवावीं. भजन, गायन व नर्तन करीत खेड्यापाड्यांतसुद्धां मिरवणुकी काढाव्या. भागवत संप्रदायामुळें उत्पन्न झालेली हरिकीर्तनाची संस्था शुद्ध स्वरूपाची करून कर्तव्यनिष्ठ, सद्वर्तनी, निस्पृह व स्पष्टवक्ते हरिदास वारंवार लोकांत सत्यनिष्ठा उत्पन्न करतील, असें केलें पाहिजे. या प्रकारानें हिंदुधर्माची उज्ज्वल पताका हातांत घेऊन निवृत्तियुक्त प्रवृत्तिमार्ग आक्रमण्यास प्रत्येकानें पुढें सरसावलें पाहिजे. अशा उत्सवांच्या प्रसंगीं कलाकौशल्य आणि उद्योगधंदे यांचीं प्रदर्शनें, साधुसंतांबद्दल आदर उत्पन्न होईल असे देखावे ( चालतीं चित्रें–सिनेमॅटोग्राफ ), पदार्थसंग्रहालयें, ग्रंथसंग्रहालयें, क्रीडाभुवनें, प्रयोगशाळा, व्याख्यानें, निरनिराळ्या बाबींचा विचार करणाऱ्या राष्ट्रीय परिषदा, नाटकें, मर्दानी खेळ, क्रिकेट फुटबॉलचे सामने वगैरेंच्या योगानें निरनिराळ्या प्रांतांतील लोक एकत्र येऊन आपण सर्व एकाच हिंदमातेचीं लेंकरें आणि एकाच धर्माचे अनुयायी आहों ही भावना त्यांच्यांत दृढ झाली पाहिजे. प्रेम, न्याय व समता यांची ध्वजा उभारली पाहिजे. हिंदुधर्म हाच हिंदुस्थानचा तरणोपाय आहे. भागवतसंप्रदाय हा त्याचें महत्वाचें अंग होय. ज्या संप्रदायाची श्रद्धा धरल्यामुळें प्राचीनकालीं ध्रुव, प्रल्हाद, अंबरीष, रुक्मांगद, नारद, सनक, सनत्कुमार वगैरे आबालवृद्धांची योग्यता वाढली आणि ही जी परंपरा चैतन्य, तुकाराम, नामदेव, ज्ञानोबा वगैरे अनेक साधूंच्या जन्मामुळें अद्यापपर्यंत अभंग चालली आहे, त्या संप्रदायाचे तुम्हीही अनुयायी व्हा असें एकादशी निक्षून सांगत आहे.

## श्रीविष्णूचा महिमा.

ओंवाळूं आरती अनंता जयजय आनंदा । दयाळा—
पतितपावना आत्मारामा जयजय सुखकंदा ॥ धृ० ॥
पूर्वकालिं तव लीला वर्णिलि ऋषि मुनिगण यांनीं ।
तोषविलें तुज सदा ऋक् यजुस् सामवेद गानीं ।
धर्म सनातन संस्थापियला, उपनिषदें कीर्ती ।
गाइली तुझी दर्शविलि जनां दीप्तिमंत मूर्ति ॥ १ ॥ ओंवाळूं ॥
तर्क वितर्क कुतर्कहि यांची वाढ जाहली जनीं ।
षट्शास्त्रें जन्मलीं जाहला बुद्धिभेद भुवनीं ॥
सगुण-निर्गुणीं द्वैताऽद्वैतीं शब्दब्रह्मिं रंगले ।
हटवादें या भक्तरक्षका तुजला विस्मरले ॥ २ ॥ ओं० ॥
अशा समयिं श्रीकृष्ण पातला धर्मजोत हातीं ।
पेटवुनी तव रूप दाविलें, दूर केलि भ्रांती ॥
कर्तव्याची दिशा दावुनी गीतामृत दिधलें ।
अमरत्वाची खूण पटविली जग पावन केलें ॥ ३ ॥ ओं० ॥
कर्म भक्ति सुज्ञान त्रिकांडीं जंव गुंतालि जनता ।
बुद्ध देव अवतरले धर्मी स्थापाया समता ॥
कर्मवाद त्यां प्रतिपादियला नास्तिक जन बनले ।
श्रीशंकर आचार्य प्रगटतां रूप तुझें दिसलें ॥ ४ ॥ ओं० ॥
रामानुज मध्वादिक गुरुनीं संप्रदाय आपुले ।
स्थापुनी पुन्हा वाद माजतां तव दर्शन चुकलें ॥
त्यांतहि आले यवन अधर्मा ऊत पुरा आला ।
उच्च नीच हा भाव वाढला भजति न देवाला ॥ ५ ॥ ओं० ॥
साधुसंत तंव धाडिलेसि त्वां रामदास स्वामी ।
एकनाथ, ज्ञानोबा, नाम्या, तुकाराम प्रेमी ॥
मीराबाई, जनी अशा परि भक्त पुढें आले ।
सकल वर्णिच्या लोकां देवा तव दर्शन घडलें ॥ ६ ॥ ओं० ॥
यापरिनें त्वां धर्म रक्षिला साधुजनांकरवीं ।
विधिघटना परि अद्भुत पुनरपि धर्मोघा फिरवी ॥

आंग्ल पातले नव युग आलें मान मिळे विषया ।
बुद्धि ज्ञान विचार सकलही पालटले सखया ॥ ७ ॥ ओं० ॥
धर्म देव गुरु वडिल जनांतें कोणि न गणि ऐशी ।
प्राप्त परिस्थिति होतां येइ न करुणा तुज कैशी ॥
परमहंस श्री रामकृष्णजी गुरु सिद्धारूढ ।
अनेक ऐसे संत निर्मिले नुकले मज गूढ ॥ ८ ॥ ओं० ॥
प्रेम तुझें या हतभाग्यांवरि अखंड हें आहे ।
म्हणुनि संकटें वितळुनि जाती धर्मनदी वाहे ॥
धर्मनदींतिल परमामृत हें प्राप्त सदा व्हावें ।
प्रार्थी, वामन तव गुण गानीं मन रंगो भावें ॥ ९ ॥ ओं० ॥

## चातुर्मास्य

आषढ शु॥ ११ शी पासून चार महिने व्रतस्थ रहावें असें भारतांत सांगितलें आहे. या चातुर्मास्यांत कोणकोणतीं व्रतें आचरावीं हें तिथितत्त्व, धर्मसिंधु, भविष्योत्तर व इतर पुरणें यांत सांगितलें आहे. भाविक हिंदुलोक या दिवसांत महाभारत, रामायण, भागवत वगैरे ग्रंथांचें श्रवण, विद्वान शास्त्र्यांच्या किंवा पुराणिकांच्या मुखानें करीत असतात. ज्यांनीं चतुर्थाश्रम घेतला आहे असे संन्यासी एकादें निवांत स्थळ पाहून तेथें पावसाचे चार महिने मुक्काम करितात व कित्येक आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ आपल्या जवळपास राहाणाऱ्या भाविक स्त्रीपुरुषांस करून देतात. व्रताचरणास या दिवसांत ऊत येतो. चातुर्मास्यांतील विशेष बंधन ह्मटलें ह्मणजे आहारविहारासंबंधानें होय. शिंपांचा व हाडांचा चुना, मोटेचें व पखालीचें पाणी, ईडनिंबू, मातुलिंग, मसुरा, मांस, हे पदार्थ वर्ज्य करावे. वैश्वदेव केल्याशिवाय किंवा विष्णूस नैवेद्य दाखविल्यावांचून अन्न ग्रहण करूं नये. पांढरे पावटे, काळे वाल, घेवडा, चवळी, लोणचीं, वांगीं, कलिंगड, केळें, मुळे, कोहळा, ऊंस, बोरें, आवळे, चिंच, मध, पडवळ, उडीद, कुळीथ पांढऱ्या मोहऱ्या वगैरे कित्येक फळें, भाज्या व धान्यें वर्ज्य करण्याबद्दल शास्त्राची अनुज्ञा आहे. विषयोपभोग वर्ज्य आहे. शिळें व करपलेलें अन्न, भूमींतील लवण, यांचेंही सेवन करूं नये. या प्रकारचा निर्बंध आहे परंतु तो पाळणें बहुतेक अशक्य असल्यामुळें अत्यंत कर्मठ हिंदू खेरीजकरून इतर लोक बहुतेक वर्ज्य पदार्थांचें यथेच्छ सेवन करीत असतात.

आहारविहारांत मितपणा राखणें आरोग्यदृष्ट्या हितावह असल्याचें प्राचीन कालीं मत बनलें होतें असें कित्येक पुराणांतील कथानकांवरून दिसतें. कित्येक पुराणमतवादी लोक असें प्रतिपादन करितात कीं सध्यांच्या कालीं प्रजा क्षीण व हतवीर्य होण्याचें कारण लोकांनीं आहारविहारासंबंधानें अगदींच ताळ सोडला आहे हें होय. या त्यांच्या समजांत कांहींच तथ्य नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. शहरवासी जनांत तर हल्लीं या बाबींत फार अदूरदर्शीपणा दिसून येतो. गल्लीकुचींत उपाहारगृहें स्थापन झालीं असून तेथें उघड्यावर ठेवलेले अनेक शिळे व ताजे पदार्थ स्वच्छास्वच्छतेची कल्पनाही मनांत न आणतां वेळीं अवेळीं, गरज असो किंवा नसो, बुभुक्षितांप्रमाणें भक्षण करून पैशाची व प्रकृतीची खराबी करून घेणाऱ्या अनेक तरुण बांधवांस पाहिल्यावर मन उद्विग्न होतें. घशाच्या, कानांच्या व फुप्फुसांच्या रोगांस कारणीभूत होणारे अत्यंत शीत किंवा उष्ण (आईसक्रीम, थंडा सोडा, कढत चहा, कॉफी वगैरे) पदार्थांचें बेतानें व कारणपरत्वें सेवन न करितां भलत्याच वेळीं केवळ मजेखातर ग्रहण करणें सर्वथैव अनिष्ठ आहे. सध्यां सोंवळयाओवळ्याचा निर्बंध सुटत चालल्यामुळें आहाराच्या बाबींत लोकांचें स्वैर वर्तन विशेष वाढत चाललें आहे. ही स्थिति शोचनीय असून तिला आळा घालणें हें कुटुंबनायकांचें कर्तव्यकर्म होय. पुराणकालच्या सुमारास वैद्यकशास्त्रदृष्ट्या विचार करून आहारासंबंधानें कोणत्या प्रकारचे निर्बंध ठरविण्यांत आले याची संक्षिप्त माहिती पुढें देत आहों.

## ऋतुपरत्वें आहार

घ्यावा असें ठरवून शिशिर, वसंत व ग्रीष्म या ऋतूंत कांहीं पदार्थ ग्रहण करावे व वर्षा, शरद् व हेमंत या ऋतूंत यांचा त्याग करावा असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. ग्रहण करणें व त्याग करणें या अर्थी आदान व विसर्ग हे शब्द अनुक्रमें योजलेले आढळतात. उत्तरायण व दक्षिणायन यांत सूर्यरश्मींचा लाभ सारखाच मिळत नाहीं; त्यामुळें जो हवेंत फरक उत्पन्न होतो त्यायोगें मनुष्याच्या शरीरावर परिणाम घडून ऋतुपरत्वें त्याची प्रकृति सशक्त किंवा अशक्त होते असें मानिलें आहे. ग्रीष्म व वर्षाऋतूंत शरीरप्रकृति क्षीण होते, शरद् व वसंतांत ती मध्यम असते व हेमंत शिशिरांत उत्तम असते. यासाठीं प्रकृतीच्या शक्तीच्या मानानें पचन करितां येतील अशा पदार्थांचें सेवन करावें. शेवटच्या दोन्ही ऋतूंत मांस, दूध वगैरे पौष्टिक पदार्थ ग्रहण केले असतां ते पचनीं पडून

शरीरसामर्थ्याची वाढ होते. तैलमर्दन, अभ्यंगस्नान, व ऊबदार कपडे यांच्यायोगानें जठराग्नि प्रदीप्त ठेवण्यास हा काल बरा आहे. शिशिर ऋतूंत तिखट व आंबट पदार्थांचे बेतानें ग्रहण करावें हें बरें. वसंतांत रेचक घ्यावें, थंड व सुवासिक जलानें स्नान करावें, जडान्न सेवन करूं नये. ग्रीष्म ऋतूंत आहारविहारासंबंधानें फार जपावें. शारीरिक व मानसिक श्रम विशेष करूं नये. अति शीत, अति उष्ण व मादक पदार्थांचें सेवन करणें हानिकारक आहे. वर्षाऋतूंत आंबट व पाचक पदार्थ ग्रहण करावे. वातुळ पदार्थ व्यर्ज्य करावे. शरदृतूंत पित्तप्रकोप करणारे पदार्थ सेवूं नये व उन्हांत श्रमाचीं कामें करूं नये. मूलतः वैद्यक शास्त्रदृष्टया ठरविण्यांत आलेल्या या प्रकारच्या नियमांचा धर्माच्या बाबींत समावेश करितांच त्यांचा अर्थ निरनिराळ्या तऱ्हेनें करण्यांत येऊन त्यांच्यांत पापपुण्याच्या कल्पनांचा समावेश करण्यांत आला. याचा परिणाम असा झाला आहे कीं, उत्तरेकडील देशांत आहाराचा बेत या नियमांवर बसविलेला आहे. ऋतुपरत्वें अनेक धान्यें, भाज्या व पदार्थ वर्ज्य केले जातात. यामुळें दक्षिणेकडील अनियंत्रितपणें चालणाऱ्या मंडळीपेक्षां त्यांचे उत्तरदेशीय बांधव प्रकृतीनें विशेष चांगले असतात. चातुर्मास्यांत कित्येक पदार्थ वर्ज्य करण्यासंबंधानें घालून दिलेले नियम मूलतः वैद्यकशास्त्राच्या पायावर रचलेले होते; तथापि व्रतवैकल्यांचें प्रस्त वाढतांच हें प्रकरण बेताबाहेर जाऊन सध्यां त्यांच्याबद्दल आदरभाव नाहींसा झाला आहे यांत आश्चर्य नाहीं. जुन्या व नव्या निर्बंधांतील अंतर व त्यांतील ग्राह्यांशाचा आदरपूर्वक स्वीकार करण्याची तयारी आम्ही दाखविली पाहिजे. आहारविहारासंबंधानें अत्यंत हितावह असे नियम प्राचीन ग्रंथांत सांपडतात. गीतेंत श्रीकृष्णानें उपदेश केला आहे तोही मनन करण्यासारखा आहे.

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥ ६—१७॥

अर्थ—जो योग्य आहारविहार करितो, जो कर्मांच्याठायीं योग्य रीतीनें वर्ततो, जो योग्य काळीं निजतो, जागतो त्याचा योग त्याच्या दुःखाचा नाश करितो. सारावली नामक ज्योतिषग्रंथांत म्हटलें आहेः—

पथ्याशिनां शीलवतां नराणां। सद्वृत्तभाजां विजितेंद्रियाणाम्।
एवंविधानामिदमायुरेव। सत्यं भवेत् वृद्धमुनिप्रणीतम्॥

भावार्थ—येथें ग्रहमानानें ठरलेलें आयुष्य जे कोणी शीलवान्, सद्वर्तनी, पथ्यभोजी व जितेंद्रिय असतील अशांना मात्र लाभेल; तात्पर्य, मितपणा व सदाचरण न राखल्यानें आयुष्याची दोरी अकालीं तुटते. आर्यवैद्यकाचे सुप्रसिद्ध पंडित वाग्भट यानें सांगितलें आहे कीं:—

नित्यं हिताहारविहारसेवी। समीक्ष्यकारी विषयेष्यसक्तः॥
दाता समः सत्यपरः क्षमावान्। आप्तोपसेवी च भवेत्यरोगः॥

( अर्थ--जो मनुष्य रोज हितकारक आहारविहाराचें सेवन करितो, कार्यास विचारपूर्वक प्रवृत्त होतो, विषयलंपट न होतां दानशील, समदृष्टी, सत्यवक्ता, क्षमावान् व सन्मार्गगामी असतो तो निरोगी असतो. ) याप्रकारचें निरोगी राहून शरीर व मनःस्वास्थ्य बिघडूं न देण्याचें व्रत चातुर्मास्यापुरतेंच नव्हे तर सबंध आयुष्यांत चालविलें पाहिजे.

## चातुर्मास्याचा प्राचीन इतिहास

लक्षांत घेतां असें दिसतें कीं हल्लींचा चातुर्मास्याचा प्रकार पूर्वकालीं नव्हता. प्रत्येक गृहस्थाश्रमी माणसानें १९ गृह्यसंस्कार, ७ पाक यज्ञ, ७ हविर्यज्ञ व ७ सोमयज्ञ करावे असा निर्बंध असे. प्रसिद्ध सूत्रकार बोधायन यानें जीं सूत्रें लिहिलीं आहेत त्यांत श्रौतसूत्रें, कर्मांतसूत्रें, द्वैतसूत्रें, गृह्यसूत्रें, धर्मसूत्रें, व शुल्बसूत्रें असे सहा भाग केले असून त्यांत गृहस्थानें धर्मार्थकाममोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ साधण्यासाठीं कोणत्या रीतीनें वागावें हें सांगितलें आहे. त्यांत हविर्यज्ञ व सोमयज्ञ यांची माहिती श्रौतसूत्रांत असून जे ७ हविर्यज्ञ सांगितले आहेत त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें होतः-१अग्न्यधन, २ अग्निहोत्र ३ दर्शपूर्णमास, ४ आग्रयण, ५ चातुर्मास्य, ६ निरुधपशुबंध आणि ७ सौत्रमणि, यांपैकीं ब्राह्मणास सकाळसंध्याकाळ अग्निहोत्र प्रदीप्त करावें लागत असे. प्रत्येक अमावास्येस व पौर्णिमेस इष्टी हविर्यज्ञ करावा असा निर्बंध होता. वर्षाचे तीन ऋतु मानीत.

प्रत्येक चार महिन्यांनीं एकदां ऋतु बदलण्याच्या वेळीं जो हविर्यज्ञ करण्यांत येई तोच चातुर्मास्य या नांवानें ओळखला जात असे. वसंत व ग्रीष्म ऋतूंच्या अंतीं एक, वर्षाऋतु व शरद् ऋतूच्या अंतीं एक व हेमंत व शिशिरऋतूच्या अंतीं एक याप्रमाणें तीन हविर्यज्ञ होत असत. हल्लीं यज्ञाची कल्पना पार नाहींशी होऊन चातुर्मास्य हें एक निराळेंच प्रकरण होऊन बसलें आहे. या चातुर्मास्याच्या निमित्तानें अनेक व्रतें निर्माण होऊन पुण्यप्राप्तीचा सोपा

उपाय अवगत झाल्यामुळें स्त्रिया कोकिलाव्रत, शाकाव्रत, दधिव्रत, पिठोरीव्रत, नक्त-सोमवारव्रत, संकष्टीव्रत, दुग्धव्रत, हस्तागौरीव्रत वगैरे अनेक व्रतें आचरतात. पाक-यज्ञ, हविर्यज्ञ व इतर गृह्यविधि यांचा मनूच्या कालीं लोकांनीं थोडाबहुत त्याग केला होता असें त्याच्याच लिहिण्यावरून दिसतें. दिवसेंदिवस समाजाची परिस्थिति बदलत गेली त्या मानानें आचारविचारांतही भलतेच फेरबदल होऊन आजमितीस प्राचीन विधींहून किती तरी भिन्न असे नवीन विधि प्रचारांत आले आहेत. सध्याच्या कालचें चातुर्मास्य प्रकरण हें त्या संबंधाचें उदाहरण आहे. व्रतवैकल्यांचें तेज सद्वर्तनापुढें पडावयाचें नाहीं. पुनर्जन्माच्या अर्थात् जन्ममरणाच्या फेऱ्यांतून पूर्णपणें मुक्त होणें हें आर्यांचें अंतिम ध्येय. तें ध्येय साध्य होण्यास व्रतवैकल्यें मदत करीत नसून उलट त्यांत विशेष गुंतवीत असतात. गीतेंत असेंच सांगितलें आहे. मनु म्हणतो—

**कामात्मता न प्रशस्ता न चैवेहास्त्यकामता**
**काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः ॥२-२॥**
**संकल्पमूलः कामो वै यज्ञाः संकल्पसंभवाः**
**व्रतानियमधर्माश्च सर्वे संकल्पजाः स्मृताः ॥२-३॥**

सकाम भक्तीनें कोणतेंही कार्य करणें योग्य नाहीं. खरा शाश्वत व सनातन धर्म कोणता हें समजून घेऊन त्याचाच अवलंब करण्याचा प्रत्येकानें निश्चय केला पाहिजे. आमची आधिभौतिक अवनति होण्याचीं जीं कारणें असतील तीं शोधून काढून आमचा उत्कर्ष ज्या उपायांनीं होईल ते उपाय योजणें योग्य आहे.

## हल्लींचा काळ

या उन्नतिकार्यास अनुकूल आहे. हिंदमातेचा पुत्र किंवा दुहिता या नात्यानें आमच्या वांट्यास आलेलें कार्य अत्यंत महत्वाचें, परम मंगल व स्फुर्तिदायक असें आहे. कुंभकर्णी झोंपेंतून ताजेतवाने होऊन उठल्यावर सध्यांच्या जागृतीच्या काळीं कर्तव्यपराङ्मुख होऊन जांभया देत बसूं तर प्राचीन ऋषींचे वंशज म्हण-विण्याची पात्रता आमच्या अंगीं राहणार नाहीं. दुरभिमान व दोषैकदृष्टि यांचा त्याग करावा प्रेमभावानें आपण सर्व एकाच हिंदमातेचीं लेंकरें ही भावना मनांत धरून सत्कार्यासाठीं देह झिजविण्याचा निश्चय केल्यास लोकोत्तर अशी कामगिरी आमच्या हातून होईल. आत्मोन्नति साधण्यासाठीं व्रतस्थ राहणारानें केवळ चातु-

मास्यांतच नव्हे तर आजन्म व्रतस्थ राहिलें पाहिजे. हें व्रत म्हणजे एक दिव्य यज्ञ असून त्याच्यायोगानें महायज्ञ केल्याचें श्रेय पदरीं पडेल. अनेक पंथ, अनेक मतें, अनेक तत्वज्ञानविषयक कल्पना यांच्या योगानें मनांत विकल्प उत्पन्न होऊन खऱ्या शाश्वत अशा ध्येयापासून आपली नजर भलतीकडे भटकते. ज्या कर्मांच्यायोगानें मनाला शांतता मिळून परमार्थ हातीं येत नाहीं, ज्यांच्या योगानें सच्चिदानंदस्वरूपाची ओळख पटत नाहीं तीं कर्में आचरण्यांत अर्थ काय ? अनेक व्रतवैकल्यें केलीं तरी जीव व शिव यांची गांठ पडत नाहीं तर तीं करण्यांत मतलब कोणता ? यासाठीं प्रत्येक स्त्रीनें व पुरुषानें व्रतस्थ राहून सदाचरण, आत्मसंयमन व स्वार्थत्याग यांच्या योगानें आपले पितर, आपणाहून श्रेष्ठ असे लोक व परमन्यायी जो परमेश्वर यांची कृपा संपादन करावी. भलत्याच उपायांनीं आपली धार्मिक किंवा नैतिक उन्नति होणें शक्य नाहीं. मनुष्य या नात्यानें आमच्यावर असणारी जबाबदारी ओळखून ती पार पाडतांना मुख्य ध्येय विसरून जाऊं नये. ज्याचें चिंतन करणें आपलें कर्तव्यकर्म आहे त्या परमेश्वराच्या प्राप्तीचा खरा उपाय कोणता हें नीट समजून घेऊन त्याचा अवलंब करण्याचा निर्धार करावा. असें करणें ह्मणजेच व्रतस्थ राहणें होय. हें व्रत चातुर्मास्यापुरतें नव्हे तर आजन्म चालवावें. केवळ मूग मसूर सोडल्यानें किंवा दहीं दूध पिऊन चार महिने जिवंत राहिल्यानें परमेश्वराचे चरण दिसणार नाहींत. तुकाराम, रामकृष्ण परमहंस वगैरे जे साधु होऊन गेले त्यांनीं मूगमसूरीवर रचलेल्या धर्माची किंमत मानिली नाहीं. श्री स्वामी रामतीर्थ यांनीं म्हटल्याप्रमाणें, ‘ धार्मिक हिंदु लोकांनो ! आपलें ब्रह्मतत्व जाणून मोह आणि दौर्बल्य यांचा त्याग करा. यांना पुरून उरा, यांना जिंका. अंधश्रद्धा बाळगणाराला गति नाहीं. यासाठीं उल्हासवृत्तीनें सत्यसागरांत प्रवेश करा.’

——:०:——

## श्रावण महिना.

दरसाल श्रावण हा महिना अत्यंत पवित्र मानला जातो. महाराष्ट्रापुरतें पाहूं गेल्यास या महिन्यांतील बहुतेक दिवशीं एखादें तरी धर्मकृत्य केलें जातें. शिवाप्रीत्यर्थ प्रत्येक सोमवारीं एकभुक्त किंवा नक्त व्रत आचरलें जातें. मंगळवारीं स्त्रिया मंगळागौरीचा उत्सव साजरा करितात. गुरुवारीं दत्तात्रेयाच्या भक्ताच्या घरीं भजन, पूजन व गुरुचरित्रपठण चालतें. शुक्रवारीं स्त्रिया लक्ष्मीची पूजा करीत असतात. शनिवार शनीप्रीत्यर्थ किंवा मारुतीप्रीत्यर्थ पाळला जातो, व रविवारीं सूर्याची पूजा करून त्याला दूर्वा वाहण्याची चाल कित्येक ब्राह्मण स्त्रियांत दृष्टीस पडते. श्रावण हा चातुर्मास्यांतील श्रेष्ठ मास मानिला जात असल्यामुळें प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत कित्येक धनिक लोक बरेंच द्रव्य खर्चून हजारों गरीब लोकांस व ब्राह्मणांस भोजन देत असतात. कथापुराण, मंत्रजागर वगैरेंच्या योगानें देवस्थानांत विशेष उत्साहानें उत्सव चाललेला दिसतो. उत्तर देशांत श्रावण महिन्यांत विशेष प्रकारानें पाळले जाणारे उत्सव ह्मटले ह्मणजे **झुलन यात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व नंदोत्सव** हे होत. यांपैकीं झुलन यात्रा व नंदोत्सव हे दक्षिण देशांत रूढ नाहींत. झुलन यात्रा हा एक प्रकारचा दोलोत्सव आहे. पौर्णिमेच्या दिवशीं कृष्ण व राधा यांस हिंदोळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया त्यांच्यासंबंधाचीं गीतें गातात. हा उत्सव एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत चालतो. कांहीं ठिकाणीं तो त्रयोदशीपासून तीन दिवस चालवितात. गीत वाद्य वगैरेच्या योगानें घरोघरीं हा उत्सव साजरा करितात. राधाकृष्णाची पूजा करून ब्राह्मण व सुवासिनीस भोजन दिलें जातें. सुखवस्तु लोकांच्या घरीं कृष्णचरित्रांतील कांहीं भाग नाटकरूपानें दाखविला जातो. त्यावेळीं आजुबाजूची मंडळी तो पाहण्यासाठीं येत असते. कृष्णजन्माच्या दुसऱ्या दिवशीं नंदोत्सव असतो. नंदास पुत्र झाला या समजुतीनें हा उत्सव पाळण्यांत येत असून नृत्य, नाटक प्रयोग वगैरे होतात. या दिवशीं हरिद्राकुंकुममिश्रित पाणी पिचकारीनें एकमेकांच्या अंगावर उडविण्याचा परिपाठ उत्तर हिंदुस्थानांत आहे. विशेषतः दक्षिणभागांत जे उत्सव श्रावणमासांत पाळले जातात त्यांत पुढील उत्सव विशेष महत्वाचे आहेत. **१ नागपंचमी, २ मंगलागौरी, ३ श्रावणी, ४ पोवतीपौर्णिमा, ५ नारळी पौर्णिमा, ६ श्रीकृष्णजन्माष्टमी, ७ पिठोरी अमावास्या व ८ पोळा.**

——:०:——

# नागपंचमी.

श्रावण शुद्ध ५ च्या दिवशीं नागांची पूजा करण्यांत येते, यावरून या सणास नागपंचमी हें नांव आहे. या सणाची उत्पत्ति कशी झाली, यासंबधानें पुराणांत किंवा इतर ठिकाणीं कांहीं कथा सांपडत नाहीं. परंतु हा सण हिंदुस्थानच्या बहुतेक सर्व भागांत रूढ आहे. यावरून या सणास धार्मिकदृष्टया महत्व प्राप्त झालें असल्याचें दिसून येतें.

श्रीकृष्णानें कालिया नांवाच्या नागाचा पराजय करून तो यमुना नदीच्या पात्रांतून सुरक्षितपणें वर आला, हा दिवस श्रावण शु॥ ५ मी होता, यावरून नागपूजा प्रचारांत आली असें कित्येकांचें मत आहे. ऋग्वेदांत नागासंबंधानें उल्लेख आढळत नाहीं. इंद्रानें ज्या वृत्राचा ( अहीचा ) वज्रानें नाश केला तो सर्प होता असें दिसत नाहीं. यजुर्वेदांत मात्र सर्पांविषयीं आदर व्यक्त केला आहे. मनूनें सर्पांची उत्पत्ति आपणापासून आहे असें म्हटलें आहे. पुराणांत व महाभारतांत नागलोकांचा उल्लेख असून त्या जातीच्या स्त्रिया देव व मनुष्य यांच्यांशीं विवाह करीत असें दर्शविलें आहे. नागांतील श्रेष्ठ जो अनंत तोच मी असें श्रीकृष्णानें गीतेंत सांगितलें असून त्यानें बालवयांत नागांचा नायक जो कालिया याचा यमुनेच्या डोहांत पराभव केला तेव्हां त्याच्या कन्या श्रीकृष्णास शरण गेल्या म्हणून कालियास जीवदान दिलें अशी कथा आहे. नागकन्या उलुपी हिच्या सौंदर्यास भुलून अर्जुनानें तिच्याशीं विवाह केला असा उल्लेख महाभारतांत सांपडतो. यावरून पूर्वकालीं नाग नांवाची आर्यांस त्रास देणारी एकादी जात असावी असें दिसतें. अद्यापि कांहीं जाती आपली उत्पत्ति नागलोकांपासून आहे असें मानतात. उदाहरणार्थ डेकनमधील न्हावी, छोटा नागपूरकडील कूर लोक व म्हैसूरकडील कांहीं राजघराण्यांचे लोक आपले पूर्वज नाग होते असें समजतात व स्वतःची जात इतरांहून पवित्र आहे असें ह्मणतात. व्यवहारांत हा त्यांचा पवित्रपणा कोणीं मान्य करीत नाहीं ही गोष्ट निराळी.

दुसरी एक कहाणी सांगण्यांत येते, ती अशी आहे. मणिपूर ( बंगाल्यांत ) येथें पूर्वकालीं एक खेडवळ होता. त्यानें पंचमीच्या दिवशीं आपली जमीन नांगरली; त्यामुळें नागिणीच्या पिलांस इजा पोहोंचून तीं मरण पावलीं. तेव्हां नागिणीस पराकाष्टेचा राग येऊन तिनें त्यासह कुटुंबांतील सर्व माणसांस रात्रीं निजल्या वेळीं दंश केला. पुढें ती नागीण त्या खेडवळाच्या मुलीस दंश करण्यासाठीं

तिच्या नवऱ्याच्या घरीं गेली; परंतु मुलीनें नागाची पूजा करून त्याच्या पुढें दूध वगैरे ठेविलें होतें. हा प्रकार पाहतांच नागिणीस संतोष होऊन मुलीला दंश न करितां तिला तिच्या बापानें केलेलें कृत्य व आपण त्याबद्दल कसा सूड घेतला हें सांगितलें. मुलीनें त्या नागिणीची आपल्या सर्व माणसांस जीवंत करण्याविषयीं प्रार्थना केल्यावर तिनें अमृत दिलें व त्याचें सिंचन करतांच तीं जीवंत झालीं. खेडवळास नागपंचमीव्रताचें महत्व समजून आलें व त्या वेळेपासून तो व इतर लोक हें व्रत आचरूं लागले.

मणिपूर हा गांव बंगाल्यांत असून ही कहाणी या प्रांतांत कशी प्रसिद्ध झाली हें समजत नाहीं. एवढी गोष्ट खरी कीं, सर्पांपासून आपलें रक्षण व्हावें एतदर्थ बंगाल्यांतील हिंदुलोक मनसा नांवाच्या देवीची पूजा करीत असतात. ही देवी मूळची अनार्यांची असून तिला आर्यही भजतात. तेथें जी दंतकथा आहे तिजवरून दिसतें कीं, मनसा ही शेषाची बहीण व जरत्कारू ऋषीची पत्नी आहे. ती हेमवर्णाची सुंदर स्त्री असून कमलावर बसलेली व सर्पांनीं आच्छादलेली अशी आहे. सर्पांचें विष बाधूं नये असें करण्याचें तिच्यांत सामर्थ्य आहे, असें मानतात. ह्यामुळें तिला 'विषहरा' हें नांव पडलें आहे. मनसा देवीचा मोठा उत्सव होत असतो, त्या वेळीं एकदोन दिवसांपूर्वीं दुधाची खीर तयार करून खेड्यांतील एखाद्या झाडाखालीं एका पात्रांत घालून ठेवीत असतात. असें केल्यानें सर्पांपासून इजा पोहोंचत नाहीं, अशी बंगाल्याकडे समजूत आहे. या जत्रेच्या वेळीं गारुडी लोकांस जत्रेस येणाऱ्या लोकांकडून बरीच कमाई होते. गारुडी मंत्रसामर्थ्यानें सर्पांस त्यांच्या बिळांतून निमंत्रण करून आणतात व कितीही जालिम विष असलें तरी तें त्यांना देवीच्या कृपेनें बाधत नाहीं असें सर्व लोक समजतात. या सणासंबंधानें

## शास्त्रोक्त विधि

असा आहे कीं, पंचमीच्या दिवशीं सकाळीं जिवंत नागाची किंवा नाग व नागपत्नी यांच्या मातीच्या प्रतिमांची पूजा करावी. गृहद्वाराशीं दोन्ही बाजूंस चंदनानें किंवा खडूनें सर्पाची आकृति काढून पूजा केल्यासही चालतें. नैवेद्यासाठीं दहीं, दूध, तूप, व लाह्या अर्पण कराव्या. हा दिवस योग्य रीतीनें पाळला असतां सबंध वर्षांत सर्पांकडून त्रास पोहोंचणार नाहीं. "**अनंतं वासुकिं शेषं पद्मनाभं च कंबलं। शंखपालं धृतराष्ट्रं च तक्षकं कालियं तथा।**" वगैरे स्तोत्राचें

नित्यशः पठण करून नागाच्या या नऊ जातींची आराधना केली असतां विषाची बाधा न होतां सर्वत्र यशःप्राप्ति होते असें सांगितलें आहे.

## चालू रूढि.

या सणासंबंधानें चालू रूढि देशपरत्वें भिन्न आहे. हा सण महाराष्ट्र, दक्षिण हिंदुस्थान, गुजराथ, संयुक्तप्रांत व बंगालप्रांतांत प्रचलित आहे. या दिवशीं मातीच्या, पाषाणाच्या किंवा पिठाच्या नागप्रतिमांची पूजा करण्यांत येते. कित्येक देवालयें नागाप्रीत्यर्थच स्थापन केलेलीं आहेत. त्यांत या दिवशीं मोठा उत्सव चालतो. पुरुष, बायका व लहान मुलें या सर्वांस या सणाचें महत्व वाटतें. पुष्कळ ठिकाणीं या दिवशीं शाळा व कचेऱ्या बंद असतात. या दिवशीं पडवळा-सारखी नागाकृतीची भाजी देखील बायका चिरीत नाहींत. शेतकरी लोक जमीन नांगरीत नाहींत व कोणी फावड्यानें जमीन खणीत नाहीं. चुलीवर तळणही तळत नसतात. महाराष्ट्रांत या दिवशीं कित्येक ठिकाणीं बायका हळदकुंकवाचे समारंभ करितात. झोंपाळ्यावर बसून झोंके घेणें, फुगड्या घालणें वगैरे करमणुकीच्या प्रकारांनीं हा दिवस त्या मोठ्या मजेंत घालवीत असतात. घरांतील लहान थोर मंडळी जिवंत नागास किंवा मातीच्या प्रतिमेस दूध, लाह्या व दूर्वा अर्पण करतात. गारुडी लोक या दिवशीं घरोघर सर्प घेऊन फिरत असल्यामुळें त्यांना भाविक लोकांपासून भरपूर दूध, लाह्या व पैसे यांची प्राप्ति होते. घाटावर पहि-लवान लोक नागपंचमीच्या दिवशीं कुस्त्या, आट्यापाट्या व अनेक मर्दानी खेळ खेळून गांवांतील लोकांस एकत्र जमण्याची संधि प्राप्त करून देत असतात. नागपंचमी हा दिवस विद्याभ्यासाचा प्रारंभ करण्यास शुभ मुहूर्त आहे असें समजण्यांत येत असल्यामुळें लहान मुलांकडून या दिवशीं गणेशपूजा करविली जाऊन त्यांच्या शिक्षणाचा प्रारंभ ब्राह्मणांच्या मुखानें होत असतो. देवीच्या देवालयांतून हा उत्सव साजरा केला जात असून अशा देवीचे उपासक व इतर लोकही याच दिवशीं यज्ञोपवीतधारणविधि उरकून टाकतात.

नागांचा अधिपति राखेश्वर ( किंवा शिव ) असें मानून या पंचमीच्या दिवशीं त्याची कांहीं डोंगराळ प्रदेशांतील लोक पूजा करीत असतात. नागपंचमीला राखीपंचमी असेंही नांव तेथें आहे. उदेपूर येथें या दिवशीं घराच्या द्वाराशीं कांहीं वनस्पति आणून टाकतात. त्यायोगें विषारी प्राणी घरांत येत नाहीं अशी तेथील लोकांची समजूत आहे. नेपाळांत हा दिवस विशेष उत्सवाचा मानतात;

कारण याच दिवशीं नाग व गरुड यांच्यांत मोठें युद्ध झालें अशी कथा तेथें प्रसिद्ध आहे. अयोध्या व संयुक्तप्रांतांत नागाच्या बिळांत दूध घालून 'सर्प सर्प' या शब्दांनीं नागास आमंत्रण देत असतात. कांग्रा ( पंजाब ) येथें दिवाळीनंतर नागांबद्दल शेवटचा उत्सव केला जातो. त्या वेळीं शेणाचा नाग पुजतात. त्यानंतर सर्प दृष्टीस पडल्यास त्याला ठार मारतात. कांहीं ठिकाणीं या दिवशीं ब्राह्मणास दक्षिणा व शिधा देण्याची चाल आहे. सुतार व इतर कामगार लोक आपल्या हत्यारांची या दिवशीं पूजा करितात. ही चाल फक्त संयुक्तप्रांतांत आहे. बिहारांत हीन वर्णांतील स्त्रिया दोन अडीच दिवस स्वतः नागपत्न्या असें लेखून रस्त्यांतून नागांचीं पदें गात हिंडत असतात. त्यांस त्या वेळीं मिळालेल्या पैशांतून निम्मे ब्राह्मणांस देऊन राहिलेल्या पैशांतून मीठ व मिठाई विकत घेण्यांत येते. खेड्यांतील सर्व मंडळी यांचें सेवन करतात. गऱ्हवाल प्रांतांत शेण व मातीनें जमीन सारवून पांच, सात किंवा नऊ सर्पांच्या आकृति चंदनाच्या किंवा हळकुंडाच्या भुकीनें काढतात. चणे कुरमुरे भाजतात व ते त्यांच्यापुढें ठेवून धूप, दीप यांची आरती दाखवितात. दिवसांतून दोनदां पूजा व रात्रौ नागाच्या कहाण्या सांगण्यांत वेळ घालविला जातो. नागपूजा केव्हां व कां प्रचारांत आली, हें सांगतां येत नाहीं; तथापि आर्य लोकांत नागपूजा पुरातन कालींही चालू होती यासंबंधानें प्राचीन ग्रंथांत उल्लेख सांपडतो. सुमारें दोन अडीच हजार वर्षांमागें

## नागांप्रीत्यर्थ पाकयज्ञ

केला जात असे. गृहस्थाश्रमी पुरुषाला जीं धार्मिक गृहकृत्यें करावीं लागत असत, त्यांस गृह्यविधि हें नांव होतें. या विधींचा उल्लेख गौतम नांवाच्या सूत्रकारानें 'गृह्यसूत्रां'त केला आहे. एकोणिस गृह्यविधि, सात पाकयज्ञ, सात हविर्यज्ञ, व सात सोमयज्ञ याप्रमाणें ४० गृह्यविधि प्रत्येक गृहस्थाश्रमीयास करावे लागत. यांपैकीं श्रावणी नांवाचा एक पाकयज्ञ श्रावण पौर्णिमेच्या दिवशीं नागांप्रीत्यर्थ केला जात असे. सर्पांपासून कुटुंबांतील माणसांस इजा पोहोंचूं नये हाच या यज्ञाचा हेतु होता. त्या वेळीं मंत्र ह्मटले जात. सध्या श्रावण पौर्णिमेस नागाप्रीत्यर्थ यज्ञ केला जात नाहीं. आणि श्रावणी हा उपाकर्म विधि झाला आहे. पौर्णिमेस केला जाणारा पाकयज्ञ जाऊन त्याच्या ऐवजीं पंचमीस नागास दूध व लाह्या अर्पण करण्याची रूढि प्रचारांत आली आहे. सुमारें ८०० वर्षांमागें आलबेरुनी हा प्रवासी हिंदुस्थानांत फिरत असतां त्यानें जें प्रवासवर्णन लिहिलें, त्यांत असें ह्मटलें आहे कीं

श्रावण पौर्णिमेस प्रत्येक घरीं ब्राह्मणास भोजन दिलें जातें. नागपूजेचा किंवा उपाकर्मविधींचा त्यांत उल्लेख नाहीं. यावरून त्या कालीं हीं दोन्ही धर्मकृत्यें रूढ नव्हतीं असें दिसतें. त्या कालीं रूढ असलेले कित्येक उत्सव जसे आजमितीला नाहींत, तसेच त्या वेळीं नव्हते असे अनेक उत्सव कालेंकरून उत्पन्न झाले असें ह्मणतां येईल. श्रावण पौर्णिमा उत्तरेकडील देशांत राखी पौर्णिमा या नांवानें प्रसिद्ध असून या दिवशीं मित्र मित्रांस व भगिनी बंधूंस सर्पापासून रक्षण व्हावें ह्मणून राखी नांवाचे दोरे हातांत बांधण्यासाठीं पाठवीत असतात. नागपंचमी पाकयज्ञाचें आधुनिक रूपांतर आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## मनुष्य व सर्प

यांच्यांतील संबंध धर्मदृष्टया लक्षांत घेतां सर्पास बरेंच महत्त्व प्राप्त झालें असल्याचें दिसून येतें. ख्रिस्ती धर्मांत सर्पाला सैतानाची उपमा दिली असून परमेश्वराची आज्ञा मूलपुरुषास मोडण्यास लावणारा तो आहे; परमेश्वरानें आदम व ईव्ह हें जोडपें उत्पन्न केलें आणि ज्ञानवृक्षाचीं खेरीज करून इतर फळें खाण्याची त्यांस परवानगी दिली, परंतु ज्ञानप्राप्ति हेंच श्रेष्ठ आहे असें त्यांस समजावून देऊन सर्पानें त्यांच्या करवीं ईश्वराज्ञेचें उल्लंघन करविलें. आदम व ईव्ह यांच्यापासून उत्पन्न झालेली मनुष्यजाति देवाच्या रोषास पात्र होऊन पापी झाली असें ख्रिस्तीधर्म सांगत आहे. कुराणांतही बहुतेक अशीच गोष्ट आहे. सैतानानें आदमास ज्ञानवृक्षाचीं फळें खाऊन देवाप्रमाणें अमर होण्याची सल्ला दिली, असें कुराण ह्मणतें. हा सैतान व बायबलांतील सर्प एकाच अर्थीं योजले आहेत. यावरून सर्प हा माणसाला अमरत्व व ज्ञान यांच्या प्राप्तीचा मार्ग दाखविणारा देवाचा शत्रु होय असें दर्शविलें आहे.

## हिंदुधर्मांत सर्पाचें महत्त्व

निराळ्याच रीतीनें वर्णिलें आहे. श्रावण पौर्णिमेच्या दिवशीं स्वर्गीय, आकाशांतील व भूप्रदेशावरील सर्पांची पूजा करावी असें गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. जगन्नियंता नारायण शेष नांवाच्या नागावर निजलेला आहे; अनंत नागानें पृथ्वीस वेष्टन घातलें आहे; समुद्रमंथनाच्या वेळीं वासुकी सर्पाचा दोरीप्रमाणें उपयोग करण्यांत आला; जनमेजय राजानें यज्ञ करून सर्पांचा संहार केला, त्या वेळीं त्यांचा राजा तक्षक यास मात्र जीव दान दिलें, वगैरे कथा पुराणांत सांपडतात. यांपैकीं

शेष म्हणजे जगाचा अंत झाल्यावर जें शेष राहील तें म्हणजे अनाद्यनंत असा काल आहे असें मानण्यास हरकत नाहीं. परंतु उपरिनिर्दिष्ट कालिया व तक्षक यांची कथा ऐतिहासिक स्वरूपाची दिसते व नाग लोकांसंबंधाची असावी असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. नाग लोक हेच सर्प व नाग जसे दीर्घद्वेषी परंतु प्रसन्न झाल्यास धन्याचें रक्षण करणारे व धनादिक देणारे आहेत त्याचप्रमाणें सर्पही बरें-वाईट करणारे आहेत अशी कल्पना रूढ झाली. श्रीमद्भागवतांत ( स्कंध ४, अ. २५ ) पुढील कथा आहे. ती प्रपंच व परमार्थदृष्ट्या महत्वाची असल्यावरून येथें देत आहों. " पुरंजन ( शरीरें उत्पन्न करणारा जीव ) या नांवाचा एक मोठा कीर्तिमान् राजा होता. त्याचा अविज्ञात ( ज्याचें नांव कोणास माहीत नाहीं असा परमेश्वर ) नामक एक परम मित्र होता आणि त्याचें कर्तृत्वही कोणास समजत नसे. पुढें तो पुरंजन राजा आपणास आश्रय ( शरीर ) मिळावा म्हणून पृथ्वीवर हिंडूं लागला. पृथ्वीवरील सर्व पुरें ( शरीरें ) त्यानें पाहिलीं; परंतु तीं त्याला पसंत पडेनात. पुढें एकदां हिमालयाच्या दक्षिणेस नऊ द्वारांनीं युक्त असलेलें पुर ( शरीर ) त्यानें पाहिलें. त्या पुराच्या बाहेर उत्तम वृक्षांनीं युक्त असें एक उपवन ( विषयसमूह ) होतें. त्या उपवनांत एक सुंदर स्त्री ( बुद्धि ) स्वेच्छेनें आलेली त्यानें पाहिली. त्या स्त्रीचे दहा भृत्य (दहा इंद्रियें) असून प्रत्येक भृत्याच्या हाताखालीं शेंकडों अचनुर ( चित्तवृत्ति ) होते, त्या स्त्रीचें रक्षण करण्यासाठीं एक पांच फणांचा सर्प ( पंचप्राण ) सर्वदा दक्ष असल्याचें त्यानें पाहिलें. तेव्हां राजानें तिला तूं कोण असा प्रश्न करतांच तिनें उत्तर दिलें, 'मी जाणत नाहीं. मला इतकेंच माहीत आहे कीं, **सुप्तायां मयि जागर्ति नागोऽयं पालयन् पुरीम्।** ( मी निजल्यानंतरही हा नाग सर्वकाळ जागून या पुरीचें रक्षण करीत असतो. ) असें सांगितल्यावर त्या दोघांचा परस्परांस वरण्याचा निश्चय झाला व लग्न होऊन तीं शंभर वर्षें एकत्र राहिलीं; परंतु गंधर्वराज चंडवेगाचे ३६० गंधर्व ३६० गंधर्वपत्न्या ( दिवस व रात्र मिळून ७२० ) अनुचरांनीं पुरंजनाचें पुर लुटून १०० वर्षें सारखें त्याच्याशीं युद्ध चालविल्यामुळें तो बिचारा थकूनभागून गेला. ताप, भय, जरा व मृत्यु यांच्या हल्ल्यामुळें तो डबघाईस आला. सर्पानें पराकाष्ठा केली, परंतु त्याचें कांहीं चालेना तेव्हां मोठ्या कष्टानें तो क्षीण सर्प निघून गेला, व पुरंजन शत्रूच्या हातीं सांपडला. पुढें पुनर्जन्म प्राप्त झाल्यावेळीं त्याची व मित्राची ( देवाची ) गांठ पडली व तो सुखी झाला."

या कथेंत सर्प हा नेहमीं रक्षण करीत असतो असें दर्शविलें आहे. योगशास्त्रांत सर्पासनाची महती फार वर्णिली असून प्राणायाम करून त्याला अनुकूल करून घेतल्यास त्याच्यामुळें जीवाला ज्ञान व अमरपणाचा लाभ होतो असें सांगितलें आहे. पंचप्राण हाच पांच फणांचा नाग आहे असें भागवतांतील कथेवरून स्पष्ट होतें. स्थूलदृष्ट्या पाहूं गेल्यास सर्प हा परड्यापरसांचा, द्रव्याचा व गांवाचा अधिपति असून तो त्यांचें रक्षण करितो, अशी जुन्या काळीं समजूत होती हें वरील कथेवरून सिद्ध होतें. ही समजूत आजमितीसही आहे. प्रत्येक मनुष्याचें व उपवनाचें रक्षण करणारा सर्प आहे, ही जी जुनी कल्पना तिला मूर्तस्वरूप देऊन सर्पास पूज्य मानण्याचा प्रघात पडला असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. सध्यां नागाप्रीत्यर्थ आम्हीं आचरीत असलेलें नागपंचमीव्रत नागासंबंधाच्या वरील कल्पनांवरून रूढ झालें असें म्हणण्यास प्रत्यवाय कोणता ? पंचप्राणांच्या कल्पनेशीं जुळणारा पांच फणाचा नाग व त्याप्रीत्यर्थ पाळली जाणारी पंचमी तिथि यांचा एकमेकांशीं संबंध आहे असें म्हणणें देखील चुकीचें होईल काय ? हे प्रश्न विचार करण्याजोगे आहेत. प्राणाची उपासना मूळची, पण गोष्टींतील रूपक न समजल्यामुळें प्राणाच्याऐवजीं नाग-सापाची उपासना सुरू झाली व नागाचीं देवळेंही स्थापन झालीं. सर्व पुराणांत अत्यंत महत्त्वाचें जें

## विष्णुपुराण

त्यांत ठिकठिकाणीं सर्पासंबंधी उल्लेख असून पृथुराजानें जेव्हां पृथ्वीचा कारभार हातीं घेतला, तेव्हां शेषास सर्वांपर अधिपति नेमिलें असें सांगितलें आहे. शेषाचें वासस्थान पाताळ असून तो विष्णूच्या तमोगुणापासून उत्पन्न झाला. पृथ्वी ही त्याच्याच मस्तकावर आहे. त्याला हजार तोंडें असून प्रत्येक शिरावर प्रकाशमान असा एकेक हिरा आहे. महासागरांत शेषासनावर विष्णु प्रत्येक कल्पाच्या अंतीं शयन करीत असतो. द्वापरयुगांत विष्णूनें कृष्णावतार घेतला तेव्हां शेषानें बळरामाचें रूप धारण केलें. लक्षावधि गंधर्वांनीं नागदेवांवर हल्ला केला तेव्हां ते विष्णूस शरण गेले. नर्मदेनें पुरुकुत्सास मदत करून नागदेवांचें गंधर्वांपासून रक्षण केलें. त्यावरून नागांनीं असा आशीर्वाद दिला कीं, नर्मदेस नमस्कार करून सर्पांच्या विषापासून रक्षण कर अशी जो प्रार्थना करील, त्यास सर्पदंशाची भीति नाहीं वगैरे मजकूर विष्णुपुराणांत सांपडतो. रामाचा बंधु लक्ष्मण हा देखील शेषावतार आहे असें मानितात. आर्यांचें दुसरें जें श्रेष्ठ दैवत शिव तोही नागाभरणभूषित

असल्याचें पुराणें सांगतात. गणपतीच्या कमरेस नागाचा विळखा दिलेला असतो. यजुर्वेदांत सर्पप्रीत्यर्थ यज्ञसमयीं गावयाचीं सूक्तें आहेत. यावरून प्राचीनकालीं आर्यलोकांत नागासंबंधानें पूज्यत्वभाव वसत होता हें सिद्ध होतें. उत्तरेकडील आर्यांप्रमाणेंच दक्षिणेकडील द्रवीडही नागांची पूजा करीत असत. आर्य ज्याप्रमाणें अग्नि, वायु, जल, वगैरे पंचमहाभूतांची ( तीं परमेश्वराचीं भिन्न स्वरूपेंआहेत असें मानून ) पूजा व प्रार्थना करीत असत, त्याचप्रमाणें द्रवीडही मनुष्यास इजा करणाऱ्या सर्पादिक प्राण्यांचीं, पिशाचांचीं व देवांचीं निवासस्थानें अशा मानलेल्या कित्येक वृक्षांची पूजा करीत असत. दक्षिणहिंदुस्थानांत जागोजागीं नागांचीं देवस्थानें आहेत. कित्येक वारुळांसही नागांचीं देवालयें असें मानतात. गांवाच्या सीमेवर पाषाणाच्या नागप्रतिमा ठेविलेल्या असतात व प्रवासी त्यांना लोटांगण घातल्याशिवाय पुढें जात नाहींत. सुब्रह्मण्य, अनंतशयन वगैरे देवालयें नागाप्रीत्यर्थ-असून हजारों भाविक लोक प्रत्यहीं त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतात. तेथें संतान प्राप्त्यर्थ नागबलि व सर्पसंस्कार हे विधि केले जातात. पुत्रसंतानप्राप्तीबद्दल नागास नवस करून लहान पाळणे अर्पण करण्याची चाल दक्षिण देशांत आहे. महाराष्ट्रांत अनंत चतुर्दशी, व नागपंचमी, बंगाल, उत्तर व दक्षिण हिंदुस्थान या भागांत मनसा पंचमी ( आषाढ कृ. ५ मीस ) व बंगालांत अरंधन ( भाद्रपद किंवा आश्विन पौर्णिमेस ) हे सण नागप्रीत्यर्थ पाळतात. अरंधन या दिवशीं अन्न शिजवीत नाहींत. चुलीस तांदुळाच्या पिठाचा लेप करून मनसा नांवाच्या झाडाची फांदी तिच्यांत पुरतात व सर्पाची पूजा करतात. संयुक्त प्रांतांत आषाढ शु. १४ च्या दिवशीं हरभरे, डाळ गहूं पाण्यांत भिजवून ठेवतात व व॥ ५ मीस गवताचा नाग करून तें धान्य भिजवून ठेविलेल्या पाण्यांत बुडवितात. आणि हें पाणी सर्पास देतात. महाराष्ट्रांत दूध व लाह्या सर्पास देण्याची चाल आहे. सर्पाची पूजा प्रचारांत येण्याचें कारण त्या प्राण्यापासून होणारी प्राणहानि हें आसावें असा कित्येकांचा तर्क आहे. बंगाल व इतर ठिकाणीं दरसाल हजारों लोक सर्पदंशास बळी पडतात; यावरून सर्पास पूजेच्या योगानें संतुष्ट करण्याचा प्रघात पडला असेंही सांगण्यांत येतें. परंतु हे तर्क ग्राह्य दिसत नाहींत.

सर्पास दुखविलें असतां तो दुखविणाराचा सूड घेतल्याशिवाय रहात नाहीं, आणि ज्याच्या हातून सर्पहत्या घडते त्याच्या कुलाचा नाश होतो, अशी हिंदुलोकांची समजूत आहे. वरील विवेचनावरून दिसून येईल कीं नागांसंबंधाच्या कथा कांहीं अंशीं ऐतिहासिक व कांहीं अंशीं धार्मिक स्वरूपाच्या आहेत. सत्याची निवड करणें

फार दुर्घट झालें आहे तेव्हां सध्यां प्रचलित धार्मिक समजुतीवरच भिस्त ठेवून या सणापासून काय बोध घेतां येईल हें पाहूं. ( ज्या वारीं नागपचमी असते, त्याच वारीं गणेशचतुर्थी व होळी हे सण येतात. यावरून नागा, गणा, फागा, असें ह्मणण्याचा प्रघात कोंकणांत आहे. )

## हेतु व बोध

प्रत्येक दृश्य व अदृश्य पदार्थ परमेश्वराच्या हातून घडलेला असून त्याच्याच इच्छामात्रें सर्व जग चालत आहे अशी आम्हां आर्यांची समजूत आहे. मानवी शक्तीची व ज्ञानाची मजल कितीही पुढें गेली तरी जगाच्या अंतापर्यंत कित्येक गोष्टी मनुष्याला अगम्यच रहाणार आणि तर्कवितर्क व मनाची समजूत करण्यांत त्याला समाधान वाटणार हें निर्विवाद आहे. यासाठीं ज्या गोष्टीसंबंधानें कांहींच सांगतां येत नाहीं, त्यांच्याबद्दल परिस्थित्यनुरूप तर्क करून तदनुरोधानें समाज चालत आला आहे. या जगदावडंबरांत अतर्क्य असें पुष्कळ भरलें आहे. त्यामुळें परमेश्वराच्या अगाध लीलेविशयीं अंतःकरणांत पूज्यबुद्धि जागृत होऊन त्या भावनेस अनुसरून देवाची सेवा करण्यास मनुष्य सदा तत्पर असतो. ही भावना कमी अधिक उदात्त असणें हें मनुष्याच्या अंतःकरणाच्या संस्कृतीवर अवलंबून आहे. ज्या कालीं प्रथमतः परमेश्वराच्या अतर्क्य शक्तीबद्दल मनुष्यांना अचंबा वाटला व त्याची सेवा करणें म्हणजे त्यानें निर्माण केलेले सर्व प्राणी, झाडें वगैरेंची सेवा करणें आहे असें वाटलें, त्याच वेळीं नागपूजेसारखे प्रकार रूढ झाले आसावेत. परमेश्वरानें ज्या अर्थीं या प्राण्यास उत्पन्न केलें त्या अर्थीं तो कितीही घातकी असला तरी त्याचा प्राण घेण्याचा अधिकार आपणास नाहीं असें त्यास वाटल्यावरून त्याचा नाश करणें हें अघोर कृत्य होय असें समाजाच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें. स्थिरचर पदार्थांत परमेश्वर आहे असें समजणाऱ्या हिंदूंनीं सुष्ट व दुष्ट या सर्वांस आपल्या सेवेच्या योगानें सारखेंच संतुष्ट करण्याचें योजिलें. ज्या देशांत तत्त्वज्ञान अत्युच्च पायरीस जाऊन पोहोंचलें, ज्या देशांतील श्रेष्ठ ऋषिवर्यांनीं अनेक युगें विचार करून सच्चिदानंद स्वरूपाचा शोध लाविला आणि ज्ञानतपाच्या योगानें शाश्वत सुखाचा झरा कोणता हें निश्चितपणें ठरवून टाकिलें, त्या देशांतील त्याच ऋषींच्या वंशजांनीं दगड, धोंडे, काष्ट, पशु, पक्षी, वाघ, सर्प वगैरेंची पूजा करणें हें अनुचित आहे असें कित्येक वरवर पाहणारे म्हणतात. परंतु ज्या कारणांवरून अशा पूजा प्रचारांत आल्या, त्यांचा जोंपर्यंत त्यांनीं विचार

केला नाहीं तोंपर्यंत मात्र त्यांना हें विलक्षण वैषम्य भासणार आहे. तथापि एवढी गोष्ट खरी कीं, मनुष्यप्राण्याचें ध्येय सत्य, ज्ञान व प्रगति हें असावें; रूढीचें प्राबल्य कितीही असलें तरी तिच्या शृंखला हळूहळू तोडून टाकून धर्माचें खरें स्वरूप ओळखण्याचा व सच्चिदानंदाच्या चरणाचा आश्रय मिळविण्याचा प्रयत्न प्रत्येकानें करावा हें विहित आहे. ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, त्यांनीं अशा न पटणाऱ्या पूजादिक उपचारांपासून अलिप्त राहिल्यानें व समाजास टाकून दिल्यानें आपलें कर्तव्य संपलें असें न समजतां धर्मभोळ्या लोकांत मिळूनमिसळून त्यांना खऱ्या, श्रेष्ठ, शाश्वत व सार्वलौकिक धर्माकडे वळविलें पाहिजे.

---

# मंगलागौरी.



प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यांत मंगळवारीं मंगलागौरीचा उत्सव करण्याची रूढि महाराष्ट्रांतील कांहीं ब्राह्मणांत आहे. मुलीचें लग्न झाल्यावर पांच वर्षेंपर्यंत तिच्या करवीं मंगलागौरीची पूजा करवीत असतात. हें व्रत सौभाग्यवृद्ध्यर्थ असून त्याच्या आचरणानें पतीचें आयुष्य बलवत्तर होतें असें पुढील कथानकावरून ठरविण्यांत आलें. प्राचीन कालीं कुंडिन नगरींत धर्मपालक नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. त्याला पुत्रसंतति नव्हती. त्यामुळें तो व त्याची पत्नी सदैव कष्टी असत. ज्यांस पुत्रसंतान नाहीं त्यांच्या हस्तें भिक्षा देखील घेणें अनुचित आहे असें शास्त्रवचन असल्यामुळें एक योगी प्रत्यहीं त्या घरीं भिक्षा घेतल्याशिवाय जात असे. यामुळें तर त्यांच्या मनाला विशेष त्रास होऊन एकदां त्यांनीं युक्तीनें त्याच्या झोळींत भिक्षा घातली. हें पाहतांच योग्यास राग आला व कपटानें आपणाकरवीं शास्त्राज्ञेचा भंग करविण्याचा त्या दंपत्यानें प्रयत्न केल्याबद्दल त्यास कधींही पुत्रसंतान प्राप्त न होवो असा शाप दिला; परंतु त्यांनीं योगीमहाराजांचे पाय घट्ट धरून अनेक परीनें त्याची विनवणी केल्यावर प्रसन्न चित्तानें योग्यानें सांगितलें कीं 'नीलवस्त्र परिधान करा आणि निळ्या रंगाच्या घोड्यावर बसून तुम्ही मोठ्या अरण्यांत जा. त्या घोड्याच्या पायांस ठेंच लागतांच त्या ठिकाणीं खणा. ह्मणजे तेथें एक देवी अवतीर्ण होऊन इच्छित वर देईल. पुत्रसंतानासाठीं हपापलेल्या त्या जोडप्यानें योग्याच्या उपदेशाप्रमाणें अरण्याची वाट धरिली व घोड्यास ठेंच लागतांच थांबून जमीन खणली; तेव्हां त्यांस एक देवालय सांपडलें. त्या देवालयांतील देवीची आराधना करितांच तिनें त्यांस विचारिलें 'तुह्माला दीर्घायुषी पुत्र पाहिजे असेल तर तो अंध असा देईन. गुणवान्, सुस्वरूप असा पुत्र पाहिजे असल्यास तो अल्पायुषी असा मिळेल; तुम्ही कोणत्या पुत्राची अपेक्षा करितां ?

त्या उभयतां देवीभक्तांनीं विचार करून अल्पायुषी असला तरी गुणवान् पुत्रच दे अशी देवीची प्रार्थना करतांच 'तथास्तु' ह्मणून ती अंतर्धान पावली. देवीच्या वराप्रमाणें त्या स्त्रीच्या उदरीं पुत्र जन्मास आला. त्याचें त्यानीं शिव असें नांव ठेविलें. योग्य वय प्राप्त होतांच त्याचा उपनयनसंस्कार करण्यांत आला. पुढें विवाह करण्याजोगें त्याचें वय होतांच काशीक्षेत्रीं श्रीविश्वेश्वराचें दर्शन घेण्यासाठीं तीं मातापितरें आपल्या मुलासह निघालीं. तेथें पोहोंचल्यावर एके दिवशीं त्यांच्या कानीं एक विलक्षण गोष्ट पडली ती अशी:-कांहीं मुली एका तलावाजवळ खेळत असतां त्यांच्यांत कांहीं कारणावरून वाद उत्पन्न झाला. वादाचें पर्यवसान भांडणांत होऊन एक दुसरीवर अपशब्दांचा मारा करूं लागली. ( हल्लीं देखील सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे वादाचें असेंच पर्यवसान होतें. त्याचा परिणाम सध्यांप्रमाणें वाईट होऊं नये यासाठीं एखादें 'मौन' व्रत उपस्थित केल्यास बरें होईल. ) अशा रीतीनें आपणाविषयीं वाईट शब्द वापरलेले ऐकतांच सुशीला नांवाची मुलगी ह्मणाली-'या तुमच्या शिव्याशापांनीं माझें कांहींच वाईट होणार नाहीं; कारण माझी आई मंगलागौरीचें व्रत आचरीत असते त्यामुळें भलतेंच न होतां मला अखंड सौभाग्यच प्राप्त होणार आहे.' धर्मपालकास वाटलें कीं अशी सुशीलेसारखी मुलगी आपली सून झाली तर तिच्या करवीं मंगलागौरीचें व्रत करविल्यानें आपल्या मुलाचा अपमृत्यु टळेल. त्याप्रमाणें त्यानें त्या मुलीच्या मातापितरांची अनुमति मिळवून आपल्या मुलाचें सुशीलेशीं लग्न लाविलें. एके दिवशीं मंगलागौरी पहांटेस सुशीलेच्या स्वप्नांत आली आणि ह्मणाली 'तुझ्या पतीस दंश करण्यासाठीं एक मोठा सर्प येत आहे. यासाठीं हा अपमृत्यु चुकविण्याकरितां असें कर कीं एका घागरींत दूध घालून ठेव. तें पिण्यासाठीं सर्प आंत शिरतांच घागरीचें तोंड तुझ्या चोळीनें बंद कर आणि दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं तें वायन मातेला दे.' सुशीला जागी होऊन पाहते तर देवीनें स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें सर्प खरोखरच येत आहे; तेव्हां तिनें दुधाची घागर तयार करून सर्प आंत शिरतांच तिचें तोंड बंद केलें व देवीनें सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मातेस तें वायन दिलें. तिच्या मातेनें घागरीचें तोंड उघडलें तेव्हां त्यांत सर्पाच्या ऐवजीं मोत्यांचा हार सांपडला. कांहीं दिवसांनीं सुशीलेच्या पतीस मरण प्राप्त झालें, तेव्हां तिच्या वतीनें मंगलागौरी यमराजाच्या दूतांशीं लढली, व त्यांच्या हातून तिनें शिवाचा प्राण परत आणिला. शिव जीवंत झाला. याप्रमाणें

सुशीला मंगलागौरीच्या कृपाप्रसादानें अखंड सौभाग्यवती झाली. अर्थात् मंगलागौरी ही सौभाग्यदायिनी देवी असल्यामुळें तिची पूजा करण्याचा प्रघात पडला आहे.

## शास्त्रोक्त विधि.

लग्न झाल्यानंतर सौभाग्यवती मुलीनें श्रावण महिन्यांत प्रत्येक मंगळवारीं मंगला गौरीची पूजा करावी. उमामहेश्वराची पूजा करावयाची ती पहिल्या वर्षी माहेरीं व त्यानंतर चार वर्षें पतिगृहीं करावी. पूजा आटोपल्यावर हात जोडून

**पुत्रान्देहि धनं देहि सौभाग्यं देहि मंगले।**
**अन्यांश्च सर्वकामांश्च देहि देवी नमोस्तुते॥**

म्हणजे, पुत्र दे, धन दे, सौभाग्य दे आणि इतर सर्व मनोरथ पूर्ण कर, अशी प्रार्थना करावी. नंतर एका पात्रांत हळदकुंकू व काजळ, फणी, करंडा, कंचुकी तांबूल, दक्षिणा, फुलांची वेणी, नारळ, वगैरे ठेवून आपल्या सुवासिनी आईस किंवा इतर मातृपक्षीय सुवासिनीस तें वायन द्यावें. भटजीला यथा शक्ति दक्षिणा व वायन दिल्यावर दिवसा १६ सुवासिनींसह मौनपणें भोजन करावें. रात्रौ देवीस १६ वातींची आरती दाखवावी. ( या व्रतांत १६ चें माहात्म्य विशेष आहे. आघाडा, धोतरा, शेवती, दुर्वा, वगैरे १६ प्रकारचीं फुलें व पत्रें १६–१६ प्रमाणें देवीस वहावीं असा पूजाविधि सांगितला आहे. ) सुवासिनींच्या ओटया भराव्या. रात्रौ भोजन करूं नये. गायन, नृत्य ( फुगडी ), खेळ वगैरेंच्या योगानें देवीस संतुष्ट करावें. रात्रीचा काळ आनंदोत्सवांत घालविल्यावर दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं गौरीस सौभाग्यद्रव्यें अर्पण करून तिचें विसर्जन करावें. गौरीची प्रतिमा असल्यास ती भटजीस दान द्यावी. याप्रमाणें पांच वर्षेंपर्यंत हें व्रत पाळावें असें भविष्यपुराणांत सांगितलें आहे. या व्रतासंबंधीं

## चालू रूढि

अशी आहे कीं फक्त महाराष्ट्रांत मात्र कांहीं दाक्षिणात्य स्मार्त सांप्रदायी ब्राह्मणांत हें व्रत करण्याचा प्रघात आहे. मुंबई, पुणें व इतर कांहीं शहरीं ब्राह्मणेतरांच्या येथेंही स्त्रिया हा दिवस पाळतात. मंगलागौरीचें व्रत उत्तर किंवा दक्षिण हिंदुस्थानांत कोणी आचरीत नाहीं. शास्त्रोक्त विधीप्रमाणें सोळा सुवासिनींस भोजन किंवा मोठया किंमतीचीं वायनें देण्याची चाल नाहीं. देवीपुढें बाहुल्या मांडणें,

रात्रौ गीत गाणें, कुमारिका व सौभाग्यवती स्त्रिया यांच्या भिजविलेल्या हरभऱ्यांनीं ओटी भरणें, फुगड्या घालणें वगैरे प्रकार रूढ आहेत. क्वचित् ठिकाणीं पुरोहितास बोलावून त्याच्या मुखानें मंगलागौरीची कथा स्त्रिया श्रवण करतात. दिवसेंदिवस या व्रताचें धार्मिक महत्व कमी होत चाललें असून नववधूंस तें केवळ उत्सवाचें व करमणुकीचें एक साधन होऊन बसलें आहे. या व्रताची सांगता बालवयांत करण्यांत येत असल्यामुळें त्याचें धर्मदृष्ट्या महत्त्व फारसें कोणी मानीत नाहीं.

## या व्रतासंबंधीं विचार

करतां असें दिसतें कीं कांहीं धर्मसमजुतींवर त्या व्रताची उभारणी आहे. हें व इतर महाराष्ट्रांत रूढ असलेलीं व्रतें जशीं बंगाल्यांत व उत्तर हिंदुस्थानांतील इतर प्रदेशांत नाहींत तशींच तेथें असलेलीं व्रतें या भागांत नाहींत. उदाहरणार्थ माघ शु. ६ ला ब्रह्मवैवर्तपुराणांतर्गत प्रकृतिखंडांत सांगितलेलें सीतला * षष्ठीचें व्रत बंगाल्याकडे स्त्रिया आचरीत असतात. मुलांचें आयुरारोग्य वाढावें व त्यांना देवीच्या उपद्रवाची बाधा होऊं नये एतदर्थ हें आहे. या दिवशीं घरांत अन्न शिजवीत नाहींत. पूर्व दिवशींच स्वयंपाक सिद्ध करून ठेवून शिळें अन्न जेवतात. एका वडाच्या झाडाखालीं मनुष्याच्या डोक्याएवढा दगड ठेवून देवीप्रीत्यर्थ त्याची पूजा केली जाते. चैत्रद्वादशी ही तिथि षष्ठी या नांवानें तेथें प्रसिद्ध आहे. षष्ठी ही मुलांचें संरक्षण करणारी देवी आहे असें तेथील स्त्रिया मानतात. आपल्या प्रांतांत मूल जन्मास आल्यावर ६ व्या दिवशीं त्याच्या रक्षणार्थ षष्ठीदेवीची पूजा करण्याचा प्रघात आहे. या देवीला प्राकृतांत 'सटी' असें म्हणतात. ज्येष्ठ पौर्णिमेसही षष्ठीची पूजा याच हेतूनें केली जाते. ही पूजा अरण्यांत करावी असें शास्त्रांत सांगितलें असल्यामुळें तिला 'अरण्यषष्ठी' हें नांव आहे. फक्त कंदमूलांवर या दिवशीं निर्वाह करावा असेंही शास्त्रांत सांगितलें आहे. हीं उत्तर देशांतील व्रतें येथें कोणी पाळीत नाहीं; परंतु या सर्व व्रतांचा उगम ज्या कारणांमुळें झाला, त्या कारणांचा विचार करण्या-

---

* मुंबईइलाख्यांत बऱ्याच ठिकाणीं या देवीचीं देवालयें असून मुलांस देवी आल्या असतां त्यांचें रक्षण करावें म्हणून तिला नवस केला जातो. मुंबईंत शीतलादेवीचें एक देवालय आहे. त्या देवीस मुंबापुरवासी हिंदुलोक भजतात.

जोगा आहे. मंगलागौरी व्रत काय किंवा इतर व्रतें काय तीं अस्तित्वांत येण्यास एकच मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे अपत्यप्रीति हें आहे. पुत्रसंतानासंबंधानें एका दंपत्याच्या अंतःकरणांत उत्कट इच्छा उत्पन्न झाल्यानंतर योग्याच्या उपदेशाप्रमाणें तें देवी प्रसन्न करून घेण्याच्या मार्गास लागलें. पुत्रसंतान असणें अत्यंत आवश्यक आहे अशी ज्याप्रमाणें भविष्योत्तर पुराण अस्तित्वांत आलें त्या वेळीं समाजाची समजूत होती, तशीच ती आजमितीसही आहे. पुत्र असणें हें प्रापंचिकदृष्ट्याच अगत्याचें आहे असें नसून धार्मिकदृष्ट्याही आवश्यक आहे असें कित्येक शतकांपासून हिंदू लोक मानीत आले आहेत.

**पुं नाम्नो नरकाद्यस्मात्त्रायते पितरं सुतः**
**तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा ॥** मनु ९–१३८.

पुं नांवाच्या नरकापासून पितरांना पुत्र तारतो; यासाठीं त्याला पुत्र ह्मणतात.

**पुत्रेण लोकञ्जयति पौत्रेणानन्त्यमश्नुते ।**
**अथ पुत्रस्य पौत्रेण ब्रध्नस्याप्नोति विष्टपम् ॥** मनु ९–१३७.

पुत्र झाल्याच्या योगानें पितरांस स्वर्गादि लोकांची प्राप्ति होते. नातवामुळें चिरकाल स्वर्गसुख लाभतें. पुत्राच्या नातवामुळें आदित्य लोक प्राप्त होतो. याप्रमाणें पुत्रपौत्रादिकांच्या योगानें पितरांस स्वर्गाचीं द्वारें खुलीं होतात. ही समजूत मनूच्या कालीं हिंदुलोकांच्या अंतःकरणांत दृढ झाली होती, हें सिद्ध होतें. अत्यंत प्राचीनकालीं देखील पुत्रप्राप्तीस आर्य लोक महत्व देत असत. आणि स्वतःला पुत्र नसून परक्याचा मुलगा जवळ करण्याचा ( दत्तक घेण्याचा ) प्रसंग येई तेव्हां त्यांना वाईट वाटे. ऋग्वेदाच्या ७ व्या मंडळांत पुढील अर्थाचीं सूक्तें आहेत.

' हे अग्नि, दुसऱ्याचा पुत्र आह्मांला नको. अज्ञानी लोकांच्या या मार्गाचा अवलंब करूं नकोस. दुसऱ्याचा मुलगा आह्मांला सौख्य देऊं शकेल, परंतु तो आपला कधींही होणार नाहीं. जो आह्मांला अन्न आणून देईल आणि आमच्या शत्रूंचें निर्दालन करील असा पुत्र आह्मास दे."

या उताऱ्यावरून दिसून येईल कीं पुत्रप्राप्ति व्हावी अशी इच्छा बाळगणारें दंपत्य स्वतःस अन्न व वस्त्र पुरविण्यास व शत्रूशीं लढून त्यांस चीत करण्यास समर्थ होईल अशा पुत्राची अपेक्षा करीत असे. मरणोत्तर तिलांजुलीच्या योगानें स्वर्गलोकीं जाण्याची पात्रता पुत्रजन्मामुळें येते ही कल्पना त्या कालीं नव्हती; परंतु कालेंकरून समाजाचें असें मत बनत गेलें असावें; ह्मणूनच महा-

भारतांत 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' ज्याला पुत्र नाहीं त्याला सद्गति मिळणार नाहीं असें ह्मटलें अहे. रामानेंही दशरथ निवर्तल्याचें वर्तमान कानीं येतांच त्याला यवाचे पिंड दिल्याचें रामायणांत लिहिलें आहे. भारतीय युद्धाच्या आरंभीं अर्जुनानें जे उद्गार काढले ते प्रसिद्धच आहेत. तो ह्मणाला, "कुलक्षय झाला असतां प्राचीन कालापासून चालत आलेले कुलधर्म नष्ट होतात. धर्माचा नाश झाला ह्मणजे कुलामध्यें अधर्माचें प्राबल्य चालू होतें. अधर्माच्या प्राबल्यामुळें कुलस्त्रिया बिघडतात आणि त्यायोगें वर्णसंकर होतो.

**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।**
**पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥**

—गीता १–४२.

"वर्णसंकर झाला ह्मणजे कुलक्षय करणारांना आणि त्या कुलासही नरकाची प्राप्ति निश्चित होते; कारण कीं पिंडदान आणि तर्पण या क्रिया लुप्त झाल्यामुळें त्यांचे पितर पतन पावतात."

हे अर्जुनाचे विचार ह्मणजे भारतकालीन जनांचे किंवा समाजाचेच विचार होत. यांतील फोलपणा जाणून श्रीकृष्णानें जो खरा मार्ग सांगितला तो अत्यंत श्रेष्ठ प्रकारचा आहे. श्रीकृष्ण ह्मणतात,

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः**

—गीता २–४२ ते ४४.

अर्जुना, वेदांविषयीं पोकळ बडबड करण्यांत रमलेले, दुसरें कांहींच नाहीं असा वाद घेणारे, कामना धरून कर्मे करणारे, स्वर्गभोग हेंच सर्वस्व मानणारे असे जे मूढ लोक ते ऐश्वर्यभोगांकडेच लक्ष ठेवितात, आणि ज्या कर्मांचें फळ पुनर्जन्म आहे असलीं अमकीं तमकीं कर्मे करावीं असें प्रफुल्लित भाषण करितात; पण हें त्यांचें भाषण भोग आणि ऐश्वर्य यांच्या ठायीं आसक्त झालेल्या लोकांचें चित्त हरण करून नेतें. यामुळें अंतःकरणाची एकाग्रता करण्याला त्यांना दृढ प्रवृत्तीची बुद्धि होत नाहीं.

## हिंदुस्थानची सांप्रतची स्थिति

लक्षांत घेतां वरील श्रीकृष्णाच्या विचारानुरोधानें वर्तन करणें हाच या देशास वर येण्याचा उपाय आहे. अनेक काम्य कर्मांच्या भरीस पडण्याची दुर्बुद्धि

आमच्यांतून पार काढून टाकिली पाहिजे. देवापाशीं प्रत्येक घटकेस, 'मला अमुक दे, मला तमुक दे' असें ह्मणण्याची आमची संवय अत्यंत धर्मबाह्य आहे. अशा रीतीनें आम्ही वागूं लागल्यामुळें देवांतील देवपण विसरून आह्मी देवास दिवाळखोराच्या पायरीस मात्र आणून ठेविलें आहे. आमच्या या देवघेवीच्या ( नवस करणें व मागणें ) प्रकारामुळें, तुकारामानें ह्मटल्याप्रमाणें

**दिवाळखोर नारायण । त्यावरी बहुतांचें ऋण ॥**
**उठतांची उभे द्वारीं । अवघे दे दे ह्मणती हरी ॥**

अशी स्थिति नित्यशः आपण पाहातों. ही स्थिति वाईट तर खरीच. ती बदलली पाहिजे. पूर्वकालीन व हल्लींच्या स्थितींत महदंतर आहे हें आपण जाणलें पाहिजे. हल्लीं लोकसंख्येची वाढ प्रचंड झाली असून जीवनार्थ झटापटींत राष्ट्रीयदृष्ट्या पाहूं गेल्यास आह्मी किती तरी मागें आहों. या देशांतील लोक या कलहांत टिकाव धरून राहातील असें करण्याकडे सर्वांचें लक्ष्य वेधणें इष्ट आहे. मरणोत्तर स्वर्गप्राप्ति पुत्रजन्मावर अवलंबून आहे या कल्पनेनें अज्ञजन प्रपंचाची बिडी पायांत अडकवून तो नीटपणें चालविण्याची ताकद नसतां मरणापूर्वींच आपलें घर नरकलोकाप्रमाणें कष्ट व त्रास यांनीं युक्त करीत असतात. प्रत्येक स्त्रीचें व प्रत्येक पुरुषाचें लग्न झालेंच पाहिजे अशी जी घातुक कल्पना ती आमच्या डोक्यांतून पार घालवून दिल्याशिवाय आमची स्थिति सुधारणार नाहीं. सुमारें ८०० वर्षांपूर्वीं आल्बेरुनी ह्यानें हिंदुसमाजाचें सूक्ष्म निरीक्षण करून स्त्रिया आणि पुरुष यांच्या शारीरिक व मानसिक दौर्बल्याचा जो उल्लेख केला आहे त्याचा विचार करितां आज किती शतकांपासून आमची शारीरिक स्थिति असमाधानकारक आहे हें समजून येईल. आम्ही सध्या जी सामाजिक अधोगति भोगीत आहों, त्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे विवाहासंबंधीं धर्माज्ञांचें उल्लंघन हेंच आहे. परमेश्वरप्रणित आज्ञांचा भंग केल्याबद्दल आम्ही शिक्षा भोगीत आहों. सध्यांचा अदूरदर्शीपणाचा प्रकार बंद पाडला पाहिजे. बालविवाहापासून उत्पन्न झालेलीं कमकुवत व अल्पवयी बालकें, बालविधवा, रोगग्रस्त मातापितरें, यांची संख्या कमी होण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, आमचीं जीं व्रतें प्रचारांत आलीं आहेत त्यांचा हेतु कोणता हें ठरवून समाजांत तो हेतु तडीस जाण्याजोगे उपाय योजिले पाहिजेत. असे उपाय योजणें ह्मणजेच सनातन हिंदुधर्माबद्दल सदभिमान प्रगट करणें होय.

# श्रावणी.

प्रत्येक श्रावण पौर्णिमेस श्रवण नक्षत्र असल्यास श्रावणी नांवाचा यज्ञोपवीत घालण्याचा विधि ब्राह्मण करीत असतात. त्याचप्रमाणें इतर द्विजही हा दिवस पाळतात. ऋग्वेदी, यजुर्वेदी व सामवेदी यांना यज्ञोपवीतधारणाविषयीं निरनिराळे काल सांगितले आहेत. श्रवणनक्षत्र, पंचमी आणि हस्तनक्षत्र, असे तीन काल ऋग्वेद्यांस सांगितले असून त्यांत श्रवण नक्षत्र हा काल मुख्य आहे. श्रवण न मिळेल तर पंचमी किंवा हस्त नक्षत्र हे काल घ्यावे. यजुर्वेदाच्या अनुयायांनीं श्रावण पौर्णिमा हाच मुख्य काल असें मानावें. यांच्यांत ज्या निरनिराळ्या शाखा आहेत त्यांनीं श्रावणीसाठीं पौर्णिमा कोणती घ्यावी यासंबंधाचा निर्णय शास्त्रकारांनीं केला असून कांहीं शाखांच्या द्विजांनीं आषाढ, कांहींनीं भाद्रपद या मासांतील पौर्णिमा हा काल घ्यावा असें ठरविण्यांत आलें आहे. सामवेद्यांस भाद्रपद शुक्लपक्षांतील हस्त नक्षत्र हा उपाकर्माचा मुख्य काल आहे; तथापि क्वचित् प्रसंगीं हा काल बदलावा लागतो, असें निर्णयसिंधूंत सांगितलें आहे. नूतन मौंजीबंधन झालेल्यांनीं श्रावणी कोणत्या नक्षत्रीं करावी याबद्दलही विचार करण्यांत आला आहे. याप्रमाणें प्रत्येक वर्षीं श्रावणीचा विधि उरकला जातो. या दिवशींचा शास्त्रोक्त विधि असा आहे कीं, उपनयन झालेल्या ब्रह्मचारी मुलांनीं व गृहस्थाश्रमी पुरुषांनीं गांवांतील प्रसिद्ध देवालयांत एकत्र जमून उपाध्यांच्या सूचनेप्रमाणें शास्त्रोक्त मंत्रोच्चारपूर्वक श्रावणीचा विधि उरकावा. प्रारंभीं शरीरशुद्ध्यर्थ पंचगव्य * प्राशन करावें. होमसिद्धि करून गृहीं तयार केलेल्या चरूच्या आहुती द्याव्या. याला उत्सर्जन विधि असें नांव आहे. त्यानंतर स्नान करून सप्तर्षि व अरुंधति यांची पूजा करावी व होम पेटवून दधिसक्तूच्या आहुती द्याव्या. याला उपाकर्म विधि असें म्हणतात. त्यानंतर दशगायत्री मंत्रांनीं मंत्रविलेलें यज्ञोपवीत धारण करण्यापूर्वीं गुरु व वडील जनांस यज्ञोपवीत देऊन त्यांस नमस्कार करावा. आणि यज्ञोपवीत धारण करावें व जुनें जानवें काढून टाकावें. श्रावणींतील हा तिसरा व शेवटचा विधि आहे. याला यज्ञोपवीतधारणविधि असें म्हणतात. यानंतर मृत

---

* गायीपासून उत्पन्न झालेले पांच पदार्थ—दूध, तूप, दहीं, शेण, मूत्र.

पितृकांस तिलतर्पण द्यावें. ज्यांनीं तर्पण केलें असेल त्यांनीं एकभुक्त रहावें. श्रावणीसंबंधीं

## चालू रूढी

अशी आहे कीं, पुराणमतवादी लोक हा विधि भक्तिपूर्वक पाळतात. खेड्यापाड्यांत देवालयांत श्रावण्या होत असतात. शहरांत बहुधा एकाद्या ज्ञातीच्या सार्वजनिक जागीं किंवा प्रतिष्ठित लोकांच्या घरीं श्रावण्या होत असून त्या वेळीं जवळपास राहणारी मंडळी एकत्र होत असते. नवीन मताचे लोक या विधीस फारसें महत्व देत नाहींत व त्यांच्यापुरतें पाहूं गेल्यास श्रावणी हा आवश्यक धर्मविधि आहे असें न मानतां ती केवळ अज्ञ जनांनीं भटजींच्या तंत्रानें करण्याची वार्षिक कवाईत आहे असें ते थट्टेनें ह्मणतात. आर्यसमाजपंथाच्या अनुयायांनीं श्रावणीचा विधि आपल्या मताप्रमाणें निराळाच बसविला आहे. चरूच्या व दधिसक्तूच्या ऐवजीं उत्तम सांजा करून या पंथाचे लोक अग्नीस आहुति देतात, व होमांत चंदनाचें लांकूड व तूप घालून अग्नि प्रदीप्त झाल्यावर कांहीं वेदऋचा ह्मणून यज्ञोपवीत धारण करतात. प्रार्थनासमाजाच्या मंडळींत नवीन प्रकारचा उपनयनसंस्कार चालू आहे; परंतु त्यांनीं श्रावणीस फांटा दिला आहे. हल्लीं श्रावणीबद्दल ब्राह्मण व इतर द्विजांची जी समजूत आहे ती मात्र विलक्षण खरी.

## श्रावणी ह्मणजे काय ?

याचें ज्ञानच त्यांना नाहीं असें त्यांच्या एकंदर वर्तनावरून सिद्ध होतें. श्रावणी ह्मणजे यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि नव्हे. यज्ञोपवीतधारण हें श्रावणीचें अत्यंत गौण अंग आहे. परंतु सांप्रत यालाच तेवढें महत्व दिलें जातें. कोणतेंही धर्मकृत्य करण्यापूर्वी यज्ञोपवीत धारण करावें असें शास्त्र सांगतें; त्याचप्रमाणें श्रावणीच्या वेळीं ब्रह्मयज्ञापूर्वी यज्ञोपवीत घालावें लागतें इतकेंच. श्रावणींतील मुख्य अंगें उत्सर्जन व उपाकर्म. अर्थात् अध्ययनाची समाप्ति व अध्ययनाचा आरंभ हीं होत. हल्लीं उत्सर्जन व उपाकर्म हीं दोन्ही कार्यें एकाच बैठकीस उरकलीं जातात. हें विलक्षण तर खरेंच. उत्सर्जन व उपाकर्म यांच्यामध्यें कांहीं महिन्यांचा काल लोटला पाहिजे; हें वर वर पाहणारेही कबूल करतील. प्राचीनकालीं मुलगा आठ वर्षांचा झाला म्हणजे त्याला गुरुगृहीं पाठवीत व तेथेंच त्याचा विद्याभ्यास चाले. वेदपठण हें शिक्षणाचें एक महत्वाचें अंग होतें. परंतु

वेदाभ्यास वर्षभर चालत नव्हता. शिशिर ऋतूच्या आरंभाच्या सुमारास, हल्लीं ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत शाळांस सुटी असते त्याप्रमाणें, विद्यार्थ्यांस माघ मासीं सुटी मिळे व वेदाध्ययन पांचसहा महिने तहकूब राही. वर्षाकाल संपण्याच्या वेळीं श्रावण पौर्णिमेच्या सुमारास पुनः अभ्यासाला आरंभ होई, याप्रमाणें वेदाभ्यास बंद ठेविते वेळीं एक व प्रारंभ करतेवेळीं एक असे दोन विधि उरकावे लागत. यांसच उत्सर्जन व उपाकर्म असें ह्मणत. उत्सर्जन विधि झाल्यावर विद्यार्थी स्वगृहीं जात किंवा कसें हें सांगणें शक्य नाहीं. प्राचीन कालीं रूढ असलेली गुरुगृहीं राहून अभ्यास करण्याची पद्धति नामशेष झाली. तथापि त्याकालचे विधि मात्र अद्यापि अस्तित्वांत आहेत. गरीबीमुळें कानांतील दागीने गेले तरी ज्याप्रमाणें भोंकें कायम राहतात तशांतलाच हा प्रकार आहे.

## उपनयनसंस्कार

या विधीच्या मुळाशीं असल्यामुळें त्याची उपलब्ध त्रोटक माहिती पुढें देत आहों. अत्यंत प्राचीनकालीं ह्मणजे वेदकालीं उपनयनाचा विधि रूढ होता किंवा कसें हें सांगणें शक्य नाहीं. वेदांतील यज्ञयागादिकांचें वर्गीकरण करून ते कसे करावे याचें विवेचन ‘ ब्राह्मण ’ नांवाच्या ग्रंथांत करण्यांत आलें. त्यानंतर सूत्रकारांनीं कौटुंबिकानें करण्याचे सुमारें ४० मुख्य गृह्यविधि ठरविले. ते समाजास मान्य होऊन स्मृतिकारांनीं या विधींस किंवा संस्कारांस कायद्यांचें स्वरूप देऊन ते करणें हें द्विजत्वाचें द्योतक व द्विजत्व कायम राखण्यास ते आवश्यक आहेत असेंही ठरविलें. गृह्यसूत्रें रचलीं गेलीं त्याकालीं उपनयनाचा विधि अत्यंत साध्या तऱ्हेचा होता. योग्य वय प्राप्त होतांच विद्यार्थी जवळपास रहाणाऱ्या विद्वान्, सदाचारी व ज्ञाननिष्ठ गुरूपाशीं जाऊन आपणास शिष्यशाखेंत सामील करून विद्यादान देण्याबद्दल विनंती करीत. अल्पसा विधि उरकल्यावर शिष्यास ( ब्रह्मयज्ञ करण्यासाठीं ) उपवीत चढविलें जात असे. याच वेळीं वेदाध्ययनाचा आरंभ ह्मणून गायत्रीमंत्राचा उपदेश केला जात असे. द्विजत्वांत दाखल केल्याबद्दलचा हा मंत्र जपणें प्रत्येकास आवश्यक होतें. याप्रमाणें विधि आटोपल्यावर त्या विद्यार्थ्यास द्विजत्व*

---

*द्विज म्हणजे दोनदां जन्म पावलेला. माता व पिता यांच्यापासून प्रथमचा जन्म व गायत्री ही माता व आचार्य हा पिता यांच्यामुळें दुसरा जन्म याप्रमाणें प्रत्येक द्विजाचे दोन जन्म असल्याचें मानिलें आहे.

प्राप्त होई. अध्ययनासाठीं गुरूपाशीं नेणें यालाच 'उपनयन' असें ह्मणतात. अशारीतीनें गुरूकडे वेदाध्ययन करण्याच्या हेतूनें अनेक विद्यार्थी जात. भारद्वाजाचा पुत्र सुकेश, शिबीचा पुत्र सत्यकाम, गर्ग गोत्रोत्पन्न सौर्यायणि, अश्वलाचा पुत्र कौसल्य, विदर्भ देशींचा भार्गव व कात्याचा पुत्र कबंधी हे परब्रह्माविषयीं ज्ञान संपादन करण्यासाठीं पिप्पलादमुनीकडे गेले असें प्रश्नोपनिषदांत सांगितलें आहे. आरुणीचा पुत्र श्वेतकेतु पित्याच्या आज्ञेनें बाराव्या वर्षापासून पुढें बारा वर्षें आपल्या कुलगुरूच्या आश्रमांत राहिला ( छांदोग्य ). या प्रकारचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. त्या वेळच्या गुरूंना हल्लींच्या खासगी शाळांच्या चालकांस वाटतें त्याप्रमाणें आपणाकडे शिष्य यावेत अशी इच्छा असे. तैत्तिरीयोपनिषदांत पुढील प्रार्थना आहे.

"माझ्याकडे ब्रह्मचारी ( शिष्य ) येवोत. ते शिष्य शमदमानें युक्त होवोत. जनामध्यें मी यशस्वी व्हावें, मीं श्रेयस्कर व्हावें, मीं द्रव्यानें युक्त व्हावें."

अर्थात् अध्ययन समाप्त झाल्यावर गुरूंना शक्त्यनुसार दक्षिणा देऊन त्यांचा आशिर्वाद घेत व त्या वेळीं शिष्याचें समावर्तन केलें जात असे. अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय समावर्तन करीत नसत. कमलपुत्र उपकोसल हा सत्यकाम जाबालाच्या गृहीं ब्रह्मचर्यानें अध्ययनासाठीं राहिला. सत्यकामानें इतर सर्व शिष्यांचें ( बारा वर्षांनंतर ) समावर्तन केलें; परंतु उपकोसलाचें समावर्तन केलें नाहीं. शिष्याला पूर्ण ज्ञान झाल्याशिवाय त्याजकडून गुरुदक्षिणा घेत नसत. याज्ञवल्क्याला विदेही जनकराजानें हजार गाई देऊं केल्या, तेव्हां याज्ञवल्क्यानें म्हटलें, 'पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति' ( अर्थ–शिष्याला पूर्ण ज्ञान देण्यापूर्वीं त्याजपासून कांहीं घेऊं नये, असा माझ्या पित्याचा अभिप्राय होता. ) आचार्याकडून विद्या प्राप्त करून घेत. त्याचप्रमाणें

## पित्याकडून ज्ञान संपादन

करण्याची चाल पूर्वकालीं होती, ह्याबद्दल अनेक प्राचीन ग्रंथ साक्ष देतात. मातेकडून देखील मुलांस शिक्षण मिळे व कित्येक राजेही आचार्याकडे जात. तसेंच विद्वान् राजाकडे अनेक जिज्ञासु विद्यार्थी हातांत समिधा घेऊन जात. स्त्रिया गुरूंच्या आश्रमीं राहून अध्ययन करीत किंवा कसें हें समजत नाहीं. तरी त्या घरींच अध्ययन करून ब्रह्मवादिनी हें नांव मिळवीत असें दिसतें. वचक्नूची कन्या गार्गी ही ब्रह्मज्ञानी होती. याज्ञवल्क्याकडून त्याची पत्नी मैत्रेयी हिनें

ब्रह्मज्ञान संपादन केलें. याप्रमाणें पुरुष व स्त्रिया ब्रह्मज्ञानी असल्यामुळें माता, पिता किंवा आचार्य यांच्याकडून मुलांस उपदेश दिला जात असे. स्त्रियांनीं ब्रह्मचाऱ्यास उपदेश द्यावा, असें देवलाचें मत आहे. ज्याप्रमाणें पुरुषांचा उपनयनविधि करण्यांत येई, त्याचप्रमाणें स्त्रियांचाही व्रतबंध पूर्वकालीं होत असे. यमाचें वचन असें आढळतें कीं,

**पुराकल्पे तु नारीणां मौंजीबंधनमिष्यते ।**
**अध्यापनं च वेदानां सावित्री वचनं तथा ।**–निर्णयसिंधु ॥
**द्वादश वर्षाणि वेद ब्रह्मचर्यं उपनयनादूर्ध्वं ॥** –सूत्र ।

यावरून स्त्रियांचें मौंजीबंधन करून त्यांस ब्रह्मचर्य पाळण्यास लावीत हें सिद्ध होतें. याप्रमाणें स्त्रियांस मौंजीबंधन, वेदाध्ययन, महामंत्रोपदेश यांचा अधिकार त्या कालीं होता ह्मणूनच उपनयनाच्या वेळीं त्यांस गुरु होण्याचा अधिकार असे. कित्येक स्त्रिया जन्मभर अध्ययन व अध्यापन यांत काल घालवीत. त्या समाजांत पूज्य मानिल्या जात. गार्गी, वाचक्नवी, वडवा प्रातिथेयी, सुलभा, मैत्रेयी, यांस ब्रह्मवादिनी अशी विशेष संज्ञा प्राप्त होण्याचें कारण त्यांची योग्यता हेंच होय. त्यांच्या नांवें तर्पण द्यावें, असें आश्वलायनानें सांगितलें आहे. गुरुगृहीं असतांना व उपनयनाच्या वेळीं महामंत्रोपदेश झाल्यावर गुरुकडून

## ब्रह्मचाऱ्यास उपदेश

मिळे तो अत्यंत महत्वाचा असे. या उपदेशाचा मासला तैत्तिरीयोपनिषदांत पुढीलप्रमाणें दिला आहे. तो विद्यार्थिदशेंतील स्त्रीपुरुषांनीं मनन करून त्याप्रमाणें आचरण ठेवण्याजोगें आहे.

**सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायन्मा प्रमदः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि । यान्यस्माकꣳसुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेयाꣳसो ब्राह्मणाः तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धयाऽदेयम् । श्रिया देयम् । ह्रिया**

**देयम्। भिया देयम्। संविदा देयम्। आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः॥**

**अर्थ**–सत्य भाषण कर. धर्माप्रमाणें वाग. अध्ययनाविषयीं प्रमाद करूं नको. सत्याविषयीं प्रमाद करूं नको. धर्माविषयीं प्रमाद करूं नको. आपलें कुशल व्हावें यासाठीं कर्में करण्याविषयीं प्रमाद करूं नको. भूतमात्रासाठीं कर्मांविषयीं प्रमाद करूं नको. स्वाध्याय व प्रवचन यांविषयीं प्रमाद करूं नको. देवकार्य व पितृकार्य यांविषयीं प्रमाद करूं नको. मातेला देवाप्रमाणें समज. पित्याला देवाप्रमाणें समज. आचार्याला देवाप्रमाणें समज. अतिथीला देवाप्रमाणें समज. जीं कर्में निंद्य नाहींत त्यांचेंच आचरण करावें; इतर कर्मांचें आचरण करूं नये. आमचीं ( गुरूंचीं ) जीं सत्कर्में असतील, त्यांचेंच तूं आचरण करावेंस; इतर कर्मांचें आचरण करूं नये. जे आमच्याहून श्रेष्ठ ब्राह्मण असतील, त्यांना आसन देऊन त्यांच्या श्रमाचा परिहार करावा. जें कांहीं द्यावयाचें तें श्रद्धेनें द्यावें. अश्रद्धेनें देऊं नये. मर्यादायुक्त द्यावें. भीतियुक्त द्यावें. ओळख करून घेऊन द्यावें. ( अध्ययन पुरें झाल्यावर ) आचार्याला प्रिय असें धन देऊन गृहस्थाश्रमाचा उपभोग घे.

याशिवाय कोणत्याही बिकट प्रसंगीं वर्तन कसें ठेवावें याबद्दल संशय आल्यास विद्वान्, निस्पृह, सच्छील, सदाचारसंपन्न अशा महाजनांची सल्ला घेऊन वागावें असेंही सांगितलें आहे. हा उपदेश अमृततुल्य आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? हल्लीं परीक्षेंतून उत्तीर्ण झाल्यावर नूतन पदवीधरांस पदवीदान समारंभाच्या वेळीं विश्वविद्यालयाचे 'चेन्सलर' उपदेश करीत असतात. त्यांच्या उपदेशाशीं वरील उपनिषदांतील उपदेशाची तुलना केल्यास प्राचीन गुरूंचीं वचनें त्रिकालाबाधित व सर्व दर्जाच्या लोकांस मान्य होण्याजोगींच असत हें कोणीही कबूल करील.

अध्ययनासाठीं विद्यार्थी आचार्यगृहीं बराच काल घालवीत. त्या मुदतींत त्यांना ज्ञानसंपादनार्थ देशपर्यटन करावें लागत असे, असें दिसतें. बृहदारण्यक उपनिषदींत लह्याचा पुत्र भुज्यु हा अध्ययनव्रत आचरीत असतां मद्र देशांत पर्यटणास गेल्याबद्दलचा उल्लेख आहे. तसेंच अध्ययन ह्मणजे घोकंपट्टी नसे. प्रत्येक विषय नीटपणें समजल्याशिवाय पुढचा अभ्यास करण्याची परवानगी नसे. वेदाध्ययन हें अभ्यासाचें महत्वाचें अंग होतें, आणि तें अर्थ समजून करावें लागे. हल्लींची पोपटपंची व अर्थज्ञानाशिवाय पाठ करण्याची जी

वैदिकांत चाल आहे, ती अत्यंत अश्लाघ्य असें मानीत. यासंबंधाच्या पुढील ऋचा ऋग्वेदांत सांपडतात.

**ऋचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधिविश्वे निषेदुः ।**
**यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुत इमे समासते ॥**

**अर्थ**--ज्याच्या ठायीं सर्व देव आहेत अशा परब्रह्माविषयीं सर्व मंत्र आहेत. जो तें परब्रह्म जाणत नाहीं त्याला ऋचा काय उपयोगी पडणार आहेत ? जे तें परब्रह्म जाणतात ते मात्र तत्स्वरूपाप्रत जातात.

**उत त्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणोत्येनाम् । उतो त्वस्मै तन्वं ? विसस्त्रे—**

**अर्थ**—"जो पुरुष वेद पाठ मात्र करतो, परंतु त्याचा अर्थ समजत नाहीं तो वेदवाणी पहात असूनही पहात नाहीं.* ज्यास अर्थज्ञान नाहीं तो वेद ऐकत असूनही ऐकत नाहीं. ज्यास अर्थज्ञान आहे त्यासच श्रुति आपली सर्व तनु अर्थात् रहस्य प्रकाशित करिते." ज्ञानाशिवाय केलेल्या पाठांतराच्या मदतीनें मोक्षाचा व धर्माचा मार्ग दाखविणारे वैदिक व त्यांच्यावर भरंवसा ठेवून कर्मावडंबरांत गुरफटून जाणारे अज्ञजन या उभयतांची स्थिति सारखीच शोचनीय होय. उपनिषत्कालीं उपनयनाची जी पद्धति होती ती बदलून स्मृति व पुराणकालीं उपनयन व अध्ययन यांचे प्रकार बदलले. प्रत्येक वर्णाचा दर्जा व अधिकार यांसंबंधानें स्मृतिकारांनीं निर्बंध ठरविले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे जे मुख्य चार भेद यांच्यापैकीं पहिल्या तीन वर्णांस उपनयनाचा संस्कार अवश्य आहे असें ठरविण्यांत आलें. शूद्र व स्त्रिया यांस उपनयनाचा अधिकार नाहीं असेंही ठरलें; कारण स्त्रिया शूद्रवत् मानाव्या असें स्मृतिकारांनीं मत दिलें. आचार्यगृहीं ब्रह्मचर्यानें राहून अध्ययन करण्याची चाल स्मृतिकालीं होती असें दिसतें; कारण स्मृतींतील अनुज्ञांवरून त्यासंबंधाचा तर्क करितां येतो. परंतु ह्या प्राचीन पद्धतीचा हळूहळू लोप होत गेला व घरींच उपनयन करून पिता किंवा दुसरा जवळचा नातेवाईक मंत्रोपदेशापुरता गुरु करण्याची रूढि पडली. सध्यां पुरुषांच्या बाबींत ब्रह्मचर्य, गुरुगृहीं वास, वेदाध्ययन वगैरे सर्व लुप्त झालें असून मुलाची मुंज होतांच त्याचा विवाह करण्यासंबंधानें अनेक कुटुंबांत तयारी चाललेली

* वेदवाणी पाहणें याचा अर्थ वेदांचीं लिहिलेलीं सूक्तें पाहाणें असा केल्यास, वेद कालीं लिपि होती हें सिद्ध होतें.

दिसते. आज उपनयन, उद्यां समावर्तन, काशीयात्रेस जाण्याचा नाटकी थाट, काशी यात्रेस जाण्याचें मिष करून निघालेल्या आठ दहा वर्षें वयाच्या बटूस मुलगी देऊन गृहस्थाश्रमी बनविण्याचा विचार प्रगट करून त्यास परतविण्याचा तमाशा, भिक्षावळीचा कर, ब्रह्मचर्याची दीक्षा देण्यासाठीं उभारलेल्या मंडपांत प्रदीप्त केलेल्या अग्निनारायणापुढें नृत्यांगनांचा नाच, थाटमाटाचे भोजनसमारंभ वगैरे पाहतां आम्ही उपनयनाचें खरें महत्त्व विसरून गेलों आहों असें सिद्ध होतें. ऋषींच्या वंशजांनो, द्विजांनों, ब्राह्मण क्षत्रिय वैश्यांनों ! तुम्ही असा प्रकार किती दिवस चालू ठेवणार ? सदभिमानपूर्वक सध्यांची स्थिति सुधारणें तुमचें कर्तव्यकर्म नव्हे काय ?

## उत्सर्जन व उपाकर्म.

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, प्राचीनकालीं उपनयनाचा संस्कार हा विद्याभ्यासाचा आरंभ असे; परंतु वर्षभर अध्ययन चालत नसे. प्रत्येक महिन्यांत अनध्ययनाच्या ( सुटीच्या ) कांहीं तिथि असत. खरा अध्ययनाचा काल म्हणजे पावसाळा संपल्यावर आहे असें मानून श्रावण शुद्ध पंचमीस किंवा पौर्णिमेस वेदाध्ययनास प्रारंभ करीत. प्रारंभ करण्यापूर्वी जो होम पेटवून विधि केला जात असे, तोच उपाकर्मविधि होय. श्रावणापासून पुढें थंडीचे दिवस प्राप्त होत तोंपर्यंत अध्ययन चाले व माघमासीं त्या सालचें अध्ययन संपविल्याचें दर्शक ह्मणून जो पुनः होम पेटवून विधि केला जात असे, त्याला उत्सर्जन हें नांव आहे. याप्रमाणें वर्षाचे फक्त ६।७ महिने अध्ययन चाले. बाकी पांच सहा महिने विद्यार्थी अध्ययन केलेल्या विषयांचें मनन करण्यांत व इतर सामान्य विषयांचें ज्ञान करून घेण्यांत घालवीत. त्या कालीं चवदा विद्या व चौसष्ट कला यांचें ज्ञान प्रत्येकास असणें अवश्य आहे असें मानीत. मृच्छकटिक नाटकाच्या उपोद्घातांत शूद्रक राजासंबंधानें असें लिहिलें आहे कीं, तो ऋग्वेद, सामवेद, गणित, चौसष्ट कला आणि हस्तिशिक्षणविद्या यांत निष्णात होता. या राजासंबंधानें स्कंदपुराणांतही गोष्ट सांगितली आहे. श्रीकृष्ण व श्रीराम वेदविद्येंत व तत्त्वज्ञानांत जितके पारंगत होते तितकेच ते युद्धकलेंत व राजधर्मांतही वाकबगार होते. त्यांचें शिक्षण आचार्यांच्या आश्रमींच पुरें झालें. हे आश्रम हल्लीं पृथ्वीच्या पाठीवरील सुधारलेल्या राष्ट्रांतील 'बोर्डिंग स्कूल' प्रमाणें असून ऋषि हेच 'प्रोफेसर' असत. या विद्यालयांतून बाहेर पडणारे विद्यार्थी तेजःपुंज, स्वावलंबी सदाचरणी, धीरोदात्त व प्रेमळ असून वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध लोकांबद्दल व आपल्या

परमपूज्य गुरूंबद्दल त्यांच्या अंतःकरणांत पूज्यत्वबुद्धि असे. सध्यां आर्यसमाज पंथीयांनीं प्राचीन पद्धतीवर गुरुकुल ही संस्था स्थापन करून उत्तम नागरिक तयार करण्याचा उपक्रम चालविला आहे. कविवर्य डॉ० रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनांत अनेक आर्यपुत्र ज्ञान संपादन करीत आहेत, व त्यांचें विश्व भारती नांवाचें सर्व जगाला वंद्य होईल असें विश्वविद्यालय या देशाची कीर्ति सर्वतोमुखीं होण्यास कारणीभूत होईल यांत संदेह नाहीं. श्रावणी म्हणजे उत्सर्जन व उपाकर्म यांसंबंधाचें धार्मिक कृत्य असून आजकाल श्रावणी ह्मणजे यज्ञोपवीत-धारणविधि अशी जी सार्वत्रिक समजूत आहे, ती चुकीची होय हें वर आलेंच आहे. उपनयनानंतर समावर्तन होईपर्यंत आचार्यांच्या आश्रमीं अध्ययन नियमितपणें चाले. तेव्हां उत्सर्जन व उपाकर्म हे विधि अध्ययनासंबंधींच असल्यामुळें समावर्तन झालें आहे अशा विद्यार्थ्यांनीं व विवाह होऊन जे गृहस्थाश्रमांत दाखल झाले अशांनीं हे विधि दरसाल उरकणें योग्य आहे किंवा कसें हा प्रश्न आहे. कारण ज्यांचें वेदाध्ययन बंद पडलें किंवा जे वेदाध्ययन करीत नाहींत अशांनीं हे विधि दरसाल करणें सयुक्तिक दिसत नाहीं. द्विजहो, तुम्ही उपनयन व समावर्तन यांच्यासंबंधीं अध्ययन, ब्रह्मयज्ञ, गुरुगृहीं वास वगैरे गोष्टी तुमच्या उपनिषत्कालीन पूर्वजांप्रमाणें करतां काय? सध्यां श्रावणीच्या दिवशीं उत्सर्जन व उपाकर्म हीं बसल्या बैठकीस करतां हें योग्य आहे काय? तुमचे वैदिक या दिवशीं जो श्रुतिस्मृति-शास्त्रपुराणोक्त विधि ह्मणून तुमच्या हस्तें करवितात, त्यांतील मर्म व त्यांनीं पोथीवरून वाचून सांगितलेल्या वाक्यांचा अर्थ त्यांना किंवा तुह्माला समजतो काय? श्रावणीचें मुख्य अंग ह्मटलें ह्मणजे यज्ञोपवीतधारण आहे असें जें तुम्ही समजतां हें चुकीचें आहे असें तुह्मांस वाटत नाहीं काय? बरें, यज्ञोपवीतास साजेल असें तरी तुमचें वर्तन आहे काय?

## यज्ञोपवीत घालण्याची रूढी

आर्यांतील उच्च वर्णांत आहे. ही रूढी प्रथमतः यज्ञयागादिकांचा विधि याज्ञिकांनीं ठरविला त्या कालीं ह्मणजे ब्राह्मणें व उपनिषदें अस्तित्वांत आलीं तेव्हांच प्रचारांत आली. शतपथब्राह्मणांत असें सांगितलें आहे कीं जेव्हां सर्व मनुष्यें प्रजापतीसमोर आलीं, तेव्हां देव व पितरें यांनीं यज्ञोपवीत घातलें होतें. कौशितकी हा त्रिकाल सूर्याची प्रार्थना करीत असे व प्रभातकालीं उपासनेच्या वेळीं यज्ञोपवीत धारण करीत असे असें कौशितकी उपनिषदांत सांगितलें आहे.

अर्थात् तो सूर्योपासनेला यज्ञाप्रमाणें मनीत असे. अजून गायत्रीचा जप* करण्याच्या वेळीं यज्ञोपवीत हातांत धरण्याची जी पद्धत आहे, ती कौशितकीच्या सूर्योपासनेच्या पद्धतीस जुळते. महाशिवरात्री या सणाविषयीं केलेल्या विवेचनांत व्याधरूपी रुद्र व मृगरूपी प्रजापति यांचें वर्णन आलें आहे. या प्रजापतीला विश्वकर्मा, ब्रह्मणस्पति, ब्रह्मा अशीं निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं आहेत. प्रजापतीनें यज्ञाच्याद्वारें किंवा आत्मयज्ञ करून जग निर्माण केलें असें हिंदुधर्माचें मत आहे; ब्रह्मा किंवा प्रजापति स्वतःच्या दुहितेवर आसक्त झाला ही नीच वृत्ति रुद्रास पसंत न पडतां त्यानें व्याधाचें रूप धारण करून मृगरूप धारण केलेल्या प्रजापतीस शासन केलें अशी कथा ऋषींनीं निवेदन केली असून या कथानकाचें दृश्य नभोमंडळांत अद्यापि पाहण्यास सांपडतें. आर्द्रानक्षत्राचा स्वामी रुद्र मृगव्याध ( हें एक नक्षत्र आहे ) होऊन मृगवेष धारण केलेल्या प्रजापतीचा म्हणजे मृगशीर्ष नक्षत्राचा पाठलाग करीत आहे, प्रजापतीच्या समोर त्याची दुहिता रोहिणी अत्यंत लावण्ययुक्त होत्साती प्रकाशत आहे असा देखावा नभोमंडळांत पाहिल्यावर प्राचीन ऋषींच्या कल्पना कशा उच्च भराऱ्या मारीत होत्या हें लक्षांत येईल. कालांतरानें ही कथा रूपांतर पावली. प्रजापति हा वेदांत्यानीं ब्रह्म

---

* गायत्रीमंत्र या अत्यंत पवित्र व श्रेष्ठ मानला जातो. छांदोग्योपनिषदांत असें सांगितलें आहे कीं,

**गायत्री वा इद ँ सर्वं भूतं यदिदं किं च वाग्वै**
**गायत्री वाग्वा इद ँ सर्वं भूतं गायति च त्रायते च**

"गायत्री ही सर्व प्राणिजात किंवा स्थावरजंगमादि जात आहे. गायत्री ह्मणजे वाणी होय. या सर्व प्राणिजाताला वाणीच शब्द करण्यास लावते व सर्वांचें रक्षण करते." पुढें एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, "पुरुष हाच यज्ञ होय. त्याचीं जीं चोवीस वर्षें तें प्रातःस्तवन. गायत्रीचीं चोवीस अक्षरें असतात आणि प्रातःस्तवन गायत्रीमंत्रानें करतात. बृहदारण्यकोपनिषदांत पुढील मजकूर आहे—"गायत्री अध्यात्मरूपी प्राणाचे ठिकाणीं स्थित आहे. प्राण ही गाय, तिनें इंद्रियांचें रक्षण केलें ह्मणून गायत्री. आचार्य जेव्हां या सवितृ देवतात्मक गायत्रीचा उपदेश करतो तेव्हां तो त्याच्या प्राणाचें रक्षण करतो. अग्नि हेंच गायत्रीचें मुख. ज्याप्रमाणें अग्नीमध्यें पुष्कळ टाकिलें असतां तें सर्व दहन होतें त्याप्रमाणें गायत्रीविदानें पातकाचा नाश होऊन ( मनुष्य ) पुनीत, जरारहित व मृत्युरहित होतो."

किंवा जगाचें आदिकारण आहे असें ठरविलें. त्यापासून उत्पन्न झालेली माया हीच त्याची दुहिता. या मायेच्या द्वारें त्यानें जग उत्पन्न केल्यामुळें तिला पत्नीत्व प्राप्त झालें. असो. जगदारंभीं यज्ञ करणाऱ्या प्रजापतीनें यज्ञसमयीं ज्या प्रकारें उपवीतादिक धारण केलीं त्याच प्रकारें यज्ञास प्रवृत्त होणाऱ्या द्विजानें तीं धारण करण्याची पद्धति शास्त्रकारांनीं रूढ केली असावी असें कै. बाळ गंगाधर टिळक यांचें मत आहे. आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ त्यानीं पुढील प्रकारें मजकूर आपल्या ओरायन ( Orion) नामक ग्रंथांत प्रसिद्ध केला आहे. बौधायनाच्या ब्रह्मोपनिषदांत पुढील मंत्र सांपडतो.

**यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्**

म्हणजे यज्ञोपवीत हें परमपवित्र असून तें प्राचीन प्रजापतीबरोबरच किंवा त्याचें अंगभूत होऊनच निर्माण झालें. हा मंत्र यज्ञोपवीत धारण करते वेळीं म्हणतात. हें उपवीत म्हटलें म्हणजे मृगरूपी प्रजापतीचा कमरपट्टा होय. प्राचीन कालीं यज्ञसमयीं लहान वस्त्र किंवा मृगचर्माचा तुकडा उपवीतादाखल वापरण्याची चाल होती. खरें पाहिलें असतां प्रजापतीप्रमाणें सर्वांग मृगचर्मानें झांकणें योग्य होतें. तथापि सबंध मृगचर्माचें काम एका लहान तुकड्यावर भागविण्यांत आलें. सध्यां अशा प्रकारचा एक तुकडा उपनयनाच्या वेळीं बटूच्या जानव्यास टांगलेला आपण पाहतों. त्याचप्रमाणें मृगरूपी प्रजापतीच्या शिरावर दिसणाऱ्या बाणांतील तीन नक्षत्रें बटूच्या कमरेंतील दर्भाच्या मुंजींतील तीन ग्रंथी होत. यांपैकीं एक ग्रंथी सोमाप्रीत्यर्थ असते. यज्ञास जातेवेळीं पलाशाची काठी किंवा दंड हातांत धरण्याची चाल होती. अर्थात् प्रजापतीनेंही असा दंड धरला असावा. ही चाल उपनयनाच्या वेळीं दृष्टीस पडते. याप्रमाणें मेखला ( मुंज ) अजिन ( मृगचर्म ) व दंड हीं प्रजापतीप्रमाणेंच बटूस धारण करावीं लागतात. यज्ञ याचें प्राकृत रूप जन्नो हें आहे. यावरून जानवें हा शब्द निघाला. या जानव्यानें यज्ञोपवीताची जागा पटकावली व तें कमरेवरून भुजावर चढलें. हा कालांतरानें घडलेला फरक आहे. मूलतः यज्ञोपवीत म्हणजे हल्लींचें जानवें नव्हतें असें प्राचीन लेखांवरून दिसतें. तरी सर्व द्विजांना द्विजत्वाची खूण होऊन राहिलेलें हें जानवें अस्तित्वांत येण्यास अत्यंत प्राचीन कालची प्रजापतीची गोष्ट कारणीभूत झाली आहे हें आपण विसरतां नये. या दृष्टीनें पाहतां आमच्या संस्कारांचा व सणांचा संबंध वेदकालाशीं कसा पोहोंचतो हें दिसून येईल.

हल्लींची स्थिति लक्षांत घेतां यज्ञोपवीतासंबधी धर्मकृत्यें मागें पडलीं तरी त्याचें महत्व मात्र सर्वांस वाटूं लागलें असून ज्यांस यज्ञोपवीत घालण्याचा अधिकार नाहीं असें शास्त्रकारांनीं ठरविलें किंवा रूढिपरत्वें या बाबीकडे ज्यांनीं द्विज असूनही पिढयान् पिढया लक्ष दिलें नाहीं ते सर्व मौंजीबंधनादि संस्कार आपल्या ज्ञातींत चालू करण्यास उद्युक्त झाले आहेत. ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाल्यापासून धर्मस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा बावटा या देशांत रोविला गेला. याचा परिणाम असा झाला आहे कीं प्रत्येक जात आपल्या स्थितीचा विचार करून आपली योग्यता अनेक उपायांनीं वाढविण्याच्या प्रयत्नास लागली आहे. धर्माच्या बाबींत ब्राह्मणांचा कित्ता पुढें ठेवून त्यांच्या बऱ्यावाईट रूढि ते आपल्यांत प्रचलित करूं पाहत आहेत. प्रत्येक वर्षी कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत ज्या हजारों ज्ञातिपरिषदा भरतात, त्यांनीं पसार केलेल्या ठरावांकडे पाहिलें म्हणजे या ज्ञातींचें अंतिम ध्येय स्वतःची योग्यता वाढवून घेणें हेंच आहे असें दिसतें. जवळच्या वरच्या वर्णांत ( किंवा जातींत ) त्याच्या खालच्या वर्णांतील लोक आपला समावेश करून घेण्याचा यत्न करीत आहेत. कित्येक आपणास ब्राह्मण तर कित्येक क्षत्रिय आणि कित्येक वैश्य म्हणवून घेण्यांत आपण धर्माच्या बाबींत यश मिळविलें असें समजत असून उच्चवर्णीय पुराणमतवादी लोक अशा प्रकारचा खालच्या वर्णांचा खटाटोप कलियुगास साजेसा असून त्यामुळें जगप्रलय लवकर प्राप्त होईल असें अंतःकरणपूर्वक समजतात. जिनगरांसारख्या अस्पृश्य मानलेल्या लोकांनीं जानवें चढवून ब्राह्मणांची बरोबरी करण्याचा यत्न चालविल्यास आज बरींच वर्षें झालीं. त्याचप्रमाणें इतर कित्येक शूद्र मानलेल्या जाती राजरोसपणें जानवें चढवूं लागल्या आहेत. उलट पक्षीं जे ब्राह्मणवर्णांतच जन्मास आले त्यांच्यांत शिक्षण मिळविलेले लोक जातिभेदास महत्व न देतां अनेकजण तो मोडण्याच्या मार्गास लागले आहेत. महार व इतर सुमारें पांच कोटी अस्पृश्य मानलेल्या लोकांस देखील वर उचलून सामाजिक बाबींत न्याय व समता यांचा उपभोग घेण्याची त्यांच्या अंगीं पात्रता आणावी म्हणून यत्न करीत आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खालच्या वर्णांतील सुशिक्षित लोक उच्च वर्णांत समावेश करून घेण्याचा व सुशिक्षित असे श्रेष्ठ वर्णांतील लोक सर्व वर्णांस एकाच पायरीवर आणण्याचा यत्न करीत आहेत. दुःखाची गोष्ट ही कीं कमी मानलेल्या जाती उच्च मानलेल्या जातींत आपली गणना व्हावी एतदर्थ खटपट करितात; परंतु आपणापेक्षां नीच मानलेल्या जातींना आपणांत सामील करून घेण्यास किंवा आपल्या बरोबरीच्या मानण्यास त्या बिलकुल तयार नसतात.

## हेतु व बोध.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ साधण्यासाठीं प्राचीनकालीं समाजानें त्या वेळच्या परिस्थित्यनुरूप आचारासंबंधी नियम ठरविलेले होते, त्रिकालाबाधित असे नियम ठरविणें शक्य नाहीं. मनुष्याच्या अनुभवांत भर पडत जाईल त्याप्रमाणें समाजाचे विचार बदलत जाऊन नवीन परिस्थितीस योग्य असे सामाजिक नियम ठरविले जातात. अशा रीतीनें कालमानाप्रमाणें वर्तनक्रमांत योग्य तो फेरबदल होत जाणें हें समाजाच्या जिवंतपणाचें व प्रगतीचें लक्षण आहे. आपल्या देशांत वेदकालापासून आजपर्यंत किती तरी घडामोडी झाल्या. राजकीय व इतर प्रकारचें स्थित्यंतर झाल्यामुळें लोकांच्या आचारविचारांत क्रांति घडून आली. तथापि पुराणप्रियतेचा गुण आम्हां हिंदूंत विशेष बलवत्तर असल्याकारणानें आम्ही कित्येक अत्यंत प्राचीन चालींस मिठी मारून बसलों आहों. सध्यांच्या परिस्थितीचा व जीवनार्थकलहाचा विचार करून आमचे आचार ज्या ज्या ठिकाणीं बदलणें आवश्यक असेल, तेथें तेथें ते बदलण्यास आपण तयार झालें पाहिजे. परंपरागत रूढींत काय रहस्य आहे, त्यांत ग्राह्यभाग कितपत आहे वगैरे पाहून शिंपा टाकून मोतीं घेण्याचा उपक्रम केल्याशिवाय आपली उन्नति होणार नाहीं. श्रावणीचा दिवस प्राप्त होतांच आमच्या उपनयनसंस्काराची, जुन्या ऋषींची, प्राचीन आश्रमांची वगैरे सहजच आम्हांस आठवण होते. अशा वेळीं आमचें पाऊल योग्य मार्गी आहे किंवा कसें, याचा विचार करून, तसें तें नसल्यास, सदभिमानपूर्वक खरा मार्ग आमच्या स्वतःसाठीं व पुढील पिढीसाठींही आंखून तयार करण्यास आम्हीं निर्धारानें पुढें सरसावलें पाहिजे. चालू परिस्थितींत वेदाध्ययनावर अवलंबून राहणें शक्य नाहीं; परंतु वेद म्हणजे ज्ञान या अर्थानें प्राप्तकालानुसार जें ज्ञान आपण संपादन करतों, तें उत्साहानें ब्रह्मचर्यांत राहून करण्यास कोणती हरकत आहे ? तसेंच मातापितरें, शाळा व महाविद्यालयें यांतील गुरुजन व समाजधुरीण यांनीं वर दिलेला उपनिषदांतील अमूल्य उपदेश भावी पिढीच्या हृत्पटलावर ठसविण्यास कां यत्न करूं नये ? कोणत्याही स्थितींत ज्ञानवृद्धि करण्याची आवड भावी पिढीच्या अंतःकरणांत उत्पन्न करून देणें यासारखें पुण्यकार्य दुसरें नाहीं. वडिलजन, गुरु, समाजांतील पुढारी या सर्वांनीं या कार्याचें महत्व जाणून त्याला शक्त्यनुसार हातभार लावावा. आम्ही तर असें समजतों कीं श्रावणी हें अध्ययनासंबंधी ज्ञाननिष्ठ जनांचें एक संमेलन आहे. सर्व

विद्वानांनीं व ज्ञानार्जनाची लालसा असणाऱ्या तरुणांनीं या दिवशीं एकत्र जमून ज्ञानर्जनासंबंधाची आपली कळकळ व्यक्त करावी; लहानांनीं मोठ्यांबद्दल आदर व्यक्त करावा व ज्ञानतप करणारांची खूण ( Badge ) ह्मणून यज्ञोपवीत धारण करून त्यास साजेल अशाच रीतीनें वागण्याचा निश्चय करावा. यज्ञोपवीत घालणारांनीं विद्या, कला, ज्ञान व धर्म यांच्या बाबींत श्रेष्ठत्व संपादन करून आपणाहून खालच्या पायरीवर असणारांस वर आणण्याचा यत्न केला पाहिजे. निरक्षर व अज्ञानी अशांनीं केवळ ब्राह्मणकुलांत जन्माला आल्यामुळेंच आपणास ब्राह्मणत्व प्राप्त झालें असें मानणें कदापि योग्य नाहीं. यासाठीं ज्यांस यज्ञोपवीत घालणें अगत्याचें आहे असें वाटतें, त्यांनीं ते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र असोत आपली योग्यता वाढवून हें उपवीत धारण करण्यास आपण पात्र आहों हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे; मग उपवीताच्या अधिकारासंबंधाचा तंटाच राहाणार नाहीं.

——:०:——

## पोवती पौर्णिमा

प्रत्येक श्रावण पौर्णिमेस पोवती धारण करण्याची चाल हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागांत दृष्टीस पडते. धर्मशास्त्रांत या विधीस पवित्रारोपण असें नांव दिलें आहे. या पोवत्याची लांबी व त्याला असावयांच्या ग्रंथी शास्त्रकारांनीं ठरविल्या असून हल्लीं हीं तयार करणारा जो ज्योतिषी व भटजींचा वर्ग आहे, त्यास ह्या दिवशीं किंचित् महत्व प्राप्त होतें. पोवत्यांत उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन वर्ग असून त्यांच्यासंबंधाची धर्मग्रंथांत उपलब्ध असलेली माहिती पुढीलप्रमाणें आहे. कापसाच्या सुताची नवसुती करून तिचें एकशें आठ फेऱ्यांचे व मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत पोहोंचेल इतकेंच लांब व चोवीस ग्रंथींनीं युक्त असें पोवतें उत्तम समजावयाचें. ५४ फेऱ्यांचें मांडीपर्यंत बारा ग्रंथींनीं युक्त तें मध्यम आणि २७ फेऱ्यांचें असून नाभीपर्यंत लोंबणारें ८ ग्रंथींचें पोवतें कनिष्ठ होय. याप्रमाणें पोवतें तयार केल्यावर नवसुतीचे १२० किंवा ७० फेरे घेऊन पायांपर्यंत लोंबणारी १०८ किंवा २४ ग्रंथींची वनमाला करावी. मग नवसुतीचें १२ फेऱ्याचें १२ ग्रंथींचें असें गंधपवित्र करावें. नवसुतीचें २७ फेऱ्यांचें गुरुपवित्र करून तीन सुतीनें अंगदेवतांचीं पोवतीं करावी. शिवलिंगाच्या आकारानुरूप

शिवाचीं पोवतीं करावीं. त्यानंतर पंचगव्यानें प्रोक्षण करून तीं शुद्ध केल्यावर त्यांवर १०८ वेळां अभिमंत्रण करावें. पोवत्यांच्या ग्रंथींस कुंकुम लावल्यावर तीं वेळूच्या पात्रांत ठेवावीं व देव्हाऱ्यापुढें तीं मांडून 'सर्व प्रकारच्या विघ्नांचा परिहार व क्रियालोप झाल्याबद्दल क्षमा कर 'अशी देवापाशीं प्रार्थना करावी, त्यानंतर त्या पोवत्यांच्या ठायीं ॐकार, सोम, वन्हि, नागेश, सूर्य, शिव, विश्वेदेव, ब्रह्मा, विष्णु, शिव वगैरे अनेक देवतांचें आवाहन करून तीं देवास अर्पण करावीं. धूप, दीप, नैवेद्यादिक उपचारांनीं देवाची व पोवत्यांची पूजा केल्यानंतर गुरूची पूजा करून त्यांस पोवतें द्यावें व कुटुंबांतील सर्व स्त्रीपुरुषांनीं पोवतीं हातांत बांधावीं. ब्राह्मणासह मिष्टान्न भोजन करावें. श्रावण शुद्ध अष्टमी व चतुर्दशी या पोवतीं धारण करण्याच्या तिथी आहेत. तथापि शास्त्रोक्तरीत्या हा विधि करण्यांत येत नसल्यामुळें पौर्णिमेसच तो उरकण्यांत येतो. पवित्रारोपण नित्यशः करावें असें शास्त्रांत सांगितलें आहे; परंतु सध्यां तसें कोणी करीत नाहीं.

उत्तरेकडे या विधीस रक्षाबंधन असें नांव आहे, ह्मणूनच या पौर्णिमेला राखी पुनम असें तेथील लोक ह्मणतात. रजपूत लोकांतही रक्षाबंधनाची चाल आहे. पूर्वकालीं या दिवशीं श्रावणी नांवाचा नागाप्रीत्यर्थ पाकयज्ञ केला जात असे. नागापासून इजा पोहोंचू नये ह्मणूनच हा यज्ञ करीत असत. त्याचेंच रूपांतर होऊन रक्षाबंधनाचा विधि प्रचारांत आला असावा; कारण विशेषतः नागासारख्या विषारी प्राण्याच्या दंशापासून अपमृत्यु प्राप्त होऊं नये ह्मणून रक्षाबंधन करीत असतात, व बहीण बहुधा भावाच्या हातांत रक्षा बांधीत असते. शत्रूच्या कंपूंत बिनदिक्कत जाऊन या दिवशीं रजपूत स्त्रिया आपल्या पतीशीं युद्ध करणाऱ्या शत्रूच्या हातांत रक्षा बांधीत असत. त्यामुळें द्वेषभाव विरघळून जाऊन उभय पक्षांत सलोखा होत असे असें सांगतात. ज्याप्रमाणें परस्परप्रेम व मैत्री वाढविण्यासाठीं तीळगूळ वांटण्याचा संप्रदाय रूढ आहे, त्याचप्रमाणें हा रक्षाबंधनाचा विधि समाजांतील ऐक्य व प्रेमभाव वाढविण्यासाठीं युद्धकुशल अशा रजपूत लोकांत रूढ झाला असावा.

## हेतु व बोध

श्राद्ध किंवा इतर धार्मिक कृत्य करीत असतां भटजी आपल्या करांगुलीजवळच्या बोटास दर्भाचें वेष्टन चढवीत असतात. याला पवित्र असें नांव आहे. पवित्रारोपण केल्याशिवाय शुभाशुभ कृत्यास प्रारंभ करितां येत नाहीं. याचा

अर्थ काय ? देव किंवा पितर यांच्या सान्निध्यांत असल्याची जेव्हां आपण कल्पना करितों, तेव्हां अंगीं पावित्र्याचें अधिष्ठान करणें आवश्यक आहे. अर्थात् देव व देवाप्रमाणें पूज्य असणाऱ्या पितरांकडे संबंध ठेवण्याची पात्रता आपल्या अंगीं येण्यास पावित्र्याची गरज आहे. दर्भाचें वेष्टन किंवा सुताचा धागा ह्या पाविञ्याच्या खुणा मानिल्या आहेत; जशा त्या ' पवित्र ' होऊं शकत नाहींत, तसें त्यांच्यायोगानें अंगीं पाविञ्याचा प्रादुर्भाव होणें शक्य नाहीं. मूर्ति या कांहीं देव नव्हत, परंतु देवाचें सान्निध्य मूर्तरूपानें नेत्रांत प्रस्थापित करण्यास मूर्ति साधनीभूत होतात, तद्वत पोवतें हेंच कांहीं पाविञ्य अंगीं आणणारा ताईत नसला तरी त्याच्यामुळें पाविञ्य राखण्याबद्दलचें महत्व आमच्या मनांत बिंबतें व बिंबलें पाहिजे. एका श्रावण पौर्णिमेसच हें ' पवित्र ' धारण करण्याचें नसून प्रत्येक दिवशीं त्याचें धारण केलें पाहिजे. मग आम्हांला कधींही कोणाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. काया, वाचा व मन यांस सदोदित पावित्र्याच्या सत्तेखालीं ठेविलें पाहिजे. अपवित्र आचरणामुळें देवानें दिलेली कायानौका भंग पावते. आपल्या देशाकरितां, आपल्या धर्माकरितां, आपल्या देहाकरितां आणि आपल्या मनाकरितां, इहलोकाकरितां आणि परलोकाकरितां आपण पूर्ण पवित्र राहिलें पाहिजे. पावित्र्यावांचून ऐक्य नाहीं व पाविञ्यावांचून शांति नाहीं. आम्ही हिंदूलोक असें समजतों कीं आपली उत्पत्ति परब्रह्मापासून झाली. मग ती मुखावाटे झालेली असो किंवा पायांपासून झालेली असो. परमेश्वराचें मुख जितकें पवित्र तितकेच पायही पवित्र होत. मग आम्ही सर्वजण जर ईश्वरभूत आहों, त्याच्याच विराटदेहाचे अंश आहों तर त्याच्याप्रमाणें पवित्र रहाणें आपलें कर्तव्यकर्म नव्हे काय ? आपण अनीतीच्या मार्गानें जाऊन दुःस्थिति प्राप्त होतांच ती सुधारण्याबद्दल देवाची विनवणी करण्यांत किंवा त्याला 'देवा, तूं अमुक कर' असें नित्यशः रडगाणें गाण्यांत अर्थ नाहीं. त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून सत्कार्यांत निष्कामबुद्धीनें सदोदित चूर असणें हा एकच मार्ग आम्हां आर्य म्हणविणारांस उचित आहे. क्षणभंगुर सुखासाठीं किंवा जीवितासाठीं व्यवहारांत अपवित्रतारूपी पिशाचाचें मित्रत्व संपादन करणें यासारखें घातकी कृत्य दुसरें नाहीं. त्याच्या योगानें हृदय विदीर्ण करणाऱ्या वेदना, अस्वास्थ्य व अधोगति प्राप्त होऊन आपण आर्यत्वास मुकल्यावांचून रहाणार नाहीं. प्रेमाच्या नांवाखालीं कामवासनेला जवळ करणें, अनेक विषयांच्या लालसेमुळें आपल्या सौख्यांत भर पडेल असें मानून परापहार करण्यास उद्युक्त होणें,

यासारखीं कृत्यें आपल्या हातून कधींही घडूं नयेत म्हणून ज्या ईश्वरापासून आपण उत्पन्न झालों, त्याच्याच कृपाप्रसादाचा लाभ करून घेण्यासाठीं पावित्र्याच्या योगानें वज्रदेही बनण्याची तयारी प्रत्येकानें चालविली पाहिजे. कृत्रिम उपायांनीं पावित्र्य अंगीं येणें शक्य नाहीं. ही पावित्र्याची अभेद्य ढाल ज्याच्यापाशीं आहे तो जीवनकलहांत अजिंक्य होईल हें निःसंदेह होय.

---

## नारळी पौर्णिमा.

प्रत्येक श्रावण पौर्णिमेस वरुणदेवतेप्रीत्यर्थ समुद्राची पूजा करून त्यास नारळ अर्पण करावा असें शास्त्रांत सांगितलें आहे. यावरून या दिवसास नारळी पौर्णिमा हें नांव प्राप्त झालें. हिंदुस्थानच्या पूर्व पश्चिम किनाऱ्यांवर असणारे हिंदूलोक विशेषतः व्यापार करणारे या सणाचें विशेष महत्व मानतात. मुंबईसारख्या व्यापाराच्या बाबतींत अत्यंत श्रेष्ठ दर्जास पोहोंचलेल्या शहरीं हिंदूंप्रमाणें इतर धर्मीय व्यापारी देखील हा दिवस महत्वाचा मानून मोठ्या समारंभानें व उत्साहानें समुद्रदर्शनास जाऊन त्याला नारळ अर्पीत असतात. हा विधि केल्याच्या योगानें समुद्रावर सत्ता गाजविणारा वरुण देव ( Uranus ) तृप्त होऊन मालाची ने-आण करणाऱ्या जहाजांस इजा पोहोंचवीत नाहीं अशी सार्वत्रिक समजूत आहे. पावसाळ्याचा भर ज्येष्ठ आषाढ महिन्यांत विशेष असतो. त्या वेळीं गलबतें चालत नसतात; श्रावण पौर्णिमेपासून जलमार्गानें व्यापाराची सुरवात होते. त्या सुमारास वादळाची भीति कमी होते व समुद्रकांठचे व्यापारी आपल्या आयात-निर्गत व्यापाराचें धोरण याच वेळीं ठरवीत असतात. अडतीचा धंदा करणारे सावकार आषाढ व० ३० स आपलें व्यापारी वर्ष संपवून गतसालचा खातेउतारा आपल्या कुळांकडे पाठवीत असतात. या सणावरून हिंदूंच्या व्यापारविषयक उद्योगधंद्याची आठवण होते.

## जलमार्गानें प्रवास व व्यापार

करणें ही गोष्ट पूर्वकालापासून हिंदुस्थानांत रूढ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अत्यंत प्राचीनकालीं ज्या वेळीं आर्यवसाहतवाले अनार्यांशीं युद्ध करण्यांत गुंतलेले होते त्या वेळीं देखील त्यांनीं जलमार्गानें प्रवास केल्याबद्दलचा उल्लेख ऋग्वेदांत सांपडतो. समुद्रावर सत्ता चालविणाऱ्या देवास ‘ भगो वरुणो मित्रः ’

ह्मणजे 'भाग्यदाता लोकमित्र वरुण' असें ह्मटलें आहे. 'संपत्ति मिळविण्याची हांव धरणारे व्यापारी उष्ण निःश्वास टाकणाऱ्या नौकेवर आरूढ होऊन सफर करण्यासाठीं समुद्रमार्ग मोकळा करतात' असा उल्लेख ऋग्वेदाच्या ४ थ्या मंडळांत ५६ व्या सूक्तांत आहे. यावरून सिद्ध होतें कीं त्या कालीं देखील जलमार्गानें व्यापार चालत होता व परदेशाशीं व्यापार केल्याच्या योगानेंच संपत्ति मिळविण्याची इच्छा पूर्ण होते असें लोक मानीत. अश्विन देवतेनें भुज्यूचें रक्षण केलें याबद्दल अश्विनाची स्तुति करतांना एक ऋषि ह्मणतोः–

'हे अश्विनहो, जसा एकादा मृत मनुष्य वैभवाचा त्याग करून जातो, त्याप्रमाणें खरोखर तुम्रानें भूज्यूला उदकाच्या प्रवाहांत टाकून दिलें होतें; परंतु अन्तरिक्षांतून उड्डाण करणाऱ्या व उदकाच्या स्पर्शापासून अलिप्त रहाणाऱ्या अशा नौकेंत बसवून त्यास तुम्ही सुरक्षितपणें घेऊन गेलां. हे सत्यस्वरूप देवहो! तीन दिवस व तीन रात्री याहूनही अधिक वेळेपर्यंत तुम्ही त्यास उदकानें भरलेल्या समुद्राच्या पलीकडे कोरड्या जमिनीवर घेऊन गेलां' ( ऋक् १–११६–३ ). यावरून दिसून येईल कीं अत्यंत वेगानें जाणाऱ्या नौका त्या कालीं तयार होत. तसेंच रात्रंदिवस वायुवेगानें चालणारी नौका सबंध तीन दिवस व तीन रात्री अफाट व खवळलेल्या समुद्रावर .भुज्यूसह चालत होती हें लक्षांत घेण्याजोगें आहे. तीन दिवस व तीन रात्र जो जलप्रवाह करतो तो पतित होतो. असा कायदा स्मृतिकारांनीं मागाहून पसार केला. तो कायदा ऋग्वेदाच्या कालीं असता तर भुज्यूच्या रक्षणाबद्दल अश्विनांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत ऋषिजन गर्क न होतां त्यांनीं भुज्यूला पुनीत करण्यासाठीं प्रायश्चित्तार्थ योजलेल्या यज्ञांतील अग्नीची स्तुति केली असती. असो. वरुणदेवाची सत्ता समुद्रावर आहे असें मानून त्याला 'वेद नावः समुद्रियः ' ह्मणजे समुद्रनिवासी असल्यामुळें तारवांची वाट त्याला माहीत आहे असें ह्मटलें आहे. समुद्रांत नाव लोटण्याचा त्या वेळीं कांहीं तरी विधि करीत असत, हें पुढील ऋचेवरून दिसतें.

उवासोषा उच्छाच्च नु देवी जीरा रथानाम् ।
ये अस्या आचरणेषु दध्रिरे समुद्रे न श्रवस्यवः ( १–४–३ )

अर्थ—'प्रातःकाळ होतांच मार्ग क्रमूं लागण्यासाठीं तयार करून ठेविलेले रथ चालविण्याविषयीं प्रेरणा करणारी उषादेवी पूर्वीं प्रभातकाळ करिती झाली आणि अजूनही करिते. याचप्रमाणें धन मिळवूं इच्छिणारे वाणी लोक समुद्रांत

जाण्याकरितां तयार करून ठेवलेल्या नौकांची प्रेरणा करितात.'—सध्यांची नारळी पौर्णिमा ही या प्राचीन विधीवरून प्रचारांत आली असें ह्मणणें चुकीचें होईल काय?

हिंदुस्थानांत आर्यांनीं प्रवेश केल्यानंतर त्यांचीं कांहीं वर्षें अनार्यांशीं झुंजत स्वतःची सत्ता स्थापन करण्यांत गेलीं. कालेंकरून शांतता नांदूं लागल्यावर कृषि व इतर व्यवसाय फलद्रूप होऊं लागून उद्योगामुळें उत्पन्न झालेला अनेक प्रकारचा माल परदेशांत जाऊन किफायतीच्या भावानें विकण्याची त्यांना आकांक्षा उत्पन्न झाली. याप्रमाणें पूर्व व पश्चिम बाजूस असणाऱ्या अनेक देशांशीं त्यांचा व्यापार सुरू झाला. ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकाच्या सुमारास ग्रीस देशांत पिथेगोरस नांवाचा मोठा तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें हिंदु लोकांच्या तत्त्वज्ञानाचें परिशीलन करून आर्यांचे कित्येक सिद्धांत ग्राह्य आहेत असें आपल्या लेखांत प्रतिपादन केलें. पुनर्जन्म, ब्रह्म, अहिंसा वगैरे विषयांचें ज्ञान त्याला उत्तम झालें होतें. सूत्रांवरून त्याला सिद्धांतशास्त्राचेंही उत्तम ज्ञान झालें होतें. त्याच्या नंतर सुमारें शंभर वर्षांनीं हेरोडोटस या ग्रीक इतिहासकारानें हिंदूसंबंधानें बरीच उपयुक्त माहिती लिहून ठेविली आहे. ह्या इतिहासकारानें हिंदुस्थानच्या भूमीवर कधीं पाय ठेविलेला नाहीं. असें असून या देशांतील लोकांचा मार्मिक इतिहास लिहिण्याचीं साधनें त्याला कोठून उपलब्ध झालीं? ख्रिस्ती शकापूर्वी पांचसहाशें वर्षांपासून ग्रीक देशांत येथील वाङ्मयानें प्रवेश केला; येथून तत्त्वज्ञानासारखे विषय तेथील पंडितांस समजावून देणारे आर्य पंडित त्या देशांत गेल्याशिवाय येथील वाङ्मयाचा प्रवेश तेथें होण्याजोगा नाहीं. यानंतर ख्रिस्ती शकाच्या ४०० वर्षांपूर्वी मॅगेस्थेनीस हा ग्रीक प्रवासी हिंदुस्थानांत आला. तो चंद्रगुप्ताच्या पदरीं ( ख्रि. शकापूर्वी ३१७ ते ३१२ ) होता. त्याच्या वेळीं अर्यांनीं उत्तर व दक्षिण हिंदुस्थान बहुतेक काबीज केलें होतें. मॅगेस्थेनीसनें अनेक प्रसिद्ध शहरांचें, हिंदूंच्या उद्योगाचें, अनेक प्रतापशाली राजांचें वगैरे वर्णन आपल्या लेखांत केलें आहे. त्यांत व्यापारासंबंधानें प्रसिद्धीस आलेल्या बंदरांची जी माहिती दिली आहे तिजवरून आपले लोक नौकांच्या मदतीनें दूरदूरच्या ठिकाणीं येथील उत्तमोत्तम माल विकण्यासाठीं जात असत असें दिसतें.

ताप्रोबेन येथील लोक पूर्वकिनाऱ्यावरील कालिंग देशींच्या राजांस जंगलांतून हत्ती नेऊन विकीत असत, असें इलियन या इतिहासकारानें लिहिलें आहे. याव-

रून हत्तीस नेण्याजोग्या नौका त्या कालीं तयार होत असें दिसतें. हिंदुलोक निरनिराळ्या धंद्यांत कुशल आहेत, असें मॅगेस्थेनीसनें म्हटलें असून हिंदूंच्या कलाकुसरीचीं कामें ख्रिस्तीशकाच्यापूर्वी कित्येक शतकें अरबस्थान, ग्रीस, इजिप्त वगैरे देशांस जाऊन पोहोंचलीं होतीं, असें त्यानें लिहिलें आहे. ख्रि. शकापूर्वी ५० वर्षें सिलोन ( लंका ) बेट मगध देशाच्या विजय नांवाच्या राजपुत्रानें जिंकलें. तेथें हिंदूंची वसाहत देखील झाली होती. या बेटास ग्रीक इतिहासकारांनीं ताप्रोबेन हें नांव दिलें असून तें संस्कृत ताम्रपर्णी किंवा पाली भाषेंतील 'तांबपण्णी' याचा अपभ्रंश आहे. जयधीर या राजानें सिंहलद्वीपास आपला वकील गलबतांतून पाठविला होता, असें राजतरंगिणी या ग्रंथांत लिहिलें आहे. यावरून हिंदुलोक दोन अडीच हजार वर्षांपूर्वीपासून जलमार्गानें प्रवास करीत हें सिद्ध होत नाहीं काय ? दुसरा असाही पुरावा सांपडतो कीं, येथील लोकांनीं कित्येक शतकांमागें अन्यधर्मीय व अन्य भाषा बोलणाऱ्या लोकांच्या देशांत जाऊन तेथें वसाहत देखील केली. सन ४०० वर्षांच्या सुमारास चीन देशांतील बुद्ध भिक्षु फा–हायन हा या देशीं बौद्ध धर्मीय ग्रंथ गोळा करण्यासाठीं आला. सिलोन बेटापर्यंत प्रवास करून तो तेथून कांहीं ग्रंथांसह स्वदेशीं जाण्यासाठीं जहाजांतून निघाला; तेव्हां वाटेंत वादळ झाल्यामुळें जावा बेटांत उतरला. तेथें वसाहत करून राहिलेले अनेक ब्राह्मण त्याच्या दृष्टीस पडले. तेथून कांहीं महिन्यांनंतर चीन देशास जाण्यासाठीं तो जलमार्गानें प्रवास करीत असतां पुनः वादळ होऊन जहाज बुडण्याच्या बेतांत आलें तेव्हां जहाजावरील कांहीं ब्राह्मणांनीं त्या भिक्षूमुळेंच पुनःपुनः प्रवासांत विघ्न उपस्थित होतें असें मानून त्याला मध्येंच कोणत्या तरी बेटावर टाकून जाण्याचा बेत केला, असें फा-हायनानें आपल्या प्रवासवर्णनांत लिहिलें आहे. यावरून दिसतें कीं, त्या कालीं जावा बेटांत ब्राह्मणांची वसाहत होती व लांबचा प्रवास करणारे ब्राह्मण त्याच्या गलबतांत होते. अमेरिकेंतील पदार्थसंग्रहालयांत प्राचीन मेक्सिकन देवतांच्या मूर्ति आहेत. त्या आमच्या प्राचीन बौद्ध मूर्तीप्रमाणें दिसतात. अमेरिकेहून जपानास जातांना वाटेवर पासिफिक महासागरांत हवाई बेटें आहेत. त्यांची राजधानी होनोलोलु येथें पूर्वीच्या राजांचे पुतळे आहेत. त्यांची कामेहमेह, चौलुक्यानी वगैरे नांवें संस्कृत शब्दांचीं अपभ्रष्ट रूपें असावींत असें वाटतें. कामेहमेह राजाच्या पुतळ्याचा पोषाख आपल्या येथील कोळी लोकांप्रमाणें आहे. गळ्यांत पुष्पहार आहे.

जपानांत देखील आपल्या संस्कृतीचा प्रवेश झाला होता. जपानी भाषेंत कित्येक संस्कृत शष्द अपभ्रष्ट रूपांत सांपडतात असें तेथील भाषाकोविदांचें मत आहे. चीन देशांतील पुरुषांची डोकीची हजामत करून शेंडी ठेवण्याची चाल व स्त्रियांच्या केशपाशांत फुलांच्या वेण्या घालण्याची रीत यांचा विचार करतां येथील पद्धतीचा जुन्याकालीं चिनी लोकांनीं स्वीकार केल्याचें दिसतें. ह्यावरून आर्य संस्कृतीचा प्रसार ब्रह्मदेश, सयाम, जावा, चीन, जपान वगैरे मार्गांनीं अमेरिकेपर्यंत झाला असावा असें वाटतें. पश्चिमेस इराण, अरबस्थान, इजिप्त, आफ्रिका वगैरे देशांतून रोम, व व्हेनिसपर्यंत हिंदुस्थानचा व्यापार ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकापर्यंत सुद्धां किती जोरानें चालला होता याची माहिती Periplus of the Erythraen sea नांवाच्या इ. स. ६० च्या सुमारास एका इजिप्शियन ग्रीक नाविकानें लिहिलेल्या पुस्तकांत चांगलीच सांपडते. हिंदुस्थानच्या दक्षिणेस हिंदी महासागरांत असणाऱ्या सुमात्रा बेटांत हिंदूंची वसाहत पूर्वकालीं होती असें प्राचीन वस्तुसंशोधकांचें मत हिंदुस्थानच्या द्वीपसमूहामध्यें जावा बेटाचें जितकें महत्त्व आहे, तितकें सुमात्रा या बेटाचें आहे. जावा, सुमात्रा, बोर्निओ, सेलिबीस, संबावा या बेटांचीं नांवें अनुक्रमें यव, सुमित्र, भरणी, शलभा आणि संवभ या संस्कृत शब्दांपासून झालेलीं आहेत. हिंदुस्थानांतून वसाहत करण्यासाठीं जी मंडळी बाहेर निघाली, तिचा सुमित्र या नांवाचा एक नायक होता व त्याच्याच नांवावरून यांपैकीं एका बेटाचें नांव सुमात्रा असें पडलें असावें. या बेटांतील अच्चिन नांवाचें शहर व त्याच नांवानें प्रसिद्ध असलेला पश्चिमेकडील प्रांत हे सुमित्र या संज्ञेनेंच पूर्वी ओळखिले जात असत. प्राचीन कालीं सुमित्र शहर या बेटाची राजधानी होती व त्याचे अवशिष्ट भाग अद्यापि पाहण्यास सांपडतात. या बेटांत चिंचेचीं झाडें बरींच असून त्यांवर वानरांचे कळप नेहमीं वस्ती करून रहात असल्यावरून येथील लोकांची अशी समजूत झाली आहे कीं, रामायणांत किष्किंधा या नांवानें प्रसिद्ध असलेलें स्थळ म्हटलें म्हणजे हेंच बेट होय; आणि या ठिकाणीं वाली, सुग्रीव यांची रहाण्याची जागा अमुक असावी असें ते दाखवितात. सुमात्रा बेटाची जास्तींत जास्त लांबी व रुंदी अनुक्रमें १०४७ व ३३० मैल आहे व एकंदर क्षेत्रफळ १ लक्ष ६१ हजार ६१२ मैल आहे. या बेटांतील लोकवस्ती अगदीं पातळ आहे. येथील लोकसंख्या सुमारें ३५ लक्ष आहे. तेथील प्रदेश डोंगराळ असून त्यांत इंद्रजित, हरि, पाणी, शक वगैरे नांवांच्या नद्या उगम

धावतात. शिवाय ज्वालामुखी पर्वत व सरोवरेंही तेथें आहेत. सरोवरांचीं नांवें मणंद्रि, शंकर अशीं आहेत. या ठिकाणचे मूळचे लोक नरमांसभक्षक असल्यामुळें आर्य लोक तेथें गेल्यावर त्यांना दस्यू आणि राक्षस या नांवानें संबोधित असत. इसवी सनाच्या ७८ व्या सालीं हिंदू लोक जावा येथें रहाण्यास गेले, याबद्दल सर्व इतिहासकारांचें मतैक्य आहे व सुमात्रा येथील वसाहत यापेक्षांही जुनी असली पाहिजे असें वाटतें. सुमित्र नांवाचा हिंदु येथें वसाहत करण्यास निघाला, तो कृष्णानदीच्या मुखापाशीं श्रीककुलं नांवाचें शहर होतें तेथून होय. या वसाहतवाल्या लोकांना सुमात्रा येथील मूळच्या रहिवाशांकडून बरीच पीडा सोसावी लागली. चवथ्या शतकांत गुजराथ व सिंध या प्रांतांमधील बौद्ध धर्माचे कांहीं लोक प्रथम सिलोन येथें जाऊन नंतर ते सुमात्राकडे गेले होते. हिंदु व बुद्ध अशा दोन्ही धर्मांचे लोक या बेटांत स्नेहानें रहात असत. त्यांचीं एकमेकांशेजारीं असलेलीं अनेक देवालयें तेथें आढळतात. तेथील लोक आपण सूर्यवंशीय किंवा चंद्रवंशीय आहों, असें अभिमानानें सांगतात. आपण शिकंदरचे वंशज आहों असें सांगणारेही त्यांत कांहीं आहेत. सुमात्रा बेटाचा राज्यकारभार जावा बेटांतील राजाच्या हातीं असे. सुमात्रा बेटांत ठिकठिकाणीं राम, शिव, सीता, भवानी, दुर्गा, महादेव, महेश, सुग्रीव, रुद्र इत्यादि नांवांच्या हिंदुदेवालयांचे अवशिष्ट भाग आढळतात. ज्याप्रमाणें येथील लोक परदेशीं जात त्याचप्रमाणें परस्थही या देशीं येऊन रहात असें दिसतें; कारण प्रसिद्ध स्मृतिकार मनूनें कित्येक परस्थ लोकांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणें केला आहे.

पौण्ड्रकाश्चोड्रद्रविडाः काम्बोजा यवनाः शकाः ।
पारदापल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥

( मनु १०–४४. )

स्वदेशांतील पौण्ड्रक ( उत्तरबंगाल्यांतील लोक ), ओढिया प्रांतांतील व दक्षिणेकडील द्रविड यांच्या बाहेर कांबोज ( काबुली ), यवन ( ग्रीक ), शक ( टयूरेनियन ), पारद (?), पल्हव ( पारसी ), चिनी वगैरे परस्थ लोक या देशांत होते. हे मूळ क्षत्रिय असून क्रियालोपामुळें पतित झाले असें मनूनें लिहिलें आहे. त्यांच्या पराक्रमाची जागोजागीं तारीफ केली असल्यामुळें त्यांना पतित झालेले क्षत्रिय असें म्हटलें असेल. यवनांच्या ज्ञानासंबंधानेंही आदर व्यक्त केला असून ‘ ऋषिवत्तेपि पूज्याः ’ म्हणजे ऋषींप्रमाणें पूज्य असल्याब-

द्दल यवनाचार्यांची ज्योतिषग्रंथांत तारीफ केली आहे. चंद्रगुप्तानें सेल्युकस या यवन राजाच्या मुलीचें पाणिग्रहण केलें. आंध्रवंशीय शातवाहन कुळांतील पुलुमायी यानें शकाची मुलगी वरिली. यावरून परकीयांशीं येथील लोकांचें दळणवळण बरेंच होतें असें दिसतें. ही स्थिति चालू असणें योग्य नाहीं असें तत्कालीन धर्माभिमान्यांस वाटून अनेक निर्बंध ठरवून यवन वगैरे परकीयांशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार हिंदूंनीं करूं नये असें बहुजनमत बनलें. हेंच मत स्मृतींत पाहावयास सांपडतें. विशेषतः ब्राह्मणांची योग्यता व त्यांचें धार्मिक पावित्र्य अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें असावें म्हणून त्यांच्याबद्दल कडक नियम करण्यांत आले. सध्यां हिंदु ज्यास अत्यंत पूज्य मानतात तो

## प्रसिद्ध स्मृतिकार मनु

हाच हिंदूंचा मुख्य आचार्य व धर्मार्थकाममोक्षादि चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घेण्याचा मार्गदर्शक आहे. त्यानें जे नियम घालून दिले, तेच आज दोन सवादोन हजार वर्षांपासून अनुल्लंघनीय मानून हिंदूंतील उच्च वर्णीय लोक त्यास मान देत आले आहेत. मनूनें प्रत्येक जातीचीं कर्तव्यकर्में निवेदन केलीं असून द्विजांनीं अमुक गोष्टी करूं नयेत–पूर्वयुगांत त्या चालत होत्या परंतु कलियुगांत त्या वर्ज्य आहेत–असें सांगितलें आहे. इतर स्मृतिकारांनीं याच गोष्टींसंबंधानें भिन्न मतें प्रदर्शित केलीं आहेत. कलिवर्ज्यांतल्या कित्येक बाबींपैकीं समुद्रयान ही एक आहे. मनूच्या पूर्वी सूत्रें अस्तित्वांत आलीं. त्यांत श्रुतीवरून आलेलीं श्रौतसूत्रें व सामाजिक व्यवस्थेसंबंधानें अस्तित्वांत आलेलीं धर्मसूत्रें असे दोन भाग आहेत. हींच धर्मसूत्रें एकत्र करून त्यांस व्यवस्थित रूप दिल्याचें श्रेय मनु व याज्ञवल्क्य यांस आहे. मनूच्या कालापूर्वी धर्मसूत्रें गद्यापद्यात्मक असून तीं मुखोद्गत करणें हें शिक्षणांतील एक अंग होतें. समाजांतील एक जबाबदार व्यक्ति व राज्यांतील नीतीनें वागणारा नागरिक या नात्यानें आपलें कर्तव्य नीटपणें जाणण्यास हीं सूत्रें पाठ करावीं लागत. अशा पाठपद्धतीमुळें उपलब्ध असलेल्या सूत्रांवरून मनूनें स्मृति हा ग्रंथ तयार केला. या मनूपूर्वी दुसरा एक त्याच नांवाचा मोठा धर्मसूत्रकार होऊन गेला. त्याचीं मानवसूत्रें महाभारत रामायणकालीं लोकांस मुखोद्गत होतीं. यासाठीं त्या दोन्ही इतिहासांत हीं मनुस्मृतींत दिल्याप्रमाणेंच सांपडतात. मनुस्मृति छंदोबद्ध व व्यवस्थित आहे. वसिष्ठ, गौतम, बोधायन, आणि आपस्तंभ हे प्रसिद्ध धर्मसूत्रकार होत. पराशर हा उदारमतवादी कलियुगासाठींच धर्मबंधनें सांगणारा स्मृतिकार होता.

## वेदकालीं जातिभेद

सध्यांप्रमाणें नव्हता, हें यापूर्वी आलेंच आहे. वेदांत वर्ण हा शब्द आहे. गीतेंतही श्रीकृष्णानें तोच वापरला आहे. आर्य व अनार्य यांच्यांतील वर्णभेदाचा हा द्योतक असून आर्यवर्णाचें रक्षण केलेंस व दस्यूचा वध केलास–हत्वी दस्यून्प्रार्यं वर्णमावत्–अशी वेदांत इंद्राची प्रार्थना केली आहे ( ऋक्–३–३५ ). क्षत्रिय हा शब्द मूलतः तेजोबलदर्शक होता. ऋग्वेदांत देवांचे पराक्रम वर्णन करितांना त्यांस क्षत्रिय असें म्हटलें आहे. कालेंकरून हा शब्द जातिवाचक झाला. त्याचप्रमाणें ब्राह्मण व विप्र, हे शब्द विद्वत्तादर्शक होते, ते हळू हळू जातिवाचक झाले. बुद्धाच्या कालीं जाति बऱ्याच उग्र स्वरूपांत होत्या त्यांचा प्रतिकार करण्याच्या हेतूनें बुद्ध हा धर्मसुधारक पुढें आला. पुनः बौद्ध धर्म क्षीण होत जाऊन हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन झालें. अशा वेळीं जातीजातींतील भिन्नत्व ठळकपणें दिसावें, यासाठीं अनेक निर्बंध ठरविण्यांत आले. मयूख, निर्णयसिंधु वगैरे ग्रंथांत बृहन्नारदीय पुराणांतील कांहीं वचनें कलिवर्ज्यांच्या सदराखालीं दिलीं आहेत.

**समुद्रयातुः स्वीकारः कमंडलुविधारणम्।**

म्हणजे समुद्रयान केलेल्या मनुष्याचा स्वीकार करणें व संन्यास घेणें या गोष्टी कलियुगांत वर्ज्य आहेत. आदित्यपुराणांतील पुढील वचनही त्यांत आढळतें.

**द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्याप्यसंग्रहः**

द्विजांनीं समुद्रयान केलें असतां त्यांस प्रायश्चित्त देऊन शुद्ध केलें तरी त्यांशीं व्यवहार करूं नये. यासंबंधानें मिताक्षरींत बौद्धायन ऋषीचें वचन असून समुद्रयान व इतर गोष्टींबद्दल निरनिराळीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. व्यवहारमयूखांत नारदवचन आहे, त्यांत नौकेनें समुद्रांतून द्वीपांतरास जाणारास औरस पुत्र असला तरी भाग मिळत नाहीं असें म्हटलें आहे. विलायतेस जाऊं नये यासंबंधानें ज्या वचनांत निषेध आहे त्यांत इतर देशांचाही समावेश केला आहे. तो असा–

**सिंधुसौवीरसौराष्ट्रांस्तथा प्रत्यंतवासिनः**
**अंगवंगकलिंगाश्च गत्वा संस्कारमर्हति ॥**

म्हणजे सिंधु ( सिंध ), सौवीर ( होळकरशाहींतील सिंधु नदीजवळील प्रदेश ), सौराष्ट्र ( गुजराथेंतील सोमनाथाचें देवालय असलेला प्रांत ), परधर्मीयांचा देश,

अंग ( कुरुक्षेत्राजवळचा देश ), वंग ( बंगाल ), कलिंग ( मद्रास इलाख्यांतील सर्कार हा प्रांत ) या सर्व देशांत गेलें असतां संस्कार केला पाहिजे ! समुद्र-यानाप्रमाणेंच अनेक गोष्टी बृहन्नारदीय पुराणांत कलिवर्ज्यांत सांगितल्या आहेत उदाहरणार्थ–संन्यासग्रहण, मधुपर्कांत पशूचा वध, श्राद्धाच्या वेळीं मांसदान, कन्येचें पुनर्दान, दीर्घकाल ब्रह्मचर्य, आजन्म तीर्थयात्रा, आते व मामेबहिणीशीं विवाह. परंतु सध्यांची स्थिति पाहतां यांपैकीं बऱ्याच बाबी चालू आहेत. इतकेंच नाहीं तर द्विजांतील श्रेष्ठ जे ब्राह्मण त्यांच्यांत चालू आहेत. मग नौका-गमनांतच काय पाप आहे ? शिवाय जे देश कलिवर्ज्यांत सांगितले आहेत ते याच देशांत असून आम्ही आज हजारों वर्षें तेथें जात येत आहों. बृहस्पति व कलिवर्ज्यांचा पुरस्कर्ता देवल हे ऋषि सिंध प्रांतांतले होते. धृतराष्ट्राचा जामात जयद्रथ हा देखील तेथीलच रहाणारा असून कौरव त्याच्याकडे जात येत असत. कौरव हे कलियुगांतीलच होते अशाबद्दल इतिहास साक्ष देत आहे. या सर्व वर्ज्य देशांत किती तरी ब्राह्मणवस्ती आहे व इतर देशांतील ब्राह्मणही जाऊन तेथें बिनदिक्कत रहात असतात. अंग देशाची राजधानी कर्णालय ( कर्णाळ ) येथें उदारधी कर्ण राज्य करीत असतां त्याच्या औदार्याचा फायदा घेण्यासाठीं हजारों ब्राह्मण त्या ठिकाणीं दूरदूरच्या प्रांतांतून जात असत. बोधायन हा सूत्रकार खिस्ती शकाच्या पांच सहाशें वर्षांपूर्वी होऊन गेला. उत्तर हिंदुस्थानांतील लोक समुद्रयान करितात असें त्यानें सांगितलें असून त्या देशांतील रूढीपरत्वें हें कृत्य निषिद्ध मानूं नये व ज्या ठिकाणीं तें करण्याचा संप्रदाय नाहीं तेथेंच निषिद्ध मानावें असें त्याचें मत आहे; अर्थात् उत्तर हिंदुस्थानांतील द्विजाला जी गोष्ट करितां येते ती केवळ रूढीच्या अभावीं दक्षिण हिंदुस्थानांतील द्विजास करतां येऊं नये हें विलक्षण खरेंच. दीर्घकाल एकाद्या पद्धतीचा अवलंब करणें यालाच रूढि म्हणतात. अशा रीतीनें कोणतीही गोष्ट चालू होतां होतां तिचा समावेश रूढींत होऊं शकतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्रिकालाबाधित असे सामाजिक नियम ठरविणें कोणाही मनुष्यप्राण्यास शक्य नाहीं. कालपरत्वें सामाजिक निर्बंधांची उजळणी होऊन त्यांत कित्येक नवीन नियमांचा समावेश तर कित्येकांचा लोप करण्याची आपली तयारी असली पाहिजे. आज खिस्ती शकाच्या विसाव्या शतकांत आम्ही जर इसवी सनापूर्वीच्या विसाव्या शतकांतील चालीरीती आचरणांत ठेवण्याचा दुरभिमान धरून बसलों तर पाश्चात्यांचें व कित्येक पौर्वात्यांचें पाऊल ज्या उद्योग व व्यापारामुळें पुढें पडलें ते

उद्योगधंदे शिकणें व मालाची योग्य भावानें दूरदेशीं विक्री करून द्रव्य मिळविणें या गोष्टी असाध्य होतील. सध्याच्या जीवनकलहाची तीव्रता किती आहे हें लक्षांत आणून आमच्या आचारविचारांत योग्य फेरबदल न केल्यास आपण कोठचे कुठें उडून जाऊं. आम्ही पूर्वजांचा अभिमान बाळगतों असें म्हणणारांनीं पूर्वजांचीं कृत्यें नीट ध्यानीं आणावीं. जेव्हां पुष्कर तीर्थांच्या ठिकाणीं मोठा यज्ञ झाला तेव्हां हबशी, चिनी आणि इराणी राष्ट्रांतील लोकांस निमंत्रण केलें होतें. राजसूय यज्ञाच्या पूर्वीं भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे पंडुपुत्र परदेशीं गेले होते असें प्राचीन लेख सांगतात. खुद्द श्रीरामचंद्रानें समुद्र ओलांडून त्या कामीं आपली अनुमति दिली आहे. रामानें समुद्राच्या पलीकडे जाऊन ज्याप्रमाणें सीतेस प्राप्त करून घेतलें, त्याचप्रमाणें आपणही पाहिजे तो समुद्र ओलांडून विद्या व कला संपादन करण्याच्या मार्गास लागलें पाहिजे. अशा रीतीनें कूपमंडूकाची नीच स्थिति सोडून देऊन ज्या दिवशीं आपण नवीन प्रागतिक मार्गाचा अवलंब करण्यास उल्हासानें पुढें येऊं व विद्या व कला संपादनाच्या कामीं धर्माची आडकाठी बिलकुल होणार नाहीं असें आमचे आचार्य व वैदिक होतकरू विद्यार्थ्यांस फलमंत्राक्षतापूर्वक आशीर्वाद देऊन सांगतील त्या दिवशीं हिंदूंच्या उन्नतावस्थेच्या नवयुगाचा आरंभ होईल ! तेव्हांच लोकांत नवा जोम व नवा जीव उत्पन्न होईल. ज्यांस आपण अज्ञानानें भ्रष्ट मानिलें ते आमच्याहून किती तरी पुढें गेले असून जगांतील प्रगमनशील वातावरणाचा आमच्यावर परिणाम होऊन आमचें पाऊल पुढें पडूं लागलें आहे. अशा वेळीं धर्माची आडकाठी पुढें आणून आम्हास मागें खेंचूं पाहणारे अद्यापि जागेच झाले नाहींत असें म्हणणें भाग आहे.

## आमची सध्यांची स्थिति

लक्षांत घेतां असें दिसून येईल कीं, इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या मानानें सांपत्तिकदृष्ट्या आम्ही फार खालावलेल्या स्थितींत आहों. इतर बाबींत (तत्त्वज्ञान, शोध, शास्त्रीय ज्ञान) यांतही आमची स्थिति समाधानकारक नाहीं. याचें कारण आम्ही स्वतःच्या दृष्टीचा उपयोग न करतां पुरातनकालीं होऊन गेलेल्या ऋषींच्या, सूत्रकारांच्या व स्मृतिकारांच्या दृष्टीचा उपयोग करीत आहों. स्मृतिकार, श्रुतींचे मंत्रद्रष्टे ऋषि, सूत्रकार, पुराणकार व इतिहासकार यांच्यांत पावलोपावलीं मतभेद दृष्टीस पडतो. याचें कारण असें कीं ते ज्या ज्या कालीं होते त्या त्या

कालास अनुसरून त्यांचे विचार आहेत; परंतु हें आम्ही जाणत नसतां त्यांच्यांत मेळ घालण्याचा किंवा रूढिपरत्वें जीं मतें आम्ही ग्राह्य धरून बसलों आहों त्यांसच चिकटून राहण्याचा यत्न करीत आहों. हें दोन हजार वर्षांमागचें नाणें आज कसें चालू होणार ? मजेखातर घ्यावें, किंवा ऐतिहासिकदृष्ट्या त्यास महत्त्व आहे म्हणून जवळ बाळगावें, याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. परंतु तें आज चालवूं पाहणें म्हणजे निव्वळ दुराग्रह आहे. कनिष्काचें नाणें जसें शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींत चालणें शक्य नव्हतें, तसें शिवराई नाणें आजमितीस मान्य होण्याजोगें नाहीं. हीच स्थिति स्मृतींतील कायद्यांची आहे. पूर्वस्थिति पुनः प्राप्त करून घेणें हेंच परमध्येय होय असें सांगणारे भविष्यत्कालसंबंधाच्या महत्वकांक्षेस भलतेंच वळण लावून देत आहेत, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. श्रुतिस्मृतींतील आधार देऊन त्यांच्याबद्दल काथ्याकूट करीत वेळ दवडण्यापेक्षां स्वानुभव व देशाचा इतिहास काय सांगत आहे याचा विचार करणें विशेष फायद्याचें होईल. जुन्या गोधडीला ठिकळ्या लावीत लावीत तिचें मूळचें स्वरूपही बदलून टाकिलें हें पुरें झालें नाहीं काय ? असें करणें म्हणजेच पूर्वजांबद्दल अभिमान बाळगणें होय, हें सांगणाऱ्या आमच्या हिंदुबांधवांची स्थिति खरोखर अनुकंपनीय आहे. **कायदे मनुष्याकरितां असून मनुष्य कायद्याकरितां नाहीं**, हें सत्य ज्या दिवशीं हिंदूंच्या अंतःकरणांत प्रकाशमान होईल तोच सुदिन खरा. तोंपर्यंत सूर्य जरी आर्यावर्तावर प्रकाश पाडीत असला तथापि रात्रच चालली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. जुनें आदरावें परंतु नव्यांतील ग्राह्यांश घेण्यास कचरूं नये. सत्यनिष्ठा, भूतदया, प्रेम, स्वार्थत्याग, पारमार्थिक वृत्ति, ज्ञाननिष्ठा हे गुण नव्यांतून देखील घ्यावे. यांचें सहकारित्व म्हणजेच देशाची उर्जितावस्था होय. अशा प्रकारच्या गुणांचा समाजांत प्रादुर्भाव होईल असें करणारे स्मृतिकार पाहिजे आहेत. पराजय पावलेली सैन्याची तुकडी ज्याप्रमाणें आपल्या मदतीस प्रचंड सेनासमुद्रासह कूच करीत येणाऱ्या धूर्त व अजिंक्य सेनानायकाची वाट पाहत राहते, तशी आम्ही या स्मृतिकारांची वाट पाहत राहिलें पाहिजे आणि ते येतांच त्यांचें योग्य स्वागत करण्याची तयारी ठेविली पाहिजे. ज्यांनीं आप, तेज, वायु वगैरे महाभूतें आपल्या ताब्यांत आणिलीं त्यांची सत्ता जगतावर स्थापन झाली आणि त्यांच्या पूजनांत जे आपण गढून गेलों त्या आमची स्थिति काय झाली याचा विचार करून या धार्मिक हीन अव-

स्थेंतून वर येण्याचा प्रत्येक आर्यानें यत्न केला पाहिजे. सतत उद्योग, स्वार्थ-त्याग, उल्हासी वृत्ति, सत्यत्व, स्वावलंबन, पावित्र्य व आत्मविकास या साधनसांच्या द्वारें आपला उत्कर्ष करून घेण्यास आर्यांनीं कंबर बांधिली पाहिजे. मुलांमुलींस शब्दज्ञान होऊं लागल्यापासून उत्कर्षाचा हा महामंत्र पढवून त्यांना देशाचे आधारस्तंभ बनवून टाकिलें पाहिजे. मातेच्या दुग्धांतून बालकास या उत्कर्षामृताचें पान होईल असे उपाय समाजानें योजिले पाहिजेत. समुद्रयानाच्या विधिनिषेधाचे प्रश्न बाजूस सारून स्वोदाहरणानें त्याची उपयुक्तता जनतेच्या नजरेस आणून दिली पाहिजे असें हा

## समुद्रपूजनाचा दिवस

सर्व आर्यांस निवेदन करीत आहे. प्राचीन काळीं जैन, बुद्ध, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वगैरे लोक समुद्रयान करीत. इजिप्त, ग्रीस, लंका, ब्रह्मदेश, चीन, जावा, इत्यादि देशीं जाऊन ते आपल्या मायदेशाची संपत्ति व्यापाराच्या योगानें वाढवीत असत. हिंदुस्थानांत उत्पन्न झालेला कलाकुसरीचा माल जसा त्यांनीं त्या देशीं पोहोंचविला त्याचप्रमाणें येथील तत्वज्ञान, धर्म व देवता यांचेंही आवाहन तेथें केलें. बौद्ध धर्म जपानापर्यंत पोहोंचविणारे हिंदूच होते. ग्रीस देशांत तत्वज्ञान पोंचविणारेही हिंदूच. अशा लोकांची—अशा परमपूज्य पूर्वजांची--कीर्ति नारळीपौर्णिमेच्या दिवशीं एकदिलानें गाऊंया. त्यांची संतति, देवालयें, देव व भाषा अद्यापि जावा वगैरे बेटांत नांदत आहेत. कांहीं वर्षांपूर्वी चीन देशांत हिंदूचें एक देवालय जमिनींत दडपून गेलेलें सांपडलें. ज्या पुण्यात्म्यांनीं आमच्या देवतांस सातासमुद्रांपलीकडे नेलें, त्यांची व इतरत्र सांपडणाऱ्या हिंदूंच्या वंशजांच्या पितरांची आठवण करून त्यांस समुद्रोदकानें तिलतर्पण देऊं या. सध्या विद्यार्जनासाठीं व व्यापारउद्योगाच्या मागें लागून जे अनेक आर्यबांधव परदेशीं गेले आहेत त्यांची या दिवशीं प्रेमानें आठवण करून त्यांचें कल्याण व्हावें एतदर्थ वरुण देवाची प्रार्थना करूं या. आजपर्यंत लष्करी पेशा पतकरलेल्या अनेक हिंदुवीरांनीं परभूमीवर क्षात्रतेज दाखविण्यासाठीं जाऊन धारातीर्थी आपले प्राण ठेविले अशांना तिलांजलीच्या योगानें स्वर्गीं तृप्त करूं या. १९१४ सालीं आसुरी संपत्तीच्या मोहामुळें उपस्थित झालेल्या घनघोर संग्रामांत रणदेवतेची रुधिरतृषा शांत करण्यासाठीं अनेक वीरांस या देशांतून सत्ताधिकाऱ्यांच्या आज्ञेवरून जावें लागलें त्यांच्यांत कित्येक द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी,

अग्निहोत्री, श्रोत्रिय, उपाध्याय, पाठक, पाण्डेय, शुक्ल, मिश्र, वाजपेयी, त्रिपाठी असे उच्चवर्णीय द्विज होते. स्वामी-सेवेचें वचन पाळण्यासाठीं त्यांनीं स्वतःचा जीव धोक्यांत घातला. अशांची कीर्ति सुवर्णाक्षरांनीं हृत्पटलावर लिहून ठेवूं या. समुद्रयानामुळें ते पतित झाले असें प्रतिपादन करणारे आम्ही धर्मदृष्ट्या पतित होऊं. गेल्या सालीं जलमार्गानें आपला व्यापार किती झाला, तो वाढवावा कसा वगैरे प्रश्नांचा खल या दिवशीं व्यापारी मंडळीनीं करण्याजोगा आहे. असें केल्यास आपली व्यापाराची बाजू कशी आहे, याची त्यांना अटकळ बांधतां येईल. अशा रीतीनें नारळी पौर्णिमा हा सण साजरा केल्यास प्रपंच व परमार्थ हे दोन्ही साधतील.

## अर्वाचीन कालचे ऋषि

श्रीस्वामी रामतीर्थ म्हणतात—माझ्या हिंदु बांधवांनो, योग्य ते फरफार करण्यास कंटाळून जुन्या चाली आणि परंपरागत संस्कार यांना महत्व देऊं नका. तेणें-करून तुम्ही मनुष्यकोटीहूनही हीन बनाल. हिंदुस्थानांतील प्राचीन ऋषींचे तुम्ही वंशज आहां हें मान्य आहे. परंतु त्यांच्या कालांत तुम्ही आज राहत नाहीं. तुम्हांला अतःपर सध्याच्या जगावरील चळवळींतून अंग काढून रहातां येणार नाहीं. वाफेचीं यंत्रें, आगबोटी, तारायंत्रें हीं तुमच्या आजूबाजूस पसरलीं आहेत. या विसाव्या शतकांतील युरोप व अमेरिका देशांतील शास्त्रज्ञ, शिल्पज्ञ व मजूरदार यांच्याशीं तुम्हांस झुंजावयाचें आहे. हें झुंजणें तुम्हाला टाळतां येणार नाहीं. या नव्या ज्ञानाचें ग्रहण करून तें आपलेंसें करावयाचें नसेल तर तुम्हींही आपल्या पूर्वजांबरोबर पितृलोकांत जाऊन रहा. बाह्यवस्तु ग्रहण करून त्या पचनीं पाडा आणि आपली उन्नति करून घ्या. मात्र श्रुतिरूपि प्राण तुम्हीं आपल्या हृदयांत जागृत ठेवा.

# श्रीकृष्णजन्माष्टमी.



श्रीकृष्णाचा जन्मोत्सव हिंदुस्थानांतील सर्व वर्णांचे लोक मोठ्या प्रेमानें प्रत्येक वर्षी श्रावण वद्य अष्टमीस साजरा करीत असतात. श्रीकृष्णाचें चरित्र अत्यंत हृदयंगम असून तें पावन करणारें आहे असें प्राचीनकालापासून हिंदुलोक समजत आले आहेत. महाभारत, हरिवंश, भागवत व जैमिनी अश्वमेध यांत हें चरित्र सांपडतें. तें येथें विस्तारपूर्वक देणें शक्य नाहीं. यासाठीं श्रीकृष्णचरित्रांतील महत्वाच्या गोष्टी तेवढया संक्षेपानें पुढें देत आहों.

राजा श्रीरामचंद्राच्या कालीं यमुना नदीच्या दक्षिण भागीं शत्रुघ्नानें मधुवन नांवाचा एक अत्यंत सुपीक व रमणीय देश काबीज केला. याला शूरसेन देश असें म्हणतात. प्रथमतः मधु नांवाच्या एका राक्षसानें त्या देशीं वसाहत करून जें राजधानीचें शहर स्थापन केलें होतें तें मधुपुरी किंवा मथुरा या नांवानें प्रसिद्ध झालें. कांहीं काल शत्रुघ्नाच्या क्षत्रिय वंशजांनीं या देशावर सत्ता चालविली. कालेंकरून त्यांची सत्ता लयास गेल्यावर शूरसेन देशांत यादव, अंधक, भोज, भौम, कुकुर, दाशार्ह आणि वृष्णि अशा सात चंद्रवंशी क्षत्रियांच्या कुलांनीं वसाहती केल्या. त्यांपैकीं यादवांचें घराणें प्रमुख असून वसुदेव हा

यादव जहागीरदार भोज राजाचा मांडलिक होता. तो यमुना नदीच्या पलीकडे गोवर्धन नांवाच्या टेकडीजवळच्या आपल्या जहागिरींत राहत असे. यादवांचा व इतर क्षत्रियांचा त्या कालचा धंदा कृषि, गोरक्षण व व्यापार हा असे. ( कालें-करून वैश्यांनीं कृषि व गोरक्षण कमी लेखिल्यामुळें हे धंदे चतुर्थ वर्णाकडे गेले. ) क्षत्रियलोक गाईंचे शेंकडो कळप बाळगून हवा, पाणी व चारा यांची अनुकूलता असे, त्या ठिकाणीं वसाहत करून रहात व गोपाचा धंदा करीत. त्यांच्यांत वसु-देव हा प्रमुख असून त्याचा शब्द सर्व गोप शिरसावंद्य मानीत. शूरसेन देशाचा राजा त्या कालीं उग्रसेन हा होता. हा मोठा पापभीरू व सदाचरणी असल्यामुळें लोक आनंदी होते. परंतु त्याचा पुत्र कंस हा फार दुष्ट निघाला. त्यानें आपल्या बंधूंच्या मदतीनें पित्यास कैद करून तो स्वतःच राज्यकारभार पाहूं लागला. स्वभावतः क्रूर असलेल्या कंसानें अनेक परीनें प्रजाजनांस गांजण्यास प्रारंभ केला. उग्रसेनाची कन्या ( कंसाची बहीण देवकी ) वसुदेवाची बायको असल्यामुळें आपला मेहुणा वसुदेव हा सासऱ्याच्या वतीनें आपल्या विरुद्ध कारस्थानें करील अशी कंसास भीति वाटून तो त्याला शत्रूप्रमाणें मानूं लागला. वसुदेवाच्या मुलां-कडून आपणास इजा होऊं नये म्हणून कंसानें त्यांस जन्मतःच ठार करण्याचा क्रम ठेविला. त्यानें आपल्या बहिणीचे सहा पुत्र जन्मतांच शिलेवर आपटून ठार केले. सातव्या खेपेस भीतीमुळें तिचा गर्भ गळून पडला. वसुदेवास रोहिणी नांवाची दुसरी एक बायको असून ती देवकीहून ज्येष्ठ होती. ती या सुमारास गर्भवती असल्या-मुळें कंसाच्या भीतीनें तिला त्यानें आपला मित्र नंद याच्या घरीं पोहोंचविलें. तिला कालेंकरून जो मुलगा झाला त्याला संकर्षण हें नांव ठेवण्यांत आलें. यालाच पुढें बलराम हें नांव पडलें. देवकी आठव्या खेपेस गर्भवती राहातांच तिला व वसुदेवास कंसानें कडेकोट बंदोबस्तांत ठेविलें. या मुलावर त्याचा विशेष कटाक्ष होता. कारण त्याच्या हातून कंसाचा अंत होईल असें नारदानें भविष्य वर्तविलें होतें. देवकी कर्मधर्मसंयोगानें आठव्या महिन्यांत अकल्पित बाळंत झाली. सोसाट्याचा पाऊस पडत असतां श्रावण महिन्यांत वद्य अष्टमीस ऐन मध्यरात्रीच्या वेळीं श्रीकृष्णाचा जन्म झाला. या मुलास तरी कोणत्याही उपायानें वांचवावें असा वसुदेवानें निश्चय केला व पहारेकरी गाढ झोंपेंत अस-लेले पाहून तो त्या बालकासह वाड्यांतून बाहेर पडला. यमुनानदी ओलांडून नंदाच्या गृहीं जाऊन पाहतो तर तेथें नंदाची पत्नी यशोदा नुक्तीच कन्या प्रस-वली होती. आपल्या सुकुमार बालकास तेथें ठेवून नंदाच्या मुलीस घेऊन तो

पुनः आपल्या वाड्यांत शिरला. दुसऱ्या दिवशीं कंसाची स्वारी कारागृहीं प्रविष्ट झाली व त्यानें देवकीच्या विनवण्या लक्षांत न घेतां त्या मुलीस शिलेवर आपटून यमसदनास पाठविलें. त्या वेळीं कंसास असा भास झाला कीं एक तेजःपुंज दिव्य शक्ति त्या कन्येपासून निघून तिनें तुझीं शंभर वर्षें भरलीं असें त्यास बजाविलें. हीच नंदाची कन्या शक्ति असें मानण्यांत येत असून ती भगवती या नांवानें प्रसिद्ध आहे.

याप्रमाणें आपल्या शत्रूचा नाश केल्याचें समाधान मानून कंस आपल्या राजमंदिरीं गेला, व वसुदेवदेवकीस बंधमुक्त करण्यांत आलें. इकडे नंदाच्या घरीं पुत्रजन्म झाल्याबद्दल सर्वांस आनंद झाला. त्याला कृष्ण असें नांव ठेवण्यांत आलें. नंद हा गोकुळ येथील पाटील असून तो सदाचरणी व परोपकारी होता. सुमारें चार महिन्यांनंतर सरकारसारा भरण्यासाठीं मथुरेस तो कृष्णासह आला. तेव्हां वसुदेवानें कृष्ण आपला मुलगा आहे, असें कळूं न देतां त्या मुलास डोळे भरून पाहिलें व लवकर त्याला परत नेण्याबद्दल आग्रह केला.

कृष्ण जात्याच फार हूड, चलाख व लहानामोठ्यांचें चित्त आकर्षण करून घेणारा होता. यशोदेस तो एक क्षणही स्वस्थ बसूं देत नसे. दांडगें मूल आईस प्रियच असतें; त्या अर्थीं त्याचें कौतुक करण्यांत नंदयशोदेचा काल मोठ्या आनंदानें जात असे, यांत आश्चर्य नाहीं. राम व कृष्ण यांची जोडी असे. ते किंचित् मोठे होऊन हिंडूं सवरूं लागतांच गोपगोपींस फार प्रिय झाले. कृष्ण व राम सात वर्षांचे होतांच नंदानें त्यांस गाई चारावयास पाठवून देण्याचा क्रम सुरू केला. बालगोपालांवर कृष्णानें हां हां म्हणतां स्वामित्व मिळवून तो त्यांचा नायक बनला. त्याच्या नेतृत्वाखालीं गोकुळांतील सर्व बालगोपाल झाडांच्या दाट छायेखालीं अनेक खेळ खेळत.

त्या काळच्या गवळ्यांच्या पद्धतीप्रमाणें नंदानें गोकुळांतून आपलें ठाणें उठवून त्याहीपेक्षां उत्तम अशा प्रांतीं जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें सर्व गोपगोपी आपलीं गुरें × व चीजवस्त घेऊन उत्तरेकडे चालल्या व वृंदावन नांवाच्या एका नवीन वनांत त्यांनीं ठाणें दिलें. त्या वेळीं कृष्णाचें वय सुमारें

---

×पुराणांत हा विषारी सर्प होता अशी कथा आहे. परंतु हा नाग जातीचा दुष्ट पुरुष असावा असें आम्हास वाटतें.

चवदा वर्षांचें असावें. बलराम त्याहून पांच सहा महिन्यांनीं मोठा होता. त्या उभयतांनीं गो-पालनाचा उद्योग मोठ्या प्रेमानें चालविला. कृष्ण मुरली वाजविण्यांत पटाईत होता. त्याच्या मनोहर आलापांस पशुपक्षीही भुलून जात; मग गोपगोपी ह्या मधुर वेणुरवास विसंबण्यास तयार नसत यांत आश्चर्य कोणतें ? गोपांसंगें असतांना या बंधुद्वयास कुस्तीचा नाद लागला. दोघेही मल्लविद्येंत निष्णात झाले. दूधतुपासारखा सात्विक आहार, निर्मल हवा व प्रेमळ व शुद्ध विचार यांच्या अनुग्रहामुळें आधींच सशक्त असलेल्या त्या बालवीरांस मल्लविद्या साध्य होतांच ते अप्रतिम शक्तिमान् झाले. त्यांचें सौंदर्य पाहून व्रजवासी स्त्रीपुरुष मोहित होऊं लागले.

या व्रजाच्या जवळच गाईस पाणी पाजण्याचा एक डोह होता. कोणी कालिया नाग नामें एक मत्त पुरुष त्या डोहांत विष कालवी; त्यामुळें पाणी पिण्यासाठीं तेथें येणारीं गुरें प्राणास मुकत. कृष्णानें त्या नागास जेरीस आणिलें व त्याला तेथून हुसकावून लाविलें. याच सुमारास धेनुकासुर व प्रलंब नांवाचे दोघे दैत्य गाईंच्या कळपांत शिरून त्या पळवून नेण्याच्या खटपटींत होते. त्यांनाही या पराक्रमी बंधुद्वयानें यमसदनास पाठविलें. यावरून कृष्णाचा बंधु संकर्षण यास बलदेव, बलराम व प्रलंबहन् हीं नांवें पडलीं. शरदृतूच्या प्रारंभीं गवळी लोक पर्जन्याचा देव जो इंद्र त्याच्या नांवानें शक्रोत्सव करीत; परंतु कृष्णाच्या सूचनेप्रमाणें या उत्सवाचा विचार बदलून ज्या गोवर्धन पर्वतामुळें गाईंस भरपूर चारा मिळतो, त्याचा गोवर्धनोत्सव व्रजांनीं साजरा केला. या प्रमादाबद्दल इंद्रास राग येऊन त्यानें सात दिवस व्रजावर भयंकर वृष्टि केली व सर्वांस जेरीस आणण्याचा यत्न केला. तेव्हां श्रीकृष्णानें गोवर्धनच वर उचलून त्याच्याखालीं सर्वांस राहण्याची सोय करून दिली. अशा प्रकारें कृष्णाच्या पराक्रमाच्या गोष्टी आजूबाजूच्या देशांत पसरल्या. बलराम व कृष्ण ह्यांचा तोंडवळा सारखा असल्यामुळें ते दोघेही वसुदेवाचेच पुत्र असावेत असें लोक बोलूं लागले. कृष्णजन्मासंबंधाची खरी वार्ता खुद्द कंसाच्या कानावर येतांच तो रागानें खळवळून गेला. वसुदेवानें आपणास फसविलें, हें कंसाच्या लक्षांत आलें तेव्हां त्यानें दरबार भरवून वसुदेवाचें कठोर वाक्प्रहारांनीं ताडण केलें आणि कृष्ण व बलराम यांस आपल्या नगरीं बोलावून आणून कुस्तीचा पण लावून आपल्या पदरीं असलेल्या चाणूर व मुष्टिक या मल्लांकडून त्यांना ठार करण्याचा बेत केला. त्यांस आणण्यासाठीं अक्रूरास

व्रजाला पाठवून दिलें. या बंधुद्वयास रथांत घालून आणतांना व्रजांतील सर्व स्त्रीपुरुषांनीं जो आक्रांत केला, त्याचें वर्णन अनेक प्रासादिक कवींनीं केलें असून तें श्रवण केलें असतां अजून मन कळवळूं लागतें. कृष्ण व बलराम यांच्याशीं मुष्टिक व चाणूर हे धिप्पाड मल्ल बराच वेळ झुंजले. सर्व मथुरा नगरी हा सामना पाहण्यासाठीं लोटली होती. शेवटीं त्या दोघांसही त्या उभयतांनीं यमसदनीं पाठविलें. द्वारावर एक मत्त हत्ती ठेवून त्याच्या करवीं त्यांस ठार करविण्याची कंसानें युक्ति योजिली; तीही निष्फळ झाली. अशा रीतीनें हीं गवळ्याचीं पोरें आटोपेनात असें पाहतांच कंस चवताळला व वसुदेव राम व कृष्ण यांच्यासंबंधानें कठोर भाषण करूं लागला; तेव्हां सिंहाचा छावा ज्याप्रमाणें हरिणावर उडी टाकतो, त्याप्रमाणें कृष्ण कंसाच्या अंगावर धांवला व एका हिसक्यासरशीं त्याला जमिनीवर आपटून त्यानें त्याची जीवनयात्रा संपविली. वसुदेवदेवकींच्या पायांवर त्यानें मस्तक ठेविलें, तेव्हां त्यांच्या प्रेमाश्रूंचें त्याला स्नान घडलें. कंसाचें उत्तरकार्य संपतांच त्याचा वृद्ध व नीतिमान् पिता उग्रसेन याच्या हवालीं राज्य करून कृष्ण व राम आपल्या खऱ्या मातापितरांच्या घरीं राहण्यास गेले. येथें एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, उग्रसेनाचा आग्रह असतांही कृष्णानें मथुरेच्या गादीवर बसण्याचें कबूल केलें नाहीं व आपल्या हातानें राजमुकुट उग्रसेनाच्या मस्तकावर ठेविला. ही निस्पृहपणाची कमाल आहे असें कोण कबूल करणार नाहीं ? नंदाच्या घरीं राहिल्यामुळें क्षत्रियास योग्य असे जे उपनयनादि संस्कार शिल्लक राहिले होते ते सर्व वसुदेवानें यथासांग करून त्या पुत्रद्वयास उज्जनीस संदीपन गुरूंच्या आश्रमीं वेदाध्ययन व धनुर्विद्या संपादन करण्यासाठीं ठेविलें. अल्प कालांत त्यांनीं या विद्या अवगत करून घेतल्या. अनेक प्रकारें गुरूची सेवा करून त्यास या शिष्यांनीं संतुष्ट केलें. गरीब ब्राम्हणपुत्र सुदामा हा त्यांचा गुरुबंधु होता. अध्ययन समाप्त झाल्यावर राम व कृष्ण मथुरेस परत आले. व्रजवासियांप्रमाणेंच मथुरेंतील आबालवृद्ध त्यांच्यावर अत्यंत प्रेम करूं लागले. कंसाच्या दोन पट्टराण्या अस्ति व प्राप्ति या जरासंध राजाच्या मुली होत्या. त्यांनीं आपल्या प्रिय भर्त्याच्या नाशाबद्दल रामकृष्णांचा सूड उगवावा अशी आपल्या पित्यास विनंति केली. जरासंध हा पराक्रमी सार्वभौम राजा असून त्याचे अनेक आश्रित संस्थानिक होते. करुष देशाचा राजा दंतवक्र, चेदि देशाचा शिशुपाल, विदर्भाचा भीष्मक व त्याचा युद्धकुशल पुत्र रुक्मी, काश्मीर देशाचा गोनर्द, सौवीरचा शैब्य, तसेंच काशी, विदेह, मद्र,

त्रिगर्त, शाल्व, दरद वगैरे देशींचे राजे यांच्या मदतीनें जरासंधानें मथुरेस वेढा दिला. कृष्ण व राम यांच्या सेनापतित्वाखालीं हल्ला परतविण्याचें काम चालू झालें. अनेक राजांचा पराभव होऊन शेवटीं २८ दिवसांनीं वेढा उठवून जरासंध आपल्या राजधानीस परत गेला. परंतु पुनः युद्धसामग्रीची जुळवाजुळव करून तो परत आला तेव्हां आपणामुळें मथुरेवर हा अनर्थ कोसळतो हें ध्यानीं आणून कृष्णानें बलरामासह मथुरा सोडून दक्षिणदेशीं जाण्याचा विचार ठरवून तो निघून गेला. हें वर्तमान जरासंधास समजतांच त्यानें मथुरेस वेढा घालण्याचा बेत रहित केला. परंतु जरासंधानें त्याच्या मागून जाऊन गोमत पर्वताच्या पायथ्याशीं त्यास गांठिलें. पुढें जरासंधाच्या सेनेचा पराभव होतांच तो स्वदेशीं परत गेला. कृष्णानें पुनः मथुरेची वाट धरली. रस्त्यांत करवीरचा राजा शृगाल यास त्यानें द्वंद्वयुद्धांत ठार केलें व त्याच्या पुत्रास सिंहासनावर बसवून तो मथुरेस आला. या वेळीं कृष्ण सुमारें २२।२३ वर्षांचा होता. याच सुमारास त्याची आत्या कुंती ( वसुदेवाची बहीण ) हिजला पंडूच्या निधनामुळें वैधव्य प्राप्त झालें. तेव्हां अक्रुरास हस्तिनापुरास पाठवून आपल्या आतेभावांचा ( धर्म, भीम व अर्जुन ) प्रेमानें सांभाळ करावा असा निरोप कृष्णानें धृतराष्ट्रास कळविला. मथुरेंत परचक्राची भीति नसल्यामुळें सुबत्ता नांदूं लागली. लवकरच कुंडनपुरीं भीष्मक राजानें आपली मुलगी रुक्मिणी हिचें स्वयंवर करण्याचा बेत ठरवून देशोदेशींच्या राजांस निमंत्रण केलें. परंतु तो व त्याचा मुलगा रुक्मी हे जरासंधाच्या पक्षाचे असल्यामुळें कृष्णास निमंत्रण गेलें नव्हतें. रुक्मिणीच्या मनांतून कृष्णासच वरण्याचें होतें; परंतु हा योग कसा जुळून येईल हें तिला समजेना. इतक्यांत कृष्णाची स्वारी तेथें येऊन थडकली. हा मूर्धाभिषिक्त राजा नसून त्याला या स्वयंवरास येण्याचा अधिकार नाहीं असें शिशुपाल वगैरे राजांनीं प्रतिपादन करतांच कृष्णाच्या वतीच्या कित्येक राजांपैकीं एकानें आपलें राज्य त्यास अर्पण करून मूर्धाभिषेकही केला. तेव्हां विरुद्ध पक्षीयांस राग येऊन ते स्वदेशीं निघून गेले. कृष्णानें मित्राचें राज्य परत दिलें व तोही मथुरेस निघून गेला. अर्थात् स्वयंवराचें काम बंद पडलें. जरासंध व कालयवन ( हाच कालियानाग असावा ) यांनीं पुनः मथुरेवर हल्ला केला. त्यास कृष्णानें युक्तीनें दुसऱ्याकडून ठार करविलें. स्वतःमुळें पुनः पुनः मथुरेवर अनर्थ कोसळतो असें लक्षांत आणून कृष्णानें ती नगरी सोडून जाण्याचा निश्चय केला व पश्चिमेस द्वारकाबेटावर त्यानें यादवांसह जाऊन वसाहत केली.

द्वारकेची नगररचना फार सुंदर अशी करण्यांत आली. या ठिकाणीं याद-वांची संतति व संपत्ति या बाबींत दिवसेंदिवस बढती होत गेली व लोक द्वार-केस इंद्रपुरीची उपमा देऊं लागले. कृष्ण द्वारकेंत येऊन राहिल्यावर रुक्मिणीच्या विवाहाचा विचार चालून तिला रुक्मीच्या सल्ल्यानें शिशुपालास देण्याचें ठरलें. कृष्णाचें मन रुक्मिणीवर व रुक्मिणीचें कृष्णावर होतें. रुक्मिणीकडून यासंबं-धानें पत्र मिळतांच ऐन लग्नसमारंभाच्या वेळीं कृष्णानें कुंडिनपुरास जाऊन तिचें युक्तीनें हरण केलें व तिला रथांत बसवून तो द्वारकेस आला. या वेळीं कृष्णाचें वय २५ व तिचें १८ वर्षांचें असावें. सुमुहूर्तावर कृष्णरुक्मिणीचा विवाह झाला. कालेंकरून प्रद्युम्न हा अत्यंत सौंदर्ययुक्त पुत्र त्यांस झाला. हिच्याशिवाय कृष्णाला आणखी सात बायका होत्या. त्यांचीं नांवें सत्यभामा, नाग्नजिती सत्या, सुदत्ता, लक्ष्मणा, जांबवंती, मित्रविंदा व कालिंदी अशीं होतीं. त्यांच्या पोटीं अनेक वीरपुत्र व वीरकन्या झाल्या. जांबवंतीचा पुत्र सांब हा मोठा वीर होता. कृष्णाचें सर्व भार्यांवर सारखें प्रेम असे व त्यांच्या सहवासांत तो आनंदानें काल घालवी. या निरनिराळ्या स्त्रियांशीं कारणपरत्वें कृष्णाचा विवाह झाल्याचें भागवतांत लिहिलें आहे. कृष्णानें आपल्या वृद्ध पित्याच्या हस्तें अनेक यज्ञ करवून सत्पात्रीं दानधर्म केला. याप्रमाणें गृहस्थाश्रमांत राहून कृष्णानें मध्य वयाच्या पूर्वार्धाचा काल द्वारकेंत घालविला.

कृष्णाचे आतेभाऊ धर्म, भीम व अर्जुन यांचा धृतराष्ट्राचे पुत्र द्वेष करीत व पुढें त्यांचा नाश करण्याच्या मार्गास ते लागले. त्यांचा नाश झाला असतां सबंध राज्याचा उपभोग घेण्यास सांपडेल या दुराशेनें धृतराष्ट्रपुत्रांनीं लाखेचें घर तयार करून त्यांत पंडुपुत्रांस ठेविलें व एके रात्रीं त्यास आग लावून दिली. पांडवांनीं वेळींच आपल्या चुलतबंधूंचें कपट जाणून त्या लाक्षा-गृहांतून पाय काढल्यामुळें ते सुरक्षित राहिले. धृतराष्ट्र व त्याचे पुत्र, पांड-वांचा कांटा काढून टाकला अशा समजुतींत असतां द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं पांडव प्रकट झाले. त्यांनीं द्रौपदीस पणांत जिंकल्यावर तिचा पांचही पंडुपुत्रांशीं विवाह झाला. आपले आतेभाऊ जिवंत असल्याचें पाहून कृष्णास अत्यानंद झाला. ही बातमी धृतराष्ट्रपुत्रांस समजली तेव्हां त्यांस अशी धास्ती पडली कीं यादव व पांचाळ यांची मदत घेऊन पांडव आपल्या हक्काचा प्रदेश मागण्यासाठीं कुरुप्रदेशावर स्वारी करतील. तेव्हां त्यांनीं विदुरास द्वारकेस पाठवून कृष्ण, कुंती व पांडव यांस हस्तिनापुरीं बोलावून आणिलें. यमुनेच्या

कांठचा अरण्यमय प्रदेश पांडवांस देऊन हस्तिनापुर असलेला गंगेच्या कांठचा सुपीक प्रांत कौरवांनीं ठेवून घेतला. श्रीकृष्णाच्या सल्ल्यानें पांडवांनीं या नवीन प्रदेशांत खांडव वनाच्या शेजारीं इंद्रप्रस्थ हें राजधानीचें शहर स्थापन केलें. आतेभावांची याप्रमाणें नवीन प्रांतीं स्थापना करून देऊन कृष्ण द्वारकेस गेला. द्रौपदीस तर तो बहिणीप्रमाणें मानूं लागला. पांडवांची दिवसेंदिवस भरभराट होत गेली. अर्जुनानें कांहीं दोष निवारणार्थ बारा वर्षें तीर्थयात्रा केली. शेवटीं द्वारकेहून परत घरीं येत असतां बलरामाची बहीण ( कृष्णाची सावत्र बहीण ) सुभद्रा हिचें अर्जुनानें युक्तीनें हरण केलें. पुढें त्यांचा विवाह यथाविधि करण्यांत आला. त्यानंतर पांडवांनीं कृष्णाच्या सल्ल्यानें खांडव वन जाळून तेथील विस्तृत प्रदेश वसाहतीस योग्य होईल असें केलें. पांडवांचें वैभव शिखरास पोहोंचलें. मयासुर नांवाच्या कारागिरानें इंद्रप्रस्थास आपल्या कलाकुसरीच्या कामाच्या योगानें स्वर्गपुरीचें रूप प्राप्त करून दिलें. पांडवांच्या पराक्रमाची कीर्ति दिगंतरीं पसरली.

आपल्या चुलत भावांस निर्जन असा प्रदेश देऊन सुपीक प्रांत आपण ठेवून घेतला. असें असतां पांडवांचें वैभव फारच वाढलें, हें पाहून कौरवांच्या अंतः-करणांत मत्सर व द्वेष उत्पन्न झाला. तशांत पांडवांनीं लवकरच राजसूययज्ञ करून देशोदेशींच्या राजांना व कौरवांना निमंत्रण केलें. त्या वेळीं त्यांची संपत्ति पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले. पांडवांची संपत्ति कशी हरण करावी हा विचार कौरवांनीं त्या वेळेपासून चालविला होता हें सांगणें नकोच. राजसूययज्ञ करण्या-पूर्वीं श्रीकृष्णानें अशी सल्ला दिली कीं तो निर्विघ्नपणें पार पडण्यास दुष्ट व बलिष्ठ असलेल्या जरासंधाचा नाश करणें अगत्याचें आहे. तेव्हां धर्मराजानें अर्जुन व भीम यांस कृष्णासह मगध देशाला पाठविलें. त्यांनीं जरासंधास द्वंद्वयुद्धास आव्हान केलें. या मल्लयुद्धांत जरासंध भीमाकडून मारला गेला. जरासंधानें कैदेंत टाकलेल्या अनेक क्षत्रियांस कृष्णानें बंधमुक्त करून त्यांचें राज्य त्यांच्या पुत्रांच्या स्वाधीन केलें व भीम व अर्जुन यांसह श्रीकृष्ण इंद्रप्रस्थास आला. कृष्णानें जरासंधास मारविलें असून त्याचें प्रस्थ दिवसेंदिवस वाढत चाललें आहे असें पाहतांच कृष्णाचा हेवा करणारा पौंड्रक वासुदेव ( वसुदेवाचा पुत्र ) हा त्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं आला. पौंड्रक वासुदेव कृष्णाप्रमाणेंच वनमाला व शंखचक्रादि आयुधें धारण करून आपण श्रीविष्णूचा अवतार आहे असें भासवीत असे. कृष्णानें या भोंदूस गांठून त्याचें शिर आपल्या चक्रानें तोडिलें. असो.

युधिष्ठिरानें आपल्या चारही बंधूंस चार दिशा जिंकण्यासाठीं पाठवून आपलें स्वामित्व अनेक देशांवर प्रस्थापित केल्यावर मांडलिकांस निमंत्रण करून राजसूययज्ञ मोठ्या थाटानें चालविला. या समारंभांत देवांस हवींनीं, ब्राह्मणांस दक्षणांनीं, राजे लोकांस अनुपम सत्कारांनीं व इतर जनांस उत्तमोत्तम पक्वान्नांनीं संतुष्ट केलें. शेवटीं समारंभास आलेल्या मोठमोठ्या व्यक्तींचें पूजन करण्याचा विधि चालू झाला. भीष्माच्या सल्लयानें अग्रपूजेचा मान श्रीकृष्णास देण्यांत आला. तेव्हां शिशुपाल ( जरासंधाचा सेनापति व चेदीचा राजा ) क्रोधायमान होऊन म्हणाला, ‘ पांडव हो, मूर्खासारखे कृष्णास प्रथम मान काय म्हणून देतां ? वृद्ध म्हणून त्याची पूजा करीत असाल तर त्याचा बाप त्याहून जो वृद्ध तो येथें हजर आहे त्याची पूजा करा. आचार्य म्हणून तो श्रेष्ठ असें म्हणावें तर त्यापेक्षां द्रोणाचार्य अग्रमानास योग्य आहेत. वेद जाणणारा म्हणून कृष्ण श्रेष्ठ असें म्हणावें तर प्रत्यक्ष व्यास महर्षि हे येथें हजर असून त्यांच्याइतका वेदविद् दुसरा कोणी नाहीं. राजा म्हणून त्याला हा मान देत असाल तर त्याच्यापेक्षां श्रेष्ठ असे दुर्योधन, भीष्मक, कृतलक्षण, पांड्य, शाल्व, शल्य, रुक्मी वगैरे महान् महान् राजे येथें आहेत. ’ अशा रीतीनें भाषण करून कृष्णाची त्यानें कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली. भीष्मानें कृष्णाची योग्यता सभाजनांस समजावून देऊन शेवटीं असें सांगितलें कीं, ‘कृष्ण हा ज्ञानवृद्ध, बलवृद्ध आणि धनवृद्ध आहे. तो सर्व द्विजांत श्रेष्ठ होय. वेदवेदांगें तो जाणत असून सत्त्वबलसंपन्न असा हा श्रीकृष्ण सर्वांचा आचार्य, पिता व गुरु आहे. ’ असें म्हणतांच शिशुपाल भलतेसलते शब्द बरळूं लागला. पाव प्रहरांत द्वंद्वयुद्धाच्या आव्हानावर गोष्ट येऊन ठेपली. तेव्हां कृष्णानें चक्र फेंकून शिशुपाळास यमसदनास पाठविलें. श्रीकृष्णाचें धाडस, पराक्रम व प्रसंगावधान पाहून सर्व सभा स्तिमित झाली; व शिशुपालाचा वध केल्याबद्दल त्यांनीं कृष्णाची स्तुति केली. यज्ञकार्य योग्य कालीं संपून मंडळी आपआपल्या गृहीं गेली परंतु हा यज्ञ म्हटला म्हणजे जणू काय भारतीयुद्धाच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभच झाला.

राजसूययज्ञानंतर कौरवांनीं धर्म, भीम वगैरे भ्रातृव्यांस व भावजयींस हस्तिनापुरास आणून कपटानें द्यूत ( जुगार ) खेळण्याची व त्यायोगें त्यांच्या राज्याचा अपहार करण्याची युक्ति योजिली. त्यांनीं या कपटकार्यांत कुशल अशा शकुनीची मदत घेतली. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे धर्मानें या खेळांत आपलें राज्य गमाविलें; इतकेंच नाहीं तर स्वतः बंधूंसह तो हरला जाऊन

पांडवांना कौरवांचें दास्य पतकरण्याचा प्रसंग आला. आपली पत्नी द्रौपदी हिला देखील पणास लावून तो पण हरल्यावर दुर्योधनानें तिला दासी असें मानून राजसभेंत बोलाविलें व तिचीं वस्त्रें सर्वांसमक्ष फेडण्यास दुःशासनास सांगितलें. तो नीच तिचें लुगडें फेडूं लागतांच तिनें अत्यंत काकुळतीनें कृष्णाचा धांवा केला. तेव्हां तिचीं अनेक वस्त्रें फेडलीं गेलीं तरी ती नग्न झाली नाहीं असा चमत्कार घडला. शेवटीं दुःशासन थकून खालीं बसतांच सभ्य जनांनीं त्याचा धिःकार करून द्रौपदीची स्तुती केली. धृतराष्ट्रानेंही प्रसन्न होऊन तिला वर मागण्यास सांगतांच आपल्या पतींस दास्यांतून मुक्त करून त्यांचें राज्य परत द्यावें अशी द्रौपदीनें प्रार्थना केली. ती विदुराच्या सांगण्यानें धृतराष्ट्रानें मान्य केली. परंतु त्याच्या पुत्रांनीं पुनः एक वेळ द्यूत खेळून जो हरेल त्यानें बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावा असें ठरविलें. त्याप्रमाणें कपटानें पांडवांस चीत केल्यामुळें त्यांस वनवासास जाणें भाग पडलें.

कृष्णास या द्यूताची व पांडवांच्या दुर्दशेची हकीकत मागाहून समजली. तशांत त्याच्या नगरीवर शाल्वानें स्वारी करून त्यास फार त्रास दिला. हल्लींप्रमाणें या हल्ल्यांत सौभ नांवाच्या आकाशविमानाचा उपयोग शाल्वानें केला असल्याचें भारतांत लिहिलें आहे. पुढें शाल्वाचा पाठलाग करून कृष्णानें त्याचा नाश केला. कांहीं कालानंतर त्यानें पांडवांची वनांत असतांना गांठ घेतली. ज्या कौरवांनीं कपटानें राज्यहरण केलें व महासती द्रौपदीचा अपमान केला, त्यांचा नाश करून पुनः वैभवशिखरीं पांडवांस बसवीन असें कृष्णानें त्यांस आश्वासन दिलें. त्या वेळीं कृष्णाचें वय सुमारें ७० वर्षांचें असावें. त्यानें पुढील तेरा वर्षें द्वारकेंत राहून तपश्चरणांत व वैराग्यांत घालविलीं. या मुदतींत त्यानें उपनिषदांचा अभ्यास केला व तो योगीश्रेष्ठ असल्याबद्दल त्याची कीर्ति पसरली. छांदोग्य उपनिषदांत ( अ. ३—१६-५ ) देवकीचा पुत्र श्रीकृष्ण हा घोर आंगिरसापासून आत्मविद्या शिकला असें सांगितलें आहे.

वनवासांतून परत आल्यानंतर पांडवांनीं कौरवांकडे आपलें राज्य मागितलें; परंतु तें त्यांनीं दिलें नाहीं. कृष्णानें केलेल्या उपदेशाची पर्वा न करतां ते युद्धास सिद्ध झाले. या महायुद्धांत कौरवांच्या वतीनें ११ अक्षौहिणी ( ३३ लक्ष ) व पांडवांच्या वतीनें ७ अक्षौहिणी ( २१ लक्ष ) सैन्य गुंतलें होतें. कृष्णानें दोन्हीपक्षांस मदत देण्याचें कबूल करून कौरवांस सेनेची मदत दिली व पांडवांतील

शूर योद्धा अर्जुन याचें आपण सारथ्य पतकरलें. युद्ध चालू असतां अनेक प्रकारें योग्य सल्ला देऊन त्यानें पांडवांस यश मिळवून दिलें. या घनघोर संग्रामाचें वर्णन ( भारतांत ) वाचलें म्हणजे अंगावर शहारे उठतात. शेवटीं कौरवांचा समूळ नाश होऊन पांडव पुनः सार्वभौम राजे झाले. युद्धाच्या आरंभीं अर्जुनास मोह उत्पन्न होऊन तो युद्ध करण्यास कबूल होईना, तेव्हां कृष्णानें कर्तव्यकर्मा-संबंधानें त्याला अमूल्य उपदेश करून त्याचा मोह दूर केला. हाच उपदेश गीतोपनिषत् किंवा गीता होय. या उपदेशामुळेंच त्याला धर्मसंस्थापक असें मानितात.

भारतीय युद्धाच्या वेळीं कृष्ण सुमारें ८३ वर्षांचा होता. त्यानें आपलें पुढील आयुष्य विदेह्याप्रमाणें ब्रह्मोपासनेंत घालविलें. पुढें यादवांत मद्याचें व्यसन वाढलें. ते संपत्तीच्या मदानें धुंद झाले व अनीतीनें वागूं लागले. तेव्हां त्यांचा अंत होण्याचा काळ समीप आला असें कृष्णानें ताडलें. त्याप्रमाणें लवकरच यादवांत भयंकर रण माजून सर्व वीरांचा नाश झाला. यापूर्वींच बलरामानें संसाराचा त्याग करून तो योगसाधनांत निमग्न झाला होता. त्याच्या आश्रमीं जाऊन कृष्णानें योग्याप्रमाणें ब्रह्मासन मांडिलें व तो ध्यानस्थ बसला असतां एका व्याधानें त्यास मृग असें समजून बाण मारला; त्यायोगें त्याचें प्राणोत्क्रमण झालें. श्रीकृष्ण व बलराम यांचीं प्रेतें शोधून काढून व्रजांनीं त्यांचें और्ध्वदेहिक केलें. अर्जुनास द्वारकेंतील अनर्थाची हकीकत समजतांच तो तेथें आला व सर्व अनाथ स्त्रीपुरुषांस घेऊन आपल्या देशीं जाण्याकरितां द्वारके बाहेर पडतांच समुद्र वाढून श्रीकृष्णानें वसविलेली पवित्र द्वारका पाण्यांत बुडून गेली. निधन-समयीं कृष्णाचें वय १०१ वर्षांचें असावें असें ज्योतिष व गणितशास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे.

## शास्त्रोक्त विधि.

श्रावण वद्य अष्टमीच्या दिवशीं उपोषित राहून मध्यरात्रीस बालकृष्णाची षोडशोपचारें पूजा करावी. पूजनोत्तर सुंठवडा मात्र घ्यावा. दुसऱ्या दिवशीं अष्टमी संपल्यावर भोजन करावें. पूजेसाठीं मृत्तिकेची प्रतिमा आणिली असल्यास ती जलांत विसर्जन करावी. कृष्णजन्माच्या उत्सवाच्या कालासंबंधानें शास्त्रका-रांनीं निश्चित असें कांहींच सांगितलेलें नाहीं. कांहीं कृष्णोपासक रोहिणी नक्षत्र-युक्त अष्टमी असेल तीच तिथि जन्माष्टमी असें मानतात. कित्येक अष्टमी तिथि

असेल त्या दिवशीं मध्यरात्रीस रोहिणी नक्षत्र असो किंवा नसो, त्याच वेळीं कृष्णजन्म झाला असें प्रतिपादन करितात. मध्यरात्रीस मथुरेंत कृष्णाचा जन्म झाला, तथापि दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं गोकुळांत त्याची प्रसिद्धी झाली. यावरून तोच दिवस मुख्य मानून त्या दिवशीं कांहीं लोक जयंत्युत्सव साजरा करितात. या उत्सवास ‘ गोकुळाष्टमी’ असें नांव देण्यांत आलें आहे.

## श्रीकृष्णाचा उत्सव.

महाभारतांतील ज्या श्रेष्ठ व्यक्तींस पूजेचा मान मिळाला त्यांत अग्रेसरत्व श्रीकृष्णास दिलें पाहिजे. तथापि इतर कांहीं श्रेष्ठांची आठवण ठेवण्यांत आली आहे. पांडवांतील वडील बंधु धर्मराज याची पूजा चालू नाहीं. तथापि महाराष्ट्रांत नाशिक येथें असलेल्या पांडुलेण्यांत बुद्धाची जी एक भव्य मूर्ति आहे तिला धर्मराज मानून तिची पूजा श्रावण महिन्यांत प्रत्येक सोमवारीं केली जाते. इतर चित्रें इतर बंधूचीं असेंही मानिलें जातें ! तिसऱ्या श्रावण सोमवारीं लोकसमुदाय विशेष असतो. अज्ञातवासांत असल्यानें अर्जुनानें शमीवृक्षावर आपलें धनुष्य लपवून ठेविलें होतें व पुढें विराट राजाशीं युद्ध करण्याच्या वेळीं तें तेथून आणलें अशी कथा असल्यामुळें सहजच या अत्यंत पराक्रमी वीराची शमीपूजनाच्या वेळीं आठवण होते. कोल्हापूर संस्थानांत **भीमसागिरि** येथें भीमाचें देवालय असून माघ कृ. १३ पासून फाल्गुन शु. ५ मी पर्यंत मोठी जत्रा भरते. तसेंच कान्हेरी ( ठाणें जिल्हा ) येथील लेण्यांत जीं दोन प्रचंड आकाराचीं कोरीव चित्रें आहेत त्यांची (भीमाच्या मूर्तींच्या ठिकाणीं मानून) भक्तीनें पूजा केली जाते. कार्तिक शु. ११ व महाशिवरात्रीच्या दिवशीं या ठिकाणीं जत्रा भरतात. माघ शु. ८ मीस भीष्माचार्यांच्या प्रीत्यर्थ श्राद्ध व तिलतर्पण करावें असें शास्त्रांत सांगितलें आहे. कांहीं ठिकाणीं भीष्माष्टमी पाळतात. परंतु हा दिवस सर्व ठिकाणीं बिनचूक पाळला जातो असें म्हणतां येत नाहीं. तरी श्राद्धादिकांच्या वेळीं भीष्माचार्यांप्रीत्यर्थ तिलांजली देण्याची रूढि द्विजवर्गांत आजही चालू आहे. महाभारताचे लेखक श्रीव्यासमुनी यांच्या प्रीत्यर्थ कार्तिक पौर्णिमा पाळिली जाते. या तिथीस व्यासपूजा करतात. जुन्या काळीं या दिवशीं हरिदास पुराणिकांस बोलवून त्यांस शक्त्यनुसार देणगी दिली जात असे. संन्यासी लोकांची व परंपरागत धर्माचार्यांची त्यांचे शिष्यजन व अनुयायी या दिवशीं पूजा करतात. तसेंच आषाढ पौर्णिमेस

गुरुपूजा करण्याचा प्रघात कांहीं ठिकाणीं आहे. हा दिवस देखील व्यासपूजेचा आहे असें मानतात. गुरूस व्यासाच्या ठायीं मानण्याची ही पद्धति फार प्राचीन असावी असें दिसतें.

कृष्णजन्माष्टमीचा दिवस सबंध हिंदुस्थानांत कमीअधिक प्रमाणानें साजरा करण्यांत येतो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, पुरी वगैरे गांवीं हा उत्सव फार थाटानें साजरा केला जातो. वैष्णवमतप्रतिपादक व प्रवर्तक असे कित्येक आचार्य या देशांत होऊन गेले. त्यांच्यामुळें कृष्णभक्तीचें महत्त्व या देशांत वाढलें. कृष्ण हा बुद्ध किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणें एक विशिष्ट धर्म स्थापन करणारा पुरुष नव्हता. त्यानें धर्माची दिशा दाखवून दिली इतकेंच नाहीं तर सर्व प्रचलित धर्मांची व कालेंकरून अस्तित्वांत येण्याजोग्या अनेक धर्मपंथांची एकवाक्यता करून देऊन ते सर्व एकाच परमेश्वराची प्राप्ति करून घेण्याचे निरनिराळे मार्ग आहेत असें दाखवून दिलें. यामुळें कृष्णास जगद्गुरु हें सार्थ नामाभिधान प्राचीन व अर्वाचीन लोक देत आहेत. कृष्णभक्ति ज्यांच्यामुळें फैलावली असे अनेक आचार्य व साधुसंत आपल्या देशांत होऊन गेले. ( त्यांच्या संबंधाची सविस्तर माहिती ' महाएकादशी ' या सणाच्या विवेचनांत पहावी. ) सध्यां कृष्णाष्टमी साजरी करण्याचा जो प्रकार आहे, तो लक्षांत घेतां श्रीकृष्णासंबंधानें हा उत्सव रूढ होण्यास ज्या गोष्टी कारण झाल्या, त्या लोकांच्या नजरेसमोर आहेत असें दिसत नाहीं. कृष्ण विष्णूचा अवतार आहे, एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष जगद्रक्षक विष्णुदेवता आहे, असें मानून त्याच्या प्रतिमेची पूजा करणें व त्यानें बालवयांत केलेल्या लीला भक्तीनें कथन व श्रवण करणें यांतच आपल्या धार्मिक जबाबदारीची परिसमाप्ति होते असें लोक समजतात. कृष्णजन्म मध्यरात्रीस झाला त्या वेळेपर्यंत पूजेसाठीं अत्यंत भाविक लोक खेरीजकरून विशेष कोणी तिष्ठत बसत नाहींत. कित्येक दिवसा तर बरेच लोक प्रहर रात्रीच्या आंत पूजा आटोपून फलाहार करतात. कित्येकांच्या घरीं गोकुळ वृंदावनाचा तटबंदीचा सुंदर देखावा तयार करून त्यांत कृष्णजन्माचा उत्सव साजरा करतात. सर्व वर्णांचे लोक हा दिवस महत्वाचा मानतात. त्यांतही वैष्णवमतानुयायी हा दिवस विशेष आस्थेनें पाळतात. विष्णूच्या देवालयांत दीपाराधना, पालखीची मिरवणूक, आंदोलनोत्सव, कृष्णलीलेचे खेळ, भागवताचें वाचन, हरिकीर्तन, भजन, नृत्य, गान वगैरे कधीं कधीं प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत चालतात.

## मथुरा, गोकुळ व वृंदावन

येथें लाखों यात्रेकरू या दिवशीं एकत्र जमून कृष्णाच्या ठिकाणीं आपलें तनुमनधन अर्पण करीत असल्याचें दिसून येतें. कृष्णचरित्राशीं मथुरा, गोकुळ व वृंदावन यांचा निकट संबंध असल्यामुळें त्यासंबंधाची माहिती येथें देतों. ब्रह्मवैवर्त पुराणांत अशी कथा आहे कीं, सत्ययुगांत केदार नामक एक उत्तम राजा होऊन गेला. जैगीषव्य ऋषीच्या उपदेशानें त्यानें आपल्या मुलास राज्य देऊन अरण्यवास पतकरला. त्याला वृन्दा नांवाची एक कन्या होती. तिनें आजन्म अविवाहित राहण्याचें व्रत स्वीकारून यमुनातटावर घोर तपश्चर्या आरंभिली. तिला पाहून श्रीकृष्ण संतुष्ट झाला आणि वर माग, असें म्हणतांच वृन्देनें करद्वय जोडून वर मागितला कीं, 'तुम्ही माझे पति व्हा.' कृष्णानें तिची विनंति मान्य करून तिला स्वगृहीं नेलें. ज्या वनांत या राजनंदिनीनें तप केलें त्याला **वृंदावन** असें नांव पडलें. श्रीकृष्णाच्या कालापासून वृंदावनाची ख्याति वाढत गेली असें दिसतें. मथुरानगरीच्या पुढें यमुनेच्या पलीकडे गोकुळ नांवाचें खेडें आहे. त्या ठिकणीं व्रजांचीं गुरें चाऱ्यासाठीं ठेविलीं जात. गोकुळाजवळ गुरें चरत त्या जागेस बृहद्वन ( महावन ) असें नांव आहे. प्राचीन लेखांवरून असें दिसतें कीं, गोवर्धन टेकडीपर्यंत मथुरेचा विस्तार असून तेथें गुरांना चारण्यासाठीं श्रीकृष्ण बालगोपालांसह जात असे. व्रजावर मुसळधारा पाऊन पडून गोपांचीं झोंपडीं जमीनदोस्त झालीं, तेव्हां भयभीत झालेल्या प्रिय गोपांना घेऊन कृष्ण गोवर्धनाच्या आश्रयास गेला व तेथें त्यानें त्यांचा बचाव केला यावरून देखील गोवर्धन हा जवळच्या टापूंत होता हें सिद्ध होतें. यमुनानदी या टेकडीजवळून वहात होती हें देखील जुन्या लेखांवरून सिद्ध होतें; परंतु कालेंकरून यमुनेचा प्रवाह दुसरीकडे वळतां वळतां वृंदावन व गोवर्धन येथून ती गुप्त झाली असून सध्या या दोहोंमध्यें चवदा मैलांचें अंतर पडलें आहे. वृन्दावनांत गोवर्धनगिरि आहे असा उल्लेख स्कंदपुराणांत सांपडतो. वृन्दावनाचा विस्तार ५ योजनें ( वीस कोस ) असल्याचें त्यांत सांगितलें आहे. याच प्रदेशांत निंबवन नामक स्थलीं महर्षि अरुणीचा पुत्र आरुणि नांवाचा एक नैष्ठिक ब्रह्मचारी तपश्चर्या करीत असे. बिंबवनाला बिंबग्राम असें म्हणतात. पुढें कृष्णानें गोकुळ सोडल्यावर वृन्दावनांत गोवर्धनाजवळ आरुणि महर्षीनें ठाणें दिलें. या प्रदेशालाही निंबग्राम हेंच नांव आहे. आरुणीची योग्यता श्रेष्ठ दर्जाची होती असें देवर्षि नारदानें भक्तिसूत्रांत म्हटलें आहे. अजून

या निंबग्रामाला आरुणीची तपोभूमि म्हणून पूज्य मानतात. आरुणि ऋषीला निम्बार्क असेंही म्हणतात. हा सनकसंप्रदायाचा प्रवर्तक होय.

वृन्दावन हा गांव यमुनेच्या कांठावर असून तो विस्तृत होता याची साक्ष सध्यां तेथें असलेल्या नन्दघाट व चीरघाट यांवरून पटते. हे घाट प्राचीन काळीं नदींत स्नान करण्यासाठीं बांधण्यांत आले होते; परंतु यमुनेनें तेथून आपलें ठाणें उठविल्यामुळें आज ते तिच्या प्रवाहापासून कितीतरी कोस दूर असल्याचें दिसून येतें. वृंदावनाहून सध्यांची मथुरा तीन कोस आहे. श्रीकृष्णाच्या कालीं हें अंतर किंचित् जास्त होतें असें दिसतें. कारण वृंदावनवासीयांस मथुरेस जाण्यास दोन प्रहर लागत असें भागवतावरून अनुमान निघतें. वृन्दावन, मथुरा व व्रजभूमि यांच्यावर कुरुक्षेत्रांतील युद्धाचा अनिष्ट परिणाम घडून तेथील शूर व्रजांचा त्या संग्रामांत नाश झाला. अनेक परधर्मीयांनीं या पवित्र भूमीवर रक्तपात केला, तथापि तेथें सनातन धर्माचें ठाणें राहिलें. बौद्धधर्मीयांनीं व्रजभूमीवर आपल्या धर्माची छाप बसविण्याचा प्रयत्न केला व हजारों बौद्ध भिक्षु तेथें वास करून राहिले होते, हें चीनचे प्रसिद्ध यात्रेकरू फाहायन व हुएनत्सिआंग यांच्या लेखांवरून दिसतें; पुढें इ. स. १०१७ त गझनी महंमदानें वीस दिवसपर्यंत मथुरेवर हल्ला करून ती नगरी उध्वस्त केली. इ. स. १५०० त सुलतान शिकंदर लोदी यानें मथुरेचा नाश केला; परंतु त्या वेळीं केशवकाश्मिरी भट्टाचार्य या निंबार्क सांप्रदायी साधूनें शिकंदरास युक्तिप्रयुक्तीनें वश करून तेथून घालविलें. पुढें श्रीकेशवाचार्यांच्या शिष्यशाखेंत अधिकाधिक योग्यतेचे गोस्वामी प्रसिद्धीस येऊन मोंगल, पेशवे वगैरे अधिकारसंपन्न लोकांकडून मथुरेच्या धार्मिक वैभवांत भर पडत चालली. औरंगजेबानें मात्र अनेक देवालयें जमीनदोस्त केलीं. इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यापासून मथुरेंत शांतता नांदत आहे. तेथील ऐतिहासिक स्थानांत असलेलीं गोविंददेव, मदनमोहन, गोपिनाथ, जुगलकिशोर, राधावल्लभ वगैरे पुरातन भग्नमंदिरें प्राचीन इतिहासाची साक्ष पटवीत आहेत. त्यांच्या शेजारीं सध्यां नवीन मंदिरें स्थापन करण्यांत आलीं आहेत. श्रीरंगनाथ शेटजीचें मंदिर, शाहाजीचें मंदिर, लाला बाबूचें मंदिर व श्रीब्रह्मचारीजी ( ग्वाल्हेर महाराजांचें ) मंदिर हीं प्रेक्षणीय आहेत. घाटांपैकीं भरतपूरच्या लक्ष्मीराणीचा घाट दर्शनीय आहे. वंशीवट, सेवाकुंज, शृंगारवट, कैवारवट व निधुवन हीं सुप्रसिद्ध प्राचीन स्थानें होत. वृंदावनांत श्रावण महिन्यांत झुलन किंवा दोलोत्सव अत्यंत प्रेक्षणीय होतो. संयुक्तप्रांतांतील आर्यसमाजानें वृंदावनास आपल्या कार्यक्षेत्राचें केंद्र बनविलें असून

व्रजमंडलऋषिकुल व आचार्यकुल नांवाच्या दोन उत्तम संस्था स्थापन केल्या आहेत. तेथें रामकृष्ण ( परमहंस ) मिशनच्या वतीनें एक धर्मार्थ दवाखाना चालू आहे. यमुनानदीच्या प्रवाहाचा ओघ बदलून तो वृंदावनाजवळून जाईल असें करण्याकडे सरकार व राजेरजवाड्यांचें लक्ष लागलें असून सुमारें आठ लाख रुपये या कामीं खर्च केल्यास वृंदावनास प्राचीन सौंदर्य प्राप्त होईल असें ह्मणतात. श्रीकृष्णाचें नांव अजरामर झालेंच आहे. तथापि अवश्य ती सुधारणा करून वृंदावनास प्राचीन वैभव प्राप्त करून देणें हें सर्व कृष्णभक्तांचें आद्य कर्तव्य होय. श्रीकृष्णाचें हें एक स्मारक आहे असें म्हणतां येईल. आरोग्यदृष्ट्या वृंदावनाची स्थिती बरी नसून ती सुधारण्याचा यत्न सरकार व लोक करीत आहेत ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय.

श्रीकृष्णाचें चरित्र वर दिलें आहे त्यावरून त्यानें आपल्या आयुष्यांत केलेल्या कामांची कल्पना होण्याजोगी आहे. कृष्णाला अवतारांत गणतात. त्याअर्थी अवतार या दृष्टीनें त्याच्या हस्तें कोणतें महत्कार्य घडलें याचा विचार करण्यापूर्वी अवतारकार्याची व्याख्या जी स्वतः श्रीकृष्णानेंच सांगितली तिचा अर्थ नीटपणें समजून घेणें आवश्यक आहे. श्रीकृष्णानें गीतोपदेश करितांना अर्जुनास सांगितलें कीं

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

साधूंचें परित्राण करण्यासाठीं, दुष्कृती करणाऱ्यांचा नाश करण्याकरितां व धर्मसंस्थापनार्थ मी प्रत्येक युगाच्या ठायीं जन्म घेत असतों, असें जें श्रीकृष्णानें सांगितलें, त्याला अनुसरून त्याच्या हस्तें कसें कार्य घडत गेलें हें पाहिलें म्हणजे कृष्ण हा अवतार आहे हें समजण्यास आपणास सुलभ पडेल. प्रथमतः

**‘ परित्राणाय साधूनाम् ’**

या दृष्टीनें कृष्णचरित्राचा विचार करूं. देवकीच्या उदरीं श्रीकृष्णाचा जन्म झाल्यावर त्याला नंद गवळ्याच्या येथें नेऊन ठेवण्यांत आलें. हे गवळी क्षत्रिय होते; परंतु त्यांनीं समशेर चालवून रक्तपात करण्याचा व्यवसाय टाकून देऊन कृषिवलांस योग्य असा गोपालनाचा व गोरसविक्रय करण्याचा धंदा पतकरला होता. अशा व्यवसायांत पडलेले लोक सहजच त्यांच्या युद्धकलाविशारद व राजकार्यांत गुंतलेल्या क्षत्रिय ज्ञातिबंधूंप्रमाणें संपत्तिमान् किंवा अधिकारयुक्त नसावयाचे. वसुदेवाची बहीण पंडुराजास दिली होती. अर्थात् राजघराण्याशीं यादवांचा

श्रीकृष्ण शिष्टाई.



यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

( पृष्ठ २३४ पहा. )

Joshi Art P. Works, Bombay. 1.

संबंध होता, तरी यादवांची स्थिति सांपत्तिकदृष्ट्या बरी नव्हती. ते सच्छील, सदाचारी व प्रेमळ होते. श्रीकृष्ण त्यांच्यांतच लहानाचा मोठा झाला. त्यामुळें त्यांचे सात्विक गुण सहजच त्याच्यांतही विकास पावले. दीन स्थितींत दिवस कंठणाऱ्या गोपगोपींबद्दल त्याच्या अंःकरणांत आदर उत्पन्न झाला. प्रेमाचा विकास होऊन सर्वांठायीं ममत्वबुद्धि प्रस्थापित झाली म्हणजे स्वार्थत्याग हा अनुपम गुण मनुष्याच्या अंगीं उद्भूत होतो. स्वतःचा स्वार्थ न पहातां श्रीकृष्णानें जीं महत्वाचीं कामें केलीं, त्यांचें कारण पाहूं गेल्यास गरीब गोपजनांत त्याचें बालपण मोठ्या आनंदानें गेलें हेंच आहे असें दिसून येईल. निष्कांचन व दहींभाकरीवर निर्वाह करून राहणाऱ्या गवळ्यांत वाढलेला कृष्ण पराक्रमानें प्राप्त झालेल्या राज्यपदाचा उपभोग घेण्यास कबूल न होतां तें योग्य वारसाच्या हवालीं करतो व आपणच चालून आलेलें वैभव लाथाळतो, यापरता श्रेष्ठ स्वार्थत्याग असेल काय ? कंस, जरासंध, शृगाल वगैरे कित्येक आसुरी स्वभावाच्या राजांस यमसदनीं पाठविल्यावर त्यांच्या राज्यावर आपलें स्वामित्व स्थापन करण्याचा विचारच त्याला शिवला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपण होऊन तीं राज्यें त्यानें योग्य वारसांच्या हवालीं केलीं. ज्या यादवांत त्याचें बालवय गेलें, त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा त्यानें यत्न केला. कालेंकरून यादव धनाढ्य झाले व त्यांच्या द्वारका नगरीची इंद्रपुरी हेवा करूं लागली. अत्यंत गरीब गुरुबंधु सुदामा हा श्रीकृष्णाच्या ऐन भरभराटीच्या वेळीं त्याला भेटण्यासाठीं आला, तेव्हां कित्येक आधुनिक धनवान् गुरुबंधूंप्रमाणें दरवाजांतून आपल्या मित्राची बोळवण न करतां अनेक प्रकारांनीं आपलें प्रेम व्यक्त करून कृष्णानें त्याचें दारिद्र्य दूर केलें. पांडव व कौरव हे दोघेही त्याचे आप्त होते. परंतु पांडवांचा पक्ष हा सत्पक्ष आहे हें जाणून त्यांस यश मिळवून देण्यासाठीं सारथ्याचें कमी लेखलें जाणारें काम श्रीकृष्णानें पतकरलें. खांडव वन जाळून नवीन प्रदेश तयार करण्यासाठीं अर्जुनास त्यानें मदत केली. राजसूययज्ञाच्या वेळीं मेजवानींत आचाऱ्यांबरोबर त्यानें काम केलें. अर्थात् साधूंच्या परित्राणासाठीं प्रसंगानुसार जीं उच्च नीच कामें करावीं असें त्याला वाटलें, तीं सर्व त्यानें मोठ्या उत्सुकतेनें केलीं.

हें जग त्रिगुणात्मक असून रज व तम या गुणांपेक्षां सत्वगुण श्रेष्ठ आहे व सत्वस्थ लोकांस ज्या ज्या वेळीं रजोगुणी व तमोगुणी लोकांकडून त्रास होतो, त्या त्या वेळीं सात्विक जनांचें रक्षण करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे, असें

श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें. साध्या व सरळ उपायांनींच साधूंचें परित्राण करितां येतें असें नाहीं. कृष्णानें दुर्योधनाची अनेकपरीनें समजूत घालून कौरव-पांडवांमधील लढा मिटविण्याचा यत्न केला. परंतु तो जेव्हां साधला नाहीं, तेव्हांच पांडवांस युद्धार्थ उभें राहण्याची त्यानें सल्ला दिली. सारांश, साधूंचें रक्षण करून त्यांना दुष्टांच्या हातून सोडविण्याला एकच मार्ग मोकळा असतो आणि तो युद्धाचा, हें जाणून अवतारकृत्यांपैकीं जें एक कृत्य

## ‘विनाशाय च दुष्कृताम्’

तेंही श्रीकृष्णानें उत्तम प्रकारें पार पाडलें. बालवयांत कालियानाग व मधुकैटभ यांच्या त्रासापासून व्रजास मोकळें केलें. कंसास निजधामास पाठवून मथुरेंतील लोकांच्या मागचा त्रास नाहींसा केला. नरमेध करण्यापर्यंत मत्त झालेल्या जरासंधास यमसदनीं पाठवून अनेक राजांस बंधमुक्त केलें. शिशुपाळ, शृगाल वगैरे गर्विष्ट व नीच प्रवृत्तीच्या राजांच्या जीवनावर घाव घालून प्रजेस सुखी केलें. शेवटीं दुर्योधनादिक दुष्ट, मत्त व जुलमी कौरवकुलाचा नाश करण्यासाठीं अर्जुनाचें सारथ्य पतकरून त्यांचा पांडवांकरवीं नाश करविला. आपले सगेसोयरे जे यादव ते दुर्व्यसनांत सांपडून अघोर कृत्यें करूं लागले हें पहातांच त्यांजवरील प्रेमास फांटा देऊन भू-भार कमी करण्यासाठीं त्यांचा नाश करण्यास श्रीकृष्णानें मागेंपुढें पाहिलें नाहीं. याप्रमाणें दुष्कृताचा विनाश करण्याच्या कामीं त्यानें अलौकिक पराक्रम, साहस, बल व निश्चय हीं जगाच्या निदर्शनास आणून दिलीं. अवतारकृत्यांपैकीं तिसरें आणि अत्यंत महत्वाचें

## धर्मसंस्थापनेचें कार्य

श्रीकृष्णानें केलें. त्या कालीं धर्मसंस्थापना करण्याची काय जरुरी होती हा प्रश्न सहज उद्भवतो. श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें कीं,

> यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
> अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

हे भारता, जेव्हां जेव्हां धर्माला क्षीणता येते आणि अधर्माचें प्राबल्य होतें, तेव्हां तेव्हां मी जन्म घेतों. अर्थात् ज्या अर्थीं धर्मसंस्थापनेचें कार्य श्रीकृष्णास भारतकालीं करणें प्राप्त झालें, त्या अर्थीं अधर्माचें प्राबल्य कसें झालें होतें हें पाहूं. मुख्यतः समाजाची घडी नीट राहून व्यवहार सुरळीत चालण्यास या लोकीं धर्म,

अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ उत्तम प्रकारें कसे प्राप्त करून घ्यावे याचें योग्य ज्ञान लोकांस असावें लागतें. समाजांत केवळ सात्विक वृत्तीची वाढ झाली ह्मणून प्रगति होत नाहीं. इहलोकीं व परलोकीं सद्गति प्राप्त होण्यास सत्त्व रज व तमोगुणांनुसार योग्य कर्मे समाजनायकांच्या हस्तें घडलीं पाहिजेत. पुरुषार्थासंबंधीं भलत्याच कल्पना लोकांत रूढ झाल्या ह्मणजे त्याचा परिणाम विपरीत व्हावयाचा. एका बाजूनें प्रवृत्तिपर वर्तनाचा जोर तर दुसरीकडून निवृत्तीचें बंड माजावयाचें. प्रवृत्तीच्याच मार्गाला लागणें खऱ्या उन्नतीच्या दृष्टीनें जितकें अनिष्ट आहे, तितकेंच निवृत्तिपर कर्मांत अगदीं गढून जाणें अहितकारक आहे. या दोहोंत समतोलपणा राहिला पाहिजे. प्रवृत्ति व निवृत्ति किंवा निवृत्तिपर प्रवृत्ति असणें हें अत्यंत आवश्यक आहे. यांच्यांतील समतोलपणा चुकला ह्मणजे समाजाचाही समतोलपणा चुकलाच. याचा परिणाम असा व्हावयाचा कीं समाजास कोणत्या दिशेनें पाऊल टाकावें हें न समजतां तो भलतीकडे जावयाचा. ही स्थिति सुधारण्यासाठीं धर्मसंस्थापक पृथ्वीतलावर वेळोवेळां जन्मास आले आहेत. सर्व धर्मसंस्थापकांनीं हेंच कार्य केलें आहे. हें सूक्ष्मरीत्या विचार केला असतां दिसून येईल.

पांडव व कौरव हे त्या कालचे निवृत्ति व प्रवृत्तीचे पुरस्कर्ते होते असें म्हणतां येईल. एका पक्षानें संन्यस्त वृत्तीचा स्वीकार केला तर दुसऱ्यानें सर्वथैव प्रवृत्तीस पोटाशीं धरिलें. यामुळें प्रत्येक ठिकाणीं धर्माधर्माचा व कर्तव्याकर्तव्याचा विचार करीत पाऊल टाकणारे पांडव जसे भीत भीत ऐहिक कर्तव्यकर्में आचरीत त्याचप्रमाणें दुर्योधन व त्यांचे जरासंध वगैरे मित्र बेफाम होऊन प्रवृत्तिपर अनन्वित कृत्यें बिनदिक्कत करण्यांत गढून गेलेले असत. धर्म, अर्जुन वगैरे निवृत्तिपंथीय समाजाचे नेते कर्तव्यकर्मांपासून परावृत्त होऊन धर्मसंबंधीं भलत्याच कल्पनांस आपल्या डोक्यांत थारा देऊन बसले होते. पापपुण्याचे भ्रामक विचार त्यांच्या मनांत घोळत असल्याकारणानें जगांतील व्यवहारांचा तात्त्विकदृष्ट्या विचार करण्याची शक्ति त्यांच्यांत राहिली नव्हती. अनेक देवतांची उपासना, त्या देवतांस संतुष्ट करण्याचे अनेक यज्ञयागादिक उपाय, मोहाच्या योगें बुद्धिनाश झाल्यामुळें कर्तव्यपराङ्मुखता, देह व आत्मा यांच्यासंबंधानें योग्य ज्ञानाचा अभाव, वेदांबद्दल अंधश्रद्धा, समाजाच्या अंगीं सद्धर्मरहस्य कोणतें हें पारखण्याची अपात्रता, केवळ जन्मावरून वर्णांचा उच्चनीचपणा मानण्याची दूषित पद्धति वगैरे किती तरी गोष्टी श्रीकृष्णानें पाहतांच योग्य संधि साधून सद्धर्माचा उपदेश

अर्जुनास केला व त्याचा मोह घालवून त्याला योग्य कर्म करण्यास प्रवृत्त केलें. या दिव्य उपदेशाला भगवद्गीता असें म्हणतात. प्रवृत्तीपासून परावृत्त करून निवृत्तीच्या मार्गास ओढून आणण्यास हा गीतोपदेश जसा समर्थ आहे तसाच तो निवृत्तिपरायणास सत्कर्तव्याची दिशा दाखवून देणारा आहे. हिंदुस्थानांत आज शेंकडों वर्षें या उपदेशाचा पगडा समाजावर बसलेला असून आडवाटेनें जाणारांस तो पुनःपुनः शुद्धीवर आणीत आहेत. अज्ञानतमाचा नाश करणारा हा कोटिभास्करतुल्य प्रकाश आहे. या गीतामृतपानाच्या योगानें या देशांत अनेक आर्यांस परंधाम व शांतता यांचा लाभ झाला आहे. स्त्रिया, शूद्र, पतित व चांडाल मानलेल्या लोकांसही हा दिव्य उपदेश देणाऱ्या गुरूनें स्वर्गाचें द्वार खुलें करून दिलें आहे. सध्यांच्या कालीं तर या भगवंत मानलेल्या श्रीकृष्णाच्या वाणीचा मधुर आलाप पृथ्वीच्या पाठीवरील सर्व धर्मियांच्या व सर्व मनोवृत्तींच्या लोकांच्या कर्णरंध्रीं पडल्यामुळें त्यांस अत्यानंद होऊन जगाकडे ते नव्या व शुद्ध दृष्टीनें पाहूं लागले आहेत. श्रीकृष्णानें बुद्धिवादास धरून कथन केलेला हा एकांतिन् भक्तीचा धर्म परमवंद्य होऊं लागला आहे. या दृष्टीनें पहातां श्रीकृष्ण हिंदुस्थानापुरता धर्मकथन करणारा महात्मा होऊन गेला असें न म्हणतां तो सर्व जगासाठीं विश्वधर्म सांगणारा धर्मसंस्थापक आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

ज्या भगवद्गीतेवर शेंकडों टीकात्मक ग्रंथ होऊन गेले व आजही होत आहेत, जिचा अर्थ सुबोध करून जनांचा उद्धार करण्यासाठीं श्रीशंकराचार्य, ज्ञानेश्वर, वामनपंडित, विद्वद्वर्य टिळक वगैरे संस्कृत व प्राकृत भाषाभिज्ञ जनांनीं प्रयत्न केला आहे, जिची महती जगावरील सर्व विद्वान् गात आहेत, तिचें योग्य कथन या लहानशा लेखांत करणें शक्य नाहीं. तेव्हां सामान्यतः या गीतोपदेशाची अल्पस्वल्प ओळख व्हावी ह्मणून अत्यंत संक्षेपरूपानें तो पुढें देत आहों. प्रत्येक आर्य ह्मणविणारानें गीतेचें पठण करून आपल्या कर्तव्यकर्मांची दिशा समजून घेतली पाहिजे. तसें न करणारा आर्य या नामाभिधानास पात्र होणार नाहीं.

## भगवद्गीतोपदेश.

या शरिराला क्षेत्र असें नांव असून शरीरास जाणणाराला क्षेत्रज्ञ असें ह्मणतात. परमेश्वर हाच क्षेत्रज्ञ होय. क्षेत्राहून क्षेत्रज्ञ वेगळा. क्षेत्र ह्मणजे देह व क्षेत्रज्ञ तो देही किंवा आत्मा. आत्मा हा नित्य, अविनाशी आणि अप्रमेय ( पूर्णपणें समजावयाचा नाहीं. ) असा आहे. हा अजन्मा पुराणपुरुष आहे. मनुष्य जसा जुनीं वस्त्रें टाकून दुसरीं नवीं

**देह व देही.**

घेतो तसा हा देही जुना देह टाकून नवा देह घेतो. आत्मा हा अव्यक्त, अचिंत्य व अविकार्य आहे. देहाला इच्छा, द्वेष, सुख, दुःख, चेतना, धैर्य, जन्ममरण वगैरे यांची बाधा आहे. आत्मा यापासून मोकळा. यासाठीं जन्माबरोबर आपणावर आलेली जबाबदारी स्मरून आपल्या वांट्यास आलेलें योग्य कर्म करण्यास मनुष्यानें मागेंपुढें पाहूं नये.

कर्म हें शेवटपर्यंत करीत राहिलेंच पाहिजे. कर्मापासून कोणीच सुटला नाहीं.

**कर्मयोग.**

परंतु इतकें मात्र ध्यानीं असावें कीं, कर्म करण्यापुरता मात्र मनुष्याचा अधिकार. फलाच्या ठायीं कदापि नाहीं. यासाठीं योगयुक्त होऊन मीपणा सोडून कर्माचें आचरण करावें. लाभ अलाभ, सिद्धि, असिद्धि यांच्या ठायीं समबुद्धि ठेवावी. या समबुद्धीलाच योग असें म्हणतात. कर्माच्या फलाची आसक्ति सोडणारे जन्मबंधापासून मुक्त होऊन सायुज्यपदाला जातात. आपलें नेमलेलें कर्म केलेंच पाहिजे. तें केल्याशिवाय चालावयाचें नाहीं. विद्वानानें जनतेला सुमार्ग लावण्याची इच्छा धरावी. आपण आसक्तिविरहित कर्म करून अज्ञजनांस धडा घालून द्यावा. श्रेष्ठ लोक जसे चालतात तसेच इतर लोक चालतात हें नेहमीं लक्षांत ठेवावें.

कर्माचा त्याग करावा असें कोणी ह्मणतात. परंतु त्यांना असें समजत नाहीं कीं

**कर्मत्याग व मनोविजय.**

कर्म न करणें हा कांहीं कर्मत्याग नव्हे. फलेच्छारहित कर्म करणें हाच कर्मत्याग समजावा. कर्माच्या फलाची आसक्ति सोडून, जो योग्य कर्म आचरितो तोच खरा संन्यासी आणि तोच खरा योगी; ज्यानें लौकिक कर्मांचा त्याग केला तो नव्हे. जो निष्काम झाला, जो रागद्वेषापासून मुक्त झाला, सर्वत्र ज्याला ब्रह्म दिसतें त्याला ब्रह्मप्राप्ति होते. आपणच आपला उद्धार करून घेतला पाहिजे. आपला आपणच हितकर्ता आणि आपला आपणच शत्रू हें सदैव ध्यानीं ठेवावें. ज्यानें स्वतः विवेकानें आपलें मन जिंकिलें तो आपलें हित करून घेतो; परंतु जो अविवेकी तो आपणच आपला शत्रू बनतो. अंतःकरण फार शांत ठेवून, निर्भय होऊन, ब्रह्मचर्यव्रतानें राहून, मनाचा उत्तम प्रकारें निरोध करून, परमेश्वराच्या ठायीं चित्त ठेवून, परमेश्वर हेंच सर्वस्व मानून रहावें. याप्रमाणें चित्ताचा निरोध करणारा शेवटीं निर्वाणशांति पावतो. मन स्वभावतः चंचल आहे, यासाठीं अभ्यासानें तें जिंकिलें पाहिजे. धैर्याच्या साधनानें बुद्धीला आपल्या स्वाधीन ठेवून, हळूहळू विषयांपासून मागें सरावें. मनाला उत्तम रीतीनें आपल्याठायीं निश्चल करावें व त्या मध्यें भलत्यासलत्या कल्पना न आणतां स्थिर रहावें.

परमेश्वराला ज्या प्रकारें लोक भजतात त्या प्रकारचेंच फळ तो देतो. मनुष्यें कोणत्याही पंथानें परमेश्वराचें पूजन करीत असोत, तथापि त्याच्याकडे जाण्याचा जो मार्ग त्यालाच येऊन तीं मिळतात. रोगपीडित, जिज्ञासु ( ह्मणजे आत्मज्ञान मिळवूं इच्छिणारे, ) अर्थार्थी (ह्मणजे भोगसाधनांची इच्छा करणारे) व ज्ञानी असे चार प्रकारचे लोक ईश्वराला भजतात. त्यांत ज्ञानी श्रेष्ठ होत. वार्धक्य आणि मृत्यु यांपासून सुटण्यासाठीं परमेश्वराचा आश्रय करून जे प्रयत्नानें झटतात, ते तें ब्रह्म जाणतात, सर्व अध्यात्म जाणतात आणि सर्व कर्म जाणतात. अंतकाळीं ईश्वराचें स्मरण करीत जो देह सोडून जातो, तो ईश्वर स्वरूपीं मिळून जातो. अनन्य चित्तानें सदासर्वदा ईश्वरस्मरण करणाऱ्या निरंतर समाधानयुक्त योग्याला परमेश्वर प्राप्त होतो. ज्याच्यांत सर्व भूतमात्राचा अंतर्भाव होतो आणि ज्याच्या सामर्थ्यानें हें सर्व चाललें आहे, तो परमपुरुष अनन्यभक्तीनेंच प्राप्त होतो. परमेश्वराच्या ठायीं चित्त ठेवून व जीव लावून, परस्परांना ईश्वराविषयीं बोध करीत सर्वकाळ संतोष पावतात ते सर्वदा समाधान चित्तानें राहून प्रीतिपूर्वक भजनाच्या योगानें ईश्वराला प्राप्त करून घेतात. जे अनन्यभावानें ईश्वराचें चिंतन करून सर्वदा स्थिरचित्तानें त्याला भजतात, त्यांच्या योगक्षेमाची काळजी ईश्वरच वाहतो. ईश्वराप्रीत्यर्थ शुद्ध चित्तानें व भक्तीनें अल्प जरी अर्पण केलें तरी त्या भक्तीच्या उपाहाराचा स्वीकार तो मोठ्या प्रेमानें करतो. जें कांहीं आपण करितों, जें खातों, जें दान करितों, तें सर्व ईश्वराला अर्पण होवो अशा बुद्धीनें करीत जावें. असें केल्यानें कर्मांच्या बंधनापासून मनुष्य मुक्त राहील व असा मुक्त झालेला मनुष्य ईश्वराप्रत जाऊन पोहोंचेल. परमेश्वर सर्व भूतांशीं समबुद्धीनें वागतो; परंतु त्याच्याशीं जे भक्तीनें वागतात ते ईश्वराच्या ठायीं व ईश्वर त्यांच्या ठायीं आहे. भक्तीच्या योगानें कोणत्याही स्थितींत मनुष्यास ईश्वरप्राप्ति होईल. उच्चनीच भाव ईश्वराच्या घरीं बिलकुल नाहीं.

**भक्तियोग.**

ज्ञानयोग हा सर्वांत श्रेष्ठ होय. जो श्रद्धावान् आहे, ज्याची ज्ञानाच्याच ठायीं एकनिष्ठा आहे, ज्यानें इंद्रियांचा संयम केला आहे, त्याला ज्ञान प्राप्त होतें. ज्ञानप्राप्तीच्या योगानें त्वरित मोठी शांति लाभते. जो अज्ञानी आहे आणि ज्याला श्रद्धा नाहीं, ज्याचें मन सदा संशयी तो नाश पावतो. त्याला हा लोकही नाहीं, परलोकही नाहीं आणि सुखही नाहीं. आत्मज्ञानानें ज्याचें अज्ञान नाहींसें झालें आहे त्याचें तें

**ज्ञानयोग.**

आत्मज्ञान परमेश्वराच्या स्वरूपाला प्रदर्शित करितें. परमेश्वराच्या ठायीं जे आपली बुद्धि आणि आपलें मन लावितात, आपली निष्ठा ठेवितात आणि सर्वदा त्यामध्येंच निमग्न असतात, त्यांच्या ज्ञानानें त्यांचें पातक धुऊन जाऊन, ते पुनर्जन्मापासून सुटतात. जे ज्ञानी आहेत त्यांना आपपरभाव किंवा उच्चनीच भाव शिवत नाहीं. त्यांची दृष्टि सर्वांवर समान असते. ज्यांच्या मनामध्यें समता उत्पन्न झाली त्यांनीं या लोकीं असतांच संसार जिंकिला. कारण कीं, ब्रह्म, हें निर्दोष आणि सर्वत्र समान आहे ह्मणून ब्रह्माच्या ठायीं तें स्थिर झालें. सर्व कर्मांचें जें फळ त्याचा अंतर्भाव ज्ञानाच्या फळामध्यें होतो.

**परमेश्वरी माया.**

सर्व जड पदार्थांचें अत्यंत मूळचें जें स्वरूप त्याचें नांव प्रकृति. प्रकृतीचा जो चैतन्यरूप चालक त्याला पुरुष म्हणतात. तोच परमात्मा. जीव हा परमात्म्याचाच अंश. प्रकृति आणि पुरुष हीं दोन्ही अनादि. प्रकृतीच्या अंगीं सत्वगुण, रजोगुण व तमोगुण असे तीन गुण ह्मणजे शक्ती आहेत. रजोगुण ह्मणजे चंचलता, सत्वगुण ह्मणजे प्रौढता आणि तमोगुण ह्मणजे मंदता. यांत सत्वगुण हा श्रेष्ठ प्रकृतीच्या ठायीं या गुणांचा जसजसा उत्कर्ष किंवा अपकर्ष होईल तसतशीं कार्यें घडतात. त्यांच्याचयोगानें सृष्टीची सर्व घडामोड चालली आहे. या तीन गुणांच्या उत्कर्षापकर्षांचें मर्म काय ही मोठी गूढ गोष्ट आहे. परमेश्वराची अगाध माया ती हीच. परमेश्वराच्या आधारानें सर्व ब्रह्मांडें माळेंतील मण्याप्रमाणें ओंविलीं गेलीं आहेत. ही अति दिव्य आणि त्रिगुणात्मिका ईश्वरी माया ह्मणजे विलक्षण शक्ति फार दुस्तर आहे. जे अनन्यभावानें ईश्वराला भजतात ते या मायेला तरून जातात. सर्वांचा अधिपति असा जो परमेश्वर त्याच्या आश्रयानें प्रकृति सर्व चराचराला उत्पन्न करिते. यामुळें सर्व जगत् पुनःपुनः उदयास येतें. मूर्ख मनुष्य व्यर्थ अहंकार धरून ह्मणतो "मीं अमुक केलें, मीं तमुक केलें." परंतु वास्तविक गोष्ट वेगळीच आहे. प्रकृतीच्या गुणामुळेंच या सर्व घाडामोडी होतात. इंद्रियें आणि विषय यांमध्यें परस्परांची आवडनिवड ठरलेली आहे. तिला अनुसरून त्यांचीं त्यांचीं कार्यें होतात. तथापि परमेश्वरानें मनुष्याला बुद्धीचें स्वातंत्र्य दिलें असल्यामुळें त्याच्या पापपुण्याचें फळ त्यालाच भोगावें लागतें. परमेश्वराच्या सभोंवतीं योगमायेचें ह्मणजे अघटित घटनाचातुर्याचें पटल आहे, ह्मणून परमेश्वर सर्वांना प्रगट दिसत नाहीं. जग मूढ आहे यामुळें परमेश्वर अनादि अव्यय आहे ही गोष्ट तें जाणत नाहीं.

मनुष्यानें आपल्या खऱ्या स्थितीचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. त्यानें निरिच्छपणें आपलीं कर्तव्यकर्मे केलीं पाहिजेत आणि कर्माचरणाच्या असंख्य दोषांपासून मुक्त राहाण्यास्तव आपलें अंतःकरण शुद्ध ठेवून अनन्यभावानें परमेश्वराला शरणागत झालें पाहिजे. मन ताब्यांत ठेवून निष्काम कर्म करावें. भक्तीनें परमेश्वरास प्राप्त करून घ्यावें व ज्ञानाच्या योगानें परम श्रेष्ठ, परम अक्षर व कधींही विकार न पावणाऱ्या ब्रह्मांत मिळून जावें. हाच मनुष्याचा तरणोपाय असून परमात्मस्वरूपीं लय पावणें हेंच त्याचें अंतिम ध्येय होय.

मानवी ध्येय.

अशा प्रकारें धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ साधून देणारा धर्मोपदेश ज्यानें केला व अर्जुनाचा मोह दूर करून त्याला कर्तव्यकर्म करण्यास प्रवृत्त केलें, ज्यानें दुष्टांचा संहार करून व करवून साधुवृत्तीच्या लोकांचें रक्षण केलें त्या

## श्रीकृष्णासंबंधाचा गैरसमज

आजकाल या देशांत असलेला आपण पहातों. कृष्णानें गोपींशीं लहान वयांत अश्लाघ्य वर्तन केलें, तो मोठा रंगेल होता, रासक्रीडा वगैरे खेळांत राधेसारख्या परवधूसह तो विषयोपभोगांत मग्न असे वगैरे कितीतरी आरोप श्रीकृष्णावर लादले जातात. या गोष्टी सत्य मानूनही श्रीकृष्णासंबंधानें हिंदुलोक आदर कसा व्यक्त करतात, याबद्दल अन्यधर्मीयांस व आमच्यांतील कित्येक नवीन मतांच्या लोकांसही आश्चर्य वाटतें. खरें पाहिलें असतां कृष्णाच्या वर निर्दिष्ट केलेल्या कृत्यांचा महाभारतांत उल्लेख नाहीं आणि महाभारत हाच ग्रंथ कृष्णासंबंधाचा प्रामाण्य ग्रंथ होय. राजसूय यज्ञाच्या वेळीं भीष्मानें कृष्णासंबंधानें असें म्हटलें आहे कीं, कृष्ण हाच अग्रमानार्ह आहे. याचें कारण औदार्य, व्यवहारचातुर्य, वेदज्ञान, शौर्य, विनय, पराक्रम, विद्वत्ता, सौंदर्य, निरिच्छपणा व संपत्ति हीं सर्व लक्षांत घेतां श्रीकृष्णाइतक्या योग्यतेचा दुसरा कोणी नाहीं. ( सभापर्व अ. ३८-१९।२० ). असे हे उत्तम गुण त्याच्यांत प्रामुख्यानें वसत होते, हें भीष्माच्या भाषणावरून सिद्ध होतें. कृष्ण हा अर्जुनाहून १८ च वर्षांनीं मोठा होता. परंतु त्याच्याबद्दल अर्जुनाच्या अंतःकरणांत अत्यंत पूज्यत्व बुद्धि वसत होती, हें त्यानें

गीतोपदेशाच्या वेळीं काढलेल्या उद्गारांवरून स्पष्ट होतें. कृष्णाबरोबर जो अर्जुन खेळला, निजला, बसला, जेवला व विनोदानें बोलला त्याला कृष्ण हा अनाचारी व कपटी आहे हें माहीत असतें तर त्याच्या उपदेशाचा परिणाम अर्जुनावर झाला नसता; इतकेंच नाहीं, तर अशा कुमार्गी पुरुषाचा उपदेश ऐकण्यास तो तयार झाला असता कीं काय, हा एक प्रश्न आहे. द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळीं त्या साध्वीनें श्रीकृष्णाचा 'गोपीजनप्रिय' ह्मणून धांवा केला आहे. गोपींशीं अश्लाघ्य वर्तन करणारा हा कृष्ण असता तर महासभेंत गोपीजनाशीं कृष्णाचा संबंध असल्याचें उघड रीतीनें ती सांगतीना व अशा पातिव्रत्यावर घाला घालणाऱ्या श्रीकृष्णाची ती आठवणही करती ना. अबलांचा कैवारी या दृष्टीनें कृष्णाची आठवण तिला झाली हें निर्विवाद आहे. गोपींचें निर्व्याज प्रेम कृष्णावर व त्यांच्याबद्दल भगिनीप्रेम त्याच्या अंतःकरणांत वसत होतें इतकेंच. या प्रेमाचा परिणाम मात्र असा झाला कीं, श्रीकृष्णानें जो धर्मबोध केला त्यांत स्त्रियांस देखील परमेश्वराची अनन्य भावानें भक्ति करण्याचा अधिकार आहे व त्यांना पुरुषां-प्रमाणेंच सायुज्यपद मिळवितां येतें, असें त्यानें आपलें निश्चयात्मक मत दिलें. चांडाल, वेश्या, शूद्र अशांना देखील मुक्तीचें द्वार मोकळें आहे असें सांगणारा श्रीकृष्ण किती उदारमतवादी होता याचीही अटकळ बांधतां येण्याजोगी आहे. सर्वांत महत्वाचा पुरावा ह्मटला ह्मणजे शिशुपालाचें कृष्णासंबंधाचें राजसूय यज्ञाच्या वेळचें भाषण होय. कृष्णास अर्घहरणाच्या वेळीं तो अत्यंत टाकून बोलला. तो ह्मणाला, 'कृष्णानें पूतना वगैरेंचा वध केला यांत मोठें काय झालें ? गोवर्धन उचलला, अश्वाला ठार केलें इतक्यावरूनच त्याला मोठा ह्मणतां काय ?' याप्रमाणें यानें निंदात्मक टीका केली; परंतु कृष्णाचें आचरण निंद्य असतें तर त्याचा उल्लेख करण्याची संधि शिशुपालानें फुकट घालविली नसती. युधिष्ठिरास राजधर्म सांगणारा, पांडवांवर द्यूतामुळें अनर्थ कोसळल्यावेळीं बहुमोल उपदेश देऊन सांत्वन करणारा व महाजन जसे चालतात तसेच सामान्य लोक चालतात यासाठीं आपलें वर्तन चोख असू द्यावें असें अर्जुनास सांगणारा श्रीकृष्ण वाईट वर्तनाचा होता असें ह्मणणें किती मूर्खपणाचें आहे, याचा विचार करण्याजोगा आहे. कृष्णाचें आचरट वर्तन व्रजांत असतांना अर्थात् बालवयांतच होतें असें ह्मणावें तर ज्या गोपींशीं तो अनीतीनें वागत होता असें सांगण्यांत येत आहे, त्यांच्या पतींचें पूर्णप्रेम त्याच्यावर असण्याचा संभव नाहीं. शिवाय ज्या मल्लविद्येमुळें व शारीरिक बलामुळें तो प्रसिद्धीस आला, ती मल्लविद्या व तें बल त्याला प्राप्त

झालें नसतें. कृष्ण चौर्यकर्मांत प्रवीण होता असें दाखविण्यासाठीं लीलेनें अनेक कथा ज्यांनीं उत्पन्न केल्या, त्यांनीं सीमंतक मण्याची गोष्ट लक्षपूर्वक वाचावी. ज्याला चोरीची आळ न खपल्यामुळें अत्यंत धाडसाचीं कामें करून तो मणि खरोखर कोणापाशीं आहे याचा तपास लावून ज्यानें तो मालकास मिळवून दिला, तोच कृष्ण दहीं, दूध, लोणी, चोरण्याच्या कामांत गुंतलेला होता असें ह्मणावें काय ? भारतीय युद्धानंतर जेव्हां अभिमन्यूची गर्भवती स्त्री बाळंत झाली तेव्हां मूल मेलेलें निघालें. पांडववंशाचा भावी अंकुर हाच शिल्लक होता तो अशा रीतीनें मेलेला निघाल्यामुळें आक्रोश करीत जेव्हां सर्वजण कृष्णापाशीं आले तेव्हां त्याचें हृदय कळवळलें. त्यानें आसन घालून त्या मृत बालकास मांडीवर घेतलें व उच्च स्वरांत शपथ करून ह्मटलें, ‘ मी आजपर्यंत थट्टेनें सुद्धां असत्य भाषण केलें नाहीं व युद्धांतून माघारा फिरलों नाहीं, त्या माझ्या पुण्यानें मृत बालक जिवंत होवो. ज्या अर्थी मला धर्म प्रिय आहे; आणि धर्माचे अधिष्ठाते ब्राह्मण मला प्रिय आहेत, त्या अर्थीं अभिमन्यूचा पुत्र जिवंत होवो. मी विजयांत सुद्धां दुसऱ्याचा विरोध केला नाहीं हें जर सत्य असेल, तर त्या सत्यानें या बालकाचा प्राण परत येवो. कंस आणि केशी यांचा मीं धर्मानें नाश केला, ही गोष्ट खरी असेल तर त्या सत्यानें हा मृत बालक पुन्हा सचेतन होवो!’ ( अश्वमेध पर्व ) यावरून सत्यवचन, धर्मानुसार वर्तन, सत्यप्रीति यांच्याच वर कृष्णानें सर्वत्र जय मिळविला आणि त्याचें वर्तन मुळापासून निष्कलंक होतें असें सिद्ध होतें. एकंदरींत महाभारतावरून कृष्णाच्या चरित्राचा विचार केला असतां तो त्या कालचा थोर मुत्सद्दी, वीर पुरुष व महात्मा होता हें दिसून येणार आहे. भारतीय युद्धाच्या व इतर कांहीं प्रसंगीं त्यानें कपटानें व अन्यायानें शत्रूचा नाश करविल्याचें दर्शविलें आहे. यासंबंधाचीं वाक्यें महाभारताच्या कांहीं प्रतींत सांपडतात तर कांहींत सांपडत नाहींत. शिवाय काल, प्रसंग व उपयुक्तता यांच्याकडे योग्य नजर देऊन त्यानें केलेलीं किंवा करविलेलीं निष्काम कर्में योग्य होतीं किंवा कसें याचा विचार करण्याचा व त्यावर मन मानेल तसे तर्क लढविण्याचा सामान्य बुद्धीच्या मनुष्यांस कितपत अधिकार आहे हा एक प्रश्नच आहे. तेव्हां यासंबंधानें विशेष काथ्याकूट करून जागा न अडवितां कृष्णासंबंधानें

## भलत्यासलत्या गोष्टी

प्रेमानें व भक्तीनेंच कां होईना, ज्यांनीं लिहून समाजांत रूढ केल्या त्यांच्या लेखांकडे वळतों. पुराणें पाहूं गेल्यास या गोष्टीसंबंधानें एकवाक्यता दिसून येत

नाहीं. या गोष्टींचा उल्लेख हरिवंशांत आहे तेवढा विष्णुपुराणांत नाहीं. भागवतांत त्याहूनही विशेष रीतीनें कृष्णाच्या लीलांचें वर्णन आहे. ब्रह्मवैवर्त पुराणांत तर याबद्दल बहारीचें वर्णन सांपडतें. परंतु ऐतिहासिकदृष्टया यांची किंमत मानतां येत नाहीं. गोपींसह रासक्रीडा केल्याचें वर्णन विष्णुपुराणांत आहे, परंतु तेथें अनयगोपाची पत्नी जी राधा तिचा नामनिर्देश नाहीं. हरिवंशांतही तिचें नांव दिलेलें नाहीं. भागवतांत एकदांच राधेच्या नांवाचा उल्लेख आहे. ब्रह्मवैवर्त पुराणांत मात्र प्रत्यक्ष ब्रह्मा उपाध्या होऊन राधेबरोबर कृष्णाचा विवाहविधि चालवीत असल्याचें दर्शविलें आहे. तीच गोष्ट गोपीवस्त्रहरणाची. हरिवंश व विष्णुपुराण यांत ही गोष्ट नाहीं. ब्रह्मवैवर्तपुराण व भागवत यांत ती दिली आहे. या दोन्ही ग्रंथांत रासलीलेचें वर्णन आहे; परंतु भागवतांत तें विस्तारपूर्वक दिलें आहे. यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, भागवत व ब्रह्मवैवर्त पुराण यांच्या लेखकांनीं आपल्या कल्पनाचातुर्यानें या लीलेचें वर्णन केलें आहे. हरिवंशांत कृष्णाच्या आयुष्यांतील शेवटच्या भागांत केलेल्या कार्यांचें, त्यानें भारतीय युद्धांत गाजविलेल्या पराक्रमाचें किंवा अनीतींत सांपडून अनावर झालेल्या आपल्या भाऊबंदांचें निर्मूलन केल्याचें सांगितलेलें नाहीं. आपल्या शत्रूंचा संहार करून व्रजांत नंदयशोदेची भेट घेतल्यावर ऋषींचें दर्शन घेण्यासाठीं पुष्कर तीर्थावर कृष्ण गेला असल्याचें मात्र हरिवंश सांगत आहे. भागवत व विष्णुपुराण यांतही कृष्णचरित्र पूर्णपणें आढळत नाहीं. कृष्णाच्या बायकांसंबंधानें विचार करतां हरिवंशांत असें लिहिलें आहे कीं, प्राग्ज्योतिषपुरचा राजा नरकासुर यानें बंदींत ठेवलेल्या स्त्रियांस मुक्त केल्यावर त्यांनीं कृष्णास माळ घातली; परंतु या स्त्रियांची संख्या १६००० होती असें त्यावरून दिसत नाहीं. त्यानंतरच्या लेखकांनीं या स्त्रियांची संख्या १६००० वर आणिली. ज्यानें धर्माचें प्रतिपादन अत्युत्तम रीतीनें केलें, आणि अर्जुनास विषयाच्या मोहापासून परावृत्त कसें व्हावें हें अधिकारयुक्त वाणीनें सांगितलें व

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।**

म्हणजे माझ्याठायीं मन ठेव, माझी भक्ति कर, माझें पूजन कर, मला वंदन कर, म्हणजे खरोखर तूं मलाच येऊन मिळशील असा आशीर्वाद ज्यानें अर्जुनास व त्याच्या द्वारें सर्व मनुष्यप्राण्यांस दिला, तोच श्रीकृष्ण १६००० बायकांचा नवरा

होता, राधेचा वल्लभ होता वगैरे गोष्टींवर आह्मीं विश्वास ठेवावा ना ? हिंदूंचें दुर्दैव हें कीं या गोष्टींस त्यांनीं आपल्या अंतःकरणांत थारा दिला. वैष्णव धर्मासारख्या सार्वलौकिक धर्मांत अशा विचारांस व या गोष्टींस मान मिळाला ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. त्याची अनेक बाबींत अवनति होण्याचें कारण तरी या प्रकारच्या गोष्टीच होत. भागवत हा अत्युत्तम रसभरित ग्रंथ आहे, याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. परंतु तो अगदीं अलीकडे बंगाल्यांत मुसलमानांच्या अमदानींत सुमारें ४०० वर्षांमागें ह्मणजे श्रीकृष्णानंतर सुमारें ३००० वर्षांनीं बोपदेवानें लिहिलेला ग्रंथ आहे. यानें कृष्णभक्तीची वाढ केली परंतु तो इतिहास नव्हे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

कृष्णानें केलेल्या लीलांचा अन्य तऱ्हेनें अर्थ सांगण्यांत येतो. वृंदावनांतील गोपी म्हणजे मनोवृत्ति व कृष्ण हा परमात्मा या दृष्टीनें मनोवृत्ति परमात्म्यांत लय पावतात. राधा म्हणजे जीवात्मा व कृष्ण हा परमात्मा याचें दर्शक असून गोपीवस्त्रहरणाची कथा सर्वसंगपरित्याग करून परमात्म्याचा लाभ करून घ्यावा एतदर्थ आहे वगैरे प्रतिपादन वेदांत्यांकडून करण्यांत येतें; परंतु यामुळें कृष्णाच्या ऐतिहासिक अस्तित्वास बाधा येते. यासाठीं अशा गोष्टी कवीच्या कल्पनाचातुर्यानें व त्या कथन करण्याच्या चातुर्यामुळें सर्वसंमत झाल्या, इतक्यावरून त्यांचें प्रामाण्य आम्ही मानलेंच पाहिजे असें नाहीं. या व इतर अद्भुत चमत्काराच्या गोष्टी कृष्णचरित्रांतून वगळल्या ह्मणून श्रीकृष्णाची योग्यता कमी होण्याचा संभव नाहीं. मत्त हत्तीस त्यानें एका मुष्टिप्रहारानें ठार केलें, त्याच्या दाढा उपटल्या, गोवर्धन पर्वत करांगुलीवर उचलला, मृतबालकास जीवंत केलें, सात फडांच्या कालिया नागास* जेरीस आणलें व त्याच्या मस्तकावर तो थै थै नाचला इतक्यावरून कृष्णास देव ह्मणावयाचें नसून त्याच्या अपार बुद्धिमत्तेवरून व त्याच्या

*नाग व आर्य यांच्यांत दीर्घकालपर्यंत लढा चालून शेवटीं त्यांच्यांत समेट झाला व आर्यांनीं त्यांची हत्या करूं नये व नागांनीं आर्यांस कोणत्याही प्रकारें आपल्या विषारी शल्यांनीं इजा पोहोंचवूं नये असें ठरलें. या समेटाचें दर्शक नागपंचमीचा सण असून विष्णुपुराणांतील कथाभागाचा ऐतिहासिकदृष्ट्या अर्थ लावतां येईल असें प्रतिपादन करणारे लोक आहेत. यासंबंधानें निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं, ह्मणून सध्या रूढ असलेल्या अर्थानेंच नागपंचमी या सणाचा या पुस्तकांत विचार केला आहे.

अंगीकृत सत्कार्यांवरून त्याचा अवतारमालिकेंत समावेश करावयाचा आहे. **कृष्ण हा मनुष्याप्रमाणें जन्मला, वाढला, जगला व निवर्तला परंतु त्याच्या हस्तें घडलेल्या महत्कार्यांवरून त्याला देवत्व प्राप्त झालें.** नर करनी करे तो नरका नारायण हो जाय—याचें श्रीकृष्ण हें एक अत्युत्तम उदाहरण आहे.

## हेतु व बोध.

ज्या श्रीकृष्णाचा जन्मोत्सव श्रावण वद्य अष्टमीस हिंदुलोक मोठ्या प्रेमानें व भक्तीनें साजरा करतात त्याचा अवतार साधूंचा सांभाळ करून दुष्टांचा विनाश करण्यासाठीं व धर्मसंस्थापनार्थ सुमारें ३००० वर्षांमागें या देशांत झाला. कृष्णाचा समकालीन जो महामुनि व्यास यानें कृष्णाच्या आयुष्यांतील ज्या मुख्य व महत्वाच्या गोष्टी महाभारतांत दिल्या आहेत, त्यांवरून पाहतां श्रीकृष्ण हा एक धाडसी, दूरदर्शी, मुत्सद्दी व धर्मज्ञ होता हें स्पष्ट होतें. त्याच्या कालीं समाजांत धर्म व तदंगभूत कर्तव्यकर्म यांची जाणीव पुढारी ह्मणविणारांसही नव्हती. ज्याच्यामुळें जगाचें धारण होतें अर्थात् जग टिकतें तो धर्म. असा धर्म कोणता हें स्पष्ट व निर्भीडपणें सांगणाऱ्या आधिकारी धर्मसंस्थापकाची आवश्यकता त्या कालीं भासूं लागली होती आणि हें अवतारकार्य श्रीकृष्णानें उत्तम प्रकारें बजाविलें. वेद हे अपौरुषेय आहेत, यासाठीं त्यांच्याबद्दल पूज्यत्वबुद्धि बाळगून यज्ञयागादिकांच्या मदतीनें स्वर्गप्राप्ति करून घ्यावी असें कांहींचें मत होतें तर कित्येक जिज्ञासु जगाची उत्पत्ति कशी झाली, तें कोणत्या कारणामुळें टिकलें आहे, त्याचा नाश कां होतो, जगाशीं आपला संबंध काय, आपण कोण, कोठून व कशासाठीं आलों व शेवटीं जाणार कोठें वगैरे प्रश्नांचा उलगडा करण्यांत रात्रंदिवस गुंतलेले होते. परंतु कोणतें तरी एक मत गृहीत धरून निरनिराळ्या प्रश्नांचा विचार चालविला असल्यामुळें कोणाचेंही कायमचें समाधान होईना. प्रत्येकाचें मत निराळें असे. यासाठीं ठाम असे सिद्धांत निघणें फार मुष्किलीचें होऊन समाज घोटाळ्यांत पडला होता. त्या कालीं अस्तित्वांत आलेल्या तत्वज्ञानावरून कृष्णानंतर बऱ्याच कालानें गौतम, कणाद, कपिल, पतंजली जैमिनी व व्यास यांनीं अनुक्रमें न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदांत हीं शास्त्रें रचलीं; त्यांस षट्शास्त्र असें म्हणतात. श्रीकृष्णानें तत्कालीन तत्वज्ञानविषयक मतांपैकीं योग, सांख्य व वेदांत यांच्यांत एकवाक्यता कशी आहे

हें दाखवून व एक दुसऱ्यावर अवलंबून असल्याचें सिद्ध करून समाजाचा भ्रम दूर केला. त्यांतही तत्वज्ञानास भक्तीची जोड लावून दिल्यामुळें सर्व दर्जाच्या लोकांस ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुगम झाला. मायावादांत गुरफटल्यामुळें कर्तव्यशून्य बनलेल्या समाजास श्रीकृष्णानें ऐहिक व पारलौकिक कर्तव्यकर्मांची योग्य दिशा दाखवून दिली. कर्म, उपासना व ज्ञान या त्रयीच्या साह्यानें हा भयाण वाटणारा भवसागर तरून प्रत्येकाला पैलतीरास सुरक्षितपणें जातां येतें व सर्व दृश्यादृश्य पदार्थ-मात्राचें आदिकारण जें सत्स्वरूप ब्रह्म त्यांत मिळून जाऊन जन्ममरणाचे असंख्य फेरे चुकवितां येतात, हें श्रीकृष्णानें जगास सांगितलें. ह्मणूनच त्याला **जगद्गुरु** असें ह्मटलें आहे.

## नरजन्माचें महत्व

लक्षांत येण्यासाठीं श्रीकृष्णानें केलेला उपदेश प्रत्येक मनुष्य म्हणविणारानें हृत्पट-लावर कोरून ठेविला पाहिजे. त्या उपदेशाचें महत्व लक्षांत आणून आपलें आच-रण शुद्ध ठेवणें हाच तरणोपाय आहे.

**देहो देवालयः प्रोक्तः जीवो देवः सनातनः ।**
**त्यजेदज्ञाननिर्माल्यं सोऽहं भावेन पूजयेत् ॥**

हा मानवदेह हें देवालय असून त्यांतील रहिवासी जीव हा देव आहे. अज्ञान-रूपी निर्माल्याचें विसर्जन करून अंतस्थ आत्मा हा केवळ ईश्वर आहे या भावनेनें त्याची पूजा करावी. देह हें देवालय आहे अशी प्रत्येक मनुष्याची खात्री पट-ल्यास हें देवालय शुचिर्भूत राखण्यासाठीं आह्मी किती बरें यत्न करूं? परमेश्वररूपी आत्मारामास या देहाचा कंटाळा येऊं नये म्हणून आह्मी किती बरें जपूं? ही मानवी देहाची देणगी देऊन आम्हांस धन्य केल्याबद्दल आम्ही ईश्वराचे किती आभार मानूं? परंतु देह हें देवालय आहे, ही भावना दृढ झाली नसल्यामुळें आमच्या हातून पावलोपावलीं असंख्य अपराध घडतात व अशा अपवित्र जागीं रहाण्याचा ईश्वरासही कंटाळा येतो. सर्व धर्मांचे विचारी लोक भगवद्गीतेला मान देतात. तिच्या द्वारें श्रीकृष्णानें सांगितलेल्या कर्मयोगाची उभारणी व्यापक व उदात्त अशा धर्म, नीति व वेदांत या तत्त्वत्रयावर केली असल्यामुळें त्याची योग्यता सर्व लोक वाखाणीत आहेत. मानवी उन्नतीस धर्म, नीति व वेदांत यांचा उपयोग कसा होतो पहा. स्त्रिया व पुरुष, उच्च व नीच या सर्वांच्या अंतःकरणांत प्रेम, सद्भाव, समता व सदसद्विवेकबुद्धि उत्पन्न करणारा धर्म मनुष्यास सन्मार्गाचा

अवलंब करण्यास भाग पाडतो. अर्थात् मनुष्य पापभीरु झाल्याच्या योगानें त्याचें वर्तन शुद्ध व सरळ होतें. नीतिबंधन हें समाजांतील एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशीं असलेला हितसंबंध सुरळीतपणें चालण्यास आवश्यक आहे. या नीतीवरच कुटुंबाचें, समाजाचें, राज्याचें व राष्ट्रांचें स्थैर्य, प्रगति व सौख्य हीं अवलंबून आहेत. नीतिविघातक कृत्यें कोणाकडूनही न घडावीं. एतदर्थ राजशासनाची व्यवस्था केलेली असते. राष्ट्राराष्ट्रांमधील सुनीतीच्या वर्तनास विघात येतांच युद्ध उपस्थित होऊन शस्त्रानें अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं राजा व त्याची प्रजा स्वार्थत्यागपूर्वक पुढें सरसावते. वेदान्ताचें ध्येय या सर्वांच्याही पुढचें आहे. सर्व मानवी कुटुंब एक जीव करून जात, धर्म, पंथ, भाषा व देश यांच्यामुळें उत्पन्न झालेलें कृत्रिम भिन्नत्व नाहींसें करण्याला वेदांत झटत असतो व तसें करण्यास तोच समर्थ आहे. वेदांत हा सार्वलौकिक धर्म व त्रिकालाबाधित नीति होय. सुखदुःखाच्या विवंचनेंत सांपडून सदा कष्टी होणाऱ्या जीवास वेदान्त सच्चिदानंदाची ओळख करून देत असतो. वेदांत हा जगदुद्धारासाठीं श्रीकृष्णानें गीतेच्या द्वारें कथन केलेला शुभ संदेश आहे. ज्यांना श्रीकृष्णाबद्दल पूज्यत्व बुद्धि दाटते, त्यांनीं गीतेंत कथन केलेल्या सन्मार्गानें जाऊन आत्मोद्धार करून घ्यावा असें हा जन्माष्टमीचा उत्सव सांगत आहे. जगांत प्रेम, ऐक्य व ज्ञान यांची वाढ श्रीकृष्णाच्या कृपेनें होवो, अशी प्रार्थना प्रत्येक मनुष्यानें जीवमान असेपर्यंत दररोज करून श्रीकृष्णाबद्दल आदर व अनन्यभक्ति प्रगट करावी व सत्कर्मांच्या योगानें कृष्णमय व्हावें हेंच योग्य होय.

## आरती श्रीकृष्णाची.

जय जय जगदानंदा जय जय श्रीकृष्णा ।
तव गीतामृतपानें निवली भवतृष्णा ॥ ध्रु० ॥
नीतिन्यायदयादिक गुण जनिं लोपोनी ।
अधर्म अन्यायांहीं त्रासलि जंव अवनी ॥
दुष्टां निर्दाळाया तंव जगिं अवतरुनी ।
सुष्टां रक्षियलें त्वां सत्पक्षा धरुनी ॥ १ ॥
वेदोक्ताचरणीं रत झाले जन सारे ।
उपनिषदांचें ज्ञानहि वेगें विस्तारे ॥

परि निज कर्तव्या जन विसरूनि गेले ।
सकाम कर्मे करितां धर्मा अंतरले ॥ २ ॥
नाना पंथ मतें हीं नाना उद्भवलीं ।
कर्माकर्मविचारीं मति मोहित झाली ॥
अवतरलासी तेव्हां धर्माचा वाली ।
वाजविली भगवंता त्वां गीता मुरली ॥ ३ ॥
लाभलि पुण्यें गीता, तव दर्शन घडलें ।
भ्रामक मोहाचे ते पाश पुरे तुटले ॥
आत्मस्वरूप उमगुनि मन निश्चल झालें ।
ब्रह्मानंदीं शिरतां देहा विस्मरलें ॥ ४ ॥

---

## पिठोरी अमावास्या.

श्रावण वद्य ३० स पिठोरी व्रत करण्याची चाल कांहीं ठिकाणीं आहे. मंगलागौरी, हरितालिका वगैरे जीं व्रतें सध्यांच्या कालीं स्त्रीसमाजांत रूढ झालीं त्यांपैकीं पिठोरी हें एक असून विशेषतः संततीप्राप्त्यर्थ सौभाग्यवती स्त्रिया हें व्रत आचरीत असतात. हें व्रत पार्वतीप्रीत्यर्थ आहे. भविष्योत्तर पुराणांत अशी कथा आहे कीं, पार्वतीनें इंद्रायणीस या व्रताचा महिमा कथन केला व हें व्रत आचरिल्याच्या योगानें सौभाग्य, संतति व ऐश्वर्य हीं प्राप्त होतात असें सांगितलें. ज्या कथेवरून हें व्रत अस्तित्वांत आलें ती कथा अशी आहे:–पूर्वकालीं श्रीधर नांवाच्या एका ब्राह्मणास सुमित्रा नांवाची बायको होती. तिच्या ज्येष्ठ पुत्राचें नांव शंकर व स्नुषेचें नांव विदेहा असें होतें. विदेहा प्रत्येक वर्षीं श्रावण अमावास्येस प्रसूत होई व तिचें मूल मरत असे. तिच्या सासू सासऱ्यांचा श्राद्धाचा दिवस त्याच दिवशीं असल्यामुळें तो पाळतां येईना. घरांतील माणसांच्या सल्ल्यानें तिच्या पतीनें तिला घराबाहेर घातलें. नवीन जन्मलेल्या बालकासह ती एका अरण्यांत गेली असतां तेथें एका देवतेची व तिची गांठ पडली. देवतेनें प्रसन्न होऊन तिला असें सांगितलें कीं, 'या ठिकाणीं ६४ देवता येत असतात, त्यांचें दर्शन घडल्यावर तुझे हेतु पूर्ण होतील.' त्याप्रमाणें तेथें त्या देवता आल्यावर विदेहा त्यांस शरण गेली व त्यांच्या वरानें तिला पतिसमागम घडला व आठ दीर्घायुषी पुत्र झाले.

## शास्त्रोक्त विधि.

श्रावण वद्य ३० च्या दिवशीं उपोषित राहून सायंकाळच्या पहिल्या प्रहरीं आठ कलश मांडून ब्राह्मी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, महेश्वरी व चामुंडा या देवतांच्या प्रतिमा स्थापन कराव्या. याशिवाय ६४ सुपाऱ्या मांडून निरनिराळ्या नांवाच्या ६४ देवतांची आराधना करावी. त्यांची पूजा करून ऐश्वर्य व पुत्र यांची प्राप्ति होवो अशी त्यांजपाशीं प्रार्थना करावी. घरांतल्या मुलींस पोळीचें वायन द्यावें.

## चालू रूढी

वटसावित्री किंवा मंगळागौरी यांप्रमाणें हें व्रत विशेष रूढ नाहीं. धर्मशास्त्रांतही याचा उल्लेख नाहीं. जिची संतति वांचत नाहीं अशी स्त्री हें व्रत आचरीत असते. याच हेतूनें सोळा सोमवार नांवाचें शिवाचें व्रत करण्याचा प्रघात शैवसांप्रदायी लोकांत आहे. मुंबईंत पांढरपेशा लोकांत या व्रताचा विशेष प्रचार आहे. भिंतीवर ६४ देवतांचा पट काढून त्यांची पूजा करण्यांत येते. या व्रतासंबंधानें विचार केला असतां असें दिसतें कीं, मंगळागौरी, हरितालिका वगैरे काम्य व्रतांप्रमाणें हें देखील अगदीं अलीकडे अस्तित्वांत आलेलें व्रत आहे. वेताळपंचविशींतील गोष्टींसारख्या एका सामान्य कथेवरून हें व्रत कसें उत्पन्न झालें याचें आश्चर्य वाटतें. प्रत्येक वर्षी प्रसूत झाल्यावर मुलें मृत्युमुखीं पडणें याबद्दल विदेहेस बाळंत असतांनाच घरांतून हांकून दिलें. यावरून ज्या पुराणांत ही गोष्ट लिहिली आहे, तें भविष्यपुराण अस्तित्वांत आलें त्या वेळीं हिंदुसमाजाची स्थिति किती शोचनीय होती याचें अनुमान करितां येण्याजोगें आहे. स्त्री ह्मणजे घरांत आणलेली दासी असून तिच्यापासून कोणत्याही कारणानें पीडा उत्पन्न होतांच तिचा त्याग करण्यास हरकत नाहीं अशी समजूत आज कित्येक शतकांपासून या देशांत रूढ असून धर्मशास्त्रकारांनीं स्त्रीजातीबद्दल जो तिटकारा प्रदर्शित केला, त्याचा परिणाम आजकाल दृग्गोचर होत आहे. स्मृतिकार मनु यानें स्त्रियांची योग्यता व त्यांचें स्वातंत्र्य यांजवर शास्त्रवचनांची कुऱ्हाड मारून त्यांची योग्यता कमी केली. साह्यकर्ती व गृहिणी या श्रेष्ठ पदावरून त्यांस खालीं लोटलें. याचा परिणाम असा झाला कीं, मनूच्या कालापासून स्त्रियांस अज्ञानांत वाढविण्याची चाल शिष्टसंमत झाली. स्त्रियांच्या बाबींत मनूचें मत किती अनुदार होतें, यासंबंधानें अनेक उतारे देतां येतील. ( अ० ०-१४-१५. ) स्त्रियांना जातकर्मादि क्रिया

किंवा मंत्राचा अधिकार नाहीं, त्यांना असत्याप्रमाणें मानावें. त्या स्वभावानें आळशी, दांभिक कामक्रोधानें युक्त, दुसऱ्याची भीड न राखणाऱ्या अशा आहेत असें मनू सांगत आहे. ज्या आर्यावर्तांत सीता, दमयंती, सावित्री, अरुंधती, वाचक्नवी, अशा योग्यतेच्या असंख्य साध्वी होऊन गेल्या, त्याच देशांतील स्त्रियांस अनुलक्षून मनूनें वरील प्रकारें मत कां प्रदर्शित केलें हें सांगणें शक्य नाहीं. त्यानें सांगितलें आहे कीं स्त्री ही बालवयाची असो, युवती असो किंवा वृद्ध असो तिनें कोणतेंही कार्य स्वतंत्रपणें करूं नये. तिनें बालवयांत पित्याच्या, यौवनांत नवऱ्याच्या व वैधव्य स्थितींत 'पुत्राच्या ताब्यांत रहावें. अनेक कारणांवरून स्त्रीचा त्याग करण्याचा पतीस अधिकार आहे अशा अर्थाचीं स्मृतिवचनें असून त्यांतील पुढील स्मृतिवाक्य अत्यंत अनुदारपणाचें होय.

**वंध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा ।**
**एकादशे स्त्रीजननी सद्यस्त्वप्रियवादिनी ॥ ( ९ ८१ )**

मुलें होत नसल्यास ८ व्या वर्षी, मुलें होऊन तीं जगत नसल्यास १० व्या वर्षी मुलीच जन्मत असल्यास ११ व्या वर्षी आणि अप्रियवादिनी असेल तर तत्काल स्त्रीचा त्याग करावा. यांतून दुसऱ्या नियमान्वयें विदेहा अपराधी ठरून प्रसूत होतांच तिला अरण्याची वाट धरावी लागली. कमी अधिक प्रमाणानें हिंदूसमाजांत या प्रकारच्या नियमांचा परिणाम आजमितीसही दृग्गोचर होतो. पवित्र विवाहसंस्काराची अशा रीतीनें निर्भर्त्सना केल्यावर त्या संस्कारामुळें उत्पन्न होणारी प्रजा अधोगतीस जात असल्यास आश्चर्य नाहीं. उलट पक्षीं स्त्री-धर्म सांगतांना मात्र स्मृतिकारांनीं स्त्रियांस पुढीलप्रमाणें आज्ञा केली आहेः–

**विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।**
**उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ॥**
**नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।**
**पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥५–१५४।५५**

शील नसलेला, दुर्गुणी किंवा कसाही असो, पति हा देवाप्रमाणें पूज्य आहे असें समजून त्याची सेवा करावी. पतीची शुश्रूषा हाच स्त्रीला स्वर्गास जाण्याचा एक मार्ग आहे. यज्ञ, व्रत, उपोषण यांच्यायोगानें त्यांना स्वर्गप्राप्ति होणार नाहीं! असो. मनुस्मृतींत परमात्मस्वरूप, ब्रह्मचर्य, इंद्रियनिग्रह, गुरुजनांची योग्यता, अतिथि-सत्कार, पतिपत्नी धर्म, न्यायनिरूपण इत्यादि विषयांसंबंधानें

दिलेले कांहीं नियम जितके सर्वव्यापी, उदात्त व पथ्यकर आहेत तितकेच समाजाचे अत्यंत महत्वाचे घटकावयंव असलेल्या स्त्रियांसंबंधानें प्रदर्शित केलेलें मत समाजविघातक आहे. स्त्रियांचा मान राखावा, त्यांना संतोषित ठेविलें असतां देवता आनंद पावतात व त्यायोगें कुटुंबाचें कल्याण होतें असें ज्या मनुस्मृतींत निक्षून सांगितलें आहे त्याच स्मृतींत वरीलप्रमाणें स्त्रीवर्गासंबंधानें अनुदार मत कां प्रदर्शित करण्यांत आलें याचें आश्चर्य वाटतें. आमचें मत असें आहे कीं हिंदुसमाज कालें करून अवनत स्थितीस पोहोंचल्यावर शास्त्रकारांनीं ढवळाढवळ करून अशाप्रकारचीं समाजाचें अकल्याण होण्याजोगीं शास्त्रवचनें मनुस्मृतींत घुसडून दिलीं असावीं. महाभारत, रामायण, उपनिषदें, पुराणें व प्रत्यक्ष वेद यांत देखील ढवळाढवळ करण्यास ज्यांनीं कमी केलें नाहीं, त्या अदूरदर्शी पंडित व शास्त्रज्ञ म्हणविणारांनीं मनुस्मृतींत याप्रमाणें ढवळाढवळ केली असल्यास त्यांत नवल नाहीं. कदाचित् स्त्रियांविषयीं याप्रकारचें मत मनूचेंच आहे असें गृहित धरलें तरी हल्लींच्या कालास व देशाच्या प्रगतीस हें मत अपायकारक असल्यामुळें त्याचा अव्हेर करण्यासाठीं व कालमानाप्रमाणें स्मृतींत देखील योग्य तो फेरबदल करून स्त्रियांची योग्यता वाढविण्यास समाजनेत्यांनीं धीरानें पुढें सरसावलें पाहिजे. स्त्रियांची स्थिति सुधारण्याचें काम राष्ट्रहितदृष्टया अत्यंत आवश्यक असून सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं आमच्या स्त्रीसमाजास अज्ञानपंकांतून वर काढलें पाहिजे. विद्येच्या योगानें ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, त्यांनीं आपल्या बहिणी, मुलीं व बायका यांच्यांतील अज्ञान घालविण्याचा शक्य तो प्रयत्न केला पाहिजे, असें केल्यास पिठोरी व्रतासारखीं हिंदुसमाजाचें हिडीस रूप दाखविणारीं व्रतें मागें पडतील. या व्रताचा काल अगदीं अलीकडचा आहे. मनूनंतर बराच काल लोटल्यावर पुराणें अस्तित्वांत आलीं. त्यानंतर तंत्रें रचलीं गेली. शक्तिपूजेचें महत्व वाढलें. देवींच्या अंगीं संतती व संपत्ति देण्याची शक्ति आहे असें तंत्रकारांनीं व पुराणांच्या लेखकांनीं प्रतिपादन केलें. ज्या देवींची आराधना केल्यानें पुत्रप्राप्ति होते असें सांगण्यांत आलें त्या देवींचीं नांवेंच लक्षांत घेतां त्या किती भयानक आहेत याची सहज कल्पना होण्याजोगी आहे.' प्रेताळी, डांकिनी, निशाचरी, रुद्रवेताली, विरूपाक्षी, नरभोजनी, कलहप्रिया, राक्षसी, भयंकरी, ध्वंसिनी, दुर्मुखी, प्रेतवाहना, त्राटकी, यमदूति, दीर्घलंबोष्टी, काकदृष्टि, भक्षणी, व्याघ्री, प्रेतभक्षणी, मुंडधारिणी वगैरे नांवें भयंकर आहेत. त्यांचा अर्थ लक्षांत घेतां देवाची प्रकृति जी शक्ति ती इतकी भयानक व भेसूर करून

दाखविणें हें योग्य आहे किंवा कसें हा प्रश्न उद्भवतो. ज्या देवास माता व पिता या अत्यंत श्रेष्ठ नांवांनीं संबोधितात त्याची शक्ति इतकी भेसूर आहे काय ? देवाच्या ठायीं अत्यंत श्रेष्ठतम असेच गुण असणें व असल्याचें समजणें योग्य आहे. संतति अल्पायुषी होण्याचीं कारणें कोणतीं हें स्त्रियांनीं नीट समजून घेऊन उपरिनिर्दिष्ट देवतांचा घरांत संचार होऊं नये एतदर्थ प्रयत्न करावा. त्यांचा संचार झाला असतां पुत्रप्राप्ति कोठून होणार ? बालवयांत मुलांस मातृपितृपद प्राप्त होणार नाहीं अशी समाजानें खबरदारी घ्यावी. त्यांच्यांतील अज्ञान घालवावें. जीवनार्थ कलहांत त्यांचा टिकाव लागेल असें करावें. आरोग्य-देवतेची पूजा करावी. अर्थात् घरांतील स्त्रीपुरुषांचें आरोग्य कायम राहण्यास स्वच्छ हवा व उजेड यांचा मुबलक उपयोग पूर्णपणें घेतां येईल असें करावें, म्हणजे पिठोरी अमावास्येचें व्रत केल्याप्रमाणें होऊन इच्छित हेतू तडीस जातील.

पिठोरी अमावास्या ही विशेषतः संतति सुख प्राप्त व्हावें म्हणून पाळतात. मुलांबद्दलचें प्रेम व त्यांचें हित व्हावें एतदर्थ काळजी मातेच्या ठायीं किती असते हें या सणावरून व्यक्त होतें. या सणास **मातृदिन** असें नांव देऊन त्या दिवशीं मातेची महति मुलांच्या अंतःकरणावर बिंबविण्याचा प्रयत्न हल्लीं चालू आहे. मूलतः इंग्रजांच्या Mother's day वरून या मातृदिनाची टूम निघाली आहे; तथापि पिठोरी अमावास्येस सध्याच्या कालास उपयुक्त असें वळण देण्याच्या कामीं समाजहितचिंतकांकडून होत असलेला प्रयत्न स्तुतीस पात्र आहे. या मातृदिनाच्या दिवशीं जन्मदात्या मातेप्रमाणेंच

**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि ।**

म्हणजे जन्मभूमि देखील स्वर्गापेक्षां श्रेष्ठ आहे ही कल्पना कोमल वयाच्या बालबालिकांच्या अंतःकरणावर ठसविल्यास आमच्या समाजाचें विशेष हित होईल हें सांगणें नको.

——:०:——

## पोळा किंवा वृषभोत्सव.

श्रावण अमावास्येस शेतकरी लोक पोळा नांवाचा सण साजरा करतात. हा सण बैलांसंबंधाचा असून त्या दिवशीं बैलांस रंगवून व शृंगारून त्यांची गांवांतून मिरवणूक काढतात. घाटावरील कित्येक गांवीं हा सण रूढ आहे. सातारा जिल्ह्यांत आषाढांत मूळ नक्षत्राच्या दिवशीं हा सण शेतकरी लोक साजरा करि-

तात. तो ' बेंदर ' या नांवानें ओळखला जातो. सोलापूर, दौंड, पुणेंप्रांत, कर्नाटक व महाराष्ट्राच्या कांहीं भागांत भाद्रपद अमावास्येस ' पोळा ' करतात. पोळ्याचा दिवस जवळ येतांच शेतकरी लोक आपल्या ढोरांचें सामर्थ्य जमलेल्या मंडळीस दाखविण्यास उत्सुक असतात. बैलांच्या शर्यती लावून त्यांचे मालक तो दिवस आनंदांत घालवितात. रात्रीच्या वेळीं वाजतगाजत त्यांची मिरवणूक निघते तेव्हां लहानथोर मोठ्या आनंदानें तो देखावा पाहण्यासाठीं एकत्र होतात. या सणासंबंधानें शास्त्रोक्त विधि नाहीं; तथापि कांहीं ब्राह्मणांत या दिवशीं मातीचा बैल करून त्याची पूजा करण्याची चाल आहे असें समजतें. आपल्या देशांत पुराणकालापासून

## गोधनाचें महत्त्व

विशेष मानिलें आहे. वेदकालीं तर गाईचा समावेश संपत्तींत होत असे. गाईंची अनेक ठिकाणीं स्तुति केलेली असून त्यांचें शत्रूंपासून रक्षण करण्यासाठीं इंद्राची अनेक वेळां प्रार्थना केलेली आढळते. महाभारतकालींदेखील गाई धनाप्रमाणें समजत असत. गाईचें पालनपोषण करणें हें अत्यंत पवित्र व पुण्यदायक कृत्य आहे असें हिंदूंचें ठाम मत असून श्रीकृष्णाचें गोपाल हें नांव अत्यंत प्रिय झालें आहे. कित्येक अवतारांनीं गो—प्रतिपालन करण्यासाठीं शत्रूंवर शस्त्र उचललें असेंही पुराणांतरीं लिहिलें आहे. गाईस पवित्र मानणें, तिला प्रत्यक्ष देवतेच्या ठिकाणीं मानून तिची पूजाअर्चा करणें हें हिंदुधर्माचें एक लक्षण आहे.

शंकराचें वाहन या नात्यानें नंदीस प्रत्येक शिवाच्या देवालयांत अग्रमान मिळतो. लिंगाईतांस ' बसव' हें नांव फार प्रिय आहे. ' बसव' याचा अर्थ 'बैल' असा आहे. देवतांचीं जीं निरनिराळीं वाहनें त्यांतून ' बसव' हें एक नांव मात्र प्रचारांत आलेलें दिसतें. पूर्वकालीं ज्या आर्यांनीं बैलांच्या मदतीनें कृषीचा धंदा नांवारूपास आणिला, त्यांनीं त्यांची जोपासना चांगल्या रीतीनें करून या देशाच्या संपत्तींत भर घातली. हल्लीं शेतकरीवर्गाची स्थिति समाधानकारक नसल्यामुळें त्यांच्या पदरीं भरपूर ढोरें नाहींत; यास्तव त्यांजकडून जमिनीची नीट मशागत होत नाहीं. पूर्वी ज्याप्रमाणें प्रत्येक कुटुंबांत दूधदुभतें भरपूर पुरविणाऱ्या एक दोन गाई असत त्याप्रमाणें आज नाहींत. क्वचित् ठिकाणीं त्या असल्या तरी त्या रोडलेल्या असल्यामुळें त्यांच्यापासून आरोग्य व शक्तिदायक दूध प्राप्त होत नाहीं. जनतेस भरपूर दूधदुभतें मिळाल्याशिवाय ती सशक्त होणें

शक्य नाहीं. शहरवासियांस तर जलमिश्रित दुधाची संवय जडल्यामुळें खऱ्या दुधाची रुचीच ठाऊक नाहींशी झाली आहे. दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असलेल्या चहाच्या दुकानांत होणाऱ्या जलमिश्रित दुधाच्या अपरंपार खपामुळें चांगलें दूध जास्त भाव देऊनही मिळणें मुष्किलीचें झालें आहे. तरी पोळ्यासारख्या सणाचा फायदा घेऊन सुशिक्षितांस बरींच कामें करितां येण्याजोगीं आहेत. अशा उत्सवांत पडून त्यांनीं शेतकरी वर्गाच्या तक्रारी व त्यांच्या गरजा लक्षांत घ्याव्या, त्यांस गुरांढोरांची अवलाद सुधारण्याचे मार्ग दाखवावे. प्रदर्शनें भरवून अवलाद सुधारणारांस बक्षिसांच्या द्वारें उत्तेजन द्यावें; तसें न करतां सध्याची स्थिति अशीच चालू राहूं दिल्यास आमचे अन्नदाते बैल व बलदात्या गाई आम्हांस सोडून जातील.

---

## भाद्रपद महिना.

भाद्रपद मासांत एकान्न व्रत करावें. त्यायोगें धन, धान्य व आरोग्यप्राप्ति होते असें शास्त्रांत सांगितलें आहे. या महिन्यांत हृषीकेशास पायस, गुडमिश्रित भात व लवण दिल्यानें तो संतुष्ट होतो. भाद्रपद शु॥ ३ हा वराह जयंतीचा दिवस आहे. शु॥ १ स शिवाप्रीत्यर्थ मौनव्रत पाळण्याची चाल कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडते. पोळा हा गुरांप्रीत्यर्थ उत्सव भाद्रपद पौर्णिमेस साजरा करण्याची रूढि कांहीं ठिकाणीं आहे. बंगाल्यांत भाद्रपद किंवा आश्विन पौर्णिमेस "अरांधण" नांवाचा सण असतो. त्या दिवशीं चुलीवर कोणीही पाक तयार करीत नाहींत. गणेश चतुर्थी, ज्येष्ठागौरी व वामनद्वादशी हे सण याच महिन्यांत असतात. यांशिवाय हरितालिका व ऋषिपंचमी हीं व्रतें स्त्रियांकडून आचरलीं जातात. अनंतव्रताचें आचरण कुलाचारपरत्वें भाद्रपद शु० १४ च्या दिवशीं करण्यांत येतें. गुजराथेंत भाद्रपद शु० ८ मीस बायका दुर्गाष्टमीचें व्रत करतात. या दिवशीं बायका दूर्वांनीं गणपतीचें पूजन करून उपोषण करतात. या व्रताचें वर्णन व्रतराजांत आहे. शु० ८ मी पासून १६ दिवस महालक्ष्मीव्रत करावें असें व्रतराजांत सांगितलें आहे. महाराष्ट्रांत हें व्रत कांहीं ठिकाणीं चालू असून रात्रौ महालक्ष्मीच्या प्रतिमेपुढें स्त्रिया घागरी फुंकतात. गुजराथेंत गोत्रिरात्रि व्रत या नांवाचें व्रत भाद्रपद शु० १३ पूर्वी तीन दिवस पाळतात व त्रयोदशीपर्यंत तीन दिवस उपोषण करून गाईची पूजा करतात. चवथ्या दिवशीं पारणा होते. सौभाग्यरक्षणासाठीं या

व्रताची योजना असून बायका चारपांच वर्षें हें व्रत पाळतात. महाराष्ट्रांतील मंगलागौरी किंवा वटसावित्री यांच्या जोडीचें हें व्रत असून गोपालकृष्णाची भक्ति विशेष असलेल्या गुजराथी प्रदेशांत गोपूजेचा प्रकार प्रचलित झाला असावा. महाराष्ट्रांत हें व्रत जरी प्रचलित नाहीं तरी सौभाग्यासाठीं गोपूजा करण्याचा प्रघात आहे. भाद्रपद कृष्णपक्ष पितरांप्रीत्यर्थ, श्राद्धादिक कर्में करण्यासाठीं योजलेला असून तो महालय पक्ष या नांवानें प्रसिद्ध आहे.

---

## हरितालिका.

हरितालिका हा सण नव्हे. तें एक कौटुंबिक व्रत असून कांहीं दाक्षिणात्य ब्राह्मण स्त्रियांत मात्र त्याचा प्रचार आहे. याच्या उपत्तीसंबंधानें पुराणांत अशी कथा सांपडते कीं, पूर्वकालीं पर्वतराजाची कन्या पार्वती ही उपवर झाली व नारदाच्या सल्ल्यानें तिच्या पित्यानें तिला विष्णूला देण्याचा बेत केला. परंतु पार्वतीच्या मनांतून शंकरास वरण्याचें असल्यामुळें तिनें आपल्या सखीकडून पित्यास निरोप पाठविला कीं, 'तुम्हीं मला विष्णूच्या पदरीं बांधल्यास मी प्राणत्याग करीन.' इतक्यावरच ती थांबली नाहीं. तिनें आपल्या सखीशीं मसलत करून घरांतून पळून जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ती एका अरण्यांत जाऊन तेथें शिवाचा लाभ व्हावा एतदर्थ शिवलिंगाची पूजा करूं लागली. कालेंकरून शिव प्रसन्न झाला व त्यानें तिला वरिलें. तिनें जें व्रत आचरिलें त्याच प्रकारच्या व्रताचरणानें इच्छित वर प्राप्त होईल या हेतूनें हरितालिकागौरी या नांवानें सखीसह गौरीची पूजा केली जाते.

### शास्त्रोक्त विधि.

भाद्रपद शु० तृतीयेस सर्व मुलींनीं व सौभाग्यवती स्त्रियांनीं प्रातःकालीं मंगल स्नान करून नदींतील शुद्ध स्थानावरील वाळूचीं तीन लिंगें स्थापन करावीं. त्यांची पूजा केल्यावर ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी व सौभाग्यवायन देऊन त्यांचा आशीर्वाद घ्यावा. या दिवशीं उपोषण करावें. रात्रौ जागरण करून हरितालिकेची कथा श्रवण करावी. दुसऱ्या दिवशीं पहांटेस लिंगांची उत्तरपूजा करून तीं विसर्जन करावीं. पूजेसाठीं शेष असेल ती तृतीया घ्यावी. परदिवशीं मुहूर्त मात्र तृतीया असली तरी गौरीव्रत परदिवशींच करावें; कारण चतुर्थी योग शुभ मानिला आहे.

## या व्रताची रूढि

महाराष्ट्रांतील कांहीं स्मार्त सांप्रदायी ब्राह्मणांत मात्र आहे. एकंदर कथेचा मथितार्थ लक्षांत घेतां हें व्रत कुमारिकांनीं करावें हें उचित दिसतें; परंतु कित्येक स्त्रिया लग्न झाल्यावर हें व्रत आचरीत असून पतिनिधनानंतरही तत्संबंधीं उपोषण, पूजा वगैरे करीत असतात. पार्वती व तिची सखी यांच्या मातीच्या रंगविलेल्या मूर्ती आणून त्यांची व शिवलिंगाची पूजा केली जाते. श्रावण शु० तृतीयेला सुवर्णगौरी ( मधुश्रावणीका ), श्रावण कृष्ण तृतीयेला कज्जली गौरी आणि भाद्रपद शु० तृतीयेला हरितालिका गौरी याप्रमाणें सौभाग्यवती स्त्रियांनीं तीनदां गौरीपूजन करावें असें शास्त्र सांगतें.

बंगाल्याकडे हरितालिकेच्या ऐवजीं **वरदचतुर्थी** हें व्रत प्रचारांत आहे. तें देखील इच्छित वर प्राप्त व्हावा याच हेतूनें स्त्रिया माघ पौर्णिमेस आचरीत असतात. या दिवशीं शिवाची कुंदपुष्पांनीं पूजा करावी असें पद्मपुराणांत व इतर ग्रंथांत सांगितलें आहे. यावरून या दिवसाला कुंदचतुर्थी असेंही नांव आहे. स्त्रिया व पुरुष या उभयतांनीं गौरीची पूजा करावी असें आहे, तथापि सौभाग्यवती स्त्रिया मात्र तो दिवस पाळतात. या दिवशीं कुमारिकांना धनधान्य मोदक वगैरेंचीं वायनें द्यावीं असें देवीपुराणांत सांगितलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांत माघ शु० द्वितीयेपासून तीन दिवस गौरी उत्सव चालतो व कुमारिका व विवाहित स्त्रिया त्यांत सामील होतात. हरितालिका व्रत गुजराथेंत प्रचलित नाहीं. कांहीं ठिकाणीं हें व्रत स्त्रियांत रूढ करण्याचा प्रयत्न भटजींकडून चाललेला दृष्टीस पडतो. गुजराथेंतून आलेलें सत्यनारायणाचें व्रत ज्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत विशेष प्रिय झालें तसें हें स्त्रियांसच योग्य मानलेलें व्रत गुजराथी समाजांत प्रचलित होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. हरितालिका गौरीच्या

## व्रतावरून बोध

काय घेतां येईल हें पाहूं. याच्या उत्पत्तीस पार्वती कारण झाली असें दाखवून लिंगपूजा वगैरे कथाभाग पुराणकारांनीं पुढें आणिला हें जरी खरें, तथापि शिव व पार्वती हीं उभयतां विवाहास योग्य होऊन त्यांनीं एकमेकांस वरिलें त्या वेळीं शिवाप्रीत्यर्थ लिंगपूजा करण्याचा प्रघात पडला नव्हता. ( शिवरात्री हा सण पहा. ). प्राचीन कालच्या आख्यायिकांवरून या प्रीतिविवाहाची कथा लिहितेवेळीं पुराणलेखकांनीं त्यांच्या कालीं समाजांत रूढ असलेला लिंगपूजेचा प्रकार या

कथाभागांत घेतला हेंच खरें आहे. शिवासंबंधानें ज्या कालीं पूज्यत्वभाव वाढून त्याची गणना देवांत होऊं लागली, इतकेंच नव्हे तर त्याला प्रत्यक्ष महादेव मानूं लागले, त्याच वेळीं निरनिराळ्या प्रकारानें शिवपार्वतीची पूजा करण्याची पद्धति सुरू झाली. पार्वतीनें त्याला वरिलें त्या वेळीं तो देव म्हणून तिनें त्यास वरलें नाहीं. आपणास हा योग्य वर आहे याच विचारानें तिनें त्याला वरलें व पित्याच्या इच्छेविरुद्ध तिनें हा प्रीतिविवाह घडवून आणिला. असे विवाह प्राचीनकालीं घडून आल्याचे अनेक दाखले पुराणांतरीं आढळतात. भारतकालीं सुभद्रेनें बळरामाच्या इच्छेविरुद्ध अर्जुनास वरिलें. कण्वमहर्षींची अनुमति घेण्यापूर्वींच शकुंतलेचा दुष्यंत राजाबरोबर गांधर्वविवाह झाला. सावित्रीनें तर स्वतःच सत्यवानास निवडलें. नल व दमयंती यांच्या विवाहाची कथा अत्यंत रसभरित असून तिच्यावरून प्रीतिविवाहाच्या बुडाशीं असलेल्या उदात्त प्रेमाची कल्पना होणार आहे. श्रीकृष्णासच वरणार असा रुक्मिणीनें निर्धार करून शेवटीं अन्य वराशीं आपला विवाह लागण्याचें ऐन बेतांत आल्यावेळीं कसें युक्तीनें चुकवून घेतलें हें महशूर आहे. स्वयंवराची चाल प्रीतिविवाहाच्या चालीहून किंचित् भिन्न होती; कारण वधूच्या पित्यानें लावलेला पण जिंकणारासच तिनें माळ घालावी लागत असल्यामुळें अशा वेळीं आवडीनावडीचा प्रश्न नसे. जीं उदाहरणें वर दिलीं आहेत तीं निराळ्या तऱ्हेचीं असून त्यांवरून मुली योग्य वय प्राप्त झाल्यावर आपली प्रापंचिक जबाबदारी पूर्णपणें ओळखून योग्य पुरुषासच वरीत असें दिसतें. अंबेच्या मनांतून भीष्मासच वरण्याचें होतें; परंतु त्यानें आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केली होती त्यामुळें तिला तो वर प्राप्त होत नाहीं असें वाटल्यावर तिनें दुसऱ्या कोणाबरोबर विवाह केला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अशा रीतीनें प्राचीनकालीं घडलेलीं कितीतरी उदाहरणें देतां येण्याजोगीं आहेत. यावरून इतकेंच दिसतें कीं आपला पति निवडण्याची मोकळीक रामायण महाभारतकालीं स्त्रियांस होती. इतकेंच नव्हे तर ही चाल त्यानंतरही रूढ असून क्षत्रियांत असे विवाह झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. त्यांतलेंच एक उदाहरण पृथ्वीराज चव्हाण या रजपूत राजाचें होय. जेव्हां राजा जयचंदानें संयोगितेचें स्वयंवर मांडून अनेक देशींच्या राजांस निमंत्रण केलें, तेव्हां आपल्या कन्येनें ज्यास मनानें वरिलें होतें त्या पृथ्वीराजास निमंत्रण न करितां त्याचा अपमान करण्याच्या हेतूनें द्वारांत त्याच्या सारखा पुतळा उभा करून ठेविला; तेव्हां संयोगितेनें स्वयंवरमंडपांत न्याहाळून पाहून

कोणासही न वरतां थेट जाऊन त्या निर्जीव पुतळ्याच्या गळ्यांत माळ घातली; त्या वेळीं श्रीकृष्णाप्रमाणें पृथ्वीराजानेंही तिला आपल्या रथांत घालून आपल्या राजधानीस नेलें. ( ही कथा भविष्यपुराणांतही दिली आहे. ) सारांश असे विवाह मागें झाले आहेत व सध्या हिंदूंशिवाय इतर धर्मांच्या लोकांत ते होत असतात. पारशी व ख्रिस्तीधर्मीय लोकांत मुलीनें आपला पति निवडण्याची पद्धति सर्वसमंत आहे; परंतु काडीमोड ( divorce ) करण्याची मोकळीक त्या धर्मांनीं ठेविली असून कायद्यानें या बाबींत पुरुष व स्त्रिया यांस बऱ्याच सवलती दिल्या असल्याकारणानें कांहीं अंशीं ही प्रीतिविवाहाची चाल समाजाच्या स्थैर्यास व नैतिक प्रगतीस विघातक आहे असें कित्येकांचें मत बनत चाललें आहे. तथापि अज्ञानदशेंत वधू व वर हीं उभयतां असतांना त्यांचा जन्माचा संबंध त्यांच्या पालकांनीं कधीं कधीं बेजबाबदार रीतीनें जुळविणें हेंदेखील अनिष्टच होय. आम्हीं हिंदूंनीं विवाहसंस्काराचें पावित्र्य ओळखून अल्पवयी अर्भकांचीं लग्नें करण्याची चाल साफ बंद करण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. या दिशेनें आपल्या भरतखंडांतील म्हैसूर व बडोदें येथील सुविद्य संस्थानिकांनीं कायदे करून या विषयाचें महत्व लोकसमुदायाच्या नजरेस आणून दिलें आहे. याबद्दल ते सर्व हिंदु धर्मीयांच्या स्तुतीस पात्र आहेत. प्रपंच म्हणजे काय, पति व पत्नी यांचें नातें किती श्रेष्ठ दर्जाचें आहे, पति व पत्नी हीं एकमेकांस सर्व तऱ्हेनें अनुरूप असणें किती अगत्याचें आहे वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार केल्याशिवाय आपल्या ताब्यांतील मुलांमुलींची विल्हेवाट लावूं नये. वधूपक्षाकडून हुंड्याच्या रूपानें शक्य तितकी अगडबंब रक्कम उपटण्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेस वरपक्ष बळी पडत असल्यामुळें विवाहकार्यांत सांपत्तिक अडचणी उपस्थित होऊन कित्येक कुटुंबांवर आपत्ति कोसळते. त्याचा विचार करून ही आसुरी चाल काढून टाकिली पाहिजे. बंगाल्यांत अलीकडच्या कालांत घडलेलें स्नेहलतेच्या आत्महत्येचें हृदयद्रावक उदाहरण या दुष्ट चालीचें निर्मूलन करण्यास सर्व वडील जनांस व तरुणांस सांगत आहे. जरठ कुमारी विवाह, अज्ञान अर्भकांचे विवाह, केवळ द्रव्याच्या आशेनें घडून येणारे विवाह बंद पाडा असें हरितालिका व्रत सांगत आहे. गौरीनें जरठ शंभूस वरिलें असें जें वर्णन आहे तें सर्वथैव असत्य होय, हें शंकरानें विवाहानंतर केलेल्या अद्भुत पराक्रमावरून समजून येईल. शंकरपार्वतीच्या जरठकुमारी विवाहासंबंधाच्या गोष्टी हास्यरसपरिपोषणासाठीं पुराणकारांनीं उत्पन्न केल्या असाव्या. ' आर्य ऋषींच्या वंशजांनो ! तुमच्या विवाहसंस्कारांत शिरलेली अनीति अजी-

घात काढून टाकून तो शुद्ध करा; असें केल्यानें तुमचें आर्यत्व कायम राहून तुमचा समाज श्रेष्ठतम पायरीस चढल्याशिवाय राहणार नाहीं.'

---

## गणेशचतुर्थी.



**नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने ।**
**यस्यागस्त्यायते नाम विघ्नसागरशोषणे ॥**

ज्याच्या नामामध्यें विघ्नसमुद्राचें अगस्तीप्रमाणें शोषण करण्याचें सामर्थ्य आहे आणि वेदान्ताचें ज्ञानही जो करून देतो असें मानिलें जातें, त्या गणपतीचा वार्षिक महोत्सव प्रत्येक भाद्रपद शु० चतुर्थीस साजरा केला जातो. प्रत्येक हिंदु महिन्याची शुक्ल पक्षांतील चवथी तिथि सिद्धिविनायकी या नांवानें प्रसिद्ध असून भाद्रपद शुक्लचतुर्थी ही महासिद्धिविनायकी होय. कृष्णपक्षांतील चतुर्थीस संकष्टचतुर्थी हें नांव आहे. ही तिथि मंगळवारीं आल्यास अंगारकी संकष्टचतुर्थी असें मानून त्या दिवशीं चंद्रोदयीं गणपतीची पूजा केल्याच्या योगानें सर्व प्रकारच्या संकटांचा परिहार होतो असें भाविक हिंदुलोक समजतात. श्रावण व माघांतील अंगारकी विशेष श्रेष्ठ समजतात. गणपतीच्या उपपत्तीसंबंधानें अनेक कथा पुराणांत सांपडतात. मुद्गलपुराण, गणेशपुराण व गणेशभागवत हे तीन संस्कृत ग्रंथ उपपुराणात्मक असून त्यांच्यांत आलेल्या कथाभागांत एकवाक्यता नाहीं. तरी सामान्यतः पुढील कथा गणेशाच्या उत्पत्तीसंबंधानें विशेषतः सांगण्यांत येतातः—मत्स्यपुराणांत असें लिहिलें आहे कीं एकदां पार्वतीनें आपल्या

अंगाची मळी काढून तिचा एक पुतळा तयार केला. त्यास हत्तीचें मुख असून खालची आकृति पुरुषाप्रमाणें होती. पुढें तिनें लीलेचा उपरम करून तो पुतळा जलांत टाकिला. तेव्हां त्यानें विशाल देह धारण केला व देवानीं हा गंगापुत्र मानून त्याची पूजा केली. विनायकनामक रुद्रगणांचें त्यास आधिपत्य दिलें. पार्वतीच्या अंगाच्या मळापासून याची उत्पत्ति असल्यामुळें यास शिवपुत्र असें ह्मणतात. दुसरी एक कथा अशी आहे कीं तारकासुराच्या सैन्यांतील गजासुर नांवाच्या असुरानें शंकराचा कमंडलू लाथाळून त्याचा अपमान केला. हें कृत्य आपला द्वारपाल जो गणपति त्याचेंच असावें या समजुतीनें शंकरानें त्याचा शिरच्छेद केला. परंतु आपल्या पत्नीकडून खरा प्रकार समजतांच त्यानें गजासुराचें शुंडायुक्त शिर त्याच्या धडापासून वेगळें केलें व गणपतीच्या धडावर गजतुंड बसविलें. हा गजासुर तारकामय संग्रामांत कपाली रुद्राच्या हातून मरण पावल्याचें मत्स्यपुराणांत सांगितलें आहे. अशीही एक कथा आहे कीं गजासुराचा वध करण्यासाठीं विष्णूनें पार्वतीच्या उदरीं जन्म घेतला. त्याचें योग्य कालीं अष्टसिद्धींबरोबर लग्न झालें व सिद्धींनीं त्याला अनेक कार्यांत मदत केली. प्राचीन कालीं त्रिविष्टप किंवा तिबेटदेश देवभूमि होता व तेथें प्राचीन आर्यांच्या देवदेवता मूलतः वास करीत अशी समजूत आहे. या देवांत लेखाः नांवाचे देवगण होते. हे देवगण लेखकाचें काम करीत. गणपतीस अत्यंत श्रेष्ठ लेखक मानिला आहे. तेव्हां अशा गणांतील एक देवता गणपतीच्या नांवानें हिंदूंच्या देवगणांत दाखल करण्यांत आली असल्यास नकळे. गणपतीच्या उत्पत्तीचा तात्त्विकदृष्ट्या विचार करून

## गणपति हा प्रणवस्वरूप

असल्याचें गणेशपुराणाच्या १२ व्या अध्यायांत विस्तारानें सांगितलें आहे. गणपति हा मूळचा गणेश नसून गुणेश आहे; अर्थात् सत्व, रज व तम या त्रिगुणांचा तो अधिपति होय. सृष्टीला व्यापून असणारा परमेश्वर ॐ प्रणववाच्य असल्याचें सांगून गणपति हा त्याचेंच रूपांतर होय असें दर्शविलें आहे. एकदंत वक्रदंत, हा प्रणवाच्यावरचा भाग आहे. यासाठीं हीं नांवें गणपतीस देण्यांत आलीं आहेत. ज्ञानेश्वरीच्या आरंभीं श्रीगणेशस्तवन करितेवेळीं ज्ञानदेवानें ह्मटलें आहे कीं—

> **उपरी दशोपनिषदें । जियें उदार ज्ञानमकरंदें ॥**
> **तियें कुसुमें मुक्तिसुगंधें । शोभती भाळीं ॥**

अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ॥
मकार महामंडल । मस्तकाकार ॥
हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ॥
तें मियां गुरुकृपें नमिलें । आदिबीज ॥

चतुर्थीला गणपतिपूजनाची चाल आहे तिचा अर्थ असा कीं, चतुर्थ तूर्यावस्थेंत परमात्म्याचा साक्षात्कार होतो. या दिवशीं चंद्रदर्शनाचा निषेध आहे; कारण चंद्र ही मनाची देवता असून मन चंचल आहे. चंद्रदर्शन न घेणें म्हणजे मनोलय करणें होय. गणपतीचें वाहन जो उंदीर तो कालरूप जाणावा. उंदीर ज्याप्रमाणें अहर्निश पदार्थमात्र कुरतडीत असतो, तद्वत् कालही सृष्ट पदार्थांचा सारखा नाश करीत आहे. या कालालाच ज्यानें जिंकून आपलें वाहन बनविलें तो भूतमात्रांचा पति गणराज श्रेष्ठ होय. असें या देवतेचें तात्विक वर्णन आहे.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणपतीची मृत्तिकेची प्रतिमा पूजावी. या देवतेला दूर्वा व मोदक फार प्रिय असल्यामुळें ते समर्पण करावे. शक्त्यनुसार नवविधा भक्तीच्या प्रकारांनीं त्याला संतुष्ट करावें. गणपतीचें विसर्जन दीड, पांच, सात, दहा, किंवा एकवीस दिवसांनीं करावें. विसर्जन होईपर्यंत उत्सव चालू ठेवावा. उत्तरपूजेनंतर प्रतिमा जलांत विसर्जन करावी असा हा वार्षिक गणपतिपूजेचा शास्त्रोक्त विधि आहे. चालू रूढि पाहूं जातां गणेशचतुर्थी पाळण्याची पद्धति विंध्याद्रीच्या दक्षिणेस मात्र आहे. दक्षिण देशांतून जे लोक उत्तरेकडील प्रदेशांत जाऊन राहिले आहेत त्यांच्यांतही हा उत्सव चालू आहे. मुंबई इलाख्याच्या कांहीं भागांत या दिवशीं कागदावर किंवा चंदनानें पानांवर तात्पुरतें काढलेलें गणपतीचें चित्रच पूजीत असतात. अन्यधर्मीयांच्या जाचामुळें देशत्याग करून रानोमाळ पळून जाण्याचा प्रसंग आल्यामुळें आपले धार्मिक विधि रक्षण करून ठेवण्यासाठीं या प्रकाराचा पूर्वजानीं अवलंब केला असावा. तोच कुलाचार अद्यापि कोंकणांतील कांहीं भागांत दृष्टीस पडतो. कित्येक या चित्रांशिवाय मृत्तिकेच्या प्रतिमेचीही स्थापना करितात. तृतीयेच्या दिवशीं शंकर व गौरीचीं चित्रें पुजण्याची चाल कांहीं ठिकाणीं आहे. कोंकण, महाराष्ट्र व मुंबई या ठिकाणीं सप्तमीपासून नवमीपर्यंत मोठ्या थाटानें ज्येष्ठा गौरीचा

उत्सव साजरा होत असून गौरीगणपतीचें एकाच दिवशीं विसर्जन करण्यांत येतें. ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत सर्वच वर्णांचे लोक या देवतेची मोठ्या भक्तीनें पूजा करितात. बंगाल्यांत गणपतीचा उत्सव रूढ नाहीं, परंतु दुसऱ्या दोन शिवगणांची पूजा करण्यांत येते. फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस घंटाकर्ण नांवाच्या गणाची पूजा होत असून हा गण अप्रतिम सुंदर असल्यामुळें त्याच्या पूजनानें सौंदर्य प्राप्त होतें अशी तेथील लोकांची समजूत आहे. या गणाचा द्योतक म्हणून एका पाण्यानें भरलेल्या घटाची पूजा केली जाते. याच महिन्यांत घेंटू नांवाच्या दुसऱ्या एका गणाची पूजा करून त्वग्रोगापासून आपलें रक्षण करण्याबद्दल त्याची प्रार्थना केली जाते. द्रविड देशांत रामेश्वरापर्यंत गणेशोत्सव चालू असून तो साजरा करण्याची पद्धति स्थलपरत्वें भिन्न आहे. कानडी लोक गणेशचतुर्थीस **बेनकन हब्ब** आणि तेलगू लोक **पिल्लेयर चवती** असें म्हणतात. पिल्लेयर हें त्या लोकांनीं गणपतीस दिलेलें नांव आहे. तेथील लोकांचा असा समज आहे कीं ब्राह्मणाचें आराध्यदैवत शंकर, क्षत्रियाचें विष्णु, वैश्याचें ब्रह्मा आणि शूद्राचें गणपति होय. गणपतीची पूजा चतुर्थ वर्णांतील लोक देखील आस्थेनें करीत असतात. यावरून तेथील लोकांचा हा समज झाला असावा. आपले हिंदु संस्थानिक व मठाधिपति देखील हा उत्सव मोठ्या दरबारी थाटानें पाळतात. मुंबई, पुणें वगैरे प्रसिद्ध ठिकाणीं चित्रांचे सार्वजनिक देखावे या प्रसंगीं दाखविले जातात. अलीकडे सार्वजनिक गणपत्युत्सव साजरा करण्याचा प्रघात पडत चालला असून त्यांत मूर्तीसमोर पुराण, कथा व कीर्तनाशिवाय निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देण्याची वहिवाट पडत चालली आहे. भजनी मेळ्यांचा उपक्रम कांहीं कारणांमुळें यशस्वी झाला नाहीं. हा चतुर्थीचा उत्सव हिंदुस्थानांत सर्वत्र चालू असल्याचें दिसत नाहीं. गुजराथेंत गणेशचतुर्थीचा उत्सव पाळण्यांत येत नाहीं. या दिवशीं गूळ व तूप घालून तयार केलेल्या बाजरीच्या पिठाच्या गोळ्या घरांत जागोजागीं ठेवतात. त्या उंदीर खाऊन टाकतात. गणपतीच्या दिवशीं त्याच्या वाहनास याप्रमाणें मान देण्याची रूढि कां पडली हें नकळे. काठेवाडांत घरोघरीं गणपतीची मूर्ति असते. वैशाख शु॥ ४ स तूप व शेंदुरानें मूर्तीचें पूजन करून नैवेद्य दाखवितात. महाराष्ट्राप्रमाणें नवीन मूर्ति आणून तिची पूजा करण्याचा किंवा हा दिवस सणांप्रमाणें पाळण्याचा प्रघात उत्तर देशीं आढळत नाहीं.

## गणेशाचीं देवालयें.

गणेशाचीं महाराष्ट्रांत गांवोगांवीं देवालयें आहेत. त्यांतही चिंचवड, मोरगांव, पारोळें, व रंजनगांव येथील देवालयें जवळपासच्या भागांत विशेष प्रसिद्ध असून भक्त मंडळी या देवतेच्या दर्शनास व नवस फेडण्यास तेथें जात असतात. चिंचवड येथील देवालय मोरोबा नांवाच्या गणेश भक्तामुळें विशेष प्रसिद्धीस आलें. देव घराण्याच्या सात पिढया या ठिकाणीं झाल्या व शेवटची पिढी १८१० सालीं वारस नसतां नामशेष झाली. अद्यापि देव कुलाचे कांहीं लोक या ठिकाणीं राहतात. या सात पिढयांच्या मूळ पुरुषाच्या स्मरणार्थ मार्गशीर्ष कृ० ६ पासून ९ मी पर्यंत उत्सव चालतो व मोठी जत्रा भरते. मोरोबाचें इष्टदैवत गणेश प्रथमतः मोरगांव ( पुणें ) येथें होतें. पुढें मोरोबा चिंचवड येथें राहूं लागले. मोरगांव येथें भाद्रपद शु० ४ पासून आश्विन शु० १० मीपर्यंत गणेश उत्सव होत असून मोठी जत्रा भरते. पारोळें ( खानदेश ) येथील गणेशाची जत्रा वैशाखांत भरते. रंजनगांव ( पुणें ) येथें भाद्रपद ४ थीस गणेश उत्सव मोठ्या प्रमाणावर होत असून तो पाहण्यासाठीं शेजारच्या गांवची बरीच मंडळी एकत्र होते.

## गणपतीबद्दल पूज्यत्वभाव

प्रत्येक हिंदु ह्मणविणाराच्या अंतःकरणांत पूर्णपणें वसत आहे. हें दैवत विघ्नांचें हनन करण्यास सर्वथैव समर्थ असल्यामुळें नित्यपूजेच्या पंचायतनांत त्याचा समावेश झाला आहे. सर्व शुभाशुभ संस्कारांत गणेशपूजा ही प्रारंभीं व्हावयाची. या देवतेची व्याप्ति नेपाळांतील लौडी गणेशापासून रामेश्वर येथील गणेशमूर्तीपर्यंत आढळते. याचें कारण शैव व वैष्णव या दोन्ही पंथांचे लोक या देवतेस भजत असून आपआपल्या मताप्रमाणें कोणी त्यास शिवस्वरूप तर कोणी विष्णुस्वरूप समजतात. हिंदुस्थानांत प्रत्येक गांवांत विघ्नहर्त्या गणपतीचें देवालय असून कित्येक त्याला कुलदेव असें मानितात. तामील देशांत त्याला **तुंबिकाई अलवर** म्हणजे बुद्धिवान गजानन असें म्हणतात. तंजावर येथें गणपतीचें प्रसिद्ध देवालय आहे. त्रिचनापल्ली येथील उच्छि पिल्लेयर हें गणपतीचें देवालय अत्यंत भव्य व सुंदर आहे. अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथारंभीं गणेशस्तवन केलेलें आढळतें. मराठींत गणेशप्रताप, गणेशलीलामृत, गणेशभागवत, गणेशपुराण, गणेशवि-

जय वगैरे जुने ग्रंथ प्रसिद्ध असून त्यांची श्लोकसंख्या दीड लक्षाहून अधिक होईल. या देवतेच्या भक्तीचा जो निराळाच पंथ आहे तो

## गाणपत्य पंथ

या नांवानें संबोधिला जातो. यासंबंधाची माहिती अशी आहे कीं, वेदांतील रुद्र हा मरुत् वगैरे अनेक गणांचा अधिपति असें मानण्यांत येत असे. या गणांत रुद्राचेच गुण वास करीत असल्याचें मानून त्यांना देखील रुद्र असें म्हणत. या रुद्रांचा किंवा गणांचा एक नायक असे, त्याला गणपति हें नांव देण्यांत आलें होतें. अथर्वशीर्ष उपनिषदांत अनेक देव व भूतांस रुद्र असें म्हटलें आहे. यांपैकीं विनायक हें एकाचें नांव आहे. विनायक हा सर्व ठिकाणीं असून मनुष्यमात्रांच्या कृत्यावर त्याची नजर असते असें महाभारतांत (अनुशासनपर्व) सांगितलें आहे. विनायक, गणेश्वर किंवा गणपति अनेक असल्याचा उल्लेख असून विनायकांची प्रार्थना केली असतां ते संकटांचें निवारण करून कार्यसिद्धि करून देतात; यामुळें त्यांना सिद्धिविनायक हें नांव प्राप्त झालें. मानवगृह्यसूत्रांत चार विनायक असल्याचें सांगितलें असून त्यांचा संचार अंगांत झाला असतां स्त्रीपुरुषांच्या हातून विलक्षण कार्यें घडतात असा उल्लेख आहे. त्यांचा कोप झाला असतां मुलें मृत्युमुखीं पडतात व इतर प्रकारची हानि होते. यासाठीं विनायकास संतुष्ट करण्याकरितां मांस, मत्स्य, अन्न व खिचडी या पदार्थांचा बलि अर्पण करावा व तो दूर्वांनीं झांकून चार रस्ते एका ठिकाणीं जुळले आहेत अशा जागीं ठेवावा वगैरे अनेक विधि सांगितले आहेत. रुद्र व ब्रह्मदेव यांनीं विनायकास गणांचा नायक नेमिलें आणि मनुष्यमात्रांच्या कार्यांत संकटें उपस्थित करण्याची ( स्तुत्य ?) कामगिरी त्याजकडे सोंपविली. सहा नांवांनीं प्रसिद्ध असा एकच विनायक आहे व त्याला, बलि अर्पण करून संतुष्ट करावें वगैरे विवेचन याज्ञवल्क्य-स्मृतींत केलें आहे. अंबिका ही विनायकाची माता असून तिलाही पूजा अर्पण करावी असें याज्ञवल्क्याचें मत आहे. यावरून दिसून येईल कीं विनायक हा रुद्राप्रमाणेंच भयानक परंतु प्रसन्न करून घेतल्यास हित करणारा आहे असें मानण्यांत येत असे. गृह्यसूत्रें लिहिलीं गेलीं त्या वेळीं चार विनायक असल्याचें समजत असत. स्मृतिकालीं एकच विनायक आहे असें ठरविण्यांत येऊन त्याची माता अंबिका आहे असें मत बनलें. विनायकाचीं कृत्यें, त्याला देण्यांत येणाऱ्या मत्स्यमांसादिक बलींचा प्रकार, हें सर्व पाहिलें असतां त्याला भूतपिशाचादिकांचा नायक किंवा

पुढारी समजत असत हें सिद्ध होतें. पौराणिक कालीं गणपति–विनायक हा हिंदूंचा अत्यंत पूज्य देव झाला. तो विघ्नहर्ता आहे याच दृष्टीनें सर्व त्याच्याकडे पाहूं लागल्यामुळें कार्यारंभीं त्याचें चिंतन करणें हा सर्व शुभाशुभ कृत्यांतील एक अत्यावश्यक विधि होऊन बसला. ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या किंवा चवथ्या शतकापर्यंत गणपति–विनायकाची महति वाढली नव्हती व त्यानंतर त्याची पूजा अर्चा करण्याचा प्रघात पडला असें डॉ. भांडारकरांचें मत आहे. जोधपूरच्या वायव्येस २२ मैलांवर घटियाला येथें विक्रम संवत् ९१८ ( इ. स. ८६२ )त बांधलेला एक स्तूप असून त्याच्या शिखरावर चोहोंबाजूंस चार विनायक खोदलेले आहेत. त्यावरील लेखांत विनायकांची प्रार्थना केलेली आढळते. कित्येक पुरातन लेण्यांत देखील गणपतीची मूर्ति खोदलेली आहे. यावरून असें म्हणतां येईल कीं सुमारें एक हजार वर्षांपूर्वीपासून गणपतिविनायकाची उपासना करण्याची रूढि या देशांत चालू झाली असावी.

गणपतीचा गजानन केव्हां व कसा झाला याचा उलगडा होत नाहीं. पुराणांत त्याबद्दल कारण दिलें आहे, त्यावरून त्याच्या धडावर गजतुंड बसविलें असावें हें सयुक्तिक दिसत नाहीं. रुद्र व त्याची पत्नी हीं गजचर्म पांघरीत असत. ज्या अरण्यांत रुद्राचा व त्याच्या विनायक वगैरे गणांचा वास असे तें स्थान हत्तींसाठीं प्रसिद्ध मानून वन्यपशूंत विशेष बुद्धिमान् जो हत्ती त्याचें शिर विनायकास जोडण्याची क्लृप्ति पुराणकालीं निघाली असावी. शिवाच्या अन्य गणांस देखील इतर प्राण्यांचीं ( माकड, मांजर, सिंह ) शिरें असल्याचें पुराणांवरून दिसून येतें. या सर्व गणांत गणपतीला अत्यंत बुद्धिमान् व विद्वान् असें मानतात. वेदांत बृहस्पतीस अत्यंत ज्ञाता व बुद्धिशाली गणिलें असून त्यास गणपति असें संबोधिलें आहे.

**गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ॥**

( मं. २–२३ सू. )

**अर्थ**—“ समुदायांचा प्रभु म्हणून तूं गणपति, तूं ज्ञानी जनांत अत्यंत ज्ञानी, ज्यांची कीर्ति अतिशय उत्कृष्ट त्यांच्यामध्येंही तूं श्रेष्ठ, तूं राजाधिराज, तुला आम्ही आदरानें बोलावितों. हे सूक्तदेवते ब्रह्मणस्पते, आमची हांक ऐकून आपल्या सर्व शक्तींसह या आसनावर विराजमान हो. ” याच सूक्तानें गणपतीचीही स्तुति केलेली आपण सध्यां पाहतों; अर्थात् वेदकालीं केवळ रुद्रांचा

किंवा भूतपिशाचादिकांचा जो नायक म्हणून प्रसिद्ध होता, तोच पुराणें रचलीं गेलीं तेव्हां विघ्नहर्ता सिद्धिविनायक व विद्याधर बृहस्पति झाला हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. अथर्ववेदांतील मुख्य मंत्र ॐ **गं गणपतये नमः** हा देखील हल्लींच्या गणपतीसंबंधाचा नाहीं असें विद्वानांचें मत आहे. परंतु पाणिनीच्या पूर्वी तैत्तिरीयारण्यकाच्या सुमारास रचिलेल्या नारयणोपनिषदांत गणपतीचा स्पष्टपणें उल्लेख आहे. यावरून गणेशभक्ति ख्रिस्ती शकाच्या आरंभीं प्रचारांत होती असें ठरतें.

गाणपत्य पंथांत सहा भेद असल्याचें आनंदगिरीनें शांकरदिग्विजयांत सांगितलें आहे. ते पुढीलप्रमाणें आहेतः—**महागणपतिपंथ**—या पंथाचे लोक गणपति हाच जगत्कर्ता असून त्यानेंच ब्रह्मदेवादि देव व एकंदर विश्व उत्पन्न केलें असें मानतात. २ **हरिद्रा गणपतिपंथ**—या पंथाचे लोक वर निर्दिष्ट केलेल्या सूक्तांतील ब्रह्मणस्पति हाच गणपति असें मानून तो सर्वांत श्रेष्ठ आहे असें समजतात. गणपतीची मूर्ति, त्याचें यज्ञोपवीत, वस्त्रें वगैरे पिंवळ्या रंगाचीं असावीं. त्याची सोंड व एकदंत याच्या तप्तमुद्रा अंगावर धारण कराव्या. तोच सर्वश्रेष्ठ आहे असें मानावें वगैरे या पंथाचें मत आहे. हा पंथ मध्वाचार्यांच्या वैष्णवपंथानंतर अस्तित्वांत आला असावा किंवा मध्वाचार्यांनीं तप्तमुद्राधारणासंबंधानें केलेल्या अनुज्ञांचा त्याच्यावर परिणाम झाला असला पाहिजे. ३ **उच्छिष्ट गणपतिपंथ**—या पंथाचे लोक वाममार्गी शाक्तांप्रमाणें निंद्य रीतीनें त्याची भक्ति करितात. ४ **नवनीतगणपतिपंथ.** ५ **स्वर्णगणपतिपंथ.** ६ **संतान गणपतिपंथ.** ह्या पंथाचे लोक आपण श्रुतीप्रमाणें गणपतिपूजा करितों असें सांगतात. गणपति हाच आदिकारण असून प्रत्येक शुभकार्याच्या आरंभीं तो देवाधिदेव असल्यामुळें त्याची पूजा करण्यांत येते असें ते प्रतिपादन करितात. या पंथाचे लोक महाराष्ट्रांतही होते व सध्यां आहेत. चिंचवड गांवीं सुमारें अडीचशें वर्षांपूर्वी श्रीमोरयादेव, धरणीधर, गोसावीनंदन, निरंजन, चिंतामणिदेव इत्यादि भक्त परम गाणपत्य होऊन गेले. थोरले माधवराव पेशवे हेदेखील गणपतीचे उपासक असून थेऊर येथील गणपतीची सेवा मनोभावानें करीत. पुण्याजवळ चिंचवड, कोकणांतील पुळें व उत्तर कानडा जिल्ह्यांत इडगुंजी येथील गणपतीचीं देवालयें जागृत असल्याबद्दल प्रसिद्धि आहे. प्रसिद्ध अष्टविनायकांचीं जीं आठ पवित्र स्थानें तीं देखील महाराष्ट्रांतच आहेत. यावरून या प्रांतापुरतें पाहूं गेल्यास एका कालीं येथें गाणपत्य पंथानें लोकांच्या धर्म-

विचारांवर बराच पगडा बसविला होता असें दिसतें. असो. ऐतिहासिकदृष्टया विचार करतां असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, वेदकालापूर्वी सुरासुरांत ( देव दैत्य ) ज्या जंगी लढाया झाल्या त्यांत गणपति हा तत्कालीन सेनानायक असावा. कोणत्याही प्रकारचीं विघ्नें आलीं तरी आपल्या बुद्धिसामर्थ्यानें त्यांचा परिहार करून व शत्रूंना पावलोपावलीं विघ्नें उपस्थित करून यानें स्वपक्षाची सरशी होईल असें केलें असावें, म्हणूनच याला विघ्नराज व विघ्नहर्ता हीं दोन्ही नामाभिधानें प्राप्त झालीं. कालेंकरून गणपतीचें ऐतिहासिक अस्तित्व व त्याचे पराक्रम यांचें वर्णन लोकोत्तर प्रकारचें होऊन त्याला धार्मिक स्वरूप व महत्व प्राप्त झालें. सध्यां या दैवताची पूजा

## विघ्नविनाशक मंगलमूर्ती

म्हणून केली जाते. तो सोळा विद्या व चौसष्ट कला यांहीं मंडित असल्याचें मानून त्याच्या कृपाप्रसादानें सुबुद्धि व सुविद्या यांचा लाभ होतो असें आम्ही आर्य समजतों. कार्य लहान असो किंवा मोठें असो तें निश्चितपणें तडीस जाईल व त्यापासून इच्छित हेतु साध्य होईल हें सांगणें अशक्य असतें. अटकळीबाहेर अदृष्ट अशा गोष्टी आयत्या वेळीं कशा नडतील हें सांगणें बहुतेक शक्य नसल्यामुळें प्रत्येक कार्याच्या आरंभीं विघ्नहर्त्या परमेश्वराची प्रार्थना करून त्याच्या कृपाछत्राखालीं कार्य करीत रहाणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. पुनःपुनः विघ्नें उपस्थित होऊन आपला प्रगतीचा मार्ग तीं खुंटवूं लागलीं तरी न डगमगतां ईश्वरभक्तीची अभेद्य ढाल घेऊन पुढें कूच करीत जाणें म्हणजेच पुरुषार्थाची गुरुकिल्ली प्राप्त करून घेणें होय. हल्लींच्या काळीं गणपतीसारखें गजतुंडधारी स्वरूप सच्चिदानंद स्वरूपाच्या कल्पनेशीं जुळविणें अशक्य झाल्यामुळें ज्यांचे विचार प्रगल्भ झाले आहेत असे लोक चतुर्थीसारखा उत्सव हिंदुस्थानांत साजरा होत असलेला पाहून किंचित् नाक मुरडतात. अशा विचारी व ज्ञानी लोकांनीं या सणास शुद्ध व उदात्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करावा. प्राचीनकाळीं आपल्या देशांत हल्लींच्या पद्धतीप्रमाणें ' क्लब ' किंवा समाज नव्हते. अशा वेळीं एकमेकांत दळणवळण वाढून ओळखी होण्यास व प्रेमसंवर्धनास हे उत्सव कारणीभूत होत. तसेंच आजही घडवून आणणें शक्य आहे. खालच्या वर्गांत मद्यपानाचें बंड याच उत्सवाच्या प्रसंगीं विशेष दिसतें. अशा धर्मबाह्य आचरण करणाऱ्या आपल्या गरीब भाऊबंदांस खरा नीतीचा व धर्माचा मार्ग दाखवून

त्यांस रस्त्यावर आणण्याचा यत्न सुशिक्षित म्हणविणारांनीं अवश्य केला पाहिजे. अनेक देवांच्या ठायीं एकच देव आहे, हें जाणण्याचें सामर्थ्य लोकांत उत्पन्न होईल असें करण्यास पुराणिक व हरिदास यांनीं अशा उत्सवाच्या प्रसंगीं प्रयत्न करणें योग्य होय. केवळ भाडोत्री पुराणिक व हरिदास यांच्या हस्तें कोणतेंही सामाजिक सत्कार्य होणें शक्य नाहीं. श्रीसमर्थ रामदास व संत तुकाराम यांसारखीं निस्पृह व शुद्ध वर्तनाचीं थोर माणसें आमच्यांत कर्तव्यजागृति उत्पन्न करतील तोच सुदिन खरा. गणेशचतुर्थीच्या योगानें आमच्या चित्रकलेस उत्तेजन देण्याची आयती संधि प्राप्त होते. अशा प्रसंगीं प्रसिद्ध चित्रकांराकडून चित्रें तयार करवून त्यांचीं प्रदर्शनें गांवोगांवीं भरतील असें केल्यास बराच उपयोग होईल. विख्यात लेखक रस्किन यांनीं म्हटल्याप्रमाणें चित्रकलेच्या अंगीं सामाजिक, नैतिक व इतर प्रकारची उन्नति करण्याचें सामर्थ्य आहे. यासाठीं समाजहितेच्छूंनीं चित्रकारांस सार्वजनिक रीत्या पारितोषकें देऊन उत्तेजन द्यावें व या महत्वाच्या बाबीकडे जनतेचें लक्ष वेधेल असें करावें. स्वामी विवेकानंद यांनीं एका व्याख्यानांत सांगितलें कीं, '**भरतभूमीला नवजीवन प्राप्त होईल असे प्रयत्न सध्यां हवे आहेत.**' सत्य आहे. विघ्नहर्त्या परमेश्वराचें साह्य मागून ते अव्याहत चालविण्याची जबाबदारी तरुण व सुशिक्षित पुढाऱ्यांच्या शिरावर आहे. सामाजिक नीतिमत्ता प्रत्येक बाबतींत उच्चतम पायरीस पोहोंचेल असें करण्यास

## सुसंस्कृत मनाचे निस्पृह पुढारी

कंबर बांधतील तर आपले सद्धेतु हां हां म्हणतां तडीस जातील. या कार्यांत यशप्राप्ति ही ठेविलेली; यासंबंधानें जगाचा इतिहास साक्ष देत आहे. आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं कोणत्याही समाजांत उच्चतर धर्मतत्वें किंवा नीतितत्त्वें एका किंवा अनेक व्यक्तींच्या द्वारें प्रविष्ट झालीं म्हणजे या नव्या प्रकाशाच्या योगानें त्या समाजाची आध्यात्मिक परिस्थिति बदलून जाते. हा बदल ओळखून त्याप्रमाणें आपलीं मतें व आचरण जर तो समाज नव्या परिस्थितीस जुळेल असें करणार नाहीं, तर तो समाज कालेंकरून नामशेष होतो. ग्रीस व रोम देशांचा प्राचीन इतिहास याची साक्ष देत आहे. तेथील तत्वज्ञान्यांनीं वेळोवेळां केलेल्या उपदेशाचें महत्व न जाणतां त्या राष्ट्रांनीं कमी दर्जाच्या धार्मिक विधींचा स्वीकार केला व शेवटीं तीं महापराक्रमी राष्ट्रें विलयास गेलीं. प्राचीन

लोकांपैकीं फक्त ज्यू व हिंदु तेवढे अस्तित्वांत आहेत. हिंदुराष्ट्रानें नेहमीं बदललेल्या आध्यात्मिक परिस्थितीशीं आपले विचार व वर्तन जुळवून घेतलें. अद्यापि ह्याच प्रकार दृष्टीस पडतो. आम्हीं असें केलें म्हणूनच जिवंत राहिलों. वेदकालीं अनेक देवतांची उपासना चालू होती, परंतु पुढें उपनिषत् कालीं देव एकच आहे असा सिद्धांत ठरला व परमेश्वराचें दिव्य स्वरूप ऋषिमुनि ध्याते झाले. वेदकालीन यज्ञाची कल्पना आत्मयज्ञांत रूपांतर पावली. सत्यज्ञानाची महती कळतांच सर्व समाज जागृत झाला. पुढें ज्ञान शुष्क वाटून श्रीकृष्णानें त्यास भक्तीची जोड देतांच तें अप्रतिम रम्य दिसलें व त्याचा अवलंब करण्यास हिंदुराष्ट्र तयार झालें. पुनः चक्रनेमिक्रमनियमानुसार अनेक आपत्तींच्या माऱ्यांत हें राष्ट्र सांपडल्यामुळें सहजच ज्ञानाभिवृद्धीस वाव न मिळून तें दैववादाच्या व भलत्याच धार्मिक विधींच्या फेऱ्यांत सांपडलें. आज पहावें तर पुनः विचारक्रांति होत असून उच्चतर धर्मतत्वें व नीतितत्वें उदित होत आहेत. पूर्वकालीं ऋषिमुनींनीं व अलीकडे संतांनीं प्रवर्तित केलेल्या उदात्त ज्ञानमार्गाचा अवलंब करण्याकडे सर्वांचा ओढा आहे, हें शुभ चिन्ह होय. अशा वेळीं या बदललेल्या वातावरणांत शुद्ध, सात्विक व शाश्वत सुखाचा लाभ करून देणारें दिव्यतेज उत्पन्न होईल असें करण्यास प्रत्येक आर्यमातेच्या लेंकरानें पुढें सरसावलें पाहिजे. या महत्कार्यांत विघ्नहर्त्या परमेश्वराच्या मदतीनें आम्हांस यश येईलच येईल.

## आरती गणपतीची.

श्री सच्चित् आनंदा जय जय गणराया ।
नेई परम पदातें तव भक्तां सदया ॥ ध्रु० ॥

अपार महिमा तूझा न कळे कवणांसी ।
धर्मविचारी थकले गम्य न परि त्यांसी ।
तीर्थाटन जन करितीं रामेश्वर काशी ।
परि नच शांती लाभे चंचल चित्तासी ॥ १ ॥

जगत्स्वरूपा तुजला स्थापूं मी कोठें ।
आवाहन करुं कैसें सन्मंडपिं थाटें ।
तव महिमा आठवितां तर्कोदधि आटे ।
पाहुनि अद्भुत शक्ती आदर बहु वाटे ॥ २ ॥

गंधाक्षतसुमदूर्वा तव योग्य न मिळती ।
तव निज महिमा सूचक मंत्र न मज येती ॥
अर्घ्यस्नानविलेपन करुं कैंवी रीति ।
नकळे, येउनि राहो हृन्मंदिरिं मूर्ति ॥ ३ ॥
काया वाचा मनही तव सेवे लागो ।
जो तूं सत्पथ दाविसि त्या मार्गें वागो ॥
तव गुणचिंतनिं मन्मन आनंदें जागो ।
'सज्जन संगति देई' वर निशिदिनिं मागो ॥ ४ ॥

---

## ऋषिपंचमी.

ऋषिपंचमी हा सण नव्हे. तें एक व्रत आहे. स्त्रिया मात्र तें पाळतात. या व्रताचा दिवस भाद्रपद शु. पंचमी असून त्या दिवशीं स्त्रिया ऋषींची पूजा मनोभावें करतात. यावरून या दिवसाला ऋषिपंचमी हें नांव प्राप्त झालें आहे. या व्रतासंबंधानें पुढील दोन कथा भविष्योत्तर पुराणांत सांपडतात. वैदर्भदेशीं उत्तंक व सुशीला या नांवाचें एक दंपत्य होतें. त्यांस एक पुत्र व एक कन्या अशीं दोन अपत्यें होतीं. त्यांनीं यथाकालीं कन्येचा विवाह केला. ती अल्पवयी असतांच तिचा पति निवर्तल्यामुळें वैधव्याचे कष्टमय दिवस मातापितरांच्या शुश्रूषेंत ती कंठूं लागली. पुढें उत्तंकानें वानप्रस्थाश्रम पत्करून तो बायकोमुलांसह गंगातटाकावर एका पर्णकुटिकेंत राहूं लागला. एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं ती विधवा मुलगी निजल्यानंतर कांहीं वेळानें तिच्या देहाचे किडे बनले. गतजन्मीं तिच्या हातून रजस्वला असतां पाप घडल्यामुळें तिला अशी दुरवस्था प्राप्त झाली असें उत्तंकानें ठरवून तिच्याकडून पापक्षालनार्थ ऋषिपंचमी व्रत करविलें; त्यामुळें ती पुनः मूळस्वरूपी झाली. ( उत्तंकानें प्रथम हें व्रत कथन करीपर्यंत त्याच्या पत्नीस तें ठाऊक नव्हतें असें या कथेवरून सिद्ध होतें. कन्येचे किडे बनले, किड्यांची पुनः कन्या कशी व केव्हां बनली व तिच्याच हस्तें हें व्रत करविलें किंवा त्या किड्यांकडून करविलें याचा बरोबर उलगडा या कथेवरून होत नाहीं. )

दुसरी एक याच व्रतासंबंधीं अशी कथा आहे कीं वर सांगितलेल्या विदर्भ देशीं सुमित्र नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीनेंही रजस्वला असतां

घरांत विटाळ कालविल्यामुळें उभयतां पतिपत्नींस अनुक्रमें कुत्र्याचा, बैलाचा व किड्यांचा जन्म प्राप्त झाला. पुढें तें दंपत्य सप्तर्षींच्या पूजनानें उद्धरून गेलें. ( विदर्भ देशांतच या दोन्ही गोष्टी घडल्या असें त्यांच्या लेखकानें दाखविलें. आहे. किड्यांचा जन्म प्राप्त झाल्यावर त्या दंपत्यांनीं हें व्रत कसें आचरिलें हें समजत नाहीं. )

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

माध्यान्हकालीं नदी, तलाव किंवा विहीर यांपैकीं एकाद्या जलाशयाजवळ जाऊन या व्रतासंबंधीं संकल्प केल्यावर पंचगव्य प्राशन करावें. आघाड्याच्या समिधेनें दंतधावन करून अंगास सौभाग्यवती स्त्रीनें हळद व विधवेनें गोमय लावावें व थंड पाण्यानें स्नान करावें. याप्रमाणें १०८ वेळां स्नान करून पाटावर सप्तर्षींच्या स्थानीं सात सुपाऱ्या मांडून त्यांची पूजा करावी. ब्राह्मणास वायन व दक्षिणा द्यावी. ऋषींची कथा श्रवण करावी. या पंचमीच्या दिवशीं फक्त कंद-मूलांवर रहावें. बैलाच्या श्रमानें पैदा केलेले जिन्नस वापरूं नयेत. याप्रमाणें सात वर्षें हें व्रत पाळल्यास वर कथन केलेल्या पातकाचा नाश होतो ( अर्थात् देहाचे किडे बनण्याची किंवा किड्यांचा जन्म प्राप्त होण्याची भीति रहात नाहीं ).

हें व्रत करण्याचा प्रघात फक्त महाराष्ट्र व कोंकणपट्टींतील कांहीं ब्राह्मण स्त्रियांत असल्याचें दिसून येतें. कित्येक ब्राह्मणस्त्रिया अगदीं लहानपणीं हें व्रत पाळतात, तर कित्येक अगदीं वृद्धापकालीं आचरीत असतात. ( बंगाल्याकडे हें व्रत रूढ नाहीं. तेथें अशी एक समजूत आहे कीं, आषाढांत तीन दिवस पृथ्वी रजस्वला असते. या तीन दिवसांत कोणी जमीन खणीत नाहीं किंवा बीं पेरीत नाहीं. या दिवसांस येथील लोक ‘ अंबुबासी ’ असें म्हणतात. काठेवाडांत कांहीं ठिकाणीं बायका व पुरुष उभयतां ऋषिपंचमीचें व्रत करतात. ) या दिवशीं बैलाच्या श्रमाचे पदार्थ सेवन करूं नयेत असें शास्त्रकारांनीं ठरविल्यामुळें अन्य तऱ्हेनें मीठ, धान्य वगैरे जिन्नस पैदा करून त्यांचें यथेच्छ सेवन करतात. हें

## विलक्षण व्रत

अगदीं अलीकडच्या कालीं उपस्थित झालें. रजस्वला स्त्रीनें कांहीं काल स्वस्थ पडून असणें व प्रपंचाच्या कार्यापासून अलग राहणें आरोग्यदृष्ट्या अत्यंत इष्ट आहे. आरोग्याचें महत्व विशेष रीतीनें ज्या धर्मांत सांगितलें आहे त्या झरतुष्ट्राच्या

( पारशी ) धर्मांत रजस्वला स्त्रियांसंबंधीं कडक निर्बंध सांगितले आहेत; परंतु व्रतोपोषणादि प्रकार त्या लोकांस माहीत नाहींत. हिंदुधर्मांत या गोष्टीस विलक्षण रूप प्राप्त झालें आहे. विशेष सोंवळे पाळणारे कर्मठ पुरुष व स्त्रिया रजस्वला स्त्रीचा शब्द कानीं पडल्यास विटाळ झाला असें मानून स्नान करतात; कित्येक मंत्रवादी म्हणविणारे भोजन करीत असतां अशा स्त्रीचें भाषण कानीं पडल्यास जेवण टाकून जातात. तिची सावली लहान मुलावर पडल्यास तें रोडतें असें समजतात. रजस्वला स्त्रीच्या सावलीमुळें प्राप्त झालेल्या अशक्ततेवर औषधही देण्याचा परिपाठ आहे. रामरक्षास्तोत्रामंत्रित भस्मही मुलांच्या अंगास लावतात. या व्रताच्या उपपत्तीसंबंधाची पौराणिक कथा जशी असंभवनीय व पोरकट आहे तशीच त्याच्या पालनाची तऱ्हा किळसवाणी आहे. गोमय, माती वगैरे पदार्थ अंगास लावणें, पंचगव्य प्राशन करणें वगैरे प्रकार खरोखरच विलक्षण आहेत. यावरून असें दिसतें कीं अशा कथानकावर विश्वास ठेवून भलत्याच सद्धर्मबाह्य कर्मांच्या मागें लागणाऱ्या आमच्या महिलावर्गास

## ऋषि कोणास ह्मणतात

व या पंचमीचें महत्व किती आहे हें समजत नाहीं. त्यामुळें हा दिवस विलक्षण रीतीनें पाळण्यांत येतो. सुमारें सहासात हजार वर्षांपूर्वी आर्य लोक सध्यांच्या हिंदुस्थान देशाच्या वायव्येस रहात होते.कालेंकरून त्यांच्यांत भाऊबंदकी वाढून भयंकर कलह उत्पन्न झाला. तेव्हां त्यांपैकीं कांहीं कुटुंबांतील मंडळी पूर्वेकडे वळली व त्यांनीं पंजाबांत प्रवेश केला. येथें येण्यापूर्वी त्यांच्या युद्धकार्यांत व इतर बाबींत ज्यांनीं यश मिळवून दिलें, त्या इंद्र, रुद्र, विष्णु वगैरे महनीय नायकांस त्यांनीं देव असें मानून त्यांच्या पराक्रमांचें अनेक प्रकारें वर्णन केलें. त्यांच्याप्रीत्यर्थ यज्ञयागादि करून अग्नीच्या द्वारें त्यांस संतुष्ट करण्याचाही त्यांनीं उपक्रम आरंभिला. या देशांत मूळचे जे लोक होते त्यांचे आचारविचार भिन्न प्रकारचे असून ते रानटी असल्यामुळें या नवीन आर्यवसाहतवाल्यांस अनेक परींनें त्रास देण्याचा त्यांनीं सपाटा लावला. आपणास सर्व परीनें यश प्राप्त व्हावें म्हणून त्यांच्यापैकीं जे विशेष मान्य व पूज्य होते अशा महंतांनीं व त्यांच्या वंशजांनीं शत्रूंचा कांटा समूळ काढून टाकीपर्यंत कित्येक वर्षें आपल्या पूर्वजांची स्तुति चालवली व आपणास साह्य करण्याबद्दल त्यांची प्रार्थना केली. त्यांच्या पराक्रमाच्या तोलाचीं जीं सृष्टींतील महाभूतें—आप, तेज, वायु वगैरे—त्यांस आपल्या परमपूज्य पूर्वजांच्या ठिकाणीं

कल्पून त्यांची प्रार्थना व स्तुति करण्यासाठीं प्रासादिक व अर्थपूर्ण अशीं सूक्तें रचिलीं. या प्रार्थनापर स्तोत्रांस वेद असें नांव आहे. वेद म्हणजे ज्ञान. **वेद** या अर्थीं **श्रुति** * हा शब्दही वापरतात. श्रुति म्हणजे देवाच्या मुखानें श्रवण केलेलें ज्ञान. यास्तव वेद हे मनुष्यानें रचले नसून ते देवाकडून प्राप्त झाले, अतएव ते अपौरुषेय आहेत असें मानतात.

असे हे वेद चार आहेत. त्यांचीं नांवें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हीं होत. यांपैकीं पहिला ऋक् हा सर्वांत ज्येष्ठ व श्रेष्ठ असून शेवटचा अथर्व हा सर्वांत कनिष्ठ होय. ऋग्वेद अत्यंत प्राचीनकालीं प्रचलित असलेल्या संस्कृत भाषेंत आहे. अनेक परदेशीय व स्वकीय पंडितांच्या परिश्रमामुळें चारही वेद भाषांतररूपानें इंग्रजी व इतर परकी भाषेंत व स्वदेशी भाषेंत उपलब्ध झाले आहेत. त्यावरून सुसंबद्ध असा प्राचीन इतिहासही लिहिण्यांत आला आहे. वेदांतील सूक्तें ज्या महापुरुषांनीं रचिलीं व गाइलीं त्यांस ऋषि ही बहुमानार्थी संज्ञा देण्यांत आली आहे. त्यांस मंत्रद्रष्टे असेंही म्हणत असून त्यांनीं रचिलेलीं छंदोबद्ध सूत्रें **मंत्र** या नांवानें प्रसिद्ध आहेत.

वेदरचनेचें काम सुमारें पांचशें वर्षें चालून अनेक ऋषींनीं त्यांच्या रचनेच्या कामीं श्रम घेतले. पुराणकालापर्यंत अनेक ऋषि होऊन गेले. या सर्वांनीं वेदरक्षण केलें व वेदांतील धर्माचा प्रसार केला. सध्यां प्रत्येक द्विज आपण प्राचीन कालीन

---

*वेद अपौरुषेय असून त्यांस दिलेलें श्रुति हें नांव यथार्थ दिसतें. अपौरुषेय ह्मणण्याचें कारण हें कीं ज्यांच्या स्तुतिपर ते रचले गेले ते सर्व देव असें मानण्यांत येत असून ते ज्यांनीं रचले ते कोण आहेत हें नक्की सांगणें शक्य नाहीं, असा समज आहे. श्रुति असें ह्मणण्याचें कारण लेखनकला अस्तित्वांत येईपर्यंत श्रवणाच्या द्वारेंच वेदांचें रक्षण करण्यांत आलें हें असावें. पारशी लोकांचा देवाधिदेव अहूर मज्द (असुर महत्?) आहे. त्यानें झरतुष्ट्रास कथन केलेला धर्म ज्या **झेंडअवस्था** नामक धर्मग्रंथांत आहे त्याला **श्रोश** असें ह्मणतात. श्रोश याचा अर्थ श्रुति असाच होतो. झेंड याचाही अर्थ जवळ जवळ वेद किंवा ज्ञान यासारखाच आहे. यावरून दिसून येईल कीं प्राचीन इराणी व आर्य एकाच प्रकारच्या धर्मविचारांनीं प्रेरित होते; परंतु प्रत्येकाच्या विचारांची दिशा मात्र भिन्न होती. महंमदी व ख्रिस्ती धर्माचे लोक आपला धर्म प्रत्यक्ष देवाकडून प्राप्त झाला असें मानतात. तो कथन करणारा हाच त्यांचा देवदूत, देवपुत्र किंवा पैगंबर होय.

एकाद्या ऋषीचा वंशज आहे असें मानितो. तो प्रत्यहीं संध्यावंदनाच्या वेळीं आपल्या गोत्राचा उच्चार करून आपला संबंध प्राचीन ऋषीशीं आहे याचें स्मरण कायम ठेवितो. सर्व वेदांत अग्रगण्य जो ऋग्वेद त्याचीं दहा प्रकरणें किंवा मंडळें असून पहिलें व शेवटचें मंडळ अनेक भिन्न ऋषींकडून रचलें गेलें. भृगुकुलोत्पन्न गृत्समद व त्याचे वंशज यांनीं दुसरें मंडळ, विश्वामित्रानें तिसरें, वामदेवानें चवथें, अत्रीनें पांचवें, भारद्वाजानें सहावें व सातवें, कण्वानें आठवें व अंगिरसानें नववें याप्रमाणें मधलीं आठ मंडळें भिन्न ऋषींनीं रचिलीं. त्यांनीं निरनिराळ्या तेहतीस * देवतांची स्तुति केली आहे. परंतु या स्तुतीचें पर्यवसान 'ईश्वर एकच आहे' अशा भावनेंत झालें आहे. वेदकालीं एकंदर ९१ ऋषि होऊन गेले असें मत्स्यपुराणांत सांगितलें आहे.

एकाद्या ऋषीचें आयुर्मान दोन तीन हजार वर्षांहूनही जास्त होतें कीं काय असा रामायण, भारत व इतर पुराणें वर वर वाचणारांकडून प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. एकच ऋषि पुरोहितानें तीस तीस पिढ्यांपर्यंत एकाद्या कुलांत पुरोहितपणा चालविल्याचें दिसतें. याचा उलगडा करणें कठीण नाहीं. असा समज होण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे प्राचीन महनीय ऋषींबद्दलच्या अनेक प्रचलित दंतकथांचा समावेश निरनिराळ्या ग्रंथांत लेखकांनीं अभिमानपूर्वक केला आहे हें होय. भारताचा लेखक व्यास हाच पुराणाचा लेखक होण्यास सर्वथैव पात्र आहे असें मानून त्याच्यानंतर अस्तित्वांत आलेल्या पुराणांचा लेखक होण्याचा मान खऱ्या लेखकानें व्यासालाच दिला. एकच ऋषीचें नांव अनेक पिढ्यांपर्यंत आढळण्याचें दुसरें कारण असें कीं मूल ऋषीचें नांव त्याच्या वंशजांनीं उपनामात्मक वापरण्याचा परिपाठ ठेविला. या अर्थानें व्यास, विश्वामित्र, वसिष्ठ वगैरे मूलतः एकच व्यक्तीचीं नांवें त्याच्या पिढींतील सर्व पुरुषांनीं उपनामात्मक घेतलीं हेंच खरें. असो. प्राचीन ऋषींपैकीं जे महर्षि विशेष प्रसिद्धीस आले, त्यांचीं नांवें चिरस्मरणीय व्हावीं म्हणून उत्तरेकडील ध्रुव नक्षत्राभोंवतीं प्रदक्षिणा घालणाऱ्या ( हा भास आहे ) नक्षत्रपुंजांतील सात तेजःपुंज नक्षत्रांस सात ऋषींचीं व एकास एक ऋषिपत्नीचें नांव देण्यांत आलें आहे. यांस सप्तर्षि म्हणतात. त्यांचीं नांवें कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम,

---

* या ३३ प्रकारच्या देवतांवरून पुराणकारांनीं देवांची संख्या तेहतीस कोटींवर नेली.

जमदग्नि व वसिष्ठ हीं असून त्यांपैकीं वसिष्ठाच्या पत्नीचें नांव अरुंधती असें आहे. या

## सप्तर्षींची पूजा

ऋषिपंचमीच्या दिवशीं स्त्रिया करतात. तिच्या योगानें रजोदर्शनकालीं घडलेलें पाप धुऊन जातें असें त्या मानितात. हे ऋषि म्हणजे हल्लींच्या लोकांप्रमाणें प्रापंचिक होते. पारमार्थिक विचारांची दिशा त्यांना विशेष मान्य झाल्यामुळें त्यांनीं उच्च पायरीवरून जगांतील सुखदुःखांकडे पाहिलें इतकेंच. एऱ्हवीं ते सर्वथैव गृहस्थाश्रमी सत्पुरुष होते. त्यांच्यांत कित्येक ब्राह्मण, कित्येक क्षत्रिय आणि कित्येक वैश्यवृत्तीचे लोक होते; यास ऋग्वेद साक्ष देत आहे. या ऋषींच्या आचारविचारांचें निरीक्षण करून त्यांच्या व्यवसायानुसार त्यांस देवर्षि, ब्रह्मर्षि व राजर्षि हीं अर्थपूर्ण नांवें पुराणकारांनीं दिलीं आहेत. उदाहरणार्थ प्रसिद्ध नारदमुनींची देवर्षींत, वसिष्ठ, कण्वादिकांची ब्रह्मर्षींत व जनकाची राजर्षींत गणना करण्यांत आली आहे. जसे पूर्वकालीं अनेक ऋषि होऊन गेले त्याप्रमाणें आधुनिक कालीं आमच्या देशांत अनेक व्यक्ति या पदास योग्य अशा होऊन गेल्या. देवेंद्रनाथ टागोर, माधवराव रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी हे व यांसारखे कित्येक सत्पुरुष हल्लींच्या कालचे ऋषि आहेत. रवींद्रनाथ टागोर, डॉक्टर भांडारकर, यांसारखे अनेक ज्ञाननिष्ठ आर्य ऋषीच होत. ही जी ऋषींची परंपरा या देशांत अव्याहत चालू आहे तिच्याकडे नजर देऊन आशापूर्ण दृष्टीनें आपण भविष्यकालाकडे पाहिलें पाहिजे. ज्या आर्यपुत्रांनीं व दुहितांनीं आमच्या धर्माचें कठिण प्रसंगींही रक्षण करून आमची योग्यता व आमचें शील वाढविलें त्यांप्रीत्यर्थ हा

## ऋषिपंचमीचा दिवस

सर्व आबालवृद्धांनीं, स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाळावयास नको काय ? या दिवशीं कथाकीर्तनें, नाटकें व व्याख्यानें यांच्या द्वारें त्या प्राचीन महंतांची आर्यमातेच्या लेंकरांना आठवण होईल असें केलें पाहिजे. देहात्मबुद्धीचा त्याग करून खऱ्या, शाश्वत व सर्वांस सुखदायक अशा ध्येयाचा विचार प्रत्येकानें केला पाहिजे असें हा दिवस निक्षून सांगत आहे. अशा प्रसंगीं ऋषिश्रेष्ठांचे गुणानुवाद गाऊन व यांनाच आपले आदर्श मानून आम्ही चालू तर आपलें कल्याण झाल्याशिवाय

राहणार नाहीं. आर्यमहिलांनो! अज्ञान टाकून देऊन ज्ञानाच्या साम्राज्यांत शिरा. ऋषिपंचमीच्या व्रतासंबंधीं जी कथा वर दिली आहे, तिच्यासंबंधानें पूर्णपणें विचार केल्यावरही तुम्हाला तें व्रत सध्यांप्रमाणेंच केलें पाहिजे असें वाटतें काय? आम्ही अमुक व्रत करणार म्हणून हट्ट धरून बसणें हें जसें तुम्हाला प्रशस्त नव्हे, तसेंच अशा रीतीनें भलत्याच कर्ममार्गांत लोटणारीं व्रतें तुमच्या हस्तें करविणें तुमच्या पुरुषमंडळीस गैर आहे. हें जाणून भलतेसलते हट्ट न धरतां तुमचें खरें ध्येय कोणतें व खरा धर्म कशांत आहे, हें समजून घ्या. या व्रताच्या बुडाशीं असलेला प्रधान हेतु मात्र विसरूं नका. तुमच्या स्वतःच्या व तुमच्या पुत्रपौत्रांच्या आरोग्यासाठीं तुम्ही रजोदर्शनाच्या स्थितींत पाळण्याचे नियम पूर्णपणें पाळा. तसें करणें हें तुमचें कौटुंबिक कर्तव्य आहे. तुमचा स्त्रीधर्म आहे. तुमची दृष्टि प्राचीनकालाकडे न्या व त्या कालीं स्त्रियांची योग्यता विशेष कां मानीत हें नीटपणें समजून घ्या. पुरुषांप्रमाणें कित्येक स्त्रियाही ऋषिपदास पोहोंचल्या होत्या व म्हणूनच त्या वंद्य झाल्या हें ध्यानांत ठेवा. कित्येक आर्यदुहितांनीं वेदांतील सूक्तें रचिलीं तर कित्येकींनीं उपनिषदांतील तत्वज्ञानांत भर घातली याचें स्मरण ठेवा. गार्गी, अरुंधती, लोपामुद्रा, सुलभा, अहिल्या, अनुसूया, सीता, द्रौपदी, तारा, वृंदा, वगैरे महिलांचीं नांवें अजरामर कां झालीं याचा विचार करा. सांप्रत कस्तूरीबाई गांधी, वासंतीदेवी दास, सरलादेवी घोसाल, रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, सरोजिनी नायडू यांच्यासारख्या साध्वींचीं नांवें सर्वतोमुखीं कां झालीं आहेत याचाही विचार करा. त्यांचें जीवनचारित्र्य समजून घेऊन आपली योग्यता वाढवा. अहिल्याबाई होळकरीण, जिजाबाई, मिराबाई, पन्नादाई, मुक्ताबाई, जनाबाई अशा किती तरी साध्वींनीं तुमचें नांव मोठें होईल असें केलें आहे. त्यांच्याच तोडीच्या तुम्ही व्हा म्हणजे तुमच्या पोटीं ऋषि व ऋषिपत्न्या जन्मास येतील. गृहिणी या नात्यानें तुमच्यावर आलेली जबाबदारी व तुमच्याकडे सोंपविलेलीं कामें अत्यंत महत्वाचीं आहेत. तीं योग्य रीतीनें पार पाडा. आघाड्याचीं पानें, मुळें किंवा पंचगव्य चाखिलें आणि शेण, माती किंवा हळद लावून अष्टोत्तर वेळां स्नान केलें तरी तुमच्या आत्म्याला सद्गति मिळणार नाहीं. ती केवळ सदाचरण, परोपकार, अंतर्बाह्य शुद्धता यांच्याच योगानें प्राप्त होईल. यासाठीं या पवित्र दिवशीं अरुंधतीसह सप्तर्षींस नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद मागा म्हणजे तुमची खास उन्नति होईल.

# सज्जनांची पुण्यतिथि.

इंग्लंडदेशांत ज्याप्रमाणें All Saints Day नांवाचा दिवस मागें होऊन गेलेल्या सर्व संतजनांच्या आठवणीसाठीं पाळला जातो त्याचप्रमाणें ऋषिपंचमीचा दिवस प्राचीन व आर्वाचीन काळांत होऊन गेलेल्या सर्व महनीय लोकांच्या स्मरणार्थ पाळणें योग्य होईल. प्रत्येक थोर व्यक्ति देशांत नवीन चेतना कमी-जास्त प्रमाणानें उत्पन्न करीत असते. देशाचें भाग्य उदयास येण्याला एकाच विविक्षित क्षेत्रांत चेतना उत्पन्न करून भागत नाहीं; सामाजिक, नैतिक, आर्थिक औद्योगिक, राजकीय, धार्मिक वगैरे अनेक अंगांनीं सुधारणा घडून आल्याशिवाय सर्वांगपूर्ण अशी प्रगति होणें शक्य नाहीं. एकाच व्यक्तीस या निरनिराळ्या दिशांनीं कार्य करून सुधारणा घडवून आणणें अशक्य आहे. तेव्हां अशा प्रकारचें कार्य अनेक व्यक्ति भिन्नकालीं भिन्न मार्गांचा अवलंब करून घडवून आणतात. अशा थोर, निःस्पृह व परदुःख निवारण करण्यासाठीं रात्रंदिवस खपून त्याच कार्यांत असतांना अंत पावणाऱ्या व्यक्तींची आठवण कायम ठेवणें हें देशांतील समाजचालकांचें कर्तव्यकर्म आहे. स्थानिक थोर व्यक्तींप्रमाणें राष्ट्रीय थोर व्यक्ति लोककल्याणाचें कार्य शक्त्यनुसार करून गेलेल्या असतात. राष्ट्रीय जागृति उत्पन्न झाल्यानंतर किंवा ती होण्यासाठीं देखील अशा थोरांचे गुणानुवाद गाणें व त्यांचा कित्ता भावी समाजनायकांपुढें ठेवणें हें लोककल्याणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें व अगत्याचें आहे. निरनिराळ्या वेळीं निधन पावलेल्या महनीय व्यक्तींची पुण्यतिथि ज्ञातिपरत्वें किंवा मतसंप्रदायाप्रमाणें पाळण्याची चाल राष्ट्रैक्याच्या दृष्टीनें योग्य नाहीं. सर्व प्राचीन व अर्वाचीन सज्जनांची पुण्यतिथि ऋषिपंचमीसारख्या पवित्र दिवशीं साजरी करण्याची चाल आपल्या देशांत रूढ झाल्यास आमचें विशेष हित होईल. प्राचीन कालांतील ऋषींप्रमाणें सर्व वर्णांच्या व विचारांच्या लोकांस वंद्य अशा व्यक्ति आपणांस ठरवितां येणार नाहींत ही गोष्ट खरी आहे. तथापि देशोन्नतीच्या कार्यास अनेक परीनें हातभार लावलेल्या भिन्न प्रांतीय सज्जनांची पुण्यतिथि एकाच दिवशीं पाळण्यास हरकत नाहीं. येथें मतभेदाचा प्रश्न नसावा. त्यांचें कार्य हेंच त्यांचें स्मारक आहे. तुकाराम रामदासादिक साधुसंत, मागें होऊन गेलेले अनेक धर्मप्रवर्तक, महर्षि देवेंद्रनाथ टागोर, रामकृष्ण परमहंस, स्वामी रामतीर्थ, विवेकानंद, दयानंदसरस्वती, राजा राममोहन राय, पंडित विद्यासागर, श्री शिवाजीमहाराज, तेलंग, रानडे, गोखले,

टिळक, डॉ. भाऊदाजी, मेथा, वगैरे कित्येक राष्ट्रीय दृष्ट्या वंद्य अशा पुरुषांची व मीराबाई, जनाबाई, जिजाबाई वगैरे स्त्रियांची आठवण करून त्यांच्या कार्याबद्दल आदर दाखविण्यास एकादा दिवस योग्य असेल तर तो दिवस ऋषिपंचमी हा होय.

——:०:——

## ज्येष्ठागौरी.

भाद्रपद शुक्लपक्षांतील अनुराधा नक्षत्रावर गौरीचें आवाहन, ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन व मूळ नक्षत्रावर विसर्जन करण्याचा संप्रदाय महाराष्ट्रांत व दक्षिण हिंदुस्थानांत असून हा उत्सव ज्येष्ठागौरी किंवा महालक्ष्मी उत्सव या नांवानें प्रसिद्ध आहे. हा प्रचारांत येण्याचें कारण पुराणांत असें सांपडतें कीं पूर्वकालीं दैत्यांनीं देवांस अतिशय त्रास दिल्यामुळें स्त्रीमंडळीस आपलें सौभाग्य कसें कायम राहील याची धास्ती पडली. तेव्हां त्यांनीं एकत्र जमून या संकटांतून आपली मुक्तता होण्याबद्दल महालक्ष्मीस विनविण्याची तयारी केली. पुढें त्यांच्या विनंतीस मान देऊन त्या देवतेनें मत्त दैत्यांचा संहार करून आपल्या भक्तांस सुखी केलें. या तिच्या उपकाराचें स्मरण म्हणून हा उत्सव दरसाल साजरा केला जातो. हा उत्सव तीन दिवस चालतो. गणपत्युत्सवाच्या नंतर दोन तीन दिवसांतच गौरी बसवितात. बहुधा भाद्रपद शु. अष्टमीस हा उत्सव होत असतो. या तिथीस दूर्वाष्टमी असेंही म्हणतात. गौरीबरोबर गणपतिविसर्जन करण्याची पद्धति अनेक ठिकाणीं दृष्टीस पडते. विशेषतः स्त्रियांस हा सण फार प्रिय आहे. याचें कारण असें कीं महालक्ष्मीच्या पूजनानें आपण अखंड सौभाग्यवती होऊं असें त्यांस वाटतें. कांहीं ठिकाणीं पुरुषही हा सण पाळतात. दक्षिण हिंदुस्थानांत हे गौरी उत्सवाचे तीन दिवस स्त्रिया व पुरुष मोठ्या आनंदांत घालवितात. गौरीपूजनाचे प्रकार देशपरत्वें भिन्न आहेत. कित्येक धातूच्या तर कित्येक मृत्तिकेच्या मूर्तींची आणि बरेच लोक तर कागदावरील गौरीच्या रंगीत चित्राची पूजा करतात. ब्राह्मण वर्णांतील सर्वच लोक हा उत्सव पाळीत नाहींत. कित्येक भाद्रपद शु. तृतीयेच्या दिवशीं बसविलेल्या गौरीपुढेंच वायनें मांडून त्यांवर दिवे ठेवतात. या गौरीस वाहिलेलीं सौभाग्यद्रव्यें ( कुंकु, फणी, पोत, बांगड्या वगैरे ) वापरण्याची चाल कांहीं दाक्षिणात्य ब्राह्मणस्त्रियांत दृष्टीस पडते. तृतीय व चतुर्थवर्णांतील लोकांत या सणाचा प्रसार विशेष आहे. कांहीं ब्राह्मणांत या गौरीची पूजा करण्याची पद्धति पुढीलप्रमाणें आहे. कुंभाराकडून पांच नवीन मडकीं आणून त्यांतील एकांत

धान्य घालतात व त्याच्याबरोबर पिंवळ्या रंगाचा एक दोरा, पांच खोबऱ्याच्या वाट्या व पांच खारका त्या भांड्यांत घालतात. नंतर सर्व मडकीं एकावर एक रचून शिरोभागीं गौरीचा मुखवटा बसवितात. हा मुखवटा मातीचा, कागदाचा किंवा वेळणीवर रंगानें चित्रित असा असतो. अशीच दुसरी एक गौरी करून तिच्याच शेजारीं बसवितात. तीन दिवस गौरीचीं गाणीं, पूजा, नाच वगैरे प्रकार चालतो. तिसऱ्या दिवशीं मडकीं उतरून स्त्रिया खारीक व खोबऱ्याचे तुकडे पिवळ्या रंगाच्या दोऱ्यांत सात गांठींतून बांधतात व गळ्यांत घालतात. असेच दोरे मुलांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं तयार केले जातात. पुढें शुभ दिवस पाहून ते दोरे दहीं व दूध यांत भिजवून शेतांत पुरतात. कोंकणपट्टींतील कांहीं लोकांत—कोळी, मराठे वगैरे—पुरुषमंडळीचे या दिवसांत थाटमाटानें मेळे निघत असून कित्येकांकडून कलालांच्या दुकानांस उदार आश्रय मिळतो. कोळी लोकांच्या बायका वस्त्रालंकारांनीं मंडित होऊन गात व नाचत गौरीस नेऊन जलांत विसर्जन करितात. गौरीपाशीं धनधान्यसमृद्धि व दीर्घायुष्य मागणें, हाच या सणाचा विशिष्ट हेतु दिसतो. शक्तीपूजेच्या अनेक प्रकारांपैकीं ज्येष्ठागौरी हा एक प्रकार आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. धन्यधान्यसमृद्धि व दीर्घायुष्य मागणाऱ्या देवीच्या उपसकांनीं घातुक अशा दारूच्या व्यसनाधीन होऊन द्रव्याचा नाश करणें यापरतें शोचनीय काय आहे? मुंबईंत गौरीउपासकांचा भरणा खालच्या वर्गांत विशेष आहे. अशा लोकांना खरें धर्मरहस्य समजावून देऊन त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न ताडदेव येथें राहाणाऱ्या कांहीं मंडळीकडून होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. ज्यांच्यांत असे हे अनीतीचे व अधर्माचे प्रकार चालू आहेत, त्यांत प्रत्येक वर्षीं हा उत्सव प्राप्त झाल्यावेळींच मद्यपानाविरुद्ध व्याख्यानें देऊन विशेष कांहीं वळणार नाहीं. त्यांचें अज्ञान घालविलें ह्मणजे सहजासहजीं त्यांचे डोळे उघडून ते रस्त्यावर येतील. तेव्हां विद्याप्रसार होईल असे प्रयत्न अव्याहत चालवून मागसलेल्या लोकांस आपला खरा प्रगतीचा मार्ग कोणता हें समजेल असें केलें पाहिजे, ह्मणजे व्याख्यानांची आवश्यकता राहाणार नाहीं.

## वामनद्वादशी.

दशावतारांतील पांचवा जो वामन त्याच्या नांवानें भाद्रपद महिन्यांतील शुक्ल द्वादशी पाळली जाते. वामनावताराची कथा वामनपुराणांत्त अशी आढळते कीं, पूर्वकालीं बली या नांवाचा एक मोठा विख्यात चक्रवर्ति राजा होऊन गेला. तो प्रसिद्ध दैत्यकुलोत्पन्न विष्णुभक्त प्रल्हादाचा पुत्र होता; तथापि तो पापभीरु व सदाचरणी असून त्याच्या दातृत्वाची कीर्ति दिगंतरीं पसरली होती. त्यानें आपल्या पराक्रमाच्या जोरावर अलोट संपत्ति मिळविली. त्याची सत्ता दशदिशांस प्रस्थापित होऊन त्याचे प्रजाजनही आनंदानें त्याच्या सत्तेखालीं सुखसमृद्धि भोगूं लागले. देवांसही तो त्रास देत नसल्यामुळें त्याच्याशीं युद्धास उभें राहण्यास योग्य कारण मिळेना. त्यासाठीं बळी राजाचें साम्राज्य कपटानें हरण करावें असा देवांनीं विचार ठरवून या कार्यासाठीं अदितीचा पुत्र जो वामन त्याची योजना केली. यानें ब्रह्मचाऱ्याचा वेष घेतला व तो बळीनें चालविलेल्या यज्ञाच्या वेळीं हजर राहिला. तेथें त्यानें आपल्या विद्वत्तेनें त्या राजास चकित केलें. राजानें संतुष्ट होऊन ‘ तुला काय पाहिजे ’ असें विचारतांच ‘ मी त्रिपादभूमीची तेवढी याचना करितों ’ असें त्यानें उत्तर दिलें. बळीचा पुरोहित शुक्राचार्य यानें वामनाचें कपट जाणिलें व त्याला त्रिपादभूमिदान न देण्याबद्दल बळीराजास आग्रह केला; परंतु तत्पूर्वीच बळीनें आपण दान देतों असें वचन दिल्यामुळें तें तो परत घेईना. पुढें भूमिदान दिल्याबद्दल शास्त्रोक्तरीत्या वामनाच्या हातावर उदक सोडतांच वामनानें आपलें खरें विश्वरूप प्रगट केलें व दोन पावलांत सर्व भूमि व्यापून तिसरें पाऊल कोठें ठेवूं असा बळीस प्रश्न केला; तेव्हां त्यानें आपलें शिर नम्र करितांच वामनानें त्याच्या मस्तकावर पाय ठेवून त्यास पाताळांत लोटून दिलें. बळीचें शील, त्याचा दानशूरपणा व सद्वर्तन पाहून वामनास संतोष झाला व मी तुझा द्वारपाळ होऊन राहीन असें त्यानें त्यास आश्वासन दिलें, अशी ही अपूर्व कथा आहे.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

भाद्रपद शुक्ल एकादशीस उपोषित राहून माध्यान्हकालीं वामनाची पूजा करावी. रात्रौ त्याची अवतारकथा वाचावी. हरिकीर्तन, विष्णुनामस्मरण, भजन वगैरे प्रकारांनीं रात्रौ जागरण करून द्वादशीच्या दिवशीं त्याची पंचोपचारें पूजा केल्यावर ब्राह्मणास दान द्यावें. दहीं व दूध घालून भांड्याचें शिंकाळें, छत्री, उपानह

वगैरे दान द्यावें व पंक्तीस ब्राह्मण घेऊन भोजन करावें. याप्रमाणें एकादशी व द्वादशी हे दोन्ही दिवस विष्णुस्मरणांत घालवावे. या सणासंबंधानें रूढि पाहूं जातां महाराष्ट्रांत कांहीं वैष्णव सांप्रदायी ब्राह्मणांत मात्र तो प्रचलित असल्याचें दिसून येतें. मलबारांत हा उत्सव अत्यंत प्रेक्षणीय होतो. त्याला 'ओनम्' असें नांव आहे. मलबारांत त्या वेळीं वर्षाकाळ संपून धनधान्याची सर्वत्र समृद्धि होते. घरांच्या दरवाज्यांवर फुलांच्या माळा लोंबवून तीं सुशोभित करण्यांत येतात. रात्रौ दीपोत्सव होतो. याच दिवशीं नवीन कपडे व भांडीं विकत घेण्याचाही तेथें परिपाट आहे. हा उत्सव सर्व वर्णांचे व दर्जांचे लोक पाळतात. भोजनोत्तर लटक्या लढाईचा प्रेक्षणीय समारंभ होतो. हा पाहण्यासाठीं गांवांतील लोक एकाद्या सार्वजनिक जागीं एकत्र होतात. असुरांचें राज्य जाऊन देवांचें राज्य प्रस्थापित झाल्यावर प्रजेची सांपत्तिक स्थिति कशी काय झाली हें पाहण्यासाठीं या दिवशीं बळीराजा पृथ्वीवर येतो. आपलें वैभव त्याच्या दृष्टीस पडावें म्हणून हा उत्सव होत असतो अशी तेथील लोकांची समजूत आहे. सामान्यतः पाहूं गेल्यास हा दिवस कोणी सणाप्रमाणें मानीत नाहीं. पुराणें अस्तित्वांत आलीं तेव्हां अनेक

## प्राचीन ऐतिहासिक गोष्टींचे रूपांतर

कसें झालें हें समजण्यास वामनावताराची गोष्ट हें एक उत्तम उदाहरण आहे. या कथानकाचा खरा व सरळ अर्थ असा आहे कीं, देवांच्या वतीनें वामनानें पुढें येऊन त्यांचें सर्व राज्य बळकावून बसलेल्या बळीपाशीं थोडीशी भूमि मागितली. बळी हा मनाचा उदार असल्यामुळें त्यानें देवांची विनंति मान्य करून त्यांना आपल्या राज्यांत आश्रय दिला; परंतु याचा परिणाम मात्र असा झाला कीं देवांनीं पाय पसरतां पसरतां बिचाऱ्या बळीची व त्याच्या दैत्यकुलाची स्वतःची म्हणून एक टीचभरही जमीन राहिली नाहीं. देव व दैत्य किंवा सुर व असुर हे भाऊबंद असून त्यांच्यांत वारंवार लढाया होत. ( यासंबंधाचें विवरण नृसिंहावताराच्या इतिहासांत आलेंच आहे. ) बळी हा सद्धर्मनिष्ठ असून त्याची प्रजाही संतुष्ट व राजनिष्ठ असल्यामुळें तरवारीच्या जोरावर त्यास चित करणें देवपक्षाला शक्य नव्हतें. अशा प्रसंगीं राजनीतिशास्त्रांतील मार्गांपैकीं जो कपटाचा उपाय तो करून देवांनीं बळीस चकविलें व कालेंकरून आपला हेतु तडीस नेला. ही वेदकालापूर्वीची गोष्ट आहे. शतपथ ब्राह्मणांत या घडामोडीचें सरळ रीतीनें वर्णन दिलें आहे त्यावरून देखील वर दिलेल्या ऐतिहासिक पुराव्यास

पुष्टी येते. त्यांत असें सांगितलें आहे कीं देव व दैत्य यांच्यांत लढाई जुंपून देवांचा पाडाव झाला. दैत्यांना वाटलें कीं यापुढें देव आपलें डोकें वर काढणार नाहींत. तेव्हां विष्णूनें लहान असें वामनरूप धारण करून असुरांपाशीं थोडी जमीन मागितली व दैत्यांनीं त्याच्या निवासाला पुरेल इतकी जमीन देण्याचें अभिवचन दिलें. पुढें विष्णूनें विराट रूप धारण करून सर्व विश्व व्यापून टाकिलें व त्यामुळें सर्व देश देवांच्या ताब्यांत आला. ही गोष्ट घडून बराच काळ लोटल्यावर अस्तित्वांत आलेल्या वेदांत हीच गोष्ट निराळ्या रीतीनें सांगून विष्णूची तारीफ केली आहे. ऋग्वेदांत ( मं. १–१५४–२ व ३ ) पुढील ऋचा सांपडतात.

**प्र तद्विष्णुः स्तवते वीर्येण मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः ।**
**यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा ॥**
**प्र विष्णवे शूषमेतु मन्म गिरिक्षित उरुगायाय वृष्णे ।**
**य इदं दीर्घं प्रयतं सधस्थमेको विममे त्रिभिरित्पदेभिः ॥**

अर्थ—"विष्णूची त्याच्या पराक्रमामुळेंच फार स्तुति होत असते. गिरिकंदरीं राहून घोर प्रदेशांत संचार करणाऱ्या सिंहाप्रमाणें हा महापराक्रमी आहे. सर्वव्यापक अशा निरनिराळ्या तीन पावलांतच विश्वांतील सर्व भुवनें सहज मावलीं आहेत. हें मनोहर कवन विष्णूच्या कानावर जावो. प्रेमळ स्तुतीचा भोक्ता आणि ज्याचें यश सर्व जगतीतलावर पसरलें आहे असा हा वीर आहे. हें एकंदर विश्व इतकें अवाढव्य असून तें त्याच्या एकट्याच्या तीनच पावलांत मावून गेलें." मूळची गोष्ट ऐतिहासिक असून वेदगायकांनीं ती अभिमानपूर्वक गाइली; परंतु कालेंकरून अदिति व अदितिपुत्र यांचा मूळचा अर्थ जाऊन आकाश ह्मणजे अदिति व अदितिपुत्र हाच वामन (विष्णु ह्मणजे सूर्य) असा अर्थ होतांच त्रिपादांचा अर्थ उदय, मध्य व अस्त असा करण्यांत आला. असा हा वामनावताराच्या कथेचा इतिहास आहे. वामनानें बळीस पाताळांत लोटून दिलें याचा अर्थ इतकाच कीं त्याला राज्यभ्रष्ट करून आपल्या प्रदेशांतून हाकून लाविलें. तरी त्यानें त्याचें योग्य प्रकारें रक्षण केलें व त्याच्याप्रीत्यर्थ दरसाल दिवाळीच्या वेळीं महोत्सव करून त्याचें नांव चिरस्मरणीय होईल असें करण्याचेंही आश्वासन दिलें. अशा या उत्सवास सध्यां सर्वथैव धार्मिक स्वरूप प्राप्त झालें आहे. ऐतिहासिक महत्वाची माहिती टिपून ठेवण्याची किंवा त्याचें महत्व जाणण्याची उपजत बुद्धि हिंदुलोकांत नाहीं असें कित्येक लोक ह्मणतात; पण हें खरें आहे असें

म्हणतां येत नाहीं. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं, जे प्रसंग धार्मिकदृष्ट्या महत्वाचे वाटले त्यांचीच योग्यता विशेष मानिली आणि त्यांचें टिपण तत्कालीन लेखकांनीं करून ठेविलें. पुराणें, महाभारत व रामायण हे तर इतिहास आहेत. त्यांतील प्रक्षिप्त व अतिशयोक्तीचा भाग वजा केला असतां त्यांत शुद्ध इतिहासच सांपडतो. वेदांत देखील आर्यांचा इतिहास आहे. उपनिषदांवरून तत्कालीन समाजाची उत्तम कल्पना येते. येथील लोकांत अनेक कारणांवरून धार्मिक प्रवृत्ति विशेष वृद्धिंगत झाल्यामुळें प्राचीन इतिहासास सर्वथैव धार्मिक वळण मिळालें. वामनद्वादशीसारखे ऐतिहासिक महत्वाचे दिवस निवळ धार्मिक उत्सव होऊन बसण्याचें कारण तरी हेंच आहे. या सणावरून

## बोध काय घेतां येईल

हें पाहूं. हें सर्व विश्व चमत्कारांनीं युक्त आहे. या विश्वांत घडणाऱ्या गोष्टी अत्यंत चमत्कारिक आहेत. पृथ्वीचा नकाशा व उपलब्ध असलेला जगाचा इतिहास यांचें विचारपूर्वक निरीक्षण केलें असतां असें दिसून येईल कीं प्राचीन कालापासून आजपावेतों जगांत हजारों घडामोडी झाल्या. राज्यतृष्णेच्या पायीं निरपराध्यांवर अनर्थ कोसळले. 'बळी तो कान पिळी' या न्यायानें मनगटाच्या जोरावर प्रबल लोकांनीं कमकुवत लोकांस पादाक्रांत केलें. अशांचा पाडाव करण्याकरितां कधीं युक्तीचा तर कधीं शक्तीचा उपयोग करणारे लोक पुढें आलेले आहेत. या पृथ्वीतलावर कधीं देवांचें तर कधीं दैत्यांचें राज्य झालें आहे; परंतु ज्यांच्यांत सत्वस्थपणा विशेष असून आपपरभाव कमी, सत्य, न्याय व समता यांच्याबद्दल पूर्णपणें आदर वसत आहे अशांची सत्ता सुखावह व स्थायिक झाली आहे. साम, दाम, दंड, भेद वगैरे सरळ व कुटिल प्रकारांचा सर्व देशांत प्रसंगानुसार अवलंब करण्यांत आला आहे. अवतार मानलेल्या वामनावर कुटिल नीतीचा आरोप करणारांनीं जगाच्या इतिहासाची छाननी करून पहावें म्हणजे त्यांना दिसून येईल कीं या आरोपापासून कोणतेंही राष्ट्र सुटलेलें नाहीं; परंतु कुटिल नीति ही कदाचित् तात्पुरती उपयुक्त असली तरी राष्ट्रांचा खरा अभ्युदय शीलावर अवलंबून आहे. राजा व प्रजा सच्छील असल्यास राष्ट्राचें कल्याण होतें. बळी शीलवान् होता परंतु त्याची प्रजा जे दैत्य ते आसुरी वृत्तीचे असून देवांस त्रास देण्यास कमी करीत नसत. याचा परिणाम त्यांना भोंवला. शीलवान बळीचें नांव अजरामर झालें, परंतु त्याच्या बळावर मत्त होऊन भल-

त्याच रीतीनें वागणाऱ्या दैत्यांचा शेवटीं निःपात झाला. हें जाणून प्रत्येकानें आसुरी वृत्तीचा त्याग केला पाहिजे. सदाचारसंपन्न होऊन देवत्व अंगीं येईल असे यत्न केले पाहिजेत. हाच प्रगतीचा मार्ग आहे. याच मार्गाचें सर्व साधु, ज्ञानी जन व सर्व महंत यांनीं अवलंबन केलें आहे. आसुरी उपायांच्या जोरावर मानवी स्वातंत्र्य हिरावून घेणारांस स्वार्थत्याग, प्रेम, सत्य व ममत्वभाव यांच्या बळानें जिंकावें असें तत्व प्रतिपादन करणारे आधुनिक महात्मा मोहनदास करमचंद गांधी हे याच साधुसंतांचा मार्ग सर्वजगास दर्शवीत आहेत. **शठं प्रति सत्यम्** असें प्रतिपादन करणाऱ्या या साधूच्या मार्गानें आम्हीं आर्यांनींही गेलें पाहिजे. इतकें जरी आपण वामनद्वादशीच्या उत्सवावरून शिकलों तरी हा उत्सव रूढ झाल्याचें सार्थक होईल.

---

## अनंतचतुर्दशी.



अनंतचतुर्दशी हा सण नसून तें एक काम्य व्रत आहे. कुलाचार असेल तर किंवा संकल्प केला तर मात्र तें आचरितात. या व्रताचा महिमा श्रीकृष्णानें युधिष्ठिराला कथन करून त्याजकडून हें व्रत करविलें असें महाभारतांत वर्णिलें आहे. या व्रताच्या उत्पत्तीविषयीं अशी कथा सांगितली आहे कीं पूर्वकालीं सुमंत नांवाच्या कोणा एका ब्राह्मणाला सुशीला नामक एक मुलगी होती. तिच्या सापत्न मातेनें तिला सापत्नभावामुळें सतावून सोडलें. विवाहानंतर ती आपला पति जो कौंडिण्यऋषि त्याच्याबरोबर अरण्यांत निघून गेली. त्यावेळीं हें दंपत्य अत्यंत दारिद्र्यावस्थेंत काळ कंठीत होतें. पतीसह अरण्यांत हिंडत असतां एकदां कित्येक सौभाग्यवती स्त्रिया लाल रंगाचीं वस्त्रें नेसून कलशपूजा करितांना

सुशीलेच्या दृष्टीस पडल्या. तिनें त्यांजकडून त्या व्रताची माहिती मिळवून तें यथामति व भक्तिपूर्वक आचरिलें. त्याचें फळ वैभवाच्या रूपानें त्या दंपत्यास मिळालें. पुढें तिनें आपणांस ऐश्वर्याची जोड देणाऱ्या अनंताप्रीत्यर्थ धारण केलेला १४ ग्रंथींनीं युक्त दोरा आपल्या पतीस दाखविला व अनंताच्या कृपेनें आपणास वैभव लाभलें असें ती म्हणाली. हें तिचें भाषण कौंडिण्य ऋषीस रुचलें नाहीं. ऐश्वर्यप्राप्ति व्रताचरणावर अवलंबून नसून उद्योगानेंच आपणास ऐश्वर्याचा लाभ झाला असें त्यानें प्रतिपादिलें व आपल्या भाषणाच्या समर्थनार्थ तो अनंतव्रताचा दोरा त्यानें अग्नींत फेंकून दिला. यामुळें त्याचें वैभव नष्ट झालें; तेव्हां त्यास अनंताचें सारखें वेड लागलें. अनंताचा लाभ व्हावा एतदर्थ तो रानोमाळ भटकत असतां उत्कृष्ट पक्क फलांनीं युक्त असा एक आम्रवृक्ष असूनही त्याच्या जवळपास पक्षी फिरकत नाहींत असें त्याच्या नजरेस आलें. पुढें एक बैल व सवत्स धेनु भरपूर चारा असूनही तो खाण्यास तीं असमर्थ आहेत असें त्यास आढळलें. आणखी पुढें जात असतां त्यास दोन सरोवरें दिसलीं; परंतु त्या जलाचा उपयोग करणारा त्यास दिसून येईना. नंतर त्यास एक हत्ती व एक गाढव हे पशु आढळले. या सर्व फळांस, सरोवरांस व पशूंस त्यानें अनंताचा लाभ कसा होईल म्हणून विचारलें. तें त्यांस सांगतां येईना. शेवटीं हताश होऊन तो जमिनीवर धाडकन् पडतांच भक्तिवश अनंत प्रगट झाला व तुला पूर्व वैभव प्राप्त होईल असें त्यानें त्यास वरदान दिलें. त्याच वेळीं त्यानें कौंडिण्यास असें सांगितलें कीं, तुला वाटेंत भेटलेला आंबा हा एक वेदज्ञ ब्राम्हण असून विद्यादान न केल्यामुळें त्यास दुर्गति प्राप्त झाली. बैल हा पूर्वजन्मीं दानधर्म केलेला धनिक आहे व स्वार्थापायीं परस्परांस दान देऊन मनाची समजूत करून घेणाऱ्या या दोन पूर्वजन्मींच्या बहिणी सरोवररूपानें आहेत. गाढव व हत्ती म्हणजे केवळ तुझे राग व गर्व होत. अशी कान उघाडणी झाल्यावर त्यानें अनंताची करुणा भाकतांच तो पुनः धनकनकसंपन्न झाला.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

माध्यान्हीं सुशोभित मंडपाच्या ठायीं शुद्धोदकपूर्ण ताम्रकलश स्थापन करावा. त्यास दोन पंचे बांधावे व त्याजवर दर्भाचा शेष तयार करून ठेवावा. कलशावरील पूर्णपात्रांत मोहिनीसहित अनंताची प्रतिमा किंवा शालिग्राम स्थापन करून षोडशोपचारें पूजा करावी. तसेंच १४ ग्रंथींनीं युक्त रेशमी दोऱ्याची

पूजा करावी. रात्रीं नृत्य, गीत, वाद्य, कथाश्रवण वगैरेच्या योगानें अनंताची सेवा करून पूजा आटोपल्यावर ब्राम्हणांस पक्वान्नाचें वायन द्यावें. याप्रमाणें १४ वर्षें व्रत करावें, म्हणजे इच्छित हेतु तडीस जातात. अनंतव्रत शेषाप्रीत्यर्थ असून दक्षिण हिंदुस्थानांत वैष्णवमतानुयायी लोकांत त्याचा विशेष प्रसार आहे. बंगाल्यांतही हें व्रत आचारणारे लोक आहेत परंतु तें कृष्णाप्रीत्यर्थ पाळलें जात असून या दिवशीं अनेक प्रकारचीं फळें व मिठाई श्रीकृष्णास अर्पण करतात. हें व्रत १४ वर्षें पाळल्यावर विष्णुलोकाची प्राप्ति होते असें तेथील लोक समजतात. अलीकडे सत्यनारायणाचें माहात्म्य विशेष वाढलें असून महाराष्ट्रांत व गुर्जरदेशांत तें मान्य होत चाललें आहे. मुंबईंत तर सार्वजनिक सत्यनारायणापर्यंत मजल येऊन ठेपली असून कांहीं ठिकाणीं सामाजिक व राजकीय गाऱ्हाणें वरिष्ठांच्या कानावर घालण्यासाठीं अशा पूजनाचा उपयोग केला जातो ! अशा वेळीं ज्यांचा मूर्तिपूजेवर विश्वास असणें संभवनीय नाहीं अशा अन्यधर्मीय अधिकाऱ्यांचीं स्तुतिस्तोत्रें त्याच्या समोर गाइलीं जातात. अर्थात् हा विसाव्या शतकांतील सुधारलेला पूजनप्रकार श्रीसत्यनारायणास कितपत मान्य होत असेल हें आम्ही सांगूं शकत नाहीं.

## काम्य कर्मांचा त्याग

करून निष्काम बुद्धीनें जगांतील सर्व व्यवहार करावे असें सांगणारा श्रीकृष्ण जगांतील सुखदुःखांकडे समान वृत्तीनें पाहणाऱ्या धर्मराजाकरवीं हें व्रत करवितो हें तर संभवनीय नाहीं. महाभारतांत बराच प्रक्षिप्त भाग आहे, त्यांतीलच हा अनंतव्रतासंबंधाचा भाग होय असें विद्वान् शोधकांचें मत आहे. केवळ व्रताचरणानें मनकामना सिद्ध व्हावयाची असती तर सात अक्षौहिणी सैन्याच्या मदतीनें स्वतः सारथ्य पतकरून श्रीकृष्णास पांडवांच्या वतीनें समरांगणावर जाण्याचें कारण नव्हतें. हल्लींच्या काळीं अस्तित्वांत आलेल्या सत्यनारायण, सत्यविनायक वगैरे व्रतांसारखेंच अनंताचें व्रत आहे व त्याचा संबंध जसा तीं उपस्थित करणारांनीं पुराणकालास नेऊन भिडविला आहे तसाच अनंतव्रताचा संबंध श्रीकृष्णास लावून दिला आहे हें निर्विवाद होय. अशीं व्रतें कांहीं अंशीं ईश्वरावरची श्रद्धा कमी होण्यास व मनुष्यास बेहिंमत करण्यास कारणीभूत होतात. कारण कीं नवसाप्रमाणें कार्यसिद्धि न झाल्यास मनुष्य ईश्वराच्या शक्तीबद्दल साशंक होतो. इतकेंच नव्हे तर तो दैववादी बनून दृढ प्रयत्नाचें

महत्व विसरून जातो. आर्य म्हणविणारांनीं धर्माच्या बाबतींत निष्काम भक्ति करण्याकडे व जेणेंकरून मन ईश्वरमय होईल अशीं कृत्यें करण्याकडे आपलें लक्ष लाविलें पाहिजे. वरील कथानकांत सर्व असंबद्ध व प्राचीन तत्वज्ञानास न जुळणारीं अशीं जीं विधानें आहेत त्यांवरून या व्रताची कथा रचणारास कोणत्या तरी उपायानें या व्रताचें महत्व व तेंही प्रापंचिकदृष्ट्या दाखवावयाचें होतें हें सिद्ध होतें. पुनर्जन्मासंबंधाच्या सिद्धांताप्रमाणें जीवात्मा हा आंबा किंवा सरोवर होऊन पुनर्जन्म पावणें शक्य नाहीं. प्राणिकोटींतच त्याचा जन्म व्हावयाचा. तसेंच हत्तीस विशेषतः बुद्धिमत्तेची व गाढवास सहनशीलतेची उपमा साजेशी आहे. या कथानकांत त्यांची गर्व व राग यांच्याशीं तुलना केली आहे. पंचतंत्रांतील गोष्टींवरून जसा बोध घेणें शक्य आहे तसा या अनंतव्रताच्या कथेवरूनही घेतां येईल. अनंताच्या कृपाप्रसादाशिवाय जगांतील कोणत्याही स्थिरचर पदार्थास पूर्णावस्था प्राप्त होणें शक्य नाहीं हा बोध घेतां येण्याजोगा आहे. आंब्यांतील माधुर्य अनंताच्या कृपेनें प्राप्त होतें. सरोवराचा जन्म प्राप्त होणाऱ्या बहिणींनीं परोपकार व सद्धर्माची खरी दिशा कोणती हें जाणलें असतें तर त्या निरुपयोगी जलाशय होऊन पडल्या नसत्या. ईश्वरावर भाव नसतां केलेल्या काम्य कर्मांचें फळ त्यांना अशा रीतीनें लाभलें. अंगीं विद्वत्ता असून जो मनुष्य

> **जितकें काहीं आपणास ठावें । तितकें हळूहळू शिकवावें ।**
> **शहाणे करूनि सोडावे । सकळ जन ॥**

हें समर्थांनीं दाखवून दिलेलें व्रत आचरणार नाहीं, त्याची दशा वर सांगितलेल्या बैलाप्रमाणें व्हावयाची. अनंताचा वास सर्वत्र आहे व त्याच्या कृपाप्रसादानेंच सर्व जग चाललें असून ज्याच्यांत उत्तम गुण दृग्गोचर होत नाहींत त्याच्यांत अनंत किंवा ईश्वर बाणलेला नाहीं असें समजावें, असें हें अनंतव्रत सांगत आहे.

अनंतव्रताचा दोरा बांधणारांनीं दुसरी एक गोष्ट ध्यानांत वागविण्याजोगी आहे ती ही कीं, अनंत हा परमेश्वर असून सर्व स्थिरचर पदार्थांचा नाश झाला तरी शेवटीं जें शेष किंवा शिल्लक राहील त्या कालरूपी शेषाच्या ठायीं परमात्म्याचें अधिष्ठान करण्यांत येत असतें. अनंताचा दोरा हा त्याची अद्भुत शक्ति दर्शवीत असून त्या शक्तीच्या सूत्रावर हिंदुधर्मानें मानलेलीं १४ भुवनें ग्रंथिरूपानें मण्याप्रमाणें ग्रंथित केलीं आहेत. अशा या परमसमर्थ अनंताची आठ-

वण सदासर्वदा राहण्यासाठीं व्रतस्थ होऊन हातांत यज्ञकंकणाप्रमाणें बांधलेल्या दोऱ्यास साजेल अशा रीतीनें वागण्याचा प्रत्येक अनंतव्रताच्या उपासकानें यत्न केला पाहिजे. म्हणजे कालातीत जो अनंत त्याच्यांतच तो मिलिंदायमान होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कायमचा चुकेल. अर्थात् त्याला परमपदाची प्राप्ति होईल.

---

## महालय पक्ष.

प्रत्येक भाद्रपद महिन्याचा कृष्णपक्ष पितृकार्यांस अत्यंत योग्य आहे असें शास्त्रकारांनीं ठरविलें. याला अपरपक्ष असेंही नांव आहे.यावेळीं सूर्य कन्या राशींत असतो. या पक्षांत पितरें यमलोक सोडून मृत्युलोकीं आपल्या कुटुंबीय लोकांच्या घरीं वास करण्यासाठीं येतात अशी समजूत आहे. सध्यां भाद्रपद कृष्णपक्ष हा पितृपक्ष किंवा महालयपक्ष या नांवानें ओळखिला जात असून तो या देशांत सर्वत्र पितृकार्यांसाठीं योग्य व पवित्र मानला जातो. भाद्रपद वद्य नवमी ही सौभाग्यानें मृत झालेल्या स्त्रियांप्रीत्यर्थ अधिकारपरत्वें पाळतात. गुजराथेंत या अविधवा नवमीस **डोशीनवम** असें म्हणतात. या दिवशीं आई विधवा किंवा सधवा मयत झाली असेल तरी श्राद्ध करण्याचा प्रचार आहे. काठेवाडांत **बाळा भोळानी तेरस** हा व॥ १३ चा दिवस पाळतात. या दिवशीं मयत झालेल्या लहान मुलांची आठवण करून त्यांच्याप्रीत्यर्थ काकबलि दिला जातो. महाराष्ट्रांत व गुजराथ काठेवाडांत वद्य १४ स ज्यांना जखमा लागून मृत्यु आला असेल त्यांचें विशिष्ट श्राद्ध करण्याचा रिवाज आहे. या तिथीस 'घायाळ' चतुर्दशी अशी संज्ञा आहे. श्राद्धाच्या दिवशीं तिलतर्पण, पिंडदान, ब्राह्मणभोजन वगैरे करण्याचे प्रकार सर्वांस विदित आहेत. महालय पक्षांत कांहीं तिथि विवक्षित श्राद्धांसाठीं योग्य मानिल्या आहेत. भरणी चतुर्थी व भरणी पंचमी या दिवशीं महालय पक्षाच्या सालीं मृत झालेल्या स्त्रीपुरुषांबद्दल श्राद्ध केलें जातें. व॥ ९ मी ही अविधवा नवमी म्हणून प्रसिद्ध आहे. व॥ १४ घात चतुर्दशी किंवा घायाळ चतुर्दशी या नांवानें ओळखली जाते. त्या दिवशीं अपघातानें मृत्यु पावलेल्यांचें श्राद्ध करतात. सर्वपित्री अमावास्या ही सर्व पितरांप्रीत्यर्थ पाळण्याची श्राद्धतिथि आहे. महालयपक्ष भाद्रपद अमावास्येनें संपतो तरी दुसरे दिवशीं म्हणजे आश्वीन शु॥ १ देस मुलीच्या मुलानें (दौहित्र) मातामह ( आईच्या बापाचें ) श्राद्ध करावें असें शास्त्रमत आहे. पुत्रसंतान नस-

लेल्या पितरांप्रीत्यर्थ या श्राद्धाची योजना असावी. हें श्राद्ध केल्याचें विशेष कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. याशिवाय मार्गशीर्ष व पौष कृ० ८ मी, माघ व फाल्गुन कृ० ८ मी या दिवशीं विश्वेदेव, सूर्य, अग्नि, प्रजापति, रात्र व नक्षत्र यांप्रीत्यर्थ श्राद्ध करावें असें शास्त्रकारांनीं सांगितलें असून पुष्प, मांस, शाकभाजी वगैरे पदार्थ निरनिराळ्या तिथींस अर्पण करावे असा नियम घालून दिलेला आहे. परंतु आधुनिक कालांत पितृकार्यासंबंधानेंच जेथें अनास्था वाढत आहे तेथें विश्वेदेवादिकांस संतुष्ट करण्याच्या भानगडींत कोण पडतो ? शास्त्रांत मात्र हीं सर्व श्राद्धें निवेदन केलेलीं आढळतात. त्यांवरून पूर्वकालीं देवकार्य व पितृकार्य यांबद्दल लोकांस किती आदर वाटत होता हें सिद्ध होतें. हिंदुधर्माची उभारणी पितृभक्तीच्या पायावर झाली असून त्याच्या दिव्य मंदिराची रचना करणारांनीं सूक्ष्म विचार करून आमच्या कर्तव्याकर्तव्याची दिशा ठरवून टाकिली आहे. देहाव्यतिरिक्त शाश्वत व निर्लेप जो आत्मा त्याची सत्ता व मरणोत्तर त्याचें स्थित्यंतर या कल्पनांवर अनेक संस्कार अस्तित्वांत आले. हिंदु व पारशी धर्मांत प्रचलित असलेले अंत्येष्टि संस्कार, त्यानंतर करण्यांत येणारे विधि श्राद्धकल्प हे सर्व वरील कल्पनेमुळेंच रूढ झाले. देहाव्यतिरिक्त आत्मा असा कोणी नाहीं असें धर्माचें मत झाल्यास सहजच असे संस्कार रूढ होणें शक्य नाहीं. पुनर्जन्मावर विश्वास न ठेवणाऱ्या ख्रिस्ती व महंमदी धर्मांत श्राद्धासारखे धर्मविधि प्रचलित नाहींत. हिंदुधर्म पुनर्जन्माचें विश्वासानें प्रतिपादन करीत असून मरणोत्तर जीवात्म्यास कर्मानुसार उत्तम, मध्यम किंवा कनिष्ट योनींत जन्म प्राप्त होतो; तसेंच बऱ्यावाईट कर्माप्रमाणें त्याला स्वर्ग किंवा नरकवास घडतो असें सांगत आहे. '**क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति**' या न्यायानें पुण्याचा संचय हाच स्वर्गांत जाण्यास व तेथें रहाण्यास साधनीभूत असून त्याचा व्यय होतांच प्राणी मृत्युलोकावर जन्म घेतो असें गीतावाक्य आहे. स्वर्गांत चढणें किंवा मृत्युलोकीं उतरणें या मार्गाला उपनिषत्कारांनीं **पितृयान** असें नांव दिलें असून ज्या मार्गानें जीव जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कायमचा मुक्त होतो त्याला **देवयान** असें नांव आहे. या

## देवयान व पितृयान

यांच्याविषयीं छांदोग्य, बृहदारण्यक, मुंडक वगैरे उपदिषदांत व गीता, भागवत वगैरे प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांत माहिती मिळते. बृहदारण्यकोपनिषदांत ती

ब-याच विस्तारानें दिली आहे. देवयान या अर्थी प्रकाशाचा भाव दाखविला आहे. देवयान या शब्दाच्या जोडीचे शब्द १ देवपथ, २ ब्रह्मपथ, ३ सूर्यमार्ग, ४ विरजमार्ग, ५ ज्ञानमार्ग, ६ विद्युन्मार्ग, ७ अर्चरादि मार्ग, ८ निवृत्तिमार्ग व ९ श्रेयमार्ग हे होत. पितृयान हा प्रकाशाचा अभाव किंवा अज्ञान यांचा द्योतक असून याच्या जोडीचे शब्द १ धूममार्ग, २ चंद्रमार्ग, ३ कर्ममार्ग, ४ पितृपंथ, ५ संसृतिमार्ग, ६ प्रेयमार्ग व ७ प्रवृत्तिमार्ग हे होत. या दोन मार्गांचा अवलंब केल्यानें भिन्न फळें प्राप्त होतात. ब्रह्माची उपासना केल्याच्या योगानें देवयानमार्गाची प्राप्ति होत असून तो पायरीपायरीनें क्रमून जावें लागतें. अग्नि, तेज, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायणाचे सहा महिने, देवलोक, आदित्यलोक, चंद्रलोक, विद्युल्लोक व शेवटीं ब्रह्मलोक असे हे देवयानाचे टप्पे आहेत. शेवटच्या टप्प्याला पोहोंचलेला ब्रह्मज्ञानी पुरुष पुनर्जन्म पावत नाहीं. पितृयान मार्गाचा अवलंब करणारे धूमलोक, रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायनाचे सहा महिने, पितृलोक, आकाश व शेवटीं चंद्रलोक येथें जाऊन पोहोंचतात. जीवात्मे चंद्रलोकावर पोहोंचल्यानंतर तेथून ते स्वर्गास जातात. तेथें पुण्याचा सांठा संपतांच खालीं उतरतां उतरतां स्वर्गांतून चंद्रलोक, तेथून आकाश, वायुलोक, मेघ, वृष्टिजल, वनस्पती, अन्न, तेथून पिंडरूपानें पुनर्जन्म या रीतीनें पुनः जन्म पावतात असा हा प्रवृत्तिमार्ग आहे. या लोकांचीं नांवें भिन्न भिन्न प्रकारचीं आढळतात. तरी सामान्यतः वरील विवरण विशेष मान्य झालेलें दिसतें. चंद्रलोकावर पितर पोहोंचल्यानंतर ते तेथील अमृतान्न सेवन करून निर्वाह करीत असतात. हें अमृतान्न चंद्रकलेबरोबर कृष्णपक्षांत क्षीण होत जातें. त्यासाठीं कृष्णपक्षांत येथून त्यांच्या वंशजांनीं अन्न पोहोंचवावें एतदर्थ श्राद्धाची व पिंडोदकाची योजना आहे. अमावास्येस तर पितृकार्य अवश्य केलें पाहिजे असें शास्त्र सांगतें. मनुष्य मेल्यानंतर एका वर्षानें चंद्रलोकास जाऊन पोहोंचतो. तोंपर्यंत जीवात्म्याला अन्नोदकाचा लाभ व्हावा एतदर्थ वर्षभर मृताच्या नांवानें श्राद्ध करावें लागतें ( गरुड पुराण ). वर्षानंतर मृत जीव पितृस्वरूप होतो.

## वेदकालीन मत.

ऋग्वेदांत देवयान व पितृयान यांचा उल्लेख अनेक वेळां आला आहे. अग्नीला या मार्गांचें ज्ञान असल्याचें सांगितलें असून मृत्युदेवतेचा (यमाचा) मार्ग देवयाच्या उलट आहेना असें दर्शविलें आहे. ( ऋ. मं. १०–१८ व ९८. ) परंतु

देवयान म्हणजे कोणता मार्ग हें स्पष्टपणें सांगितलेलें नाहीं. बृहदारण्यक व छांदोग्य उपनिषदांत विस्तरशः त्याचें वर्णन आहे. भगवद्गीतेंत देखील या देव-यान पितृयान मार्गांचा उल्लेख सांपडतो. यांस प्राचीन कालीं देवलोक व पितृलोक अशीं नांवें देण्यांत आलीं. त्यांचाच अनुवाद पुराणकारांनीं केलेला आहे. उत्तरायण व दक्षिणायन यांस कालेंकरून देवयान व पितृयान अशा संज्ञा प्राप्त झाल्या. यांच्यावर यज्ञसत्रें अवलंबून असत व वर्षभर चालणाऱ्या यज्ञाचा मध्यकालचा आरंभदिन विशुवन् हा होता. वसंतसंपात ज्या वेळीं मृगशीर्ष नक्षत्रांत घडत असे त्या वेळीं मध्यें असणारी आकाश-गंगा ही देवलोक व पितृलोक यांच्यांत विभाग पाडते असें मानीत. पितृलोकाच्या प्रवेशद्वारीं यमाचे दोन कुत्रे सर्व पितरांना रस्ता दाखविण्यासाठीं व रक्षण करण्यासाठीं तत्पर असतात असें सांगितलें आहे. श्वन् व प्रश्वन् या नांवानें ओळखलीं जाणारीं नक्षत्रें अद्यापि पाहण्यास सांपडतात. ह्यांसच यमाचें श्वान असें नांव दिलें आहे. यमाची व श्वानांची कथा इराणी, ग्रीक, जर्मन व इतर आर्यवंशांपासून निघालेल्या लोकांच्या प्राचीन लेखांत रूपांतरानें आढळते. भाद्रपद महिन्याच्या पौर्णिमेस ग्रीष्म काल संपून सूर्य पितृयान मार्गाकडे वळत असे. अर्थात् त्या कालीं पितृपक्षास आरंभ होई व पितरांस बळी देण्याचें व पितृयज्ञ करण्याचें कार्य त्या वेळीं पंधरा दिवस चाले. ही पद्धति अद्यापि आम्हांप्रमाणें इराणी लोकांत आहे. खरें पाहिलें असतां दक्षिणायनाचा आरंभ आषाढ मासांत कर्कसंक्रमणीं होतो. परंतु प्राचीनकालीं आमचे पूर्वज ज्या प्रदेशांत रहात असत तेथें भाद्रपदांत होत असे म्हणून त्या वेळीं प्रचारांत आलेला पितृपक्ष अद्यापि चालू आहे. दक्षिणायनाचा अंत फाल्गुन पौर्णिमेस होऊन उत्तरायणास प्रारंभ होई. हाच शिशिर ऋतूचा शेवटचा दिवस. हा होळी किंवा फाल्गुनोत्सव करून साजरा करीत. हल्लीं पौष मासांत मकर-संक्रमणीं उत्तरायणाचा आरंभ होतो. याप्रमाणें अयन काल बदलला तरी प्राचीन कालचे उत्सव दिवस कायम आहेत.

## श्राद्धाचे काल

निरनिराळे सांगितले आहेत. यासंबंधीं विष्णुपुराणांत दिलेली माहिती ( ३-अ. १४. ) अशी आहे कीं प्रत्येक अमावास्येस व अष्टकाच्या दिवशीं श्राद्ध करावें. याशिवाय योग्य द्रव्यें व सत्पात्र ब्राह्मणाचा लाभ झाला असतां, व्यतिपात, अयनसंक्रांति, विषुव संक्रांति, चंद्रसूर्यग्रहण, प्रत्येक संक्रांति असे योग आल्या-

वेळीं श्राद्ध करावें. अमावास्येस पुष्य, आर्द्रा, पुनर्वसु वगैरे नक्षत्रांचा योग असतां केलेल्या श्राद्धाच्या योगानें पितर विशेष तृप्त होतात. वैशाख शु. ३, कार्तिक शु. ९, भाद्रपद व. १३ व माघ अमावास्या या चार तिथि युगादि संज्ञक असून त्या वेळीं श्राद्ध करणें अत्यंत श्रेयस्कर आहे. भाद्रपद कृष्णपक्षांतील मघा नक्षत्रास केलेल्या श्राद्धानें पितर विशेष तृप्त होतात. भाद्रपद कृष्ण पक्षांत प्रत्येक दिवशीं पितरांप्रीत्यर्थ श्राद्ध करावें; कारण त्या वेळीं सर्व पितर यम-लोकांतून पृथ्वीवर उतरतात असें शास्त्रांत सांगितलें आहे. **' दिने दिने गया तुल्यम् '** या न्यायानें प्रत्येक दिवशीं केलेलें श्राद्धकार्य गया क्षेत्रीं केलेल्या पितृ-कार्यासमान पुण्यप्रद आहे; परंतु प्रत्येक दिवशीं अशीं श्राद्धें न करितां ज्या तिथीस आपला पिता निवर्तला असेल त्याच तिथीस महालय श्राद्ध उरकण्याचा परिपाठ आहे. तरी अमावास्येस सर्व वर्णांचे लोक पितरांप्रीत्यर्थ वायसबलि देतात. श्राद्धकालीं शुद्ध अंतःकरण, पवित्र द्रव्य, प्रशस्त काल, निर्दोष विधि, शास्त्रोक्त सत्पात्र ब्राह्मण व उत्कृष्ट प्रकारची भक्ति यांच्या योगानें मनुष्यास अभीष्ट फल प्राप्त होतें. प्रत्येकानें शक्त्यनुसार श्राद्धकार्य उरकावें. ब्राह्मणांस व इत-रांस यथाशक्ति अन्नदान व द्रव्यदान द्यावें. कांहींच देण्याची शक्ति नसल्यास गाईस एक दिवस पुरेल इतका चारा मिळवून द्यावा. तेवढेंही करणें शक्य नसेल तर अरण्यांत जाऊन सूर्यास आपली काख दाखवावी व पितरांस उद्देशून नमस्कार-पूर्वक म्हणावें कीं–" मला श्राद्ध करण्याची ऐपत नाहीं. यामुळें पितरांस मी नमस्कार करीत आहें. माझ्या भक्तीनें पितर तृप्त होवोत. " श्राद्धास कोणत्या ब्राह्मणांस निमंत्रण द्यावें यासंबंधानें पुराणकार व स्मृतिकार यांनीं उत्तम निर्बंध घातले असून ते मननपूर्वक पाळण्याजोगे आहेत. तसें केल्यास सध्यां अपात्रीं होणाऱ्या द्रव्याचा दुरुपयोग न होतां सत्कारार्ह असे योग्य ब्राह्मण तेवढेच समा-जांत पूज्य होतील. वेदवेदांगें जाणणारा, वेदविहित कर्म करणारा, सदाचारसंपन्न, योगाभ्यासी, ऋत्विज, विद्वान्, सुशिक्षित, सत्यनिष्ठ, ज्ञाननिष्ठ व सर्वथैव शुचिर्भूत असा मनुष्य श्राद्धप्रसंगीं ब्राह्मण होण्यास योग्य आहे. उलट पक्षीं, अशिक्षित, नीच प्रवृत्तीचा, कुकर्मे व परनिंदा करणारा, द्रोही, धर्मबाह्य आचरणाच्या योगानें उदरंभरण करणारा, द्रव्याच्या आशेनें देवपूजा करणारा, ग्रामोपाध्याय, मातापित-रांचा त्याग करणारा अशा ब्राह्मणांस श्राद्धाच्या वेळीं आमंत्रण देऊं नये. श्राद्ध-कालीं भोजनाची इच्छा करणारा अतिथि किंवा संन्यासी आला असतां त्याची पूजा करून त्यास जेऊं घालावें.

## वेदकालीं पितरपूजा

करण्याची पद्धति असावी असें कांहीं ऋचांवरून सिद्ध होतें. इतकेंच नव्हे तर मृतांबद्दल पिंडप्रदानाची पद्धति कालेंकरून अस्तित्वांत येण्यास वेदांतील कांहीं ऋचा कारणीभूत झाल्या असाव्या. सपिंडकांखेरीज इतरांस पित्रार्जित मालमत्तेचा भाग मिळूं नये असें हिंदुधर्मशास्त्रप्रणीत कायद्यानें ठरलेलें आहे. विज्ञानेश्वर या धर्मशास्त्रकारानें सपिंड म्हणजे एकच शरीरापासून उत्पन्न झालेले असा अर्थ केला आहे. परंतु जीमूतवाहनाच्या मतें जे वंशज पिंडप्रदान करण्यास अधिकारी आहेत ते सर्व सपिंडक आहेत. वेदांत पिंड हा शब्द सांपडतो, व त्याचा अर्थ एकच शरीराचे भाग असा होतो.

**एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता द्वा यन्तारा**
**भवतस्तथ ऋतुः । या ते गात्राणामृतुथा कृणोमि**
**ताता पिण्डानां प्रजुहोम्यग्नौ** ॥ ऋग्वेद मं० १-१६२-९.

अर्थ—'त्वष्ट्राच्या घोड्याचा भाग पाडणारा ( कापणारा ) एकच आहे. त्याचें व ऋतूचें नियमन करणारे दोघे ( दिवस व रात्र ) आहेत. ऋतुपरत्वें तुझ्या अवयवांचे जे भाग मी कापून काढतों त्याचे पिंड बनवून मी अग्नीस अर्पण करतों.' अर्थात् प्राचीन कालीं मांसाचे पिंड आहुती दाखल अर्पण करण्यांत येत असत. यावरून सपिंड म्हणजे एकच पुरुषापासून उत्पन्न झालेली संतति असा अर्थ प्राचीन कालीं रूढ असावा असें दिसतें. वेदकालीं देखील श्राद्धादिक कर्मे चालत होतीं असें पुढील उताऱ्यांवरून सिद्ध होतें.

" कव्याच्या सहवासांत मातलि, अंगिरसाच्या सहवासांत यम, आणि ऋक्वन्च्या सहवासांत बृहस्पति बलवान् झाले. यांस देवांनीं व देवांस यांनीं बलवान् केलें. कांहींना **स्वाहा** व कांहींना **स्वधा** ( पितरांस बलि ) या प्रकारच्या पाचारणानें आनंद होतो." ( ऋ. मं. १०-१४-३ )

" पितरें, यम व इष्टापूर्त ( यज्ञ व सत्कृत्यें यांचें फल ) यांच्याशीं परमश्रेष्ठ स्वर्गांत मिळून जा. ( त्यांच्यांत एक जीव हो ). पाप मागें टाकून देऊन तुझ्या निजधामाला जा. तुला दिव्य देह प्राप्त होवो." ( ऋ. मं. १०-१४-८ )

" या यज्ञांतील अग्निदेवतेला पाहून जो दहन भूमींतील मांस भक्षक अग्नि तुझ्या गृहामध्यें प्रविष्ट झाला आहे तो पितृयज्ञासाठीं घेऊन जातों. तो अग्नि स्वर्गांत उष्ण पेय प्राप्त करून देवो." ऋ. १०-१५-१०

याप्रमाणें अत्यंत प्राचीन कालीं आर्यांत पितृ-यज्ञ व पितृ-पूजा करण्याची चाल होती. ऋग्वेदाच्या १० व्या मंडळांत पुढीलप्रमाणें प्रार्थना आहे:—

**पितृभ्यो नमो अस्त्वद्य ये पूर्वासो य उपरास ईयुः।**

( ऋ. मं. १०–१२–२ )

अर्थ—जे पूर्वकालीं गेले व जे अलीकडच्या कालांत गेले त्या पितरांना प्रणाम असो. या प्रकारची प्रार्थना हल्लींप्रमाणें श्राद्धाच्या वेळीं केली जात असावी. ऋग्वेदकालानंतर अथर्ववेद अस्तित्वांत आला. त्या कालीं या श्राद्ध-पद्धतीला विशेष व्यवस्थित रूप प्राप्त झालें असावें. अथर्व वेदांत ( ११-१-१९ ) पुढील प्रमाणें चुलीवर शिजत असलेल्या अन्नास उद्देशून प्रार्थना आहे.

"सहस्रावयवी होऊन महिमायुक्त होत्साता स्वर्गाच्या ठायीं विस्तार पाव. पितृपितामहप्रपितामहादिक व त्यांचे मृत वंशज हो ! मी हें अन्न शिजविणारा पंधरावा वंशज आहें." पितरांप्रीत्यर्थ आहूति देण्याची व पिंडोदक देण्याची चाल सपिंडकांत वंशपरंपरा चालत होती. अथर्व वेद व शतपथ ब्राह्मण अस्तित्वांत आल्यावेळीं ही चाल समाजांत पूर्णपणें रूढ झाली होती. वेदांत श्राद्ध असा शब्द सांपडत नाहीं. हवि व स्वधा हे श्राद्धसंबंधी शब्द सांपडतात. कठोपनिषदांत श्राद्धकाल असा शब्द वापरलेला आहे ( १-३-१७ ). गृह्य वधर्मसूत्रांत मात्र श्राद्ध हा शब्द अनेक वेळां वापरलेला दृष्टीस पडतो. सध्यां प्रचारांत असलेली पिंडप्रदानपद्धति लक्षांत घेतां कालेंकरून वेदकालीन प्रार्थनांस मूर्तस्वरूप देण्यांत आल्यामुळेंच पिंडादिक विधि जन्मास आले असें दिसतें. केवळ वैदिक वर्गानें स्वार्थाच्या दृष्टीनें हे विधि उत्पन्न केलें असें ह्मणून त्यांच्यावर शिव्यांची लाखोली वाहण्यापेक्षां या अत्यंत प्राचीन व पवित्र विधींतील रहस्य समजून घेतल्यास धार्मिक व प्रापंचिक कल्याण झाल्यावांचून राहणार नाहीं.

## श्राद्धाची आवश्यकता.

वरील विवेचनावरून श्राद्धाची कल्पना मूलतः कोणत्या विचारांवर अधिष्ठित आहे हें दिसून येईल. ज्याप्रमाणें प्राचीन काळीं जाबाली, चार्वाक वगैरे नास्तिकांस पितरांस मृत्युलोकांतून पिंड पोहोंचविण्याची कल्पना रास्त दिसली नाहीं, तद्वत् आजमितीस कित्येकांस ही श्राद्धाची रूढि अज्ञानमूलक व रानटी दिसते. या पद्धती-वरील विश्वास उडण्यास कांहीं अंशीं पुरोहितांचा वर्गदेखील कारणीभूत झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. गया, काशी, नाशीक, गोकर्ण, कुंभकोणम्, रामेश्वर

वगैरे क्षेत्रांच्या ठिकाणीं पितृकार्य करणें विशेष श्रेयस्कर आहे असें मानण्यांत येत असल्यामुळें त्या ठिकाणीं श्रद्धेनें जाणाऱ्या यात्रेकरूंस पूर्णपणें लुटण्यास टपणारे भिक्षुक पाहिले ह्मणजे आमच्या विधानाची सत्यता पटेल. प्रेतसंस्कार व पितरांसंबंधीं कार्य मूलतः उत्पन्न करणारांच्या अंतःकरणांतील हेतु एकीकडे राहून या बाबीस हल्लीं फार विलक्षण स्वरूप प्राप्त झालें आहे. मृत्यूची पर्वा बाळगूं नये व वाटूंही नये असें ज्या आर्यांनीं सांगितलें, त्यांच्याच वंशजांनीं श्राद्ध व अंत्येष्टीसारख्या संस्कारांस भयंकर रूप प्राप्त करून दिल्यामुळें मूळ हेतु सिद्धीस जात नाहीं. या दिशेनें अवश्य ती सुधारणा करून हे संस्कार साधे, उपाधिविरहित व उच्च दर्जाचे असे केले पाहिजेत. पितरांस संतुष्ट करण्यास श्रद्धापूर्वक त्यांच्या मृत्युतिथीच्या दिवशीं केलेला नमस्कारही पुरे होतो हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. मुळीं श्राद्ध याचा अर्थ 'श्रद्धेनें दिलेलें' ( श्रद्धया दीयते ) असा आहे. तेव्हां ज्यांनीं आपणास जन्म दिला, ज्यांच्या कृपेमुळें आपण लहानाचे मोठे झालों, ज्यांनीं आमच्या कल्याणासाठीं स्वतःच्या स्वार्थाचा त्याग केला, त्या पितरांबद्दल अंतःकरणांत आदर बाळगून त्यांच्या प्रीत्यर्थ सत्पात्रीं यथाशक्ति दानधर्म करणें हेंच श्राद्ध होय. त्यांचें नांव मोठें होईल असें वर्तन ठेवणें यालाच पिंडदान व तिलतर्पण असें आपण म्हणूं.

---

## आश्विन महिना.

आश्विन हा पावसाळ्यांतील शेवटचा महिना असून यांत पाळावयाचे जे उत्सव आहेत त्या सर्वांस ऋतुपरत्वें वर्षाकालोत्सवांचें स्वरूप प्राप्त झालें आहे. या महिन्यांत दशमी, एकादशी किंवा पौर्णिमा यांतून कोणत्याही दिवशीं कार्तिक स्नानारंभ करून पाहांटे दोन घटिका रात्र शेष राहिल्यानंतर तीर्थादिक ठिकाणीं एक महिना कार्तिक स्नान करावें असें धर्मसिंधूंत सांगितलें आहे. आश्विन व॥ १४ स भूतचतुर्दशी असें नांव असून यमाप्रीत्यर्थ तिलतर्पण करावें, १४ प्रकारचा भाजीपाला त्यास वहावा व १४ दिवे यमाप्रीत्यर्थ पेटवून नरकवास चुकविण्याबद्दल त्याची प्रार्थना करावी, असें सांगितलें आहे. यमलोक म्हणजेच नरकलोक अशी भावना दृढ होण्यास पुराणें बऱ्याच अंशीं कारणीभूत झालीं असून वेदकालांतील यमाविषयींची उदात्त कल्पना कालेंकरून नष्ट झाल्याचें दिसतें. आश्विन शु॥ १० ही बुद्धजयंतीची तिथि आहे. बौद्धधर्म या देशांत नामशेष

झाल्यामुळें बुद्धाचा हा जन्मदिवस कोणी पाळीत नाहीं. गया येथील बुद्धाचें देवालय हिंदु पुजाऱ्यांच्या ताब्यांत आहे. तें बौद्धधर्मीयांनीं आपल्या ताब्यांत द्यावें अशी चळवळ चालविली आहे. या महिन्यांतील महत्वाचे उत्सव म्हटले म्हणजे **नवरात्र, दसरा, कोजागरीपौर्णिमा** व **दीपावली** हे होत. शाक्त-पंथामुळें नवरात्र महोत्सवास महत्व आलें. तेव्हां याच पद्धतीवर इतर देवतांचे-ही नवरात्रमहोत्सव करण्याची चाल त्या त्या देवतांच्या उपासकांनीं प्रचलित केली. रामनवमीचा उत्सव नवमीपर्यंत नवरात्र चालतो. शिवाच्या व कृष्णाच्या देवालयांत त्या देवतांप्रीत्यर्थ नवरात्रांत उत्सव मोठ्या प्रमाणांवर होतो. व्यंकटे-शगिरीवर व्यंकटेशाचा उत्सव नवरात्रांत साजरा केला जातो. याप्रमाणें मूलतः शाक्तपंथीयांनीं देवीप्रीत्यर्थ प्रचलित केलेल्या या उत्सवास वैष्णवमतानु-यायांनीं निराळें व अहिंसक वळण देऊन तो आपल्या देवालयांत प्रचलित केल्याचें दिसून येतें. गुजराथेंत आश्विन महिन्यांत बायका दशरथलीलाव्रत आश्विन शु १० मीपासून वद्य ४ थींपर्यंत पाळतात. शेवटच्या दिवशीं उपोषण करून तारादर्शन झालें म्हणजे पाणी पितात व चंद्रदर्शनानंतर भोजन करतात.

## नवरात्रमहोत्सव.

**अनाचारेण मालिन्यं अत्याचारेण मूर्खता ॥**
**विचाराचारयोर्योगः सदाचारः स उच्यते ॥**

मार्कंडेय पुराणांतर्गत देवीमाहात्म्यांत असें सांगितलें आहे कीं जगांत जेव्हां तामसी व क्रूर वृत्तीचे लोक प्रबल होऊन सात्विक, उदारमनस्क व शांतचित्त जनांस त्रास देऊं लागतात, तेव्हां त्यांच्या हातून सज्जनांची सुटका करून त्यांस पुनः सुखासनावर बसविण्यासाठीं परमसमर्थ अशी शक्तिदेवी पुनः पुनः अवतीर्ण होते. असे हे देवीचे अवतार अनेक झाले व तिनें केलेल्या महत्कृत्यांची तारीफ करून भक्तजनांनीं जेव्हां आपल्या अंतःकरणांतील प्रेम व आदर प्रशंसापर शब्दांत व्यक्त केला, तेव्हां एके प्रसंगीं देवीनें असें अभयवचन दिलें कीं, "भक्त हो ! मी तुमच्या संरक्षणासाठीं सदैव तत्पर राहीन. संकटकाळीं अनन्यभावानें मला शरण येतांच मी प्रगट होऊन तुम्हांस दुःखमुक्त करीन. मी तुमच्यावर सदा प्रसन्न असावें म्हणून प्रत्येक आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नऊ दिवस घट-पूजा, होमहवन वगैरे प्रकारांनीं माझें पूजन करावें. माझ्यावर अचल निष्ठा ठेवून

संकटसमयीं जे माझी करुणा भाकतील त्यांच्या सुखासाठीं मी सदैव जपत राहीन." यावरून नवरात्र पाळण्याची रूढि प्रचारांत आली.

## शास्त्रोक्त विधि.

देवीनवरात्रोत्सव करण्याचा अधिकार सर्व मानवजातीस आहे. यासंबंधानें शास्त्रकारांनीं वर्ण किंवा लिंगभेद ठेवलेला नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व म्लेंच्छ या सर्वांस हा उत्सव करण्याविषयीं शास्त्रसंमति असून वर्णभेदपरत्वें तो करण्याचे विधि मात्र भिन्न आहेत. ब्राह्मणांनीं सात्विक, इतर द्विजांनीं ( मद्यमांसार्पणयुक्त ) राजस, शूद्र व म्लेंच्छ यांनीं मंत्रहीन तामस पूजा करावी. प्रतिपदेच्या दिवशीं घटस्थापना केल्यावर नवमीपर्यंत सप्तशतीचा जप, देवीभागवतश्रवण, अखंडदीप, पुष्पमालासमर्पण, उपोषण, नक्त किंवा एकभुक्तव्रत, सुवासिनी व कुमारिका यांस भोजन व त्यांची पूजा, शेवटच्या दिवशीं होमहवन व बलीसमर्पण वगैरे कृत्यें नवरात्रांत करून देवीला संतुष्ट करावें. घटाशेजारीं नवधान्यें रुजत घालून त्यांचें विसर्जन केल्यावर त्यांचे रोपे प्रसादादाखल शिरीं धारण करावे. पंचमीच्या दिवशीं उपांगललिता देवीचें व्रत करावें. मूळनक्षत्रीं सरस्वतीचें आवाहन, पूर्वाषाढाच्या ठिकाणीं पूजा, उत्तरषाढा नक्षत्रीं बलिदान आणि श्रवण नक्षत्रीं विसर्जन करावें. आश्विन शुक्ल अष्टमीला व नवमीला महातिथि मानितात. देवीनवरात्राचा जो विधि शास्त्रांत सांगितला आहे तदनुसार जरी हा उत्सव सर्वत्र पाळण्यांत येत नाहीं तरी सामान्यतः सबंध हिंदुस्थानांत प्रत्येक कुलांत या दिवसांत कांहीं ना कांहीं पूजनात्मक कृत्य असतें. कुलाचाराप्रमाणें हें कृत्य सात्विक किंवा राजस असतें. सर्व देवींच्या देवालयांतून नवरात्रांत मोठा उत्सव चालतो.

## गुजराथ व काठेवाड

या प्रांतांत नवरात्र कुलाचाराप्रमाणें पाळण्यांत येतें. घटाची स्थापना करण्याची चाल आहे. विवाहित स्त्रिया चतुर्थी व अष्टमीच्या दिवशीं निदान एक दिवस तरी उपोषण करतात. या दिवसांत भोंक पाडलेल्या घड्यांत दिवा ठेवून त्याच्या भोंवतीं रात्रौ मुली व बायका फेरा धरून गातात. या गाण्यास गर्बा असें ह्मणतात. हें नृत्यगान पाहण्यास बाहेरच्या लोकांस निमंत्रण देण्याची चाल आहे. 'गर्बा' गाण्यांत कित्येक बायका निष्णात असून हा नवरात्रांतील कार्यक्रम चित्तवेधक असतो. सामान्यतः गुजराथेंतील पूजाविधि पुढीलप्रमाणें आहे. भिंतीवर

लहानशी जागा पूजेसाठीं योजून तिला पांढरा रंग लावतात व त्यावर शेंदुराचा त्रिशूळ काढतात. हा त्रिशूळ ह्मणजे दुर्गादेवीची प्रतिमा असें मानिलें जातें. या भिंतीच्या पुढें त्रिशूळाखालीं मातीचा एक ढीग रचून त्यावर गहूं व बाजरी पेरतात. या ढिगाच्या मध्यभागीं एक कलश व त्यावर नारळ ठेवतात. मातीच्या भांड्यास भोकें पाडून त्यांत एक दिवा ठेवला जातो व तो नवरात्र संपेपर्यंत त्रिशूळापुढें पेटत असतो. खेड्यापाड्यांत एकाद्या मोकळ्या मैदानांत झाड पुरून त्याला दिवे टांगतात व भोंवतालीं लोक गाणीं म्हणत व टाळ्या वाजवीत फिरतात. या रचनेला **गर्बो** किंवा **गर्बी** असें नांव असून त्याभोंवतीं फिरून म्हणण्याच्या गीतास गर्बा असें नांव प्राप्त झालें आहे. आठव्या दिवशीं बलिसमर्पण व शेवटच्या म्हणजे नवव्या दिवशीं ( त्या मातीच्या ढिगासहित गहूंबाजरीच्या रोपांचें नदीकिनाऱ्यावर नेऊन ) देवीचें विसर्जन हे विधि होतात.

## शक्तीपूजेचें महत्व

या देशांत फार वाढल्याचें या देशांत असणाऱ्या लक्षावधि देवींच्या देवालयांवरून दिसून येणार आहे. स्त्री ही जात्याच अबला असें मानणाऱ्या हिंदूंनीं स्त्रीदेवतेची शक्ति अचाट व जगांत अत्यंत भयप्रद आहे असें कां मानिलें समजत नाहीं. या भावनेमुळें किती तरी व्रतें अस्तित्वांत आलीं. चैत्र शु॥ ३ पासून वैशाख शु. ३ येपर्यंत गौरीचें व्रत करण्यांत येतें. श्रावणांत मंगलागौरीचें व्रत प्रत्येक मंगळवारीं लहान वयाच्या मुलींच्या हस्तें करविण्यांत येतें. रामपत्नी सीतेला देवतेच्या ठिकाणीं मानून वैशाख शु॥ ९ मीस तिची पूजा बंगाल्याकडील स्त्रिया करतात. षष्ठी देवीची पूजा प्रत्येक मूल जन्मास आल्यावर ५व्या किंवा ६व्या दिवशीं करण्याचा प्रघात सार्वत्रिक आहे. चैत्र शु॥ ६ ही अशोक षष्ठी म्हणून पाळतात. ज्येष्ठ शु॥ ६ बंगालांत व दक्षिण हिंदुस्थानांत पाळण्यांत येत असून मुलांची प्राप्ति व्हावी म्हणून या दिवशीं स्त्रिया षष्ठी देवीची पूजा करतात. ज्येष्ठ शु॥ ६ पाळण्याचा प्रघात पश्चिम हिंदुस्थानांत आहे. पौष शु ६ ही खस षष्ठी या नांवानें संबोधिली जाते. मुलांचें रक्षण करण्याबद्दल या दिवशीं या देवतेची प्रार्थना करण्यांत येते. सीतलादेवी ही देवीच्या आजारांत रक्षण करणारी देवता असें मानिलें असून माघ शु॥ ६ ही बंगाल्यांत सीतलाषष्ठी म्हणून स्त्रिया पाळतात. श्रावण कृ. ७ मी सीतला सप्तमी म्हणून गुजराथेंत पाळली जाते. तसेंच फाल्गुन कृ. ८ मी ही सीतलाष्टमी या नांवानें उत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. ठाणें

जिल्ह्यांत केळवें येथें वैशाख पौर्णिमेस सीतला देवीची मोठी जत्रा भरते. उत्तर हिंदुस्थानांत ज्येष्ठ शु॥ ३ येस रंभा तृतीया असें म्हणतात. समुद्रमंथनाच्या वेळीं समुद्रांतून जीं रत्नें आलीं त्यांतील एक सुंदर स्त्रीरत्न जी लक्ष्मी तिच्या प्रीत्यर्थ हा दिवस स्त्रिया पाळतात. बंगाल्यांत भाद्रपद कृ. ८ मी राधेच्या प्रीत्यर्थ राधाष्टमी म्हणून पाळली जाते. राधेस देवतेच्या ठिकाणीं मानून तिला इच्छाशक्ती असें नांव देण्यांत आलें आहे. चैत्र शु॥ ८ मी उत्तर हिंदुस्थानांत अन्नपूर्णाष्टमी म्हणून प्रसिद्ध आहे. अन्नपूर्णेचें देवालय काशींत फार प्रसिद्ध आहे. अन्नदात्री मूलशक्ती हीच आहे असें मानतात. कालिका देवीचा उत्सव बंगाल्यांत अत्यंत श्रेष्ठ मानला जातो. कार्तिक शु० ९ मीस जगद्धात्री, जगदंबा किंवा कुमारी या देवतेची पूजा थाटानें करण्याच्या प्रघात बंगाल्यांत आहे. पृथ्वीची देखील देवतेच्या ठिकाणीं कल्पना केलेली आहे. लक्ष्मीची पूजा दीपवाली, कोजागरी पौर्णिमा वगैरे दिवशीं होते. बंगाल्यांत गुरुवार व महाराष्ट्रांत शुक्रवार हा देवीचा वार मानतात. आषाढ पौर्णिमेस लक्ष्मी देवतेस दीपकाच्या ठिकाणीं कल्पून समईची पूजा करण्यांत येते, भाद्रपद शु॥ ३ येस हरितालिकेची पूजा स्त्रिया फार प्रेमानें करतात. चैत्र शु॥ ८ मीच्या दिवशीं पार्वतीचा जन्म झाला असें मानून ती तिथि भवान्युत्पत्ति तिथि म्हणून पाळण्याचा प्रघात या देशाच्या कांहीं भागांत आहे. माघ शु० ४ ही वरदचतुर्थी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशीं बंगाल्यांत स्त्रिया गौरीची पूजा करतात. श्रावण पौर्णिमा व कांहीं ठिकाणीं भाद्रपद व॥ ३० या तिथी दुर्गेप्रीत्यर्थ पाळण्यांत येतात. पिठाच्या मूर्ति करून दुर्गा व ६४ योगिनींची पूजा करण्याची चाल आहे. या तिथींस पिठोरी पौर्णिमा किंवा अमावास्या असें नांव आहे. याशिवाय प्रत्येक पंचमीच्या दिवशीं देवीची पूजा करण्याचा प्रघात असून चैत्र शु॥ ५ मीस श्रीपंचमी, आषाढांतील व॥ ५ मीस मनसापंचमी आश्विन शु॥ ५ मीस ललिता पंचमी, माघ ५ मीस श्रीपंचमी ( बंगाल ) अशीं नांवें आहेत. या दिवशीं देवीची पूजा केली जाते.

## महाराष्ट्रांत देवींचीं देवालयें

प्रत्येक खेड्यांत देखील दृष्टीस पडतात व नवरात्राच्या दिवसांत सर्व देवीदेवालयांत उत्सव होत असतो. कांहीं ठिकाणीं ठरीव दिवशीं विशेष प्रमाणावर उत्सव होत असून तेथें जत्रा भरतातः—

अडिवरें ( रत्नागिरी जिल्हा ) महाकाली. नवरात्रोत्सव.

| | |
|---|---|
| चतरसिंग ( पुणें ) सप्तशृंग देवी | आश्विन शु.९ |
| इलकल ( विजापूर ) बाणशंकरी | पौष्य पौर्णिमा |
| करमाळें ( सोलापूर ) भवानी ( अंबाबाई ) | कार्तिक पौर्णिमेपासून ३ दिवस |
| केळशी ( रत्नागिरी ) दुर्गा. | चैत्र महिना |
| केळवें ( ठाणें ) सीतलादेवी | वैशाख शु. १५ |
| कोल्हापूर अंबाबाई (फार प्रसिद्ध देवालय) | आश्विन शु. ५ |
| माढें ( सोलापूर ) देवी ( पार्वती ) | अश्विन शु. १५ |
| महालक्ष्मी ( मुंबई जवळ ) महालक्ष्मी | चैत्र शु. १ ते १५ |
| नरसिंगपूर ( सातारा, ) लक्ष्मी | वैशाख शु. १४–१५ |
| रोति ( पुणें ) तुकाई देवी | माघ शु. ९ |
| सप्तशृंग ( नाशिक ) सप्तशृंगनिवासिनीदेवी | चैत्र शु. १५ ते कृ. ७ |
| ताकारी ( सातारा ) कमलभैरी | माघ व. १३ ते ३० |
| तुळजापूर ( अहमदनगर ) भवानी ( प्रसिद्ध देवालय ) | वैशाख शु. १५ |
| वज्रेश्वरी ( ठाणें ) वज्रेश्वरी ( येथें ऊन पाण्याचे झरे आहेत ) | चैत्र |

वनि ( नाशिक ) सप्तशृंगपहाडाच्या पायथ्याशीं या देवीचें देवालय असून टेंकडी चढून जाण्याचें सामर्थ्य नसलेले देखील या देवीच्या उत्सवाच्या वेळीं महत्प्रयासानें हजर राहतात. चैत्र कृ. ८ मीस मोठी जत्रा भरते.

कारलें ( पुणें ) एकवीरभवानी — चैत्र शु. ८ मी ते पौर्णिमा. ही देवी लेण्यांत आहे, व ती बुद्धकालापूर्वीची, फार करून द्रविड लोकांची प्राचीन अक्क अवेयर ही देवता असावी असें मानतात. भवानीचे उपासक बहुतेक कोळी आहेत.

## कलकत्त्यांतील दुर्गापूजनोत्सव

नवरात्रांत प्रचंड प्रमाणावर होत असतो. प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत हा उत्सव चालत असून त्या वेळीं आबालवृद्ध त्यांत गढून गेलेले असतात. हा बंगालचा राष्ट्रीय महोत्सव आहे असें ह्मणतां येईल. दुर्गापूजा करणें हा बहुतेक लोकांचा कुलाचार आहे. त्याबाहेर कित्येक जण नव्यानें संकल्प करून नवरात्रव्रत आचरीत असतात. देवघरांत देवीची प्रतिमा व घट स्थापन करून त्यांची मोठ्या

थाटमाटानें पूजा चाललेली असते. घरोघर नृत्य, गीत, पूजा, कीर्तनें होत असतात, तीं पाहण्यासाठीं हजारों देवीभक्त रात्रभर गल्लीकुचींतून फिरत असलेले दृष्टीस पडतात. देवीच्या देवालयांत वाद्य, नृत्य, गीत, आंदोलन, ललित, खेळ, दीपोत्सव वगैरेंच्या योगानें सर्व वातावरण उल्हासानें भरून जातें. कलकत्त्यांतील दुर्गा-पूजनोत्सव अवर्णनीय आहे. शेवटच्या तीन दिवशीं रात्रौ महापूजेचा समारंभ होतो तेव्हां दिव्यांच्या लखलखाटामुळें व माणसांच्या गर्दीमुळें रात्रीचा भासच होत नाहीं. ' कालीमातेचा विजय असो ' या अर्थाच्या घोषानें आकाश दुमदुमून जातें. ढोल व नगारे यांचा ध्वनि सर्वत्र कानीं पडत असल्यामुळें एकादा अपरिचित या वेळीं आल्यास सर्व गांव रणकल्लोळांत गुंतला आहे कीं काय, असा त्यास भास होण्याचा संभव असतो. या उत्सवाच्या प्रसंगीं उच्चनीच भावना लयास जात असून सर्व लहानथोर, स्त्रिया व पुरुष, राव व रंक, ब्राह्मण व महार आपण सर्व एकाच कालीमातेचीं लेंकरें आहों असें मानून त्या देवीपुढें आपलें शिर नमवितात. या उत्सवांत जो हिंसेचा व अनाचाराचा प्रकार शिरला आहे तो काढून टाकून देवीस खऱ्या जगज्जननीचें सौम्य व प्रेमळ स्वरूप दिल्यास किती उत्तम होईल बरें ? दुर्गापूजनानंतर लवकरच ह्मणजे पौर्णिमेच्या दिवशीं कालीपूजा किंवा **श्यामापूजनोत्सव** होत असतो. या देवीचें रूप अत्यंत भयप्रद आहे. ती रुधिरप्रिया आहे असें मानून या दिवशीं निरनिराळ्या पशूंचे बली तिला अर्पण करण्यांत येतात. मद्यमांसाची रेलचेल असते. दुसऱ्या दिवशीं कालीची मूर्ति जलांत विसर्जन केली जाते. श्यामापूजेनंतर सुमारें दहा दिवसांनीं दुर्गेप्रीत्यर्थ **जगद्धात्रीपूजा** केली जाते. जगाची पोषक शक्ति ह्मणून तिला जगद्धात्री हें नांव प्राप्त झालें. लाल वस्त्रें परिधान केलेल्या या सिंहारूढ देवीसमोर अनेक उत्सव चालतात. मूर्तीसमोर नग्न नाचल्यानें संतानप्राप्ति होते अशी भाविक हिंदूंची समजूत असल्यामुळें या प्रकारचें नृत्य तेथें चालतें असें सांगतात. जगद्धात्रीच्या पूजनाचें फल चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति हें आहे असें भाविक जनांचें मत आहे. पौर्णिमेस लक्ष्मीपूजनोत्सव होत असून तो दिवस कोजागरी पौर्णिमा या नांवानें प्रसिद्ध आहे. ( दक्षिण हिंदुस्थानांत लक्ष्मीपूजन आश्विन अमावास्येस होतें. ) धान्याच्या कोठारास तांबडा रंग लावून त्याला लहानसें वस्त्र अर्पण करितात. या वेळीं पूजादिक उपचारही होत असतात. या दिवशीं रात्रौ जागणारांस मात्र लक्ष्मी प्रसन्न होते असें मानून पत्ते किंवा जुगार खेळत जागत बसण्याची रूढि बंगाल्यांत आहे. या एकंदर विवेच-

नावरून असें दिसून येईल कीं, या नवरात्राच्या दिवसांत शक्तीची निरनिराळ्या स्वरूपांत पूजा करण्यांत येते. **जगज्जननी** म्हणून उपांगललितेची, **पालनपोषण करणारी** एतदर्थ जगद्धात्रीची, **संपत्तिदायिनी** अतएव लक्ष्मीची, **विद्यादायिनी** म्हणून सरस्वतीची आणि **संहारकर्त्री** म्हणून कालीची याप्रमाणें पूजाविधि असतात. अशा रीतीनें सर्वसमर्थ मानलेल्या या देवीच्या उपासनेच्या पंथाला

## शाक्त पंथ

असें म्हणतात. त्यासंबंधाची माहिती पुढीलप्रमाणें आहे. शाक्त पंथांत दोन पक्ष आहेत. एका पक्षाचे लोक सात्विक पद्धतीनें शक्तीचें अर्चन करीत असून तिचें स्वरूपही शांत व प्रेमळ असल्याचें मानतात. हा पक्ष दक्षिणमार्गी, उत्तरकौलिक, समयिन् वगैरे नांवांनीं प्रसिद्ध आहे. दुसऱ्या मतास तंत्रमार्ग, आगम, मंत्रशास्त्र, पूर्वकौल, वाममार्ग, उपासना वगैरे नांवें असून यांचे शक्त्युपासनेचे विधि अवैदिव व खऱ्या आर्यधर्मास असम्मत असे आहेत. या पंथाची स्थापना नाथजोगी नांवाच्या सांप्रदायिकांनीं केली. त्यांनीं यासंबंधीं शिवपार्वती संवादरूप अनेक ग्रंथ लिहिले. त्यांस तंत्र असें म्हणतात. त्यांत पूजा, न्यास, मुद्रा, बीजाचे मंत्र वगैरे अनेक विधि लिहिले असून त्यांच्या देवतांस दशमहाविद्या म्हणतात. या देवींचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत–१ श्यामा ( काळी ), २ तारा, ३ त्रिपुरा, ४ बगलामुखी, ५ छिन्नमस्तका, ६ मातंगी, ७ धूमावती, ८ भैरवी, ९ महाविद्या व १० भुवनेश्वरी. याशिवाय तिच्या गुणवैशिष्ट्यामुळें व तिनें निरनिराळ्या कारणांस्तव घेतलेल्या अवतारांमुळें त्रिपुरसुंदरी, ललिता, शांता, दुर्गा, महिषासुरमार्दिनी, चंडी, चामुंडी वगैरे किती तरी नांवांनीं ती प्रख्यात झाली आहे. त्यांची पूजा, पटलें, मंत्र, सहस्रनाम, पद्धति, बीजें, कवचें, न्यास, मुद्रा, होम, बलि वगैरे अनेक विधि आहेत. हिंदुधर्मांत निंद्य मानलेल्या मद्यमांसाशिवाय हे विधि पूर्ण होत नाहींत. तांत्रिक मतास अनुसरून कोणीं उत्पन्न केलेलें देवीमहात्म्य हा ग्रंथ प्रमाण मानून त्याचें पठण व श्रवण, सप्तशतीचा चंडिपाठ हीं कृत्यें नवरात्रांत करण्यांत येतात. ह्या माहात्म्यांतील रुधिराध्याय हा तर क्रूर प्रवृत्तीची परमावधि दर्शवीत आहे. शाक्तांनीं आपल्या कल्पित देवांमध्यें अनेक भैरव असल्याचें मानिलें असून त्यांच्या अनेक देवी किंवा भैरवीही कल्पिल्या आहेत. शाक्तलोक स्त्रियांस शक्ति व पुरुषांस वीर किंवा भैरव ह्मणतात व प्रत्यक्ष स्त्रीची

पूजा अश्लील विधीनें करीत असतात. देवीची कृपा संपादन करण्यासाठीं कित्येक मोठीं उग्र अनुष्ठानें करावयाचीं असतात. प्रेतावर आसन मांडून बसणें, हाडांदातांच्या माळा घालणें वगैरे विधींचें वर्णन करण्यास आमची लेखणी धजत नाहीं. तांत्रिकांची कालगणना, पंचांग, श्राद्ध, अंत्येष्टि वगैरे सर्व विधि वैदिकांच्या पद्धतीहून भिन्न आहेत. त्यांच्यांत यंत्रें पुष्कळ असून त्यांत **श्रीचक्र** हें श्रेष्ठ आहे. हीं यंत्रें शालिग्रामशीलेवर, भूर्जपत्रावर किंवा स्फटिकावर तयार केलेलीं असतात. तीं काशी व काश्मीर येथें मिळतात. त्यांच्या धारणानें आधिव्याधि नाहींशा होऊन सर्व मनकामना सिद्ध होतात असें मानणारे हिंदु थोडेथोडके नाहींत. जे या मताचे नाहींत त्यांस कंटक किंवा पशु ही संज्ञा दिलेली असते; व जे त्यांत नव्यानें प्रवेश करतात त्यांस पूर्णाभिषेक किंवा पट्टाभिषेक करण्यांत येतो. सर्व तांत्रिक लोक आपल्या अंगीं अद्भुत सामर्थ्य असल्याचें सांगतात. जारण, मारण, उच्चाटण, शत्रुनाश, वशीकरण, मोहन, सैन्यस्तंभन, मेघस्तंभन, बुद्धिस्तंभन, सर्पनिवारण, रोगनिवारण वगैरे अद्भुत कृत्यें आपण करूं शकतों असें शक्तीचे उपासक सांगत असल्यामुळें त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून कित्येक भाविक व भोळे लोक आपल्या जन्माचें मातेरें करून घेतात. शक्तिपूजेप्रीत्यर्थ भैरवी चक्र उत्पन्न करण्याची क्लृप्ति महाभैरव जो शिव त्यासंबंधीं केल्या जाणाऱ्या लिंगपूजेवरून निघाली हें निर्विवाद आहे, यासंबंधाचें विशेष स्पष्टीकरण शिष्टसम्मत होणार नाहीं म्हणून तें केलेलें नाहीं एवढेंच येथें सुचवितों. एकंदरींत शाक्तमत वे ास, सामाजिक नीतीस किंवा सुविचारांस धरून नाहीं असें विचारी जनांचें मत आहे. शाक्त यावरून आलेला छाकटा हा शब्द या पंथाचें हीनत्व दर्शविण्यास पुरेसा आहे असें ते म्हणतात. वाममार्गाचे खास अनुयायी जात किंवा वर्णभेद पाळीत नाहींत. भैरवी चक्राची पूजा चालू असतां तर सबगोलंकार होत असतो. वारांगना, रजस्वला स्त्री, महारीण, मांगीण यांचें उच्छिष्ट सेवन करणें म्हणजे तीर्थाचें दर्शन घेण्याइतकें पवित्र व पुण्यकारक आहे असें त्यांचें मत आहे. असा हा भयंकर संप्रदाय बंगाल, नेपाळ, काश्मीर, द्रविड, मलबार, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांत कमी अधिक प्रमाणांत चालू आहे. शाक्तांचे बीभत्स, क्रूर व किळसवाणे पूजाविधि सरकारी कायद्याच्या भीतीमुळें गुप्तपणें चाललेले असतात. या उपासकांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र आणि कांहीं जारणमारणादि मंत्रप्रयोग करणाऱ्या अन्यधर्मीयांचा भरणा असून ते मंत्रसामर्थ्याच्या योगानें आपण अद्भुत कृत्यें करूं शकतों असें सांगतात व फसवे-

गिरीच्या धंद्यावर निर्वाह करतात. बंगाल्यांतील ओझे ब्राह्मण शाक्त आहेत. '**कलौ चंडीविनायकौ; चतुर्वर्गाय चंडिका** ' असें ते सांगतात. ज्याप्रमाणें बौद्ध, जैन वगैरे धर्मांचा परिणाम प्राचीनकालीं हिंदुधर्मावर झाला व सध्यां ख्रिस्ती धर्मांचा आपल्या धर्मावर होत आहे त्याचप्रमाणें

## तंत्रशास्त्राचा वैदिक धर्मावर परिणाम

झाला. वेदकालानंतर ब्राह्मणें अस्तित्वांत आलीं त्या वेळींच मंत्रांत शक्ति आहे ही समजूत उत्पन्न झाली होती. म्हणून निरनिराळ्या कर्मांचीं भिन्न भिन्न फळें सांगण्यांत आलीं. याच पायावर तंत्रकारांनीं निरनिराळ्या मंत्रांची उभारणी केली. वैदिकांसही हे मंत्र पटले. यामुळें वैदिक कर्माचरणांत अनेक तांत्रिक मंत्रांचा व देवतांचा समावेश करण्यांत आला. अथर्व वेदांत मंत्रांच्या योगानें अनेक चमत्कार घडवून आणतां येतात असें दर्शविलें आहे. परंतु या चमत्कारांच्या बुडाशीं सृष्टिनियमांचें अज्ञान, अंधश्रद्धा, व कधीं कधीं अनीतिकारक दुरिच्छा यांचें प्राबल्य दृग्गोचर होतें. संध्येंतील आसनविधि, मुद्रा, अर्घ्य, तसाच कुंडमंडपविधि यांचा उगम तंत्रांपासून झाला आहे; महारुद्र वगैरे जें वैदिक कर्म त्यांतही तांत्रिक भाग आहे, आणि बलिदान हेंही तांत्रिक आहे. न्यास, यंत्रपूजन, ह्रीं ह्रां, रं, क्रीं, वं, सं, हं क्लीं, क्रूं, क्रौं, स्वं, कं, चं, टं, धं वगैरे बीजांचा उच्चार करून देवाच्या मूर्तींत जीव भरण्याचा प्राणप्रतिष्ठाविधि, भस्म व ताईत भारणें हीं सर्व वैदिकांनीं तंत्रांतून घेतलीं. कालभैरव, कपालभैरव, चंडभैरव व इतर कित्येक मंत्रशास्त्रांतील देवतांची पूजा आर्यांच्या देवालयांत व देव्हाऱ्यांत होऊं लागली. आर्यांनीं याप्रमाणें तंत्रमार्गाचा स्वीकार करण्याचें एक कारण असें दिसतें कीं प्राचीनकालीं विश्वाच्या उत्पत्तीसंबंधानें विचार करणाऱ्या कित्येक तत्त्वज्ञांनीं पुरुष व प्रकृति यांच्या संबंधानें तर्क केलेले होते. गीतेंत देखील याचा उल्लेख आहे. तंत्रकारांनीं पुरुष हा शिव व प्रकृति ही शक्ती असें प्रतिपादन केलें. वेदांतील रुद्राच्या वर्णनाबरोबर रुद्राणी, भवानी वगैरे कित्येक स्त्रीवाचक शब्द प्रचारांत आले. या शब्दांस साजेल व जुळेल अशा रीतीनें शक्तीचें माहात्म्य वाढविण्यांत आलें. कालेंकरून या देवीसंबंधाचा भाग तंत्रकारांनीं महाभारतासारख्या अत्यंत पूज्य मानलेल्या ग्रंथांत घुसडून देऊन श्रीकृष्ण, युधिष्ठिर यांनीं देखील शक्तीस वंद्य मानल्याचें दर्शविलें. बौद्धधर्माचें साम्राज्य लयास जाऊन विस्कळीत झालेली हिंदुधर्माची घडी पुनः बसविण्यास ज्या रजपुतांचा अभिमान

कारण झाला, त्यांनीं युद्धांत विजय प्राप्त करून देणाऱ्या शक्तीची उपासना करण्याचें पतकरल्यामुळें सहजच त्यांच्या प्रजेंतही ह्या नवीन मताचा प्रादुर्भाव झाला. पांथस्थांचा गळा दाबून प्राण घेणारे ठग लोक हे एका प्रकारें शाक्तच होते. पौराणिक कालीं अनेक धर्मसंबंधी ग्रंथ अस्तित्वांत आले. याचा परिणाम असा झाला कीं लोकांत खऱ्या ज्ञानाचा लोप झाला. तीर्थमाहात्म्यें, क्षेत्रमाहात्म्यें, धर्मविधि, उपपुराणात्मक गाबाळ कथा वगैरे स्वार्थी जनांनीं उत्पन्न करून लोकांस निकृष्टावस्थेस आणून पोहोंचविलें.

## शक्तिपूजेचा प्रसार.

पौराणिक कालीं रजपूत लोकांनीं उत्तरहिंदुस्थानांतील बऱ्याच भागावर आपली सत्ता स्थापन केली. हे लोक हिंदुधर्माचे विशेष अभिमानी असल्याकारणानें बौद्धधर्माचा ऱ्हास होत गेला. बौद्ध व रजपूत यांच्यांत भयंकर लढाया झाल्याचें भविष्यपुराणावरून दिसतें. रजपूत शिवोपासक होते व शिवपत्नी शक्ती ही देखील क्षात्रदेवता असल्यामुळें तिची उपासना त्यांना मान्य झाली. रजपूत लोक नवरात्रांत देवीच्या ऐवजीं तोफेची पूजा करीत असून तिजवर कुंकवानें त्रिशूलाचें चिन्ह काढतात व भोंवतीं दिवे पेटवून ठेवतात. सहाव्या, सातव्या व आठव्या शतकांतील वाङ्मय व शिल्पकामें पाहिलीं असतां त्या कालीं शिवाच्या उपासनेस अग्रस्थान मिळालें होतें असें सिद्ध होतें. कालिदास व भारवि हे कवि सहाव्या शतकांत होऊन गेले. त्यांनीं शिवस्तुति केलेली आढळते. सातव्या शतकांत भुवनेश्वर येथील अत्यंत रमणीय देवस्थान शिवाप्रीत्यर्थ बांधण्यांत आलें. हें सिंहवंशाच्या रजपूत लोकांनीं बांधिलें असें सांगतात. याच वेळीं शिवपूजेबरोबर शक्तीपूजेचें महत्व वाढलें असावें. ख्रिस्ती शकापूर्वी तिसऱ्या शतकांत प्रसिद्ध बौद्धधर्मीय सम्राट अशोक यानें बंगाल प्रांत काबीज करून त्या देशांत आर्य लोकांची सुधारणा नेली. त्यानंतर तेथें पुंड्र, ताम्रलिप्त वगैरे पांच राज्यें झालीं. नवव्या शतकांत पाल घराण्याच्या रजपुतांनीं तो प्रांत काबीज केला व कनोजपर्यंत आपलें राज्य वाढविलें. त्यांनीं पश्चिमेकडे राज्य वाढवितांच पूर्वभागांत सेन वंशाच्या लोकांनीं आपली सत्ता स्थापन केली. याच घराण्यांतील आदिसुर नांवाच्या सेन राजानें कनोजहून ब्राह्मण व कायस्थ ज्ञातींच्या लोकांस आणून बंगाल्यांत वसाहत करण्यास लाविलें असें सांगतात. अर्थात् याच सुमारास पौराणिक देवतांनीं या प्रांतांत प्रवेश केला असावा.

व कालिकादेवीची उपासना करण्याची चाल याच सुमारास ( बाराव्या शतकांत ) विशेष वाढली असावी ( भविष्यपुराण पहा ). त्यानंतर जयदेव कवीनें ' गीतगोविंद ' या रसभरित काव्यांत कृष्णभक्तीचें माहात्म्य गाइलें. चवदाव्या शतकांत बिहारचे विद्यापति व बंगालचे चंडिदास या कवींनीं कृष्णभक्तीचें महत्व लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. त्यानंतर रामानंद व त्यांचा शिष्य कबीर यांनीं लोकांस रामाचा महिमा निवेदन करून शक्तीपूजेपासून त्यांचें मन परावृत्त करण्याचा यत्न केला. पंधराव्या शतकांत चैतन्यानें याच दिशेनें यत्न करून स्वोदाहरणानें कृष्णभक्ति वाढविली. तथापि उच्च वर्गांतील लोकांची कालीवरची भक्ति कमी झाली नाहीं. सतराव्या शतकांत मुकुंदराज नांवाच्या कवीनें दोन सुरस काव्यें रचून शक्तीदेवीच्या कृपाप्रसादानें मनुष्याच्या मनकामना सिद्ध होतात हें दाखविलें. बंगाली वाङ्मयांत हीं दोन्ही काव्यें अत्यंत सुरस गणिलीं जातात. दक्षिणेकडे चालुक्य रजपुतांची सत्ता पांचव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत चालत होती. बल्लाळ रजपूत व काकती रजपूत यांच्याही स्वाऱ्या दक्षिणेंतील कांहीं प्रांतांवर होऊन त्यांचें राज्य सुमारें दोनशें वर्षें राहिलें. या मुदतींत दक्षिणेंत देवीपूजेचा प्रवेश झाला असावा. महाराष्ट्रांत मराठ्यांनीं राज्यस्थापना केल्यावर आपलें उपास्यदैवत भवानी हिच्या प्रीत्यर्थ चहूंकडे देवालयें स्थापन केलीं. याप्रमाणें सबंध हिंदुस्थानांत देवीपूजेचा प्रसार झाला. गुढी पाडव्यासारख्या सणाला वर्षारंभ करून शेवटीं शंखध्वनीनें कलुषित झालेल्या बीभत्स होळीवर येऊन आम्ही थडकलों. हीच गोष्ट आमच्या धर्मास लागू आहे. वेदापासून प्रारंभ आणि तंत्रांत समाप्ति ! हा प्रकार पाहतां मन अत्यंत दुःखी होतें. भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें,

> शिरः शार्वं स्वर्गात्पशुपतिशिरस्तः क्षितिधरं ।
> महीध्रादुत्तुङ्गादवनिमवनेश्चापि जलधिम् ॥
> अथो गङ्गा सेयं पदमुपगता स्तोकमथवा ।
> विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ॥

एकदां स्वर्गावरून उतरलेली गंगा जशी क्रमाक्रमानें नीच पायरीस पोहोंचतां पोहोंचतां समुद्रांत मिळून गेली, तद्वत् आपली धर्मरूपी गंगा स्वर्गतुल्य वेदांपासून निघून उपनिषदांच्या मस्तकांवरून उतरली, ती पुराणें, माहात्म्यें, तंत्रें यांच्यावरून वहात वहात आजमितीस तिच्या प्रवाहाचे सहस्रशः खंड होऊन

तिचें शुद्ध स्वरूप नाहींसें झालें आहे. या धर्मनदीचा प्रवाह सध्यां दुर्गंधी, चिखल, केरकचरा यांहीं गढूळ झाला आहे. अशी ही नीचावस्था घालविण्याचा प्रयत्न आजवर रामानंदादि साधुसंत करीत आले आहेत. हा शक्तीपूजनाचा उत्सव बंद पाडून त्याला

## निराळें शुद्ध वळण

लावून दिल्यामुळें शक्तीपूजनाच्या ठिकाणीं रामलीलेचा उत्सव मोठ्या थाटमाटानें पंजाब, अयोध्या, संयुक्त प्रांत वगैरे भागांत साजरा केला जातो. दरसाल नवरात्रास प्रारंभ झाल्यापासून सर्व लहानमोठ्या गल्लींत व मोहोल्लयांत रामायणाचें कथन व रामकथा यांस प्रारंभ होतो. नाटकगृहांत रामचरित्र नवीन पद्धतीनें दाखविलें जातें. पुराणिक, कथाकार, नट, भाट, गवई, कवि, चित्रकार, आतषबाजीचें काम करणारे हे सर्व राममय होऊन जातात. हजारों लोक या वेळीं आनंदसागरांत बुडून जातात. हें सर्व रामानंदासारख्यांच्या यत्नाचें फल होय. यासाठीं जनतेचें नैतिक वैभव वाढावें म्हणून खटपट करणाऱ्या निस्पृह समाजहितचिंतकांनीं निराश न होतां आपलें अंगीकृत कार्य पुढें चालविण्यास कचरूं नये. उशिरां कां होईना त्यांच्या यत्नाचें चीज होईलच होईल.

पृथ्वीतलावर प्राचीन कालापासून अनेक धर्म उदयास आले. प्रत्येक धर्मांत अनेक पंथ उपस्थित होऊन लोक मूळधर्माला विसरले. यांपैकीं कित्येक पंथ अल्पकालांत लयास गेले. हिंदुस्थानांत देखील अनेक पंथ अस्तित्वांत येऊन सध्यां ते नामशेष झाले आहेत. आजमितीस प्रचलित असलेलीं धर्मासंबंधीं मतें कालांतरानें नाहींशीं होऊन नवीन पंथांचें साम्राज्य प्रस्थापित होणार हें निर्विवाद आहे.

## सद्धर्माचें खरें लक्षण.

सुप्रसिद्ध स्मृतिकार मनु यानें दोन हजार वर्षांमागें असें सांगितलें कीं,

**धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ।**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥ ९२ ॥**

धैर्य, क्षमा, मनोनिग्रह, परोपकार, शुचित्व, इंद्रियनिग्रह, शास्त्रज्ञान, विद्या, सत्य आणि शांति हीं धर्माचीं दहा लक्षणें होत. या कसाला जे धर्मविधि उतरत नाहींत ते शास्त्रबाह्य आहेत हें ध्यानांत ठेवून आपलें आचरण योग्य दिशेनें बदललें पाहिजे. दुरभिमान, मित्रेपणा, विषयलोलुपता, हिंसा, फलेच्छाप्रेरित कर्म

हीं सर्व वर्ज्य करून प्रत्येक आर्यांनें खऱ्या ईश्वरास ओळखण्याचा यत्न केला पाहिजे. खरी नीति कोणती, खरा देव कोण, त्याचें ज्ञान व त्याची कृपा संपादन करण्याचा खरा मार्ग कोणता हें अधिकारी सत्पुरुषांकडून समजून घेऊन धैर्यानें, उल्हासानें व शांत चित्तानें अज्ञानांधकारांतून ज्ञानप्रकाशांत गेलें पाहिजे. असें केल्यास जगन्नाथ जो परमेश्वर तो प्रसन्न होईल; नाहीं तर त्याच्याच संहारक शक्तीकरवीं आपला नाश होईल.

---

## विजयादशमी किंवा दसरा.

रामायणाच्या पंचम सर्गांत रघुवंशाच्या कथेंत पुढीलप्रमाणें एक गोष्ट दिली आहे. पूर्वकालीं पैठण नगरीं देवदत्त नांवाच्या एका ब्राह्मणास कौत्स नांवाचा मुलगा होता. हा सुशील असून विद्या संपादन करण्याची त्याला इच्छा उत्पन्न झाली व तो मौंजीबंधनानंतर भडोच नांवाच्या शहरीं वरतंतु ऋषींच्या घरीं विद्यार्जनासाठीं येऊन राहिला. कांहीं काल लोटल्यावर कौत्स सकल शास्त्रांत पारंगत झाला; तेव्हां गुरूला गुरुदक्षिणा देऊन त्याच्या ऋणांतून कसें मुक्त व्हावें याचा त्याला विचार पडला. शेवटीं गुरूचा निरोप घेतांना त्यानें अत्यंत कृतज्ञतापूर्वक त्याचे आभार मानून आपल्या आवडीचा कांहीं पदार्थ असल्यास तो सांगावा म्हणजे गुरुदक्षिणेदाखल तो आणून देईन असें त्याला सांगितलें. गुरूनें उत्तर दिलें:—"कौत्सा, दक्षिणार्थ विद्या शिकविणें हें अनुचित कर्म आहे. शिष्य विद्वान् झालेला पाहून गुरूस जो आनंद प्राप्त होतो तीच गुरुदक्षिणा होय." परंतु कौत्सास गुरूच्या ऋणांत राहणें न आवडून त्यानें आग्रह धरला व पुनः पुनः मी तुह्मांस काय दक्षिणा देऊं असें तो त्यांस विनयपूर्वक विचारूं लागला. तेव्हां वरतंतु ऋषि म्हणाला, "मीं दक्षिणा घ्यावी असा तुझा आग्रहच असेल तर तुला शिकविलेल्या प्रत्येक विद्येबद्दल एक कोटि याप्रमाणें चौदा कोटि मुद्रा व त्याही एकाकडूनच मजला आणून दे." ही अट कौत्सानें मान्य करून आपल्या विद्येच्या धीरावर तो तेथून बाहेर पडला; परंतु चौदा कोटि मुद्रा व त्याही एकाच इसमाकडून मिळविणें कांहीं सोपें काम नव्हे हें कौत्सास लवकरच समजलें. रघुराजा मोठा उदार व विद्वानांस आश्रय देणारा आहे असें त्याच्या कानावर

येतांच तो त्याजपाशीं गेला; परंतु त्याच वेळीं रघुराजानें विश्वजित् यज्ञ करून ब्राह्मणांकडून सर्व द्रव्यभांडार लुटविलें होतें; यामुळें त्यालाही अत्यंत गरीबी आलेली होती. कौत्सानें त्याच्या एकंदर स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावर आपली इच्छा येथें सफल होणार नाहीं असें वाटून त्यास दुःख झालें. रघुराजानें आपल्या द्वारीं आलेल्या विद्वान् ब्राह्मणाचा योग्य सत्कार केला व त्याच्या आगमनाचें कारण विचारिलें. कौत्सानें कारण सांगितलें व तो पुढें म्हणाला, 'राजा, तुला प्राप्त झालेल्या स्थितींत माझी मनीषा सफल होण्याचा रंग दिसत नाहीं. तथापि त्याजबद्दल खंती वाटूं न देतां मला दुसरा दाता शोधून काढण्यासाठीं जाऊं दे. हें कौत्साचें भाषण ऐकून राजा हंसला. त्यानें चौदा कोटी सुवर्ण मुद्रा तीन दिवसांत देतों असें कौत्सास आश्वासन देऊन त्याला आपल्या घरीं ठेवून घेतलें व थकलेली बाकी वसूल करण्यासाठीं इंद्राबरोबर लढण्याची तयारी जारीनें चालविली. ही गोष्ट इंद्रास समजतांच त्यानें अयोध्या नगराबाहेर आपट्याच्या व शमीच्या झाडांवर कुबेराकडून सुवर्णमुद्रांचा वर्षाव करविला. रघुराजानें त्या सर्व कौत्सास दिल्या. त्यानें त्या वरतंतु ऋषीपुढें ठेवून त्यांस त्यांचा स्वीकार करण्याविषयीं विनंति केली. परंतु त्यानें फक्त १४ कोटि मुद्रा ठेवून घेऊन बाकीच्या कौत्सास परत दिल्या. त्या त्यानें रघुराजास आणून दिल्या; पण तोही त्या घेईना. शेवटीं त्याच आपट्याच्या व शमीच्या झाडाखालीं त्या मुद्रांचा ढीग करून त्यानें लोकांस त्या नेण्यास सांगितलें. लोकांनीं अनायासें श्रीमंत होण्याची ही संधि साधून त्या नगरीच्या सीमेबाहेर असलेल्या त्या झाडांची पूजा केली, सोनें यथेच्छ लुटलें व एकमेकांस देऊन आनंद व्यक्त केला. हा दिवस विजयादशमीचा होता. त्या वेळेपासून या झाडांची पूजा करून सुवर्णमुद्रांच्या ऐवजीं या झाडांचीं पानें लुटण्याचा प्रघात प्रचारांत आला. याप्रमाणें या सणाची उपपत्ति आहे.

## शास्त्रोक्त विधि.

अपराह्णकालीं दशमी असेल त्या दिवशीं ( आणि ती श्रवण नक्षत्रयुक्त असल्यास उत्तम ) आपल्या घरीं हत्ती किंवा घोडा असल्यास त्याची व छत्रचामरादिक राजचिन्हांची, तसेंच शस्त्रें व वाद्यें यांची पूजा करावी. गांवाच्या बाहेर ईशान्य दिशेस शमीच्या व आपट्याच्या झाडांची पूजा करून अपराजितानामक देवीचेंही त्या ठिकाणीं अर्चन करावें. राजानें दिक्पाल व वास्तुदेवता यांची पूजा करून शत्रूच्या पुतळ्याचें शस्त्रानें खंडन करावें. मोठ्या

थाटमाटानें सीमोल्लंघन करून पूजिलेल्या शमीच्या किंवा आपट्याच्या मुळांतील मृत्तिका व अक्षता यांसह वाजतगाजत घरीं यावें. स्त्रियांनीं ओवाळणी करावी. वस्त्रालंकारांनीं मंडित होऊन दशमीचा दिवस मोठ्या आनंदांत घालवावा. त्या दिवशीं इष्टमित्रांसह मिष्टान्न सेवन करावें. आश्विन शु. १०।११।१५ या दिवशीं कार्तिकस्नानास आरंभ करून एक महिना पहांटे दोन घटिका रात्र राहिल्यानंतर उठून तीर्थाच्या ठिकाणीं किंवा विहिरीवर थंड पाण्यानें स्नान करावें. याच्या योगानें पापक्षालन होतें असें धर्मशास्त्र सांगतें.

## चालू रूढि.

दसरा हा शब्द दश म्हणजे दहा यावरून आला असून त्याचा अर्थ दहावा दिवस असा आहे. या दिवशीं नवरात्रांत घटासन्निध पेरलेलें नवधान्य उपटून देवीला व इतर देवतांना वाहतात. महाराष्ट्रांत कालियानागावर बसविलेल्या कृष्णाची पूजा गवळी व इतर चतुर्थ वर्णांतील लोक प्रतिपदेपासून दशमीपर्यंत करितात. हा शिलंगणांचा उत्सव या नांवानें प्रसिद्ध आहे. शिलंगणाच्या पागोट्यांत वर सांगितलेल्या नवधान्याच्या रोप्यांचा झेंडा खोवतात. शिलंगण हा शब्दच मुळीं सीमोल्लंघन याचा अपभ्रंश आहे. अनेक ठिकाणीं या दिवशीं रेडे व बकरे देवीस बळी देण्याचा प्रघात आहे. निरनिराळ्या प्राणिरक्षक संस्थांकडून हा हिंसेचा प्रकार बंद करण्याबद्दल अविरत प्रयत्न चालला असून त्यास संस्थानिकांच्या सहानुभूतीमुळें यश येत चाललें आहे. रेडा बळी देऊन तो गांवाच्या सीमेवर पुरला असतां त्या गांवांत चालू सालीं रोगराई उद्भवत नाहीं असा समज आहे. मुख्यतः गांवांतील ग्रामदेवाच्या व इतर कांहीं देवतांच्या मंदिरांतून शमीची पूजा करण्यांत येते. त्यानंतर त्याची एक फांदी तोडून तिचीं पानें, तिळाच्या झाडाचीं फुलें, बाजरीचीं पानें व आपट्याचीं पानें श्रीगणपतीस अर्पण करण्यांत येतात. नंतर तीं सर्व गांवाच्या सीमेवर नेऊन गांवकरी लोक लुटतात. शृंगारलेली देवाची मूर्ति पालखींत बसवून गांवाच्या सीमेपर्यंत मोठ्या थाटमाटानें वाजतगाजत नेतात. देवालयांत नृत्य, गान, दीपोत्सव वगैरे करण्यांत येत असून लहानथोर देवदर्शनास जातात. अलीकडे या दिवशीं संमेलनें भरविण्याची टूम निघाली असून अनेक संस्थांची स्थापना याच मुहूर्तावर करण्यांत येते. मराठे, रजपूत वगैरे सरदार व राजे या दिवशीं घोड्यांची व शस्त्रांची पूजा करितात. कांहीं संस्थानिक दरबार भरवितात. दसऱ्यास शमीचीं व आपट्याचीं पानें सोनें

म्हणून एकमेकांस देण्याचा संप्रदाय मुंबईइलाख्यांत आहे, सातान्याकडे जोंधळ्याचीं पानें रुपें व आपट्याचीं पानें सोनें असें मानून वांटण्याची चाल आहे. म्हैसुरांत व बडोद्यांत दसऱ्याचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जात असून राजदरबार भरतो व अलीकडे औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येतें. म्हैसूरांत याच वेळीं सामाजिक, औद्योगिक व इतर महत्वाच्या विषयांसंबंधानें चर्चा करण्यासाठीं परिषदा भरतात.

गुजराथेंत व काठेवाड प्रांतांत विजयादशमीचे दिवशीं शमीपूजन करण्याची चाल आहे; परंतु सोनें वांटण्याची रूढि नाहीं. रक्षाबंधन सोडण्याचा विधि याच दिवशीं होतो. रजपूत लोक या दिवशीं रात्रौ दुर्ग व कोट यांचें रक्षण करणाऱ्या देवीची पूजा करतात. शमीपूजनानंतर सर्व लोक एकत्र जमतात व भाला, बरची वगैरे हत्यारें परजतात. घोड्यावरून शर्यती खेळतात आणि लढाईच्या तयारीचा बहाणा करतात. कित्येक भाविक हिंदु शमीची पूजा आटपून घरीं येतांना त्या झाडाच्या बुडाशीं असलेली माती त्याचीं पानें, गव्हांचें रुजलेले रोपटे व सुपारी बरोबर आणतात व त्या सर्वांचा एक गोळा बनवून प्रवासांत तो बरोबर ठेवतात. हा अरिष्ट टाळतो अशी त्या लोकांची समजूत आहे. गव्हांचे रोप तुऱ्याप्रमाणें पगडींत खोवण्याची चाल अनेक ठिकाणीं दृष्टीस पडते.

श्रीरामचंद्रानें विजयदशमीच्या सुमुहूर्तावर लंकाधिपति रावणाबरोबर युद्ध करण्याकरितां दक्षिण दिशेस कूच केलें व त्या स्वारींत त्याला यशःप्राप्ति झाली. एतदर्थ रामाबद्दल अत्यंत पूज्यभाव बाळगणारे रजपूत दसऱ्याचा शुभमुहूर्त साधून वारंवार आपल्या शत्रूंवर चढाई करून जात. मराठेही यास लष्करी सण मानून परमुलुखावर स्वारी करण्यासाठीं याच दिवशीं प्रस्थान ठेवीत व योग्यतेनुसार ब्राह्मणांची संभावना करीत. अद्यापि कांहीं रजपूत संस्थानिक व सरदार मोठ्या लव्याजम्यानें दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघन करून लढाईचा थाट दाखवितात. पेशवे आपल्या आश्रित संस्थानिकांस दसऱ्याच्या दिवशीं दरबार भरवून मानाचा पोषाख देत. पेशवाईनंतर ब्रिटिश रेसिडेंट एल्फिन्स्टन, मालकम वगैरे अधिकाऱ्यांनीं ही वहिवाट तशीच चालविली होती. व्हिक्टोरिया महाराणीच्या कारकीर्दींत वरील दसऱ्याच्या दरबाराचें पर्यवसान इंग्रजी वर्षारंभाच्या दिवशीं पुण्यास दक्षिणेंतील सरदारांच्या एजंटाकडून भरविण्यांत येणाऱ्या दरबारांत झालें. जुन्या काळीं स्वराज्यांत दसऱ्याच्या दिवशीं जहागिरी, नेमणुका, पदव्या वगैरेंची

खैरात होत असे, व सध्यां व्हाइसरायांकडून वर्षातून दोनदां मानार्ह लोकांच्या सन्मानार्थ पदव्यांची खैरात होते. याच दिवशीं लाहोर येथें व इतर ठिकाणीं

## रामलीला

नांवाचा मोठा उत्सव होत असतो. ताडमाडाइतका उंच रावण तयार करून त्याच्याहून कमी उंचीचे इतर राक्षस गांवांतील मोठ्या मैदानावर उभे करतात. प्रत्येक मोहोल्यामार्फत एक दोन राक्षस याप्रमाणें बरेच राक्षस त्या ठिकाणीं उभे होतात. हे कागदाचे व पोकळ असे तयार करून त्यांच्या आंत बाण व इतर प्रकारचें दारुसामान रचून ठेवतात. उत्तम आविर्भाव करणाऱ्या सुंदर मुलांना रामलक्ष्मणादिकांचीं सोंगें देऊन मोठ्या थाटमाटानें त्या ठिकाणीं आणतात. जुन्या विचारांच्या भाविक लोकांना या वेषधारी दशरथपुत्रांस नमस्कार करितांना पाहिलें म्हणजे रामासारख्या प्राचीन विभूतींबद्दल हिंदूंच्या अंतःकरणांत किती प्रेम वसत आहे हें दिसतें. मोठमोठ्या खटाऱ्यांतून आणलेलीं राक्षसांचीं अगडबंब शरीरें यांच्यांच्या साह्यानें उभीं केलेल्या ठिकाणीं रामादिकांची स्वारी येऊन थडकतांच लंका नगरीच्या बंदोबस्तासंबंधानें आपल्या मंत्रिमंडळाचा जणूं सल्ला घेणाऱ्या त्या रावणाच्या भोंवतीं जमा झालेले सुमारें साठसत्तर हजार लोक एकदम जयघोष करतात. लंकानगरीची रचनाही ( दारूसामानानें युक्त अशी ) फार प्रेक्षणीय केलेली असते. कालीभक्तांनीं काढलेली कालीमातेची मिरवणूक याच वेळीं तेथें येते. रात्र पडूं लागतांच उभय पक्षाकडून बाण सुटूं लागतात, आणि सुमारें एका तासांत सर्व लंकानगरीची व राक्षसांची राखरांगोळी होते. राक्षस जळूं लागतांच त्यांतून शेंकडों तऱ्हेचीं चक्रें, फुलें वगैरे पेटून तोफांप्रमाणें धडाधड आवाज कानीं पडतो. दसऱ्यानंतर दोन दिवसांनीं भरतभेटीचा समारंभही मोठ्या थाटाचा व प्रेक्षणीय होतो. या उत्सवावरून रामचरित्र आबालवृद्धांस समजून जातें. अशा प्रकारचे रामलीलेचे व इतर उत्सव आपल्या महाराष्ट्रांत चालू झाल्यास किती उत्तम होईल बरें ! सध्यांच्या लोकांस पौराणिक कथानकांवरून करमणूक होत नसल्यामुळें पूर्वींप्रमाणें रामायणभारतांतील प्रसंगांस धरून खेळ करण्याची पद्धति लयास जाऊन भलतेच चोचले रंगभूमीवर पहाण्याची राक्षसी महत्वाकांक्षा लोकांत उत्पन्न झाली आहे.

## शमी व मंदार

यांच्या संबंधाची कथा गणेशपुराणांतर्गत क्रीडाकांडांत दिली आहे. ती अशीः—एकदां मालव देशीं औंर्व नांवाचा एक महाज्ञानी व तपोनिष्ठ ऋषि

रहात होता. तो योगसामर्थ्यानें इच्छित वस्तु प्राप्त करून घेई. त्याला शमी नांवाची एक सुस्वरूप कन्या होती. धौम्य ऋषीचा मुलगा मंदार याच्याबरोबर तिचें लग्न झालें. पुढें तारुण्यावस्था प्राप्त होऊन शमी व मंदार एकत्र राहूं लागल्यावर एके दिवशीं त्यांचा गुरु शौनक यांच्या गृहीं तें जोडपें जात असतां वाटेंत त्यांना महागाणपत्य भ्रशुंडी ऋषीचा आश्रम लागला. त्याच्या भालप्रदेशावर गणपतीच्या कृपाप्रसादानें सोंड वाढली होती ! ती पाहून तें तरुण दांपत्य हंसलें. त्यामुळें त्या कोपिष्ठ ऋषीनें त्यांस शाप देतांच तीं उभयतां वृक्ष होऊन पडलीं. पुढें ही आपल्या पुत्रस्नुषेची दुर्दशा समजून आल्यावर और्व ऋषीनें व शौनकानें घोर तपश्चर्येच्या योगानें गणराजास प्रसन्न करून घेतलें व शमी व मंदार यांस पुनः मानवदेह देण्याबद्दल त्याची प्रार्थना केली. परंतु भृशुंडी हा आपला परमभक्त असल्यामुळें त्यास दुखविणें बरें नव्हे असें जाणून गणपतीनें शमी व मंदार यांची त्रैलोक्यांत योग्यता वाढून सर्व लोक त्यांची पूजा करितील असा त्यांस वर दिला. शौनक तेवढयावर संतुष्ट होऊन गेला. परंतु और्वऋषीनें शमी वृक्षांत प्रवेश करून तो त्यांत अग्निरूपानें राहिला. शमीच्या समिधा होमाला अत्यंत आवश्यक असतात. त्यांच्या घर्षणापासून अग्नि * उत्पन्न होतो. शमीपत्र व मंदार पुष्प यांच्या योगानें शंकर संतुष्ट होतो असें मानितात. दुसरी अशी एक कथा आहे कीं, पांडव विराट नगरींत ( वांईक्षेत्र ) तेरा वर्षें अज्ञातवासांत घालविण्याकरितां आले, तेव्हां त्या पांचही बंधूंनीं निरनिराळे वेष घेतले व आपलीं शस्त्रास्त्रें शमीच्या झाडावर ठेवून दिलीं.

प्राचीन काळच्या कृषिविषयक उत्सवाचें दसरा हें रूपांतर असावें असें दिसतें. वर दिलेल्या कथांपैकीं आरंभींचें कथानक ( रघुराजासंबंधीं ) वस्तुतः इतिहासास धरून नाहीं. रघुराजा ही व्यक्ति निःसंशय ऐतिहासिक असून इंद्र व कुबेर यांस देवता असें मानिलें असतां रघूची इंद्रावर स्वारी असंभवनीय दिसते. त्याचा वास्तविक अर्थ असा असावा कीं, ज्याला मेघांचा राजा मानतात त्या इंद्रानें

---

* शमी वृक्षाचीं लांकडें घर्षण केलीं असतां त्यांपासून अग्नि उत्पन्न होतो याबद्दलचा शोध पूर्वकालीं लागल्यावरून यज्ञांत अग्नि प्रदीप्त करण्यासाठीं मुख्यत्वेंकरून शमीच्या समिधांचा उपयोग करण्याकडे ऋषींचें लक्ष वेधलें असावें व म्हणूनच या समिधा पवित्र मानल्या जातात. और्व ऋषींनीं याचा शोध लावल्यामुळें कदाचित् वरील कथा रचली गेली असेल काय ?

जलाचा वर्षाव करतांच धान्यसमृद्धि होऊन परंपरेनें लोकांस सुवर्णप्राप्ति झाली. सुवर्णाची मालकी पुराणकारांनीं कुबेराकडे सोंपविल्यामुळें त्याचें नांव वरील कथेंत ओंवलें गेलें असावें. ऐतिहासिक गोष्टींचें वर्णन चटकदार करण्यासाठीं कांहीं अलौकिक चमत्कारांची भर घालण्याची प्रवृत्ति आमचे जुने इतिहासलेखक जे पुराणकार यांच्यांत होती. यास भविष्यपुराणासारखे ग्रंथ साक्ष देत आहेत. या पुराणांत पृथ्वीराज, तैमूरलंग, महंमदघोरी वगैरेंच्या गोष्टी इतिहासास धरून पण चमत्कारपूर्ण अतिशयोक्तीच्या लिहिल्या असूनही त्या भरतकुलोत्पन्न महाराजा शतानिकास सुमंतूनें कथन केल्याचें दाखविलें आहे.

वरील गोष्टीवरून पूर्वकालीं क्षत्रिय लोक जिंकून आणलेलें सोनें आपल्या शत्रूवर स्वारी करतांना उत्तेजनार्थ आपल्या सैनिकांकडून लुटवीत असावे असाही तर्क करतां येण्याजोगा आहे. दसरा हा उत्सव धान्याचें पीक घरांत आणण्यासंबंधाचा आहे असें म्हणण्यास दुसरा पुरावा म्हटला म्हणजे नवरात्रांतील नवधान्याची पेरणी व उगवलेलीं झाडें उपटून शेवटच्या दिवशीं देवास वाहणें, हा होय. कित्येक लोक नवमीच्या दिवशीं शेतांतील तयार झालेलें भाताचें लोंगर आणून त्याची पूजा करतात, व प्रवेशद्वारीं टांगून ठेवितात. घरांतील वापरांत येणारीं भांडीं, उखळ, मुसळ वगैरेंना धान्याचीं कणसें बांधण्याची चाल कोकणांत आहे. बंगाल्यांतील कांहीं भागांत बहुतेक असाच विधि मकरसंक्रमणाच्या वेळीं करतात. त्या वेळीं स्त्रिया गवताची पेंडी घेऊन ती धान्याच्या कोठारांस बांधतात व बांधतांना 'बावन्न पौटि' असें म्हणतात. त्याचा अर्थ धान्य ५२ पट होवो असा आहे. या त्यांच्या विधीस बावन्नबंधन अशी संज्ञा आहे. यामुळें पुढील सबंध साल समृद्धींत जातें अशी समजूत आहे. पूर्वकालीं शमीच्या झाडाखालीं नवीन धान्याची रास घालून तेथून तें घरीं आणीत असावे. दसरा हा केवळ

## कृषिविषयक उत्सव

असावा असें याच कारणावरून म्हटलें आहे. ऋग्वेदांत पुढीलप्रमाणें क्षेत्रपतिदेवतेची प्रार्थना केलेली आढळते.

क्षेत्रस्य पतिना वयं हितेनेव जयामसि ।
गामश्वं पोषयित्न्वास नो मृळातीदृशे ॥ १ ॥
शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषतु लाङ्गलम् ।
शुनं वरत्रा बध्यन्तां शुनमष्ट्रामुदिङ्गय ॥ ४ ॥

**अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा ।**
**यथा नः सुभगासासि यथा नः सुफलाससि ॥ ६ ॥**

( मंडळ ४, सूक्त ५८. )

**अर्थ**–" हितकर्त्यानें साहाय्य केल्याप्रमाणें क्षेत्रपतीच्या मदतीनें आम्ही धेनु आणि अश्व यांना पोषक असेंच धन जिंकून आणूं. तो क्षेत्रपति आह्मांसारख्यां-वरही दया करील. ( १ ) बैल आनंदानें, लोक उत्साहानें आणि नांगर उत्तम रीतीनें जमीन नांगरोत. जुंपण्या चांगल्या घट्ट बांधूं द्या, सुखोत्पत्ति होईल अशा रीतीनें आपला असूड चालीव. ४ भाग्यशालिनी सीते, येथें आगमन कर, तुला आम्ही वंदन करितों. कारण तेणेंकरून तूं आह्मांला भाग्यदात्री होतेस. आमचे हेतु सफल करणारी होतेस. ६ ( या सूक्तांतील सीता ही कृषिदेवता होय. ) शास्त्रांत दशमीच्या दिवशीं ज्या अपराजिता नामक देवीची पूजा करावी असें सांगितलें आहे, ती मूलतः क्षेत्रपतिदेवता सीता हीच असावी असें दिसतें. कालेंकरून क्षत्रियतेजाचें व तें तेज वृद्धिंगत होण्यास कारणीभूत झालेल्या शक्तीपूजेचें माहात्म्य वाढत गेलें, तसें याच समृद्धिदायी देवतेस अपराजिता असें मानिलें असावें. याशिवाय इंद्राचीही आराधना या सूक्तांत आहे. या देशांत कृषिविषयक पदार्थांस, कृषिवलांस व कृषिकर्मांस प्राचीन कालापासून फार मान देण्यांत आला आहे. धान्याची समृद्धि होणें हें ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे असें समजून त्याचा कृपाप्रसाद मिळविण्यासाठीं राजा व प्रजा फार झटत असे. धान्य हेंच धन किंवा लक्ष्मी मानून तें तयार होतांच राजे लोक शत्रूपासून त्याचें रक्षण करीत असत. वर्षाकाल संपतांच ते प्रजाजनांबरोबर गांवाच्या सीमेपर्यंत जाऊन नवीन धान्य दरबारी थाटमाटानें घरीं आणीत असत. दसरा हा याच कृषिविषयक उत्सवाचें रूपांतर आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुमारें अडीच तीन हजार वर्षांमागें अस्तित्वांत आलेल्या या सणाचें असें रूपांतर झालें यांत नवल नाहीं. आज इतक्या काळपर्यंत हा उत्सव टिकला आहे एवढयावरूनच त्याच्यांतील उपयुक्तता व आपल्या लोकांतील पुराणप्रियता हीं दृष्टोत्पत्तीस येतात. चीनदेश हिंदुस्थानाप्रमाणेंच कृषीवर अवलंबून राहाणारा असल्यामुळें तेथें खुद्द राजाच्या हातानें योग्य मुहूर्तावर शेतांत नांगर चालवि-ण्याचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा केला जात असे. या वेळीं राजपुत्र व प्रधान देखील शेत नांगरण्याचा विधि करीत. Harvest Home नांवाचा

नवीन धान्य घरांत आणण्याचा सण कित्येक पौर्वात्य व पाश्चिमात्य लोक पूर्वी पाळीत असत व अजूनही पाळतात.

## हेतु व बोध.

सांप्रत दसऱ्याचें महत्व शमीचीं व आपट्याचीं पानें वांटण्यापुरतेंच राहिलें आहे. ज्या कृषीबद्दल पूर्वकालीं आदर वाटून 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' ही ह्मण प्रचारांत आली ती शेती अज्ञानी, आळशी व विपन्न स्थितींत दिवस घालविणाऱ्या लोकांच्या हातीं ठेवून आपण कनिष्ठ तेंच श्रेष्ठ असें मानूं लागलों आहों. इतर देशांतील लोकांनीं मात्र सरस्वती व सीता या देवतांस प्रसन्न करून घेऊन त्यांस आपल्या कह्यांत ठेविलें आहे व त्यांच्या आशीर्वादानें व मदतीनें ते धान्य व धन यांची समृद्धि करून घेत आहेत. शेतकरी वर्गाची व शेतीच्या मालकांची स्थिति दिवसेंदिवस सुधारत असून त्यांच्या देशांतील दारिद्र्य लांब पळूं लागलें आहे. लक्ष्मीचा वरदहस्त त्यांच्या शिरावर सदैव असल्याचें आपण पाहतों. उलटपक्षीं आम्ही कूपमंडुकवत् रहाण्यांत धन्यता मानूं लागलों आहों. द्रव्योत्पादक व्यवसायांबद्दल आह्मांस आदर वाटत नाहीं. सांप्रत पौरुष-युगाचा प्रारंभ होऊन पुरुषार्थसाधन करण्याविषयीं प्रत्यहीं आह्मांला कर्तृत्ववान् व दीर्घोद्योगी परदेशस्थ लोक स्वोदाहरणानें धडा घालून देत असतां आपण कलियुगाच्या रडगाण्यांत आयुष्याचे दिवस खपवीत आहों. स्पर्शास्पर्शाच्या कल्पनेचे भेसूर पर्वत, भयानक रूढि, मत्सर, मतभेद, उचनीच भाव, दारिद्र्य यांसारखे अजस्र तट आपल्याच हातानें आपणाभोंवतीं रचून तुरुंगांतील कैद्यां-प्रमाणें आम्ही हीन स्थितींत पडलों आहों. या सर्व सीमांचें उल्लंघन करून ज्या दिवशीं आपण बाहेर पडूं, त्या दिवशीं आपट्याच्या व शमीच्या पानांऐवजीं खरें सुवर्ण आपल्या हातीं लागेल. आणि हा सीमोल्लंघनाचा पवित्र दिवस दसरा होईल, यांत संशय नाहीं. सीमा उल्लंघन करणें ह्मणजेच प्रगतीच्या मार्गांत पुढें पाऊल टाकणें आहे. ज्या प्राचीन महात्म्यांच्या सूचनेप्रमाणें हा सीमोल्लंघनाचा दिवस अस्तित्वांत आला त्यांच्याबद्दल आदर व स्वतःच्या ऊर्जितावस्थेची इच्छा असेल तर प्रत्ये-कानें दसऱ्याचा दिवस प्राप्त होतांच सरस्वती व सीता या अत्यंत श्रेष्ठ देवतांचा कृपाप्रसाद मिळविण्याचा निश्चय केला पाहिजे.

# दीपावलिमहोत्सव.

आश्विन व॥ १३ पासून कार्तिक शुक्ल २ पर्यंत जो महोत्सव सबंध हिंदुस्थानांत मोठ्या थाटानें साजरा केला जातो तो दीपावलि किंवा दिपवाळी या नांवानें प्रसिद्ध आहे. शास्त्रोक्त रीत्या पाहूं गेल्यास दिपवाळीचा उत्सव तीन दिवसांचा आहे, तथापि बलिप्रतिपदा व यमद्वितीया यांची देखील या महोत्सवांत गणना केली जाते. या पांचही दिवसांचीं नांवें निरनिराळीं असून प्रत्येक दिवशीं ठरीव धार्मिक विधि उरकण्यांत येतो. पहिला दिवस

## धनत्रयोदशी

या नांवानें ओळखला जातो. याला धनतेरस असें प्राकृत लोक म्हणतात. या दिवसाच्या उत्सवासंबंधानें पुराणांतरीं एक विलक्षण कथा सांपडतेः–प्राणिमात्राच्या जीविताची मुदत संपतांच त्यांचे प्राण हरण करणाऱ्या यमधर्मानें एकदां आपल्या दूतांस विचारिलें कीं, यमपाश घालून प्राण हरण करण्याचें कार्य करीत असतां तुम्हांला कोणाची दया आली होती काय ? दूत म्हणालेः–एकदां हंस नांवाचा राजा अरण्यांत मृगयेस गेल्यावेळीं आपल्या राजधानीपासून फार लांब गेला. तेथून तो जवळ.असलेल्या हैम राजाच्या वाड्यांत विश्रांतीसाठीं आला. त्यानें त्याचा उत्तम परामर्ष घेऊन त्यास संतुष्ट केलें. या वेळीं हैम राजाला पुत्र झाल्यामुळें तो मोठ्या आनंदांत होता. या दिवशीं षष्ठीदेवीचा उत्सव होता. देवीनें स्त्रीरूप धारण करून राजाला असें कळविलें कीं या मुलाचें लग्न होतांच चवथ्या दिवशीं तो सर्पदंशानें मरण पावेल. राजास अत्यंत वाईट वाटून त्यानें अपमृत्यु टाळण्यासाठीं कांहीं दैविक उपाय योजले. हंसराजाला हें भविष्य ऐकून वाईट वाटलें. हैमराजाच्या मुलाचा अपमृत्यु चुकविण्याचा त्यानें पतकर घेतला व यमुनेच्या डोहाच्या मध्यमागीं एक सुंदर प्रासाद बांधून त्यांत त्या मुलास ठेविलें. यथाकालीं एका सुस्वरूप राजकन्येशीं त्याचा विवाह झाला. हा समारंभ थाटानें चालला असतां चवथ्या दिवशीं राजपुत्राला सर्पदंशानें मरण आलें. त्या वेळीं त्याचे प्राण हिरावून घेण्याचा प्रसंग आह्मां दूतांवर आला याबद्दल आह्मांस अत्यंत वाईट वाटलें. कारण अशा आनंदोत्सवाच्या वेळीं हा अनर्थ कोसळलेला पाहून आम्हांला दया आली. हा प्रसंग कोणावरही येऊं नये असें आपण कराल

तर फार उपकार होतील. दूतांचें हें भाषण ऐकून यमधर्म म्हणाले, 'दूतहो, आश्विन कृष्ण १३ पासून पांच दिवस प्रत्यहीं प्रदोषकालीं सर्व ठिकाणीं जो दीपोत्सव करील त्याला तुमच्या इच्छेप्रमाणें अपमृत्यु येणार नाहीं.' या कथेवरून या दिवसास धनत्रयोदशी कां म्हणतात याचा उलगडा होत नाहीं. फक्त दिपवाळीचा हा पहिला दिवस इतकें मात्र दिसून येतें.

## नरकचतुर्दशी.

दिपवाळीचा दुसरा दिवस नरकचतुर्दशी या नांवानें प्रसिद्ध आहे. भागवतांत अशी कथा आहे कीं, पूर्वकालीं भौमासूर किंवा नरकासूर नांवाचा एक बलाढ्य असुर प्राग्ज्योतिषपुर येथें राज्य करीत होता. त्यानें इंद्राचें छत्र, अदितीचीं कुंडलें व अमरपर्वतावरील मणिपर्व नांवाचें स्थान हरण केलें. देव व मानव यांस तो पीडा देऊं लागला. आपण अजिंक्य व्हावें म्हणून त्यानें आपल्या राजधानीच्या सभोंवतीं पर्वतांचे व शस्त्रांचे कोट रचले. हा दुष्ट दैत्य स्त्रियांस पीडा देऊं लागला. त्यानें जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना आपल्या तुरुंगांत कोंडून ठेविलें व त्यांच्याशीं विवाह करण्याचा बेत केला. अशी स्थिति प्राप्त होतांच जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला ही बातमी समजतांच त्यानें बरोबर सत्यभामेस घेऊन त्या असुराच्या दुर्गावर हल्ला केला. नरकासुरास ठार करून सर्व राजकन्यांची मुक्तता केली व नरकासुरानें इंद्रादिकांपासून हरण केलेलें धन ज्यांचें त्यांस परत दिलें. चतुर्दशीच्या दिवशीं उषःकालाच्या सुमारास नरकासुरास ठार करून व त्याच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाळास लावून घरीं येतांच नंदानें त्यास मंगल स्नान घातलें. स्त्रियांनीं दिवे ओंवाळून आनंद व्यक्त केला. सर्व नगरी आनंदोत्सवांत सामील झाली. या युद्धाचें स्मारक म्हणून नरकचतुर्दशीचा दिवस दिवाळींतील मुख्य दिवस होऊन राहिला आहे. गुजराथ व राजपुतान्यांतील कांहीं भागांत या दिवशीं हनुमंताची पूजा करण्याची चाल आहे.

## लक्ष्मीपूजन.

दिपवाळीच्या तिसऱ्या दिवशीं लक्ष्मीपूजन करण्यांत येतें. यासंबंधानें अशी कथा आहे कीं, पूर्वकालीं बलिराजा मोठा वैभवशाली होऊन त्यानें आपल्या संपत्तीच्या व पराक्रमाच्या योगानें देवादिकांसही कारागृहांत कोंडून ठेविलें.

प्रत्यक्ष लक्ष्मीसही बलीच्या बंदिशाळेंत दिवस कंठावे लागले. त्या वेळीं श्रीविष्णूनें वामनाचें रूप धारण करून त्रिपाद भूमीदान मागण्याच्या मिषानें सर्व विश्वावर आपलें प्रभुत्व प्रस्थापित केलें. सर्वांबरोबर लक्ष्मीचीही सुटका झाली. बली पाताळांत दडपला गेला. लक्ष्मीची याप्रमाणें असुरांच्या हातांतून मुक्तता झाल्याबद्दल सर्वांस आनंद झाला व तिचें वास्तव्य प्रत्येकाच्या घरांत कायमचें असावें एतदर्थ तिची भक्तिपूर्वक पूजा करण्याचा प्रघात या दिवसापासून प्रचारांत आला. अमावास्येस लक्ष्मीपूजन करण्यांत येतें.

## चालू रूढि.

दिपवाळीच्या सणांत अभ्यंगस्नान, दीपोत्सव, गोक्रीडन, भाऊबीज वगैरे विधि कमी अधिक प्रमाणानें सर्वत्र होत असतात. यष्टिकाकर्षण, यमतर्पण, गोवर्धनपूजा इत्यादि शास्त्रोक्त विधि कोणी करीत नाहीं. कर्नाटकांत बलिप्रतिपदेच्या दिवशीं निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळण्यांत लहान थोर गुंतलेले असतात. दक्षिण देशांत भाऊबीजेचा दिवस विशेष कोणी पाळीत नाहीं. लक्ष्मीपूजन देखील घरोघर कोणी करीत नसतो. फक्त व्यापारी लोक मात्र त्या दिवशीं आपल्या हिशेबाचा आढावा काढून लक्ष्मीसरस्वतीचें पूजन करितात. बंगाल्यांत दुर्गादेवीचा नवरात्रांतील उत्सव संपल्यावर लक्ष्मीपूजन करण्यांत येतें. मुंबई प्रसिद्ध व्यापारी पेठ असल्यामुळें येथील व्यापारी लक्ष्मीपूजनोत्सवास फार मान देतात. शहरांत फटाकड्यांचा कडकडाट सर्वत्र कानीं येत असतो. विद्युद्दीपप्रकाशनामुळें मुंबापुरीस या वेळीं सुंदर रूप प्राप्त होतें. धनिक व्यापारी वर्ग विशेषतः गुजराथी असून त्यांच्या नूतन विक्रम संवत्सराचा आरंभ कार्तिक शु. प्रतिपदेपासून होत असल्यामुळें नवीन हिशेबाच्या वह्यांचें ते पूजन करितात. रंगवल्लिकांनीं ( रांगोळीनें ) रहात्या घराच्या प्रवेशद्वाराजवळील अंगण सुशोभित करण्याची चाल महाराष्ट्राच्या कांहीं भागांत आहे. द्यूत खेळणें यासही धार्मिक कृत्य समजून या दिवसांत कित्येक लोक लक्ष्मीस प्रसन्न करून घेण्याची खटपट करीत असतां मागील सबंध सालांत मिळविलेलें धन गमावतात. महाराष्ट्राच्या कांहीं भागांत दिवाळींत चतुर्थ वर्णांतील तरुण स्त्रिया गाणीं गात सर्व गल्ल्यांतून फिरत असतात. या वेळीं त्यांस मेवा मिठाई देण्याची चाल आहे. स्त्रीपुरुषांसाठीं दिपवाळींत नूतन वस्त्रें प्रत्येक घरांत आणतात. हा सण पुरुषांपेक्षां स्त्रियांस व मुलांस विशेष आनंदाचा वाटतो. उत्तर हिंदु-

स्थानांत दिपवाळीचा सण महराष्ट्रांतील पद्धतीनें विस्तृत प्रमाणावर साजरा केला जात नाहीं. दक्षिणहिंदुस्थानांत प्रातःकालीं स्नानविधि आटोपल्यावर सुंठीचें चूर्ण असलेलें औषध घेण्याचा परिपाठ आहे. कोंकणांत व महाराष्ट्रांत घरांतील लहानमोठ्यांस दिवे ओंवाळल्यावर पुढ्यांत ठेवलेलें कारिट फोडून तें चाटण्याचा प्रघात आहे. मद्रासेस खालच्या वर्णांतील लोक दीपोत्सव वगैरे करीत असतात. तामीळ व तेलगू प्रांतांत दिपवाळीच्या दिवशीं अभ्यंगस्नान करून घराबाहेर पडल्यावर एकमेकांस पुढीलप्रमाणें प्रश्न विचारतात. 'काय महाराज, पवित्र गंगेचें स्नान घडलें का ?' तेव्हां 'होय, महाराज, तुमच्या आशीर्वादानें घडलें' असें दुसरा उत्तर देतो. या देशांत दिपवाळीस नूतन वस्त्रें घेत नसून कृत्तिका उत्सवाच्या वेळीं तीं घेतात. दीपावलिमहोत्सवाची उत्पत्ति कशी व केव्हां झाली हें नीटपणें समजण्यास तत्संबधीं खरा

## शास्त्रोक्त विधि

काय आहे हें किंचित् विस्तारानें सांगणें आवश्यक आहे. निरनिराळ्या धर्मशास्त्र-कारांनीं केलेलें या उत्सवाचें विवेचन व सूत्रकारांचीं मतें या सर्वांचा विचार करून धर्मसिंधुकारानें आश्विन पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंतचा शास्त्रोक्त विधि आपल्या ग्रंथांत नमूद केला आहे तो असा–आश्विन पौर्णिमेच्या दिवशीं **कोजागरी** व्रत करून लक्ष्मी व इंद्र यांची पूजा करावी. नारळांतील उदक प्राशन करून द्यूत आरंभावें. त्या दिवशीं श्रीलक्ष्मी मध्यरात्रीं गृहाचे ठिकाणीं येऊन जे द्यूत खेळून जागे राहतात त्यांस सधन करीन असें सांगते. नारळ, पोहे इत्यादि पदार्थ देव पितर यांना देऊन बांधवांसह भक्षण करावे. याच दिवशीं **आश्वयुजीकर्म** करावें. आश्विन पौर्णिमेस किंवा अमावास्येस **आग्रयण** करावें. निरनिराळ्या नक्षत्रांच्या ठिकाणीं व्रीहि ( वऱ्या ), श्यामक ( सांवे ) व यव याचें आग्रयण शरदृतूंत केलें पाहिजे. आग्रयण केल्याशिवाय कोणतेंही नवें उत्पन्न झालेलें धान्य भक्षण करूं नये. ज्यांना निराळें आग्रयण करतां येत नसेल त्यांनीं वर सांगितलेल्या तिन्ही धान्यापासून पुरोडाश करून दर्शपौर्णिमेस स्थालीपाक करावे. याच पौर्णिमेस ज्येष्ठ पुत्र किंवा कन्या यांस नीरांजन दाखवावें. आश्विन कृष्ण द्वादशी **गोवत्स द्वादशी** या नावानें प्रसिद्ध आहे. या दिवशीं सवत्स गाईचें पूजन करून तिला उडीद वगैरे धान्यांचे वडे भक्षणार्थ द्यावे. देव, ब्राह्मण, गाई, घोडे, ज्येष्ठ, श्रेष्ठ, कनिष्ठ या सर्वांना माता आदिकरून सर्व स्त्रियांनीं दिवे

ओंवाळावे. अपमृत्यूचा नाश व्हावा एतदर्थ त्रयोदशीच्या दिवशीं यमाप्रीत्यर्थ प्रदोषकालीं घराबाहेर दिवा लावावा. चंद्रोदयव्यापिनी अशा आश्विन चतुर्दशीच्या दिवशीं नरकाला भिणारांनीं तिलतैलाचा अभ्यंग करून स्नान करावें. रात्रीच्या शेवटच्या प्रहरापासून चंद्रोदयानंतरचा काल श्रेष्ठ जाणावा. नांगरानें उकरून काढलेलें मातीचें ढेंकूळ व आघाडा, दुधी भोपळा व टाकळा यांच्या फांद्या स्नानाच्या वेळीं तीनदां आपल्या अंगावरून फिरवाव्या. त्यानंतर गंधाचा टिळा लावून कार्तिक स्नान करावें, व स्नानोत्तर यमतर्पण करावें. प्रदोषकालीं मठ, तट, कोट, बाग, मार्ग, गोठा, अश्वशाला, गजशाला या ठिकाणीं सुशोभित दिवे लावावे. याप्रमाणें तीन दिवस दिवे लावावे तूल राशीला सूर्य गेल्यानंतर चतुर्दशी व अमावास्या या दोन दिवशीं प्रदोषकालीं पुरुषांनीं हातांत कोलीत किंवा चुडी घेऊन ( उल्कादर्शन) पितरांस मार्ग दाखवावा. यानंतर अमावास्येच्या दिवशीं प्रातःकालीं तैलाभ्यंग स्नान करून देवपूजा आटोपल्यावर अपराण्हकालीं **पार्वण** श्राद्ध करावें. प्रदोषकालीं दिवे लावणें, उल्कादर्शन व लक्ष्मीपूजन हीं कृत्यें केल्यावर भोजन करावें. बाल, वृद्ध व रोगी यांखेरीज इतरांनीं दिवसा भोजन करूं नये. आश्विनवद्य चतुर्दशी, अमावास्या व कार्तिक शुक्ल प्रतिपदा या तीन दिवसांना **दीपावलि** असें नांव आहे. अमावास्येच्या दिवशीं मध्यरात्रीं नगरांतील स्त्रियांनीं आपआपल्या गृहासमोरच्या अंगणांतून अलक्ष्मीला घालवावी *

अमावास्येच्या दिवशीं गुजराथेंत महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती यांचें पूजन होतें. दौत, रुपया व चोपडी हीं या देवतांचीं द्योतक मानिलीं जातात. या पूजनास चोपडापूजन असेंही म्हणतात. धनत्रयोदशीस धनाचें पूजन केलें जातें

## दीपावलीचें प्राचीनत्व.

दीपावलीचा सण केव्हां प्रचारांत आला हें सांगतां येणें जरी शक्य नाहीं. तथापि त्याला प्रस्तुतचें स्वरूप पौराणिक कालीं प्राप्त झालें हें निर्विवाद होय. कारण पुराणांतरीं सांगितलेल्या कित्येक कथाभागांशीं याचा संबंध जोडलेला

---

*घरांतील केरकचरा अरुणोदयापूर्वी वेशीच्या दरवाजासमोरून ओरडत जाणाऱ्या महार जातीच्या मनुष्याच्या अंगावर फेंकण्याची चाल कांहीं ठिकाणीं आहे. हा विधि चैत्रारंभ मानणारे होळीच्या दुसऱ्या दिवशीं पहांटेस करीत असतात. ही चाल कर्नाटकांत दृष्टीस पडते.

दिसतो. अकराव्या शतकांत प्रसिद्ध आल्बुरेनी ऊर्फ अबुरेहन हा खीव येथील विद्वान गृहस्थ हिंदुस्थानांत आला. त्या वेळच्या हिंदु लोकांच्या आचारविचारांचें तसेंच राजकीय व सामाजिक स्थितीचें त्यानें जें ऐतिहासिक विवेचन केलें आहे, त्यावरून पाहतां दीपावलीचा सण त्या कालीं प्रस्तुतप्रमाणेंच साजरा केला जात असे असें दिसतें. अर्थात् सुमारें ९०० वर्षांमागें सध्यांप्रमाणेंच दिपवाळीचा सण लोक साजरा करीत असत.

पौराणिक कालीं शिव व विष्णू यांचें महत्व वाढल्यानंतर त्यांच्या उपासकांनीं आपणास प्रिय असलेल्या दैवतासंबंधानें अनेक कथा रचून पूर्वकालापासून चालत आलेल्या कित्येक विधींचा व सणांचा संबंध त्या दैवतांशीं जोडला. विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण त्याच्या प्रीत्यर्थ दिपवाळीचा सण साजरा करावा असें ठरविण्यांत आलें. कृष्णासंबंधानें पूज्यत्व भाव वाढत गेला तसतसा कृष्णचरित्रांत अनेक अद्भुत गोष्टींचा समावेश करण्यांत आला. आपण या पौराणिक कालाच्या मागें जाऊन वेद व उपनिषत् कालानंतरच्या सूत्रकालांतील ( २००० वर्षांपूर्वी ) सामाजिक स्थितीसंबंधानें उपलब्ध असलेल्या माहितीचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें असतां आपणास असें दिसतें कीं, त्या कालीं प्रचलित असलेल्या अनेक गृह्य संस्कारांचें रूपांतर होऊन प्रस्तुतचे कित्येक सण प्रचारांत आले आहेत. त्या कालीं प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुष वर्षांतून सात पाकयज्ञ करीत असे. हा यज्ञ करण्याचा विधि सुलभ असल्यामुळें तो उरकण्यास विशेष खर्च किंवा त्रास नसे. दानधर्म करणें, अग्नि प्रदीप्त करून पाकाहुति देणें किंवा सत्पात्र अशा विद्वान् ब्राह्मणांस अन्नवस्त्र देणें यांची गणना पाकयज्ञांत होई. १ अष्टक, २ पार्वण, ३ श्राद्ध, ४ श्रावणी, ५ आग्रयण, ६ चैत्री व ७ आश्वयुजी हे पाकयज्ञ दरसाल निरनिराळ्या महिन्यांत करण्यांत येत असत. यांपैकीं

## पार्वण, आश्वयुजी व आग्रयण

या तीन पाकयज्ञांचें एकीकरण व रूपांतर होऊन प्रस्तुतचा दीपावलिमहोत्सव अस्तित्वांत आला असला पाहिजे. प्राचीन कालापासून आर्यांच्या अंतःकरणांत पितरांबद्दल आदर व प्रेम असल्यामुळें प्रत्येक पौर्णिमेस व अमावास्येस त्यांच्या प्रीत्यर्थ पार्वण किंवा पिंडपितृयज्ञ नांवाचा पाकयज्ञ करण्यांत येत असे. त्यांतही नवधान्य घरांत आणतांना करण्याचा यज्ञ विशेष महत्वाचा होता. प्रस्तुत दिपवाळीच्या उपपत्तीसंबंधानें दिलेली यमाज्ञेबद्दलची गोष्ट व या उत्सवानंतर लवक-

रच करण्यांत येणारें भाऊबीज नांवाचें यमराजाचें स्मारक जेवण व इतर शास्त्रोक्त कृत्यांचा संबंध पितरांचा रक्षक जो यम त्याच्याकडे आहे. पितरांच्या उद्धारासाठीं दीपोत्सव, अधिकारानुरूप सव्यापसव्यानें यमतर्पण करण्याबद्दल आज्ञा वगैरे पाहतां आश्विन वद्य ३० स पार्वण नांवाचा पाकयज्ञ–आणि तोही विशेष उत्साहपूर्वक–करण्याची चाल प्राचीनकाळीं रूढ झाली होती हें सिद्ध होतें.

पौराणिक काळीं यमासंबंधाची जुनी कल्पना जाऊन त्याला निराळें व भयंकर रूप प्राप्त झालें. वेदकाळीं तो नरकाचा धनी नसून स्वर्गांतील एक मुख्य दैवत असें मानण्यांत येत असे. सत्कर्में करणारांस सद्गति देणारा व सज्जनांचा साह्यकर्ता म्हणून त्याचीं स्तुतिस्तोत्रें ऋग्वेदांत गाइलेलीं आढळतात. ( ऋक् १०-१६—१ ) पुराणांत यमाला सूर्यपुत्र असें म्हटलें आहे. सूर्याच्या गतीबरोबर मनुष्यमात्राचें आयुष्य क्षीण होत असतें. अर्थात् मृत्यूचे दिवस समीप आणणारें दैवत सूर्यपुत्र असें मानलें गेलें यांत नवल नाहीं. वैवस्वत ( आकाश ) हा पिता व शरण्यु ( अरुणोदय ) ही माता, यांच्या पोटीं यमाचा जन्म झाला असें ऋग्वेद सांगत आहे. यमाची भगिनी यमी हिचाही त्यांत उल्लेख असून यम व यमी यांच्यांत आत्यंतिक प्रेम वसत होतें असें दर्शविलें आहे. त्यांच्या संबंधानें केलेलें विवेचन वाचल्यास दिवस व रात्र यांसच यम व यमी अशीं अलंकारिक नांवें देण्यांत आलीं होतीं असें दिसतें. यमद्वितीया हा बंधुभगिनीप्रेमाचा स्मारक सण ठरविण्यांत पौराणिक ग्रंथकारांनीं वेदकालीन यम व यमी संबंधाच्याच कल्पनांस मूर्त स्वरूप दिलें असल्याचें स्पष्ट होत आहे. दिपवाळींत समीकरण पावलेला

## दुसरा पाकयज्ञविधि

म्हटला म्हणजे आश्वयुजी हा होय. अश्वयुग किंवा आश्विन महिन्याच्या पौर्णिमेस हा करण्यांत येत असे. ऋग्वेदाच्या ६ व्या मंडळांत जो उल्लेख सांपडतो त्यावरून असें दिसतें कीं, अश्वयुगमासाच्या पौर्णिमेस इंद्रास दूध व तांदळांपासून तयार केलेली क्षीर अर्पण करण्यांत येत असे. बकरीचें तूप ( आज्य ) यज्ञांत ओतून आश्विनद्वयाला, अश्वयुगद्वयाला, अश्वयुगाच्या पूर्णचंद्राला, शरद् ऋतूला व प्रजापतीला आहुति देण्यांत येत असत. गायींप्रीत्यर्थ दहीं व लोणी यांच्या आहुति दिल्यावर गाई व वत्स यांना त्या दिवशीं रात्रीं एकत्र ठेवण्यांत येत असे. या पुरातन विधीची सांख्यायनानें जी माहिती दिली आहे तिजवरून तो कृषिविष-

यक आहे हें स्पष्ट दिसतें. याच दिवशीं कृषिदेवता सीता हिच्या प्रीत्यर्थ यज्ञ करण्यांत येऊन पुढील शब्दांनीं तिची प्रार्थना करण्यांत येत असे.

"जिच्यामध्यें देवप्रणीत व ऐहिक वैभव सदासर्वदा वास करितें त्या इंद्रपत्नी सीतेची मी प्रार्थना करितों. मीं हातीं घेतलेल्या सर्व कार्यांत ती मदत करो. जिच्यापाशीं अनेक अश्व व अनेक गाई आहेत, जी आनंदाचा निधि, जी सर्व प्राणिमात्राचें रक्षण करिते व जिचीं धान्याचीं अनेक क्षेत्रें आहेत तिची मी यज्ञ-समयीं प्रार्थना करितों. ती अचल देवता मला कधींही न विसंबो." ( २-१७-९ ). अंतर इतकेंच कीं, कृषिदेवता सीता हिच्या जागीं पौराणिक कालीं विष्णुपत्नी लक्ष्मीची स्थापना करण्यांत आली. धनधान्याची देवता म्हणून लक्ष्मीचें महत्व फार वाढलें. पुरातन काळच्या संस्कृत वाङमयांत लक्ष्मीचें नांव आढळत नाहीं. ज्याप्रमाणें रुद्राच्या भयंकर स्वरूपावरून रुद्राणी ही भयानक शक्तीदेवी मानिली गेली, त्याच प्रमाणें विष्णूच्या अंगीं जे सात्विक व सुखदायक गुण असल्याचें पुराणांतरीं सांगितलें आहे त्यांस साजेल अशीच दिव्य वधू लक्ष्मी आहे असें ठरवून तिच्यांत उत्तमोत्तम गुणांची स्थापना पुराणकारांनीं केली. सीतेची जागा लक्ष्मीनें घेतल्यानंतर आश्विनमासांतील पौर्णिमेस लक्ष्मी-पूजनोत्सव करण्यांत येऊं लागला. कोजागरी पौर्णिमा या नांवानें हा उत्सव कालीच्या व इतर देवतांच्या देवालयांतून करण्यांत येतो. महाराष्ट्रदेशांत घरोघर चंद्राची पूजा होऊन तापविलेलें दूध ब्राह्मणांस देण्यांत येतें. दिपवाळींतील लक्ष्मीपूजन, कित्येक ठिकाणीं रूढ असलेली फाशांनीं खेळण्याची पद्धति, कोजागरी पौर्णिमेपासून पितरांप्रीत्यर्थ आकाशदिवे लावण्याची चाल, त्या दिवशीं नवीन धान्याची क्षीर करण्याची रूढि, नवीन भातांचे पोहे खाण्याची चाल, याच वेळीं नवीन धान्यापासून स्थालीपाक करण्याचा बंगाल्याकडील परिपाठ, या उत्सवास जोडून गोपूजा व गोक्रीडनविधि करण्याची पद्धति वगैरे गोष्टी लक्षांत घेतां आश्वयुजी हाच गृह्ययज्ञ दीपावलीस जोडण्यांत आला असल्याचें स्पष्ट होतें.

पौराणिक कालीं वेदकालीन सीता, इंद्र वगैरे देवता मागें पडल्या, कृष्णाचें महत्व वाढलें; विष्णूचा अवतार जो कृष्ण तो इंद्राहूनही श्रेष्ठ आहे हें दाखविण्या-साठीं त्याच्या हातून इंद्राचा पराजय झाला व त्यानें करांगुलीवर गोवर्धनपर्वत उचलून गाई व गोप यांचें रक्षण केलें असें सांगण्यांत आलें. प्रत्येक अवताराचें इतिकर्तव्य म्हणजे असुरांचा संहार व गोब्राह्मणांचा प्रतिपाल. या विधानास

जुळेल अशा रीतीनें नरकासुराची व इतर दैत्यांच्या कथा रचल्या गेल्या. पुराणकारांनीं यमरायास स्वर्गलोकावरून नरकलोकीं आणिलें. त्यालाच पुढें नरकासुर बनविण्यांत येऊन त्याचें वसतिस्थान त्याचा पिता जो सूर्य त्याच्याच दिशेस ( पूर्वेस ) प्राग्ज्योतिषपूर हें आहे अशी ही कथा रचिली गेली. आश्विनमासांत आपल्या देशाचें नैसर्गिक सौंदर्य व सांपत्तिक स्थिति चांगली होत असल्यामुळें हा कृषिविषयक सण लोकांस आनंददायक व ग्राह्य वाटला. घरांत नवीन धान्य आल्यावर त्याची व तें देण्यास कारणीभूत झालेल्या गोकुलाची पूजा करणें हें प्राचीन सात्विक आर्यांस इष्ट वाटलें. गाई व गुराखी यांच्यासंबंधानें ऋग्वेदांत सांपडणारीं सूक्तें पाहिलीं असतां त्या कालीं गोधन किती मौल्यवान् मानीत असत हें दिसतें. दीपोत्सव, मंगलस्नान वगैरे धार्मिक मानलीं जाणारीं कृत्यें सर्वसंमत होऊन तीं प्रचारांत आलीं हेंहि योग्य आहे. दीपवालींत आग्रयण नांवाच्या तिसऱ्या विधीचा समावेश करण्यांत आला. अग्र हायन किंवा मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेस

## आग्रयण ( नवान्नेष्टि )

केला जात असे. मार्गशीर्ष मासाच्या पौर्णिमेची रात्र संवत्सराची पत्नी असें समजून आहुति देण्यांत येत असत. त्या वेळीं युगाच्या पंचवार्षिक मुदतींतील पांच संवत्सरांस संवत्सर, परिवत्सर, इदवत्सर, इद्वत्सर व वत्सर या नांवानें संबोधून आहुतो अर्पण करण्यांत येत असत. अर्थात् संवत्सरसमाप्तीचा हा उत्सव होता असें दिसतें. परंतु यासंबंधानें नक्की सांगतां येत नाहीं; कारण गृह्यविधींत चैत्रमहिन्यांतील चैत्री हा वर्षांतील शेवटचा विधि असें म्हटलें आहे. यावरून चैत्रमहिना शेवटचा ठरतो. मार्गशीर्ष महिन्यांत पूर्वकालीं अनेक धर्मविधि करण्यांत येत असत. विशेषतः ऋतुदेवतेस आहुति देण्यांत येत असे. ऋतूंचें वर्णन पाहतां मधु किंवा वसंत हाच प्रथम ऋतु मानला आहे. अर्थात् चैत्र वैशाख हेच महिने वर्षारंभींचे गणले पाहिजेत; परंतु ' राजा कालस्य कारणं' या उक्तीप्रमाणें नवीन वर्षाचा पहिला दिवस कालचक्राप्रमाणें बदलत जाऊन कधीं चैत्र तर कधीं वैशाख, कधीं मार्गशीर्ष तर कधीं कार्तिक या मासांस संवत्सराचा प्रथमचा महिना होण्याचा मान मिळाला असावा. मार्गशीर्षाच्या जवळचा कार्तिक हा वत्सराचा प्रथमचा महिना असें विक्रमादित्याच्या कारकीर्दींत ठरलें.

कार्तिकमास हा या संवत्सराचा प्रथमचा महिना असें राजाज्ञेनें ठरविण्यांत येऊन तो नूतन वर्षाचा प्रारंभींचा दिवस म्हणून आनंदांत घालविण्याचा प्रघात

पडल्यापासून दीपावलीस महोत्सवाचें स्वरूप प्राप्त झालें. ( आश्विनमासाची देवता इंद्र व कार्तिक मासाची देवता धात्री यांचें पूजन आपले पूर्वज त्या त्या मासांत करीत असत. अजून कार्तिकांत धात्रीपूजन नांवाखालीं वनभोजन किंवा आंवळीभोजन होत असतें. )

## हेतु व बोध.

हिंदूंचे अनेक सण आहेत. त्यांपैकीं दिपवाळीइतका पवित्र व आनंदकारक दुसरा कोणताही सण नाहीं. या सणांत स्त्रिया, पुरुष व बालकें या सर्वांस आनंद होत असतो. परस्परांकडे जाण्यायेण्याची व उपाहाराची रूढि असल्याच्या योगानें समाजांत प्रेमभाव वृद्धिंगत होऊन सलोखा वाढतो. बंधुभगिनींतील प्रेम आजन्म रहावें यासाठीं 'भाऊबीज,' करण्याचा जो विधि प्रचारांत आला आहे, तोही आर्यांच्या सात्विक वृत्तीस साजेसाच आहे. गोपूजादिकांच्या योगानें पूर्वकालीन आर्यवसाहतवाल्यांच्या अंतःकरणांत गोपालनाबद्दल असलेली आस्था दिसून येते. कृष्णास गोपाळ या नात्यानें जो मान देण्यांत येतो तो याचसाठीं आहे. अलीकडे स्थापन झालेल्या गोरक्षण संस्था गुरांची स्थिति सुधारण्यासंबंधानें प्रयत्न करीत आहेत. धुळें येथील प्राणिरक्षक संस्था, मुंबईंतील जीवदयाज्ञान-प्रसारक मंडळी, त्याचप्रमाणें इतर अनेक ठिकाणीं मुक्या जनावरांचें रक्षण करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या संस्थांस धनिक लोकांनीं हातभार लावून आपल्या अंतःकरणांत त्यांच्याबद्दल प्रेम वसत आहे असें सिद्ध केलें आहे, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. यांच्या विनंतीचा विचार करून कित्येक संस्थानिकांनीं धार्मिक उत्सवांत होणारे पशुवध बंद केले आहेत ही आनंदाची गोष्ट होय. दीपोत्सवाच्या योगानें रात्र व दिवस यांतील अंतर नाहींसें करणें हेंच दिपवाळीचें मुख्य अंग आहे. यम व यमी यांची भेट म्हणजे रात्रीच्या वेळच्या अंधःकारास नाहींसें करून तिला दिवसाच्या जोडीस आणणें आहे. अज्ञानाचें आवरण हाच अंधःकार आहे. तो घालवून आपणास दिव्यदृष्टि प्राप्त होईल असें करणें ही दीपावलि साजरी करण्याची खरी तऱ्हा होय.

——:०:——

## कार्तिक महिना.

कार्तिक महिना इंग्रजी नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास येतो. या महिन्यांत चातुर्मासांतल्याप्रमाणेंच अनेक पदार्थ वर्ज्य करावे, कार्तिकस्नान करावें, कित्येक

दानें द्यावीं, पुराण श्रवण करावें, आकाशदिवे लावावे वगैरे विधि सांगितले आहेत. या महिन्यांत प्रतिपदेच्या दिवशीं बलिदैत्याची पूजा, दीपोत्सव, गोक्रीडा, गोवर्धनपूजा, मार्गपाली बंधन, तृणाची दोरी ओढणें, नवीं वस्त्रें धारण करणें इत्यादिक उत्सव, द्यूत खेळणें, स्त्रियांनीं दिवे ओंवाळणें वगैरे कृत्यें करावीं.

कार्तिक शु. १ स गोवर्धन प्रतिपदा असें म्हणतात. या दिवशीं कृष्णानें गोवर्धन पर्वत आपल्या अंगुलीवर उचलून धरून गोपालांस इंद्रकोपानें पाऊस पडल्या वेळीं आश्रय दिला अशी कथा आहे. या दिवशीं वल्लभी पंथीय लोक अन्नाचा मोठा ढीग (अन्नकूट) करून हा उत्सव साजरा करतात. बंगाल्यांत शु. ५मीच्या दिवशीं भाविक लोक उपोषित राहून स्कंद किंवा कार्तिकेय याची रात्रीच्या वेळीं प्रहराप्रहरानें पूजा करतात. त्याचप्रमाणें अमावास्येसही स्कंदपूजा करतात. बिहारांत शु. ६ च्या दिवशीं सूर्यपूजा करतात. शु॥ ९ मी हा सत्ययुगाचा आरंभ-दिवस आहे असें मानतात. गंडकी व गंगानदीच्या संगमाशीं असलेल्या सोनपूर येथें प्राचीन हरिहरनाथ देवालयांत कार्तिक पौर्णिमेच्या दिवशीं मोठा उत्सव होतो. याला हरिहरयात्रा असें म्हणतात. ही पौर्णिमा व्यास पौर्णिमा या नांवानें प्रसिद्ध असून गुरु-रूपी व्यासाची पूजा केली जाते.

या महिन्यांतील महत्वाचे उत्सव म्हटले म्हणजे बलिप्रतिपदा, यमद्वितीया, तुलसीविवाह, धात्रीपूजन व त्रिपुरी पौर्णिमा हे होत. कार्तिक शु० ११ च्या दिवशीं विष्णूची निद्रा संपते म्हणून त्या तिथीला बोधिनी एकादशी म्हणतात. या दिवशीं पंढरपूर क्षेत्रीं मोठी जत्रा भरते. कार्तिक शु. १२ ला चातुर्मास व्रताची समाप्ती होते.

---

## बलिप्रतिपदा.

प्रौढप्रतापी दैत्याधिपति बलीस सुरश्रेष्ठ वामनानें बटुवेष धारण करून कसें पादाक्रांत केलें, याचें ऐतिहासिक विवेचन मागें वामनद्वादशी या सदराखालीं दिलें आहे. वामनानें तिसरें पाऊल बलीच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळांत लोटण्यापूर्वी बलीच्या विनंतीवरून पुढीलप्रमाणें वर दिला. तुझ्या भक्तीस वश होऊन मी असें वरदान देतों कीं, मी जरी तुला पादाक्रांत केलें, तरी तुझी आठवण

सर्वत्र चिरकाल रहावी यासाठीं कार्तिक शु० प्रतिपदेच्या दिवशीं तुझ्या नांवानें लोक आनंदोत्सव करतील. तुझ्या विनंतीस मान देऊन मी अशी आज्ञा करितों कीं या दिवशीं कोणी सुरापान किंवा इतर अनाचार करूं नये. कार्तिक शु० प्रतिपदा ही बलिप्रतिपदा असें मानून तिची पूजाअर्चा प्रत्येक गृहस्थाश्रमी कौटुंबिकानें करावी. या प्रकारें बलीस आशीर्वाद दिल्यावर दिवाळीस जोडून बलिप्रतिपदा हा सण साजरा करण्याचा प्रघात या देशांत पडला. या उत्सवासंबंधानें

## शास्त्रोक्त विधि व रूढि

अशी आहे कीं माजघरांत बलीचें, त्याची पत्नी विंध्यावली हिच्यासह चित्र काढून पूजा करावी. निशाकाल प्राप्त होतांच दीपाराधना करून सर्व नगर शृंगारावें. रात्रौ राजानें नगरांतून लवाजम्यासह फिरून नागरिकांचें वैभव पाहून संतुष्ट व्हावें. या दिवशीं यष्टिकाकर्षण ( tug of war ) नांवाचा एक विधि करावा. एका लांब काठीस दर्भवेष्टन करून ती देवद्वारीं किंवा चवाठ्यावर ठेवावी. तिच्या एका टोंकास हीन जातीच्या व दुसऱ्या टोंकास उच्चवर्णीय लोकांनीं धरावें. प्रत्येक पक्षापासून मागें बारा हाताच्या अंतरावर एक रेषा असावी. पुढें उभय पक्षांनीं यष्टिका ( आपआपल्या बाजूस ) खेंचावयाची असून जो दुसऱ्यास बारा हात खेंचील त्या पक्षास जयप्राप्ति झाली असें मानावयाचें. हें जयचिन्ह राजानें मुद्दाम पहावें असें आहे.

महाराष्ट्राच्या कांहीं भागांत या दिवशीं शेतकरी व इतर लोक शेणाच्या बाहुल्या जमिनीवर तयार करून ठेवितात. त्यांस पंचपांडव व कुंति असें म्हणतात. त्यांची पूजा करून त्यांना नवीन तांदळांच्या अन्नाचा नैवेद्य दाखवितात. नंतर घरावर त्या बाहुल्या सुकवून पौर्णिमेच्या दिवशीं पेटवितात, व त्यांवर नवीन तांदळांची खीर शिजवितात. मुंबईंत या दिवशीं कांहीं पांढरपेशा लोकांत दारांत शेणाचीं बाहुलीं करून त्यांवर दिवे ठेवण्याची, पंचपांडव पुजण्याची वगैरे चाल आहे; परंतु हे पांडव दसऱ्याच्या दिवशीं करितात.

## गोपूजा.

कृष्णाच्या सल्ल्यानें गोपांनीं इंद्राचा उत्सव न करितां गोवर्धनाची पूजा केली. त्याप्रीत्यर्थ सध्यां गायींची पूजा करण्याचा परिपाठ आहे. गुरांच्या शिंगांस रंग व बेगड लावून अंगावर लाल रंगाचे ठिपके देतात. त्यांची पूजा केल्यावर त्यांना

गळ्यास एक पोळी व नारळाची कवड बांधून दवडतात. गवळ्यांस या दिवशीं पैसे देण्याचा कर्नाटकांत परिपाठ आहे. या दिवशीं गवळी व गुराखी गाई म्हशी वगैरे जनावरांस दिवे ओंवाळतात व गुरांचे मालक त्यांस ओंवाळणी घालतात. ही रूढि सर्व महाराष्ट्रांत आहे. गोधनास हिंदुधर्मांत फार मौल्यवान गणिलें आहे. प्रत्येक प्रापंचिकाच्या घरीं सवत्स धेनु असणें अत्यंत आवश्यक आहे, असें समजतात. जिच्या दूध दुभत्यावर मुलेंबाळें पुष्ट होतात त्या गाईबद्दल अत्यंत प्रेम दाखविलें जातें यांत आश्चर्य नाहीं. वेदकालीं गोधनाच्या प्राप्तीसाठीं फार फार धडपड चाललेली असे. हजारों गाईंचे कळप शत्रूपासून जिंकून आणिल्याचीं उदाहरणें वेदांत सांपडतात. गोदान हें अत्यंत श्रेष्ठ दान मानिलें जात असे.

**सहस्रं मे ददतो अष्टकर्ण्यः॥ ऋ. १०।६२।७**

ज्या गाईंच्या कानांवर आठांची खूण डागलेली आहे अशा हजार गाई दान दिल्याबद्दलचा हा उल्लेख आहे. ( ज्या वेळीं ऋग्वेदाचें १० वें मंडळ तयार झालें त्या वेळीं तरी लेखनकला अस्तित्वांत आली असावी. तसें नसतें तर आपला गाईंचा कळप ओळखण्यासाठीं कानावर आठांची खूण केल्याचा निर्देश वेदऋचेंत आला नसता. ) वेदकालीं त्याचप्रमाणें उपनिषत्कालीं व पुढें पुराणकालीं देखील गोधनाचें महत्व फार वर्णिलेलें आढळतें. आजमितीस देखील गायीस गोमाता असें म्हणत असून तिला अत्यंत पवित्र मानतात. गाईच्या ठिकाणीं सर्व देवता अधिष्ठित आहेत असें प्रत्येक हिंदु समजतो. म्हणूनच गोपूजेचा प्रकार या देशांत चालू झाला. प्रत्यहीं गोपूजा करणारे किती तरी लोक या देशांत आहेत. गोपूजेमुळें संतति, संपत्ति, आरोग्य व सौभाग्य यांची प्राप्ति होते असें आमचा स्त्रीसमाज मानीत असतो. या देशांत निरनिराळ्या ठिकाणीं वर्षांतून एकदां तरी गोपूजा केली जाते. महाराष्ट्रांत आश्वीन व॥ १२ स गोवत्स द्वादशी असें नांव आहे. गुजराथेंत श्रावण व. ४ स गोवत्स द्वादशी म्हणतात ! कार्तिक शु॥ ८ मीस महाराष्ट्रांत गोपाष्टमी पाळतात. श्रावण कृ. ४ स बंगालांत बहुला असें नांव असून त्या दिवशीं गोपूजा केली जाते, त्याचप्रमाणें पूर्व बंगाल्यांत ज्येष्ठ शु. २ स गोपूजा करतात. दक्षिण हिंदुस्थानांत मकरसंक्रमणाच्या दिवशीं पोंगल म्हणून सण पाळतात तोही गायींप्रीत्यर्थ आहे. कोंकणांत आषाढ शु॥ १३ स किंवा कार्तिक शु. १ स गोपूजा केली जाते. तेथें या सणास बेंदूर असें नांव आहे. दक्षिण महाराष्ट्रांत श्रावण किंवा भाद्रपद पौर्णिमेस पोळा नांवाचा गोपूजनोत्सव होतो याचें वर्णन मागें आलें आहे. याप्रमाणें गोपूजेचें महत्व या देशांत

विशेष मानिलें जातें. गोपूजेवरून चित्रित गोपाद पूजा, गोदान वगैरे गोष्टींचा आमच्या धार्मिक कृत्यांत समावेश झालेला आहे.

## हेतु व बोध.

हा सण अत्यंत उदात्त स्वरूपाचा असून प्राचीन काळच्या राजनीतीचें शुद्ध व सात्विक स्वरूप ध्यानांत येण्यास कारणीभूत होतो. शत्रूंस पादाक्रांत केल्यावर त्यांच्यांतील उत्तम गुणांची किंमत लक्षांत आणून जेते त्यांस त्यांच्या योग्यते-नुसार वागवीत व प्रसंगविशेषीं विशिष्ट मानमरातब देण्यासहि ते मागेंपुढें पाहत नसत. महाभारतांत जागोजागीं राजनीति व राजकारण यांसंबंधानें जो ऊहापोह केला आहे, तो वाचतां या बाबींत प्राचीन आर्यवरांनीं किती खोल विचार केला होता, हें समजून येणार आहे. प्रजेनें केलेल्या उत्सवास सहानुभूतीची जोड देऊन तो दुणावेल असें करणें हा देखील राजेलोक आपला धर्म आहे असें त्या कालीं समजत असें दिसतें. अद्यापि संस्थानिक विशेष उत्सवाच्या प्रसंगीं आपल्या दर्शनाचा लाभ प्रजाजनांस देत असतात; ही प्राचीन पद्धतीची अवशिष्ट रूढि असावी. यष्टिकाकर्षणाचा विधि शारीरिक बल अजमावून पाहण्यासंबंधाचा असून उच्च व हीन वर्णांच्या लोकांची या बाबींत कितपत बरोबरी होते हें पाह-ण्याच्या उद्देशानें तो योजिलेला असावा. एकाद्या वर्णांत निकृष्टावस्था दिसून आल्यास राजाकडून ती घालविण्यासाठीं कांहीं उपाय योजले जात किंवा कसें हें समजत नाहीं तथापि राजाकडून आपलें अभिनंदन व्हावें एतदर्थ प्रत्येक वर्णांचे लोक आपलें शरीरसामर्थ्य वाढविण्याचा यत्न करीत, असा तर्क करण्यास जागा आहे. हल्लीं ब्राह्मण ब्राह्मणेतर हा प्रश्न राष्ट्राच्या हितावर घाव घालण्यास कारणीभूत होत आहे, अशा वेळीं ही उभय पक्षांस जवळ आणण्याची पद्धति प्रचलित करून जीवनार्थकलहांत भाग घेण्याचा हक्क पूर्वकालीं धर्मानेंच स्थापित केला आहे हें समजावून दिल्यास उभय पक्षांतील तेढ कमी होईल. सांप्रतकाळीं बलिप्रतिपदे-सारख्या उत्सवाच्या दिवशीं समाजांतील पुढाऱ्यांनीं निरनिराळ्या मर्दानी खेळांची योजना करून चढाओढींत यश संपादन करणारांस उत्तेजनार्थ सार्व-जनिक रीत्या पारितोषकें देण्याची व्यवस्था केल्यास उत्तम होईल. एकादा राष्ट्रीय खेळ ठरवून त्यांत लहानमोठ्यांनीं आपलें प्राविण्य दाखवावें; असें केल्यास बरेंच हित होण्यासारखें आहे. प्राचीन कालीं अत्यंत श्रेष्ठ पदास चढलेल्या मल्ल-विद्येचें पुनरुज्जीवन करण्याकडेही समाजधुरीणांनीं लक्ष पुरवावें. शाळा, पाठशाळा,

व विश्वविद्यालयें यांतून शारीरिक व्यायामाची शक्य ती सोय करून पुढील पिढीला बौद्धिक शक्तीबरोबरच शारीरिक शक्तीची जोड देण्यासाठीं अनेक योजना अमलांत आणणें आवश्यक आहे; भावी नागरिकांच्या मातापितरांनीं सरकारानें सध्यां केलेल्या योजनांचें महत्व ध्यानीं आणून विद्यार्थिदशेंतील सर्व मुलांस या योजनांचा योग्य फायदा घेण्यास भाग पाडावें. आह्मास कर्तृत्ववान् पिढी पाहिजे. शारीरिक स्वास्थ्य नसल्यास कर्तृत्वशक्ति तरी कोठून उत्पन्न होणार ?

## यमद्वितीया किंवा भाऊबीज.

——:०:——

कार्तिक शुद्ध द्वितीया हा दिवस यमद्वितीया या नांवानें प्रसिद्ध आहे. या दिवशीं मृत्युदेव जो यम त्यानें आपली बहीण यमी हिच्या घरीं जाऊन तिला वस्त्रालंकार वगैरे दिले व तिच्या गृहीं मोठ्या आनंदानें भोजन केलें, अशी पुराणांतरीं कथा आहे. हा दिवस बंधुभगिनींच्या भेटीचा असून भगिनींकडून बंधूची पूजा होत असल्यामुळें या सणाला भाऊबीज असें नांव पडलें आहे. शास्त्रकारांनीं या कौटुंबिक विधीस धर्माची जोड देऊन हा दिवस पाळणें हें प्रत्येक बंधुभगिनीचें श्रेष्ठ कर्तव्य आहे असें ठरविलें. त्याप्रमाणें सर्व उच्च वर्णांतील लोक हा दिवस पाळतात. सहोदर भगिनी नसल्यास चुलत, आते किंवा मामेबहिणीकडे जाऊन तिनें प्रेमानें पुढें टेवलेलें पक्वान्न ग्रहण करण्यास व तिलाही शक्त्यनुसार कांहीं तरी देणगी देण्यास कोणीही विसरत नाहीं हें पाहून मनाला अवर्णनीय आनंद होतो. एकाच मातेच्या उदरीं जन्मास आलेल्या दोन बालकांची आर्थिक स्थिति भिन्न होते. त्यांतही बंधु व भगिनी यांच्या स्थितींत कधींकधीं विलक्षण फेर पडतो. धनकनकाच्या वैभवानें आपल्या सहोदरासही विसरून जाणाऱ्या बंधूस किंवा भगिनीस हा यमद्वितीयेचा दिवस आपल्या कर्तव्यकर्मासंबंधानें आठवण देत असतो. दीपावलीच्या निमित्तानें अनेक आप्तेष्टांच्या जरी प्रेमानें भेटी होतात, तरी त्या सणाला जोडून हा भाऊबीजेचा दिवस स्वतंत्र योजणारांची योजकता खरोखर स्तुतीस पात्र आहे. बंधूंनो, तुम्ही श्रीमंत असा किंवा गरीब असा, तुमच्याबद्दल तुमच्या भगिनींच्या अंतःकरणांत जें दैदीप्यमान शुद्ध प्रेम वसत असतें, त्याची तुह्माला कल्पना करितां येईल काय ? यम व यमी यांची भेट ह्मणजे दिवस व रात्र यांची भेट असून हिचें वेदगायकांनीं विलक्षण रीतीनें

वर्णन केलेलें आढळतें. या वर्णनाचा उलगडा करणें अशक्य आहे. ऋग्वेदाच्या पहिल्या व दहाव्या मंडळांत यमाविषयीं उल्लेख आहे. यम हा प्रत्यक्ष देव आहे असें स्पष्ट म्हटलेलें नाहीं. तथापि तो देव आहे असें ध्वनित केलें आहे. मृतांवरचा तो राजा, लोकांना एकत्र करून त्यांचें वसतिस्थान तयार करणारा, जगांत प्रथमतः मृत्यु पावलेला मर्त्य वगैरे त्याचें गुणवर्णन आहे. यम या शब्दाचा अर्थ जुळें असा आहे. यमीचा यम हा जुळा भाऊ होता (ऋ. १०–१०) यम व यमी यांचें नातें बंधुभगिनीचें होतें; तथापि यमीनें हें नातें विसरून यमाला आपला पति होण्याबद्दल विनंति केल्याचें एका सूक्तांत दर्शविलें आहे. हा संवाद विलक्षण परंतु मनोरंजक आहे. त्यावरून यमराय किती सद्वर्तनी व सनातन धर्माचा अभिमानी होता हें स्पष्ट होतें. पितरांचा राजा अशा प्रकारें धर्मशील असणें हें योग्यच होय. यमास पाहून मोहित झालेल्या यमीनें अनेक परीनें त्याला आपला पति होण्याबद्दल विनंति केली व आपली मनीषा तो तृप्त करीत नाहीं म्हणून ती रागावली. परंतु शांत मनानें त्यानें तिची समजूत घातली. यमाच्या भाषणाचा आशय पुढीलप्रमाणें आहे.

" मी तुझा पति होऊं इच्छीत नाहीं कारण जी समानरूप नात्याची आहे ती विषमरूप नात्याची होईल. महा प्रज्ञावान् असुर पुत्र, देवांचे हेर हे सर्व आम्हांला पाहत असतात. तेव्हां अधर्माचें वर्तन आपल्या हातून घडूं नये. ते प्रहार करतील. तूं त्वरित अन्य पुरुषाला वर. लता वृक्षाला किंवा रथचक्र अक्षाला आलिंगन देतें त्याप्रमाणें दुसऱ्याला तूं आलिंगन दे व तोही तुला तसेंच आलिंगन देवो. तूं त्याचें मन ओढून घे. तो तुझें मन आकर्षित करो. नंतर त्याच्यासह गोड सुखाचा अनुभव घे." ( ऋ. १०–१०-- )

याप्रमाणें सनातन धर्माचें उल्लंघन करून भलत्याच मार्गाचा अवलंब करण्यास उद्युक्त होणाऱ्या भगिनीस योग्य दिशा दाखविण्यास तिचा बंधु सदा तत्पर असे. म्हणूनच वेदकालीं मुलीस बंधु असणें अत्यंत महत्वाचें आहे असें मानिलें असावें. वरील यम व यमीचा संवाद कोणत्या कारणामुळें सूत्रकारांस सुचला हें सांगणें अशक्य आहे. कदाचित् अशा प्रकारचा विवाह धर्मबाह्य आहे हें दर्शविण्यासाठीं हीं सूत्रें रचलीं गेलीं असल्यास नकळे. किंवा संध्याकालच्या आरक्त प्रभेंत तेजयुक्त सूर्यरश्मींचा मिलाफ होत असतां रजनिकाळ प्राप्त होण्याच्या समयीं स्तोत्र गायकाच्या अंतःकरणांत स्त्रीपुरुषांतील प्रेमसंयोगाची कल्पना प्रादर्भूत

होऊन या प्रकारचा विलक्षण संवाद रचला गेला असेल काय ? ज्या वेळीं सूर्य अस्तास जातो, त्या वेळीं रात्रीची भेट घेत असतां आकाशांगणीं सूर्यरश्मीची कांचनवर्णमिश्रित आरक्त प्रभा पसरून जें शोभायमान चित्र आपल्यापुढें तयार होतें, त्याचें यथार्थ वर्णन आजवर कवींस करितां आलें नाहीं किंवा कोणाही चित्रकला-विशारदास तें हुबेहुब उठवितां आलें नाहीं. बंधुभगिनीप्रेमाची गोष्ट अशीच आहे. तें प्रेम अवर्णनीय, अति उदात्त व अति शुद्ध आहे. ज्यांच्या मनांत तें सर्वकाल वसतें, तेच याची किंमत जाणूं शकतात. त्यांसच त्यापासून अवर्णनीय आनंद प्राप्त होतो. आपली दृष्टि व आपलें मन अशा रीतीनें प्रेमपूर्ण करून जे विस्तृत प्रमाणावर जगांतील व्यवहार जाणतात, त्यांच्या चित्ताची भावना अशी होईल कीं आम्ही सर्व एकाच ईश्वराचीं व एकाच हिंद मातेचीं लेंकरें आहोंत. या दृष्टीनें भाऊ-बीजेचा दिवस आम्हां सर्वांस असें सांगत आहे कीं, बंधुभगिनींनीं एकमेकां-बद्दल प्रेम बाळगून सामाजिक उन्नति साधण्यास शक्त्यनुसार यत्न करीत रहावें व यमद्वितीयेसारखा दिवस प्राप्त होतांच आपणास एक दिवस यमरायास भेटाव-याचें आहे, हें ध्यानीं आणून आपण आपल्या आयुष्यक्रमांत आपल्या बंधूंच्या किंवा भगिनींच्या उन्नत्यर्थ काय केलें, याचा आढावा काढावा.

## भ्रातृलाभाचें महत्व.

वेदकालापासून मुलीपेक्षां पुत्राची योग्यता विशेष मानलेली दिसत असून पुत्रसंतान नसलेला मात्र मुलीस पुत्रिका असें मानून तिला आपली मालमत्ता देत असे. पुत्रसंतान असणें, नसल्यास दत्तक घेणें या गोष्टी समाजांत अग-त्याच्या मानिल्या जात. इतकेंच नाहीं तर बंधु असणें हें प्रत्येक मुलीस अत्यंत महत्वाचें वाटे. भ्रातृहीन मुलीबद्दल समाजांत आदर नसे. ऋग्वेदांतील पुढील ऋचा भ्रातृहीन मुलींची केविलवाणी स्थिति दर्शविते:—

अभ्रातरो न योषणो व्यन्तः पतिरिपो
न जनयो दुरेवाः । पापासः सन्तो अनृता
असत्या इदं पदमजनता गभीरम्

ऋग्वेद ४।५।५

अर्थ—" बंधुविहीन तरुणीप्रमाणें भटकणाऱ्या, आपल्या पतींचा द्वेष कर-णाऱ्या स्त्रियांप्रमाणें भ्रमण करणाऱ्या, पापी व असत्यानें वागणाऱ्या लोकांनीं स्वतःसाठीं नरक उत्पन्न करून घेतला आहे." यावरून असें दिसतें कीं बंधु

असणें हें तरुण मुलीच्या भावी कल्याणास पोषक आहे असें मानीत. बंधुविहीन मुलींस पति मिळण्यास देखील फार अडचण पडत असावी. म्हणूनच अथर्व वेदांत ( १–१७–१ ) अशा मुलींचा उल्लेख केला असून त्या कांतिरहित आहेत असें म्हटलें आहे. अशा प्रकारच्या मुली लग्नांवांचून काळ कंठीत. ( ऋ. २–१७–७ ) स्मृतिकारांनीं देखील भ्रातृविहीन मुलींबद्दल अनादर दाखविला असून याज्ञवल्क्यानें बंधु असलेल्या मुलीशींच द्विजानें लग्न करावें असें सांगितलें आहे. यावरून दिसून येईल कीं अत्यंत प्राचीन कालापासून मुलींस भ्रातृ–लाभ होणें फार अगत्याचें व कल्याणप्रद वाटे. आणि अशाप्रकारच्या भ्रातृलाभाचें सुख ज्या मुलींस सुदैवानें प्राप्त झालें असेल त्यांनीं विवाहानंतर परक्याच्या कुटुंबाचा आश्रय धरला तरी आपल्या बंधूंस न विसरतां भाऊबीजेचा दिवस प्राप्त होतांच त्यांस भोजनास निमंत्रण करणें व एकमेकांनीं आपली प्रेमाची देणगी देऊन प्रेम-वात्सल्य प्रगट करणें हें विहितच आहे.

---

## तुलसीविवाह.

प्रत्येक वर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीस तुलशीचा विवाह केला जातो. पद्मपुराणांत यासंबंधाची कथा अशी आहे कीं, पूर्वकालीं जालंधर नांवाचा एक महाप्रतापी व असाधारण योद्धा होऊन गेला. त्यानें देवांस पादाक्रांत करून आपल्या भाईबंद दैत्यांस सुखी केलें. त्याची वृंदा नांवाची स्त्री महाप्रतिव्रता होती. तिच्या पुण्याईनें जालंधर त्रिभुवनांत अजिंक्य होऊन बसला. त्याचा पाडाव कसा करावा, यासंबंधानें देवांस मोठें गूढ पडलें. इंद्रपुरीवर चाल करून देवेंद्राची पुरी खोड मोडावी या हेतूनें त्यानें कडेकोट तयारी चालविली. पुढें लवकरच देव व दैत्य यांच्यांत तुमुल युद्ध माजून त्यांत अनेक देवांस गतासु व्हावें लागलें. तेव्हां श्रीविष्णूनें जालंधरास जेरीस आणण्यासाठीं कपटाचा उपाय योजून, जालंधरपत्नी वृंदा हिच्या जाज्वल्य पातिव्रत्यामुळें त्यास प्राप्त झालेलें अतुल सामर्थ्य नष्ट करण्याची त्यानें युक्ति योजिली. जालंधर धारातीर्थी पतन पावला, अशी बतावणी करण्यासाठीं दोन मर्कटांकडून विष्णूनें त्याचें शिर व धड याप्रमाणें तंतोतंत दिसणारे दोन अवयवांचे भाग तिच्यापुढें आणून टाकविले. तेव्हां ती दुःखानें व्याकुल होऊन अत्यंत शोक करूं लागली. इतक्यांत एका

कपटी साधूनें पुढें येऊन संजीवनी मंत्रानें या कपटवेषधारी जालंधरास उठविण्याचा उपक्रम केला व धड व शिर यांच्या जागीं जालंधराचा वेष घेतलेला विष्णु उभा राहिला. तेव्हां आनंदातिशयानें बेहोष झालेल्या वृंदेनें आपला मृत पति सजीव झाला असें मानून त्या जालंधररूपी विष्णूस कवटाळिलें. याप्रमाणें विष्णु तिच्या घरीं राहूं लागला. वृंदा अज्ञानामुळें कां होईना पण पातिव्रत्यापासून ढळल्यामुळें जालंधर बलहीन होत्साता संग्रामांत पतन पावला. कालेंकरून वृंदेस खरा प्रकार कळतांच अत्यंत कोपानें संतप्त झालेल्या त्या साध्वीनें तुला पत्नीचा वियोग घडून दोन मर्कटांचें साह्य घेण्याची पाळी तुजवर येवो असा विष्णूस शाप दिला. त्याप्रमाणें पुढें रामावतारीं घडलेंच. असो. त्यानंतर लगेच वृंदेनें अग्नीची चिता रचून तींत प्रवेश केला. कपटाचरणानें महासाध्वीचा आपण नाहक नाश केला हें पाहून विष्णूस वाईट वाटलें. इतकेंच नव्हे तर तो तिच्या रक्षेजवळ वेड्यासारखा बसून राहिला. पुढें त्याचें वेड घालविण्यासाठीं स्मशानभूमींत तिच्या रक्षेवर पार्वतीनें तुलसी, आंवळा व मालती यांचें बीं पेरून तीन झाडें उत्पन्न केलीं. त्यांतील तुलसी हीच आपल्या सर्वगुणसंपन्न वृंदेप्रमाणें आहे असें मानून विष्णूस ती फार प्रिय झाली. पुढें वृंदा ही रुक्मिणीच्या रूपानें अवतरून विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण त्यास तिनें कार्तिक शु. १२ च्या दिवशीं वरिलें. हा रुक्मिणीकृष्णविवाह दरसाल सर्व हिंदु साजरा करितात.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

या दिवशीं सर्व हिंदुलोकांत तुलसीविवाहविधि करण्याची चाल आहे. तुलसी वृंदावन सारवून तें सुशोभित करतात व त्यांत ऊंस पुरून आंवळे व ओली चिंच टाकतात. वृंदावनाभोंवतीं ऊंस रचून सुशोभित मंडप तयार केला जातो. प्रहर रात्रीच्या आंत पूजा आटोपल्यावर मंडपाभोंवतीं आरती, दीपाराधना, मंगलाष्टकें उरकण्यांत येऊन जमलेल्या मंडळीस लाह्या, कुरमुरे, ऊंसाच्या गंडेऱ्या वगैरे देण्यांत येतात. सौभाग्यवती स्त्रिया या दिवशीं प्रेमभावानें तुलसीस आरती दाखवितात. चातुर्मासांत हिंदुलोक विवाहकार्यें करीत नाहींत. तुलसीविवाहापासून चातुर्मासारंभापर्यंत शुभ मुहूर्तावर तीं होत असतात. कन्यारत्न नसलेले कांहीं धनवान् लोक या दिवशीं कृष्णरुक्मिणीचा विवाह खऱ्या लग्नासमारंभाप्रमाणें मोठ्या थाटमाटानें उरकतात.

## तुलसीचें माहात्म्य.

प्रत्येक हिंदु म्हणविणाराच्या दारांत तुलसीचें वृंदावन हें असावयाचेंच, मग तो हिंदु वर्गांतील अत्युच्च असा ब्राह्मण असो किंवा दुराग्रहानें अति नीच मानलेला महार असो. तुलसीपूजन हें हिंदुधर्माच्या अनेक लक्षणांपैकीं एक विशिष्ट लक्षण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्त्रिया तर तिला सौभाग्यदायिनी महापतिव्रता असें मानतात. तुलसीसंबंधानें हिंदूंच्या अंतःकरणांत तर पूज्यत्वभाव आहेच, पण इतर धर्मीय देखील तुलसीबद्दल आदर दर्शवितात. हें पाहिलें असतां या वनस्पतीबद्दल भूतलावर इतकी भक्ति कां दिसून यावी हें मोठें गूढ आहे.* इंग्रजी कोशांत तुलसीस पवित्र झाड असें म्हटलें आहे. ग्रीक भाषेंतील ' बेझिलिकॉन् ' हा तुलसी झाडासंबंधाचा शब्द राजयोग या अर्थाचा आहे. फ्रेंच व जर्मन भाषेंत तुलसीसंबंधाचे शब्द ग्रीक शब्दांप्रमाणें बहुमानार्थी आहेत. इटली व ग्रीस देशांत प्राचीनकालीं तुलशीच्या अंगीं विशिष्ट शक्ति आहे असें मानीत असल्याचें दिसतें. तुलसीपत्रावर पक्वान्नाचें ताट आणून ठेवल्यास स्त्रिया त्याला शिवत नसत. स्त्रिया तुलसीच्या लहान डाहाळ्या आपल्याबरोबर प्रार्थनामंदिरांत नेत, व परत आल्यावर तुलसीपत्रें भुईवर टाकीत. त्यायोगानें पुढील वर्ष सुखांत जाईल असें त्या मानीत. तुलसीपत्र खाल्ल्यानें दुखणें येत नाहीं असाही त्यांचा समज असे. तुलशीचीं पानें कपाटांत ठेविल्यानें वर्षभर उंदीर, झुरळ व कीटक यांपासून कपडे खराब होणार नाहींत असें त्या समजत. ख्रिस्ताच्या थडग्यावर तुलसीचा रोपा उगवला अशी ख्रिस्तानुयायांची समजूत आहे. आपल्या प्रियकराच्या थडग्यावर तुलशीचें झाड एका युवतीनें लावल्याचा इंग्रजी कादंबरींत उल्लेख आहे. दान देण्याच्या वेळीं हिंदु तुलसीपत्राचा उपयोग करतात.

## हेतु व बोध.

तुलसीसंबंधानें विचार करणारे आधुनिक सुशिक्षित लोक व इतर असें प्रतिपादन करितात कीं वड, पिंपळ, औदुंबर वगैरे झाडांची पूजा रूढ करण्याचा हेतु प्रदक्षिणा व त्यांचें सान्निध्य यांच्या योगानें त्यांच्या पूजकाचें आरोग्य वाढावें हा आहे. एक वीतभर तुलशीचा रोपा दारांत पुजून त्याला प्रत्यहीं पांच प्रदक्षिणा घातल्या म्हणजे आरोग्य वाढण्याचा संभव नाहीं हें कोणीही कबूल करील. तसेंच तुलसी-

---

* मि. किंकेड यांचें Tale of the Tulsi Plant हें पुस्तक पहा.

च्या झाडांचे एक दोन रोपें अंगणांत लावले म्हणजे आजूबाजूची हवा शुद्ध होऊन कौटुंबिक आरोग्य राहील हें संभवनीय नाहीं. तेव्हां नव्या दृष्टीनें तुलशीमाहात्म्याचा विचार न करितां जुन्या कथानकावरूनच काय बोध घेतां येईल याचा विचार करणें योग्य आहे. वृंदेच्या पातिव्रत्यामुळें जालंधरास सामर्थ्य प्राप्त झालें असें जें सांगण्यांत आलें आहे, त्याचा अर्थ इतकाच कीं ती सहधर्मचारिणी पतिपरायण असल्यामुळें प्रत्येक कार्यांत तिची सल्ला व तिचा धीर त्याच्या कार्यसिद्धींत उपयोगी पडून तो विजयी होत गेला; परंतु विष्णूच्या कपटामुळें तिच्या सहकारित्वास मुकल्यामुळें तो पतन पावला. प्रापंचिक कार्यांत व राजकारणांत प्राचीनकालीं स्त्रिया आपल्या पतींस मदत करीत. कैकयी व सत्यभामा ह्या आपल्या पतीबरोबर रणांगणांत गेल्याचें प्राचीन ग्रंथावरून दिसतें. राणी चंद्रावती हिनें आपला पति राणा जयवंतसिंग पराभव पावून स्वगृहीं आला, तेव्हां त्याला किल्ल्याच्या दरवाज्यांत प्रवेश करूं न देतां पुनः युद्धास पाठविलें याची साक्ष इतिहास देत आहे. अशा रीतीनें सहधर्मचारिणी होऊन ज्यांनीं पतीस साह्य केलें, त्यांच्यामुळें त्यांच्या कुलास व देशास त्या भूषणभूत झाल्या. सध्यां आपल्या देशाची सामाजिक स्थिति लक्षांत घेतां असें दिसतें कीं, आम्हीं सामान्यतः स्त्रियांच्या अंगीं सहकारित्वाची पात्रता ठेविलेली नाहीं. पाकगृहाचीं व प्रसूतीगृहाचीं तेवढीं कामें त्यांजकडे सोंपवून आम्हीं पुरुष त्यांना अज्ञानपंकांत रुतवीत आहों. व्यवहाराच्या कामीं अशा स्त्रियांकडून त्या पतिव्रता असतांही कसली सल्ला व मदत मिळणार ? जालंधरपत्नी वृंदेपासून झालेलें तुलशीचें कोमल रोप पुरुषांना स्त्रियांची योग्यता वाढविण्यास व स्त्रियांना ज्ञानार्जनाच्या योगानें अंगीं पात्रता उत्पन्न करून घेऊन पतींच्या उपयोगी पडण्यास सांगत आहे. प्रातःकालीं तुलशीचें दर्शन घेतांना प्रत्येक स्त्रीपुरुषानें आपल्या या कर्तव्याची जाणीव अंतःकरणांत उत्पन्न होईल अशा रीतीनें तुळशींत रूपांतर पावलेल्या वृंदेची महती ध्यानांत आणावी.

---

## धात्रीपूजन.

बंगाल्यांत कार्तिक महिन्यांत जगधात्रीपूजा नांवाचा मोठा उत्सव होतो. तो हिंदुस्थानच्या या भागांत होत नाहीं. तथापि कार्तिक शुक्ल दशमीपासून पौर्णिमे-

पर्यंत रानांत जाऊन आवळीच्या झाडाची पूजा करण्याची व तेथेंच थाटमाटानें भोजन करण्याची चाल मात्र दृष्टीस पडते. यावरून या उत्सवास आवळीभोजन असें नांव पडलें आहे. ही पूजा दामोदराप्रीत्यर्थ करण्यांत येते. महाराष्ट्र, कर्नाटक, गोमंतक, कोची वगैरे ठिकाणीं आवळीभोजनाची चाल असून एकाद्या देवतेची मूर्ति वाजतगाजत जवळच्या रानांत आवळीच्या झाडाकडे नेत असतात. एकादी प्रशांत जागा पाहून त्या ठिकाणीं या झाडाचा पार तयार केलेला असतो. भोजनोत्तर सायंकाळीं मंडळी देवतेस पालखींत घालून मिरवीत घरीं येते. या पूजनाच्या योगानें धात्रीदेवी संतुष्ट होते व भोजन करणारांचें पाप क्षालन होतें अशी समजूत आहे. हल्लींच्या काळीं या वनभोजनाचें स्वरूप बदललें असून शहरवासी लोक त्याचें धार्मिक महत्व जरी मानीत नाहींत, तरी वर्षांतून एक दोन वेळां मित्रमंडळीसह आपल्या रहात्या ठिकाणापासून किंचित् लांब पल्ल्यावर जाऊन एकदोन दिवस मजेंत घालवीत असतात. हा वनभोजनाचा ( picnic ) प्रकार खरोखर उत्तम आहे. त्याच्यांत धर्माचा संबंध ठेविल्यानें कित्येक हिंसात्मक व इतर धर्मबाह्य प्रकार बंद होण्याचा संभव आहे. हल्लीं मुंबईत समाजसेवासंघ ( Social Service League ) या संस्थेनें या प्रकारच्या वनभोजनाचे प्रसंग घडवून आणण्याचा उपक्रम सुरू केला आहे व शहरांतील गरीब मुलांस वर्षांतून एकदोन दिवस तरी उत्तम भोजन, निसर्गदत्त मुबलक हवा व उजेड यांचा लाभ करून देऊन निसर्गाची आवड उत्पन्न करण्याची छानदार टूम काढिली आहे. आपल्या गरीब बंधूंचा अशा रीतीनें परामर्ष घेणारे समाजसेवक धन्य होत.

---

## वैकुंठचतुर्दशी.

कार्तिक शुद्ध १४ ही वैकुंठचतुर्दशी या नांवानें प्रसिद्ध आहे. सनत्कुमार संहितेंत अशी कथा सांगितली आहे कीं, श्रीविष्णु वैकुंठाहून काशीक्षेत्रीं आला व त्यानें मणिकर्णिकेंत स्नान करून काशीविश्वेश्वरास सहस्र कमलें वाहण्याचा संकल्प केला. पूजा चालली असतां शंकरानें एक कमल बाजूस सारिलें; तेव्हां शेवटच्या कमलाची भरती करण्यासाठीं विष्णूनें पुष्पाऐवजीं आपलें नेत्रकमलच अर्पण केलें. विष्णूच्या भक्तीस प्रसन्न होऊन शिवानें त्यास चक्रायुध दिलें. या हरिहर

भेटीप्रीत्यर्थ वैकुंठचतुर्दशी व्रत प्रचारांत आलें. जो कोणी या तिथीस अरुणोदयसमयीं शिवाची व रात्रौ विष्णूची पूजा करून उपोषणव्रत पाळतो, त्यास वैकुंठप्राप्ति होते असें सांगितलें आहे. या व्रतासंबंधानें रूढि अशी आहे कीं, फक्त जुन्या मताच्या भाविक स्त्रिया तेवढया हें व्रत पाळतात. स्मार्त व वैष्णव संप्रदायाचे लोक आंपआपल्या दैवताची पूजा करून या दिवशीं उपोषण करितात. परंतु हरिहरांच्या भेटीचा हा दिवस आहे अतएव या दोन दैवतांमध्यें भेदभाव नाहीं असें समजणारे लोक विरळा सांपडतात. केवळ कथानकाकडे पाहिलें तर त्यांत कांहीं विशेष तथ्य आहे असें दिसत नाहीं; कारण शिवानें कमल लपविणें, विष्णूनें डोळा उपटून देवास वाहणें या सर्व गोष्टी पंचतंत्रांतील गोष्टींप्रमाणें आहेत. अशा कथानकावरून ईश्वरासंबंधानें पूज्यत्वभाव वाढण्याचा संभव नाहीं. मूलतः पुराणकारांनीं शिव व विष्णु यांच्यासंबंधानें अनेक गोष्टी उत्पन्न करून आपआपल्या प्रिय देवतेचें प्रस्थ वाढविण्याचा यत्न केला. याचा परिणाम

## मतभेद व मतांतरें

हाच झाला. वैष्णव व शैव हे परस्परांचें दर्शन घेण्यास नाकें मुरडतात. खाण्यापिण्याच्या पदार्थांवर एकमेकांची नजर पडली तर पदार्थ देखील भ्रष्ट झाले असें समजणारे वीरशैव व वीर वैष्णव आहेत. लिंगायतसुद्धां ज्यांच्या गळयांत लिंग नाहीं अशांची नजर आपल्या अन्नपाण्यावर पडूं देत नाहींत. शैवग्रंथ शक्तीपूजा करावी म्हणतात, तर वैष्णवग्रंथांत शाक्तांस धर्मभ्रष्ट मानावें असें सांगितलें आहे. भागवत एकादशी किंवा स्मार्त एकादशी, पिष्टपशु किंवा प्रत्यक्ष पशु, विधवाकेशवपन किंवा विधवा केशधारण, समुद्रयान करावें किंवा करूं नये वगैरेसंबंधानें जाज्वल्य मतभेद आहे. एक गोपीचंदन व तुलशीमाला यांचें महत्व सांगतो, तर दुसरा भस्मधारण व रुद्राक्षमाला यांचीच महती गातो. द्वैताद्वैतवाद, पदार्थवाद, मायावाद, मीमांसा किंवा कर्मवाद, ईश्वरवाद, अनीश्वरवाद, आत्मानात्मवाद, आद्यनादिवाद, तर्कवाद, शुद्धाद्वैतवाद, विशिष्टाद्वैतवाद, सगुणनिर्गुणवाद वगैरे अनेक वादांखालीं आमच्या सद्धर्मबुद्धीचा नाश होत चालला आहे. पंथभेद पाहिले तरी देखील मन निराश होतें. रामानंदी, कबीरपंथी, श्रीसांप्रदायी, गाणपत्य, शाक्त, सौर, शैव, वैष्णव, वल्लभपंथी, दादुपंथी, उदासी, सत्नामी, रामस्नेही, जोगी, नाथपंथी, अवधूत, प्रणामी, बीजमार्गी, लिंगायत, जैन, सत्संगी, महानुभावी, वारकरी, गोसावी, साधु, मलूकदासी, रामदासी, कपाली,

अघोरी, वाममार्गी, पाशुपत, प्रवृत्तिमार्गी ( गृहस्थाश्रमी ), निवृत्तिमार्गी ( संन्यासी, बैरागी ), कौलिक, अवधूतमार्गी, अग्निहोत्री, भागवत, हरव्यासी ( हरिवासी ), कंठिवाले वगैरे शेंकडों पंथांनीं आजवर सद्धर्मासंबंधानें आर्यांच्या अंतःकरणांत संशय व चंचलता उत्पन्न केली आहे. इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यापासून नवीन पंथ स्थापन होत असून प्रत्येक पंथाचे प्रवर्तक आपलाच पंथ तेवढा राष्ट्रीय उन्नतीस योग्य आहे असें सांगतात. असे पंथ ह्मटले ह्मणजे एकेश्वरी ( प्रार्थनासमाज ), आर्य समाज, थिऑसॉफी, ब्रह्मसमाज, सनातन धर्मसमाज, वेदांत ( रामकृष्ण परमहंसप्रणीत ) हे होत. या सर्वांच्या कचाट्यां-तून सुटून या सर्व पंथांचें व मतांचें पर्यवसान ज्या एकाच तत्वावर येतें, त्या अनाद्यनंत तत्वाची ओळख करून घेण्याच्या मार्गास ज्या दिवशीं आर्य लागतील व सर्व हिंदूचें संघटन होईल तोच दिवस सोन्याचा होईल. सबंध आर्यावर्ताला त्रिकालाबाधित असा एकच श्रेष्ठ आर्यधर्म देणारा अवतारी पुरुष केव्हां तरी निर्माण होईल काय ?

---

## त्रिपुरी पौर्णिमा.

पूर्वकालीं त्रिपुर नांवाचा एक दैत्य उन्मत्त होऊन देवांस फार पीडा देऊं लागला. त्यानें आपल्या राजधानीच्या भोंवतीं तीन अजस्र तट उभारून तो अजिंक्य झाला. तो त्रिपुरांचा अधिपति झाल्यामुळें इंद्रादिकांचें कांहींच चालेना व देवांस आपलें रक्षण कसें करावें हें समजेना. तेव्हां नारदाच्या सल्ल्यानें ते शंक-रास शरण गेले. त्यानें त्रिपुरासुराचा नाश करून देवांस आपलें गतवैभव पुनरपि मिळवून दिलें. देवांस हा विजय कार्तिक पौर्णिमेच्या दिवशीं मिळाला एतदर्थ हा दिवस पाळला जातो.

### चालू रूढि.

शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें या दिवशीं सर्व शिवालयांत दीपोत्सव करून उत्सव-मूर्तीची पालखींतून मिरवणूक वगैरे प्रकार होत असतात. स्त्रिया कूष्मांड (कोहळा) दान व दीपदान करितात. कर्नाटकांत या दिवसास मोठी दिवाळी असें मानून कित्येक गांवांत व्यापारी लोक फटाकड्या व इतर दारूसामान वगैरे पेटवून हा

उत्सव साजरा करितात. ( कोकणस्थ लोकांत मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस मोठी दिवाळी मानून त्या दिवशीं कुलदेवतांस नैवेद्य घालण्याची वहिवाट देशावर आहे.) हिंदुस्थानांत या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. हा दिवस शिवाचा पुत्र जो कार्तिकेय किंवा स्कंद याचा जयंत्युत्सव असें मानून तत्प्रीत्यर्थ मृण्मय मूर्तींची पूजा, दीपोत्सव वगैरे विधि मोठ्या थाटमाटानें साजरे केले जातात. सुब्रह्मण्य हा कार्तिकेय असून त्याला तेथील लोक रणदेव असें मानतात. तारकासुराचा नाश करणारा हाच प्रतापी वीर असून तो अप्रतिम सुंदर असल्याचा पुराणांत उल्लेख सांपडतो. शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, धात्रीपूजनाच्या दिवशीं कार्तिकेयाचें दर्शन घ्यावें. याच सुमारास दक्षिणदेशांत शिवाप्रीत्यर्थ दुसरा एक महोत्सव कार्तिक महिन्याच्या अखेरीस होतो. शिवास अग्निस्तंभाप्रमाणें मानून त्याचें मूळ किंवा टोंक यांचा पत्ता ब्रह्मा व विष्णु या दोन्ही दैवतांस लागला नाहीं असें पुराणांत वर्णिलें आहे. त्रिमूर्तींत शिव हाच मोठा आहे हें सिद्ध करण्यासाठीं ही कथा रचली गेली हें उघड आहे. दक्षिण हिंदुस्थानांत या दिवशीं **कृत्तिका** नांवाचा महोत्सव अद्भुत प्रमाणावर साजरा केला जातो. हा शिवाप्रीत्यर्थ पाळतात. रोषणाई, पालखीची मिरवणूक, महापूजा वगैरे उत्सव होत असून या वेळीं दारूसामानही लावण्यांत येतें. सुमारें वीस हात उंचीचा खांब देवळासमोर उभा करून कापूर किंवा इतर ज्वालाग्राही पदार्थांच्या योगानें तो पेटवीत असतात. तिरुवण्णामल्ली, त्रिचनापल्ली, तिरुल्लनि, मुयिलम् वगैरे ठिकाणीं जेथें टेंकडीवर देवालयें आहेत तेथें कार्तिकांत खडकांवर दिवे पेटवितात. त्यामुळें आसमंतात् भागीं अवर्णनीय शोभा प्राप्त होते. या दिवशीं नवीन वधूंस समई, नवीं भांडीं व साड्या देण्याची तेथें चाल आहे. तामिळ लोकांत अशी एक म्हण आहे कीं 'कार्तिकैक्कापुर मळे इल्ले' म्हणजे कृत्तिकोत्सवानंतर पाऊस नाहीं. यावरून असें दिसतें कीं हा उत्सव वर्षाकालाच्या समाप्तीबद्दल आहे.

## हेतु व बोध.

केवळ पुराणांतील कथानकावरून वरील सर्व उत्सव रूढ झाले असें म्हणतां येत नाहीं. स्वराज्य असतां या देशांत निरनिराळ्या ज्या क्रांत्या झाल्या त्यांचे हे दर्शक असावे किंवा ऋतुपरत्वें लोकांत या कालीं उत्पन्न होणारा उत्साह दर्शविण्यासाठीं हे अस्तित्वांत आले असावे. कसेंही झालें तरी आनंदाची गोष्ट ही कीं ह्या उत्सवांत कोणत्याही प्रकारें कुकर्मास वाव नाहीं. उत्सवाचें अंग जसें शुद्ध

व उत्साहोत्पादक असावें तसेंच असल्यामुळें याची दिपवाळींत गणना करितात. हे उत्सव विशेष प्रिय होतील असें करून त्यांच्या योगानें समाजांत शुद्ध स्वरूपाची राष्ट्रभक्ति उत्पन्न होईल असें करण्याकडे सुशिक्षितांचें लक्ष वेधलें पाहिजे. तात्विकदृष्ट्या विचार करितां असें दिसतें कीं असुर, देव, त्रिपुरें व शंकर हे शब्द रूपकाच्या अर्थानें योजिले आहेत. क्रोध, लोभ व त्या सर्वांचा अधिपती महामोह हे ( असुर ) प्रबल होऊन देवांना (इंद्रियांना) पीडा करूं लागले; तेव्हां तीं इंद्रियें शिवास ( आत्म्यास ) शरण गेलीं ( त्यांत लीन झालीं ). तेव्हां त्या शिवानें ( आत्म्यानें ) एकाच बाणानें ( शुद्ध चिन्मात्राच्या आश्रयानें ) त्रिपुर ( स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन शरीरांना ) व्यापून असणारे जे कामादि असुर त्यांना गगनांतून ( अव्याकृतांतून किंवा मायेच्या पोटांतून ) खालीं पाडलें. कामक्रोधादिकांस जिंकून जितेंद्रिय होण्यास सांगणारा हा सण असल्यास तो आर्यांस पूज्य झाला यांत नवल नाहीं.

——:०:——

## मार्गशीर्ष महिना.

मार्गशीर्ष हा महिना ऑक्टोबर महिन्याच्या सुमारास येतो. विशेषतः या महिन्यांत जनतेचें आरोग्य चांगलें रहात नसतें. याचें कारण वर्षाकाल संपल्यावर आकाश निरभ्र होऊन सूर्यरश्मींचा ताप असह्य होतो व या तापामुळें किंचित् अनारोग्य उत्पन्न होतें. तामीळ देशांत हा महिना **मरगाली** या नांवानें संबोधिला जात असून हा अहितकारक मास संपल्याबद्दल पौषांत मकरसंक्रमणाच्या सुमारास महोत्सव होत असतो. तेथें या महिन्यांतील शुक्ल एकादशी ही तिथि अत्यंत पवित्र मानली जाते. कारण या दिवशीं श्रीकृष्णाच्या देहांतून एकादशी नांवाची एक देवी उत्पन्न झाली असें तेथील लोक समजतात. याबद्दलचें कथानक ब्रह्मानंदपुराणांत सांपडतें. गीतेंत श्रीकृष्णानें सर्व मासांत श्रेष्ठ असा मार्गशीर्ष तो मीच–**मासानाम् मार्गशीर्षोहम्**– असें म्हटलें आहे. यावरून कदाचित् या विष्णूप्रीत्यर्थ पाळल्या जाणाऱ्या तिथीस इतकें महत्व प्राप्त झालें असावें. हा दिवस महत्वाचा मानण्याचें दुसरें एक कारण असें दिसतें कीं या दिवशीं द्रविड देशांत **नाम्मलवर** नांवाचा एक साधु संत तुकारामाप्रमाणेंच जडदेहानें वैकुंठाला गेला; त्या समयीं त्याला पाहण्यासाठीं तेहतीस कोटी देव स्वर्गावरून खालीं उतरले होते अशी तेथील लोकांची समजूत आहे. यावरून या दिवसाला

**मुक्कोटी** किंवा **वैकुंठ** एकादशी असें तेथें नांव आहे. 'मुक्कोटी' हें मुप्पट्टी मुक्कोटी याचें संक्षिप्त रूप असून त्याचा अर्थ 'तेहतीस कोटि असा होतो. नाम्मल्वर साधूचें स्वर्गारोहण पाहण्यासाठीं भूतलावर उतरलेल्या देवांच्या संख्येवरून मुक्कोटी हा शब्द या महाएकादशीला जोडण्यांत आला आहे. श्रीरंग येथें पंढरपुराप्रमाणेंच या एकादशीच्या दहा दिवसांपूर्वीपासून सुमारें तीन आठवडे मोठी यात्रा भरते. त्या वेळीं हजारों लोक तेथें जमतात. मार्गशीर्षांतील विशेष महत्वाचा उत्सव ह्मटला म्हणजे **श्रीदत्तजयंति** हा होय.

---

## चंपाषष्ठी.

—:०:—

मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत कांहीं शिवालयांतून व विशेषतः देवीच्या देवालयांतून उत्सव चालतो. त्यांतील शेवटचा दिवस हा मुख्य मानिला आहे. सामान्यतः पाहूं गेल्यास षष्ठी ही तिथि देवीप्रीत्यर्थ पाळण्यांत येते. माघांतील शीतला षष्ठी, चैत्रांतील अशोकषष्ठी, ज्येष्ठांतील अरण्यषष्ठी या विशेष प्रसिद्ध आहेत. तरी कांहींचें महत्व उत्तरेंत तर कांहींचें दक्षिण हिंदुस्थानांत आहे. चंपाषष्ठी हा उत्सव महाराष्ट्राच्या कांहीं भागांत आस्थापूर्वक पाळला जातो. जेजुरी, पाली, मंगसुळी, गुडगुड्डापूर ( देवरगड ) हीं खंडोबाचीं सुप्रसिद्ध स्थानें आहेत. तेथें हा चंपाषष्ठीचा उत्सव प्रेक्षणीय होतो. या देवतेविषयीं अशी कथा आहे कीं पूर्वकालीं मणी व मल्ल नांवाचे दोन दैत्य लोकांस फार पीडा देऊं लागले. तेव्हां शंकरानें खंडोबा या नांवानें योद्ध्याचें रूप धारण करून सहा दिवस पर्यंत त्या दैत्यांशीं युद्ध केलें व त्यांचा नाश केला. म्हणून या देवास मल्लारी असें ह्मणतात. खंडोबाचें मुख्य देवालय जेजुरी येथें आहे. या देवतेस बहिरोबा, मल्लारिमार्तंड, खंडेराव अशीं नांवें आहेत. जेजुरी येथें वर्षांतून चार वेळां जत्रा भरते. चैत्र शु. १२ पासून कृ. १ दा, मार्गशीर्ष शु. ४ पासून ७ मी, पौष शु॥ १२ पासून कृ. १ दा व माघ शु. १२ पासून कृ. १ दा हे जत्रांचे काल आहेत. यांपैकीं चंपाषष्ठीचा उत्सव विशेष महत्वाचा मानला जातो. धारवाड जिल्ह्यांत गुडगुड्डापूर किंवा देवरगड येथें खंडोबा व मल्लदैत्य यांच्यांत लढाई जुंपली अशी समजूत असून आश्विन शु. ९ मी व १० मीस मोठी जत्रा भरते. या देवालयांत खंडोबाचें दहा हात लांबीचें धनुष्य ठेविलें आहे. या देवतेस वाघ्या

व मुरळ्या ( अविवाहित पुरुष व स्त्रिया ). परिचारक ह्मणून वाहण्याची चाल पूर्वी होती. मुरळ्या वाहण्याची चाल कायद्यानें बंद करण्यांत आल्यापासून त्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. वाघ्यांचे द्योतक कांहीं कुत्रे खंडोबाच्या मूर्तीजवळ ठेवलेले आहेत. उत्सवप्रसंगीं वाघे कुत्र्यांप्रमाणें भुंकत असतात व लोकांनीं भक्तिपूर्वक दिलेल्या अन्नावर निर्वाह करतात. मनमाडच्या जवळ चांदूर गांवीं पौष पौर्णिमेस खंडोबाची जत्रा भरते. सातारा जिल्ह्यांत पाळ या गांवीं खंडोबाचें देवालय आहे. तेथें पौष शु.१२ पासून पौर्णिमेपर्यंत मोठा उत्सव होतो. त्या वेळीं या देवतेचा विवाह समारंभ साजरा केला जातो. धामन खेड ( पुणें ) येथील जत्रा माघ चैत्र पौर्णिमेस भरते. इंदूर संस्थानाधिपति होळकर घराण्याचें कुलदैवत मल्लारिमार्तंड आहे.

खंडोबाची पत्नी म्हाळसा या नांवानें प्रसिद्ध आहे. तिजवरून खंडोबाला मल्लारि म्हाळसाकांत हें नामाभिधान मिळालें. यांच्या भजकांत कांहींजण मल्लारीस तर कांहीं म्हाळसेस आपलें कुलदैवत मानतात. मल्लारी मार्तंड हें दैवत मराठ्यांसारख्या क्षत्रिय बाण्याच्या लोकांत विशेष पूज्य आहे. वेद व पुराणें यांत शिवासंबंधीं जी माहिती दिली आहे, तींत या खंडोबाचा मुळींच नामनिर्देश नाहीं; इतकेंच नव्हे तर या आर्यावर्तांत देखील महाराष्ट्राच्या थोड्याशा भागाव्यतिरिक्त इतर ठिकाणीं या दैवताचे उपासक नाहींत.

कोणी इसम असामान्य कर्तबगारीचा दिसून आल्यास त्याला शंकर किंवा विष्णु यांपैकीं एकाद्या देवाचा अवतार मानण्याकडे गतानुगतिक हिंदूंचा कल आहे. त्यास अनुसरून या खंडोबा नांवाच्या वीर पुरुषाला शंकरांश म्हणजे शंकराचा अवतार असें मानूं लागले असावे. अशा रीतीनें महापुरुषांतून देवत्वाचे पायरीस चढलेले कैक पुरुष आढळतात. सुप्रसिद्ध छत्रपति शिवाजी महाराज यांसही शंकराचा अवतार मानण्याची प्रवृत्ति आहे. मलबारांत तिरुपती नांवाचें भव्य देवालय आहे तेंही बाळाजी या नांवाच्या एका प्रख्यात व्यक्तीच्या सन्मानार्थ बांधण्यांत येऊन सध्यां तिरुपति वेंकटरमण हें मोठें दैवत मानलें जातें. दरसाल तिरुपति येथें मोठी जत्रा भरते. वऱ्हाडांत देवत्वास पोहोंचलेल्या कित्येक पुरुषांचीं देवालयें आहेत. चंपाषष्ठीला स्कंदषष्ठी असेंही म्हणतात. कार्तिकेय किंवा स्कंद याची पूजा कार्तिकमासीं करण्याची चाल दक्षिण हिंदुस्थानांत आहे. खंडोबासारख्या दैवतांस लघुत्व आणण्याचा आमचा उद्देश आहे असा

कोणीं निष्कर्ष काढूं नये. खरें ज्ञान सर्वांस व्हावें हाच आमचा हेतु आहे. सामान्य माणसाहून श्रेष्ठ व कर्तृत्ववान् माणसें दिसून आल्यास त्यांस देवाचे अवतार मानून त्यांच्या भजनीं लागावें व येणें करून त्यांचा गौरव करावा असा या देशांत प्रघात आहे. पाश्चिमात्य देशांतही महनीय विभूतींची स्मृति चिरकाल राहील असें करण्याची पद्धति असून ती आमच्या पद्धतीहून भिन्न आहे. खासगी किंवा सार्वजनिक वर्गणीनें अशा सत्पुरुषांचे धातुमय किंवा दगडी पुतळे करून ते शहरांतील चव्हाट्याचे जागीं किंवा प्रशस्त संग्रहालयांतून ठेवतात. त्यांतूनही विख्यात ऐतिहासिक व्यक्तींचे सांवत्सरिक उत्सव भव्य प्रमाणावर करण्यांत येतात. या पद्धतीमुळें तरुण पिढीला पूर्वकालीन आदर्शवत् माणसांचें जीवनचरित्र समजून येऊन त्यांचा कित्ता गिरविण्याचें चांगलें शिक्षण मिळतें; परंतु आपल्याकडील पद्धति भिन्न प्रकारची आहे. ती अशी कीं श्रेष्ठ विभूतींस देवावतार मानून त्यांचीं कार्यें सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेरचीं आहेत असें मानण्यांत येतें. यामुळें लोकशिक्षणाचें कार्य होण्याचें एकीकडेच राहून हे देव केवळ उत्सव व नवस यांच्या पुरतेच होतात. असें होण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे आमच्यांत रूढ असलेली अवतारकल्पना होय. अवतारांत कोणी पूर्णावतारी, अंशावतारी, आवेशावतारी, कलावतारी व विभूत्यवतारी झाले असें मानण्यांत येत आहे. खंडोबा हा यापैकीं आवेशावतारी असावा. मूलतः सर्वसंगपरित्याग करून सर्वथैव खंडोबासारख्या वीर पुरुषाच्या सेवेस स्वतःस वाहून घेण्याच्या पद्धतीवरून उत्पन्न झालेली वाघ्यामुरळ्यांची संस्था सध्यां अगदीं अवनत स्थितीस पोहोंचली आहे. उत्सवांत कांहीं अमानुष प्रकार शिरले आहेत. याप्रमाणें धर्माच्या नांवाखालीं चालणारीं क्रूर कर्में व अनाचार बंद करून उत्सवाचें स्वरूप उज्ज्वल करण्यासाठीं सांप्रत यत्न चालला आहे ही आनंदाची गोष्ट होय. खालच्या वर्गांत जसजसा विद्याप्रसार होत जाईल तसतशा या अनिष्ट चाली नामशेष होतील यांत संशय नाहीं.

## देवसेवेची अमानुष पद्धति.

या सणासंबंधाचा शास्त्रोक्त असा विधि सांगितलेला नाहीं. मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदेपासून कुलाचाराप्रमाणें घटस्थापना, सुवासिनींस भोजन देणें वगैरे प्रकार चालतात. अगदीं अलीकडे या उत्सवांत बगाड काढण्याची चाल होती. बगाड म्हणजे दगडी चाकांच्या मोठ्या गाड्यावर मधोमध एक मोठा खांब बांधून त्याला एक

मोठा आडवा खिळा ठोकावयाचा व ज्याचा नवस असेल त्या माणसाच्या पाठीस तो खिळा टोंचून त्यास लोंबकळत ठेवावयाचें व हजारों माणसें जमून त्यांनीं एकमेकांवर बेलभंडारा उडवून तो गाडा पळवावयाचा. त्या गाड्यास आठपासून बारापर्यंत बैल जुंपीत. या वेळीं या नवस करणाऱ्या माणसास काय दुःख होत असेल याचें यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. नवस फेडण्याची ही क्रूर चाल कमी अधिक प्रमाणानें हिंदुस्थानांतील बऱ्याच भागांत होती. यास देवीच्या देवालयासमोर अजून दिसणारे खांब व चाकें साक्ष देतात. कर्नाटकांत ( भंडी हब्ब ) भांडीजत्रा नांवाचे उत्सव कार्तिकमासापासून वैशाखापर्यंत होत असून त्यावेळीं जवळ जवळ बगाड काढण्याची पद्धति होती. ती सौम्य स्वरूपांत अद्यापि चालू आहे.

बंगाल्यांत चैत्रांत शिवाप्रीत्यर्थ पौर्णिमेपर्यंत चरकपूजा नांवाचा मोठा उत्सव चार दिवस चालतो. यावेळीं कलकत्ता येथें कांहीं शूद्र लोक शिवालयांत संन्याशाप्रमाणें व्रतस्थ राहून पौर्णिमेच्या दिवशीं वाद्याच्या गजरांत नाचत चरक ( चाक ) पूजेसाठीं कालीघाटावर एकत्र जमतात. तेथें बरगड्या, जीभ, पाठीचा कणा वगैरे देहाचा भाग लोखंडी सळ्या, बरच्या, तरवारी, सुरे वगैरे, साधनांनीं टोंचून घेऊन त्यांसह चरकावर गरगर फिरण्याची चाल पूर्वकालीं होती; पण सरकारानें ती बंद केली असून उत्सवाचें इतर स्वरूप मात्र तसेंच राहूं दिलें आहे ही समाधानाची गोष्ट होय. निराहार राहणें, उलटें टांगून घेऊन तपाचरण करणें, धूम्रपान व पंचाग्निसाधनानें तपत राहणें वगैरे शिवशक्तींस प्रसन्न करून घेण्याचे जे जुन्या काळीं प्रकार होते त्यांचाच बगाड हा अवशिष्ट भाग असावा. विचार करितां आम्ही खऱ्या देवास विसरून जाऊन भलत्याच मार्गांचा कसा अवलंब करितों याचा उलगडा पुढील दोन संतवचनांवरून होणार आहे. नामदेव म्हणतात—

भजन चाललें उफराटें । कोण जाणें खरें खोटें ॥
सजीवासी हाणी लाथा । निर्जीव पायीं ठेवी माथा ॥
बेला करी तोडातोडी । शिवा लाखोली रोकडी ॥
तोंड धरुनी मेंढा मारा । ह्मणति सोमयाग करा ॥
जित्या पितरां नेदी अन्न । मेल्या करी पिंडदान ॥
अग्निहोत्रांचा सुकाळ । कुशा पिंपळाचा काळ ॥
मृत्तिकेचा पूजा नाग । जित्या नागा देतो डाग ॥
नामा ह्मणे अवघें खोटें । एक हरि नाम गोमटें ॥

श्री साधु तुकारामबुवांनीं म्हटलें आहेः—

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी म्हसाबाई ॥ १ ॥
रंडी चंडी शक्ति । मद्यमांस तें भक्षिती ॥ २ ॥
बहिरव खंडेराव । रोटी सुटीसाठीं देव ॥ ३ ॥
गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥ ४ ॥
मुंजा म्हैसासुरें । हे तो कोण लेखी पोरें ॥ ५ ॥
वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥ ६ ॥
तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥ ७ ॥

---

## श्रीदत्तजयंती.



श्रीदत्तजयंत्युत्सव हा मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेस दत्तोपासक भक्तिपूर्वक साजरा करितात. या दैवतासंबधीं विविध प्रकारची माहिती नानाविध ग्रंथांत पहावयास मिळते. सध्यां दत्त म्हणून ज्या त्रिमूर्तीची पूजा करण्यांत येते तिची

कल्पना केवळ पुढें दिलेल्या पुराणकालच्या एका कथानकावरून उगम पावली असावी. महर्षि अत्रींची पतिधर्मपरायण भार्या अनसूया आश्रमांत एकटीच असतां, ब्रह्मा, विष्णु व महेश हे देवत्रय तिचें सत्व कसोटीस लावून पाहण्यासाठीं तिच्या आश्रमांत वृद्ध ब्राह्मणाच्या वेषानें प्राप्त झाले. त्या देवांनीं विवस्त्र होऊन आम्हांस अन्नदान दे असें तिजकडे विक्षिप्त मागणें केलें. मनांत कष्टी झालेली पण गृहस्थाश्रमधर्मविहित गृहिणी या नात्यानें कर्तव्य करावयास सदा तत्पर असलेली ती खंबीर मनाची सती त्यांस इच्छाभोजन देण्यासाठीं आंतून बाहेर आल्यावेळीं तीं दैवतें बालरूप झालीं. तिच्या पातिव्रत्यप्रभावानें संतुष्ट होत्साते ते तिन्ही देव आपल्या खऱ्या स्वरूपांत प्रगट झाले व त्यांनीं तीं मुलें तिला मोठ्या संतोषानें अर्पण केलीं. त्यांचीं नांवें अनुक्रमें सोम, दत्त व दुर्वास अशीं ठेवण्यांत आलीं. हीं मुलें पुढें मोठीं झाल्यावर दुर्वास तपाचरणासाठीं निघून गेला. सोमानें आपलें चंद्रमंडल गांठिलें व महात्मा दत्त हा मात्र आपल्या मातापित्यांस सुखवीत त्यांच्या आश्रमांत राहिला. अत्रिपुत्र अतएव आत्रेय व अत्रीस तो देवांनीं दिला म्हणून 'दत्त' याप्रमाणें आत्रेयदत्त किंवा दत्तात्रेय असें त्यास नामाभिधान प्राप्त झालें. अत्रीनें एकदां मृत्युलोकींची यात्रा संपविली. तथापि परत तो चालू वैवस्वत मन्वंतराच्या आरंभीं अत्रि याच नांवानें जन्मास आला. त्याला सोम, दत्त, दुर्वास व अर्यमा असे चार पुत्र व अमला नामक कन्यका अशीं पांच अपत्यें झालीं.

महाभारतांतर्गत अनुशासनपर्वांत ( अ. ९१ ) स्वयंभू मन्वंतरांतील अत्रिऋषींच्या तीन पुत्रांपैकीं दत्त हा एक असल्याचें कथन केलें आहे. स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं दत्त हा एक ऋषि असून त्याला निमि नांवाचा एक पुत्र होता. निमीचा कुलगुरु वसिष्ठ वेळींच यज्ञकार्यास न आल्यामुळें निमीनें त्याजकडील पौरोहित्य काढून तें गौतमास दिलें. मानवाचें जीवित क्षणभंगुर असल्याबद्दल निमीची अशी दृढभावना झाली होती कीं एकादें सत्कार्य करण्याचें मनांत येतांच तो तें दिरंगाईवर न टाकतां एकदम करी. क्षणाची कल्पना डोळ्यांच्या पापण्या वारंवार मिटण्यावरून होते. या कालविभागास निमीवरून निमिष ही संज्ञा प्राप्त झाली. जीवितयात्रा क्षणभंगुर आहे हें लक्षांत आणून निमीप्रमाणें आमचे आर्य वक्तशीर सत्कार्यरत होतील काय ? निमीचा वंश वैदेही या नांवानें विख्यात झाला. ( मत्स्यपुराण अ. ४७ व देवीभागवत ४

स्कंद, अ. १६ ) दत्ताचा जन्म चालू मन्वंतराच्या आरंभीं प्रथम पर्ययांतील त्रेतायुगांत झाला. तो परम ब्रह्मनिष्ठ होता. अलर्क, प्रल्हाद, यदु व सहस्रार्जुन यांनीं त्याचें शिष्यत्व स्वीकारून त्याजकडून ब्रह्मविद्या संपादन केली असेंही वर्णन आढळतें. सृष्टिक्रमानुसार नऊ मास गर्भवास भोगून मार्गशीर्षाच्या पौर्णिमेस अनसूयेच्या उदरीं दत्ताचा जन्म झाल्याबद्दल स्कंद पुराणांत उल्लेख आहे. अथर्वण वेदोपनिषदास दत्तात्रेय असें नांव आहे.

## शास्त्रोक्त विधि व रूढी.

दत्तजयंत्युत्सव पाळण्यासंबंधानें शास्त्रोक्त असा विशिष्ट विधि आढळून येत नाहीं. सदर उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचें पारायण करण्याचा प्रघात आहे. यासच गुरुचरित्रसप्ताह असें म्हणतात. भजन, पूजन व विशेषेंकरून कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार प्रचारांत आहेत. शैव व वैष्णव अशा दोन्ही पंथांचे लोक दत्तोपासक असतात. महाराष्ट्राशिवाय हिंदुस्थानच्या इतर भागांत दत्तभक्तीचें माहात्म्य विशेष दिसून येत नाहीं. महाराष्ट्रांत श्रीपादयति, नृसिंहयति व नरहरियति या तीन दत्तसांप्रदायिकांनीं दत्तभक्तीचा बराच प्रसार केला. सर्व वर्णांतील भाविक हिंदु लोकांकडून गुरुचरित्राचें वाचन, पठण व श्रवण हीं भक्तिपुरस्सर करण्यांत येत असतात. गुरुचरित्र, औदुंबर वृक्ष व त्रिमूर्ति दत्तात्रेय यांची प्रत्यहीं व विशेषेंकरून गुरुवारीं पूजा करण्यांत येते. महाराष्ट्रांत गाणगापुर, नरसोबाची वाडी, मिरजेजवळचें औदुंबर हें खेडें, गोमांतकांत सांखळी, म्हैसुरांत बाबाबुडन टापूंत पिताचें देऊळ* हीं जागृत स्थानें मानिलीं आहेत. सातारा जिल्ह्यांत अखलकोप येथें दत्ताचें देवालय असून दत्तपादुकांची पूजा केली जाते. मार्गशीर्ष पौर्णिमेस, आश्विन कृ. १२ स व माघ कृ. ५ मीस मोठी जत्रा भरते. कुलाबा जिल्ह्यांत चौल येथें कुंडलिका नदीच्या मुखाशीं समुद्रकांठीं एक टेकडी आहे. या टेकडींत सुमारें १७०० वर्षांचे जुने शिलालेख आहेत. या टेकडीवर दत्ताचें देवालय आहे. तेथें मार्गशीर्ष पौर्णिमेस मोठी जत्रा भरते. अक्कलकोट महाराज नांवाच्या साधूमुळें प्रसिद्धीस आलेल्या अक्कलकोट येथील दत्ताच्या

---

* हें देवालय साधु कलंदराप्रीत्यर्थ आहे असें मुसलमान मानतात तर हिंदुलोक तें दत्तमंदिर आहे असें समजतात. एकाच देवळांत हिंदु व मुसलमान जात असलेली पाहून मोठी गंमत वाटते.

देवालयांत या दिवशीं मोठा उत्सव होतो. कोल्हापूर संस्थानांत कोडोली येथें आणि कृष्णा व पंचगंगा या नदींच्या संगमाजवळ नरसोबाची वाडी येथें दत्तभक्त फार आस्थेनें जाऊन दत्तपादुकांचें दर्शन घेतात. दत्तावतार मानलेल्या नरसिंह सरस्वती यतीचें ह्या ठिकाणीं वास्तव्य होतें म्हणून या गांवांस नरसोबाची वाडी असें नांव पडलें. वल्लभाचार्यांनंतर अस्तित्वांत आलेल्या वैष्णव पंथाचे संस्थापक श्री स्वामीनारायण हे बारा वर्षें या वाडींत ईश्वर चिंतन करीत राहिले होते असें सांगतात. माघ शु. ५ व आश्विन कृ० १२ शी पासून एक महिना वाडीस मोठी जत्रा भरते. या वेळीं हजारों यात्रेकरू दत्तदर्शनासाठीं तेथें जात असतात.

गाणगापूर, नरसोबाची वाडी वगैरे ठिकाणीं देवस्थानचा कारभार कांहीं विवक्षित ब्राह्मणांच्या हातीं असून ते सर्व जुन्या विचाराचे असल्यामुळें दूरदूरच्या ठिकाणाहून अत्यंत भक्तीनें आलेल्या भक्तांस देवदर्शन सान्निध्यांत घेण्यास परवानगी मिळत नाहीं. पतितोद्धारक व अत्यंत हीन वृत्तींच्याही भक्तांचा स्वामी म्हणून ज्याची ख्याति आहे त्या परम दयाळू परमेश्वराच्या मानवनिर्मित प्रतिमेचें दर्शन घेण्याची बंदी असावी हें आमच्या धर्मास खरोखर लाजिरवाणें आहे. **उच्चनीच कांहीं नेणें भगवंत** ही भावना ज्या भक्तिप्रधान भागवत धर्मानें सर्वमान्य होईल अशी केली त्या धर्माचे अनुयायी म्हणविणाऱ्या ब्राह्मणांनीं कालमानाकडे तरी लक्ष देऊन परम पावन अशी देवता कधीही स्पर्शाच्या योगानें भ्रष्ट होणें शक्य नाहीं हें जाणून सर्वांस देवदर्शनाचा लाभ घेण्याची मोकळीक ठेवावी हें राष्ट्राच्या व समाजहिताच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट आहे. कित्येक शिवालयांत, जगन्नाथ, तिरुपति, व्यंकटेश सारख्या विष्णुमंदिरांत व अनेक देवींच्या देवालयांत कांहीं महत्वाच्या उत्सवाच्या वेळीं तरी ब्राह्मणांपासून तहत अस्पृश्य मानलेल्या हिंदूपर्यंत सर्वांस मुक्तद्वार असतें. तद्वत वाडी वगैरे ठिकाणीं देवस्थानचे व्यवस्थापक औदार्यपूर्वक देवदर्शनाची सर्वांस सोय करून देतील तर एक अत्यंत स्तुत्य धर्मकृत्य केल्याचें श्रेय त्यांना मिळेल. आश्विन वद्य द्वादशीस गुरुद्वादशी असें म्हणतात. त्या दिवशीं या देवतेप्रीत्यर्थ कित्येक देवालयांत मोठा उत्सव होतो. कैक श्रीमंत लोकसुद्धां सदर दिवशीं कारणपरत्वें नवसाची भिक्षा मागून आणलेल्या धान्याचाच स्वतःच्या जेवणांत उपयोग करून पुष्कळ धन खर्चून हजारों लोकांस अन्नसंतर्पण करितात.

कलियुगांत तात्कालिक फल देणारें दत्ताशिवाय अन्य दैवत नसून जागृतावस्थेंत किंवा स्वप्नसृष्टींतील साक्षात्कार दाखविणारें दैवत हेंच एक आहे अशी

लोकांची दृढ समजूत झाल्यामुळें दत्तभक्ति जोरानें फैलावली. गुरुचरित्रांत वर्णिलेल्या दत्ताच्या अद्भुत कथानकांचा स्त्रियांच्या कोमल मनावर इतका परिणाम झाला आहे कीं मध्यान्हकालीं भिक्षेसाठीं येणारा एकादा बैरागी प्रत्यक्ष दत्तात्रेयच असावा या भावनेनें स्त्रिया त्याची आवांक्याबाहेर संभावना करितात व यामुळें कित्येक ऐदी भोंदूंची आयती पोळी पिकते. विद्यमानकालीं देखील संत पदवीनें अलंकृत झालेले लोक बरेच दिसत असून ते दत्तावतारी आहेत असें कित्येक भाविकांस वाटून ते त्यांच्या भजनीं लागल्याचें दिसून येत आहे.

## दत्तात्रेयाचें स्वरूप

सध्यां जें मान्य झालें आहे तें त्रिमूर्तिदर्शक तीन तोंडें, सहा हात, दोन पाय, चतुर्वेददर्शक चार श्वान व समीप एक कामधेनु असें रेखाटण्यांत येतें. कित्येक वैष्णवमताभिमान्यांचा या स्वरूपासंबंधानें कटाक्ष असून ते विष्णूचा अंशभूत हा अनसूयापुत्र सामान्य माणसांप्रमाणें एकच तोंडाचा होता असें प्रतिपादन करतात. बुद्धाच्या कालानंतर खोदण्यांत आलेल्या कांहीं प्राचीन लेण्यांत दत्ताची त्रिमूर्ति दृष्टीस पडते. सृष्टि, स्थिति व लय हे ज्याचे खेळ त्या परम समर्थ प्रभूचें रूप एकमुखी किंवा त्रिमुखी मानिलें तरी सारखेंच. ही भावना अंतःकरणांत एकदां पटल्यावर ' सहस्रशीर्ष व सहस्र पाद ' अर्थात् हजारों तोंडें व हजारों पाय ज्या ईश्वराच्या ठायीं कल्पिले आहेत त्याला तोंडें तीन किंवा एक हा वादच मुळीं राहत नाहीं.

## त्रिमूर्तीची कल्पना

प्रथमतः वेदकालांत उगम पावली. हरिद्वारावरून आरंभीं मंदगतीनें झुळझुळ वाहणाऱ्या निर्मळ झऱ्याचें पर्यवसान शेवटीं विख्यात व पवित्र अशा गंगोदधींत झालें, तद्वत् वेदकालांतील त्रिमूर्तीची कल्पना बळावत जाऊन पुराणांत तिचें मूर्तस्वरूप साफ बदललें. वेदगायकांनीं अनेक देवतांची स्तुति केली, तथापि त्यांतील अग्नि, मरुत् व सूर्य याच तीन देवांनीं अग्रमान मिळविला. सर्व देवतांच्या प्रार्थनेसाठीं रचिलेल्या सूत्रांची देवता जो ब्राह्मणस्पति तोच उपनिषत्कालीन ब्रह्म व पुराणांतील ब्रह्मा; ज्याच्या कृपाकटाक्षामुळें सृष्टीचें पालनपोषण होतें तो सूर्य हाच विष्णु व जगत्प्रलय करण्यास समर्थ जो रुद्र तोच शंकर असा त्रिमूर्तीच्या कल्पनेंत फरक झाला. कांहींचें मत असें आहे कीं त्रिमूर्तीच्या कल्पनेस मृगशीर्ष

नक्षत्राची कथा कारण झाली. ( शिवरात्री महोत्सव या सणाचें विवेचन पहा. ) रुद्रानें व्याधरूपानें मृगाला बाण मारला तो मृगाच्या शिरावर अद्यापि तीन नक्षत्रांच्या रूपानें पाहण्यास सांपडतो, यालाच वेदांत तिष्ट्रय असें म्हटलें असावें. तिष्ट्रय याचें मूलरूप त्रि–स्त्रि ( म्हणजे तीन नक्षत्रें ) असण्याचा संभव आहे. मृगशीर्षाचा रुद्रानें छेद करतांच वसंत संपातास आरंभ झाला. अर्थात् वसंताचा स्वामी विष्णु, वर्षाकालाचा स्वामी रुद्र व मृगरूपानें आलेला प्रजापति किंवा ब्रह्मा या तिघांचा दर्शक तिष्ट्रय हा असून त्यामुळेंच कालेंकरून त्रिमूर्ति–देवता अस्तित्वांत आली. या मृगशीर्षाच्या मागें व्याधासवें पाठलाग करणारीं श्वान नक्षत्रें हींच या त्रिमूर्तीच्या बरोबर असणारे श्वान होत. ही त्रिमूर्तीची कल्पना केवळ हिंदु धर्मालाच चिकटून आहे असें नाहीं, तर ती या पृथ्वीतलावरील इतर मोठमोठ्या धर्मांनाही सोडतां आली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आर्यधर्माच्या शेजारीं जो पारशी धर्म आहे त्यांतही अग्नि, उदक व सूर्य या त्रयीच्या द्वारें देवाधिदेव अहुरमझदाची प्राप्ती होते व हीं तीन रूपें त्या सर्वेश्वराचा साक्षात्कार पटवितात असें मानिलें आहे. हिंदुधर्माचें पहिलें भावंड व पुढें ज्याशीं त्याची भाऊबंदकी झाली त्या बौद्धधर्मालाही या त्रयीची कल्पना मानवली. बुद्ध, धर्म व संघ या त्रयीस प्रत्येक बौद्धधर्मीयानें शरण गेलें पाहिजे अशी त्या धर्माची सक्त आज्ञा असून तद्धर्मीय सम्राट अशोक यानें उभारलेल्या स्तंभांवरही या आज्ञेचा उल्लेख आहे.

हिंदुलोक अनेक देवतांची पूजा करितात, तथापि ब्रह्मा, विष्णु व महेश या त्रयींत सगळ्या देवतांचा समावेश होतो; तसेंच सर्व सुजाण हिंदु खरा देव अनाद्यनंत एकच असल्याचें मानतात असें सुमारें ८०० वर्षांपूर्वी आल्बेरुनीनें वर्णिलें आहे. त्यानें या त्रिमूर्तीची तुलना ख्रिस्तीधर्माच्या त्रिमूर्तीच्या कल्पनेशीं जुळवून दिली आहे. ख्रिस्तानुयायी परमेश्वराचें अस्तित्व पिता ( देव ), पुत्र ( ख्रिस्त ) व पवित्र आत्मा ( Holy ghost ) या तीन स्वरूपांत मानतात. पुराणकारांनीं त्रिमूर्तीची कल्पना ठरवितांना बुद्धधर्माच्या त्रयीची मदत घेतल्याचें संभवतें. कारण प्रसिद्ध धर्मकार मनु याच्या लेखांत त्रैमूर्तीचा उल्लेख नाहीं. त्यानें विष्णु हा शब्द एकदांच व तोही गतिवाचक वापरला आहे (अ. १२-१२१). रज, सत्व व तम या त्रिगुणांनीं हें जग भरलेलें असून परमेश्वर त्रिगुणात्मक आहे असें उपनिषत्कारांचें मत बनलें. मागें सांगितल्याप्रमाणें वेदकालीं विशेषेंकरून हे तीन गुण धारण करणारे ब्रह्मणस्पति, सूर्य व रुद्र हे अनुक्रमें ब्रह्मा,

विष्णु व महेश असें पुराणकारांनीं ठरविलें. या कालानंतर अस्तित्वांत आलेल्या उशनस, कात्यायन, पराशर व व्यास यांच्या स्मृतिग्रंथांत त्रिमूर्तीचा उल्लेख आढळतो. ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकाच्या सुमारास शूद्रक कवीनें रचिलेल्या मृच्छकटिक नाटकांत ( अंक ६ ) त्रिमूर्तीचा निर्देश झाला आहे. यावरून असें उघड होत आहे कीं सुमारें एक हजार वर्षांपासून ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रिमूर्तीसंबंधानें नक्की मत बनत चाललें. परंतु अनसूयापुत्र दत्तोच हा त्रिमूर्तीचा अवतार असें कां मानण्यांत आलें हें समजत नाहीं. हिंदुधर्मानें श्रीकृष्णासारखे परमेश्वराचे पूर्णावतार मानिले तसेच बाकीचे अंशावतारही मानिले. या अंशावतारांतील दत्त ही एक विभूति जन्मास येऊन तिनें आध्यात्मिक उन्नतीच्या विकासाप्रीत्यर्थ एका कालीं बराच यत्न केला. सृष्टि, स्थिति व लय यांस पोषक जे रज, सत्व व तमोगुण यांची आठवण करून देणारी दत्तमूर्ति, सगुणाबरोबर निर्गुण उपासनेची आठवण करून देणारे चतुर्वेदरूपी श्वान, जन्ममरणाचा फेरा चुकवून परमात्मप्राप्तीची जोड करून देणारी कामधेनु, शीतल छाया व अमृततुल्य रस देणारा औदुंबर असें मनोरम चित्र ज्यांनीं आपल्या गृहीं ठेविलें आहे त्यांनीं खऱ्या सत्वगुणी दत्ताची स्थापना हृन्मंदिरीं करून तो गुण आपलासा करून घ्यावा व कृष्णयजुर्वेदाच्या श्वेताश्वतर उपनिषदांतील ( अ. १।८।१० ) पुढील वचनांचें मर्म जाणून जीवन्मुक्त व्हावें हाच श्रेष्ठतम मार्ग होय.

**संयुक्तमेतत् क्षरमक्षरं च व्यक्ताव्यक्तं भरते विश्वमीशः ।**
**अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृभावात् ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥**
**ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ।**
**तस्याभिध्यानात्तृतीयं देहभेदे विश्वैश्वर्यं केवलं प्राप्तकामः ॥**

‘नश्वर व शाश्वत, व्यक्ताव्यक्त अशा पदार्थांपासून उत्पन्न झालेलें विश्व परमेश्वरामुळें टिकलें आहे. मूलतः सर्व कर्मांपासून अलिप्त असलेला जीवात्मा भोगेच्छेमुळें बंध पावतो. त्याला देवाचें ज्ञान होतांच त्याचे सर्व पाश तुटतात व त्याचे जन्ममृत्यूचे फेरे, अज्ञानजन्य क्लेश वगैरे सर्वांचा नाश होतो.’

त्रिगुणात्मक परमेश्वरस्वरूप अंतःकरणावर बिंबून मी म्हणजे विश्व, विश्व म्हणजे मी, मी विश्वाचा व विश्व माझें अशी दृढ भावना अंतःकरणांत बाणण्यास श्रीदत्तभक्ति कारण होवो !

## आरती दत्तगुरूची.

रज तम सत्व गुणाधिप जयजय गुरुराया ।
आकलितां मज येवो तव अद्भुत माया ॥ ध्रु० ॥
निर्गुण अससी कां तूं सगुणात्मक मूर्ति ।
मिथ्यावादी ऐशा पंडितही भ्रमती ॥
शुद्ध ब्रह्मस्वरूप वेदांती ह्मणती ।
पौराणिक सांगति तूं अससी त्रैमूर्ति ॥१ ॥
सम्यक् त्यागें मनुजा लाभ तुझा होई ।
ऐसें सांगति कोणी मुंडिति मुख डोई ॥
प्रपंचि राहुनि वृत्ती परमार्थीठायीं ।
ठेवा ह्मणती साधू याविण गति नाहीं ॥ २ ॥
ऐशा तर्कवितर्कीं मति मोहित झाली ।
नाना पंथ मतें ही बघुनी ती भ्रमली ॥
गुरुराया ज्ञानांजन नयनांतरिं घालीं ।
दावीं सत्पथ अससी भक्तांचा वाली ॥ ३ ॥
सर्वांतर्यामीं तुज, सर्वहि तुज ठायीं ।
पाहुनियां म्यां व्हावें नम्र तुझ्या पायीं ॥
तूं गुरु, बंधू, भगिनी, मित्र, पिता, आई ।
भाव मनीं दृढ होवो देवा लवलाहीं ॥ ४ ॥

---

## पौष महिना.

हा महिना इंग्रजी डिसेंबर महिन्याच्या सुमारास येतो. यांत लग्न मुंजी वगैरे शुभ कार्यें करीत नाहींत. हा महिना घराच्या पायाचा दगड बसविण्यास उत्तम असें मानिलें आहे. याला धनुर्मास असें मानीत असून या महिन्यांत सूर्योदयापूर्वीं ब्राह्मणासह भोजन केल्यास कांहीं नकळत घडलेल्या पापांचें भस्म होतें, असें शास्त्र सांगत असल्यामुळें कित्येक भाविक लोक ह्या पापपरिहाराच्या गोड उपायाचा अवलंब करितात. या महिन्यांतील मोठा सण ह्मटला ह्मणजे **मकरसंक्रमण** हा होय. सूर्यप्रीत्यर्थ अनेक व्रतें करावीं, तिल व सुवर्णदान

द्यावें, शिवास घृताचा अभिषेक करावा वगैरे धर्मकृत्यें शास्त्रकारांनीं सांगितलीं आहेत. तीं विशेष कोणी आचरीत असल्याचें दिसून येत नाहीं. मकरसंक्रमणाच्या वेळीं तीर्थांच्या ठायीं स्नान केल्यानें मरणोत्तर सद्गति प्राप्त होते अशी धर्मशास्त्रकारांनीं समजूत करून दिली असल्यामुळें या महिन्यांत गंगा व इतर नद्यांच्या कांठीं असणाऱ्या क्षेत्रांवर लाखों लोकांची जत्रा भरत असते. पौषांत कोणतेही शुभ असे गृह्यसंस्कार करीत नसल्यामुळें याला शून्य महिना असें लोक ह्मणतात.

## मकरसंक्रमण.

संक्रमण याचा अर्थ क्रमण करून जाणें असा आहे. अर्थात् मकर नांवाच्या नक्षत्र राशींत सूर्याचा प्रवेश होणें यालाच मकरसंक्रमण म्हणतात. पृथ्वी लंबवर्तुलाकार मार्गानें सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा घालीत असते हें जरी खरें आहे तरी ती स्थिर असून सूर्य फिरत आहे असा आपल्याला भास होतो. सूर्यानें क्रमण करण्याच्या भासमान मार्गाला क्रांतिवृत्त असें नांव देण्यांत आलें आहे. आरंभस्थानापासून या क्रांतिवृत्ताचे सारखे १२ भाग कल्पिले आहेत. या बारा भागांच्या ठिकाणीं असणाऱ्या ठळक नक्षत्र-पुंजांचे चित्रमय आकार कल्पून त्यांस त्या आकारांस जुळतील अशीं नांवें देण्यांत आलीं आहेत. यांस ज्योतिषाच्या भाषेंत राशी असें म्हणतात. १ मेष ( मेंढा ), २ वृषभ (बैल ), ३ मिथुन ( जुळीं ), ४ कर्क ( खेंकडा ), ५ सिंह, ६ कन्या, ७ तुला ( तराजु ), ८ वृश्चिक ( विंचू ), ९ धनु (धनुष्य), १० मकर (सुसर), ११ कुंभ, (भांडें) व १२ मीन ( मासा ) या बारा राशी होत. चंद्र देखील पृथ्वीभोंवतीं फिरत असून त्याची एक प्रदक्षिणा संपली म्हणजे एक चांद्रमास पूर्ण होतो. ज्या चांद्रमासांत सूर्याचें मेषसंक्रमण होईल त्याचें नांव चैत्र. ज्यांत वृषभसंक्रमण होईल तो वैशाख. याप्रमाणें पौष नांवाच्या चांद्रमासांत मकरसंक्रमण होतें. ज्या महिन्यांत संक्रमणच होत नाहीं अर्थात् दोन राशींच्या मध्येंच सूर्य असल्याचा भास होतो, त्या महिन्यास अधिक मास म्हणतात. ( ह्यासंबंधाची विशेष माहिती ग्रंथारंभीं दिली आहे. ) यावरून कळून येईल कीं एका वर्षांत सूर्य बारा राशींतून जातोसा दिसतो म्हणजे त्या मुदतींत बारा संक्रमणें होतात. त्यांपैकीं मकर व कर्क हीं महत्वाचीं मानिलीं आहेत. कारण पहिलें मकरसंक्रमण हें उत्तरायणाचा व आषाढांतील दुसरें कर्कसंक्रमण दक्षिणायनाचा आरंभ सूचित करितात. उत्तराय-

णास प्रारंभ झाल्यापासून सूर्याची गति उत्तरेकडे वळल्याप्रमाणें दिसत असून दिवसाचा काल क्रमानें वाढत जातो, तसतशी रात्र कमी होत जाते. दक्षिणायनांत याच्या उलट होतें.

आर्यलोकांचें आद्य वसतिस्थान उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत होतें असा विद्वान् पंडितांचा तर्क आहे. तेथें वर्षाचे सहा महिने रात्र व सहा महिने दिवस असतो; म्हणूनच तैत्तिरीय ब्राह्मणांत ( ३–९–२२ )

**एकं वा एतद्देवानामहः ॥ यत्संवत्सरः ॥**

म्हणजे ‘ संवत्सर हा देवांचा एक दिवस होय ’ असें म्हटलें असावें. संवत्सर म्हणजे देवांचे अहोरात्र ( दिवस व रात्र यास अहोरात्र म्हणतात ) असें वेदोत्तर कालीन ज्योतिषांत प्रसिद्ध आहे. यावरून देखील वरील तर्कास पुष्टी येते. सहा महिन्यांनीं कष्टमय रात्र संपून श्रीसूर्यनारायणाचे किरण वसुंधरेवर पहिल्यांदा उत्तरायणाच्या प्रारंभाच्या दिवशीं पडत तेव्हां सर्वांस अत्यानंद प्राप्त होई. या आनंदाप्रीत्यर्थ जो उत्सव करण्यांत येई तोच हल्लीं आम्ही मकरसंक्रमणाच्या दिवशीं साजरा करीत असतों. यावरून हा दिवस ऐतिहासिकदृष्ट्या किती महत्वाचा आहे हें समजून येईल. कित्येक विद्वानांचें मत असें आहे कीं उत्तरायणाचा आरंभ हाच पूर्वकालीं वर्षारंभाचा दिवस असावा. कारण याच मुहूर्तावर शिशिर ऋतूचा आरंभ होत असून प्राचीन ग्रंथांत ऋतूंसंबंधानें **ऋतवः शिशिरादयः** ( अश्वमेधपर्व, अ० ४ ) असें म्हटलें आहे. कालेंकरून अनेक कारणांमुळें कालगणनेंत फेरबदल होत जाऊन वसंत हा प्रथम ऋतु मानण्यांत आला व वर्षारंभाचे दिवसही निराळे ठरले. (याबद्दलची माहिती मागें दिली आहे. ) ज्योतिषगणिताप्रमाणें मकरसंक्रमण पौषमासांत ( जानेवारीच्या ११ पासून १४ तारखेच्या दरम्यान ) होत असतें. खरें पाहिलें असतां मकरसंक्रमण हें २३ डिसेंबर रोजीं व्हावयास पाहिजे. कारण त्या दिवशीं रात्र सर्वांत मोठी असते. नंतर ती कमी कमी होत जाऊन दिवसाचा काल वाढत जातो. असें होतां होतां ता० २३ मार्च रोजीं दिवस व रात्र हीं सारखीं असतात. पुढें दिवस मोठा मोठा होत जाऊन ता. २३ जून रोजीं तो सर्वांत मोठा असतो. नंतर दिवस कमी होत जाऊन ता० २३ सप्टेंबर रोजीं दिवस व रात्र हीं पुनः सारखीं होतात. कर्क आणि मकर राशीवर सूर्य आल्याप्रमाणें दिसूं लागल्यापासून ऋतुमानांत फेरबदल होतो. मकर राशीवर सूर्य आल्याचा निदर्शक म्हणून मकरसंक्रांत हा सण प्रचारांत आला. मकरसंक्रमणोत्सवाचा खरा इतिहास वरीलप्रमाणें आहे. तरी

## धार्मिक समजूत

निराळीच आहे. शक्तिपूजेचें महत्व वाढल्यानंतर देवीच्या निरनिराळ्या अवतारांचें वर्णन करण्यांत आलें, तेव्हां संक्रमणाची संक्रांति देवी झाली व ती संकरासुराचा या दिवशीं नाश करिते असें सांगण्यांत आलें. ही अनेकभुजा देवी एकाद्या वाहनावर बसून वस्त्रालंकारांनीं मंडित व आयुधांनीं सज्ज अशी एका दिशेकडून दुसऱ्या दिशेस जात असते असेंही पंचांगांत लिहिलेलें असतें. या संक्रांतीचें वर्णन प्रत्येक वर्षी भिन्न असतें. यांत वाहनाचा वगैरे उल्लेख केलेला असतो. उदाहणार्थ–"वाहन गाढव, पुढें मेंढा, वस्त्र पांढरें, गंध गोपीचंदनाचें, हातांत केवडा, शस्त्र काठी, भक्षण पक्वान्न, दागिने हिऱ्याचे, जाति पक्ष्याची, वयानें तरुण, निजलेली, उत्तरेकडून येणारी, दक्षिणेकडे जाणारी अशी असून नैर्ऋत्येकडे पाहते." संक्रांतिदेवी ज्या ज्या वस्तूंचा स्वीकार करते त्यांचा नाश होतो असें संक्रांतिफल सांगण्यांत येतें. आपल्या देशांत प्राचीनकालीं ज्योतिषशास्त्राचा अभ्यास उत्तम प्रकारें करून कित्येक आर्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें. या कालानंतर खरें ज्योतिष मागें पडून

## फलज्योतिष

पुढें आलें. ज्योतिषशास्त्रकारांनीं जे खगोलांतील निरनिराळ्या ज्योतीसंबंधानें शोध लाविले त्यांचा परिणाम मनुष्यावर होतो असें गृहीत धरून फलज्योतिष शास्त्र रचण्यांत आलें. अर्थात् या शास्त्रांत कांहीं ज्योतिषविषय व फलासंबंधीं कांहीं तर्क यांची सांगड घालण्यांत आली. प्राचीनकालीं माहीत झालेले बुध, शुक्र, गुरु, मंगळ व शनि या खऱ्या ग्रहांबाहेर चंद्र व सूर्य यांसही ग्रहांत गणिलें आहे. शिवाय राहु व केतु या कल्पित ग्रहांचा समावेश ग्रहसंख्येंत करून एकंदर नवग्रह मनुष्याच्या बऱ्यावाईटास कारण होतात असें फलज्योतिषकार म्हणतात. युरोपांतील फलज्योतिषी निराळ्या पद्धतीनें पण खरोखर अस्तित्वांत असलेल्या ग्रहमालेवरून खगोलशास्त्राच्या गणितानुसार भविष्य वर्तवितात; तर आपल्याकडील ज्योतिषी पुरातनकालीं अस्तित्वांत असलेल्या परंतु सध्यां प्रचीतीस न उतरणाऱ्या निरयनपद्धतीनें फलविचार करितात. यासंबंधानें शेंकडों ग्रंथ उपलब्ध असून त्यांच्या लेखकांच्या मतांत एकवाक्यता नाहीं. जन्मकालीं ज्या राशींत सूर्य असल्याचें मानतात त्या राशीस लग्न असें म्हणतात. लग्नापासून निरनिराळ्या दिशांस इतर खऱ्या व काल्पनिक ग्रहांची स्थापना करण्यांत येते.

जन्मकालावरून फलविचार ठरविण्याच्या पद्धतीस होराशास्त्र किंवा जातक असें नांव आहे. बारास्थानांची एक कुंडली काढून तींत लग्नापासून निरनिराळ्या स्थानीं जन्मकालची आकाशांतील ग्रहस्थिति दाखवितात.* या स्थानांस अनुक्रमें तनु, धन, सहज, सुहृत्, सुत, रिपु, जाया, मृत्यु, धर्म, कर्म, आय व व्यय अशा संज्ञा असून या संज्ञांनीं बोधित होणाऱ्या व त्यासंबंधाच्या इतर सर्व गोष्टींचा विचार त्या स्थानांच्या राशींच्या ग्रहांवरून व इतर ग्रहांचा त्या स्थानांशीं दृष्टयादि संबंध असेल त्यावरून करतात. आरबी, ग्रीक वगैरे यवनांकडूनही फलज्योतिषासंबंधानें ज्ञान संपादन करून आपल्या लोकांनीं प्राचीन कालीं या शास्त्रांत भर घातली. ताजिक ही शाखा आम्ही यवनांपासून घेतली. वर्षप्रवेशकालीं जें लग्न असेल तेंच वर्षलग्न असें गणून त्यावरून फलें सांगण्याची पद्धति ताजिक शाखेवरून घेतली आहे. सध्यांच्या कालीं याच पद्धतीनें संक्रांति व संवत्सरफल सांगण्यांत येतें. आपल्यास भविष्यत्कालीं काय प्राप्त होईल हें समजून घेण्यास मनुष्य केव्हांही उत्सुक असावयाचा. ही जी त्याच्यांतील कुतूहल बुद्धि तीस अनुसरून सामुद्रिक शास्त्र, होराशास्त्र, शकुनशास्त्र वगैरे भविष्यासंबंधाच्या शास्त्रांची उत्पत्ति झाली. त्यावर विश्वास ठेवणारांचा भरणा पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत आहे. तरी ज्ञाते भविष्यावर भिस्त न ठेवतां आपली जीवनयात्रा संपेपर्यंत शक्य तेवढ्या सावधगिरीनें सर्व कर्मे आचरीत असतात व त्यांच्या मनाचा पक्का निश्चय असतो कीं परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें आपल्यास शुभ किंवा अशुभ फल प्राप्त होतें, आणि म्हणूनच मनाची समान वृत्ति ठेवून तें स्वीकारण्याचीही त्यांची सर्वदा तयारी असते. हाच खरा प्रगतीचा मार्ग आहे. याचा अवलंब करण्याचें सोडून आज कित्येक शतकांपासून आम्ही हिंदुलोक फलज्योतिषशास्त्रानुसार सामाजिक, औद्योगिक, राजकीय वगैरे कार्यें करीत आलों. त्याचा परिणाम काय झाला हें समजण्यास आमच्या अधःपाताचा इतिहास व सध्यांची अवनत स्थिति हीं पुरेशीं उदाहरणें आहेत. सर्व स्थावरजंगम पदार्थांसंबंधानें खरें भविष्य वर्तवूं शकणारा एकच महाज्योतिषी जगन्नियंता परमेश्वर आहे हें आम्हीं बरोबर जाणिलें असतां आमची खरी प्रगती होत जाईल. असो. संक्रांतिसणासंबंधानें

## शास्त्रोक्त विधि

---

* ग्रह आमच्या पृथ्वीप्रमाणेंच भूगोल आहेत, व ते पृथ्वीप्रमाणें सूर्याभोंवतीं फिरतात.

असा आहे कीं या दिवशीं तिलतर्पण करून वास्तुदेवतेस व विश्वेदेवांस मंत्रोच्चारपूर्वक पूजा अर्पण करावी. स्नान, दान, श्राद्ध, भोजन इत्यादिक दिवसा करावीं, महादेवास तीळतांदूळ वहावे, तिळांच्या तेलाचे दिवे लावावे, सौभाग्यवती स्त्रियांनीं पांच घट, दोन वेळण्या, पांच बोळकीं हे जिन्नस आणून त्यांस चुना व कुंकूं लावावें व त्यांत गहूं, कापूस, हळकुंडें वगैरे घालून पांच सुवासिनींस हळदकुंकवासमवेत ते घट वायनाप्रीत्यर्थ द्यावे अशी शास्त्रविहित रूढि आहे. याला सुघट किंवा सुगड ह्मणतात. विवाहित मुलीकडून पहिल्या वर्षी या दिवशीं तेल, कापूस, मीठ, जिरें वगैरे जिन्नस कांहीं सुवासिनींस देवविण्याचा प्रघात दाक्षिणात्य ब्राह्मणांत आहे. या संक्रांतीच्या पूर्वदिवसाला भोगी असें नांव आहे. त्या दिवशीं उत्तम वस्त्रालंकारांनीं मंडित होऊन सौभाग्यद्रव्यें द्यावीं व खिचडी, लोणी वगैरे पदार्थ देवास अर्पण करून त्यांचें सेवन करावें. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशीं देवीनें किंकर नांवाच्या दैत्याचा वध केल्यामुळें त्याला करीचा दिवस किंवा कंक्रांत असें ह्मणतात. या दिवशीं उषःकालीं वेणीफणी करून सुवासिनीच्या ओट्या भराव्या वगैरे विधि सांगितले आहेत.

## या सणासंबंधी रूढि

स्थलपरत्वें भिन्न आहे. तथापि तिचें विशिष्ट लक्षण ह्मटलें ह्मणजे प्रेमवृद्धि हेंच आहे. महाराष्ट्रांत या दिवशीं तीळगूळ नांवाचा हलवा वांटण्याची चाल आहे. सौभाग्यवती स्त्रिया व कुमारिका या वेळीं आपल्या मैत्रिणींस भेटून हळदकुंकू व तीळगूळ देत असतात. याशिवाय कित्येकांच्या घरीं स्त्रियांकडून हळदकुंकवाचे समारंभ व पुरुषांकडून सम्मेलनें होत असतात. मकरसंक्रमणाच्या दिवशीं समुद्रस्नान, तीर्थस्नान, तीळतर्पण, श्राद्ध, दान वगैरे कृत्येंही करण्यांत येतात. बंगाल्यांत संक्रांतीस तिलदान देतात. गुळाच्या किंवा खजुराच्या काकवींत तीळ घालून तेही वांटण्याची चाल आहे. तेथें या मेव्याला '**तिळूआ**' असें नांव आहे. तांदुळाच्या पिठांत साखर व तूप मिसळून पिष्टक नांवाचें खाद्य तयार करून तें आप्तेष्टांसह सेवन केल्यावर गरीब लोकांस वांटण्याची चाल बंगाल्यांत आहे. यावरून या सणास तेथें **तिळूआ संक्रांति** व **पिष्टक संक्रांति** अशीं नांवें पडलीं आहेत. ऐपतीप्रमाणें रेशमी किंवा इतर वस्त्रांत पिष्टक लपेटून दूरदेशीं राहणाऱ्या आपल्या मित्रांस ते पाठविले जातात. याच दिवशीं **बावन्नबंधनाचा विधि** होतो. या संक्रांतीच्या दिवशीं गंगेंत स्नान करणें पुण्यप्रद आहे असें मानिल्या-

मुळें गंगासागरावर स्नानार्थ दोन लक्षपावेतों लोकांची यात्रा जमते. दक्षिण हिंदुस्थानांतील द्रवीड प्रदेशांत याच वेळीं **पोंगल** नांवाचा महोत्सव तीन दिवस मोठ्या प्रमाणावर चालतो. पहिला दिवस **भोगी पोंगल** किंवा इंद्रपोंगल हा वर्षाऋतूचा देव जो इंद्र त्याच्याप्रीत्यर्थ आहे. दुसरा दिवस सूर्याप्रीत्यर्थ असून त्याला **सूर्यपोंगल** असें ह्मणतात. या दिवशीं सौभाग्यवती स्त्रिया स्नान करून ओल्या वस्त्रानिशीं अंगणांत दूध व तांदूळ घातलेलें भांडें अग्नीवर ठेवितात. त्याला कढ येऊं लागतांच त्या ' पोंगल ओ पोंगल ' अशी मोठ्यानें गर्जना करितात. नंतर ती खीर गणपतीस अर्पण केल्यावर थोडी गाईस देऊन राहिलेल्या पायसाचें घरांतील मंडळी सेवन करीत असते. पोंगल हा तेलगू भाषेंतील ' पोंघडी ' व तामिळ भाषेंतील ' पोंगू ' या शब्दावरून आला असून त्याचा अर्थ ' शिजविणें ' असा आहे. अर्थात् पोंगल हा एक प्रकारचा ' पाकोत्सव' आहे असें ह्मणतां येईल. तिसऱ्या दिवशीं **मट्ट पोंगल** नांवाचा गाईंचा पोंगल होत असतो. त्या वेळीं गुरेंढोरें, घोडे वगैरे पशूंची पूजा करून त्यांस वाजतगाजत गांवांतून मिरवीत नेतात. मदुरा व तिन्नेवेल्ली येथें हा उत्सव मोठ्या प्रमाणावर होतो. या दिवशीं

' तीळगूळ घ्या आणि गोड गोड बोला '

असें ह्मणत तीळगूळ वांटण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. खीर शिजली का ? असें विचारण्याची चाल द्रविडदेशांत आहे. ( ' ऋषिपंचमीस होत असलेल्या **पजूसन** नांवाच्या जैनवर्षारंभोत्सवाच्या दिवशीं त्या धर्माचे अनुयायी एकमेकांस भेटून कृतापराधाबद्दल क्षमा मागतात. यामुळें कित्येक शत्रूही मित्र होण्याचा संभव असतो. ) या संक्रांतीच्या संबंधांत तिळाचें महत्व विशेष सांगितलें आहे.

तिलस्नायी तिलोद्वर्ती तिलहोमी तिलोदकी ।
तिलभुक्तिलदाता च षट् तिलाः पापनाशनाः ॥

ह्मणजे तिलोदकांचें स्नान करणें, तीळ वांटून अंगास लावणें, तिलहोम करणें, पितरांस तिलोदक देणें, तीळ खाणें, व तिल दान देणें हें अत्यंत पुण्यदायक आहे असें शास्त्रवचन आहे. बंगाल्यांत वराह द्वादशीस ( माघ शु० १२ ) याप्रमाणें करतात. तिळांच्या उत्पत्तीसंबंधानें एक कथा आहे. तिजवरून ते यमरायाच्या तपश्चर्येमुळें प्राप्त झाले असें दिसून येतें. यासाठीं यमाप्रीत्यर्थ सर्व कार्यांत तीळ हे श्रेष्ठ मानिले आहेत. पितृकार्य करण्याचे जे अनेक उद्देश आहेत त्यांतील एक हा आहे कीं आपल्या संततीचें कल्याण व्हावें व तिची वृद्धि व्हावी. पिकाचें

मान लक्षांत घेतां तिळाचें पीक इतर कित्येक धान्यांहून जास्त प्रमाणांत येतें. अर्थात् संतानाभिवृद्धि सुचविणारें हें धान्य तत्संबंधीं धर्मविधींत वापरण्याची रूढि पूर्वकालीं पडली असावी. प्राचीन ग्रीक लोक लग्नकार्याच्या वेळीं वधु-वरांच्या संतानाभिवृद्ध्यर्थ शुभेच्छादर्शक असें तिळांचें पक्वान्न आप्तेष्टांस वांटीत असत. उत्तरायणाच्या आरंभीं सध्यां हिंदुलोक जसे तिळगूळ, तिळुआ किंवा पिष्टक वांटतात त्याचप्रमाणें याच सुमारास होत असलेल्या क्रिस्टमसच्या ( नाताळ ) सणांत ख्रिस्ती लोक मनुकांचें पक्वान्न ( Plum cake ) एकमेकांकडे पाठवीत असतात. रोमन लोकांत पूर्वकालीं मकरसंक्रमणाच्या दिवशीं अंजीर, खजूर व मध आप्तेष्टांकडे रवाना करण्याची चाल होती. याशिवाय शुभेच्छादर्शक पत्रेंही ते पाठवीत असत. ख्रिस्ती लोकांत क्रिस्टमस कार्ड Xmas Card पाठविण्याची सध्यां चाल आहे. यावरून दिसून येईल कीं उत्तरायणाच्या आरंभाचा काल अत्यंत पवित्र व श्रेष्ठ मानून त्याप्रीत्यर्थ उत्सव साजरा करण्याची चाल सर्वत्र आहे. हिंदूंनीं या दिवसास धार्मिक वळण दिलें आहे इतकेंच.

## हेतु व बोध.

समाजांत मकरसंक्रमणोत्सव रूढ करण्याचा हेतु फार उदात्त आहे. आह्मां आर्यांत परस्पर प्रेम वाढावें, व आम्हीं प्रगतीच्या मार्गांत राहून मानवजन्माचें सार्थक्य करून घ्यावें, हाच या उत्सवाचा मुख्य हेतु आहे. या सणाप्रीत्यर्थ पाळले जाणारे विधि प्रेमवर्धक व शुद्ध स्वरूपाचे आहेत. या दिवशीं होणारीं संमेलनें, हळदकुंकवाचे समारंभ व तीळगूळ वांटण्याचा व परस्परांच्या भेटी घेण्याचा संप्रदाय हें सर्व आर्यत्वास साजेसेंच आहे. अशा उत्सवाच्या योगानें आमच्या अंतःकरणांत आम्ही सर्वजण एकाच मायदेशाचीं लेंकरें आहों, अशी बंधुत्व भावना उत्पन्न झाल्यास आमचें किती कोट कल्याण होईल बरें ? आल्हादकारक वसंतागमनाचा शुभ संदेश आणणारा संक्रमणोत्सव आमच्याठायीं सदभिलाषा व प्रेम यांस उद्भूत करीत असतो. उत्तरायणाचा प्रारंभ झाल्यापासून सृष्टीस क्रमाक्रमानें रमणीय स्वरूप प्राप्त होत जातें. या निर्मल स्वरूपाच्या आंत परम कृपाळू जगन्नायकाचें उज्ज्वल प्रतिबिंबही आपणास दृग्गोचर होऊन तच्चरणीं आपलें मन लीन होतें. फुलें व फुलपांखरें, निरभ्र नभोमंडळांतील तारागण, पुष्प-पर्णांनीं विनम्र झालेले वृक्ष व लता, अमृततुल्य कौमुदीचा वर्षाव करणारा चंद्रमा, जागोजागीं मंद गतीनें वाहणारे झरे व नद्या, शांत स्वरूप असा रत्नाकर या

सर्वांकडे पाहिलें ह्मणजे ईश्वराचें तेजोमय सांनिध्य भासूं लागतें. दिनावधि वाढत गेल्यामुळें सत्कार्यांत पडून तें चालविण्यास अधिक काल मिळतो. अशा या मंगलकालीं परस्परांच्या उपयोगी पडण्याची संवय लावून घ्यावी असें हा संक्रमणोत्सव सर्व आर्यांस प्रेमपूर्वक सांगत आहे.

——:०:——

## माघ महिना.

माघ हा इंग्रजी फेब्रुआरी महिन्याच्या सुमारास येतो. या महिन्यांत तीर्थांच्या ठायीं स्नान केल्यानें पुण्य प्राप्त होतें असें सांगितलें आहे. प्रयागक्षेत्राच्या ठिकाणीं स्त्रिया व पुरुष यांनीं क्षौर करणेंही पुण्यप्रद आहे असें सांगितलें असल्यामुळें उत्तरेंतील कित्येक सौभाग्यवती स्त्रिया देखील केशवपन करितात. याला वेणीदान विधि असें नांव आहे. कित्येक स्त्रिया फक्त दोन अंगुळें केशांचें छेदन करून त्रिवेणीची पूजा करितात. या विधीमुळें अखंड सौभाग्य प्राप्त होतें अशी समजूत आहे. पति गत झाल्यावर केशवपन करणें हें पतीस स्वर्गाचें द्वार मोकळें करून देण्यासाठीं असून तो असतांना वपन किंवा वेणीदान करणें हें अखंड सौभाग्यप्राप्त्यर्थ आहे असें मानण्यांत येतें. धर्माच्या नांवावर फलाशेनें मनुष्य काय करणार नाहीं ? गंगा व यमुना या नद्यांत या महिन्यांत देहविसर्जन करणेंही मुक्तिप्रद मानिलें असल्यावरून धर्मसिंधु वगैरे ग्रंथांत जलसमाधीचा शास्त्रोक्त विधि सांगितला आहे. सध्यां कायद्यानें हें सुलभ मुक्तीचें द्वार बंद करण्यांत आलें आहे. माघ शुक्ल पंचमीला **वसंतपंचमी** व सप्तमीला **रथसप्तमी** असें ह्मणतात. हे दोन्ही दिवस या देशाच्या बहुतेक भागांत पाळतात. माघ शुक्ल अष्टमी भीष्माष्टमी या नांवानें ओळखिली जात असून या दिवशीं भीष्मपितामहाप्रीत्यर्थ तिलतर्पण वगैरे करण्याची चाल बंगाल्याकडे आहे. माघ व० ९ **दासनवमी** या नावानें महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. या दिवशीं श्रीसमर्थ रामदास स्वामींचा जयंत्युत्सव साजरा केला जातो. माघांतील श्रेष्ठ उत्सव ह्मटला ह्मणजे **शिवरात्र** हा होय. याशिवाय माघ शुक्ल अष्टमीस मांसाष्टक, वरद चतुर्थी, श्रीपंचमी, सीतलाषष्ठि, भीमैकादशी, युगादि वगैरे कित्येक सण बंगाल्याकडे पाळतात.

---

# वसंतपंचमी.

माघ शु० पंचमीपासून वसंतोत्सवास प्रारंभ होतो, ह्मणून या दिवसास वसंतपंचमी असें ह्मणतात. माघमासीं विशेषेंकरून देवीच्या देवालयांतून वाद्य, नृत्य, गीत वगैरे उत्सव चालू असतात. वेलदोडे व मिऱ्यांची बुकी गूळ कालविलेल्या थंड पाण्यांत घालून एका प्रकारचें पेय तयार करण्यांत येतें. याला **पानक** (पान) असें ह्मणतात. हें पानक व मुगांच्या डाळीपासून तयार केलेली कोशिंबीर जमलेल्या मंडळीस वांटून देण्याची कर्नाटकाच्या कांहीं भागांत चाल आहे. विशेषतः वैशाख मासीं वसंतोत्सवाप्रीत्यर्थ तृतीया, पंचमी, नवमी, पौर्णिमा वगैरे दिवशीं देवाचे भजक देवालयांत जमतात व त्यांस आंबे, अननस, केळीं, व इतर अनेक प्रकारचीं फळें व उपरिनिर्दिष्ट पानक किंवा शक्य असेल तर पन्हें वांटण्याचा संप्रदाय गोव्यांत व दक्षिण कोंकणांत दृष्टीस पडतो. अशा उत्सवाच्या वेळीं देवस्थानासमोरील दीपस्तंभ व जवळील प्रदेश दीपपंक्तींनीं सुभूषित केला जातो हे उत्सव अखंड चालावे म्हणून भाविक लोकांनीं मोठ्या रकमा देवाच्या भांडारांत भरल्या असून त्यांच्या व्याजावर हे उत्सव चालतात. वसंतकालीं व्यक्तिमात्रानें यथाशक्ति महोत्सव करावे असें शास्त्रवचन आहे, तथापि प्रपंच सुरळीतपणें कसा चालवावा, या विवंचनेंत एकादा सणावाराचा दिवस देखील प्रसन्न चित्तवृत्तीनें घालवितां न येणाऱ्या बहुजनसमुदायास वसंतारंभाची किंवा त्याच्या समाप्तीची आठवण होण्यासही सवड नसते. परंपरागत संपत्तीचा उपभोग घेणारे कांहीं भाग्यशाली धनिक मित्रमंडळीसमवेत गायन, वादन, वनभोजन, मिष्टान्नसेवन, जलक्रीडा वगैरे समारंभांत दंग होऊन वसंताचे दिवस मौजेंत घालवितात. उत्तर हिंदुस्थानांत हा पंचमीचा दिवस पाळण्याची तऱ्हा मात्र स्थानपरत्वें भिन्न आहे. दक्षिणेंत ही तिथि विशेष रीतीनें पाळल्याचें दिसत नाहीं. तिथितत्वांत संवत्सरप्रदीपांतून जो उतारा घेतला आहे त्यावरून हा दिवस लक्ष्मीप्रीत्यर्थ पाळावयाचा आहे असें दिसतें. या दिवशीं तिला अन्नोदक व सुवासिक पदार्थ अर्पण करावे. शाई, दौत, लेखण्या व पुस्तकें यांसह श्रीसरस्वतीपूजनोत्सवाचा हाच दिवस ठरविण्यांत आल्यामुळें यास **श्रीपंचमी** असें मानून बंगाली लोक या दिवशीं सरस्वतीच्या प्रतिमेची यथासांग पूजा करितात. घरांतील आबालवृद्ध सरस्वतीस नमस्कार करून नवसही करितात. या दिवशीं लेखनाचें

काम बंद असतें. लिहिण्याचें विशेष निकडीचें काम आल्यास खडूनें किंवा कोळशानें फळीवर लिहितात. परंतु भाविक लोक कागदाचा उपयोग सहसा करीत नाहींत. उत्तर देशांत सरस्वतीपूजनाच्या दिवशीं एकादी तार आल्यास ती उघडून वाचणें हें देखील धर्मबाह्य आहे असें मानणारे कैक भाविक हिंदु अजून आढळतात. श्रीपंचमीच्या दिवशीं संध्याकाळीं मुलें विलायती पद्धतीचे खेळ खेळतात व दुसऱ्यांच्या बागेंत शिरून आपल्या अधिकारांत फळफळावळ लाटण्याची आपणास पूर्ण मुभा आहे असें समजतात. अलीकडे शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें या अजाणपणामुळें घडून येणाऱ्या अनीतिवर्धक चालीस आळा पडत चालला आहे. पूजेच्या दुसऱ्या दिवशीं गणपतिविसर्जनाच्या संमारंभाप्रमाणें भक्त मंडळी शारदा देवीच्या मूर्तीस मोठ्या थाटानें मिरवीत जवळपास असलेल्या जलाशयापर्यंत नेतात व त्यांत तिचें विसर्जन करतात.

## वसंतपंचमीचा उत्सव

जसा आजमितीस हिंदुलोकांत रूढ आहे तसा तो पूर्वकालीं रोम देशांत होता असें मानण्यास सबळ कारण आहे. रोमन पंचांगांत हा वसंतारंभाचा दिवस असल्याचें दाखविलें आहे. वसंतऋतु हा रति व मदन यांचा ऋतु आहे असें मानण्यांत येतें. तथापि त्यांप्रीत्यर्थ देवालयें नसल्यामुळें लक्ष्मी व विष्णु यांची या दिवसांत पूजा केली जाते.

चैत्र व वैशाख हा खरा वसंतकाल मानला आहे, तथापि माघांत उत्तरायणाबरोबर वसंत कालाचा आरंभ होतो. यास्तव वसंतपंचमी ही वसंतऋतूच्या आरंभाची तिथि असें मानतात. वसंतकाल हा सर्व ऋतूंत अत्यंत उत्साहवर्धक असून त्या कालानुरूप आपलें वर्तन असावें हें उचित आहे. सृष्टिदेवता जशी रमणीय स्वरूप धारण करिते, तद्वत् आपले कंगाल देशबांधव व भगिनी प्रफुल्ल चित्तवृत्तीनें सृष्टिसौंदर्य निरीक्षण करण्यांत तन्मय होऊन जातील असें करण्याचा समाजाच्या धुरीणांनीं शक्य तेवढा यत्न करावा. विवाह, उपनयन वगैरे अनेक समारंभ वसंतकालांत होत असतात. अशा वेळीं भोजनादि प्रसंगीं केवळ आप्तेष्ट व धनिक मित्र यांस निमंत्रण करण्याची चाल आहे. सदर समारंभाचा थाटमाट लांबून पाहून दिपून जाणाऱ्या गरीबांस शक्त्यनुसार अन्नवस्त्र देऊन संतुष्ट केलें असतां एक दिवस तरी त्यांस कंटकमय संसाराची विस्मृति पाडल्याचें पुण्यकृत्य ईशचरणीं रुजू होईलच होईल. असें करणें हा आर्य या नात्यानें आमचा धर्म आहे. प्रफुल्लित

होणारीं फुलें, अनेक रंगांनीं सजून नटणारीं फुलपांखरें, रानावनांतही परिपक्व होऊन त्यांची इच्छा धरणारांची तहान भूक निववणारीं अमृततुल्य फळें, सृष्टि-मातेच्या कृपाप्रसादानें सर्वांस, मग ते गरीब असोत किंवा श्रीमंत असोत, प्राप्त होतात. मग कृत्रिम सामाजिक बंधनांचे पाश किंचित् ढिले करून आपल्या श्रेष्ठ अशा कर्तव्याची हेळसांड न करण्याविषयीं आम्ही तयार झाल्यास वसंत देवतेस आमचें वर्तन मान्य होईल यांत काय संशय ? यासाठीं प्रत्येकानें स्वोदाहरणानें या दिवसांत आपल्या बांधवांच्याही अंतःकरणांत प्रेम व आनंदाचा विकास करण्याचा शक्त्यनुसार प्रयत्न करावा हें उचित होय.

---

## रथसप्तमी.

माघ शुक्ल सप्तमीला महा सप्तमी असें म्हणत असून हा दिवस सूर्यदेवाप्रीत्यर्थ पाळावा असें भविष्यादिक पुराणांत सांगितलें आहे. सूर्य हा एक तेजोमय गोल आहे व त्याच्याभोंवतीं ही पृथ्वी व पृथ्वीसारखेच इतर कित्येक गोल फिरत असतात. हें जरी खरें आहे तथापि सूर्याकडून मानवी सुखास साह्यभूत अशा गोष्टी घडून येत असल्यामुळें त्याला प्राक्कालीं देव मानूं लागले व अर्थातच त्याची पूजा सुरू झाली. ती हिंदुस्थान व इराण या देशांतच न थांबतां एशिया मायनर, रोम व ग्रीक या देशांपर्यंत जाऊन थडकली होती. सूर्योपासनेचा मुख्य हेतु आरोग्य व तदनुषंगानें उत्पन्न होणारें सुख भोगावें हा होता. यासंबंधानें पुराणांतरीं अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांतील एक अशी आहे कीं, एकदां कांबोज देशांत यशोवर्मा ह्मणून एक राजा होऊन गेला. त्याला वृद्धापकाळीं एक पुत्र झाला. तो अशक्त व रोगग्रस्त असल्यामुळें कोणत्या उपायानें बरा होईल याजबद्दल फलज्योतिषाचें मत घेतां नवग्रहांतील मुकुटमणि जो सूर्य त्याच्या कृपाकटाक्षाच्या अभावीं मुलास आरोग्य लाभत नाहीं ह्मणून महासप्तमीच्या दिवशीं व्रतस्थ राहून सूर्यपूजा करावी व त्या देवतेस अनुकूल करून घ्यावें, अशी त्यांनीं राजास सल्ला दिली. तदनुसार राजानें व्रत आचरितांच त्या राजपुत्राची कांति तेजःपुंज झाली.

स्थानपरत्वें या तिथीला निरनिराळीं नामें प्राप्त झालीं आहेत. बंगाल्यांत या दिवसास **भास्कर सप्तमी** असें ह्मणतात. शब्दकल्पद्रुमकारांनीं माघ मासास माकरी मास हें नांव दिलें असून या तिथीला **माकरीसप्तमी** असें म्हटलें आहे.

उत्तरेंत ही तिथि **अचला** व **जयंती सप्तमी** या नांवांनीं प्रसिद्ध आहे. हा मन्वंतराचा पहिला दिवस असून या दिवशीं सूर्यनारायणाची स्वारी सात घोडे जुंपिलेल्या नवीन रथांतून आकाशमार्गानें फिरावयास निघते या समजुतीनें दक्षिणेंत त्याला **रथसप्तमी** हें नांव मिळालें आहे. वेदकालीन इतिहास लक्षांत घेतां माघ शु. ७ मी ही अत्यंत महत्वाची तिथि मानीत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ( श्रावणी व महाशिवरात्र या सदरांखालीं प्रजापतीविषयींचा कथाभाग पहा. )

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

या सप्तमीच्या पूर्वदिवशीं उपोषण करावें व रात्र संपतांच अरुणोदयसमयीं मस्तकावर दीप धारण करून स्वच्छ व निश्चल अशा पाण्यांत शिरावें. तेथें सूर्योदयापर्यंत स्नान केल्यावर पुनः मस्तकावर दीप घेऊन सूर्याचें ध्यान करावें व तो दिवा पाण्यांत सोडून द्यावा. स्नानाच्या वेळीं रुईचीं व बोरीचीं सातसात पानें मस्तकावर ठेवून घ्यावीं असें मदनरत्न व निर्णयसिंधु या ग्रंथांत वर्णिलें आहे व त्याप्रमाणें बंगाल व द्रविड देशांतील भाविक स्त्रिया करीत असतात. श्रीसूर्यनारायणाची प्रार्थना कोणत्या शब्दांत करावी याजबद्दल काशीखंड, शब्दकल्पद्रुम, भविष्य पुराण वगैरे ग्रंथांत विस्तृत पण भिन्न वर्णन आहे. स्नान करून घरीं आल्यावर देवतर्पण करून तुलसीवृंदावनासमोर सूर्यासह सात घोडे जुंपिलेल्या रथाचें चित्र काढावें व त्याची पूजा करावी. गोवऱ्या पेटवून त्यांजवर मातीच्या भांड्यांत तयार केलेल्या दुधाच्या खिरीचा सूर्यास नैवेद्य दाखवावा. ब्राह्मणास धन धान्याचें दान द्यावें. ब्राह्मण सुवासिनी समवेत भोजन करावें असा विधि सांगितला आहे.

आर्यावर्तांत महासप्तमीप्रीत्यर्थ पायस ( क्षीर ) करण्याचा संप्रदाय प्रायः सर्वत्र दिसून येतो. पण याव्यतिरिक्त ही तिथि भिन्नप्रकारानें पाळतात. द्रविड देशांत या दिवशीं शास्त्रोक्त विधींस अनुसरून कामें चालत असतात. रात्रौ गायन, वादन, दीपोत्सव *रथोत्सवादि प्रकारांची गर्दी असते. ही तिथी अनध्ययनाची

---

* रथोत्सवाची कल्पना आर्यांनीं बौद्धांकडून प्रथम उचलली असावी. ख्रिस्ती शकाच्या चौथ्या व सातव्या शतकांत चिनी प्रवासी फा हायन व हुएनत्सिआंग हे हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां त्यांनीं बुद्धधर्मीय राजांच्या आज्ञानुसार रथांतून मिरवीत नेलेली बुद्धमूर्ति पाहिल्याचें आपल्या प्रवासवर्णनांत नमूद करून ठेविलें आहे. जनतेचें धार्मिक संस्कारांकडे लक्ष वेधून घेण्यास अशा प्रकारें भव्य प्रमाणावर साजरे होणारे उत्सव साधनीभूत होतात. रथोत्सवाचा मुख्य काल माघ शुक्ल सप्तमीपासून वैशाख पौर्णिमेपर्यंत असतो.

मानिल्यामुळें या दिवशीं तेथील विद्यार्थ्यांस पुस्तक वाचण्याची व लिहिण्याची सक्त मनाई आहे. बंगाल्यांत कार्तिक पौर्णिमेस व प्रत्येक रविवारीं सूर्यनारायणाची पूजा होते; इजला **ऐत ( आदित्य ) पूजा** ह्मणतात. एका लहान मातीच्या भांड्यास तांबडा रंग लावतात व त्यावर कर्दळीचें पान व विडा ठेवून त्यास रक्तवर्णी पुष्पें, दूर्वा, परमान्न ( क्षीर व पिष्टक इत्यादि ) समर्पण करितात. तसेंच या दिवशीं स्त्रिया सुस्नात होऊन हळदकुंकू वांटतात. महाराष्ट्र व कर्नाटकांतील बऱ्याच भागांत रथसप्तमीच्या दिवशीं हळदकुंकू व वायनें वांटीत असतात. परंतु तेथें ऐत पूजेची चाल नाहीं. श्रावण मासांत प्रत्येक रविवारीं सूर्यपूजा करण्याचा प्रघात कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडतो.

## सूर्योपासना व सौरपंथ.

सूर्योपासना वेदकालीं होती हें सूर्यासंबंधाच्या प्रार्थनांवरून स्पष्ट दिसतें. सूर्य हा अदितीचा पुत्र मानिल्यामुळें त्याला आदित्य असें नांव प्राप्त झालें. आकाशास अदिति असें नांव देण्यांत आलें होतें हें ऋग्वेदांतील सूक्तांवरून सिद्ध होतें. सूर्य आपल्या पापांचें क्षालन करतो अशी प्राचीन आर्यांची भावना असल्यामुळें त्यांनीं आपल्यास पापमुक्त करण्याविषयीं व आपण निष्पाप असल्याचें मित्र, वरुण व इतर देवतांस कळविण्याविषयीं सूर्याची प्रार्थना केलेली आढळते. ( ऋग्वेद मं. ७–६९–१, ६२–२. ) कौशीतकी ब्राह्मणोपनिषदांत असें सांगितलें आहे कीं, कौशीतकी प्रातःकाळीं, मध्यान्हीं व सायंकाळीं सूर्यास अर्घ्य देऊन आपणास पापमुक्त करण्याबद्दल त्याची प्रार्थना करीत असे. आजमितीसही द्विज याचप्रमाणें अर्घ्य देऊन सूर्य, मन्यु व मन्युपते हे पापमार्गापासून आपलें रक्षण करोत अशी प्रार्थना करितात. नंतर ते गायत्रीमंत्राचा उच्चार करून **'असावादित्यो ब्रह्म'** असें म्हणत तीन वेळ पाणी आपल्या डोईभोंवतीं फिरवून तें टाकून देतात. 'असावादित्यो ब्रह्म' याचा अर्थ **'हा आदित्य ब्रह्म होय'** असा आहे. उदयकालीं व अस्ताच्या वेळीं सूर्यावर दृष्टि ठेवून उदय व अस्त पूर्ण होईपर्यंत गायत्रीमंत्र जपावा असें आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. उपनयनाच्या वेळीं बटूस सूर्याभिमुख उभा करून उपाध्याय पुढीलप्रमाणें प्रार्थना करीत असतात. 'हे सवितर्, हा तुझा विद्यार्थी आहे. याचें रक्षण कर. हा मृत्युमुखीं न पडो.' धन व कीर्ति यांची प्राप्ति होण्यासाठीं सूर्याची उपासना करावी असें खादिर गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. युधिष्ठिरास सूर्यानें इच्छित अन्न देणारी थाली दिली त्या वेळीं त्यानें सूर्याची प्रार्थना केली असा महाभारतांत उल्लेख

आहे. सफेत कुष्टरोगाचें निवारण होण्यासाठीं मयूरानें सूर्याची प्रार्थना केली असें वर्णन आहे. ( मयूर हा सातव्या शतकांत हर्षवर्धनाच्या पदरीं होता. त्यानें सूर्यस्तुतिपर १०० श्लोक रचले आहेत. )

या विवेचनावरून दिसून येईल कीं पूर्वकालीं आर्यावर्तांत सूर्योपासना करण्याची चाल अस्तित्वांत होती व पापविमोचन करून अन्न, धनधान्य, कीर्ति आणि आयुरारोग्य देण्याविषयीं त्याची प्रार्थना केली जात असे. सूर्याच्या द्वादश नामांचा उच्चार करून त्यास बारा नमस्कार घालण्याची रूढि अद्यापि या देशांत आहे. शिव, विष्णु, गणपति, शक्ती वगैरे देवतांची पूजा करणारे व त्यांस भजणारे पंथ या देशांत निर्माण झाले; त्याचप्रमाणें सूर्यास देव मानून त्याची पूजा करणारा एक पंथ निघाला यांत काय आश्चर्य? हा पंथ **'सौर'** या नांवानें प्रसिद्ध आहे. या पंथाचे लोक सूर्य हा स्थिरचर सृष्टीचा आत्मा आहे असें प्रतिपादन करितात व श्रुतीचा आधार देऊन तो सकल देवतांमध्यें श्रेष्ठ आहे असें सांगतात.

**चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।**
**आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ।**

( मं. १–११५. सु. )

**अर्थ**—"मित्र, वरुण आणि अग्नि यांचे नेत्रच असें हें देवांचें आश्चर्यकारक बळ उदय पावलें आहे. स्थावरजंगम वस्तूंचा आत्माच अशा या सूर्यानें द्युलोक, भूलोक व अन्तरिक्ष यांस व्यापून टाकिलें आहे." या सूक्तावर सौरपंथीयांची विशेष भिस्त आहे. सौर पंथांत सहा भेद आहेत. एका पंथाचे लोक तांबड्या चंदनाचा वाटोळा टिळा कपाळास लावतात आणि तांबड्या फुलांच्या माळा कंठीं धारण करितात. दुसऱ्या तीन पंथांचे लोक उदयकालचा सूर्य ब्रह्मदेव, मध्यकालचा शिव व अस्ताच्या वेळचा विष्णु असें मानून त्याची पूजा करितात. पांचवा पंथ या तिन्ही कालीं दृग्गोचर होणारा सूर्य त्रिमूर्तीच्या ठिकाणीं मानतो. या पंथांतील कांहीं अनुयायी सूर्यास्त व सूर्योदय याच्या दरम्यान अन्न ग्रहण करीत नाहींत. सहाव्या शाखेचे लोक सूर्यचिन्हांकित तप्तमुद्रा शरीरावर धारण करतात व ॐ **नमः श्रीसूर्याय** हा सप्ताक्षरी मंत्र जपतात. वेदांतील सूक्तें पुरुषसूक्त व शतरुद्रीय यांचाही अर्थ निराळ्या रीतीनें करून तीं सूक्तें सूर्योपासनाविषयक आहेत असें ते प्रतिपादन करितात.

रामायण व महाभारतकालीं सूर्याचीं आयतनें स्वतंत्र मांडून तेथें या देवतेची उपासना करीत असें दिसतें. पुढें पुराणकालीं मूर्तिपूजा चालू झाल्यावर

सूर्याची प्रतिमा कशी असावी यासंबंधानेंही पुराणकारांनीं तर्क केले. सहाव्या शतकांत वराहमिहिर नांवाचा एक मोठा ज्योतिषी होऊन गेला. त्यानें सूर्याची मूर्ति कशी बनवावी हें सांगितलें आहे. कल्पतरु या ग्रंथांत माघ शुक्ल सप्तमीच्या दिवशीं देवालयांतील सूर्यप्रतिमेची पूजा करावी असें सांगितलें आहे. यावरून सुमारें १५०० वर्षांमागें या देशांत सूर्याचीं देवालयें होतीं असें दिसतें. अशा सूर्यमंदिरांचें अस्तित्व सिद्ध करणारे अनेक शिलालेख व ताम्रपट सध्यां उपलब्ध आहेत. पश्चिम हिंदुस्थानांत मुलतानपासून कच्छापर्यंत हीं देवालयें होतीं. मुलतान येथील सुप्रसिद्ध सूर्यमंदिर हुएनत्सिआंग व आल्बेरुनी यांनीं पाहिलें होतें. १७ व्या शतकांत औरंगजेब बादशहानें त्याचा समूळ विध्वंस केला. काश्मिरांत मार्तंडाचें सुंदर देवालय आहे. तें आठव्या शतकांतील असावें असें म्हणतात. श्रीनगर ( काश्मीर ) पासून सुमारें २० मैल अंतरावर असलेलें दुसरें एक सूर्यमंदिर पांचव्या शतकांत बांधलें असावें असें सर कनिंगह्याम यांचें मत आहे. सांप्रत केवळ सूर्याप्रीत्यर्थ बांधिलेलीं देवालयें कोठें आढळत नाहींत. मुंबईंत मात्र एक सूर्यमंदिर दृष्टिपथांत येतें. तथापि बहुशः सर्व देवालयांत सूर्य म्हणून एकादा पाषाण किंवा प्रतिमा दूर्वांकुरांनीं व तांबड्या फुलांनीं पूजिलेली नजरेस पडते. अबदागीर व उत्सवरथ यांवर सूर्याची प्रतिमा चित्रित केलेली आढळते. श्रावणमासांतील रविवारीं या देवतेप्रीत्यर्थ सुपारी ठेवून तिचें पूजन करण्याची चाल दाक्षिणात्य ब्राह्मणस्त्रियांत आहे. आर्यांप्रमाणें इतर धर्मीयांनीं जरी सूर्याला देवत्व दिलेलें नाहीं तरी त्याच्या ठायीं त्यांनीं आदरभाव ठेविला हें आठवड्यांतील एका वारास त्यांजकडून सूर्याचें नांव मिळालें आहे यावरून उघड दिसतें. कनिष्क या बुद्ध धर्मानुयायी राजाच्या नाण्यांवर **मायरो** हीं अक्षरें आहेत. मायरो, मिहिर, मिहर हे परभाषीय शब्द, झेंड भाषेंतील मिथ्र व संस्कृतांतील मित्र हीं सर्व सूर्याचीं नांवें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. सूर्योपासनेचें प्राबल्य सांप्रत लुप्तप्राय झालेलें दिसलें तरी सूर्यनारायणाची प्रार्थना आजतागायत त्रिकाल करणें हें वैदिक धर्माचें एक प्रधान अंग होऊन बसलें आहे. ऋग्वेदांतील ( मंडळ ३, सूक्त ६२–१० ) पुढील ऋचा अत्यंत श्रेष्ठ मानतात.

**तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥**

**अर्थ**—"अखिल चराचराला प्रेरणा करणारा जो भगवान् त्याचें सर्वांना अत्यंत प्रिय असें जें एक सर्वश्रेष्ठ अवर्णनीय उज्ज्वल तेज आहे त्याचें आम्ही

ध्यान करितों. तोच भगवान् ( सूर्य ) आमच्या बुद्धीला आणि ध्यानभक्तीला उत्तम रीतीनें प्रेरणा करो. " दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या प्रार्थनेचा अर्थ हल्लींच्या द्विजांना समजत नाहीं. अशा स्थितींत त्यांच्या कृत्यांवर किंवा विचारांवर तिचा परिणाम होणार तरी कसा? या गायत्रीमंत्राची योग्यता पूर्वकालीं किती श्रेष्ठ मानीत हें या मंत्रावर छांदोग्य वगैरे उपनिषदांबाहेर स्वतंत्र असे गायत्रीरामायणादिक ३२ ग्रंथ झाले आहेत, यावरून दिसून येणार आहे. या आर्यावर्तांत वेदकालापासून सूर्योपासना चालू होती; तथापि तिचा विस्तृत प्रमाणावर फैलाव होण्यास

## परधर्मीय व परदेशस्थ लोक

कारण झाले असें भविष्यपुराणांतील विस्तृत वर्णनावरून ठरत आहे. ऐतिहासिक ग्रंथलेखनास सर्वथैव साजेशी विश्वसनीय माहिती न मिळाल्यामुळें केवळ तत्कालीन उपलब्ध साधनांवर भिस्त ठेवून या पुराणलेखकानें दंतकथांचा आश्रय घेतला व इतिहासांत लोकोत्तर चमत्कारांची भेळ केली हें खरें; तथापि सूक्ष्मदृष्ट्या विचार करतां असें दिसतें कीं, एका काळीं परदेशांतून स्थलांतर पावून इकडे आलेल्या मग नांवाच्या सूर्योपासकांनीं सूर्यपूजेचा फैलाव या आर्यभूमींत केला. इराणी लोकांचा धर्मसंस्थापक झरतुष्ट्र हा याच मगांपैकीं एक असल्याचें जसें भविष्यपुराणावरून ठरत आहे, तसेंच अवांतर ऐतिहासिक पुराव्यावरूनही सिद्ध होत आहे. यासंबंधी त्रोटक माहिती मागें दिली असून प्राचीनकालीं आर्यांतील भाऊबंदकीमुळें सुर व असुर किंवा देव व दैत्य हे भेद उत्पन्न होऊन त्यांच्यांत लढे कसे उत्पन्न झाले हें दाखविलें आहे. भविष्यपुराणांत असें वर्णन आहे कीं, श्रीकृष्णपुत्र सांब हा कुष्ठरोगानें पीडित झाल्यामुळें यादवांचा उपाध्याय गौरमुख याच्या सल्ल्यानें सूर्याची पूजा करण्यासाठीं त्यानें शाकद्वीपाहून मग नांवाचे सूर्योपासक ब्राह्मण आणविले. सुजीव्ह या मिहिर गोत्री ब्राह्मणाला निक्षुभा नांवाची एक कन्या होती. तिला सूर्यापासून जरशस्त किंवा जरतुष्ट्र* हा पुत्र झाला व

---

* अर=नांगरणें या कृषिविषयक शब्दावरून आर्य शब्द आला. प्राचीनकालीं हे शेतीला उपयुक्त होणारे घोडे, उंट, गुरें ढोरें वगैरेंचे कळप बाळगून रहात. या पशूंच्या संपत्तीवरून कित्येक कुलांत पुढीलप्रमाणें नांवें प्राप्त झालीं:—

१ गुष्टास्प ( गुत्साश्व किंवा अश्वगुत्स ), २ पावोरोशास्प ( जरतुष्ट्राचा पिता पौरुषाश्व ), ३ जमास्प ( यमाश्व ), ३ जरत् कुलाचा जरतुष्ट्र, ४ अश्वपति, कैकय व हय वगैरे नांवाच्या कित्येक पुरुषांचें वर्णन पारसी धर्मग्रंथांत व भारतादि पुराणांतही सांपडतें. कै हा शब्द गावो ( गाई ) यावरून आला.

त्याची संतति मग या नांवानें प्रसिद्ध झाली. इ. स. ११३७।३८ च्या एका शिला-लेखांत मग हे सूर्यापासून उत्पन्न झाले व त्यांस सांबानें या देशांत आणिलें असें म्हटलें आहे. आल्बेरुनीनें या देशांत आल्यावर मगांस पाहिलें व ते इराणी मगांचे वंशज आहेत असें त्यानें आपलें मत नमूद करून ठेविलें. कालगतीनें मगांचे वंशज विस्तार पावून राजपुताना, बंगाल व पश्चिम हिंदुस्थानाचा कांहीं भाग यांत इतस्ततः पसरले. हे मग तैल बुद्धीचे असल्याबद्दल यांची ख्याति असून यांच्यांत कांहीं नामांकित कवि होऊन गेले.

## इराणी व हिंदुधर्मांचा तुलनात्मक विचार.

वर शाकद्वीप व तेथील मूळचे रहिवासी मग लोक यांचा उल्लेख केला आहे. हिंदुस्थानाबाहेरील अन्य धर्मीय लोकांस शक असें म्हणण्याचा प्रघात होता. भविष्यपुराणांतील शाकद्वीप हें आतां इराण या नांवानें प्रसिद्ध असून तेथें मग या नांवाची जात असल्याचें इतिहासावरून दिसून येत आहे. त्यांस मनूनें पल्हव ( पार्शी ) असें म्हटलें आहे. डॉ. हॉग सारख्या चौकस इतिहाससंशोधकानें पार्शी धर्मग्रंथांचें आस्थापूर्वक परिशीलन करून असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदु हे मूळचे इराण देशाच्या उत्तरप्रदेशीं होते. तेथें या कुलांत भाऊबंदकी उत्पन्न होऊन यादवी माजली व जे थोडे लोक देशत्याग करून पूर्वेस निघाले त्यांनीं प्रथम पंजाब प्रांतांत ठाणें दिलें. या आर्यांच्या अंतःकरणांत देव व धर्म यांज-बद्दल सद्भाव वसत होता. यास्तव त्यांजकडून जें अति महत्वाचें कार्य घडलें तें धर्मसंबंधींच होय. आर्यांच्या आद्य धर्मग्रंथांस वेद असें नांव असून इराणां-तील त्यांच्याच भ्रातृव्यांनीं पूज्य मानिलेल्या ग्रंथांस अवस्ता किंवा झेंद अवस्ता* असें ह्मणतात. या दोन्ही ग्रंथांत वर्णिलेल्या देवता बहुशः एकच आहेत; इतकेंच नव्हे तर ऋग्वेदांतील कैक देवता त्याच नांवानें किंवा अल्प रूपांतरानें अवस्ता ग्रंथांत सांपडतात. वायु, वृत्रघ्न, हविष्ठ (यविष्ठ) या देवता व सूर्य अणि वरुण यांची उपासना त्याच किंवा तत्सम नांवांनीं केलेली आढळते. यज्ञयागादिकांचे सर्व विधि समान असून निरनिराळ्या स्तोत्रसमूहांस लाविलेला यस्न हा शब्द यज्ञ व यजनवाचक आहे. आमचे यज्ञ सोमरस व मांस यांशिवाय सांग होत नसत. त्याच प्रमाणें पारसीकांचे यज्ञही या द्रव्यांशिवाय पूर्ण होत नसत. सोम या अर्थी **होआम** हा शब्द अवस्ता ग्रंथांत वापरला आहे. मित्रवरुणादिकांच्या

---

* झेंद ही जुन्या संस्कृताशीं जुळती भाषा आहे.

कथा ऋग्वेदांतल्याप्रमाणें हुबेहूब अवस्ता ग्रंथांत सांपडत असून कित्येक प्रार्थनांचें भाषांतर केल्यास तें या दोहोंपैकीं कोणत्या ग्रंथांतील आहे हें अचूक सांगणें कठीण होईल.

ज्याप्रमाणें पारशांच्या धर्मग्रंथांत देव हा शब्द मूलतः देवार्थीच योजिला आहे, तसाच ऋग्वेदाच्या कांहीं भागांत असुर हा शब्द देवत्ववाचक वापरला आहे. तसेंच अग्नि, इंद्र, वरुण, वगैरे देवतांची स्तुति ऋग्वेद व अवस्ता ग्रंथाचा कांहीं भाग यांत बहुतेक सारखीच केलेली आढळते. यावरून पारशी व आर्य लोक विभक्त होण्यापूर्वी ज्या प्रार्थना त्यांच्यांत होत्या त्या विभक्त झाल्यावरही त्यानें यथातथ्य ठेविल्या; पुढें मात्र विरोध वाढत गेला तसे एकमेक दुसऱ्याच्या देवतांची निंदा करूं लागले आणि म्हणूनच मूळचे कित्येक देवतावाचक शब्द विरुद्धार्थी वापरण्यांत येऊं लागले. आर्यांचा देवाधिदेव जो इंद्र त्यास पारसिकांनीं नीच व लबाड मानून त्याला नरकाधिपति बनविलें. उलटपक्षीं ज्या त्वष्ट्यावर वेदगायकांनीं शिव्यांची लाखोली वाहिली आहे तोच त्वष्टा किंवा तीर पारसिकांस वंद्य वाटूं लागला. वेदगायकांनीं पारसिकांस पूज्य वाटणारा देवाधिदेव असुर ( अहुर ) याजबद्दल तिरस्कारव्यंजक उद्गार काढले तर पारसिकांनीं देवास भूतकोटींत गणिलें.

वेद हे अपौरुषेय आहेत असें आर्यांचें मत आहे. अवस्ता धर्मग्रंथ देखील जरशस्तास प्रत्यक्ष देवाकडून प्राप्त झाला व अंतःकरणांत धर्मासंबंधीं जिज्ञासा उत्पन्न झाल्यावर बह्मन् या देवतेच्या द्वारें अहुरमझ्दास जरशस्तानें कांहीं प्रश्न विचारले; त्यांचीं उत्तरें त्या देवाधिदेवानें **श्रोश** या देवदूताच्या विद्यमानें दिलीं असें पारसिक समजतात. आर्यांचा आद्य मनू मोठा नीतिशास्त्रज्ञ होऊन गेला असें जसें हिंदू समजतात, तद्वत् पारसिकही आपला मनुश्चेचर ( मनुष्येश्वर ? ) हा मोठा स्मृतिकार होऊन गेला असें मानतात. हिंदूंनीं **ब्रह्म** हें सकल वस्तूंचें आदिकारण मानलें तर त्यांच्या इराणांतील बंधूंनीं **बम्हन** म्हणजे चांगलें मन असा अर्थ केला. येथील आर्यांनीं पुनर्जन्मापासून मुक्त होण्याचे उपाय शोधिले तर पारसिकांनीं आपलें मृत शरीर पुनः सजीव* होईल असें मानून देहात्मवादास साजेशा रीतीनें अमरत्व ( अमरतत् ) व अजिंक्यपणा मागितला. पारसिकांचें

---

* ख्रिस्ती लोकांची पुनरुत्थापनाची (Resurrection) कल्पना या कल्पनेशीं साम्य पावते.

मुख्य धर्मग्रंथ **झेंद अवस्ता, गाथा, वेंदिदाद, यजस्ने** किंवा **यस्न** हे आहेत. पहिला ग्रंथ खुद्द जरशस्त व त्याच्या शिष्यांनीं लिहिला. गै म्हणजे गाणें यावरून आलेल्या देवाच्या प्रार्थना गाथाग्रंथांत आहेत. वेंदिदाद किंवा **वेंदेवोदाद** ( वि म्हणजे विरुद्ध व देवो म्हणजे देवांच्या ) यांत आर्यांच्या देवतांची निंदा आहे. यजस्ने किंवा यस्न हा यज्ञासंबंधीं माहितीचा ग्रंथ आहे. एकंदरींत आपले धर्मग्रंथ अपौरुषेय असल्याबद्दल या दोन्ही धर्मीयांची कल्पना, पारसिकांचा **बह्मन** व आर्यांचे **ब्रह्म, श्रोश** यांशीं जमता शब्द **श्रुति** वगैरे-वरून पाहूं जातां पार्शी हे आमचे केवळ देशबंधूच नसून धर्मबंधूही आहेत असें आज प्रत्ययास येत आहे. मागें नृसिंहावताराच्या विवेचनांत इराणी हेच पुराणांत वर्णिलेले

## असुर, दैत्य किंवा दानव

होत असें जें म्हटलें आहे त्या विधानास पुष्टी देणारा बराच आधार देतां येईल; परंतु विस्तारभयास्तव तसें करणें इष्ट नाहीं. अद्यापि इराणी लोक आपल्यास **दांघावो** असें म्हणवितात. **दस्यवः** व **दानव** हे शब्द **दांघावो** यावरून आले असावे असें डॉ. स्पूनर यांचें मत आहे. बंगाल, बिहार व ओडिसा या ठिकाणीं वस्ती केलेल्या या लोकांचा तसेंच कांबोज, पारद व पल्हव यांचा मनुस्मृतींत निर्देश झाला आहे. हे सर्व इराण्यांचे वंशज आहेत असें पंडितांचें मत आहे. ऋग्वेदांत वृत्रास दानव असें म्हटलें असून यजुर्वेदांत ( ५०-७३ ) व अथर्व वेदांत ( ४०-२४ ) हा शब्द शत्रु या अर्थी वापरला आहे. अवस्ता ग्रंथांतही याच अर्थी दानव हा शब्द वापरला आहे असें डॉ. हॉग म्हणतात. महाभारतांत ( आदिपर्व ६७ ) जरासंध हा पूर्वजन्मीं दानवाधिपति होता असें म्हटलें आहे. हाच जरासंध मगध देशाचा राजा असून त्या देशास मगांवरूनच तें नांव प्राप्त झालें असें भविष्यपुराणांत सूचित केलें आहे.

**मगं ध्यायन्ति ते यस्मात्तेन मगधाः स्मृताः ।**

( मगांचें म्हणजे दोषांचें ध्यान करीत असल्यामुळें, अर्थात् कोणत्या कर्मापासून कोणता दोष लागेल हें मनांत आणून वागत असल्यामुळें, त्यांस मगध असें म्हण-तात. ) या मगांचीं १८ कुलें या देशांत आलीं. ते वेदाचा विपरीत अर्थ करणारे आहेत असें भविष्य पुराणांत म्हटलें आहे. मग लोक कंबरेसभोंवतीं अभ्यंगाचें वेष्टन करीत. याला झेंद भाषेंत **ऐव्याओंघेन** व संस्कृतांत **अभ्यंग** हें नांव

असून हल्लीं पार्शीलोक त्यास **कस्ति** असें म्हणतात. त्यांच्यांतील कस्ति व सद्रे धारणाचा विधि जवळ जवळ आमच्या मौंजीबंधनासारखाच आहे. १२०० वर्षांपूर्वी पारशी लोक आपल्या जन्मभूमीचा त्याग करून या देशांत आश्रयार्थ आले; तेव्हां त्यांच्यांत रूढ असलेली अग्निपूजा, वर्णव्यवस्था,* सूर्यपूजा व त्यांचे आर्यांशीं जुळते असे आचारविचार पाहून त्यांस **संजान** येथें तत्कालीन राजानें आश्रय दिला. संख्येनें अल्प असलेल्या या लोकांत दानशौर्य, ज्ञानलालसा, उद्यमशीलता, धीरोदात्तता, प्रेमळ वर्तणूक हीं आजवर अखंड चालू असून यांच्यांत सर्व भरतखंडास ललामभूत असे महर्षि दादाभाई नौरोजी व फेरोजशाह मेथासारखे महनीय मुत्सद्दी, वाडिया, सर जमशेटजी जिजीभाई व टाटासारखे संपत्तीचा सव्यय करणारे महोद्योगी पुरुष निर्माण झाले. आमच्या खांद्यास खांदा भिडवून आर्यभूमीची सेवा करावयास हे आमचे बंधु आम्हांस परत मिळाले याबद्दल आम्ही धन्यता मानणें उचित आहे.

## हेतु व बोध

परमेश्वर स्थिरचरव्यापक असून अखिल ब्रह्मांड हेंच त्याचें अद्भुत व अतर्क्य देवालय आहे त्याचा संपूर्ण महिमा वर्णन करण्यास कोणताही धर्मसंस्थापक किंवा धर्मग्रंथ समर्थ झाला नाहीं. परमेश्वरासंबंधानें ज्यांनीं म्हणून आजवर विचार केला त्या सर्वांनीं आपल्या मनास पटल्या त्या ईशप्राप्तीच्या दिशा दाखवून दिल्या. कोणी अग्नीची तर कोणी सूर्याची योग्यता विशेष आहे असें मानून त्याच्या उपासनेचें महत्व गाइलें.

एकेकालीं सर्व प्राचीन राष्ट्रांत अग्निपूजेचें मोठेंच स्तोम माजून राहिलें होतें. हिंदुस्थानांत तर यज्ञयागांतील अग्नीबद्दल फारच पूज्यत्वभाव वसत होता. यज्ञादिकांतील हविर्भागांवर देवांचा उदरनिर्वाह चालतो असें मानण्यांत आल्यामुळें व अग्नीशिवाय यज्ञाची सांगता होणें अगदीं अपरिहार्य असल्यामुळें अग्नीची इतकी थोरवी गाइली आहे कीं अग्नीस 'सकल देव कल्याणकर्ता' अशी पदवी मिळाली. तसेंच सर्व देवांमध्यें वयानें तो यविष्ठ म्हणजे लहान असें समजत व याला प्रमाण अरणींच्या ( समिधांच्या ) घर्षणामुळें हरएक यज्ञसमयीं तो नव्यानेंच प्रदीप्त

---

*पारसिकांत अथर्वण किंवा **अथोर्नन, रथेष्टर, वस्टेरीयस** व **हुतोक्ष हे** चार भेद पूर्वकालीं होते. ते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र याच अर्थाचे आहेत.

होई हें होय. याच कारणाकरितां त्याला घर्षणोद्भव किंवा प्रमंथ हें नामाभिधान प्राप्त झालें आहे.

कालांतरानें या सर्व शक्तींची भक्ती एकाच सर्वसमर्थ देवांत परिणत झाली. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांत पुढीलप्रमाणें परमेश्वराचें स्वरूप वर्णिलें आहे.

"सर्वस्रष्टा श्रेष्ठ होय. त्यानें सर्व ( विश्व ) उत्पन्न केलें. तो सर्वांचें पोषण करितो, व सर्व वस्तुमात्राचा तो अधिपति आहे. तो सप्तर्षींच्याही पलीकडे रहात असून त्याची कृपा ज्याच्यावर होते, त्याच्या सर्व मनकामना सिद्ध होतात. ज्या पित्यानें आम्हांस उत्पन्न केलें, जो सर्व मानवकुलास व पदार्थमात्रास जाणतो त्याला अनेक देवांचीं नांवें आहेत तरी तो एकच आहे ( ऋक्- १०-८२ ). ज्यानें आह्मांला जीव व सामर्थ्य दिलें, ज्याची आज्ञा सर्व देव पाळतात, ज्याची छाया हाच मृत्यु, ज्याचें तेज हेंच अमरत्व, जो स्थिरचर पदार्थांचा धनी, ज्याच्या पराक्रमामुळें हे हिममय पर्वत, ही पृथ्वी व हा सागर हीं सर्व उत्पन्न झालीं आणि ज्याचे बाहु आकाशमंडळांत पसरले आहेत त्या एका परमेश्वराशिवाय आम्ही दुसऱ्या कोणाचें यजन करणार ?( ऋक्. १०-१२१ )

बहुतेक याच परीनें साधुसंतांनींही परमात्म्याचा साक्षात्कार जाणिला. सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, तारागण, महासागर यांच्या द्वारें परमेश्वराच्या अगाधत्वाबद्दल कल्पना होत असून त्यांच्या उपासनेच्या योगानें परमपदाची प्राप्ति करून घेण्याचा पंथ खरोखर उदात्त स्वरूपाचा होय. रथसप्तमीसारखे उत्सव आम्हांस प्राक्कालिन आर्यांची आठवण करून देत असून त्यांचे वंशज या नात्यानें आमच्यावर असणाऱ्या धार्मिक कर्तव्याची जाणीव आमच्या अंतःकरणांत उद्भूत करीत आहेत. यासाठीं या सणाचें सध्यांच्या काळीं कितीही बरें वाईट रूपांतर झालेलें असो आम्ही त्याच्या उत्पादकांची स्तुतिच करितों. श्रीसूर्यनारायण सर्वांस आयुरारोग्य व ज्ञानप्रकाश देवो !

---

## महाशिवरात्र.

हिंदु लोकांत ब्रह्मा, विष्णु व शिव या तीन देवता मुख्य कल्पिलेल्या आहेत; त्यांपैकीं ब्रह्म्याची पूजा करण्याचा संप्रदाय नाहीं. तथापि प्रत्येक शुभाशुभ कृत्य शेवटीं ब्रह्म्यालाच जातें अशी एक पौराणिक कथा आहे. परंतु गीतावाक्य

( अ. १७–२३ ) व इतर तात्विकग्रंथ यांतील विचार लक्षांत घेतां असें दिसतें कीं प्रत्येक कर्माच्या अंतीं " ॐ **तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु** " या शब्दांनीं केलेला संकल्प निरुपाधि, निरवयव व विश्वकारण रूप जें ब्रह्म त्याच्याच विषयींचा आहे. आणि याप्रमाणें फलेच्छा न धरतां, ब्रह्मार्पण केल्याशिवाय कोणतेंही धर्मकृत्य सांग होत नाहीं. विष्णु व शिव यांपैकीं कोणा एकाची तरी आराधना हिंदु म्हणविणारा प्रत्यहीं करीत असतो. या प्रत्येक देवतेस अनुलक्षून निरनिराळे उपासनेचे दिवस अस्तित्वांत आले आहेत. शिवाप्रीत्यर्थ जो उत्सवदिवस विशेष आस्थेनें व भक्तिपुरःसर पाळला जातो तो **महाशिवरात्र** हा होय. हा सण प्रत्येक माघ व. १४ स साजरा केला जातो. प्रत्येक महिन्याच्या वद्य १४ स शिवरात्र असें मानतात आणि माघांतील शिवरात्र विशेष महत्वाची गणली जात असल्यामुळें तिला महाशिवरात्र असें म्हणण्याचा प्रघात आहे. या सणाची उत्पत्ति कशी झाली हें सांगण्यापूर्वीं शिवोपासनेचा उगम या देशांत कसा झाला हें सांगणें इष्ट असल्यावरून तत्संबंधी माहिती पुढें देत आहों.

## ऋग्वेदकालीं शिवोपासना.

चतुर्वेदांतील आद्य असा जो ऋग्वेद त्यांत शिवाचें स्वरूप व त्याचा महिमा रुद्र या संज्ञेनें वर्णिला आहे. विश्वासंबंधानें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, तें जितकें आनंदजनक व शिवकारक आहे तितकेंच तें भयप्रद व अशिव आहे. ऋतुपरत्वें होणाऱ्या मेघगर्जना, मरुत्प्रकोपामुळें समुद्रांत घडून येणारी प्रचंड खळबळ, महान् वृक्षांचें उन्मीलन, विद्युत्पात व तज्जन्य अनर्थ, भूकंप व उल्कापात या सर्व गोष्टी अंतःकरणांत भीति उत्पन्न करितात. पर्यायेंकरून अशा अनर्थांचा परिणाम विश्वाच्या प्रगतीच्या दृष्टीनें कांहीं अंशीं हितावह होतो हें खरें, तरी तात्कालिक परिणामांकडे पाहतां ज्या प्रचंड संहारक शक्तीच्या द्वारें हें कार्य घडून येतें, त्या अद्भुत शक्तीसंबंधानें विचार करण्याकडे मनुष्यमात्राची प्रवृत्ति असावी यांत नवल नाहीं. आमच्या आद्य ऋषींनीं या भयानक शक्तीस रुद्र हें नांव देऊन तिची अनेक परीनें करुणा भाकिली आहे. अन्नोदक देऊन आपलें पालनपोषण करणारी जगज्जननीपदास नेऊन पोहोंचविलेली श्रीविष्णु देवता प्राचीन आर्यांस जितकी पूज्य झाली तितकीच किंबहुना अधिक प्रमाणांत या विश्वाचा लय करण्याचें सामर्थ्य असलेली रुद्रदेवता वंद्य झाली; अर्थात् विष्णूच्या पूजेचा उगम जसा प्रेमापासून झाला तद्वत् रुद्रपूजेचा उगम भीती-

पासून झाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या रुद्रदेवतेचें स्तुतिपर वर्णन अनेक प्रकारें केलेलें आढळतें. उदाहरणार्थ ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतील १२४ व्या सूक्तांत पुढील वर्णन आहे.

“ जो प्रत्यक्ष पराक्रमच आहे, जो जटाभारांनीं मंडित आहे आणि ज्याचा आश्रय अखिल वीर करीत असतात त्या रुद्रास आम्ही हें स्तोत्र अर्पण करीत आहों. ( या योगानें आमच्या द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांचें कल्याण होईल व या ग्रामांतील प्राणिमात्र अभिवृद्धि पावून दुःखमुक्त होईल. ) देदीप्यमान, जटाधारी व त्वेषयुक्त रूप धारण करणाऱ्या त्या स्वर्गीय वराहास वंदन करून आम्ही येथें पाचारण करीत आहों. तो आपल्या हातांत आवश्यक वाटणारीं औषधें धारण करून आम्हांस सौख्य, अभय व सुरक्षितपणा यांचा लाभ करून देवो. हे रुद्रा, आमच्यांतील थोर किंवा सान यांपैकीं कोणालाही इजा होऊं देऊं नको. आमच्या मातापितरांस मारूं नकोस. आमच्या प्रिय शरीरांस तुजकडून इजा न पोहोंचो. गाई व पुरुष यांचें हनन करणारें तुझें शस्त्र दूर राहो. वीर पुरुषांस आश्रयभूत झालेल्या देवा, तुझ्याजवळील उत्कृष्ट वैभव तेवढें आम्हांकरितां असूं दे. तूं आम्हांस सौख्य दे व आमचा कैवार घेऊन बोल. तूं द्विगुणित सामर्थ्यवान् असल्यामुळें आम्हांस सुरक्षित ठेव.”

या व अशाच आशयाच्या अनेक स्तोत्रांवरून सिद्ध होतें कीं, रुद्र हा द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांवर सत्ता चालविणारा, त्यांचा संहारकर्ता व त्यांचा हितकर्ताही आहे असें प्राचीन आर्य मानीत असत. तथापि त्याला कल्याण करण्याची शक्ति आहे असें समजत असल्यामुळें त्याजकडून वरप्रदान घेण्यास ते सदा तत्पर असत. सर्व वनस्पतींचा तो स्वामी आहे असें मानून औषधी जाणणारा मोठा भिषग्वर आहे या समजुतीनें अनेक रोगांपासून मुक्त करण्याबद्दल वेदगायकांनीं त्यास स्तविलें आहे.

औषधींच्या द्वारें तूं आमच्या सैनिकांस खडखडीत बरें कर. वैद्यांचाही तूं अपूर्व वैद्य असल्याबद्दल तुझी ख्याति आहे. हे रुद्रा, तुझा तो मंगलकारक हस्त—पीडितांस व्याधिनिर्मुक्त करणारा तुझा तो औषधियुक्त हस्त—कोठें आहे ? हे मरुतांनों, तुमचीं औषधें अत्यंत पवित्र, मंगलकारक व कल्याणप्रद आहेत. त्यांची आम्ही सर्वांच्या सुखसोयीसाठीं रुद्रापाशीं याचना करीत आहों.”

( ऋग्वेद मंडल २, २७ ).

याप्रमाणें रुद्र हा भिषग्वर आहे हें मानण्याचें एक कारण असें दिसतें कीं सर्व वनस्पतींचें माहेरघर मानिलेल्या हिमाचलावर त्याचें वासस्थान आहे, व योग्य कालीं वर्षाव करून त्यांचें तो पोषण करितो असें त्याचे भक्त मानीत. रुद्राचें निवासस्थान व त्याचा संचार अरण्यांत व पहाडावर आहे; अतएव तेथील हिंस्र पशूंचा वध करण्यास तो समर्थ आहे असें ठरवून त्याला कुशल शस्त्रधारी असें म्हटलें असावें.

"भगवान रुद्राचीं अस्त्रें आम्हांस वगळून दुसऱ्यांकडे जावोत. त्याच्या जाज्वल्य क्रोधाचा आवेश देखील इतरत्र वळो. दानशूर यजमानांच्या हितार्थ तूं आपल्या अढळ धनुष्याची दोरी अमळ सैल कर" इत्यादि प्रकारें त्याची जागोजागीं प्रार्थना केलेली आढळते. शिवाचें मुख्य आयुध त्रिशूल होतें तथापि व्याधाप्रमाणें वर्तत असतां तो धनुष्यबाणाचा उपयोग करितो असें मानीत. मृगाची किंवा प्रजापतीची शिकार करते वेळीं त्यानें धनुष्यबाणाचा उपयोग केला असें दर्शविलें आहे. ऋग्वेदकालानंतर रुद्रासंबंधानें आदरभाव कमी न होतां उलट वृद्धिंगत होत चालला यास तत्कालीन लेख साक्ष देतात.

## यजुर्वेदांतील शिवोपासना.

यजुर्वेदांतर्गत तैत्तिरीय संहितेंत रुद्रासंबंधानें बरेंच वर्णन असून त्या कालीं त्याची आराधना विशेष मान्य झाली होती असें दिसतें. शतरुद्रीयांत रुद्राच्या अंगीं असलेल्या चांगुलपणाचें वर्णन सविस्तर केलें असून बहुतेक तेंच वर्णन त्यानंतर अस्तित्वांत आलेल्या पुराणकारांनीं निराळ्या कथानकांत ओंविलें आहे. त्याला पशुपति, गिरीश किंवा गिरित्र, नीळकंठ, कपर्दिन् किंवा जटाधारी, शर्व किंवा धनुर्विद्यापटु, शिव, शंकर म्हणजे कल्याणकर्ता वगैरे अनेक सार्थ नांवें दिलीं आहेत. अत्युच्च पर्वताच्या शिरोभागीं रुद्राचें वासस्थान असून आसमंतात् अभ्राच्छादित प्रदेशांतून तो विद्युत्प्रहार करतो यासाठीं त्याला गिरीश हें नांव पडलें. इंद्रधनुष्याच्या रंगानें सुशोभित झालेल्या ढगांत रहाणाऱ्या रुद्र देवास ताम्र, अरुण, बभ्रु, नीलकंठ वगैरे नांवें देण्यांत आलीं. अत्युत्तम औषधींचा धनी व विषवर्षाव करणाराहि तोच, या दोन वर्णनांची सांगड घालून समुद्रमंथनाच्या वेळीं हालाहल विष पचविल्यामुळें तो नीलकंठ झाला असा कथाभाग पुढें रचण्यांत आला. अत्यंत उपयुक्त असणाऱ्या चतुष्पादांचा हा स्वामी असल्यामुळें त्यास पशुपति हें नांव पडलें. अग्नि व रुद्र हे एकच आहेत ही कल्पना

मान्य झाली तेव्हां अग्निज्वालांची त्याच्या जटेशीं तुलना करून त्याला कपर्दिन् असें संबोधूं लागले. अवर्षण पाडूं पाहणाऱ्या निर्जल ढगांवर विद्युत्शल्य टाकून त्यांस हटविणाऱ्या रुद्राला शर्व किंवा धनुर्वेदवेत्ता हें नांव प्राप्त झालें. शिव, शंभु व शंकर हीं शुभसूचक नांवें त्याच्या कल्याणप्रद गुणांवरून त्यास पडलीं. या प्रकारचे अनेक तर्क विद्वानांनीं रुद्रदेवतेसंबंधानें केले आहेत.

आर्यांनीं हें दैवत पूज्य मानिलें, तसेंच निषाद, चोर, दरवडेखोर, लुटारू, वाटमारे वगैरे नागरिकांपासून लांब रहाणारे लोक याच वेदांत वर्णिलेल्या रुद्र देवाच्या भजनीं लागले. मात्र त्यांनीं त्याच्या संबंधाच्या कल्पनांस आपल्या कोत्या विचारांचें वळण दिलें. त्यांनीं त्यास अरण्यवासी बनवून उग्र अशा पंचाननाशीं त्याचें साम्य कल्पिलें व त्याच्या गळ्यांत रुंडमाळाही चढविल्या. निषादांनीं आपल्या प्रमाणें तोही मृगचर्मधारी आहे असें समजून त्याला किरातांचा अधिपति मानिलें. यावरून त्याला कृत्तिवासाः म्हणजे मृगचर्मधारी असें नांव प्राप्त झालें. गांवाच्या सीमेवर व रानाच्या जवळपास असणाऱ्या स्मशानावरही रुद्राचें स्वामित्व आहे असें मानून तो चिताभस्मधारी रुंडमालाधर आहे अशा कल्पना उद्भवल्या. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं या दैवताचे उपासक जे निषाद त्यांनां रुद्र असें म्हणत. त्याप्रमाणेंच कुंभार, सुतार वगैरे कारागीर याच देवाला भजत असून त्यांच्या कुलांना गण हें नांव असे. त्यांचा जो नायक तोच—गणपति-रुद्रदेवतेचा सर्व कार्यांत उजवा हात झाला. ( गणपतीसंबंधाचें विवेचन पहा.) याप्रमाणें आर्य व अनार्य, सुशिक्षित व अशिक्षित हे सर्वच रुद्रभक्तीचें महत्व मानूं लागले.

## उपनिषदांतील शिव.

यजुर्वेदकालीं रुद्राचें महत्व वाढल्यामुळें त्याचा परिणाम कांहीं उपनिषत्कारांवर झाला. शतरुद्रीयांत रुद्रास विश्वाचें आदिकारण, देवांचा जनिता व वर्धन करणारा महायोगी असें म्हटलें आहे. बहुतेक याच आशयाचे कांहीं उतारे श्वेताश्वतरोपनिषदांत सांपडतात. रुद्राला ईश, ईशान व शिव हीं नांवें दिलेलीं असून त्याच्या ठायीं अपरंपार शक्ति असल्याचें वर्णिलें आहे. तो प्राणिमात्राच्या अंतर्यामीं वसत असून विश्वालाही व्यापून आहे आणि त्याचें ज्ञान करून घेतल्यानें मानवास अमरत्व प्राप्त होतें वगैरे जें या उपनिषदांत लिहिलें आहे, त्यावरून

ज्याला ब्रह्म ही संज्ञा मागाहून देण्यांत आली, तेंच ब्रह्म म्हणजे रुद्र आहे असें मत उपनिषत्कालीं बनलें असावें. अथर्वशीर्ष उपनिषदांत रुद्राचें महत्व फार वर्णिलें आहे. तो अनाद्यनंत व शाश्वत असून विश्वोत्पत्ति व विश्वाचा नाश हीं त्याजकडूनच होतात असें दर्शविलें आहे. विष्णु, महेश्वर, उमा, स्कंद, विनायक, ईशान, भगवत, महदेव, ब्रह्म इत्यादि नांवांनीं त्याला संबोधिलें आहे. ॐ या प्रणवाचा जप करून पाशुपतव्रत केलें असतां मुक्ति मिळते असेंही या उपनिषदांत वर्णिलें आहे.

उपनिषत्कालीं वेदांत वर्णिलेल्या देवतांचें प्रस्थ कमी होत जाऊन एकेश्वरी मताचा अनुवाद करण्यांत समाजांतील सुजाण लोक गुंतले होते. या अनेक देवतांचा उत्पादक असा एकच देव आहे असें मत बनत चाललें होतें. केनोपनिषदांत असें म्हटलें आहे कीं ब्रह्मानें देवांना असुरांवर जय मिळवून दिला; परंतु अग्नि, वायु, इंद्र वगैरे देवतांना तो आपल्याच पराक्रमानें मिळाला असा गर्व झाला तेव्हां ब्रह्म प्रकट होऊन त्यानें अग्नीस एक गवताची काडी जाळण्यास व वायूस ती हलविण्यास सांगितलें, पण त्यांच्यानें तें होईना. इतक्यांत इंद्र पुढें आला, तेव्हां ब्रह्म अंतर्धान पावलें व त्या जागीं हैमवती उमा प्रगट झाली. इंद्रानें तिला विचारलें कीं, आतां अंतर्धान पावलेलें "पूजनीय ब्रह्म तें हेंच कीं काय ?" तेव्हां ती "होय" असें म्हणाली. या उताऱ्यावरून कळून येईल कीं इंद्रादिकांविषयींची पूज्य बुद्धि कमी होऊन विचारी लोकांचें ब्रह्माकडे लक्ष वेधूं लागलें होतें. हैमवती उमेनें ज्याला ब्रह्म म्हटलें तोच शिव होता हें देखील वरील उताऱ्यावरून सिद्ध होतें. श्वेताश्वतरोपनिषदांत माया हीच प्रकृति असून तिचा भोक्ता महेश्वर असल्याचें कथन केलें आहे. पुराणकालीं महेश्वर हें नांव रुद्रास–शिवास–देण्यांत आलें; तसेंच माया किंवा प्रकृति ही शिवाची अर्धांगी ठरली. शतपथब्राह्मणांत अंबिका ही रुद्राची बहीण असें म्हटलें आहे, परंतु पुराणकालीं रुद्राच्या किंवा शिवाच्या पत्नीस अंबिका हें नांव प्राप्त झालें. मुंडकोपनिषदांत अग्नीच्या सात ज्वालांचें वर्णन असून त्यांना काली, कराली, मनोजवा, सुलोहिता, स्फुलिंगिनी व विश्वरूपी अशीं नांवें दिलीं आहेत. हींच नांवें कालेंकरून रुद्रपत्नीलाही देण्यांत आलीं. हिरण्यकेशी गृह्यसूत्रांत शिवाप्रीत्यर्थ शूलगव यज्ञाचा जो विधि सांगितला आहे त्यांत त्याला मृड, भव, इंद्र, रुद्र व शर्व या नांवानें संबोधिलें आहे. अर्थात् त्याची पत्नी मृडानी, भवानी, इंद्राणी, रुद्राणी आणि शर्वाणी या नांवांनीं पुराणकालीं प्रसिद्ध झाली.

## महाभारतकालीं रुद्रोपासना.

महाभारतांत अनेक ठिकाणीं शिवासंघाचा उल्लेख आहे. त्यावरून असें दिसतें कीं, व्यासानें मूळ भारत लिहून काढल्यावर त्याची पूर्तता सुमारें ५०० वर्षेपर्यंत निरनिराळ्या लेखकांनीं करून महाभारत हा प्रचंड ग्रंथ संपूर्ण होण्याच्या अवधींत रुद्र किंवा शिव या देवतेसंबंधानें आदरभाव होता. किरात ( शिव ) व अर्जुन यांचें युद्ध, अर्जुन व कृष्ण यांस शंकराचें हिमालयावर दर्शन, अश्वत्थाम्यास शंकराकडून खड्गप्राप्ति, अर्जुनाला पाशुपतास्त्राची शिवाकडून भेट, शिवप्रसादानें जांबुवंतीच्या उदरीं झालेल्या श्रीकृष्णपुत्र सांबाची कथा, उपमन्यूस उमामहेश्वराचें दर्शन, अर्जुनानें युद्धारंभीं केलेलें दुर्गास्तवन इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केला असतां त्या कालीं शिव हें दैवत आर्य लोकांस पूज्य झालें होतें असें म्हणतां येईल. शिवाप्रीत्यर्थ केल्या जाणाऱ्या

## लिंगपूजेसंबंधाची माहिती

महाभारतांत उपलब्ध आहे. यारून ती पूजा कित्येक शतकें या देशांत चालू आहे असें दिसतें. या पूजेच्या उत्पत्तीसंबंधानें नक्की ऐतिहासिक माहिती देणें अवघड आहे. वेदकालीं आर्यांत लिंगपूजा रूढ नव्हती; परंतु अनार्यांत मात्र ती होती ( ऋग्वेद मंडळ ७, सूक्त २१–५ ) असें दिसतें. लिंगांची पूजा करणारांकडून यज्ञास विघ्न न पोहोंचो, या आशयाच्या प्रार्थनेवरून लिंगपूजक आर्यांच्या यज्ञकार्यांत विघ्नें आणीत हें स्पष्ट दिसतें. दुसऱ्या एका ठिकाणीं इंद्रानें लिंगपूजा करणारांचा नाश करून त्यांच्या नगरींतून द्रव्यहरण केलें असा उल्लेख आहे. यावरून इंद्रास देव न मानणाऱ्या अनार्यांत लिंगपूजेची चाल होती असें अनुमान निघतें. कालगतीनें अनार्यांचा आर्यांत मिलाफ झाल्यावर वेदमार्गीयांतही ही पूजा सुरू झाली असावी. पतंजलीच्या कालीं शिवप्रतिमा–पूजनाचा प्रघात होता असें त्याच्या सूत्रांतील उदाहरणांवरून दिसतें. त्या कालीं सार्वजनिक देवालयांत शिवप्रतिमेची पूजा चालत असे.

रामायणकालीं लिंगपूजा नसावी. रावण शिवलिंगाची पूजा करीत असे व रामानें सेतुबंधनापूर्वी रामेश्वर येथें शिवलिंग स्थापन केलें असा जो रामायणांत उल्लेख आहे तो प्रक्षिप्त असल्याबद्दल पंडितांचें मत आहे. महाभारतलेखनाचें काम चालू असलेल्या मुदतींत उच्चवर्णीयांनींही लिंगपूजा स्वीकारिली असें दिसतें. कारण उपमन्यूनें इंद्रवेषांत आलेल्या महादेवाची स्तुति करितांना

शिवलिंग हें सर्व लोकांस श्रेष्ठ वाटल्यामुळें त्याची सार्वत्रिक पूजा होते असें म्हटलें आहे. पुराणकालीं मात्र या पूजेचें महत्व अधिकाधिक वृद्धिंगत होऊन तिच्या उत्पत्तीसंबंधानें हरतऱ्हेच्या कथांचा उदय झाला. पद्म व वायु पुराणांत हीं कथानकें सांपडतात. या कथांचा मथितार्थ इतकाच आहे कीं शिवसंज्ञक देवता चराचर उत्पादक असून या तिच्या शक्तीचें द्योतक लिंग आहे; परंतु केवळ एकट्या शंकराकडून हें उत्पत्तीकार्य होणें असंभाव्य असल्यामुळें शंकराबरोबरच त्याची आदिशक्ति पार्वती इजलाहि पूजेमध्यें स्थान मिळून योनिपूजेचा उपक्रम सुरू झाला. ( यासंबंधीं विशेष माहिती नवरात्र या सदराखालीं दिली आहे. ) कांहीं पुराणें शिवपर तर कांहीं विष्णुपर असून वैष्णवांनीं लिंगपूजा करणाऱ्या शैवांवर व उलटपक्षीं शैवांनीं शालिग्रामशिळेची पूजा करणाऱ्या वैष्णवांवर यथेच्छ तोंडसुख घेतलें आहे. वेदकाल व पुराणकाल या कालांतील उपासनांत फार महत्वाचें अंतर आहे. वेदकालीं जरी अनेक देवता पूज्य मानल्या होत्या तरी उपासक आपल्या उपास्य देवतेची केवळ स्तुति मात्र करीत; पण पुढें पुराणकालीं आपल्या देवतेचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याकरितां इतर देवतांस जेंणेंकरून लघुत्व आणतां येईल असे उपाय अट्टाहासानें योजण्याकडे उपसकांची प्रवृत्ति झाली. याचें पर्यवसान आर्यांतल्या आर्यांत अहमहमिका सुरू होण्याच्या बीजारोपणांत झालें. सध्यां हिंदुस्थानांत प्रसिद्ध शिवस्थानें १२ असून हीं सर्व पूर्वकालीं शिवपुऱ्या होत्या असें तेथील देवालयें व वस्ती पाहिली असतां दिसतें. या ज्योतिर्लिंगांचीं नांवें पुढीलप्रमाणें होतः—

१ प्रभासपट्टणचा **सोमनाथ,** २ श्रीशैल्य **मल्लिकार्जुन,** ३ उज्जयनीचा **महाकाल,** ४ नर्मदेंतील **ओंकारमांधाता,** ५ हिमालयांतील **केदार,** ६ डाकिनीवनांतील **भीमाशंकर,** ७ श्रीक्षेत्र काशी येथील **विश्वेश्वर,** ८ नाशिकाजवळ **त्र्यंबकेश्वर,** ९ चिताभूमींतील परळी **वैजनाथ,** १० दारुकावनांतील अवंढ्या **नागनाथ,** ११ सेतुबंध **रामेश्वर,** १२ वेरूळचा **घृष्णेश्वर.** याशिवाय स्थानपरत्वें माहात्म्य पावलेलीं कानडा जिल्ह्यांतील ५ लिंगें, कारवाराजवळ सेज्जेश्वर, गोकर्णांत महाबळेश्वर, होन्नावराजवळ गुणवंतेश्वर, धारेश्वर व मुर्डेश्वर व दक्षिण हिंदुस्थानांत कांजिवरम्, त्रिचनापल्लि, श्रीकालहस्ती, तिरुवण्णामल्लि व चिदंबरम् येथील अनुक्रमें पृथ्वी, आप, अग्नि, वायु व आकाश हीं पंचतत्वात्मक लिंगें प्रसिद्ध आहेत.

## पुराणकाल व नंतरची शिवोपासना.

पुराणकालीं शिव व विष्णु यांचें वर्णन करतांना वेदकालापासून पुराणकालापर्यंत रुद्रोपासनेंत जीं स्थित्यंतरें होत गेलीं, त्या सर्वांचा समावेश करून पुराणकारांनीं शिवाचें नक्की स्वरूप ठरविलें. आर्य व अनार्य भिन्न दृष्टीनें त्याची योग्यता मानीत. या दोघांच्याही विचारांचें प्रतिबिंब पुराणकालीन* शिवपूजेंत दिसून येतें. याशिवाय महायोगी, † नाट्यकुशल व गानपटु असल्याबद्दल शिवाची प्रसिद्धि आहे. पुराणकारांच्या प्रयत्नामुळें त्या कालीं शिवोपासनेचा प्रभाव सर्व देशभर वाढला व त्याचमुळें द्वादश ज्योतिर्लिंगें व इतर सुप्रसिद्ध लिंगें जिकडे तिकडे प्रसिद्धीस आलीं. शिवदेवतेप्रीत्यर्थ पाळल्या जाणाऱ्या निरनिराळ्या दिवसांत माघ वद्य चतुर्दशीचा दिवस श्रेष्ठ मानिला आहे. अल्बेरुनीनें फाल्गुन वद्य प्रतिपदेस लोक शिवरात्र पाळतात असें लिहून ठेविलें आहे. प्रत्येक मास पौर्णिमांत धरला असतां ही तिथि माघ वद्य प्रतिपदा ठरते. बंगाल्यांत फाल्गुन वद्य चतुर्दशीला अर्थात् बहुतेक येथील रिवाजाप्रमाणेंच शिवरात्र पाळतात. कारण तेथेंही पौर्णिमांत मास गणण्याची पद्धति आहे.

## शिवरात्रीची उत्पत्ति

ज्या कारणामुळें झाली, त्यासंबंधाच्या कथा ईशानसंहिता, शिवपुराण वगैरे ग्रंथांत सांपडतात. ब्रह्मा व विष्णु यांजपेक्षां शिवदैवताची योग्यता मोठी आहे हें दर्शविण्यासाठीं, ते दोघेही या दिवशीं शिवलिंगाचा आदि व अंत शोधून काढण्याकरितां दोन दिशेनें गेले व शेवटीं एका वर्षानें याच दिवशीं ते भग्न मनोरथ झालेले शिवाकडे येऊन त्यांनीं शिव हा आपल्याहून श्रेष्ठ असल्याचें प्रांजलपणें कबूल केलें असें ईशानसंहितेंत लिहिलें आहे. दुसरी एक पौराणिक कथा अशी आहे कीं एक व्याध शिकारीसाठीं एका वृक्षावर टपून बसला असतां कांहीं हरीण त्याच्या

---

* शिव हा जाडा वैय्याकरणी होता; याजकडून विख्यात पाणिनीला व्याकरणाच्या सूत्रांची माहिती झाली असें वर्णन आहे.

† नाट्यांत कुशल म्हणून यास नटेश्वर असें नांव आहे. या नटेश्वराचें देवालय दक्षिणेंत प्रसिद्ध असून तेथें मार्गशीर्ष शुक्ल षष्ठीला आर्द्रा उत्सव नांवाचा मोठा जयंत्युत्सव होत असतो. शिवानें रूढ केलेल्या नृत्यास तांडवनृत्य असें म्हणतात. नटराजन् हें शिवाचें नांव द्रविड प्रदेशांत चालू आहे.

तावडींत सांपडले. पण त्यांनीं इहलोक सोडण्यापूर्वीं आपल्या आप्तेष्टांच्या भेटी घेण्यासाठीं जाऊं देण्यास त्या पारध्यास विनविलें. त्यांच्या विनंतीस त्यानें रुकार दिल्यावरून सकाळच्या वेळीं ते सर्व वचनबद्ध मृग परत आपल्या आप्तेष्टांसह मरण्यासाठीं तयार होऊन आले; पण त्या मृत्यूच्या द्वारीं असलेल्या मृगांची सत्यपालनाविषयींची तत्परता पाहून तो व्याध अंतर्यामीं कळवळला. शेवटीं त्या सर्वांस नकळत शिवरात्रीचा उपवास घडल्यामुळें मृगासह त्याचा उद्धार होऊन त्यांस कैलास प्राप्त झाला. सध्यां दृग्गोचर होणाऱ्या मृगशीर्ष नक्षत्राशीं या कथेचा संबंध आहे असें दक्षिण हिंदुस्थानांतील लोक समजतात. शिवरात्री-संबंधीं येथें प्रचलित कथा किंचित् भिन्न आहे. ज्या वृक्षावर तो पारधी शिकारी-साठीं बसला होता तो बिल्ववृक्ष होता. त्या झाडावरून आपल्या सोयीसाठीं त्यानें कांहीं बिल्वपत्रें तोडून खालीं टाकिलीं तीं त्या झाडाखालीं वाळूंत एक सांबाची पिंडी होती तिच्यावर पडलीं. सर्व रात्र त्यास उपोषण घडलें व बिल्वदलें पिंडीवर पडल्यामुळें त्यास आयतेंच शिवपूजनाचें पुण्य लाभून कैलास प्राप्त झाला.

## वेदकालीन कथा

सुमारें सात आठशें वर्षांमागें शिवस्तुतिपर लिहिलेल्या महिम्न स्तोत्रांत खालीं दिलेल्या श्लोकांत रुद्रस्वरूपाचें वर्णन केलें असून हें रुद्राचें गंभीर स्वरूप अद्यापि नभोमंडळांत पाहण्यास सांपडतें असें म्हटलें आहे.

वियद्व्यापी तारागणगुणितफेनोद्गमरुचिः  
प्रवाहो वारां यः पृषतलघु दृष्टः शिरसि ते ।  
जगद्द्वीपाकारं जलधिवलयं तेन कृत-  
मित्यनेनैवोन्नेयं धृतमहिम दिव्यं तव वपुः ॥ १७ ॥  
प्रजानाथं नाथ प्रसभमभिकं स्वां दुहितरं ।  
गतं रोहिद्भूतां रिरमयिषुमृष्यस्य वपुषा ॥  
धनुष्पाणेर्यातं दिवमपि सपत्रीकृतममुं ।  
त्रसंतं तेऽद्यापि त्यजति न मृगव्याधरभसः ॥ १८ ॥

अर्थ—तुझ्या मस्तकावर जो जगद्व्याळ व असंख्य तारकापुंजामुळें अधिकच फेसाळ झालेला असा तुषारयुक्त पाण्याचा प्रवाह दिसतो त्यानें द्वीपाकार जगताला समुद्राप्रमाणें वेष्टण घातलें आहे. यावरून तुझ्या दिव्य विराट देहाची

कल्पना येते. । १७ । हे प्रभो, हरिणीचें रूप धारण केलेल्या व स्वतःच्या कन्येचा उपभोग हरिण देहानें घेऊं इच्छिणाऱ्या प्रजापतीच्या मागें हातांत धनुष्य घेऊन सदोदित त्याला बाणांनीं विद्ध करीत, तूं केवळ शिकारी मनुष्याला योग्य अशा दांडगाईनें, मागें लागला आहेस. तो घाबरला आहे तरी तूं त्याला अद्यापि सोडीत नाहींस. हें वर्णन प्रजापतीविषयीं वेदांत सांपडणाऱ्या वर्णनाशीं जुळतें व महिम्न स्तोत्र रचणारास देखील नभोमंडळांतील मृगशीर्ष नक्षत्राचा तारकापुंज व आकाशगंगा पाहून रुद्राचा महिमा अवर्णनीय आहे असें वाटलें.

ऋग्वेदांत रुद्राच्या पराक्रमाचें वर्णन करतांना मृग व व्याध यांची गोष्ट सांगितली आहे. ही गोष्ट मृगशीर्ष नक्षत्राविषयींची असून रुद्रानें व्याधरूपानें प्रजापतीचा पाठलाग केल्याचें दर्शविलें आहे. आर्द्रा नक्षत्राचा स्वामी रुद्र आहे. आर्द्रा नक्षत्राचा प्रवेश हाच पर्जन्य कालाचा आरंभ असल्यामुळें त्या नक्षत्राचा स्वामी जो रुद्र ( किंवा भयानक गर्जना करणारा ) तो जसा सर्व प्राणिमात्र व वनस्पती यांचा हितकर्ता तसा मेघगर्जना, विद्युत्गर्जना व झंझावात यांच्या योगानें भीति उत्पन्न करणारा भयानक देव आहे अशी कल्पना प्राचीन कालीं रूढ होती. या देवतेनें प्रजापतीचा पाठलाग करून त्याला बाणानें वेधिलें. प्रजापती म्हणजेच संवत्सर व संवत्सर म्हणजे एक संपूर्ण यज्ञसत्र असा निष्कर्ष पंडितांनीं काढिला असून माघ पौर्णिमेस या यज्ञाचा विध्वंस रुद्रानें केला. अर्थात् यज्ञरूपी प्रजापति किंवा मृगरूपी प्रजापति किंवा संवत्सर यांचा शिरच्छेद करणारा रुद्र याचें दृश्य मृगशीर्ष नक्षत्रांत अद्यापि पाहण्याजोगें आहे असें महिम्नकार म्हणतात. आर्द्रा नक्षत्र आकाश गंगेच्या ( Milky way ) जवळ आहे म्हणून हीच गंगा स्वर्नदी या नांवानें प्रसिद्धीस येऊन ती रुद्राच्या जटाभारांतून वाहते अशी कल्पना पुराण कालीं प्रचलित झाली. महाभारताच्या सौप्तिक पर्वांत ( १८, १३–१४ ) पुढील वर्णन आहे.

ततः स यज्ञं विव्याध रौद्रेण हृदि पत्रिणा ।
अपक्रांतस्ततो यज्ञो मृगो भूत्वा स पावकः ॥
स तु तेनैव रूपेण दिवं प्राप्य व्यराजत ।
अन्वीयमानो रुद्रेण युधिष्ठिर नभस्तले ॥

**अर्थ**—रुद्रानें यज्ञाचें हृदय आपल्या बाणानें छेदिलें. यज्ञास बाण लागतांच तो अग्नीसह मृगाच्या रूपानें पळाला आणि नभोमंडळांत पोंहोचला. तेथें तो रुद्र त्याचा

पाठलाग करीत आहे अशा स्थितींत तो यज्ञ किंवा तें मृगशीर्ष प्रकाशत आहे. दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस करणारा हाच भयानक रुद्र आहे अशी कथा पुराणांत सांपडते. तिचा उगम या वेदकालीन ऋषींच्या रुद्रस्तवनापासून झाला यांत संशय नाहीं. पुराण कालापूर्वी व वेदकालानंतर महाभारतकालीं उपरिनिर्दिष्ट मृगव्याधाची गोष्ट लोकांस अवगत होती. प्रजापतीनें स्वतःचा यज्ञ करून जगांतील प्राणिमात्रादिक उत्पन्न केले अशी ही कथा आहे. कालिदासाच्या शाकुंतलांत दुष्यंत राजास अनुलक्षून

**मृगानुसारिणं साक्षात्पश्यामीव पिनाकिनम् ।**

( म्हणजे मृगाच्या मागें धांवणाऱ्या शिवाला साक्षात् मी पाहतों ) असें म्हटलें आहे. यावरून या मृगव्याधाच्या गोष्टीशीं संबंध असलेलें मृगशीर्ष नक्षत्र, हें काव्य रचते वेळीं कालिदास कवीच्या नजरेसमोर होतें असें दिसतें. रुद्राच्या सान्निध्यांत श्वान असल्याचेंही प्राचीन कालीं मानीत. हीं श्वान-नक्षत्रें श्वन् व प्रश्वन् या नांवानें प्रसिद्ध आहेत. पितृयान मार्गाच्या आरंभीं हे श्वान असल्यामुळें रुद्रास पितरांचा व स्मशानाचा स्वामी असें समजतात. ही प्राचीन मृगव्याधाची कथा पुराणांत निराळ्या पद्धतीनें लिहिली जाऊन सध्यां प्रचलित असलेली साधी कथा अस्तित्वांत आली असावी. ( श्रावणी प्रकरण पहा ) माघ पौर्णिमेस किंवा त्या सुमारास नवीन वर्ष किंवा ऋतूचा ( वसंत संक्रमणाचा ) प्रारंभ प्राचीन काळीं होतांच एकाष्टक नांवाच्या यज्ञास प्रारंभ होई. हा बारा दिवस चाले. अर्थात् माघ व॥ १४ ही शिवरात्र या नांवानें प्रसिद्धीस येण्यास वेदकालीन ऋषींची स्तोत्रें, त्या कालीं चालत असलेले यज्ञ व पुराणकारांच्या धार्मिक कल्पना कारणीभूत झाल्या असल्या पाहिजेत हें निर्विवाद आहे. तेव्हां हल्लींच्या शिवरात्रीचा उगम कमींत कमी पांच सहा हजार वर्षांमागें झाला व ती पाळणारे आम्ही एका प्राचीन धार्मिक विधीची स्मृति कायम ठेवीत आहों या दृष्टीनें शिवरात्रीचें महत्व फार आहे हें कबूल केलें पाहिजे. शिवरात्रीच्या दिवशीं शिवपूजनानंतर अर्घ्य देतेवेळीं दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा शिवानें विध्वंस केल्याबद्दल त्याची स्तुति केली जाते यावरून देखील हल्लींची शिवरात्र वेदकालीन. ऋषींच्या मृगशीर्षाच्या वर्णनावर अधिष्ठित आहे असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. तेव्हां दक्षिण हिंदुस्थानांतील लोक शिवरात्रीचा संबंध मृगशीर्ष नक्षत्राशीं लावतात हेंच योग्य दिसतें.

## शास्त्रोक्त विधि व रूढि.

त्रयोदशीच्या दिवशीं महाशिवरात्रीव्रत आचरावें. रुद्रमंत्रोच्चारपूर्वक शिवलिंगास अभिषेक घातल्यावर शक्त्यनुसार अष्टोत्तर, सहस्र किंवा लक्ष बिल्वपत्रें त्यास अर्पण करावीं. तीन प्रहरांपूर्वी शिवरात्र संपल्यास चतुर्दशीच्या अंतीं व तीन प्रहरांपेक्षां अधिक चतुर्दशी असेल तर प्रातःकालीं तिथीचा अंत होण्यापूर्वीच पारणें करावें. अशा रीतीनें चतुर्दशीच्या दिवशींच शिवरात्र घडून पारणें करावयाचा योग क्वचित्च येतो. हा योग विशेष पुण्यकारक मानिला आहे. शिवपूजनानंतर मिष्टान्न सेवावें असें शास्त्रवचन असल्यामुळें एक शिवरात्र वर्ज करून इतर कोणत्याही शिवव्रताच्या दिवशीं देवपूजा संपतांच भोजन करतात. परंतु शिवरात्र तिसऱ्या प्रहरीं संपते आणि हिंदुपद्धतीप्रमाणें मध्यरात्रीनंतर भोजन वर्ज्य असल्यामुळें फलाहाराची योजना झाली आहे. यास्तव शिवरात्र हा उपोषणाचा दिवस मानिला जातो. सर्व भाविक शैवपंथी शिवरात्र पाळतात. कित्येक वैष्णवही या दिवशीं शिवलिंगाची पूजा करणें वैष्णवसंप्रदायाच्या ब्रीदास विघातक आहे असें मानीत नाहींत. कालमानाप्रमाणें हें व्रत पाळण्याचे कडक निर्बंध सुटत जाऊन हल्लीं एक दोन प्रहर रात्रीच्या आंतच पूजाअर्चादि उरकून घेण्यांत येतात. लहानमोठ्या सर्व शिवालयांत भक्तजनांची गर्दी उसळते. काशी, गोकर्ण, बेळिवी, सिद्धनाथ, वैजनाथ, रामेश्वर, ओंकार, महाकालेश्वर वगैरे क्षेत्रांत लाखों लोकांची यात्रा जमत असते. यांपैकीं उत्तरेकडील लोक काशीस जितकें महत्व देतात तितकेंच महाराष्ट्र व कर्नाटक यांतील लोक गोकर्णास व द्रविड देशांतील लोक मद्रास इलाख्यांतील एलूर ग्रामानजीक असलेलें बेळिवी क्षेत्र यास देतात. रथोत्सव व सोय असेल तिकडे तीर्थस्नान हीं आटोपल्यावर उत्सव समाप्त होतो. हा उत्सव चालू असतां चारही वर्णांच्या लोकांस देवालयांत जाऊन लिंगपूजा करण्याची मोकळीक असते. इतकेंच नव्हे तर चिदंबरसारख्या ठिकाणीं शिवोपासक बनलेले कित्येक शूद्रवर्णाचे लोक वेद व उपनिषदें पाठ म्हणण्यास अधिकारी आहेत असें तिकडील ब्राह्मणही मानतात. आणि हे लोक वेदपाठाचा अर्थ देखील जाणतात हें पाहून मोठें कौतुक वाटतें. यावरून असें दिसतें कीं, जसें विष्णूच्या उपासकांस सर्व लोक वैष्णवपंथास येऊन मिळावे असें वाटत होतें तसें शैवसंप्रदाय वाढविणाऱ्या शैवांस हा पंथ सर्व वर्णांच्या लोकांसाठीं आहे असें वाटत असे.

## शिवाप्रीत्यर्थ जत्रा

या देशांत अनेक ठिकाणीं भरतात. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध स्थानें पुढें देत आहों:— वैतरणा व सूर्य या नदींच्या मुखाशीं असलेल्या आगाशी ( ठाणें जिल्हा ) क्षेत्रांत भवानीशंकराचें देवालय असून तेथें कार्तिक कृ. ११ स मोठी जत्रा भरते. या संगमावर स्नान केल्यानें त्वचारोग बरा होतो अशी समजूत आहे. अंबरनाथ येथें अंबरेश्वर महादेवाचें देवालय आहे. तेथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा जमते. पौष पौर्णिमेस व चैत्र शु॥ ९ मीस बाहे ( सातारा जिल्हा ) येथें श्रीराम लिंग नांवाच्या शिवालयांत मोठा उत्सव होत असून तेथें शिवोपासकांची यात्रा जमते. मूलतः हें शिव व विष्णु यांचें देवालय असून दोन्ही देवतांचे उपासक या ठिकाणीं यात्रेस येत असत. बाहुले ( सातारा ) येथें बाहुलेश्वर महादेवाचें देवालय आहे. तेथें महाशिवरात्रीस व श्रावण सोमवारीं यात्रा भरते. बाणपुरी येथें नायकबा नांवाचें शिवालय आहे. तेथें आश्विन शु॥ १० मीस यात्रा भरते. भीमा नदीच्या उगमाशीं भीमसागिरी ( कोल्हापूर सं. ) येथें भीमाशंकर नांवाचें शिवालय असून तेथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. हें स्थान द्वादशलिंगांप्रमाणें श्रेष्ठ मानिलें जातें. शिवाचा गण कालभैरव याच्या प्रीत्यर्थ देवगड किंवा हरेश्वर ( जंजीरा सं. ) येथील देवालयांत महाशिवरात्रीच्या दिवशीं व कार्तिक शु १० मी पासून पौर्णिमेपर्यंत मोठा उत्सव होत असतो. पिशाचबाधा निवारण करण्यासाठीं या देवतेची उपासना करण्यांत येते. कृष्णा नदीच्या उगमाशीं धोम ( सातारा ) हें क्षेत्र असून तेथें अनेक देवालयें आहेत. महादेवाचें देवालय व नृसिंह देवालय हीं त्यांत विशेष प्रसिद्ध असून वैशाख शु. १४ स व पौर्णिमेस या ठिकाणीं मोठी जत्रा भरते. डोंगरगांव ( अहमदनगर ) येथें श्रावण महिन्यांत तिसऱ्या सोमवारीं मोठी यात्रा भरते. येथील शिवालय महत्वाचें मानिलें जातें. मुंबईजवळ घारापुरी येथें लेणीं आहेत. तेथें दत्तात्रेयाची प्रतिमा असून शिवाप्रीत्यर्थ महाशिवरात्रीच्या दिवशीं मोठी यात्रा भरते. कोल्हापूर संस्थानांत गोडची येथें वीरभद्राचें देवालय आहे. तेथें मार्गशीर्ष पौर्णिमेस मोठी यात्रा भरते व विशेषतः लिंगायत लोकांचा भरणा विशेष असतो. बिजापूर जिल्ह्यांत गोलगेरी येथील गोललीश्वर या शिवालयांत चैत्र पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत मोठी जत्रा भरते. हिप्परगि ( बिजापूर ) येथें कलमेश्वराचें शिवालय आहे. हें परशुरामाचा बाप जमदग्नि यानें स्थापन

केलें अशी आख्यायिका असून आश्विन महिन्यांत या ठिकाणीं जत्रा भरते. ठाणें जिल्ह्यांत जंब्रुग येथील लेण्यांत गंभीरनाथाचें देवालय आहे. तेथें भाद्रपद पौर्णिमेस व दसऱ्याच्या दिवशीं उत्सव होतो. सांगली संस्थानांत कणकेश्वर येथें एक जुनें देवालय आहे. यांत शिवलिंगाची स्थापना केलेली असून पौष पौर्णिमेस गांवांतील इतर देवतांच्या पालख्या त्या ठिकाणीं येतात. उत्सव मोठ्या प्रमाणावर होतो व तो पाहण्यासाठीं दूरदूरचे भाविक लोक येत असतात. मिरज-संस्थानांत लक्ष्मीश्वरी येथें लक्ष्मीश्वराचें सुमारें एक हजार वर्षांचें जुनें देवालय आहे. येथें वैशाख शु. १० मीस मोठी जत्रा भरते. कृष्णानदीच्या उगमाशीं महाबळेश्वर येथें महाबळेश्वराचें देवालय आहे. तेथें माघ व. १२ शीपासून सुमारें एक आठवडा मोठी जत्रा भरते. मुधोळसंस्थानांत महालिंगपूर येथील महालिंगेश्वराच्या देवालयांत भाद्रपद शु १० मीपासून पौर्णिमेपर्यंत उत्सव चालतो व जत्रा भरते. याशिवाय खालीं दिलेल्या ठिकाणींही लहान मोठ्या जत्रा भरतात—

| गांव | जिल्हा | देवालय | जत्रेचा काल. |
|---|---|---|---|
| म्हास | ठाणें | खांबलिंग | पौष १५ पासून |
| म्हसवाड | सातारा | सिद्धनाथ | मार्गशीर्ष शु. १ दा |
| मोहोळ | सोलापूर | नीलकंठेश्वर | वैशाख शु ४–५–६ |
| मुंबई | | भुलेश्वर, वालुकेश्वर व बाबुलनाथ | शिवरात्री व श्रावण सोमवार. |
| | | या दिवशीं लक्षावधि लोक शिवलिंगाच्या पूजेस जात असतात. | |
| नैताल | नाशीक | मारोबा | पौष शु॥ १४ ते कृ॥ ४ |
| नाशीक | ,, | सोमेश्वर | प्रत्येक श्रावण सोमवार |
| नातेपुतें | सोलापूर | गौरीशंकर | चैत्र शु. ८ मी |
| निर्मल | ठाणें | ईश्वर | कार्तिक कृ ११ ते मार्ग. शु ३ |
| जोतिबाचा डोंगर | कोल्हापूर | जोतीबा–यमाई | चैत्र शु. १५ |
| पिंपळगांव बुद्रुक | खानदेश | हरिहरेश्वर ( शिव–विष्णु ) | पौष. |
| प्रकाश. | ( गोमी नदीच्या कांठीं ) ,, | गौतमेश्वर महादेव | सिंहस्थाच्या वर्षी |
| पुर | पुणें | कुकडेश्वरलिंग | महाशिवरात्री. |
| शाहापूर | ठाणें | त्र्यंबकेश्वर–भवानीशंकर | ,, व फाल्गुन १५. |
| संगमेश्वर | विजापूर | शिव | महाशिवरात्री |
| संगमेश्वर | खानदेश | महादेव | |

| गांव | जिल्हा | देवालय | जत्रेचा काल. |
|---|---|---|---|
| सिंदगी | विजापूर | संगमेश्वर | मकरसंक्रांति. |

( ही जत्रा पांच दिवस चालते. त्यावेळीं संगमेश्वर व पार्वती यांचा विवाह-समारंभ करण्यांत येतो. गांवचा ब्राह्मण कुळकर्णी हा संगमेश्वराची भूमिका घेत असून पटेल ( लिंगायत ) पार्वतीची भूमिका घेतो.

| | | | |
|---|---|---|---|
| सिंगणापूर | सातारा | महादेव | महाशिवरात्री व चैत्र शु ५ पासून १५. |
| शिराळें | ,, | गोरखनाथ | चैत्र कृ. ११ ते वैशाख १५. |
| सोनारी | सोलापूर | भैरवनाथ | चैत्र कृ. ८ ते अमावास्या |
| तिळसें | ठाणें | स्वयंभूलिंग | महाशिवरात्रीपासून होळी. |
| त्र्यंबक | नाशीक | त्र्यंबकेश्वर | महाशिवरात्री, त्रिपुरी पौर्णिमा सिंहस्थाचें वर्ष. |

( हें फार महत्वाचें क्षेत्र मानिलें जातें. कारण येथेंच गोदावरीचा उगम आहे )

| | | | |
|---|---|---|---|
| वळनेश्वर | रत्नागिरी | वळनेश्वर | महाशिवरात्री. |

प्रत्येक त्रयोदशीस शिवरात्र मानून शिवाची प्रदोषपूजा करतात. माघ व॥ १३ ही महाशिवरात्र या नांवानें प्रसिद्ध आहे. याशिवाय प्रत्येक सोमवार शिवाप्रीत्यर्थ वाहिलेला असतो. पुत्रप्राप्तीसाठीं स्त्रिया सोळा सोमवारांचें व्रत पाळतात. श्रावण महिन्यांतील सोमवार विशेष महत्वाचे मानिले जात असून या दिवशीं दिवसा उपोषण करून शिवाची प्रदोषपूजा केल्यानंतर अन्न ग्रहण करण्याचा प्रघात आहे. भाद्रपद शु ॥१ स पुरुषांनीं मौनव्रत पाळावें व शिवाची पूजा करावी म्हणजे शिवलोकाची प्राप्ति होते असें सांगितलें आहे. मौनव्रताच्या दिवशीं स्त्रियांनीं स्वयंपाक करते वेळीं व सर्वांस भोजनाच्या वेळीं भाषण करण्याची मनाई आहे. हें व्रत पाळलेलें हल्लीं दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

## शैवपंथ

विष्णु, गणपति, शक्ती वगैरे दैवतांच्या उपासकांत निघालेल्या अनेक पंथांप्रमाणेंच शैवांत देखील बहुविध पंथ आहेत. **वाममार्ग, अघोरीपंथ, परमहंस, सरभंगी, पाशुपत, लाकुलिन, कापाल, कालामुख, वीरशैव** किंवा **लिंगायत, शैव** वगैरे कैक पंथ आजवर या देशांत उत्पन्न झाले असून त्यांपैकीं कांहीं अद्यापि टिकाव धरून राहिले आहेत. वीरशैव व शैव या पंथांखेरीज बहुतेक इतरांची उत्पत्ति रुद्रासंबंधीं भेसूर कल्पनांवरून निघाली असल्यामुळें

साहजिकच या पंथांचे आचारविचार सात्विक मनोवृत्तींस पटण्याजोगे नाहींत. लाकुलिन व पाशुपत हे पंथ प्रायः एकच असून त्यांनीं शिवास कार्य व कारण मानिलें आहे. योग व विधि यांचा अवलंब करणारांस **दुःखांत** ( मुक्ति ) प्राप्त होतो असें हे मानतात. ॐ प्रणवाचा सर्व काल जप, त्रिकाल भस्मस्नान वगैरे कित्येक उपाय केल्यानें मानवास शिवस्वरूपांत मिळून जातां येतें असेंही त्याचें मत आहे. कालामुख पंथ याहून भेसूर स्वरूपाचा आहे. मृताच्या नरोटींतून अन्नग्रहण, सर्वांगीं चिताभस्मविलेपन, भस्मभक्षण, मद्यसेवन, रुद्राक्षमाला व जटाधारण इत्यादि आसुरी उपायांनीं शिवास सुप्रसन्न करावें असें या पंथाचें ब्रीद आहे. भवभूतीनें मालतीमाधव नाटकांत कापालिकांचें वर्णन केलें आहे. सध्यां या पंथाचा बहुतेक लोप होत चालला असून कालगतीनें हा नामशेष होईल यांत संदेह नाहीं. उत्तरप्रदेशीं काश्मिरी शैव या नांवाचा एक उज्ज्वल स्वरूपाचा पंथ आहे. या पंथांतील लोक कर्म व माया यांचा संबंध शिवाशीं लावीत नाहींत. महेश्वर ( शिव ) हाच परब्रह्म. यानें इच्छामात्रेंकरून जगदुत्पत्ति केली; जीव व शिव यांत भेदाभेद नसून मलाच्या ( अज्ञानाच्या ) योगानें ते एक असल्याची जाणीव मात्र अंतःकरणांत प्रादुर्भूत होत नाहीं. यास्तव चित्ताची एकतानता करून शिवस्वरूपीं लय लावल्यास अज्ञानतिमिराचा नाश होतो; एरवीं भस्मचर्चनादि बाह्योपचारांनीं शिवप्राप्ति होत नाहीं असें हा पंथ मानतो. समान्यतः सर्व भरतभूमींत शैवसंज्ञेनें विख्यात असलेला पंथ कांहीं साधे व निरुपद्रविक विधि पाळीत असतो. आत्मा हा पशु व शिव हाच पति असून अज्ञान, कर्म व माया यांजवर वर्चस्व मिळविणें हेंच या शैवपंथाचें मुख्य लक्षण आहे. अन्य देवतेस अर्पिलेल्या नैवेद्याचें भक्षण, शिवाची किंवा शिवभक्ताची निंदा, देवस्वाचा अपहार व प्राणिमात्राची हिंसा हीं सर्व शैवपंथीयांस पूर्णपणें निषिद्ध आहेत. कित्येक शैवांवर वैष्णवपंथाचा पगडा बसल्यामुळें ते हरिहरांत भेद न मानतां शिवरात्र व एकादशी समान भक्तीनें पाळतात. द्रविड देशांत सुमारें १२०० वर्षांवर शिवभक्ति चालू आहे असें अनेक आधारांवरून दिसून येतें. आद्य श्रीमत् शंकराचार्य यांनीं उत्तरमीमांसानिवेदित अद्वैत मताचा प्रसार करून कर्मकांडाचें महत्व कमी केलें व कर्में हीं केवळ देहशुद्धीकरतांच होत असें प्रतिपादून वेदांतमार्गाचा प्रसार केला. यांचें मत बहुजनःसमाजानें मान्य केल्यामुळें निवृत्तिमार्ग फैलावला. श्रीशंकराचार्यांच्या विचारांचा पगडा काश्मिरी शैवपंथीयांवरही बसला असावा. मादि राजाचा पुत्र बसव यानें

## लिंगायत किंवा वीरशैव पंथ

स्थापिला असें सामान्यतः मानतात. परंतु या पंथाचा हा प्रवर्तक नसला तरी मोठा प्रसारक होऊन गेला याबद्दल भरपूर पुरावा सांपडतो. हे लोक एकेश्वरी मताचा अनुवाद करतात आणि सत्, चित् व आनंद ( सच्चिदानंद ) यालाच शिवतत्व मानून प्रकृतिपुरुषनिर्मित विश्व कालेंकरून त्यांच्यांतच लय पावतें असें ह्मणतात. अर्थात् यांनीं उत्पत्तिस्थानीं मानिलेल्या पुरुषप्रकृतीला स्थल, शिवास लिंगस्थल व जीवास अंगस्थल अशा संज्ञा दिल्या आहेत. कला व भक्ति असे शक्तीचे दोन भाग करून कलेची शिवांत व भक्तीची जीवांत स्थापना झाली आहे; तसेंच भक्ति ही जीवशिवाची सांगड घालणारी आहे वगैरे या पंथाचें मत आहे. लिंग हें शिवद्योतक केवळ चिन्ह नसून तें प्रत्यक्ष शिव आहे असें मानणें व तें सदैव अंगावर धारण करणें हें वीरशैवपंथाचें विशिष्ट लक्षण आहे. लिंगायतांतील लिंगधारणविधि **लिंगस्वायत्तदीक्षा** नांवानें प्रसिद्ध असून तो द्विजांतील उपनयनाप्रमणेंच पवित्र व आवश्यक मानला जातो. हे लोक **ॐनमः शिवाय** हा षडाक्षरी मंत्र प्रत्यहीं जपतात. हे मद्यमांसाचें कदापि सेवन करीत नाहींत. यांच्यांत विधवापुनर्विवाहाची रूढि आहे. हे रजस्वला स्त्रियांचा स्पर्शास्पर्श मानीत नाहींत. यांच्यांत **जंगम** ( भटजी ), **शीलवंत**; ( भक्त ), **बणजीग** ( व्यापारी ) व **पंचमसाली** असे चार भेद आहेत. यांपैकीं बणजिगांचा वर्ग धनकनकसंपन्न असून परोपकारी असल्याबद्दल त्याची ख्याति आहे. जंगमांत कित्येक विरक्त असतात. ह्मैसुरांत चितळदुर्ग येथें या लोकांचा मुख्य मठ असून तेथील आचार्यांचा सर्व लिंगायतांवर धर्माधिकार चालतो.

## शिव व विष्णु.

शिव व विष्णु यांच्या भक्तांत कालेंकरून फार दुही माजूं लागली. एका देवतेचे भक्त दुसऱ्या देवतेची निंदा करूं लागले. कदाचित् ही अनवस्था दूर करण्यासाठीं विचारी भक्तांनीं या दोन्ही देवतांमध्यें विशेष अंतर नाहीं व दोन्ही एकच परब्रह्मरूप आहेत हें दर्शविण्यासाठीं कांहीं उत्सव किंवा व्रतें प्रचारांत आणिल्याचें दिसतें. कार्तिक शु. १४ स पाळण्यांत येणारें वैकुंठचतुर्दशीव्रत याच प्रकारचें आहे. या दिवशीं विष्णूनें काशीक्षेत्रीं जाऊन मणिकर्णिकेंत स्नान केलें व सहस्र कमल पुष्पांनीं श्रीविश्वेश्वराची पूजा केली. या कमलांतून एक कमल

शिवानें बाजूस काढल्यामुळें सहस्र कमलांत एकाची कमतरता पडतांच विष्णूनें आपलें नेत्रकमल अर्पण केलें. या अनन्य भक्तीनें शिव प्रसन्न झाला व त्यानें स्वतः मणिकर्णिकेंत स्नान करून विष्णूची पूजा केली. हरिहरांच्या भेटीचा हा दिवस फार पवित्र मानला जातो व हा पाळणारांस वैकुंठ लोकाची प्राप्ति होते म्हणून या तिथीला वैकुंठचतुर्दशी असें नांव आहे. गंडकी व गंगानदी यांच्या संगमाशीं असणाऱ्या सोनपूर या गांवीं हरिहरनाथ नांवाचें देवालय असून तें श्रीरामानें स्थापिलें अशी समजूत आहे. कार्तिक शु॥ १५ स या ठिकाणीं हरि व हर यांचे उपासक या देवालयांत एकत्र होऊन हरिहरेश्वराची पूजा करतात त्या वेळीं येथें मोठी स्नानयात्रा भरते.

## उपसंहार.

या देशांत वेदकालीं निरनिराळ्या देवतांच्या उपासनांस प्रारंभ झाला. पुढें सूर्य, चंद्र, भू, जल, तेज, समीर, विद्युत् व मेघ या सर्वांमध्यें **एकम् सत्** अर्थात् एकच ईश्वर ही उपासकांची भावना झाली. कालगतीनें धार्मिक बुद्धीवर अनेक परिणाम होऊन पौराणिक कालीं शिव व विष्णु* या दैवतांस प्राधान्य आलें. त्यांतूनही संख्येच्या मानानें शैवांनीं अग्रेसरत्व पटकावलें. असा हा सर्वगामी संप्रदाय, मग त्यांत कितीही बरे वाईट विभाग असोत, आम्हांस काय निवेदन करीत आहे हें समजून घेणें आम्हां हिंदू म्हणविणारांचें कर्तव्यकर्म आहे. सर्व देवतांचें वर्गीकरण ज्याप्रमाणें त्रिमूर्तीत करतां येतें, तद्वत् या देशांतील प्रचलित धर्मपंथांचें वर्गीकरणही तीन सदरांत करतां येण्याजोगें आहे. या तीन पंथांचे लोक देवास उद्देशून अनुक्रमें **तस्यैवाहम्, तवैवाहम्** व **त्वमेवाहम्** म्हणजे मी **त्याचा** आहें, मी **तुझा** आहें व मी **तूंच** आहें असें म्हणतात. ज्याचें आध्यात्मिक ज्ञान उच्च पायरीस पोहोंचलेलें नाहीं ते ईश्वराचें सान्निध्य न जाणतां तो दूर व अदृश्य आहे असें मानतात. सहजच नेत्रांवरील घनपटल दूर होईपर्यंत मात्र ही धार्मिक वृत्ति असूं शकते. श्रद्धेच्या योगानें या पटलाचें निराकरण होत जाईल तसतसें भाव, निष्ठा, उत्साह, विश्वास व जोम इत्यादिकांच्या साह्यानें ईश्वराचें सान्निध्य मनुष्यास जाणवून तो **तवैवाहम्** म्हणजे मीं **तुझा** आहें असें म्हणण्याच्या पायरीवर येऊन पोहोंचतो. ही स्थिति प्राप्त

---

* या देवतेसंबंधाचें विवेचन महाएकादशी या सदरांत पाहावें.

होतांच त्यास ईश्वर दृष्टिगोचर होतो. त्याच्याही पुढील पायरी ह्मणजे प्रगतीच्या अंतिम स्थितीमध्यें **मी व तूं** किंवा **मी व तो** या भेदबुद्धीचा लय होय. ही आध्यात्मिक प्रगतीची परमावधि असें म्हणतां येईल. या स्थितींत **सेव्य व सेवक** किंवा भज्य व भजक यांचें एकमेकांशीं तादात्म्य होतें. यालाच **वेदान्त** म्हणजे वेदाची अथवा ज्ञानाची अखेर पायरी असे ह्मटलें आहे. **शिवोपासनेचें अंतिम ध्येय तरी हेंच आहे.** यासाठींच शैव हे अद्वैती आहेत असें म्हणतात. त्रिकांडांतील ज्ञानकांडाची उभारणी याच अद्वैत मतावर झाली आहे. ज्ञानकांडाचें साधन विशेष क्लेशकारक आहे हें जाणून गीतोपदेश करतांना भगवंतानें अर्जुनास सांगितलें कीं,

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।**

गीता ( अ. १२ ).

अव्यक्ताचे ठायीं चित्त स्थिर करणें कष्टसाध्य आहे ह्मणून हा ज्ञानमार्ग अग्राह्य असें मानणें धाडसाचें ठरेल. पराभक्तीचा मार्ग ( ह्मणजे केवळ सत्य व अद्वितीय ईश्वराचें अनन्यभावानें चिंतन करणें ) यास उपासनाकांडांत देखील गौणी * भक्तिमार्गाहून श्रेष्ठ असें ह्मटलें आहे; परंतु कोणत्याही परीनें ईश्वरास प्राप्त करून घेणें हेंच ज्या अर्थी प्रत्येक पंथाचें ध्येय आहे, त्या अर्थी भलत्याच वादांत हेका धरून आयुष्याचा दुरुपयोग करण्यांत तरी अर्थ कोणता ? कोणत्याही मार्गाचा अवलंब करून जे एकदां ईश्वराचा साक्षात्कार करून घेतात, त्यांस स्वतःच्या आंत व बाहेर ईश्वर दिसूं लागतो. सर्व हस्तांमध्यें ईश्वराचा हस्त, सर्व मनांमध्यें ईश्वराचें चित्त, सर्व नेत्रांमध्यें ईश्वराची दृष्टि, सर्व कार्यांमध्यें ईश्वराची प्रेरणा, सर्व प्रेमामध्यें ईश्वराची भक्ति, सर्व सद्गुणांमध्यें ईश्वरी सद्गुण आणि सर्वत्र ईश्वराचा वास असल्याचा त्यांस अखंड प्रत्यय येतो. कित्येक शिवोपासकांनीं अद्वैत मताची कास धरून असा प्रत्यय अनुभविलेला आहे. येथें जातिभेदाचा किंवा पंथभेदाचा प्रश्न नसून सर्व वर्णांस शिवालयाचें मुक्तद्वार सारखेंच उघडें आहे. भक्तीच्या सानंदाश्रूंनीं नेत्रांतील अहंभावाचें किल्मिष धुवून टाकिल्यास दृष्टि साफ होऊन मानवांचें अंतिम ध्येय एकच आहे असें दिसून येईल. जावत्काल आपण परस्परांकडे दोषैकदृष्टीनेंच पाहूं, तावत्काल प्रेम व ऐक्य हीं आमच्यांत

---

* अवतारादिकांची कल्पना करून त्यांची भक्ति करणें यास गौणी भक्तिमार्ग अशी संज्ञा आहे.

एकत्र नांदण्यास कबूल होणार नाहींत. तत्वज्ञानाचा वाद जगाच्या अंतापर्यंत चालू राहाणार. पूर्वपक्ष व उत्तरपक्ष हे सदा चालावयाचेच. यासाठीं विकारवश होऊन एकमेकांचें उणें काढण्यांत शक्तीचा दुरुपयोग न करतां परस्परांचें कोणत्या बाबींत साधर्म्य आहे, त्यावरच जोर दिला पाहिजे. कोणी आर्यसमाजाची तरफदारी करतात, तर कोणी ब्रह्मसमाजाची तारीफ करतात; कोणी वैष्णवी दीक्षेची स्तुति करतात तर कोणी शैवपंथास अग्रस्थान देतात; परंतु **ब्रह्मविदाप्नोति परम्** ह्मणजे परमेश्वरास जाणणारे उत्तम गति पावतात, हें सर्वांसच कबूल आहे. त्या अर्थीं सर्वांचे प्रयत्न एकाच परंधामाकडे जाण्याचे आहेत. हें साधर्म्य सर्व पंथांच्या अनुयायांस पटेल तर कोणत्याही नव्या जुन्या पंथांस दुसऱ्या पंथांच्या अनुयायांबद्दल तिरस्कार वाटावयास जागा न राहतां आपला प्रगतीचा मार्ग निष्कंटक होऊन राहील. उपनिषदांनीं बजावल्याप्रमाणें **ना भयेत्** भिण्याचें किंवा निराश होण्याचें कारण नाहीं. कां कीं वरील प्रकारची भावना सद्विद्यालाभामुळें सर्वांतर्यामीं उदित होऊं लागली आहे.

## पुराणमतवादी व सुधारणाभिमानी

बांधवहो, या शिवस्वरूपाकडे नवीन दृष्टीनें पाहून त्याच्या भजनीं लागा, ह्मणजे आध्यात्मिक व आधिभौतिक अशा उन्नतीच्या दोन्ही शाखांस तुह्मी हातभार लाविल्यासारखें होईल. हिंदुस्थान हा शिवाचा विराट देह, प्रचंड हिमालय हाच त्याचा जटाभार, धवलगिरि हा त्याचा शोभिवंत मुकुट असून ऋषीमुनींनीं ध्यायिलेलें पवित्र गंगातीर्थ त्याच्या जटाभारांतून वहात असतें. विंध्याचलरूपी नाग हा त्याचा कंबरपट्टा होऊन बसला आहे. पूर्व व पश्चिमेकडील प्रदेश हे त्याचे हस्त असून त्यांनीं धारण केलेला डमरू हाच प्रचंड गर्जना करणारा महोदधि होय. शिवांश असलेल्या भूतमात्राची सेवा करणें म्हणजेच शिवसेवा. या शिवस्वरूपाला जे पूर्णपणें वाहून घेतील ते कालेंकरून शिवस्वरूपच होतील.

**महोक्षःखट्वांगं परशुरजिनं भस्म फणिनः ।**
**कपालं चेत्तीयत्तव वरद तंत्रोपकरणम् ॥ ८ ॥**

महिम्नस्तोत्रांतील वरील वर्णनाप्रमाणें एक ह्मातारा बैल, मोडकें खाटलें, जुना परशु, राखेचा ढीग, आजूबाजूस सर्प, हस्तामध्यें करोटी हेंच ज्याचें वैभव त्या शिवाच्या उपासनेला परमध्येय मानावें काय, असा प्रश्न येतो. ही संपत्ति

आजही आपण आमच्या अन्नदात्या शेतकऱ्याची असल्याचें प्रत्यक्ष पाहतों. पशूंचें ऐश्वर्य बाळगून राहणाऱ्या या गरीब वर्गाची स्थिति यथाशक्ति सुधारण्याचा प्रयत्न करणें याव्यतिरिक्त शिवाला संतोषविणारी अन्य श्रेयस्कर उपासना शक्य दिसत नाहीं. कारण बोलूनचालून शिव हा शेतकरीवर्गानें दैवत मानलेल्या पशूंचा ( गुराढोरांचा ) पति आहे. म्हणूनच या पशुपतीच्या उपासनेला आम्ही परमध्येय समजतों.

शिव हा तमोगुणी असल्याचें मानतात. खालच्या वर्णांत याच त्याच्या तमोगुणाचें प्राबल्य आहे असें शास्त्रकार सांगतात. अखिल मानवजातीचें जीवन ज्यांच्या हातीं आहे, असा हा कनिष्ठ मानलेला वर्ग तमोगुणाचा आश्रय धरून अंगीकृत कार्य पार पाडावयास समर्थ झाला आहे; केवळ नैतिक व बौद्धिक प्रगति झाल्यानें राष्ट्राचें पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं. त्यांच्या विकासाबरोबर तमोगुणजन्य तेजस्वीपणा व शीलाचा जोम हीं अवश्य हवीं आहेत. यासाठींच तमोगुणांचें आधिदैवत जो शिव त्याची आराधना सर्वांसच इष्ट आहे.

राष्ट्रहित साधण्याकरितां कोणतेंही लोकसेवेचें व्रत आचरिल्यानें विश्वांतील शक्ती किंवा देवदेवता यांची पूजा केल्याप्रमाणें होतें. हिंदस्वरूपी विराट शिवप्रतिमेची पूजा करण्यास त्यावर अवलंबून असलेल्या सर्व भूतगणांनीं तयार झालें पाहिजे. पृथ्वीला व्यापून असलेला अफाट सागर, ब्रह्मपुत्रा, सिंधूसारखे नद, कृष्णा, गोदावरीसारख्या नद्या व लहान ओहोळ, तलाव, डबकीं या सर्वांकडून बाष्परूपानें अभ्रें उत्पन्न करून जलाच्या वर्षावानें जीवमात्राचें जीवनाचें कार्य शक्त्यनुसार घडतें. तद्वत् राव व रंक, सशक्त व अशक्त, सान व थोर या सर्वांनीं एकसमयावच्छेदेंकरून आर्यभूरूपि शंकराच्या ( सुखदात्या देवतेच्या ) चरणीं स्वतःस वाहून घेऊन यथाशक्ति सत्कार्यरत होण्यास सज्ज झालें पाहिजे. इतकें जरी आमच्या हृत्पटलावर बिंबविण्यास हा शिवरात्रिमहोत्सव कारण झाला, तरी सर्वांचें कोटकल्याण होईल. कोणतेंही योग्य दिशेंत झालेलें सत्कार्य फलद्रूप झाल्यावांचून राहत नाहीं, एतद्विषयक वर दिलेली निषादाची गोष्ट असें सत्कार्य अंगिकारण्यास आम्हास प्रोत्साहन देत आहे. श्रीशंकराचा वरदहस्त या देशावर अखंड असो.

## फाल्गुन महिना.

फाल्गुन हा दक्षिणेंत वर्षाचा शेवटचा मास गणिला जातो. हा इंग्रजी मार्च महिन्याच्या सुमारास येतो. श्रीकृष्णाप्रीत्यर्थ या महिन्यांत गाई, तांदूळ व वस्त्रें यांचीं दानें करावीं. फाल्गुनी पौर्णिमा ही मन्वादि आहे. या तिथीला होलिका असें म्हणतात. फाल्गुन कृष्ण प्रतिपदेस वसंतारंभोत्सव करावा. दुसऱ्या दिवशीं राजानें दरबार भरवावा. त्या वेळीं प्रजाजनांनीं त्याच्यावर शेंदूर, गुलाल, चंदन, अबीर वगैरे उधळून त्याच्या ठायीं आपलें प्रेम व्यक्त करावें व नृत्य, गायन, विनोद इत्यादिक करून मोठा उत्सव करावा. या महिन्यांतील मुख्य व एकच सण **शिमगा** हा होय.

## फाल्गुनोत्सव व होळी.

शालिवाहन शकाच्या मासगणनेप्रमाणें शेवटचा जो फाल्गुन महिना त्यांत फाल्गुनोत्सव करावा असें भविष्यादि पुराणांत कथन केलें आहे. सामान्यतः शुक्ल नवमीपासून पौर्णिमेपर्यंत हा उत्सव सर्व लहानथोरांकडून मोठ्या उल्हासानें साजरा केला जातो. स्थानपरत्वें यास **शिमगा,** होलिकादहन किंवा **होळी,** हुताशनीमहोत्सव, **दोलायात्रा** अशीं नांवें आहेत. उत्तरेंत याला **दोलायात्रा,** कोंकण व महाराष्ट्रांत **शिमगा** व **होळी** व दक्षिणेंत **कामदहन** अशा संज्ञा आहेत. हा उत्सव साजरा करण्याची तऱ्हा सर्वत्र बहुतेक सारखीच असली तरी याच्या उत्पत्तीसंबंधीं मात्र एकवाक्यता नहीं. एकंदरींत याला वसंतोत्सव अथवा वसंतागमनोत्सव हें नांव देण्यास हरकत नाहीं. उत्तरेकडील लोक हा कृष्णासंबंधीं उत्सव असल्याचें मानतात. विष्णुपुराण व भागवत यांत कृष्ण बालवयाचा असतां त्याला विषमय दुग्ध पाजून त्याचे प्राण हरण करण्याकरितां पूतना राक्षसीला कंसानें पाठविलें; परंतु दुग्धप्राशन करतां करतां तिचा प्राणही शोषून तिजला त्यानें यमसदन दाखविलें अशी कथा आहे. पूतनेला होळीच्या दिवशीं रात्रीच्या समयीं जाळण्यांत येतें असें ते मानतात. या होलिकादहनाच्या अगोदर कित्येक दिवसांपासून कृष्णविषयक कल्पित बाललीलांचें लोकांस स्मरण होईल अशा रीतीनें त्यांचें वर्तन असतें. महाराष्ट्र व कोकणपट्टींतील लोक भविष्यपुराणावर हवाला देऊन असें सांगतात कीं पूर्वकालीं ढौंढानामक एक भयंकर राक्षसी अज्ञान बालकांस पीडा देऊं लागली, तेव्हां

बीभत्स शिव्या व शाप देऊन व जिकडे तिकडे प्रचंड अग्नि पेटवून तिला भिवविण्याची व गांवाबाहेर हुसकावून लावण्याची क्लृप्ति काढण्यांत आली. दक्षिणेंतील लोक हा उत्सव केवल कामदेवाप्रीत्यर्थ आहे असें मानतात. योगेश्वर शिव तपाचरणांत गढून गेला असतां मदनाच्या द्वारें देवांनीं त्याचें लक्ष पार्वतीकडे वेधण्याचा प्रयत्न केला. यामुळें कोपाविष्ट होत्सात्या शंकरानें तृतीय नेत्र उघडून त्या मदनास भस्मसात् केलें अशी एक कथा आढळते.

## प्रांतपरत्वें रूढिभेद.

शास्त्रांत होलिकादहन वगैरे कसें करावें यासंबंधानें कांहीं सुलभ विधि सांगितले असून मनसोक्त वर्तन करण्याच्या या कालांत त्यांची मातब्बरी उरलेली नाहीं. बंगाल्यांत फाल्गुन शुक्ल चतुर्दशीस दोलायात्रा नामक उत्सवास प्रारंभ होतो. या दिवशीं घरचा यजमान उपोषित राहून कृष्णाची व सायंकाळीं अग्नीची पूजा करीत असतो. पूजाविधि आटोपल्यावर कृष्णमूर्तीवर फल्गु ( गुलाल ) उधळून जमलेल्या मंडळीलाही तो वांटण्याचा प्रचार आहे. नंतर घराबाहेर एक मोठी गवताची मूर्ती जाळण्यांत येते. हिलाच होळी असें नांव आहे. खालच्या वर्णांच्या लोकांत होलिकादहनाचा समारंभ फार महत्वाचा मानितात. शुक्ल त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत महाराष्ट्र व कर्नाटकांत चालू असलेले शिमग्याचे बहुतेक प्रकार तिकडेही चालतात. हिंदी सैन्यांतील लोक देखील या दिवसांत आपल्या अधिकाऱ्यांस गुलालानें रंगवितात व या बाबतींत अधिकारीही त्यांस मुभा देतात. पौर्णिमेस झोंपाळ्यावर किंवा पाळण्यांत बसविलेल्या श्रीकृष्णमूर्तीस अरुणोदयापासून सूर्यास्तापर्यंत मधून मधून झोंके देण्याची वहिवाट आहे. सदर क्रम पुढेंही कित्येक दिवस चालतो. या उत्सवमूर्तीस पाहण्यासाठीं बरीच मंडळी एकमेकांकडे जात असते. खेड्यापाड्यांत या उत्सवास सार्वजनिक स्वरूप प्राप्त होतें.

ओडिसा प्रांतांत बंगालप्रमाणेंच दोलोत्सव चालतो. फक्त होलिकादहनविधि मात्र होत नसतो. तेथें चैतन्यसांप्रदायी लोकांचा विशेष भरणा आहे. या पंथाचे गोसावी व ब्राह्मण कृष्णमूर्तीस पालखींतून मिरवीत घरोघर नेत असतात. सर्वांस अत्तर व गुलाल वांटल्यावर वस्त्रप्रावरणें व दक्षिणा देऊन घरच्या यजमानाकडून त्या मंडळीची संभावना केली जाते. गोपलोकांस हा उत्सव विशेष प्रिय आहे. या दिवशीं ते स्वतः नवीन पोशाख धारण करतात व गुरांढोरां-

साठीं दावीं, जूं वगैरे लागणारें सामान आणितात. ठिकठिकाणीं हे गोप आपल्यांतील एकास कृष्णाचा वेष देऊन त्याच्या प्रामुख्याखालीं मेळे काढतात व कांहीं दिवस टिपऱ्यांचा नाच वगैरे प्रकारांनीं लोकांस कृष्णलीलेची आठवण करून देतात.

उत्तर हिंदुस्थानांत फाल्गुन शुक्ल पंचमीपासून सर्व मंडळी लाल व पिंवळीं वस्त्रें धारण करून गुलाल उधळीत व गाणीं गात पौर्णिमेपर्यंतचे दिवस मोठ्या मजेंत घालवितात. या मुदतींत गांवांतील एका मोठया प्रशस्त जागीं सर्व मंडळी बऱ्या वाईट प्रकारांनीं जमविलेल्या लांकडाच्या व लाकडी सामानाच्या ढिगाची पौर्णिमेस राखरांगोळी करते; त्यावेळीं गांवकरी लोक हसण्याखिदळण्यांत व गप्पागोष्टींत वेळ घालवितात व अग्निनारायणानें लांकूड स्वाहा केल्यावर ते आपआपल्या घरचा रस्ता सुधारतात. दुसऱ्या दिवशीं सर्व रक्षा जलांत फेंकण्यांत येते. कांहीं भाविक लोक–विशेषतः शैव–होळीचें भस्म अरिष्टपरिहारक मानून अंगास लावतात.

मुंबई इलाख्यांत स्थानपरत्वें भिन्न पद्धतीनें हा उत्सव साजरा करण्याचा प्रघात आहे. उत्सवाचे दिवसही भिन्न असतात. कांहीं ठिकाणीं शुक्ल नवमीपासून पौर्णिमेपर्यंत तर कांहीं ठिकाणीं पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत लोकांचा हुरूप व द्रव्यादिकांची अनुकूलता यांवर या उत्सवाचा कार्यक्रम ठरविला जातो. तरी पण या उत्सवांतील प्रधान अंग मानिलेला जो **होलिकादहनविधि** तो मात्र पौर्णिमेस रात्रौ करण्याबद्दल सर्व ठिकाणीं एकवाक्यता आहे. गांवोगांव होळीचा विधि एका ठराविक सार्वजनिक जागीं दरसाल होत असतो. त्यावेळीं प्रत्येक घरांतील एक तरी पुरुष त्या ठिकाणीं हजर असतोच. होळीच्या मधोमध आंबा, माड, पोफळ, एरंड किंवा केळ यांपैकीं एकादें झाड पुरण्याची चाल ठिकठिकाणीं आहे. शिवाय शहरांतील पेठा व गल्ल्यांनिहाय रस्त्यावर होळी पेटवितात; ती सबंध रात्र पेटत ठेवण्यासाठीं त्या टापूंतील लहान वयाची मंडळी दक्ष असते. होळी प्रज्वलित असतां या मुलांस चुकवून स्वच्छ कपडे करून पादत्राणांनिशीं जाणें कोणा हिंदु गृहस्थास शक्य नाहीं. त्यांच्यावर शिव्यांचा व पिचकारीच्या लाल पाण्याचा वर्षाव व्हावयाचा हें ठरलेलें आहे. या दिवशीं मित्रमंडळीसमवेत काफी व भांगेचा घोटा मधूनमधून घेत व पत्ते, गंजिफा वगैरे खेळत ब्राह्मण मंडळीही जागरण करिते. इतर वर्गांतील लोक भांग, गांजा, चंडोल, अफू, मद्य वगैरे अमली पदार्थांस राजरोस उदार आश्रय देण्याची पर्वणी हीच असें मानून

देहभान विसरेपर्यंत त्यांचें सेवन करतात. मुंबई व तिच्या आसमंतात् भागीं होळीपूर्वी पांच दिवस प्रत्यहीं सूर्यास्तानंतर घरासमोर लहानशी होळी पेटविण्याचा प्रघात आहे. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं त्याच अग्नीवर पाणी तापवून स्नान केल्यावर होळीची पूजा करतात आणि वद्य प्रतिपदा ही तिथि सणाप्रमाणें मानून लोक त्या दिवशीं मिष्टान्नभोजनानंतर देवदर्शनास जातात. मद्रासइलाख्यांत फाल्गुनोत्सव विस्तृत प्रमाणावर होत नसतो. तिकडे शिवालयासमोर होळी पेटविण्याचा परिपाठ आहे.

होळीनंतर फाल्गुनोत्सवाच्या दुसऱ्या प्रकारांस सुरवात होते. गोमंतकांत व दक्षिण कोंकणपट्टींत तासे, कर्णे, ढोल, सनई वगैरे वाद्यासह नृत्यगानकुशल वारांगनांस बरोबर घेऊन गांवकरी लोक आपल्या शेजारच्या गांवांत घरोघर जात असतात. तेथें नृत्यगान वगैरे प्रकारांनीं कांहीं वेळ करमणूक झाल्यावर घरचा यजमान ताटांत कांहीं रौप्यमुद्रा घालून आलेल्या मंडळीचा सत्कार करितो. गोव्यांत व कर्नाटकांत खालच्या वर्णांतील लोकांचे मेळे भेंडापासून* तयार केलेल्या पांढऱ्या शुभ्र कृत्रिम फुलांच्या माळांची रास डोईवरून पायांपर्यंत लोंबवीत व टिपऱ्यांचा खेळ खेळत घरोघर जातात. तिकडे शिमग्यांत घुमट नांवाचें एक विलक्षण वाद्य वाजवितात. कधींकधीं पन्नासांपर्यंत घुमटांबरोबर वाजविण्यांत येणाऱ्या झांजा, सनई, तबला, सारंगी इत्यादिकांचा एकसमयावच्छेदेंकरून होणारा वाद्यघोष, त्यांतच तालावर नाचतांना वारांगनाच्या पायांतील चाळांचा होणारा नाद व या सर्वांवर कडी म्हटली म्हणजे त्या वारयोषितांचे मधुर आलाप, यांनीं जेव्हां वातावरण दुमदुमून जातें तेव्हां सर्व मंडळी क्षणभर जगांतील दुःखविषयक कल्पना विसरून गेल्याचा भास होतो. हरतऱ्हेचे वेश घेऊन लोकरंजन करणारे, भक्तिपर गाणीं गाणारे व एका नाच्या पोऱ्यास राधेचें सोंग देऊन त्याजकडून कृष्णलीलेचीं गीतें गावविणारे मेळे व हें सर्व चाललें असतांना साल्हाद प्रेक्षकांचें काम करणाऱ्या बालगोपाल मंडळीकडे पाहिलें म्हणजे या उत्सवांत सामील होणाऱ्या भावी नागरिकांच्या भावी कार्यक्रमासंबंधानें मनांत हरतऱ्हेचे विचार उभे राहातात. कित्येक शहरांत व खेड्यापाड्यांत खालच्या वर्णांतील स्त्रिया व मुली आपआपले जमाव घेऊन दारोदार जातात; व गुजराथी

---

* नरम पांढरा गाभा असलेलें झाड. हें अगदींच हलकें असतें. यापासून बुचें व बाशिंगें तयार करतात.

स्त्रियांच्या गर्भ्यांच्या धर्तीवर गाणीं गात व घेरा घेत नाचत असतात. या सर्व उत्सवांत सामील होणाऱ्या मंडळीचा अर्थप्राप्तीपरता दुसरा कोणताही विशिष्ट हेतू नसून त्याचा विनियोग चुकून तरी एकाद्या सत्कार्यांत होत असेल अशी शंकाही घ्यावयास नको. कर्नाटकांत मात्र कुणबी, घाडी वगैरे शेतकरी लोक जे शिमग्याचा उत्सव मोठ्या उमेदीनें करितात, ते मद्यास शिवत नाहींत किंवा बीभत्स गाणीं गात नाहींत. प्राप्त झालेल्या द्रव्याचा देवकार्याप्रीत्यर्थ सदुपयोग करितात ही आनंदाची गोष्ट होय.

## ऐतिहासिक माहिती.

हिंदुराजे वसंतपंचमीपासून वसंतकाल संपेपर्यंत बहुतेक दिवस एकना एक उत्सवांत घालवीत असत. याविषयीं कांहीं ऐतिहासिक टिपणें सांपडतात. कर्नल टॉड यांनीं रजपूतांच्या रीतीभातींचें जें सुरस वर्णन लिहिलें आहे त्यावरून असें दिसतें कीं वसंतपंचमीपासून चाळीस दिवस म्हणजे फाल्गुन पौर्णिमेपर्यंत रजपूत लोक उदेपुरांत मनःपूत वागत. श्रेष्ठ व कनिष्ठ वर्गांतील लोक बीभत्स गाणीं गात भटकत असत. भांग, अफु वगैरे अमली पदार्थयुक्त मिठाईचें सेवन करून व सुरापानामुळें मत्त होऊन खालच्या वर्णाचे लोक उदेपुरांत ( विशेषतः फाल्गुनास प्रारंभ झाल्यापासून ) रस्त्यांत भटकत असत. त्या वेळीं ते एकमेकांच्या अंगावर गुलाल व तांबड्या रंगाचें पाणी फेंकीत. त्यायोगानें कित्येक दिवसपर्यंत लोकांचीं तोंडें व कपडे लालभडक दिसत. शेवटच्या दिवशीं होलिकेची घोड्यावरून मिरवणूक निघत असे; त्यावेळीं गुलालाचे चेंडू बनवून ते एकमेकांच्या अंगावर फेंकीत. या दिवशीं मेवाड देशाचा अधिपति राणा देखील आपल्या सरदारांसमवेत एका भव्य तंबूत सुमारें एक तास होळीचीं गाणीं ऐकत बसे. नंतर त्या सरदारांस मेजवानी देण्यांत येई. भोजनोत्तर त्यांना नारळ व एक लाकडी तरवार बक्षीस मिळे. वसंतोत्सवास प्रारंभ झाल्यावर खऱ्या तरवारीनें मनुष्याचा शिरच्छेद करणें योग्य नसून या आनंदमय कालांत युद्धाच्या कल्पना डोक्यांतून काढून टाकून सर्वांशीं सलोख्यानें वागणें इष्ट आहे हें दर्शविण्यासाठीं हा नकली तरवारी देण्याचा समारंभ असावा. यानंतर होळी जाळून अबीर व गुलाल सर्वांच्या अंगावर उधळीत व दुसरे दिवशीं प्रहर वेळ लोटल्यावर सर्व मंडळी घरोघर जाऊन शुचिर्भूत होई व नवीन वस्त्रें परिधान केल्यावर लोक आपल्या सरदारांस व राजपुत्रांस शक्त्यनुसार नजराणा अर्पण करीत.

हा उत्सव सार्वजनिक रीत्या पाळला जात असून राजेलोकही त्यास आपल्या सहानुभूतीची जोड देत असें कर्नल टॉड यांच्या वरील वर्णनावरून दिसतें. हिंदु संस्थानिकांच्या दरबारीं असणारे ब्रिटिश रेसिडेंट हे देखील होळीच्या वेळीं महाराजांबरोबर उत्सव पाहण्यास जात असत. महाराज दौलतराव शिंदे यांच्या दरबारांत घडलेल्या होळीच्या उत्सवाचें मेजर बौटन यांनीं एका पत्रांत मजेदार वर्णन केलें आहे. बंगालचा नबाब सुराज उद्दवला हा होळीच्या दिवशीं खोटे निरोप पाठवून त्यांवर विश्वास ठेवणाऱ्या सरदारांस मूर्ख ह्मणून हांसे असें कर्नल पियर्स यांनीं लिहून ठेविलें आहे. ही पद्धति इंग्रजी '**एप्रिल फूल**' ( April fool ) च्या पद्धतीप्रमाणेंच विनोदात्मक होय. शहाजी भोंसले हा पांच वर्षांचा असतां रंगपंचमीच्या दरबारांत त्याच्यावर लखोजी जाधवाची अल्पवयी मुलगी जिजाई हिनें गुलाल उधळला. तेव्हां त्यांच्यांत पतिपत्नीचें नातें ठरविल्याप्रमाणें पुढें खरोखरच त्यांचें लग्न होऊन त्यांच्या पोटीं शिवाजी हा नरपुंगव जन्मल्याची कथा गोंधळी, शाहीर वगैरे लोक मोठ्या प्रेमानें गात असतात. यावरून इतकेंच दिसतें कीं, मराठ्यांच्या कारकीर्दींत हा सण थाटामाटानें पाळला जात असे.

## फाल्गुनोत्सवांतील अनिष्ट प्रकार.

वसंतागमनाप्रीत्यर्थ पाळल्या जाणाऱ्या या उत्सवांत जो अनिष्ट प्रकार शिरला आहे, त्याचें यथार्थ वर्णन करणें प्रशस्त नव्हे; तथापि त्यासंबंधानें मुग्ध राहणेंही अप्रशस्त असल्यावरून थोडेंसें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत निरनिराळ्या नांवानें साजऱ्या होणाऱ्या या उत्सवांत कमी अधिक प्रमाणानें अनीति व बीभत्सपणा यांचा प्रकार दृग्गोचर होतो. चोरी, अश्लील शब्दोच्चार, शंखध्वनि, लोकांच्या मालमत्तेचा नाश, नीतिदृष्ट्या पतन झालेल्या स्त्रीपुरुषांस बरोबर घेऊन काढलेल्या मिरवणुकी, अपरिमित मद्यपानानें झिंगण्याचीं पद्धति, स्त्रियांसंबंधानें उच्चारण्यांत येणारे किळसवाणे शब्द, एकमेकांच्या पोषाखावर मारण्यांत येणारे अश्लील अर्थाचे शिक्के वगैरे माणुसकीस न शोभेशा व केवळ पशुवृत्तीस साजेशा उपायांनीं उच्छृंखल वृत्तीचा कळस करणें यासारखें अनन्वित कृत्य कोणतेंही नाहीं. परंतु उत्सवाचें हें एक विशिष्ट अंग होऊन बसल्यामुळें नवीन विचारांच्या सभ्य व सद्वर्तनी लोकांस या फाल्गुनोत्सवाचा किळस येत असतो. अन्यधर्मीय लोक याजबद्दल आह्मांस हांसतात. अनार्य व अवैदिक असा जो प्रकार हल्लीं दिसून येतो त्याजबद्दल विचार करितां

असें दिसतें कीं अनेक अनार्यांचा आर्यांशीं मिलाफ झाल्यावर मूळच्यां विधीस वांकडें वळण लागलें. होळीच्या दुसऱ्या दिवशीं अंत्यजास स्पर्श करून नंतर स्नान करावें असें शास्त्रवचन आहे. यावरून देखील आर्य व अनार्य या सणांत सामील व्हावे असा या सणाच्या उत्पादकांचा हेतु असावा. याच्या उत्पत्तीशीं ढौंढा राक्षसीचें कथानक पुराणकारांनीं जोडून दिलें आहे. परंतु सध्यांतरी ही राक्षसी कोठें आढळून येत नसल्यामुळें तिचा वध करण्याचा हा उपद्व्याप, तिच्या अभावीं नीतिमत्तेचा वध करण्यास मात्र कारणीभूत होत आहे. यासाठीं या उत्सवाचें स्वरूप शुद्ध व रमणीय करण्यास धर्माची आडकाठी येणार नाहीं असें आम्ही समजतों. हा सण अत्यंत प्राचीन स्वरूपाचा आहे. इतकेंच नाहीं तर पृथ्वीच्या पाठीवरील

## सर्व देशांत हा उत्सव होता व आहे.

बोलूनचालून मनुष्यप्राणीच मुळीं उत्सवप्रिय असल्यामुळें ऋतुपरत्वें त्या त्या कालास अनुरूप असे उत्सव प्रचारांत आणण्याची त्याला सहजच स्फूर्ति उत्पन्न झाली. सध्यां भूमंडलावर प्रचलित असलेले व सकृद्दर्शनीं केवळ धार्मिक वाटणारे उत्सव या स्फूर्तीचेच द्योतक होत. वर्षाकालानंतर शरत् कालांत मानवी प्रकृतीस विशेष सौख्य नसतें. शिशिरऋतूचा विपरीत परिणाम सर्व सृष्टीवर होऊन वनश्रीची शोभा नष्ट होते. वसंतागमनापासून विश्वांतील प्राणिमात्र व वनस्पति यांच्यांत नवीन टवटवी, तेज व जीव, निसर्गदत्त चेतना व जोम यांचा प्रादुर्भाव होतो. हा सण या संक्रमण स्थितीचा द्योतक आहे हें सिद्ध करण्यास ढौंढा राक्षसीचें वर्णन करणारें भविष्यपुराणांतील पुढील एकच वाक्य पुरे आहे.

**अद्य पंचदशी शुक्ला फाल्गुनस्य नराधिप ।**
**शीतकालो विनिष्क्रान्तः प्रातर्ग्रीष्मो भविष्यति ॥ १३२–२४**

म्हणजे " हे राजा, आज फाल्गुन शुक्ल पौर्णिमा आहे. आतां शीतकाल संपून सकाळीं ग्रीष्म लागेल." यावरून होळी म्हणजे थंडीचे त्रासदायक दिवस संपल्याबद्दलचा एक आनंदप्रदर्शक सार्वजनिक होम आहे हें सिद्ध होतें. पुढें निरनिराळ्या सांप्रदायिक पुराणकारांनीं या उत्सवाचा संबंध आपल्या प्रिय देवतेशीं लावून कोणीं तो शिवविषयक तर कोणी कृष्णविषयक आहे असें प्रतिपादन केलें. पाश्चात्य देशांत देखील असाच प्रकार घडला. युरोपांत पूर्वकालीं अनेक देवांची पूजा चालत असे. ख्रिस्ती धर्मामुळें अनेक देवतांची रूढि

नष्ट झाली हें जरी खरें तरी या देवतांसंबंधानें प्रचलित असलेले अनेक उत्सव ख्रिस्ती संतांशीं (Saints) संलग्न करण्यांत आले. अँग्लो सॅक्सन लोक पूर्वकालीं जानेवारीच्या ८ व्या तारखेस वर्षारंभ मानून दिनमान वाढल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ होळी पेटवीत. हल्लीं देखील क्रिस्मसच्या ( नाताळ ) वेळीं अशा रीतीनें होळी पेटविण्याचा विधि होत असतो. विशेष आनंदोत्सवाच्या प्रसंगीं होळी (bon-fire) पेटविण्याची चाल जगावरील सुधारलेल्या लोकांत आहे. प्राचीन रोमन लोक प्रत्येक वर्षीं फेब्रुवारी महिन्याच्या सुमारास जवळ जवळ होळीसारखाच उत्सव साजरा करीत, असें इतिहासावरून दिसतें. महंमदी धर्मानुयायांनीं **मोहरम** हा वर्षारंभाचा महिना मानिला असून शिया पंथाचे लोक अल्ली व त्याचे पुत्र हसन व हुसेन यांच्या प्रीत्यर्थ ताबूत वगैरे करून उत्सव साजरा करितात. या उत्सवांत देखील होळीसारखा विधि आहे. या सर्व भिन्न भिन्न धर्मांच्या अनुयायांतील वसंताप्रीत्यर्थ होत असलेले उत्सव ( नाताळ, ईस्टर, मोहरम, शिमगा ) साजरे करण्याचे प्रकार जवळजवळ सारखेच आहेत. मनोरंजनार्थ घेण्यांत येणारे निरनिराळे वेष, मिष्टान्न भोजन, नृत्यगान वगैरे प्रकार जसे सर्वसामान्य आहेत तसेच मद्यपान, असभ्य वर्तन वगैरे प्रकार सर्वत्र रूढ आहेत. यावरून असें दिसतें कीं उत्सव हे मनुष्याच्या अंतःकरणांत सात्विक वृत्तींप्रमाणें राजस व तामस वृत्ति देखील प्रदीप्त करीत असतात. तेव्हां मूलतः असे उत्सव उत्पन्न करणारांचा हेतु एकीकडेच राहून त्यांच्यांत कालेंकरून अनिष्ट प्रकार कमी अधिक प्रमाणानें शिरत असल्यामुळें कोणी कोणास हासण्याचें कारण नाहीं. असें जरी आहे तरी या उत्सवांस शुद्ध स्वरूप प्राप्त करून देणें आपलें कर्तव्यकर्म होय असें सर्व धर्मांच्या अनुयायांनीं समजलें पाहिजे.

## हिंदुसमाजास प्रश्न.

श्रीकृष्णानें गीतेच्या द्वारें सार्वलौकिक व त्रिकालाबाधित नीतीचा ठेवा सर्व जगाच्या स्वाधीन करून धर्माच्या ठायीं चेतना आणिली अशी त्याची कीर्ति आहे. त्याच भगवंताच्या नामाशीं संलग्न असलेल्या दोलोत्सवांत कित्येक अश्लील व असभ्य प्रकार दृष्टीस पडावे यापरतें अधिक शोचनीय तें काय आहे? योगीराज शिवानें तृतीय नेत्रांतून प्रज्वलित अग्नीच्या ज्वाला बाहेर फेंकून सत्कार्यापासून परावृत्त करूं पाहणाऱ्या मन्मथाची राखरांगोळी केली, त्याच प्रसंगाचें स्मरण म्हणून पाळावयास या उत्सवांत पशुवृत्तीनेंही घटकाभर शरमावें असें

अनाचाराचें वर्तन निःशंकपणें करणें म्हणजे माणुसकीलाही विसरणें नव्हे काय ? शिवाचा जो तृतीय नेत्र तो प्रत्येकास आहे. यालाच ज्ञानचक्षु म्हणतात. ज्ञानाग्नीनें उच्छृंखल मनोवृत्तींचा समूळ उच्छेद करावा असें सांगणारा होलिकोत्सव शीलाची विस्मृति पाडून आम्हांस अनीतिकर्दमांत लोटण्यास कारण व्हावा ना ? गुलाल किंवा अबीर उधळणें, नृत्यगानादिकांच्या योगानें मनाला प्रसन्नता आणणें किंवा आनंदद्योतक होळी प्रत्येक गांवांत पेटविणें यावर आमचा कोणत्याही प्रकारें कटाक्ष नाहीं; परंतु उत्साह वाढविण्याच्या हेतूनें दुराचारांत हे एक दोन आठवडे घालविल्यानें मनावर दुष्ट संस्कारांच्या बीजारोपणास आपण वाव मात्र करून देतों व त्यायोगानें शरीराची व पैशाची माती होते, इतकेंच नव्हे तर स्वसंपादित ज्ञानावर व इभ्रतीवरही पाणी पडतें, याबद्दल आम्हांस अत्यंत खेद वाटतो. आर्यावर्तांत संगीत कलेचा उदय झाल्यावर तिला वैभवशिखरास पोहोंचविणारे कित्येक गायनकलेचे भक्त व भोक्ते होऊन गेले. या कलेची योग्यता लक्षांत आणून तिचें स्वामित्व स्वर्गीय मानलेल्या गंधर्वांकडे जोडिलें. गायनकला सामवेदांतर्गत मानतात. त्याच कलेस सध्यां अवनत दशा प्राप्त झाली आहे. गायनकलेवर निर्वाह करून राहणारा जो वर्ग आहे, त्याची सामाजिक नीतिमत्ता सुधारल्याशिवाय या कलेचा अभ्युदय होणें शक्य नाहीं. या लोकांनीं द्रव्यसंपादनाच्या हेतूनें लोकाभिरुचीस अनिष्ट वळण लाविलें आहे. अशा वेळीं सर्वत्र गांधर्व महाविद्यालयें स्थापन करून या कलेस उच्च पायरीस नेऊन पोहोंचविणारे कैक **विष्णु दिगम्बर** जन्मतील तेव्हांच इच्छित हेतु तडीस जाईल. भजनकीर्तनाच्या वेळीं ईश्वरस्वरूपीं मन खेंचणाऱ्या रागरागिण्या शिमग्याच्या सणांत मनोवृत्तींस अनीतीच्या साम्राज्यांत ओढून नेतात, याबद्दल समाजहितचिंतकांस वाईट वाटावयास नको काय ?

## आमच्या माता व भगिनी

लहानमोठ्यांच्या अश्लील शब्दांच्या माऱ्यास या उत्सवप्रसंगीं बळी पडतात हें पाहिल्यावर तर मन अधिकच उद्विग्न होतें. अशा रीतीनें ईश्वरदत्त वाचेचा दुरुपयोग करणारांची आम्हांस कींव येते. भावी नागरिकांच्या मुखावाटे निघणारे नीच प्रवृत्ति दर्शविणारे उद्गार कानीं पडतांच देशाच्या भविष्य कालासंबंधानें मन निराश व चिंताग्रस्त होतें. आपणास माता व भगिनी शोभतील अशा स्त्रियांची, आपल्या मातृजातीची, निर्भर्त्सना आपल्या कह्यांतील लहान मुलांस

करूं देणारे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुरुष त्यांना जर योग्य वेळीं स्त्रीत्वाच्या थोरवीची ओळख करून देण्यास चुकले तर त्यांच्या या पुढील पिढीच्या हातून स्वोदाहरणानें समाजांत न्याय व समता यांचा प्रादुर्भाव करण्याचें सत्कार्य कधींतरी घडून येण्याची आशा आहे काय ? कांहीं काल जाहीर रीतीनें चाललेल्या या निंद्य वर्तनाचा परिणाम समाजावर नकळत कसा घडतो हें पहावयास आमच्या लोकांच्या तोंडीं बसलेले कित्येक किळसवाणे शब्द पुरे आहेत. ते बायकामुलांच्या देखतही अलंकारार्थींच कां होईना, बिनदिक्कत वापरण्यांत आल्यामुळें त्यांचा अर्थ न कळतां अज्ञ स्त्रिया व मुलें आपल्या भाषणांत ते सहजरीत्या उपयोगांत आणतात, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. ही स्थिति शोचनीय नव्हे काय ? दुर्योधनदुःशासनादिक आसुरी स्वभावाच्या आर्यांनीं साध्वी द्रौपदीस सभेंत आणून तिचा मानभंग करण्याचा जो सर्वस्वी निंद्य प्रयत्न केला त्याबद्दल श्रीकृष्णानें पुढाकार घेऊन सर्व कौरवकुलाचा व त्यांच्या आश्रितांचा कसा नाश केला ही गोष्ट महर्षि व्यासांनीं भारतांत वर्णिली आहे. त्याच श्रीकृष्णाच्या नांवावर अनेक आचरट लीला करण्याचें योजून आपल्या भगिनी व मातेसमान असलेल्या स्त्रियांचा अनेक प्रकारें अपमान करणाऱ्या भारतीयांस भगवंताच्या प्रखर कोपास बळी पडावें लागत आहे आणि त्याच्या अवकृपेमुळेंच ते अधोगतीस गेले आहेत, असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. या उत्सवांत दृष्टीस पडणारा आर्यांचा अधःपात मनःक्लेश उत्पन्न करणारा आहे. हा प्रकार अनुचित, अवैदिक व सद्धर्मबाह्य आहे असें आम्ही निक्षून सांगतों. अमर्याद मद्यपानानें बेहोष होऊन नरकाचें साधन करणारा नरपशु अदूरदृष्टीनें स्वतःच्या हातानें आपलाच गळा कापून घेण्याचें अघोर कर्म करीत आहे. बुद्धीचा भ्रंश, पराधीनता, अनाचार व अनारोग्य यांस कारणीभूत अशा या मद्यपिशाचास कवटाळून थैथै नाचणारे नराधम अल्पकाळांत अधोगतीस गेल्याशिवाय कसे रहातील ? समाजाची घडी बिघडूं नये असें ज्यांस वाटतें त्यांनीं या अधःपातापासून जनतेचा बचाव करण्यासाठीं रात्रंदिवस झटलें पाहिजे. मद्य तयार करणें व विकणें हें कायद्यानें चालू ठेवावयाचें नसून तें बंद पाडलें पाहिजे. अशा उत्सवापासून अलिप्त राहिल्यानें आपलें कर्तव्य संपलें असें मात्र कोणीं समजूं नये. सांप्रत या दिशेनें गांवोगांवीं होत असलेले

## सुशिक्षितांचे प्रयत्न

पाहून मन आनंदित होतें. अर्वाचीन राजर्षि गोपाळ कृष्ण गोखले यांनीं एक-

राष्ट्रीयत्वाच्या दिव्य ध्येयावर उभारलेल्या पवित्र भारतसेवक संस्थेच्या आश्रयाखालीं समाजसेवेप्रीत्यर्थ एक शाखा स्थापन करण्यांत आली असून तिजकडून ज्ञानप्रसार, अंत्यजोद्धार, नीतिवर्धन, ऋणविमोचन, परस्परसहाय वगैरे कार्यक्षेत्रांत अप्रतिम कामगिरी होत आहे. मुंबईसारख्या दहा बारा लक्ष लोकवस्तीच्या नगरींत जागोजागीं होलिकासंमेलनें भरवून जनतेच्या उच्छृंखल वृत्तीस आळा घालण्याचें महत्कार्य देशहितचिंतकांनीं करून जागृति उत्पन्न केली आहे. योग्य दिशेंत चाललेल्या कोणत्याही उन्नतीच्या प्रयत्नास मदत करण्यास राजसत्ताधाऱ्यांनींही तत्पर राहून मद्यपानास आळा घालण्याच्या कामीं उदार मनानें मदत केली पाहिजे. अर्थात् मद्यापासून मिळणारें उत्पन्न स्वीकार करण्यास सर्वथैव अयोग्य आहे असें राज्यसूत्रें चालविणारांनीं ठरवून टाकिलें पाहिजे. मद्यपाननिषेधक संस्था या देशाच्या कोनाकोपऱ्यांत स्थापन झाल्या पाहिजेत. जेणेंकरून लोकांची नीतिमत्ता वाढेल असे अखंड प्रयत्न फक्त फाल्गुनोत्सवाच्या वेळींच नव्हे तर सर्व काल करीत राहिल्यास किती तरी अल्पकालांत या उत्सवास शुद्ध वळण लागेल. चैतन्याच्या उपदेशानें राधाकृष्णाच्या भक्तीस उत्तम वळण लागलें. यामुळें या संप्रदायाचे लोक ह्या उत्सवांत अश्लील प्रकारांस थारा 'देत नाहींत, हें सर्व एका व्यक्तीच्या परिश्रमाचें फळ आहे. तर मग हजारों लोक याच कार्याप्रीत्यर्थ प्रेमानें व उमेदीनें खपूं लागल्यास ह्या उत्सवाचें सध्याचें हिडीस स्वरूप बदलण्यास अवधि लागेल काय ? सुशिक्षित बांधवहो ! अशिक्षितांस वगळून आर्यभूच्या अभ्युदयार्थ केलेल्या प्रयत्नांनीं देशोन्नति होईल असें स्वप्नांत देखील आणूं नका. अशिक्षित बंधूंनो, परंपरागत एवढयाच कारणानें वंद्य मानलेल्या चालीरीति तुम्हांस कितीही प्रिय असल्या तरी तुमचे सुशिक्षित बंधु तुम्हांला योग्य मार्ग दाखवून देत असतां त्यांच्या शब्दास मान द्या. आपला हेका खरा करण्याच्या भरांत तुमच्या उन्नतीचा वृक्ष छाटूं नका. फाल्गुनोत्सवानंतर प्राप्त होणाऱ्या वर्षारंभाच्या दिवशीं पाडव्याची धवल पताका चढविण्याची पात्रता तुमच्या अंगीं असावी, एतदर्थ वर्षाच्या अखेरीचे दिवस शुद्ध स्वरूपाच्या उत्साहांत व उल्हासांत घालवावे हें योग्य आहे. साधारणतः आम्ही असें सुचवितों कीं होळीच्या दिवशीं खेड्याच्या वस्तीच्या मानानें एक दोनच सार्वजनिक होळ्या असाव्या. ग्रामांतील प्रमुखांनीं पंचांची एक कार्यकारी मंडळी नेमून त्यांच्या सूचनेप्रमाणें आवश्यक तो पैसा गोळा करून उत्सवाचा खर्च वजा जातां राहील ती शिल्लक वाचनालयासारख्या ज्ञानाभिवृद्धीच्या सत्कार्यास

लावावी. फाल्गुनोत्सवाप्रीत्यर्थ नृत्यगानादिकांची व्यवस्था सार्वजनिक पद्धतीची करून त्यांतच सर्व लहानथोरांस व्याख्यानें, कीर्तनें, पुराणें, प्रवचनें वगैरेंच्या योगानें ऐहिक व पारमार्थिक कर्तव्यकर्मांची जाणीव उत्पन्न होईल असें करावें. होळीच्या एकदोन दिवसांपूर्वीपासून नगरकीर्तनें चालवावीं. शहरांतील वस्तीच्या मानानें अशाच प्रकारांची योजना करण्याचें काम सुप्रसिद्ध नागरिकांच्या भिन्न मंडळांकडे द्यावें. जाति, तट, पंथ, वगैरे भेदांस मुळींच थारा न देतां एकदिलानें व एकच शुद्ध प्रेरणेनें फाल्गुनोत्सव साजरा करावा. गांवोगांव व शहरांनिहाय स्वयंसेवकांच्या संस्था स्थापन करून त्यांत तरुण सुशिक्षितांचा समावेश करावा. सर्व उत्सवांच्या प्रसंगीं जनतेच्या आधिभौतिक व पारमार्थिक प्रगतीच्या महत्कार्यास त्यांजकडून प्रोत्साहन मिळावें यासाठीं प्रतिष्ठित गांवकरी व विशेषतः शाळांचे अध्यापक यांनीं शक्य ती मदत करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. सर्वमान्य वसंतागमनाप्रीत्यर्थ असलेला हा उत्सव शुद्ध स्वरूपांत चालू ठेवणारे धर्मवीर जन्मास येतील तो सुदिन. परमेश्वर करो आणि असा सुदिन लवकर प्राप्त होवो.

# शेवटची प्रार्थना.

येथवर **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** यथामति लिहून तो आम्हीं आमच्या महाराष्ट्रभाषाभिज्ञ बंधुभगिनींस सादर केला. **पिंडे पिंडे मतिर्भिन्ना** या न्यायानें या पुस्तकांतील आमची विचारसरणी सर्वांसच सारखी पटण्याजोगी नसली तथापि खालील तीन मुद्यांसंबंधानें प्रायः मतभेद असेलसें वाटत नाहीं.

१. प्रत्येक आर्यपुत्रास व दुहितेस स्वधर्म व स्वदेश यांबद्दल आदर व अभिमान असला पाहिजे.

२. प्रत्येकानें प्राचीनकालाचें यथार्थ ज्ञान करून घेण्याविषयीं झटलें पाहिजे.

३. सत्य, न्याय, समता, पावित्र्य, अंतर्बाह्य शुद्धता व परोपकारबुद्धि यांच्या मदतीनें चतुर्विध पुरुषार्थ साधून श्रीसमर्थांची ' **सत्कर्मयोगें वय घालवावें। सर्वां मुखीं मंगल बोलवावें॥**' ही उक्ति सार्थ केली पाहिजे.

या वरील हेतुत्रयास पुष्टिकारक असा हा सणांचा इतिहास लिहितांना आम्हीं जागोजाग केलेल्या सूचनांचा सर्वांनीं विचार करावा व वरील हेतु तडीस जाण्यासाठीं आम्हीं सूचित केलेले किंवा इतर पसंतीस उतरणारे उपाय योजावे. जनतेंत प्रेमसंवर्धन करून एकोपा घडवून आणण्यास उत्सवासारखा दुसरा रामबाण उपाय नाहीं. नागरिकांचे व खेडवळांचेही उत्साहवर्धक उत्सव राहिलेच पाहिजेत; परंतु त्यांच्यांतील अनाचार व अनीति काढून टाकून त्यांस शुद्ध वळण देण्यास सुशिक्षितांनीं शैथिल्य टाकून कंबर बांधली पाहिजे. आमचे गृह्यसंस्कार शुद्ध झाले, उत्सवांतील शिष्टसंमत नसलेला भाग नाहींसा झाला, बंधुत्वभावनेचा विकास झाला व परमात्म्याची ओळख पटूं लागली म्हणजे आम्ही खास उन्नतिपथ आक्रमूं लागलों असें म्हणावयास हरकत नाहीं. उपदेशामृतानें सर्वतोपरी आमची कायिक, वाचिक व मानसिक प्रगति व्हावी हेंच आमचीं कथाकीर्तनें, जत्रा, पूजासमारंभ, प्रवचनें इत्यादिकांचें उद्दिष्ट आहे.

आर्यभूमींत जन्मून तिच्या अन्नावर पोसलेले आम्ही सर्व आर्यऋषींचे वंशज परस्परहितार्थ सदा सिद्ध असूं या. आमचे मतभेद, पंथभेद, वर्णभेद, जातिभेद वगैरे सर्व भेदांपासून उगम पावणाऱ्या द्वैतभावास हिंदमातेच्या पायाशीं अस-

लेल्या महासागरांत कायमची जलसमाधि देऊन सर्व प्रकारें देशोन्नतीच्या कार्यास लागूं या. पुरुषाच्या यज्ञापासून विश्व निर्मित झालें असें मानणारे आम्ही आत्मोन्नति व देशोन्नति यांप्रीत्यर्थ स्वतःच्या क्षणभंगुर सुखदुःखांचा यज्ञ करण्यास सदैव तयार होऊं या. जीं आर्यभूमातेचीं लेंकरें या मातृकार्यासाठीं तनुमनधनें-करून प्रत्यहीं झटत आहेत, त्यांचा विजय असो ! जे आर्यावर्तांतील लहानमोठे राज्यकर्ते स्वार्थत्याग करून जनतेची प्रगति व्हावी एतदर्थ अव्याहत प्रयत्न करीत आहेत, त्यांचा विजय असो ! ऋषिमुनींनीं आपल्या वेदवाणीनें ज्या देशाच्या वातावरणांत पवित्रता उत्पन्न केली व आत्मानुभवाचा लाभ मानव-जातीस व्हावा एतदर्थ तत्त्वज्ञानाचा वर्षाव करून मनुष्यमात्रास पुरुषार्थ साध-नाचे उपाय सुचविले आणि अमृतोपम ज्ञान जीवन दिलें, त्याच देशांतील लोकांनीं स्वत्वास विसरून परोपजीवी व्हावें यापरतें शोचनीय तें काय आहे ? नष्टवैभव या देशास पुनरपि प्राप्त होऊन तो अखिल जगतास सन्मार्गदर्शक व मुक्तिदायक होवो.

**सन्तः सन्तु निरंतरम् सुकृतिनो विध्वस्तपापोदया**
**राजानः परिपालयन्तु वसुधां धर्मे स्थिताः सर्वदा**
**कालें संततवर्षिणो जलमुचस्संतु स्थिराः पुण्यतो**
**मोदन्तां घनबद्धबांधवसुहृद्गोष्ठीप्रमोदाः प्रजाः ॥**

शेवटीं ज्या जगच्चालकाच्या प्रेरणेनें हें ग्रंथलेखनाचें कार्य हातीं घेतलें व ज्याच्या कृपेनें तें पूर्ण झालें त्या दयाघन परमेश्वराकडे अनन्य भावानें वरील सार्वत्रिक कल्याणाचें मागणें मागून सर्वांचें शुभ चिंतितों.

# आर्यांच्या सणाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास.

## ( सहा रंगीत चित्रें व प्राचीन हिंदुस्थानचा नकाशा यांसह )

लेखक **ऋग्वेदी.**

**पृष्ठसंख्या ४२०.** **कापडी प्रतीस किंमत २-८-०**

( सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति. )

या पुस्तकांत आम्ही ( एका वर्षांत ) पाळीत असलेल्या एकंदर ४३ सणांची माहिती आली असून तें वाचल्यावर हिंदुधर्माचें रहस्य काय आहे हें कळून येईल. समाजाची उन्नति धार्मिक बलावर कशी अवलंबून आहे व राष्ट्रोद्धाराच्या कामीं या सणांसारखे प्रसंग कशा रीतीनें उपयोगांत आणतां येतील याचें धार्मिक विवेचन सर्व मतांच्या व ज्ञातींच्या बंधुभगिनींस मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. या पुस्तकाची पहिली ३००० प्रतींची आवृत्ति एका वर्षांत संपली व याचें गुजराथी भाषांतर अहमदाबाद येथील गुजरात विद्यापीठाच्या विद्यमानें चालणाऱ्या पुरातत्व मंदिर या संस्थेनें प्रसिद्ध केलें. इतक्यावरून या ग्रंथाची थोरवी लक्षांत येण्याजोगी आहे. सारांश, विद्वान् व अविद्वान्, लहान व थोर, ब्राह्मण व ब्राह्मणेतर, सुधारक व पुराणप्रिय लोक, स्त्रिया व पुरुष, जुन्या व नव्या विचाराचे प्रागतिक या सर्वांस अत्यंत प्रिय होऊन बसलेलें एखादें पुस्तक असेल तर तें " आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास " हेंच आहे. महाराष्ट्रांतील विद्वानांनीं व अनेक वृत्तपत्रकारांनीं दिलेले अभिप्राय खालीं देत आहों. ते वाचून पाहिल्यावर या पुस्तकाची योग्यता कळून येईल.

महाराष्ट्राच्या परिचयाचे विद्वान् लेखक श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी.ए. यांनीं आपल्या भारदस्त प्रस्तावनेंत या पुस्तकाविषयीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

"आमच्या सामाजिक सुधारणेची इमारत सशास्त्र व पद्धतशीर रीतीनें उठविण्याची जर आमची खरी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे तर आमच्या समाजाच्या पूर्वपरंपरेविषयीं अज्ञानांत राहून कसें चालेल ? आमच्या समाजाच्या पूर्वेतिहासाविषयीं अज्ञानमूलक अभिमान जसा गर्ह्य आहे तसा त्या इतिहासाविषयीं अज्ञानमूलक तिरस्कारही तितकाच गर्ह्य व हानिकारक नाहीं काय ? अशा विचाराचा प्रादुर्भाव मनांत होऊन त्या अज्ञानाच्या उच्छेदार्थ ' मूले कुठारः ' घालण्याची प्रेरणा होणें व त्या प्रेरणेचें फल प्रस्तुत पुस्तकाच्या रूपानें दृश्य होणें हें आमच्या उदयोन्मुखतेचें लक्षण आहे असें वाटून माझ्या मनाला जो संतोष वाटतो त्या संतोषाच्या भरांत मी प्रस्तुत पुस्तकाला '**सामाजिक सुधारणा विचारांचें अवतारकृत्य**' असें गौरवयुक्त अभिधान देतों...ज्ञानसंग्रहाच्या व समाजाच्या प्रगतीच्या अशा दोन्ही दृष्टीनें प्रस्तुत पुस्तकाची उपयुक्तता मोठी आहे व त्याचा जन्मही अत्यंत समयोचित झाला आहे असें मला वाटतें."

**पुस्तकांतील विषय**—विषयप्रवेश ( प्राचीन ज्योतिषविषयक माहिती ) संवत्सर प्रतिपदा, श्रीरामनवमी, दोलोत्सव, गौरी उत्सव, हनुमान जयंती, अक्षय्य तृतीया, परशुराम जयंती, नृसिंह जयंती, गंगोत्सव ( दशहरा ), वटसावित्री, महा एकादशी, चातुर्मास, नागपंचमी, मंगलागौरी, श्रावणी, पोवती पौर्णिमा, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्णजन्माष्टमी, पिठोरी अमावास्या, पोळा ( वृषभोत्सव ), हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, ज्येष्ठा गौरी, वामन द्वादशी, अनंत चतुर्दशी, महालय पक्ष, नवरात्र महोत्सव, विजया दशमी ( दसरा ), दीपावली, बलिप्रतिपदा, यमद्वितीया ( भाऊबीज ), तुलसी विवाह, धात्रीपूजन, वैकुंठ चतुर्दशी, त्रिपुरी पौर्णिमा, चंपाषष्ठी, श्रीदत्त जयंती, मकरसंक्रमण, वसंतपंचमी, रथसप्तमी, महाशिवरात्री, फाल्गुनोत्सव व होळी.

**विषय विवेचन पद्धति.** प्रारंभीं, कालाच्या अनाद्यनंतत्वासंबंधाचें विवेचन १८ पृष्ठें असून त्यांत वेदकालापासून कालगणनेचे शोध, पंचांगपद्धति वगैरे वर्णिली आहे. प्रत्येक सणाचा इतिहास देतांना त्याची पौराणिक उत्पत्ति, ऐतिहासिक पुरावा, शास्त्रोक्त विधि, प्रांतपरत्वें रूढिभेद, सणांत अंतर्गत असलेल्या सामाजिक व नैतिक तत्वांविषयीं विचार, सणांचा हेतु, त्यापासून घेण्या

जोगा बोध, वगैरे विवेचन वस्तुस्थितीस जुळेल असें केलें आहे. उदाहरणार्थ खालीं दिलेल्या सणांत जीं प्रकरणें आहेत त्यांचें त्रोटक वर्णन पुढें देत आहोंः—

**श्रीरामनवमी**—श्रीरामकथा, शास्त्रोक्त विधि, चालू रूढि, ऐतिहासिक माहिती, क्षत्रियांचा धर्म, क्षत्रियांची कामगिरी, रामायणकालीं सामाजिक नीतिमत्ता, त्या कालीं ब्राह्मणांचें वर्चस्व, वैदेही जनक राजा, रामराज्य, रामायणकालीन स्त्रीसमाज, पतिपत्नींतील प्रेम, नूतन विचारांचा उदय, राम ही व्यक्ति काल्पनिक किंवा ऐतिहासिक, वानर हे कोण, रामायणाचा काल, राम हा सातवा अवतार, रामानें केलेले लोकोत्तर चमत्कार, चमत्कारांचा उलगडा, रामचरित्रापासून बोध, श्रीरामाची आरती–पृष्ठें ३५.

**महाएकादशी**—पौराणिक उत्पत्ति, शास्त्रोक्त पालन, रूढि, श्रीविष्णूचें वेदांतील वर्णन, विष्णुलोक, विष्णूचे अवतार, अवतार-रहस्य, विष्णुभक्तीचा संप्रदाय, वासुदेव धर्म, भागवत धर्म, वैष्णव धर्म, मध्वाचार्यादि वैष्णव धर्मप्रवर्तक, महाराष्ट्रांत भागवत धर्मांचा प्रसार, श्रीसाधु तुकाराम, वारकरी संप्रदाय, ऐतिहासिक व राष्ट्रीयदृष्ट्या विचार, सामाजिकदृष्ट्या महत्व, बोध, श्रीविष्णूची आरती. पृष्ठें ३०.

**श्रावणी**—शास्त्रोक्त उपपत्ति, रूढि, श्रावणीविषयीं प्राचीन माहिती, उपनयन संस्काराची उपपत्ति, ज्ञानसंपादनाचे जुने मार्ग, ब्रह्मचाऱ्यास उपदेश, उपाकर्म व उत्सर्जन यांचें रहस्य, यज्ञोपवीत घालण्याची रूढि, गायत्री मंत्राचा अर्थ व त्याचें महत्व, हेतु व बोध. पृष्ठें १३॥.

**श्रीकृष्णजन्माष्टमी**—श्रीकृष्णचरित्र, शास्त्रोक्त विधि, रूढि, मथुरा गोकुळ व वृंदावनाचें वर्णन, श्रीकृष्णाचें अवतारकार्य, श्रीमद्भगवद्गीतोपदेश, श्रीकृष्णाविषयीं गैरसमज, हेतु व बोध, श्री कृष्णाची आरती. पृष्ठें ३१॥.

**महाशिवरात्री**—ऋग्वेदकालीं शिवोपासना, यजुर्वेदांतील शिवोपासना, उपनिषदांतील शिव, महाभारत कालीं शिवोपासना, शिवरात्रीची उपपत्ति, विधि व रूढि, शैव पंथ, उपसंहार. पृष्ठें २२.

याप्रमाणें प्रत्येक सणाविषयींचें विवेचन फार बोधप्रद व मनोरंजक आहे. सौर, शाक्त, वैष्णव, गाणपत्य वगैरे अनेक पंथ, ज्योतिष, तत्वज्ञान, प्रांतपरत्वें रूढिभेद, शास्त्रकारांची अनुशासन पद्धति या सर्वांचें यथार्थ ज्ञान होण्यास हा ग्रंथ कारणीभूत होईल. या पुस्तकांत माहिती देण्यासाठीं वेद, ब्राह्मणें, पुराणेतिहास, गृह्यसूत्रें, काव्य, स्मृतिशास्त्र, यवन प्रवाशांचे लेख, शिला लेख, नाणीं

लेणीं वगैरेंची माहिती या सर्वांचा उपयोग केला असल्यामुळें सहजच वाचकाच्या अंगीं बहुश्रुतपणा येईल. याच्या वाचनानें आमच्या देवदेवतांची, शास्त्र-पुराणांची, क्षेत्रांची, प्राचीन ऋषींची, वेदकालीन व रामायण भारत कालीन समाजस्थितीची, उपनयन विवाहादि संस्कारांची साधार माहिती होईल. यांतील विवेचन लक्षांत घेतां प्रत्येक सणावर दिव्य प्रकाश पडेल.

## संस्थानिक व सरकार यांचा आश्रय.

**श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी संस्थानचे अधिपती** यांनीं या पुस्तकाच्या कांहीं प्रतींस आश्रय देऊन पुढील आशयाचें पत्र पाठविलें:—

The book has been sanctioned for prizes in the State Schools. *The book deserves support at the hands of public and Educational bodies* (ता. १५ जुलै १९१६.)

**श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि, औंध संस्थानचे अधिपति** यांनीं या पुस्तकाच्या कांहीं प्रतींस आश्रय देऊन पुढील आशयाचें पत्र पाठविलें:— 'सदरहु पुस्तक वाचलें म्हणजे आपण केलेल्या श्रमांचें चांगलें चीज झालें असल्याचें दिसून येतें.' ( ता. २१ जानेवारी १९१७ )

**श्रीमंत सौ. थोरल्या महाराणी साहेब, इंदूर संस्थान** यांस सादर केलेलें पुस्तक वाचून पाहून त्यांनीं संतोष व्यक्त केला व खानगी कारभारी साहेब यांच्या विद्यमानें ६० प्रति मागवून उदार आश्रय दिला.

**श्रीमंत सौ. महाराणी साहेब, बडोदें संस्थान** यांहीं पुढील प्रमाणें अभिप्राय व्यक्त केला:— 'पुस्तक धर्मविषयक असून त्यांतील विवेचनही फार मार्मिक आहे. या कामांत ग्रंथकर्त्यानें खरोखर फारच परिश्रम केले आहेत.'

**डायरेक्टर, विद्याखातें सेंट्रल प्रोव्हिन्सेस व वऱ्हाड.** हुकूम नं. ४१५७, नागपूर ता. ५ जुलै १९१६ या अन्वयें हें पुस्तक प्रायमरी, व्हर्नॅक्युलर मिडल, एंग्लो व्हर्नॅक्युलर मिडल, हायस्कूल व नॉर्मलस्कूल यांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर करण्यांत आलें आहे. ( पहिली आवृत्ति. )

**एज्युकेशनल् इन्स्पेक्टर सेंट्रल डिव्हिजन्.** हुकूम नं. १३६७४, ता. १७ मार्च १९१७ या अन्वयें हें पुस्तक प्रायमरी व ॲंग्लो व्हर्नॅक्युलर शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर करण्यांत आलें आहे. ( पहिली आवृत्ति. )

# ग्रंथकर्त्यास पारितोषकें.

**डेकन व्हर्नॅक्युलर ट्रान्स्लेशन् सोसायटी, पुणें.** या संस्थेनें ग्रंथकर्त्यास रोख रुपये ६० बक्षीस दिले. बक्षीस देण्याविषयीं परीक्षकांनीं शिफारस करतेवेळीं या पुस्तकावर दिलेले अभिप्राय खालीं दिले आहेतः—

१ पुस्तक फार काळजीनें व पुष्कळ माहिती गोळा करून लिहिलेलें आहे. हें पुस्तक फार उपयोगी आहे. भाषा चांगली आहे. पुस्तक जुन्या व नव्या विचाराचे लोकांस सारखेंच ग्राह्य होण्यासारखें आहे. पुस्तककर्त्यास बक्षीस द्यावें असें माझें मत आहे.

2 This is a very thoughtful contribution to Marathi literature in a department which is comparatively very poor. The history of Hindu social institutions has yet to be written and the work under review is an attempt to interpret the spirit underlying the ritual and usages observed on Hindu Holidays. *The work displays commendable research and is noteworthy for its broad catholicity and the lofty patriotism which breathe throughout its pages.* I have no hesitation in recommeding it for a prize.

**मराठी ग्रंथोत्तेजक कमिटी, इंदूर,** या कमिटीनें ग्रंथकर्त्यास रोख रुपये ७० बक्षीस दिले.

**श्रीमत्पूर्णानंदसरस्वती स्वामी गौडपादाचार्य-कैवल्यपूर.** श्रींस सादर केलेलें पुस्तक वाचून आनंद झाला. ग्रंथकर्त्यास कल्याण मुक्कामीं येण्याविषयीं आज्ञा झाली; परिश्रमपूर्वक एक उपयुक्त धर्मविषयक ग्रंथ लिहून स्वधर्मसेवा केल्याबद्दल श्रीनीं संतोष व्यक्त करून ग्रंथकर्त्यास फलमंत्राक्षतासह २५ प्रतींची किंमत बक्षीस देऊन आशीर्वाद दिला.

**श्रीमत् श्रीरामानुजसम्प्रदायाचार्य श्रीमदनन्ताचार्य स्वामी.** ( १ फेब्रुआरी १९१७ ) श्री कांची येथील श्री प्रतिवादि भयंकर मठाधिपति आचार्यपूज्यांनीं पुस्तकाची एक प्रत मागविली होती. ती वाचून आचार्यांस संतोष झाला व इटावा येथून लहान बक्षीस पाठवून पुढील प्रमाणें आज्ञापत्राच्या द्वारें आशीर्वाद दिलाः—' **इतिहासग्रन्थदर्शनेन नितरां प्रसन्ना आचार्यपादाः । समयेस्मिन्नेतादृशानां ग्रंथानाम्महत्यावश्यकतेति च श्रीमदाचार्याणामभिप्रायः ।**'

## महाराष्ट्रांतील विदुषींचे अभिप्राय.

**श्री. रमाबाई साहेब रानडे, पुणें**—प्रत्येक सणाची यथातथ्य माहिती या पुस्तकांत दिली आहे ती अतिशय उपयुक्त आहे. दिवसें दिवस नवीन बायकांत धार्मिक भावना कमी होत चालली आहे. लिहितांवाचतां येत असून दुसरे अनेक अभ्यास व व्यवसाय पाठीमागें असल्यामुळें त्यांस जुने व नवे ग्रंथ वाचण्यास सवड मिळत नाहीं व त्यामुळेंच नव्या पिढीला आर्यांच्या सणांच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाची माहिती असावी तशी असत नाहीं हें खरें आहे. म्हणून प्रस्तुत पुस्तक अतिशय श्रम करून जुने नवे ग्रंथ पाहून व त्यांतील निरनिराळीं प्रमाणें देऊन फार उपयोगाचें केलें आहे; म्हणजे तें आर्यावर्तांतील निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या चालीरीती, धार्मिक समजुती, व्रतवैकल्यें व सण यांचें मार्गदर्शकच होऊन बसलें आहे. या दृष्टीनें या पुस्तकाची किंमत फार मोठी आहे. तें प्रत्येक स्त्रीपुरुषानें संग्रहीं ठेवण्यास योग्य आहे. ज्याला विकत घेण्याची ऐपत नसेल त्यानें तें एक वेळ वाचून तरी पहावें.

**श्रीमती काशीबाई कानिटकर.**—पुस्तक फार सुंदर व उपयुक्त आहे. सध्यांच्या काळीं अशा पुस्तकाची फार गरज होती. आपल्या पूर्वजांनीं हे सण रूढीमध्यें कां आणिले व त्यांची उपयुक्तता काय आहे हें या पुस्तकावरून चांगलें समजेल. अशासारखें पुस्तक प्रत्येकाचे संग्रहीं असावें अशी त्याची योग्यता आहे.

## महाराष्ट्रांतील विद्वानांचे अभिप्राय.

**कै. वा. रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी, एम्. ए., माजी एज्युकेशनल् इन्स्पेक्टर, वऱ्हाड,**—चैत्रापासून आरंभ करून दर महिन्यांत कोणकोणते सण पाळण्यांत येतात, त्यांचा शास्त्रोक्त विधि, चालू रूढि, प्रांतपरत्वें विधिभेद, पूर्वेतिहास, चालू रूढींत कोणकोणते फरक करणें इष्ट आहे इत्यादि सूचक अशी या ग्रंथाची रचना आहे. पूर्वेतिहास मिळविण्याकरितां ग्रंथकारांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत. वेद, ब्राह्मणें, उपनिषदें, सूत्रें, काव्यें, पुराणें, म्यागेस्थेनिस, ह्युएनत्संग, यवन प्रवासी यांचे ग्रंथ, अलीकडे प्राचीन इतिहासाची माहिती, नाणीं, लेणीं, अवशेष यांच्या साहाय्यानें झाली ती, यांचा आधार घेऊन वर्णन केलें आहे. विचार ठायीं ठायीं दिले आहेत. पूर्वेतिहास समजून घेण्याची आवश्यकता पुराणमताभिमानी व सुधारकाग्रणी यांस अवश्य असल्यानें दोघांसही या ग्रंथापासून फायदा होईल.

श्रीयुत **पांडुरंग वामन काणे, एम्. ए., एल्. एल्. एम., मुंबई.**— पुस्तकांत प्रतिपादलेला विषय रोजच्या व्यवहारांतील असूनही पुस्तक फार मनोरंजक झालें आहे. पुस्तकांत संकलित केलेली माहिती अत्यंत उपयुक्त असून शोधक बुद्धीनें व मार्मिकपणानें दिलेली आहे. ग्रंथकारानें जागोजाग जे विचार प्रगट केले आहेत ते मनन करण्यासारखे आहेत. पुस्तकाचें एकंदर धोरण उदात्त असून आपलें स्वत्व व चांगुलपणा कायम ठेवून विवेचक बुद्धीनें आपल्या आचारविचारांत, धर्मसमजुतींत व सणांत कोणता फरक केला पाहिजे व कसा केला पाहिजे हें ग्रंथकारानें समतोल भाषेंत परंतु स्पष्टपणें सांगितलें आहे. ग्रंथकाराची विचार करण्याची शैली, त्यानें केलेल्या सूचना या खरोखर मननीय आहेत. ह्या पुस्तकानें महाराष्ट्र वाङ्मयांत एका उत्तम पुस्तकाची भर पडल्यासारखें होईल. पुस्तकाची भाषा साधी, सरळ व गंभीर असून विषयास साजेल अशी आहे.

**कै. सर नारायण गणेश चंदावरकर, माजी हायकोर्ट जज्ज, मुंबई.** —It is just the kind of book that is very much wanted in these days to awaken in the minds of our people a clear consciousness of the real meaning and object of and the spritual principle underlying the holidays. You have brought out the meaning and the object with a faithful adherance to the noblest part of Hindu traditions and Shastras and I trust your book will be largely read and will prove a source of useful instruction and enlightenment. The labour you have spent on this book is commendable and deserves warm appreciation from the pubilc concerned.

**श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए., एल्. एल्. बी., केसरी व मराठा पत्रांचे संपादक, पुणें**—एकंदरीनें पुस्तकाविषयीं माझा बराच अनुकूल ग्रह झाला. हिंदूलोकांची सणांची आवड व त्यांवरील त्यांची निष्ठा प्रसिद्धच आहे. तथापि सणांच्या उपपत्तीविषयीचें समाजाचें ज्ञान अलीकडे इतकें मलीन झालें आहे कीं, सणाचा दिवस उगवला म्हणजे केवळ परंपरागत चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें आचारपालन करण्यापलीकडे सणांच्या मर्मांत लोक फारसे शिरलेले दिसत नाहींत. वास्तविक सशास्त्र उपपत्ति कळल्यानें आचारपालनाचा आनंद कमी न होतां वाढावा हेंच स्वाभाविक आहे. असो.

आपण परिश्रम पूर्वक आर्यांच्या सणांच्या उत्पत्तीचें किंवा उपपत्तीचें जें संशोधन केलें आहे तें भाविक व अभाविक या दोहोंसही सारखेंच आवडेल असें मला वाटतें. समाजशास्त्रासंबंधी पुस्तकें मराठींत फारशीं नाहींत यामुळें आपल्या पुस्तकाचा वाचकवर्गाकडून उत्सुकतेनें स्वीकार होईल अशी आशा आहे.

**कै. वा. जनार्दन सखाराम कुडाळकर, एम्. ए., एल्. एल्. बी., क्युरेटर ऑफ लायब्ररीस, बडोदें.**-हें पुस्तक एक ऐतिहासिक माहितीची भरपूर खाण आहे असें आढळून आलें व त्यानें आर्यांच्या प्राचीन इतिहासावर जो नवीन प्रकाश पाडण्याचा यत्न केला आहे तो खरोखरच चकित करणारा व प्रशंसनीय आहे. लेखकानें निव्वळ काल्पनिक किंवा ऐकीव माहितीवर भिस्त ठेवून आर्य संस्कृतीचे पोवाडे गाण्याचा यत्न न करतां आपल्या विशाल वाचनाचा व खऱ्या शोधक बुद्धीचा उत्तम उपयोग केल्याचें पुस्तकाचें प्रत्येक पृष्ठ व प्रकरण पुरावा देतें. अशा प्रकारचीं पुस्तकें आमच्या शाळांतील व कॉलेजांतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वाचनांत जितक्या अधिक प्रमाणांत येतील व त्यांचें महत्व शिक्षक लोक जेवढें खोल आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवितील तितकी त्यांची शोधकबुद्धि विकसित होऊन आमच्या प्राचीन इतिहासाच्या संशोधनास मदत होईल व तेणेंकरून आमच्या भावी उन्नतीस प्रोत्साहन मिळेल यांत कांहीं संशय नाहीं. लेखकानें दाखविलेल्या नवीन विचारांच्या दिशा सत्यान्वेषणाच्या खऱ्या मार्गाकडे पुष्कळ वाचकांचीं मनें वळवितील व त्यामुळें आर्य संस्कृतीचा खरा इतिहास लवकरच संकलित होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत. पुस्तकांतील कांहीं प्रकरणें अत्यंत चित्ताकर्षक व उत्साहजनक वाटतात व तीं वाचतांना प्रत्येक वाचकाच्या विचारशक्तींत एक नवीनच स्फूर्ति उत्पन्न होते. हें पुस्तक प्रत्येक शाळाखात्यानें व पुस्तकालयानें आश्रय देण्यास अगदीं योग्य आहे.

**श्रीयुत चिंतामण गंगाधर भानू, बी. ए., माजी प्रोफेसर फर्ग्युसन् कॉलेज, पुणें:**—पुस्तक बहुश्रुतपणाचें द्योतक असून बहुतेक सणांचा इतिहास पुष्कळच शोध करून लिहिला आहे. प्रत्येक ठिकाणीं विद्यमान सणांत शिरलेला कवाइती भाग घेऊन तो कां नको व प्रत्येक सणापासून कोणता बोध घ्यावा हें चांगल्या सुबोध भाषेंत व सयुक्तिक मांडणी करून सांगितलें आहे. महाराष्ट्रांतील सणांचा सामग्र्यानें इतिहास देण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे. असा कांहीं तरी प्रयत्न हवा होता. सणांचें विभाजन व वर्गीकरण चांगलें केलें आहे.

**वे. शा. सं मठस्थ गणेश रामचंद्र शर्मा, "आर्योत्सव प्रकाश" कर्ते, खानापूर.** आपलें पुस्तक माझ्या पुस्तकाचें उत्कृष्ट सटीक विवेचन आहे. माझी मूळ कृति आपण सर्वोत्कृष्ट तऱ्हेनें विशद स्वरूपांत लोकांपुढें आणून एक अत्यंक महत्वाच्या व जरूर असलेल्या विषयाची महाराष्ट्र वाङ्मयांत चांगलीच भर घातली. आपल्या पुस्तकांतील 'हेतु व बोध' हीं सदरें फारच बहारीचीं वठलीं आहेत.

## इंग्रजी वृत्तपत्रांतील अभिप्राय.

**The Bombay Chronicle** ( 18-7-1916. ):—An original contribution to the scant literature on the subject of Hindu Holidays and festivals has been made by a Marathi writer in a volume entitled "The history of Hindu Holidays." The author appears to be an undoubtedly well informed person who has dived deep not only into the History of Hindu civilization, but also into the antiquities of the various branches of the Aryan family of nations, in his endeavour to trace the origins of well known Hindu festivals. The Hindu Holidays, like the Christian, have thair deep significance to the Hindu youth, not only in their origin but also in their development through the past. The whole work is a storehouse of information on every thing pertaining to the Hindu Holidays and sheds light on many points regarding the same, which were not clear before.

**The Modern Review**, Calcutta ( October 19·6 ):—In these days when a good deal of interest is created in the minds of young men in the history of their nation in its political, Social, and religious aspects, the publication of a work tracing the history of our festivals to their origin, noting the transformations they have undergone in the course of centuries, describing the present stage of growth or decadence and making useful suggestions to restore them to their pristine greatness or to adapt them so as to suit our present circumstances, must be considered very opportune. The variety and amount of information, the lucidity of the style, the nice way of presenting the subject

matter so as to make it palatable, the balance of judgment discernible through out the work, the breadth of view and the instruction and the enlightenment it gives, are some of the most attractive features which ensure commendation and warm appreciation from the public, both of orthodox and reformed views. The book is undoubtedly a valuable addition to the existing Marathi literature.

**The All India Saraswat** (October 1920)--The book is a veritable mine of information and in every page breadth of view, instruction, enlightenment, and balance of judgment are descernible which equally appeal to the old and the new school of thought. The work displays commendable research and is noteworthy for its broad catholicity and lofty patriotism.

## मराठी वृत्तपत्रांतील अभिप्राय.

**केसरी, पुणें** ( ता. २२ आगष्ट १९१६ )—विषयप्रवेश कालाच्या अनाद्यनंतत्वापासून करून क्रमानें सर्व सणांचें निरूपण केलें आहे. सणांची माहिती देतांना प्रथम त्यांचा इतिहास, नंतर हल्लीं प्रचारांत असलेला त्यांविषयींचा आचार व शेवटीं हेतु आणि त्यापासून घ्यावयाचा बोध या गोष्टी योग्य रीतीनें मांडल्या आहेत. आर्यसणांचें विहंगम दृष्टीनें अवलोकन केलें म्हणजे त्यांत सदाचारसंपन्न पुरुषांचा इतिहास, सदुपदेश, जातीचें ऐक्यवर्धन व नित्य परिपाठांतील क्रमांत वैचित्र्य उत्पन्न करून मनोरंजन इत्यादि गोष्टी असलेल्या आपणास दृष्टीस पडतील. हें पुस्तक वाचनीय आहे व ग्रंथकारांनीं जागोजाग केलेला उपदेश अत्यंत आदरणीय आहे. पुराणमतवादी व सुधारणाभिमानी या दोघांस केलेला ( ३९७ पानांवरील ) उपदेश अथवा प्रार्थना अत्यंत कळकळीची असून त्यावरून लेखकाची समाजभक्ति व देशभक्ति चांगली व्यक्त होत आहे.

**ज्ञानप्रकाश, पुणें** ( ता. १७ जून १९१६ )—आर्यांच्या सणांचा शोधपूर्वक व सविस्तर इतिहास लिहिण्याचा मराठींत तरी हा पहिलाच प्रयत्न होय. फार प्राचीन काळापासून हिंदी लोकांत जे सण चालत आले आहेत व जे आजही कमी अधिक प्रमाणानें पाळले जातात त्यांची माहिती हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस असणें अगत्याचें आहे. यापुस्तकांत चैत्रादि महिने ओळीनें घेतले असून प्रत्येक महिन्यांत कोण कोणते सण येतात, त्यांचें स्वरूप काय

त्यांची उत्पत्ति कशी झाली असावी वगैरे गोष्टींचें मोठ्या मार्मिकपणानें व चिकित्सक बुद्धीनें वर्णन केलें आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत एकच सण कसकसा पाळला जातो यासंबंधाची माहिती फारच उपयुक्त व मनोरंजक आहे. शाक्त पंथासंबंधानें दिलेली माहिती फार चांगली व मनोरंजक आहे. रा. "ऋग्वेदी" यांनीं पुष्कळ प्रयत्नांनीं माहिती मिळविल्यानंतर मग ग्रंथरचनेस हात घातला असल्यामुळें या पुस्तकास विशेष महत्व आलें आहे.

**जगद्वृत्त-मुंबई.** ( ता. ११ जून १९१६ )—हिंदुसमाजाची आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नति व्हावी या एकाच हेतूनें प्रेरित होऊन लेखकानें हें पुस्तक लिहिलें असल्याकारणानें त्याचें महत्व विशेष आहे. निरनिराळ्या सणांच्या उत्पत्तीविषयींचे भाग अत्यंत उपयुक्त व चित्ताकर्षक झाले आहेत व हें पुस्तक जुन्या व नव्या विचारांच्या लोकांस सारखेंच प्रिय होईल असें वाटतें.

**मल्लारि मार्तण्ड विजय,** इंदूर ( ४ मे १९१६ )—या पुस्तकाची खरी ओळख होण्याला आणि ग्रंथकर्त्यानें किती परिश्रमानें माहिती गोळा केली आहे व ती किती चातुर्यानें संकलित करून आपल्या हिंदुसमाजाच्या गुणदोषांचा आरसा आपल्या पुढें मांडला आहे हें कळण्याला पुस्तकाचें वाचन व मनन हीं अवश्य आहेत. हीं केल्यावर प्रस्तुत ग्रंथाची योग्यता व सध्याचे काळीं असे ग्रंथ निर्माण होण्याची अवश्यकता कळून येणार आहे. माहितीच्या दृष्टीनें तर हा ग्रंथ अपूर्व आहे. **उत्तम विचार, भरपूर माहिती, सुंदर विवेचन-पद्धति, आणि निर्दोष भाषा** यांनीं हें पुस्तक सर्वांच्या आदरास व आश्रयास पात्र व्हावयास पाहिजे.

**सुबोध पत्रिका,** मुंबई. ( ता. ३० एप्रिल १९१६ )—हिंदुसमाजाच्या आजच्या नव्या पिढीला आपल्या सणांची कितपत माहिती असते याचा विचार केला म्हणजे आपल्याला सर्वत्र अज्ञान दिसून येतें. सर्व सणांचें ऐतिहासिक ज्ञान असण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ग्रंथकारानें आपल्या सणांसंबंधाची सर्व माहिती फार काळजीपूर्वक जमा करून ती पुस्तकामध्यें ग्रथित केली आहे. या ग्रंथाचा एक विशेष असा आहे कीं सणांविषयीं नुस्ती माहिती देऊन ग्रंथकार स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं प्रत्येक सणासंबंधानें टीकापर विवेचन केलें आहे व तें अनेक ठिकाणीं अत्यंत बोधपर व मार्मिक असें झालें आहे. दुसरा एक ह्या ग्रंथाचा विशेष आहे तो असा कीं जेथें जेथें विचारास न पटण्यासारखा सणवार आढळला तेथें तेथें त्यावर झांकण घालण्याचा प्रयत्न ह्यांत झालेला नाहीं. इतका

उपयुक्त, सुंदर ग्रंथ महाराष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबानें आपल्या संग्रहीं ठेवावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

**संदेश,** मुंबई. ( ता. २३ जुलै १९१६. )—एखाद्या विशिष्ट सणाचा मूळ उद्देश कोणता, त्यांत कालानुरूप फरक कसे होत गेले व त्यांस आज कसें स्वरूप प्राप्त झालें हें जाणूं इच्छिणारांस या पुस्तकांतील विवेचन उपयोगी पडणारें आहे. अशा तऱ्हेचा हा निःसंशय पाहिलाच प्रयत्न होय. या ग्रंथांत ठिकठिकाणीं जो विवेचन विस्तार दिसतो तो उपयुक्त असून ग्रंथकर्त्याच्या परिश्रमाचा व उत्साहाचा द्योतक आहे विद्यार्थ्यांनीं व एतद्विषयक ज्ञान संपादन करूं इच्छिणारांनीं हा ग्रंथ एक वेळ तरी वाचावा. त्यांस तो बोधप्रद वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

## नियतकालिकांतील अभिप्राय.

**विविधज्ञानविस्तार** ( पुस्तक ४७ अंक ११ )—या अंकांत आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास या पुस्तकावर आठ पृष्ठें टीकात्मक विवेचन आलें असून टीकाकारानें सदरहु पुस्तकासंबंधानें धन्योद्गार काढले आहेत. ते म्हणतातः—

हें अत्यंत बोधप्रद व मनोरंजक पुस्तक असून रा. ' ऋग्वेदी ' ह्यांनीं महाराष्ट्र भाषेच्या ज्ञानभाण्डारांत भर घातलीच आहे पण जागोजागीं जे प्रगल्भ विचार त्यांनीं ग्रथित केले आहेत व रसभरित शब्दांनीं जो कळकळीचा योग्य प्रसंगीं सदुपदेश केला आहे त्यामुळें त्यांनीं आपल्या महाराष्ट्रीय बांधवांस ऋणी केलें आहे. या त्यांच्या विचारांचें मनन करून त्यांच्या सदुपदेशाप्रमाणें जर आचार शुद्धि होईल तर त्यायोगानें विशुद्ध ईश्वरभक्तीचा व सात्त्विक आचारांचा परिपोष होऊन महाराष्ट्रीय जनतेचें अत्यंत कल्याण होईल. या ग्रंथाच्या एका मुख्य विशेषाचें कौतुक करणें भाग आहे. हें पुस्तक ग्रन्थकर्त्यानें अत्यन्त शुद्ध व उदात्त भावनेनें लिहिलें आहे. आपल्या देशबांधवांच्या आचारविचारांत जें त्यांस दूषणीय वाटलें, त्यावर त्यांनीं जशी खरमरीत टीका केली आहे तशीच जें श्लाघनीय आहे त्याचें कौतुक केलें आहे. आपल्या देशाच्या कल्याणाविषयीं त्यांचे मनांतील तळमळ प्रत्येक प्रकरणांत स्पष्ट दृष्टीस पडते.

**बालबोध**—( जुलै १९१६ ) या पुस्तकांत हिंदूंच्या सणांसंबंधानें माहिती आहे. पुष्कळ मेहनत घेऊन लिहिलेला हा ग्रंथ सर्वांच्या आदराला आणि आश्र-

याला पात्र आहे. 'प्रत्येक व्यक्तीच्या विचारांत चैतन्य उत्पन्न व्हावें व प्रत्येक व्यक्तीनें स्वत्त्वास न विसरतां नव्या दृष्टीनें आपल्या चालीरीती शुद्ध कराव्या हेंच माझें उद्दिष्ट आहे' हें ग्रंथकाराचें मनोगत सिद्धीस जाण्यास ह्या व्यापक स्वरूपाच्या ग्रंथाचा प्रसार होणें आवश्यक आहे. सर्वांनीं आश्रय द्यावा अशी आमची विनंति आहे.

## वाचकांकडून आलेले अभिप्राय.

**भिक्षु अखंडानंद** (मंत्री, सस्तुं साहित्यवर्धक कार्यालय), **अहमदाबाद**— आपका रचा हुआ ग्रंथ देखकर हमको बडा आनंद हुआ। ऐसे ग्रंथकी पूर्ण आवश्यकता थी; सो पूर्ण करके आपने अच्छा देशोपकार किया है। इस उत्तम ग्रंथके विषयमें आपको हमारा सानंद धन्यवाद है। ऐसे ग्रंथोंका भारतके प्रत्येक प्रान्तमें जीतना भी अधिक प्रचार हो उतना अच्छा है।

**श्रीयुत गंगाधर अमृत जोशी ( मिरज )** हें पुस्तक किती सर्वांगसुंदर आहे त्याजबद्दल लिहावें तितकें थोडें. पुस्तक वाचीत असतांना आर्यांचे थोरपणाबद्दल जो उदात्त विचार मनांत येतो तो जर बारमहा मनांत टिकेल तर वाचकाच्या उत्क्रांतिमार्गावर प्रकाश पडेल व त्याची विलक्षण प्रगति होईल. पुस्तकांत नमूद केलेले विचार व आर्यांच्या सणांच्या उत्पत्तीबद्दलचे हेतु विचारांत राहिल्यास वाचक श्रेष्ठ दर्जाला पोहोंचेल यांत शंका नाहीं.

वरील अभिप्रायांशिवाय आणखी किती तरी अभिप्राय ग्रंथकर्त्यांस आलेल्या खाजगी पत्रांतून व इतर अनेक वृत्तपत्रें व नियत कालिकें यांतून वाचकवर्गानें व्यक्त केले आहेत.

या प्रकारचें बुद्धीस चालन देणारें, स्वदेशप्रीति उत्पन्न करणारें, स्वत्वाची ओळख पटवून स्वाभिमानपूर्वक जनतेचें हित साधण्यास हुरूप आणणारें व ज्ञाननिधींत भर घालणारें पुस्तक आपल्या संग्रहीं ठेवून प्रत्येक सण प्राप्त होतांच त्यांतील विचार भावीपिढीच्या अंतःकरणावर बिंबवेण्यास आपण कसूर करणार नाहीं अशा आशा बाळगतों. आपण स्वतः एक पुस्तक मागवून व मित्रमंडळींतही त्याचा प्रवेश होईल असें करून आम्ही हातीं घेतलेल्या कार्यांत मदत करावी अशी विनंति आहे.

पत्ता—लक्ष्मीबाग,<br>भटवाडी, गिरगांव, मुंबई.

व्ही. प्रभा आणि कंपनी,<br>पब्लिशर्स.